# जोसेफ मॅझिनी

लेखक

आ. जोगळेकर, बी. ए.

१८२३
म. ग्रं. सं. ठाणे
विषय—चरित्र
सं. नं. २२२

सा[illegible] सर्वच लोक नेहमीं भाजीभाकरीच्या विवंचनेंत गढून गेलेले असतात, त्यांच्या जीवनाचा इतिहास कोणी लिहीत नाहीं. पण जनतेच्या अंतःकरणांत निष्ठेचा व ध्येयाचा उद्भव होतो तेव्हां राष्ट्राचा इतिहास स्फूर्तिदायक व सोन्याच्या अक्षरांत नमूद करून ठेवण्याच्या योग्यतेचा होतो. तात्विक ध्येयाला मूर्त स्वरूप प्राप्त व्हावें म्हणून आत्मसमर्पणाची अहमहमिका राष्ट्रामध्यें सुरू झाली कीं क्रान्ति घडून येते. राष्ट्रांच्या इतिहासांतील क्रान्तीचा काल चैतन्यमय असतो. इटलीची राज्यक्रान्ति हा आधुनिक इतिहासांतील अत्यंत अद्भुत काल होय. देशवीरांच्या आत्मसमर्पणामुळें अत्यंत स्फूर्तिदायक, ऑस्ट्रियाच्या जुलमामुळें अत्यंत करुण आणि परस्परविरोधी तत्वांच्या व व्यक्तींच्या झगड्यामुळें अत्यंत बोधप्रद अशा या क्रान्तीचा संपूर्ण इतिहास मराठी भाषेंत वाचावयास मिळत नाहीं; [illegible]चा पाया घातला व त्याच्या चरित्रांत या क्रान्तीचा [illegible]तो. क्रान्तिकालाचें ऐतिहासिक विवेचन व क्रान्ति-[illegible]ल चर्चा या ग्रंथांत केलेली आहे. मॅझिनीच्या आत्म-[illegible] जागा दिलेले आहेत यामुळें पुस्तकाची उपयुक्तता विशेषच वाढली आहे. मॅझिनीचे उदात्त विचार साररूपानें शेवटीं दिलेले आहेत.

REFBK-0002250

प्रकाशक

गणेश महादेव आणि कंपनी, ६२१ गिरगांवरोड, मुंबई

.RATHE L[illegible]ERS.
BOOKSELLERS,
Kadba's Galli, Ratansi's Chawl,
THANA.

# स्थळप्रत

म. ग्रं. सं. ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. २२५०
ता. ........
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
न. क्र. २२५०
ग्रंथ शाळा स्थळ प्रत

गणेश महादेव वीरकर यांनीं
'साहित्य सेवक' छापखाना, ९५–९७ गिरगांव बॅकरोड, मुंबई
येथें छापून
गणेश महादेव आणि कंपनी, ६२१ गिरगांव रोड, मुंबई
येथें प्रसिद्ध केलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ........
ता. ........
ठाणे.

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणे.

स्वर्गस्थ

प्रिय मातेच्या स्मरणार्थ

मराठी ग्रंथ संग्रहालय
....... नं. .......
ता. .........
ठाणे.

# अनुक्रमणिका.

| | |
|---|---|
| भूमिका. ... ... ... | ७ |
| जिनोआ. ... ... | ३३ |
| तरुण इटली. ... ... | ५२ |
| हद्दपार मॅझिनी. ... ... | ७९ |
| ‘ तरुण–युरप ’ व ‘ जीवनाचें रहस्य ’ ... | १०५ |
| लंडन–निवास. ... ... | १२४ |
| राज्यक्रांति. ... ... | १४९ |
| लोकसत्ताक रोम. ... ... | १७४ |
| सैतानांचें साम्राज्य ! ... ... | १९९ |
| मॅझिनी व काव्हूर. ... ... | २१९ |
| स्वातंत्र्ययुद्ध व विश्वासघात. ... | २३७ |
| राष्ट्रैक्य व राष्ट्रस्वातंत्र्य.... ... | २५२ |
| विविध विचार. ... ... | २८४ |
| माहात्म्य. ... ... | ३१० |

## गणेश महादेव आणि कंपनीचीं पुस्तकें.

| | | |
|---|---|---|
| १ | स्वराज्याचा श्रीगणेशा. | २-४-० |
| २ | स्वराज्याची घटना. | २-४-० |
| ३ | स्वराज्याची स्थापना. | २-४-० |
| ४ | स्वराज्याचा कारभार. | २-४-० |
| ५ | स्वराज्यावरील संकट. | २-४-० |
| ६ | मराठी रिसायत, मध्य वि. ३ | २-४-० |
| ७ | ब्रिटिश रियासत, पूर्वार्ध | ३-८-० |
| ८ | श्रीएकनाथ चरित्र. | ०-१२-० |
| ९ | अजिंक्य तारा. | १-८-० |
| १० | निकोलाय लेनिन. | ०-१२-० |
| ११ | ग्रेट ब्रिटनची शासनपद्धति. | ०-१०-० |
| १२ | नवजीवन ( नाटक. ) | ०-१०-० |
| १३ | जोसेफ मॅझिनी. | २-०-० |
| १४ | महात्मा गांधी. | २-०-० |
| १५ | मानवी कर्तव्यें. | १-०-० |

### इतर पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | मराठी रिसायत, पूर्वार्ध | ३-८-० |
| २ | मराठी रियासत, मध्यवि० २ | ३-०-० |

# आधारास घेतलेल्या ग्रंथांची यादी.

१-६ Autobiographical Writings & Works. Six Volumes. मॅझिनीचे समग्र लेख या सहा भागांमध्यें संकलित केलेले आहेत. मॅझिनीनें लिहिलेल्या आत्मचरित्रात्मक टीपांचे दोन भाग याच आवृत्तींत प्रसिद्ध झालेले आहेत.

७ Life of Mazzini. Bolton King. Everyman's Library चरित्र निःपक्षपातबुद्धीनें लिहिलेलें असून पुरवणीमध्यें मॅझिनीचीं कांहीं महत्वाचीं पत्रेहि दिलेलीं आहेत. युरपियन राजकारणाची व इतिहासाची वाचकास माहिती आहे हें गृहीत धरून सदरहू पुस्तक लिहिलेलें असल्यामुळें एवढया एकाच पुस्तकावरून वाचकास विषयबोध नीटसा होत नाहीं.

८ मॅझिनी:—घाणेकर; ग्रंथप्रकाशक आणि ग्रंथसंपादक मंडळी बडोदें. विभूतिपूजेच्या भरांत इतर महापुरुषांवर यथेच्छ तोंडसुख घेतलेलें या ग्रंथांत पहावयास मिळतें. इटलीच्या ऐतिहासिक उत्क्रांतीकडे पूर्ण दुर्लक्ष करून मॅझिनीच्या गुणवर्णनावरच लेखकानें भर ठेवला आहे.

९ Mazzini's Letters to an English Family. Edieted by E. F. Richards.

१० European Republicans. Linton. मॅझिनीच्या इंग्लंडांतील चळवळीचा वृत्तांत या ग्रंथांत विशेष विस्तृत दिलेला आहे.

११ Garibaldi's Defence of The Roman Republic.

१२ Garibaldi & The Thousand.

१३ Garibaldi & The Making of Italy. ट्रिव्हेलिन साहेबांनीं लिहिलेलीं गॅरिबॉल्डीवरील हीं तीनहि पुस्तकें इटलीच्या इतिहासाचें अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यानें वाचलींच पाहिजेत इतक्या महत्वाचीं आहेत. कोणी जिज्ञासू मॅझिनीचें असें विस्तृत चरित्र लिहील तर इतिहासभक्तांना त्याचा अत्यंत उपयोग होईल.

१४ गॅरिबॅाल्डी. केळकर, ग्रंथसंपादक व ग्रंथप्रकाशक मंडळीनें बऱ्याच वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलेलें हें पुस्तक लहान असलें तरी फार उपयुक्त आहे.

१५-१६ Cavour. Thayer. Two Volumes. हीं पुस्तकें उपयुक्त माहितीनें भरलेलीं असून ऐतिहासिक सत्यासत्यनिर्णयाच्या दृष्टीनेंहि यांची योग्यता फार मोठी आहे. काव्हूरची खरी योग्यता समजावयासाठीं हीं पुस्तकें वाचणें अत्यंत अवश्य आहे. काव्हूरचें चरित्रच नव्हे तर आधुनिक इट-लीचा इतिहास या पुस्तकांवरून स्पष्टपणें समजून येतो.

१७ काव्हूर: मुंडले: विभूतिपूजेला ध्येयापेक्षां अधिक महत्व दिल्यामुळें पूर्वग्रहदूषित विचार या पुस्तकांत शिरले आहेत.

१८ The Making of Modern Italy: Mary Clive Bayley. इटलीच्या उद्धाराचा मनोरंजक व विश्वसनीय इतिहास या पुस्तकांत वाचावयास मिळेल

१९ The Makers of Modern Italy: Marriott मॅझिनी, काव्हूर व गॅरिबॅाल्डी या तिघांचें इटलीच्या उद्धारांतील विशिष्ट कार्य कोणतें याचें विवेचन करून काव्हूर हाच इटालीचा जनक होय असा मेरियट साहेबांनीं निर्णय काढला आहे.

Modern Italy, The Liberation of Italy, The Birth of Modern Italy, वगैरे पुस्तकेंहि वाचनीय आहेत. मॅझिनीच्या लेखां-पैकीं Duties of Man (मानवी कर्तव्यें), Faith and Future (भाव आणि भवितव्य ) हे लेख Everyman's Library मध्यें थोडया किंम-तींत विकत मिळतात. त्याचप्रमाणें Scott Library मध्येंहि मॅझिनीचे निवडक लेख प्रसिद्ध झालेले आहेत. Alison Phillips नें लिहिलेल्या Modern Europe या ग्रंथांत मॅझिनीच्या कालाचें विवेचन चांगल्या रीतीनें केलेलें आहे.

# प्रस्तावना.

संग्रहालय नं. ...

आधुनिक कल्पनेचें स्वराज्य व राजकीय स्वातंत्र्य यांच्या नदीचा उगम एकोणिसाव्या शतकांत युरोपांत झाला. तेथून त्या नदीचें पाणी जगांतील इतर देशांवर पसरून त्यांतील जनतेच्या मनाची भूमी आजवर बरीच सुपीक झाली आहे. पण हें कार्य अद्यापि पूर्ण झालेलें नाहीं. निसर्ग-सृष्टींतील नदीचा उगम एकाद्या मनुष्याचे हातून निर्माण झाला असें पूर्ण शोधांतीं एकादे ठिकाणीं खरें ठरण्याचा संभव आहे. तें कसेंहि असो, पण मानवी स्वातंत्र्य बुद्धीच्या नदीचा उगम तरी मनुष्य व्यक्तींनींच उत्पन्न केलेला असतो यांत मात्र शंका नाहीं. हीं मनुष्यें देखील आपली स्फूर्ति ईश्वरी चैतन्यापासूनच घेतात. तथापि स्वर्गंगा ही भगीरथाच्या प्रय-त्नानें प्रथम पृथ्वीवर अवतरली व तो पुढें होऊन दारुवीत जाईल त्या मार्गानें वहात गेली, म्हणून तिला भागीरथी हें मनुष्योत्पत्तिदर्शक नांव मिळालें. तसाच प्रकार स्वातंत्र्यगंगेचाहि होय. यामुळेंच, स्वातंत्र्याची कल्पना वास्तविक अनादि असली तरी रूसो, टॉमस पेन, मॅझिनी अशा मनुष्यांच्या नांवाशींच आधुनिक लौकिक इतिहासांत ती निगडित होऊन राहिली आहे.

मॅझिनीचें कार्य युरोपांत इतकें बळावलें आहे कीं सृष्टिनियमाप्रमाणें त्याचें नांव तेथील लोक आतां विसरूंहि लागले आहेत. पण हिंदुस्थान-सारख्या मागसलेल्या देशांत त्याचें नांव निघतांच स्वातंत्र्य स्फूर्तीची ठिणगी अद्यापि पडावी यांत आश्चर्य नाहीं. हिंदुस्थानांतील इतर देशी भाषांतून मॅझिनीचीं चरित्रें पूर्वीं कोणी लिहिलीं होतीं कीं नाहीं हें मला माहीत नाहीं, पण महाराष्ट्रांत राष्ट्रीय चळवळ नांवारूपाला आली तेव्हां मॅझिनीचें चरित्र मराठींत प्रथम लिहिलें गेलें, व अजूनहि त्याचीं चरित्रें निरानिराळे लेखक लिहितच आहेत. बडोद्याच्या ग्रंथमालेंतील मॅझिनीचें चरित्र आतां कोणी फारसें वाचीत नाहीं. सावरकरांचा मॅझिनी जप्तींत निघाला. पण मॅझिनीचें

चरित्र ऐकण्याची मराठी वाचकांची इच्छा अद्यापि तृप्त झालेली नाहीं. म्हणून हल्लीं श्री. जोगळेकर यांनीं प्रसिद्ध केलेलें हें पुस्तक सर्वत्र मोठ्या आस्थेनें व कौतुकानें वाचलें जाईल असें मला वाटतें.

मॅझिनीचा वृत्तांत खरोखरच फार अद्भुत आहे. त्याचें सात्विक-भावना-प्रधान मन, उच्च ध्येय, धाडसी कल्पना, पण ती सिद्धीस नेण्याची व्यावहारिक अपात्रता, कट, बंडें, हद्दपारी, फांशीची शिक्षा, जगद्विख्याति वगैरे भावना थरारून सोडणाऱ्या गोष्टी त्याच्या चरित्रांत पदोपदीं आढळतात. हल्लींच्या सुधारलेल्या काळांत देखील अशा गुणावगुणमिश्रणानें आश्चर्यकारक व भीतिप्रद स्फोट होऊं शकतात. मग शंभर वर्षां पूर्वींच्या काळीं ते झाले असल्यास नवल नाहीं. इटालीची स्थितीच या काळीं तशी चमत्कारिक होती. ऑस्ट्रि-याचें परकी राज्य व स्वदेशी संस्थानिक अशा दुहेरी वस्त्रांतून खालीं पडलेला वस्त्रगाळ मासलेवाईक जुलूम इटालियन लोकांना लाभला होता. शिवाय उज्ज्वल पूर्वपीठिका हें जें एक उद्दीपन कारण राष्ट्रीय भावनेला असतें तें इटाली इतकें दुसऱ्या कोणत्याहि युरोपियन राष्ट्राला लाभलेलें नव्हतें. यामुळें सर्व तऱ्हेची अद्भुत कारस्थानें व चळवळी इटालींतच त्या शतकांत प्रथम जन्मास आल्या. फ्रान्सच्या राज्यक्रांतीचें उदाहरण ताजें डोळ्यांपुढें होतें, पण फ्रेंच लोकांना आपण कांहीं एक नवीन कृत्य केल्यावर प्रौढी मिरवितां आली तरी, इटालियन लोकांप्रमाणें, आमचें जुनें स्वातंत्र्यच आम्हीं परत मिळवीत आहों अशा पुराणपुनीत कल्पनेचें ऐश्वर्य त्यांना नव्हतें. फ्रान्समध्यें नवीन बनावट झाली पण इटालीमध्यें राष्ट्रीय भावनेचा जीर्णोद्धार झाला; व आज झालें तरी इटालींतील तरुण फॅसिस्ट पक्ष याच ऐश्वर्यांत मनानें झुलत आहे.

तथापि, एक गोष्ट कबूल केली पाहिजे ती ही कीं, मॅझिनी हा प्रत्यक्षापेक्षां कल्पनागम्य गोष्टींत अधिक रमणारा ध्येयवादी होता; इतकेंच नव्हे तर खरोखर दिक्कालातीत तात्विक मानवी स्वातंत्र्याचा तो इतर

इटालियन राष्ट्रभक्तांपेक्षां अधिक भोक्ता होता. कर्तृत्वापेक्षां तत्वज्ञानाची शुद्धता हाच त्याच्या अंगचा अधिक प्रमुख गुण म्हणतां येईल. या दृष्टीनें पाहतां ग्यारीबाल्डी व मॅझिनी यांच्या पिंडरचनेंतील सूक्ष्म फरक कौतुकास्पद ठरतो. पण मनाची तारांबळ उडविण्यास या दोन विभूति जणूं काय पुरेशा नाहींत म्हणूनच कीं काय कॅव्हूर व व्हिक्टर-इ-मंन्यूएल या व्यक्ति त्याबरोबरच नजरेसमोर येतात, आणि राष्ट्रीय रसात्मक विविध भावनांच्या नाटकांत हा तत्वज्ञानी अधिक श्रेष्ठ कीं तो वीर अधिक श्रेष्ठ, तो मुत्सद्दी अधिक श्रेष्ठ कीं तो कर्ता राजा अधिक श्रेष्ठ असे अवघड प्रश्न सुचून गोंधळ वळावतो. पण या प्रश्नांचें सविस्तर उत्तर येथें देत बसण्याचें कारण नाहीं. इतकें मात्र खास म्हणतां येईल कीं कॅव्हूर व व्हिक्टर–इ–मॅन्युअल यांच्यापेक्षां ग्यारीबाल्डीची व ग्यारीबाल्डीहूनहि मॅझिनीची आठवण जग अधिक कृतज्ञताबुद्धीनें काढतें. आधुनिक स्वातंत्र्य-कल्पनेचें धर्ममूल मॅझिनींतच आहे असें समजलें जातें व प्रजाजनांच्या स्वातंत्र्यबुद्धीला एवढा नैतिक आधार ज्यानें मिळवून दिला त्याचा उपकार जगावर खरोखरच मोठा म्हटला पाहिजे.

असो. मॅझिनीच्या चरित्रासंबंधानें विवेचनापेक्षां त्याचें प्रत्यक्ष चरित्र वाचणें हेंच केव्हांहि अधिक चित्ताकर्षक व बोधप्रद असणार. म्हणून श्री. जोगळेकर यांनीं मराठी वाचकवर्गापुढें ठेवलेल्या चमचमित भोजनाचे आड अधिक न येतां ही प्रस्तावना पुरी करतों.

पुणें ता. १० अक्टोबर १९२३.

न. चिं. केळकर.

# दोन शब्द.

युरपियन राष्ट्रांचे इतिहास वाचीत असतांना इटालियन राज्यक्रान्तीचा विशेष अभ्यास करून या विषयावर मराठींत एकादा ग्रंथ लिहावा असें वाटूं लागलें. पांच सात वर्षांच्या अभ्यासानंतर ह्या विषयावर ग्रंथ लिहिण्याची कल्पना अशक्य म्हणून जवळ जवळ सोडून दिली होती. विस्तृत व संपूर्ण इतिहास लिहिणें शक्य नसलें तरी या क्रान्तीच्या आद्यप्रणेत्याचें चरित्र लिहिणें शक्य व जरूर आहे असें ठरवून चरित्रलेखनाचें काम हातीं घेतलें. मॅझिनी वाङ्मयाशीं मराठी वाचकांचा विशेष परिचय नसल्यामुळें 'मानवी कर्तव्यें' हा निबंध-संग्रह प्रथम प्रसिद्ध करावा आणि नंतर चरित्र प्रसिद्ध करावें असा कांहीं साहित्यसेवकांचा अभिप्राय पडला व तो मान्यहि झाला. १९२१ सालीं 'मानवी कर्तव्यें' हें पुस्तक प्रसिद्ध झालें; वृत्तपत्रकारांनीं चांगले अभिप्राय देऊन व महाराष्ट्र—वाचकांनीं चांगला आश्रय देऊन उत्तेजन दिल्यामुळें चरित्र लेखनाविषयीं विशेष हुरूप वाटूं लागला. बऱ्याच वर्षांपासून मनांत बाळगलेली व जोपासना केलेली इच्छा आज पुरी होत आहे.

चरित्र लिहितांना ऐतिहासिक विवेचनपद्धति स्वीकारलेली आहे. मॅझिनीच्या शिकवणुकींतील एकाच तत्वाचा पुरस्कार करून त्या तत्वाच्या अनुरोधानें ग्रंथाची मांडणी केलेली नाहीं; त्याचप्रमाणें मॅझिनीच्या गुणवर्णनाच्या ओघांत इटलीच्या इतर उद्धारकांवर अपशब्दांचा वर्षाव केलेला नाहीं. मॅझिनीच्या चरित्राला आरंभ झाला त्यावेळीं इटलीच्या राष्ट्रीय जीवनांत धुगधुगी मात्र शिल्लक राहिलेली होती; म्हणून पहिल्या भागांत चरित्राला प्राधान्य व इटलीच्या उत्क्रान्तीला दुय्यम स्थान दिलेलें आहे; इटलीचें राष्ट्रीय जीवन जसजसें जोरदार होत चाललें तसतसें मॅझिनीच्या वैयक्तिक जीवनाला दुय्यम स्थान दिलेलें आहे. मॅझिनीच्या आयुष्याला सुरवात झाली त्यावेळीं इटलीच्या राष्ट्रैक्याच्या व स्वातंत्र्यसाधनाच्या कार्याला सुरवात झालेली नव्हती; मॅझिनीचें आयुष्य संपूर्ण झालें त्याच सुमारास हें कार्य पुरें झालें. इटलीच्या स्वातंत्र्याचा पाया मॅझिनीनेंच घातला व त्या पायावर उभारलेल्या मंदिरावर रोमचा कळस चढलेला त्यानेंच पाहिला, इटलीच्या क्रांतीचा इतिहास मॅझिनीच्या चरित्राशीं निगडित झालेला आहे; हा

इतिहास वाचावयास मिळेल अशा रीतीनेंच या चरित्राची मांडणी केलेली आहे. मॅझिनीचे विचार वाचकांना त्याच्याच शब्दांत वाचावयास मिळावे यासाठीं त्याच्या आत्मचरित्रात्मक टीपांतील निवडक उताऱ्यांचीं भाषांतरें जागोजाग मूळ मजकुरास जोडलेलीं आहेत. धर्म, नीति, राजकारण व राष्ट्रधर्म या विषयांवरील मॅझिनीचे विचार साररूपानें एकत्र करून शेवटीं वेगळ्या प्रकरणांत दिलेले आहेत. इटलीचा संगतवार इतिहास माहीत नसला तर कित्येक प्रसंगीं घोंटाळा उडतो; असें होऊं नये म्हणून इटलीच्या स्वातंत्र्यसाधनाचा संपूर्ण इतिहास भूमिकेंत दिलेला आहे.

महाराष्ट्र–साहित्यसेवकांचे अग्रणी दे. भ. नरसिंह चिंतामण केळकर यांनीं प्रस्तावना लिहून दिल्यामुळें या पुस्तकास विशेषच शोभा आली आहे. कामाकाजाची गर्दी असतांहि त्यांनीं प्रस्तावना लिहून दिली याबद्दल त्यांचे आभार कसे मानावे हेंच मला कळत नाहीं. हें चरित्र लिहीत असतांना मला अनेक इष्टमित्रांचें साह्य झालेलें आहे; विशेषत: श्री. वा. प्र. ओक; श्री. वि. स. बखले; श्री. शंकरराव जोगळेकर व श्री. वामनराव आपटे यांनीं वेळोवेळीं मदत केली नसती तर हें पुस्तक इतक्या लवकर संपूर्ण व प्रसिद्ध झालें नसतें. बाह्यांगाच्या सुंदरतेचें सारें श्रेय प्रकाशक श्री. गणेश महादेव वीरकर यांना आहे, याबद्दल त्यांचेहि आभार मानणें जरूर आहे.

माझी ही द्वितीय कृति महाराष्ट्रास प्रिय होईल अशी आशा आहे.

मुंबई
ता. ५ डिसेंबर १९२३

**स. आ. जोगळेकर.**

---

## सूचना.

(१) पान ३३ वर ता. १२ च्या ऐवजीं ता. २२ वाचावी.

(२) पान २३७ वर Country's च्या ऐवजीं enemies' वाचावें.

# भूमिका

## इटलीचें स्वातंत्र्यसाधन.

"Who would be free, themselves must strike the blow"

*Byror*.

युरोपियन संस्कृतीचा उद्भव ग्रीस व इटली या देशामध्यें झाला. रोमन साम्राज्याचे वेळीं इटली देश वैभवाच्या अत्युच्च शिखरावर होता. संपूर्ण जगतावर एकाच साम्राज्याचा विस्तार असावा, सर्वांनीं एकाच कायदा पाळावा व जगताच्या जीवनाला व्यवस्थितपणा प्राप्त व्हावा यासाठीं रोमन लोकांनीं अनेक संस्था निर्माण केल्या. उदात्त तत्वांना मूर्त स्वरूप प्राप्त व्हावें यासाठीं त्या तत्वांचा प्रचार करणाऱ्या व्यक्तींचे ठिकाणीं असाधारण स्वार्थत्याग असावा लागतो; रोमन लोकांना आपल्या महत्वाकांक्षेपुढें व यशामुळें प्राप्त होणाऱ्या सुखसाधनांपुढें उच्च तत्वांचा विसर पडला. जनता कर्तव्यभ्रष्ट झाल्यामुळें रोमच्या वैभवशाली साम्राज्याला उतरती कळा लागली. रानटी लोकांच्या स्वाऱ्यांमुळें रोमच्या साम्राज्याचा नाश झाला खरा पण युरोपांतील इतर राष्ट्रांनीं ग्रहण केल्यामुळें रोमन संस्कृति जिवंत राहून जगताच्या प्रगतीस धोका आला नाहीं.

रोमन साम्राज्याच्या अंतानतर इटलीचा मुलूख काबीज करावयासाठीं अनेक वर्षें हिसकाहिसक चालली होती. इ. स. ५५५ मध्यें इटली देश बाइझान्टाइनच्या साम्राज्यास जोडण्यांत आला. वीस पंचवीस वर्षांच्या आंतच इटली प्रांत उत्तर युरपमधील लॉंबर्ड लोकांचे ताब्यांत गेला. इटलीवर त्यांचा अंमल सुमारें दोन शतकेंपर्यंत चालला. इ. स. ७७४ मध्ये फ्रँक लोकांचा राजा चार्लस् दि ग्रेट यानें पॅव्हियाच्या लढाईत लॉंबर्डांचा पूर्ण पराभव केला.

इकडे ही हिसकाहिसक चाललेली असतांना रोम शहरांत रोमन साम्राज्याच्या सामर्थ्याला न जुमानतां स्थापन झालेल्या ख्रिश्चन धर्माच्या आद्यगुरूंच्या पीठाचें महत्व दिवसानुदिवस वाढतच होतें. पोपला व त्याच्या हुकमतींतील धर्माधिकाऱ्यांना अनेक सवलती व हक्क देऊन चार्लस् दि ग्रेट यानें सुप्रसन्न ठेविलें होतें. याचवेळीं कांहीं धर्मविषयक बाबतींत पोपचा पूर्व रोमन बादशाहीशीं तंटा उपस्थित झाला होता; त्या साम्राज्याशीं असलेला आपला संबंध तोडून टाकून इटलीमध्यें पश्चिम रोमन साम्राज्याची संस्थापना करावी म्हणजे पूर्व रोमन बादशाहीचा प्रतीकार केल्यासारखें होईल व युरपमध्यें आपलें वजन वाढेल—असा मुत्सद्देगिरीचा विचार करून पोपनें अगोदरच लोकप्रिय झालेल्या चार्लस्‌ला इ. स. ८०० मध्यें रोम शहरांत साम्राज्याभिषेक केला. पोपच्या अनुमतीनें हें साम्राज्य अस्तित्वांत आलें, म्हणून त्याला "पवित्र रोमन साम्राज्य" ही संज्ञा प्राप्त झाली. हें साम्राज्य एक हजार वर्षें अस्तित्वांत होतें.

चार्लस्‌च्या मृत्यूनंतर इटलीमध्यें भयंकर अंदाधुंदी माजली. त्याचे वंशज कर्तृत्वहीन होते, शिवाय त्यांची संख्या फार मोठी होती; यामुळें प्रदेशाच्या वांटणीसंबंधीं त्या घराण्यांतील राजपुत्रांमध्यें कलह उत्पन्न झाला आणि यांतच एकामेकांनीं एकामेकांची वाट लावली. राजघराण्यांतील गृहकलहामुळें इटलीची राजसत्ता निर्बल झाली. या धांदलींत व्हेनिस, फ्लॉरेन्स, मिलान वगैरे शहरांनीं आणि अनेक जहागीरदारांनीं केंद्रवर्ती राजसत्ता झुगारून दिली. वाढत्या सामर्थ्याबरोबर त्यांचेमध्येंहि वर्चस्वासाठीं युद्धें होऊं लागलीं. या सर्व गोंधळांत पोपांच्या महत्वाकांक्षेची भर पडली; त्यांचें धर्मविषयक प्रभुत्व सर्व युरपनें मान्य केलें होतें; स्वतःच्या ताब्यांत एक स्वतंत्र राज्य असावें या इच्छेनें त्यांनीं आज एका जहागीरदाराला तर उद्यां दुसऱ्याला मदत करावयास आरंभ केला. जिकडे तिकडे लढाया चालू असल्यामुळें शेतकी व व्यापारधंदा पार बुडाला आणि देशामध्यें रोगराईचा सुकाळ झाला.

जर्मनीच्या सॅक्सन घराण्यांतील ओटो धि ग्रेट ह्यानें इ. स. ९५१ मध्यें इटलीवर स्वारी करून तेथें आपला अंमल बसविला. नंतर रोममध्यें त्याला साम्राज्याभिषेक झाला. इ. स. १००२ मध्यें सॅक्सन घराणें लयाला जाऊन त्याच्या जागीं फ्रँकोनियन घराणें आलें. बादशाही घराणें व पोपांची गादी यांमध्यें अगोदरपासूनच वितुष्ट आलें होतें. राजकीय दृष्टया बादशहानें आपणांस पूर्णपणें स्वतंत्र मानावें असें पोपचें म्हणणें होतें; उलटपक्षीं पवित्र रोमन साम्रा-

ज्याच्या अधिपतींना पोपांचें धार्मिक सार्वभौमत्व मान्य होतें. साम्राज्यसंस्थापनेमध्यें पोपांनीं फार महत्वाचा भाग घेतला होता एवढ्या जोरावर पोप हिल्डेब्रांड यानें बादशहा चवथा हेन्री यास बहिष्काराची धमकी देऊन त्याजकडून पोपांचें धार्मिक व राजकीय सार्वभौमत्व कबूल करून घेतलें. अडचणींत अडकलेल्या बादशहानें त्यावेळीं मान्यता दिली खरी, पण योग्य संधि मिळतांच पोपांच्या राजकीय स्वतंत्रतेचा त्यानें इनकार केला. अर्थातच धर्मगुरू व बादशहा यांचेमधील कलहाला पुन्हां आरंभ झाला.

नंतर होहेनस्टाउफेन घराण्याला समाट्पद प्राप्त झालें. या घराण्यांतील फ्रेडरिक बारबरोझा यानें लोकसत्ताक शहरांचें व प्रबल जहागीरदारांचें स्वातंत्र्य चिरडून टाकावयाचा फार जोराचा प्रयत्न केला. त्यांनींहि आपला संघ स्थापन करून लेग्यानोच्या लढाईत बादशहाचा पूर्ण पराजय केला. इ. स. १२७३ मध्यें हॅप्सबर्ग घराण्यानें साम्राज्यपद मिळविलें. इटलीवर आपला एकछत्री अंमल बसविण्यासाठीं करण्यांत आलेले सर्व प्रयत्न निष्फल झालेले आहेत हें पाहून या घराण्यांतील बादशहांनीं इटलींतील मुलुखाकडे दुर्लक्ष करावयाचें ठरविलें. बादशाही सत्ता नामधारी झाल्यामुळें इटलीमध्यें अनेक स्वतंत्र संस्थानें अस्तित्वांत आलीं; त्यांपैकीं मिलान, व्हेनिस, नेपल्स, फ्लॉरेन्स, पोपचें राज्य व नेपल्स हीं मुख्य होत. व्हेनिसची सत्ता कांहीं श्रीमान् व्यापारी घराण्यांच्या ताब्यांत होती. फ्लॉरेन्समधील लोकसत्ता मेडीसी घराण्याच्या तंत्रानें चालत असे. पोपच्या राज्यांत धर्मगुरु सत्ताधारी होते; पोपच्या अनुयायांचा गेल्फ तट व बादशहाच्या तर्फेचा घिबेलाइन पक्ष असे दोन तट तेथें असून त्यांचेमध्यें नेहमीं युद्धें होत असत.

पंधराव्या व सोळाव्या शतकांत युरोपांतील राष्ट्रांना संघटित स्वरूप प्राप्त होऊं लागलें. देशांतील राजकीय सत्ता सर्वस्वीं राजकर्त्यांच्याच हातीं असावी व डोईजड झालेल्या सरंजामी सरदारांच्या सामर्थ्याला आळा घालावा हा त्या वेळीं मुत्सद्दिगिरीचा प्रधान मार्ग मानण्यांत येत असे. इतर देशांना संघटित स्वरूप प्राप्त झालें पण इटलीमध्यें पूर्वीचाच गोंधळ कायम राहिला—कारण तेथील संस्थानिकांचे सामर्थ्य सारख्याच प्रतीचें होतें आणि इतरांस जिंकून संपूर्ण इटली आपल्या ताब्यांत घेईल असा जोर मनगटांत असलेला वीरहि इटलींत निपजला नाहीं. इटलींतील संस्थानिकांच्या आपसांतील लढाया सदैव चालू असल्यामुळें लोकांच्या मनांत प्रांतिक अभिमान उत्पन्न झाला

आणि एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचा जनतेला पूर्ण विसर पडला. इटलीच्या ऐक्याच्या मार्गांत पोपचें राज्य हा एक मोठाच अडथळा होता. इटलीचें एकीकरण म्हणजे आपल्या राज्याची समाप्ति होय ही गोष्ट धर्मगुरूंना पूर्णपणें माहीत होती आणि म्हणूनच त्यांनीं आग्रह धरला होता कीं, पोपच्या ऐहिक सत्तेला धोका आल्यास त्याचें पारमार्थिक सामर्थ्यहि नष्ट होईल! भोळ्या व धार्मिक इटालियन जनतेला त्याचें म्हणणें खरें वाटे!

या अंदाधुंदीचा इटालियन लोकांच्या दानतीवर फारच वाईट परिणाम झाला; त्यांचा धार्मिक व नैतिक अध:पात झाला; स्वदेश, स्वधर्म, स्वाभिमान, स्वार्थत्याग वगैरे उच्च भावनांचा सर्वस्वीं लोप झाला. इटलीच्या या मन:स्थितीचें प्रत्यंतर मॅकॅन्हेलीच्या प्रिन्स या ग्रंथांत पहावयास सांपडतें. राष्ट्राच्या अंत:करणांतील जोम नष्ट झाल्यावर जुलूम व पारतंत्र्य सहन करावयाचा निलाजरेपणा जनतेमध्यें उत्पन्न होतो. इटलीभर साऱ्या युरपियन सत्ताधाऱ्यांनीं हवा तसा धिंगाणा घालावा व त्याला जनतेकडून मुळींच विरोध होऊं नये ही गोष्ट अगदीं नैसर्गिक झाली होती. सोळाव्या शतकांत इटली स्पेनच्या ताब्यांत गेला; नंतर स्पेनची जागा ऑस्ट्रियानें बळकावली. तेव्हांपासून स्वतंत्र होईपर्यंत इटली ऑस्ट्रियाच्याच ताब्यांत होता.

पंधराव्या व सोळाव्या शतकांत इटलीची राजकीय परिस्थिति अशी बेबंदशाहीची होती तरी याच शतकांमध्यें इटलीच्या वैभवाचा व संस्कृतीचा कळस झाला होता. इटालियन कवि, लेखक, चितारी, पंडित व शास्त्रज्ञ यांची ख्याति जगभर झाली होती; व्हेनिस, फ्लॉरेन्स, जिनोआ व रोम या शहरांमधील सरस्वतीमंदिरांत ज्ञान संपादन करावयासाठीं देशोदेशींचे विद्यार्थी इटलींत लोटत होते. सतराव्या शतकांत कोलंबसानें अमेरिकेचा शोध लावल्यामुळे व्यापाराचा प्रवाह ॲटलांटिक महासागराकडे वळला व मेडिटरेनियन समुद्रांतली रहदारी कमी झाली; यामुळें इटलींतील बंदरांना उतरती कळा लागली. देशांतील संपत्ति ओसरूं लागल्यामुळे इटलीची संस्कृति हीणकस होऊं लागली. मोठ्या नांवाचा डोलारा कसाबसा उभा ठेवण्यांतच इटालियनांच्या शक्ति क्षीण होऊन गेल्या. अठराव्या शतकांत इटलीच्या इतिहासांत अंदाधुंदी, लहानसहान संस्थानिकांची आपसांतील यादवी, याशिवाय कांहींच आढळत नाहीं. गरीबी व अज्ञान यामुळें इटली मृतवत् झाला होता पण फ्रान्सच्या राज्यक्रान्तीच्या रणशिंगाचा आवाज कानीं पडतांच इटली खडबडून जागा झाला.

फ्रेंच क्रांतीच्या सुमारास ( १७८९ ) इटलीची स्थिति अत्यंत निराशाजनक झाली होती. इटलीची विभागणी अनेक संस्थानांमध्यें झाली होती; त्यांपैकीं सार्डीनिया, मॉडेना, टस्कनी, नेपल्स, सिसिली वगैरे संस्थानें राजसत्ताक होतीं; जिनोआ, व्हेनिस वगैरे संस्थानें लोकसत्ताक होतीं; इटलीचा मध्यभाग पोपच्या ताब्यांत होता आणि मिलन व मँटुआ हे प्रांत ऑस्ट्रियाच्या ताब्यांत होते. रोमन संस्थानांत धर्मगुरूंच्या अंमलाखालीं बेबंदशाही चालली होती व दक्षिण इटलीमध्यें शेतकऱ्यांवर जुलमाचा कहर गुदरला होता. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या फ्रेंच कान्तीच्या तत्वत्रयींमुळें इटालियन जनता जागृत झाली. फ्रान्सच्या गांजलेल्या रयतेनें जुलमी राजसत्ता उलथून पाडलेली पाहून आपणहि तसेंच करावें असे विचार इटालियनांचे मनांत येऊं लागले. आपणांवर जुलूम करणारे संस्थानिक व त्यांना पाठबळ देणारा ऑस्ट्रिया यांची सत्ता उलथून पाडावयासाठीं त्यांनीं प्रयत्न सुरू केले. राज्यक्रान्तीच्या तत्वांचा प्रसार बुद्धिविकासाच्या मार्गानेंच होत राहिला तर युरपियन राष्ट्रांच्या जागृतीस फार काळ लागेल म्हणूनच कीं काय—जगत्सूत्रधारानें युरपच्या रंगभूमीवर आपली करामत करून दाखविण्याची नेपोलियनला बुद्धि दिली !

फ्रेंच लोकशाहीला ऑस्ट्रिया कसून विरोध करीत होता. इटलीचे संस्थानिक ऑस्ट्रियाचे ताबेदार असल्यामुळें त्यांनीं एकजूट होऊन फ्रान्सवर हल्ला चढवावा असें व्हिएना दरबारचें मत होतं; पण आपसांतील यादवीमुळें त्यांची एकजूट झाली नाहीं. पीडमाँट संस्थाननें मात्र ऑस्ट्रियाच्या वतीनें फ्रान्सबरोबर युद्ध पुकारलें ( १७९२ ). पहिल्याच चढाईंत फ्रेंच लोकशाहीच्या सैन्यानें सॅव्हाय व नीस हे प्रांत काबीज केले. १७९५ सालीं टस्कनी व नेपल्सच्या संस्थानिकांनीं फ्रान्सबरोबर तह केला. १७९६ सालीं इटलींतील मोहिमेचें आधिपत्य नेपोलियनकडे येतांच त्यानें पीडमाँटच्या सैन्याचा धुव्वा उडवून दिला. त्यानें ऑस्ट्रियन सैन्याचा जागोजाग पराभव केलेला पाहून इटालियन संस्थानिकांनीं फ्रान्सबरोबर हव्या त्या अटींवर तह करावयाचा मार्ग स्वीकारला ! युद्ध चालू असतांनाच त्यानें इटलीच्या पुनर्घटनेचा बेत आंखून ठेवला होता. ऑस्ट्रियन लॅाम्बर्डी, आणि मध्य व उत्तर इटलीमधील संस्थानें सिसेल्पाइन रिपब्लिक या नांवाखालीं एकीकृत करण्यांत आलीं. ( १७९७ ) याच वर्षीं जिनोआ संस्थानच्या जागीं लिगुरियन रिपब्लिक स्थापन करण्यांत आलें. या लोकसत्ताक संस्थानांची राज्यघटना फ्रान्सच्या

र्तीवर रचण्यांत आली होती; आरंभींच प्रतिगामी पुढाऱ्यांचा राज्यकारभारांत शिरकाव होऊं नये म्हणून कायदेमंडळांचे सभासद व अंमलबजावणी खात्यांतील अधिकारी खुद्द नेपोलियननेंच नेमून दिले होते ! १७९७ सालीं कँपो फोर्मियो येथें ऑस्ट्रिया व फ्रान्स यांच्या तहाच्या कच्च्या अटी कायम करण्यांत आल्या. सिसेलपाइन रिपब्लिकमध्यें सामील केलेल्या ऑस्ट्रियन मुलखांच्या मोबदल्यासाठीं व्हेनीशिया प्रांत ऑस्ट्रियाला द्यावयाचें ठरलें. १७९८ सालीं ऑस्ट्रियानें व्हेनीस शहर कबजांत घेऊन तेथील ११०० वर्षें जीव धरून राहिलेल्या लोकशाहीचा अंत केला ! पुढें नेपोलियन इजिप्तवर स्वारी करावयास गेला तेव्हां इटलींतील कांहीं संस्थानिकांनीं फिरून उठावणी केली; पण फ्रेंच सैन्यानें व मोहिमेहून परत आल्यानंतर त्यांच्या सेनापतीनें या बंडखोरांचा पराभव केला. आपल्या गैरहजिरींत शिरजोर झालेल्या ऑस्ट्रियाचा नेपोलियननें मेरेंगो येथें पराभव केला ( १८०० ). नंतर ऑस्ट्रियानें कँपो फोर्मिओच्या तहाच्या सर्व अटी मान्य केल्या, सिसेलपाइन व लिगुरियन लोकशाहींना मान्यता दिली आणि बटेव्हियन व हेल्व्हेटिक लोकशाहींचें स्वातंत्र्य कबूल केलें. १८०२ सालीं नेपोलियनला इटालियन लोकशाहीचा अध्यक्ष नेमण्यांत आलें. १८०४ सालीं नेपोलियन फ्रान्सचा बादशहा झाला. १८०५ सालीं मिलन येथील देवळांत त्यानें इटलीचा लोखंडी राजमुकुट धारण केला; नंतर सिसेलपाइन व लिगुरियन लोकशाहींमध्यें फ्रेंच बादशाहीला आरंभ झाला. १८०६ सालीं नेपल्स, १८०७ सालीं टस्कनी व १८०९ सालीं रोम हीं संस्थानें नेपोलियननें खालसा करून आपल्या मुलखांत सामील करून घेतलीं.

नेपोलियनच्या अंगांत इटालियन रक्त खेळत होतें. इटलीबद्दल त्याचे विचार फार उदार होते. " इटली हें एक राष्ट्र आहे; सर्व देशभर लोकांच्या आचारविचारांत आणि भाषा व वाङ्मय यांमध्यें ऐक्यभाव दिसून येतो. आज नाहीं उद्यां, इटलीवर एकच राज्यपद्धति चालू होईल आणि रोम हेच इटलीच्या राजधानीचें ठिकाण होईल ! " संट हेलिना येथें नेपोलियननें काढलेले हे उद्गार खरे ठरले आहेत. फ्रेंच क्रांतिकारकांचा सेनापति या नात्यानें त्यानें इटालियन संस्थानिकांना धुळीस मिळविलें, जनतेला लोकशाहीची चटक लावली, सरंजामी पद्धतीची विषमता व जुलूम नाहींसे केले आणि इटालियनांना प्रगमनशील राज्यपद्धतीची प्रत्यक्ष कल्पना आणून दिली. नेपोलियनच्या बादशाहींत इटालियनांना त्याच्या युद्धासाठीं कर व सैनिक द्यावे लागले; १८१२ सालच्या रशि-

याच्या स्वारींत सुमारें २७००० इटालियन सैनिक गारद झाले ! पण त्यानें कायद्यांची विषमता नाहींशी केली होती, लोकांना वैयक्तिक व धार्मिक स्वातंत्र्य दिलें होतें, हजारों रुपये खर्चकरून फ्रेंच इंजिनियरांनीं इटलीमध्यें जागोजाग नवे रस्ते, पूल व कालवे बांधले होते. शिक्षणाच्या दृष्टीनेहि या अमदानींत इटलीची विलक्षण प्रगति झाली. पूर्वीच्या बेबंदशाहींत अनेक शतकें लोटूनहि जेवढी प्रगति झाली नसती तेवढी सामाजिक, आर्थिक व नैतिक प्रगति या अल्प कालांत झालेली इटालियनांना दिसून आली. पण परक्यांनीं जबरदस्तीनें लादलेल्या सुधारणांमध्यें आनंद मानून निष्क्रिय राहण्यापेक्षां इटालियनांनीं मनगटाच्या जोरावर स्वातंत्र्य, राष्ट्रैक्य व प्रगति हीं संपादन करावींत असाच परमेश्वराचा संकल्प असल्यामुळें सिंहासनांचा खेळ करणारा जादूगार व समरदेवतेचा लाडका पुत्र दैवाबरोबर विश्वव्यापी साम्राज्याचा पण लावून द्यूत खेळत असतांना जिंकला गेला ! १८१४ सालीं आपखुषीनें राज्यत्याग करून नेपोलियन एल्बा बेटांत राहिला होता तेव्हां युरपियन राज्यांची पुनर्घटना करावयासाठीं पदच्युत व तक्तनशीन राजांची परिषद व्हिएन्ना येथें भरली होती. १८१५ सालीं नेपोलियन दैवाची परीक्षा पहावयासाठीं पुन्हां एकदां युरपच्या समरांगणावर दाखल झालेला पाहून परिषदेच्या कार्यांत गर्क झालेल्या राजांचें धाबें दणाणलें ! पुन्हां एक वेळ अत्यंत निकराचा प्रयत्न करून त्यांनीं वॅटर्लू येथें या परमेश्वराच्या प्रतोदाचा पराभव केला ! नेपोलियनला सेंट हेलिना बेटांत काळ्या-पाण्यावर पाठविल्यानंतर व्हिएन्नाच्या परिषदेंतील प्रमुख मुत्सद्दी व ऑस्ट्रियाचा प्रधान प्रिन्स मेटरनिक यानें दारीं जमलेल्या राजांना तुकडे वांटावयास सुरवात केली ! फ्रान्सच्या राजक्रान्तीच्या पूर्वीं राज्यावर असलेल्या घराण्यांना त्यांचे मुलूख व आसनें परत मिळावीं या हेतूनेंच ही परिषद भरविण्यात आली होती. परिषदेच्या ठरावांमुळें स्थानभ्रष्ट झालेले संस्थानिक आपल्या आसनांवर पुन्हां स्थापित झाले. त्यांच्या आसनांना सिंहासनें म्हटलेलें नाहीं, कारण हे संस्थानिक म्हणजे शुद्ध घुबडें होतीं ! अठराशें पंधरानंतर युरपभर पसरलल्या भयाण अंधकारांत ह्या घुबडांचे भेसूर शब्द सारखे ऐकूं येत होते ! युरोप खंडाच्या स्मशानभूमींत त्या घुबडांनीं या काळरात्रीमध्यें अनेक तरुण देशभक्तांचें रक्त प्राशन केलें ! या भयाण स्मशानभूमीमध्यें हीं घुबडें राज्य करीत असतांना त्यांना अनेक भुतेंखेतें साह्य झालीं होतीं ! अशा या भयाण स्मशान भूमीमध्यें—त्या भेसूर काळरात्रींत ज्या महात्म्यांनीं स्वातंत्र्यसाधन केलें ते धन्य

होत ! त्यांच्या प्रयत्नांनीं ज्या राष्ट्रांना नंदनवनाचें स्वरूप प्राप्त झालें व ज्यांवर पुनरपि स्वातंत्र्यसूर्याचा प्रकाश पसरूं लागला तीं राष्ट्रें हि धन्य होत ! नेपोलियनचा पाडाव करण्यासाठीं युरपियन राष्ट्रांचा संघ तयार करण्यांत येत होता तेंव्हां त्या संघाच्या सदस्यांना सांगण्यांत येत होतें कीं, राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा घात करणाऱ्या या सैतानाचा नायनाट करण्यासाठीं सर्व सत्ताधाऱ्यांनीं एकजूट होणें हें त्यांचें कर्तव्य आहे ! जिंकलेल्या राष्ट्रांमध्यें नेपोलियन ज्या सुधारणा करी त्यांमुळें त्याचा जुलूम जनतेला क्षम्य वाटत असे. पण त्याचा पाडाव करणाऱ्या राजांनीं वॉटर्लूनंतर युरपभर जे अत्याचार केले त्यांचीं वर्णनें वाचीत असतांना अंगावर शहारे येतात आणि क्षणभर परमेश्वरावरील विश्वास डळमळूं लागतो—तोंच स्वातंत्र्यासाठीं जीव अर्पण करणारे मॅझिनीसारखे महात्मे, गॅरिबॉल्डीसारखे वीर व काव्हूरसारखे मुत्सद्दी इटलीच्या भाग्यपटावर दिसूं लागतात व वाटूं लागतें कीं परमेश्वर आपले संकल्प अनेकविध रीतींनीं पूर्ण करीत असतो !

व्हिएन्ना येथील मुत्सद्यांनीं इटलीच्या तुकड्यांची विभागणी केली तेंव्हां पीडमाँट, सॅव्हाय, जिनोआ, नीस व सार्डीनिया या विभागांचें आधिपत्य पीडमाँटच्या राजघराण्यांतील पहिला व्हिक्टर इम्यॅन्युएल याजकडे देण्यांत आलें. टस्कनी संस्थानावर ऑस्ट्रियाच्या हॅप्सबर्ग घराण्यांतील लिओपोल्डची स्थापना झाली. ऑस्ट्रियाच्या बादशहाची मुलगी व नेपोलियनची दुसरी बायको महाराणी मेरी लुइसी इला पारमा संस्थान तहाहयात जहागीर देण्यांत आलें. लूका व मॉडेना या संस्थानांत पूर्वींचे ड्यूक परत येऊन राज्य करूं लागले. नेपल्स व सिसिलीचें राज्य पहिल्या फर्डिनंडला परत देण्यांत आलें. मध्य इटलीवर पोपचा अंमल पुन्हां गाजूं लागला. लॉंबर्डी व व्हेनीशिया हे दोन सुपीक प्रांत ऑस्ट्रियाच्या बादशहास परत देण्यांत आले. नव्या अमदानींत सर्व संस्थानिक ऑस्ट्रियाचे मांडलिक झाले होते; त्यांचें राजकारण ऑस्ट्रियाच्या लहरींच्या अनुरोधानें चालत असे. हे राजे परत आले तेंव्हां त्यांनीं पूर्वींचा सुलतानशाहीचा लवाजमाहि बरोबर आणला होता. त्यांची कल्पना होती कीं गेलीं पंधरा वर्षें इटालियन लोक आपणांप्रमाणेंच झोंपेंत गर्क झालेले होते ! लोकांचें मत व कल्याण या चिजा काय आहेत याची त्यांना कल्पनाहि नव्हती ! जुन्या राजांच्या नव्या अमदानींत कर भराभर वाढूं लागले व जनतेचे जन्मसिद्ध हक्क हिरावून घेण्यांत आलें. नव्या युगाचे अभिनव विचार कानीं पडून इटालियन गुलामांचा बुद्धिभेद होऊं नये म्हणून पोपनें आपल्या

राज्यांत इन्क्विझिशन सुरू केलें. देवीची लस टोंचणें व शहरांतील रस्त्यांवरून रात्रीं दिवे लावणें या गोष्टी फ्रेंच क्रान्तिकारकांनीं सुरूं केल्या होत्या. एवढ्याच कारणासाठीं या गोष्टींना पोप महाराजांनीं मनाई केली ! पापी शहराचे अवशेष खणून काढावयाचें काम फ्रेंचांनीं सुरू केलें होतें म्हणून तें बंद करण्यांत आलें ! १७९८ सालीं पीडमाँट संस्थानांत अधिकाराच्या जागांवर असलेल्या सर्व लोकांची १८१५ सालीं फिरून नेमणुक करण्यांत आली—जुन्या यादीपैकीं कित्येक अधिकारी मध्यंतरीं मरून गेले होते, त्यांनाहि नव्या यादींतून वगळण्यांत आले नव्हतें ! नोकरशाहीमध्यें वशील्याचीं तट्टें धुडगूस घालीत होतीं, त्यांना लांच खावयाची चटक लागली होती, उदारमतवादी लोकांची शिकार करणें हा या चढेल लोकांचा खेळ होऊन बसला होता ! राजकीय पुढाऱ्यांचे मागें पोलिसांच्या पलटणी पळत असल्यामुळें गुन्हेगारांचा धंदा फार किफायतीचा झाला होता. इटलीचें वैयक्तिक व सामाजिक जीवन सर्व बाजूंनीं उध्वस्त होत चाललें होतें.

मेटरनिकनेंच पुढील पिढीमध्यें युरपचीं राज्यें चालविलीं. त्याच्या मुत्सद्दिगिरीमुळें सर्व इटालियन संस्थानिकांना आपल्या मालमत्ता पुन्हां प्राप्त झाल्या होत्या; म्हणून त्यांच्या राजकारणाचीं सूत्रें मेटरनिकच्याच हातीं होतीं. फ्रेंच राज्यक्रांतीचीं तत्वें व त्या तत्वांचें प्रतिपादन करणारे सर्व तत्ववेत्ते यांना चिरडून टाकावयाचा आपला हेतु सिद्ध करावयासाठीं त्यानें युरपियन राजांचा " पवित्र संघ " स्थापन केला ( १८१५ ). युरोपांतील देशांचा राज्यकारभार ख्रिश्चन धर्माच्या तत्वानुसार चालवण्यांत यावा यासाठीं सर्वांनीं संघटित प्रयत्न करावा या हेतूनें रशियाचा झार अलेक्झँडर यानें ही पवित्र संघाची कल्पना प्रथम निर्माण केली. लोकांच्या कल्याणासाठीं बादशहांनीं सुधारणा कराव्या, मात्र आपणांस अमुक सुधारणा पाहिजेत असें लोकांनीं म्हणतांहि कामा नये, या अठराव्या शतकांतील सुधारलेल्या सुलतानशाहीच्या कल्पना पुन्हां रूढ करावयाचा झारचा इरादा होता. रशिया, ऑस्ट्रिया, प्रशिया, हॉलंड, बव्हेरिया, स्वीडन वगैरे राष्ट्रें या संघांत सामील झालीं. पवित्र संघ हें नांव धारण करणाऱ्या या संघाकडून मेटरनिकनें अत्यंत अपवित्र कार्यें करून घेतलीं ! युरोपांतील कोणत्याहि देशांत राष्ट्रैक्याची व स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली कीं या पवित्र संघाच्या पोलिसांच्या व हेरांच्या पलटणी तेथें दाखल होत आणि कैदखाने व फांस यांच्या साह्यानें देशामध्यें तात्पुरती शांतता प्रस्थापित करीत !

पण मेटरनिक म्हणजे कांहीं परमेश्वर नव्हे ! त्यानें संस्थानिकांना राज्यें मिळवून दिलीं पण जनतेच्या हृदयांत जागृत झालेली स्वातंत्र्याची इच्छा मात्र त्याला दडपून टाकतां आली नाहीं. स्वातंत्र्यासाठीं जनतेनें बंडखोरीचें खडतर व्रत स्वीकारलें व या व्रताचें फल म्हणूनच परमेश्वर त्या राष्ट्रांना स्वातंत्र्य देता झाला ! युरपियन दडपशाहीला पहिला विरोध स्पेनमध्यें झाला; स्पेनच्या फर्डिनँड राजाला १८२० सालीं जबाबदार राज्यघटनेचा मसुदा जाहीर करणें भाग पडलें; पण ऑस्ट्रियन सैन्याच्या जोरावर व मेटरनिकच्या आज्ञेवरून हा मसुदा लवकरच रद्द करण्यांत आला. या बंडाळीचा संसर्ग इटलीलाहि झाला. कारबोनरी या गुप्त मंडळीनें १८२० सालीं नेपल्स प्रांतांत बंड उभारलें. स्वतःच्या सैन्यांतच फितुरी माजलेली पाहून आणि बंडवाल्यांना सर्व प्रजा अनुकूल आहे असें पाहून पहिल्या फर्डिनँडनें जबाबदार राज्यपद्धति जाहीर केली हें पाहतांच पवित्र संघानें नेपल्सवर स्वारी करावयाची तयारी केली; ट्रोपाउ येथें १८२० सालीं भरलेल्या मुत्सद्यांच्या परिषदेनें नेपल्समधील बंड चिरडून टाकावयाचें ठरविलें. हें कळतांच फर्डिनँड राजानें मॅटरनिकला खलिता पाठविला कीं आणीबाणीच्या प्रसंगांतून सुटण्यासाठींच जबाबदार राज्यघटना जाहीर करण्यांत आली आहे व योग्य वेळ येतांच ती रद्द करण्यांत येईल ! लोकपक्षाला चिरडून टाकावयासाठीं ऑस्ट्रियाची मदत घेण्याकरितां फर्डिनँड राज्याबाहेर निघाला तेव्हां त्यानें पुढाऱ्यांना कळविलें कीं, पवित्रसंघापुढें राज्यघटनेचें समर्थन करावयासाठींच हा दौरा करण्यांत आला आहे आणि घटनेसाठीं लढावयाचीहि आपली तयारी आहे ! १८२१ सालीं लायबॅश येथें राष्ट्रसंघाच्या परिषदेंत नेपल्समध्यें बेजबाबदार बादशाही प्रस्थापित करण्याची जबाबदारी ऑस्ट्रियावर सोंपवण्यांत आली ! ऑस्ट्रियाच्या मदतीनें हरामखोर फर्डिनँडनें दडपशाहीला सुरवात करून हजारों लोकांना कैदेंत टाकलें व फांसावर चढविलें ! ऑस्ट्रियाचें सैन्य इतकें कुचकामी होतें कीं नेपल्सच्या बंडवाल्यांनीं धीर करून तोंड दिलें असतें तर बंड बरेच रंगाला चढलें असतें.

नेपल्समधील बंडाळी थांबते न थांबते तोंच पीडमाँटमध्यें बंड उपस्थित झालें ( १८२१ मार्च ). बंडवाल्यांपैकीं बऱ्याच सैनिकांना नेपोलियनच्या हाताखालीं लष्करी शिक्षण मिळालें होतें. या बंडवाल्यांनी जबाबदार राज्यघटनेची मागणी केली; त्याचप्रमाणें राजानें ऑस्ट्रियाविरुद्ध मोहीम सुरू करावी अशीहि मागणी केली ! लॅाँबर्डीमधील बंडवाल्यांना सामील [illegible]न नेपल्स-

ऱ्या बंडखोरांचा पाडाव करूं पाहणाऱ्या ऑस्ट्रियन सैन्याच्या पीछाडीवर हल्ला करावा असा पीडमाँटमधील बंडवाल्यांचा बेत होता. कारबोनरो या गुप्त मंड-ळीनें असंतुष्टांची संघटना केली होती. १८२१ सालीं पीडमाँटचा राजपुत्र चार्लस अलबर्ट हा तेवीस वर्षे वयाचा होता. तारुण्याच्या ऐन भरांत अंतःकरण उदार असतें, आणि शौर्य गाजवावयाची व कीर्ति संपादन करावयाची आकांक्षा असते. पीडमाँटमधून परक्यांची हकालपट्टी करावयासाठीं उभारण्यांत येणाऱ्या बंडाचें नेतृत्व स्वीकारण्यासाठीं राजपुत्राला विनंति करण्यांत आली तेव्हां उत्सा-हाच्या भरांत त्यानें कटवाल्यांच्या हेतूला मान्यता दिली (ता. ७ मार्च) पण राजपुत्राचा दिल इतका कच्चा होता कीं दुसऱ्याच दिवशीं त्यानें बंडवाल्यांची बाजू उचलून धरावयाचें नाकबूल केलें! यामुळें बंडखोरांनीं कच खाल्ली व सार्वत्रिक उठावणीचा बेत रद्द केला. उतावळ्या व बेफाम बंड-खोरांच्या एका तुकडीची आणि नेपल्समधील काम संपवून परत चाललेल्या ऑस्ट्रियन सैन्याची नोव्हॅरा येथे चकमक होऊन बंडवाल्यांचा पुरा मोड झाला. (ता. ९ एप्रिल १८२१ * तरीहि जबाबदार राज्यघटना मिळवावयासाठीं लोकांनीं चालविलेली चळवळ बंद झाली नाहीं. व्हिएन्ना येथील परिषदेच्यावेळीं पीडमाँट संस्थानचा राज्यकारभार हातीं घेतांना पहिल्या व्हिक्टर इमॅन्युएलनें ऑस्ट्रियाला वचन दिलें होतें कीं, आपण प्रजेला जबाबदार राज्यघटना देणार नाहीं. हें वचन पाळण्यासाठीं वरील धामधुमीमध्यें त्यानें राज्यत्याग करून राज्याधिकार आपल्या भावाला-चार्लस फेलिक्सला अर्पण केला! त्यावेळीं चार्लस फेलिक्स मांडनाच्या दरबारांत होता; आपल्या गैरहजिरींत त्यानें चार्लस अलबर्टला रीजंट नेमलें. त्यावेळीं चार्लस अलबर्ट तरुण होता व त्याचीं राजकीय मतें फार उदार आहेत अशी ख्याति होती; त्यानें आपल्या आठ घटकच्या अमदानींत जबाबदार राज्यपद्धतीचा जाहीरनामा काढला. चार्लस फेलिक्सनें मॉडेना येथूनच नवी राज्यघटना रद्द केल्याचा व चार्लस अलबर्टला हद्दपार केल्याचा हुकूम काढला. चार्लस अलबर्टनें यावेळीं आपल्या क्रांतिकारक मित्रांच्या वतीनें आपल्या वचनाच्या इभ्रतीकरितां चार्लस फेलिक्स व ऑस्ट्रिया यांचे बरोबर युद्ध पुकारावयास हवें होतें; पण तसें कांहींच न करतां तो आपखुषीनें

* नोव्हॅरा येथें अपयश आलेल्या बंडवाल्यांपैकीं एका तेजस्वी देशभक्ताच्या नजरेला नजर भिडतांच मॅझिनीच्या अंतःकरणांत आयुष्य देशाला अर्पण करा-वयाची प्रेरणा झाली. (पान ३७)

हद्दपार झाला. राज्यकारभार हातीं घेतल्या दिवसापासून चार्लस फेलिक्सनें दडपशाहीला सुरवात केली. स्वतःच्या संस्थानांत जबाबदार राज्यघटनेसाठीं प्रयत्न करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांचा व चार्लस अलबर्टच्या अनुयायांचा फेलिक्सनें परत येतांच सूड उगवला; त्यानें इतकी क्रूरता दाखविली कीं आपल्या प्रजेच्या वतीनें, राजसंन्यास घेतलेल्या व्हिक्टर इमॅन्युएलनें त्याचेपाशीं दयेची याचना केली ! 'पाहिजे तर राजमुगुट परत करण्यास मी तयार आहें; पण राज्यासनावर असेपर्यंत माझ्या अधिकारांत अशी ढवळाढवळ कोणी केलेली मला खपणार नाहीं ' असें त्याला चार्लस फेलिक्सकडून उत्तर मिळालें ! १८३० सालीं चार्लस मरण पावला; तोंपर्यंत ही सुलतानशाही अशीच चालू होती.

पीडमाँट व नेपल्समधील क्रान्तिकारकांना चिरडून टाकल्या दिवसापासून इटलीच्या राजकारणाचीं सूत्रें ऑस्ट्रियाच्या हातीं गेलीं. फ्रेंच राजक्रान्तीच्या पूर्वी इटालियन लोक शेतीभाती करून स्वस्थ असत; राजकारणांत भाग घेणें हें प्रजेचें कर्तव्य आहे ही कल्पना फारच थोडया लोकांच्या मनांत येत असे; नेपोलियनच्या अंमलाखालीं कांहीं दिवस राहिल्यामुळें राज्यक्रान्तीचीं तत्वें प्रचलित झालीं; परक्यांना हांकून दिल्याशिवाय आपणांस सुख लागणार नाहीं हें इटालियनांच्या निदर्शनास आलें त्या दिवसापासून त्यांना गुलामगिरींत दडपून ठेवणें अशक्य झालें. इटालियन संस्थानिक ऑस्ट्रियाचे बंदे झाले तेव्हां प्रजेवर अनन्वित जुलूम होऊं लागला; परक्यांच्या खुशामतीसाठीं चाललेल्या या जुलमामुळें इटालियनांचा स्वाभिमान जागृत होऊं लागला. ऑस्ट्रियन साम्राज्यांत अनेक जातींचा समावेश झालेला होता; पण त्या सर्वांची संस्कृति जर्मनच असल्यामुळें त्यांचे मनांत स्वातंत्र्याच्या कल्पना विशेष जोमदारपणानें उत्पन्न होऊं शकल्या नाहींत. इटलीची स्थिति तशी नव्हती; संस्कृति, इतिहास, परंपरा, जाति, राष्ट्रमर्यादा, हितसंबंध वगैरे बाबतींत राष्ट्रीयत्व अभंग असल्यामुळें इटली ऑस्ट्रियाशीं एकरूप होऊन जाणें अशक्य होतें. राष्ट्रीयत्वाची जाणीव होऊं लागलेल्या इटालियनांना चिरडून टाकावयासाठीं ऑस्ट्रियानें १८२० सालीं इटलींत पोलिस राज्य सुरू केलें. यामुळें हजारों उदारमतवाद्यांना देशत्याग करावा लागला व देहदंड भोगावा लागला. पोलिसाला हव्या त्यावेळीं हव्या त्या घरांत घुसण्याची मुभा होती; हे लोक हवा तो माल व कागदपत्र जप्त करीत, मन मानेल त्या इसमास कैदेंत टाकीत आणि जप्तीची व तुरुंगाची भीति दाखवून वाटेल त्या कुटुंबावर अत्याचार करीत ! ऑस्ट्रियन

तुरुंगामध्यें इटालियन कैद्यांना तळघरांत ठेवीत व तेथें मोऱ्यानाल्यांतील घाणेरडें पाणी वरून सारखें झिरपत असे; जाड साखळदंडांनीं एखाद्या खांबाला बांधून टाकलेल्या कैद्यांच्या अंगावर हा अभिषेक अहोरात्र चाललेला असे; त्याच घाणींत व त्याच खोलींत सर्व देहव्यापार करावे लागत असल्यामुळें यमदूत या दुर्दैवी कैद्यांची लवकरच सुटका करीत ! इटलींतील सरकारी अधिकाऱ्यांवरहि हेर ठेवलेले असत ! खुद्द पोलिसांवर नजर ठेवावयास एक गुप्त पोलिसांचें पथक उभारण्यांत आलें होतें. या पद्धतशीर दडपशाहीमुळें इटलीचें सार्वजनिक आयुष्य नष्ट झालें, इटलीचे निवडक सुपुत्र फांशी गेले व हद्दपार झाले—मृतवत् झालेल्या इटलीच्या देहांत नवचैतन्याचा संचार करणाऱ्या महात्माचें तारुण्य अशा परिस्थितींत गेलें; स्वातंत्र्यलक्ष्मीपुढचा नंदादीप कोणत्याहि वादळांत मालविला जात नाहीं; पारतंत्र्याच्या व जुलमाच्या या काळरात्रींत सर्व लोक निद्रावश झालेले होते त्यावेळीं मॅझिनीने आपल्या डोळ्यांवर झांपड येऊं दिली नाहीं इतकेच नव्हे तर जे निद्रित होते त्यांना त्यानें जागृत केलें म्हणूनच इटलीला स्वातंत्र्य प्राप्त झालें.

१८३० सालीं फ्रान्समध्यें क्रांति झाली. क्रांतिकारकांनीं राज्यसूत्रें लुई फिलिप—ड्यूक ऑफ ऑर्लीस—याच्या हातांत दिलीं. फ्रान्समध्यें क्रांतिकारकांना यश आलेलें पाहून इटलींतील कारबोनरी क्रांतिकारकांनीं उठावणी केली. मॉडेना, रोमॅग्ना, बोलोना, अंकाना, पारमा वगैरे प्रांतांत बंडवाल्यांना बरेंच यश आलें. मॉडेना शहरीं सीरो मेनोटी या श्रीमान् देशभक्त तरुणाच्या घरीं ता. २ फेब्रुआरी १८३१ रोजीं एकतीस कटवाले जमले होते, ही वातमी कानीं येतांच बोलोनाच्या ड्यूकच्या शिपायांनीं मेनोटीच्या घराला वेढा घातला; तेव्हां आंतील कटवाल्यांनीं त्यांचेवर गोळया झाडल्या; हें पाहून सैनिकांनीं मेनोटीच्या वाडयावर तोफा चालू केल्या. वाडा जमीनदोस्त झाल्यावर जखमी कटवाल्यांना कैद करण्यांत आलें. पण तोफांचे आवाज ऐकून बोलोना शहर जागें झालें व चवथ्या तारखेस कटवाल्यांनीं एकजुटीची उठावणी केली. हें बंड लवकरच संपूर्ण रोमॅग्ना प्रांतांत पसरलें. ता. ५ रोजीं मॉडेनाच्या बंडवाल्यांनीं आपल्या ड्यूकला हांकून लावलें. पारमा संस्थानची जहागीरदारीण मेरी लुइसी हिनें व्हिएन्नाकडे पळ काढला. ठिकठिकाणचे ऑस्ट्रियन सुभेदार हद्दपार करण्यांत आले. १५ फेब्रुवारीच्या सुमारास २५ लक्ष इटालियन स्वतंत्र झाले. ता. २६ फेब्रु. रोजीं बोलोना प्रांतांतील पोपचें राज्य लोकशाहीनें खालसा करून 'संयुक्त

इटालियन प्रांत ' या लोकसत्तेची प्राणप्रतिष्ठा केली ! नेपोलियनच्या काळांतील सिसेल्पाइन रिपब्लिकचा झेंडा संयुक्त प्रांताच्या लोकशाहीवर फडफडत होता ! हें सर्व कार्य जनतेनें स्वयंस्फूर्तीनें केलें ! १८२० सालीं उठावणीमध्यें जनतेनें भाग घेतला नव्हता; तीं बंडें लष्करांतील शिपायांनीं उभारलीं होतीं व त्यांचा जोर पाहून बाजारबुणग्यांनीं टाळ्या पिटल्या होत्या. त्यावेळचीं बंडें स्थानिक होतीं, त्यांना राष्ट्रीय स्वातंत्र्ययुद्धाचें व्यापक स्वरूप प्राप्त झालेलें नव्हतें. कारबोनरी कटवाल्यांनीं सार्वजनिक सहानुभूति मिळवावयाचा कधींच प्रयत्न केला नव्हता १८३०–३१ ची उठावणी केवळ लष्करांतील बेदिल शिपायांच्या जोरावर झालेली नव्हती. उठावणी जनतेकडून व जनतेसाठीं झाली पाहिजे हें क्रान्तिशास्त्राचें महत्वाचें तत्व यावेळीं प्रथमतःच अंमलांत आलें होतें. ज्या संस्थानांतील लोक स्वतंत्र झाले होते त्यांनीं इतरांना स्वतंत्र व्हावयास मदत करावयास हवी होती–ती त्यांनीं केली नाहीं; कारण इटलीमध्यें एकराष्ट्रीयत्वाची भावना अजून उत्पन्न झाली नव्हती. बंडवाल्यांनीं स्वातंत्र्य मिळतांच स्थानिक मंडळें स्थापन केलीं, त्यांनीं स्वातंत्र्यसाधनांत स्वार्थ दाखविला, त्यांचे पुढारी राजकर्त्यांच्या गुळचट थापांना बळी पडले. त्यांचेमध्यें आत्मविश्वास नव्हता, त्यांना वाटे फ्रान्स आपणांस मदत करील. ऑस्ट्रियाबरोबर युद्ध करावयाचें त्यांना धैर्य नव्हतें. शेजाऱ्यांना स्वतंत्र व्हावयास मदत न केल्याचीं फळें त्यांना लवकरच भोगावीं लागलीं ! ऑस्ट्रियाच्या पायांशीं धरणें धरून बसलेल्या संस्थानिकांच्या चिथावणीवरून व मेटरनिकच्या हुकूमावरून ऑस्ट्रियन सैन्य फिरून इटलींत घुसलें व देशोधडीला लागलेल्या संस्थानिकांना आपले मुलूख फिरून प्राप्त झाले या सैन्याची पाठ वळते न वळते तोंच पोपच्या संस्थानांत फिरून बंडाळीला सुरवात झाली, बंडखोरांना चिरडून टाकावयासाठीं त्या सैन्यानें लगेच तोंड फिरवून बोलोनाच्या दिशेनें चाल केली. इटलीमधील ऑस्ट्रियाचें हें वर्चस्व फ्रान्सला सहन झालें नाहीं— लुई फिलिपनें फ्रेंच सैन्य अंकोनाला रवाना केलें. ऑस्ट्रियन सैन्य दाखल व्हावयाच्या अगोदरच फ्रेंचांनीं अंकोना शहर कबजांत घेतलें होतें (१८३२ फेब्रु.). तेव्हांपासून १८३८ पर्यंत ऑस्ट्रिया व फ्रान्स यांच्या समाईक हुकमतींत पोपच्या ताब्यांतील मध्यइटली प्रांत कुजत पडला होता.

१८१५ सालीं युरोपांतील क्रान्तिकारकांना चिरडून टाकावयासाठीं मेटरनिकनें पवित्र संघाची संघटना केली त्यावेळीं आपणांस यश येईल अशी

त्याची कल्पना होती. नेपोलियनच्या धामधुमीनंतर युरोपांत पंचवीस तीस वर्षे-पर्यंत स्मशानशांतता पसरली होती; पण या विपरीत परिस्थितींतहि युरपियन लोकांची विलक्षण प्रगति झाली. वाफेच्या शक्तीच्या जोरावर उद्योगधंद्यांची वाढ होऊन संपत्तिमान् व्यापारीवर्ग उदयास आला होता; मनगटाच्या जोरावर काम व दाम मिळविणारा स्वतंत्र असा कामकरी वर्ग उदयाला आला होता; उद्योग-धंद्याच्या वाढीमुळें सरंजामी पद्धतीचे उरलेसुरले अवशेष नाहींसे झाले व हक्क-दार वर्गाच्या वडजावाला कोणी पुसेनासें झालें. ज्ञानाची वाढ झाल्यामुळें प्रगतीचें अमर्याद स्वरूप लोकांच्या नजरेस आलें व या प्रगतीला अडथळा करणारीं राज-कीय बंधनें झुगारून द्यावयास लोक उत्सुक झाले. लोकांच्या जिज्ञासेला, उत्सा-हाला व आकांक्षांना दडपून टाकण्यामध्यें ऑस्ट्रियानें मेटरनिकच्या नेतृत्वा-खालीं पुढाकार घेतला होता; म्हणून ऑस्ट्रियाच्या अंमलाखालीं असलेल्या मुलखामध्येच दडपशाही विशेष जोरानें चालू होती आणि अशी दडपशाही चालविणारी राज्यपद्धति उलथून टाकावयाची उत्सुकता याच प्रदेशांमध्यें विशेष प्रबल होती. १८४८ च्या सुमारास इटली देशांत अनेक चळवळी सुरू झाल्या होत्या. कोणी जबाबदार राजघटनेचे समर्थन करीत होते, कोणाला पोपच्या अध्यक्षतेखालीं इटालियन संस्थानिकांचा संघ हवा होता, कोणाला हें अध्यक्षस्थान पीडमाँटच्या अधिपतीला द्यावें असें वाटत होतें, कोणाला सर्व सत्ता कामकरी वर्गाच्या हातीं रहावी असें वाटत होतें. पण या सर्व चळवळ्यांनीं राष्ट्रैक्य व राष्ट्रस्वातंत्र्य हीं मॅझिनीचीं तत्वे मान्य केलीं होतीं. १८३१ सालीं चार्लस अलबर्ट गादीवर आला तेव्हां नव्या राजाच्या अमदानींत आपणांस जबाबदार राज्यपद्धति लाभेल या आशेनें वेडा-वून गेलेल्या लोकांची फसगत झाली होती. उदारमतवादी नववा पोप १८४६ सालीं गादीवर आला तेव्हां त्याचे भोंवतीं भक्तजनांची गर्दी झाली; त्यानें थोड्याशा सुधारणा जाहीर करतांच सर्वत्र त्याचा जयजयकार होऊं लागला; पोपच्या नेतृत्वाखालीं इटलीला स्वातंत्र्य मिळणार अशी आशा सर्वांना वाटूं लागली. पोपच्या हेतूबद्दल संशय उत्पन्न झाल्यामुळें इटलींतील ऑस्ट्रियन सैन्याला चढाईचा हुकूम व्हिएन्ना दरबारनें दिला. १८४७ सालीं या सैन्यानें फेरारा शहर कबजांत घेतलें. ऑस्ट्रियाच्या या चढाईचा पोपनें निषेध केला; ऑस्ट्रियन सैन्याला हांकून देण्यासाठीं इंग्लिश व फ्रेंच आरमाराचा काफिला नेपल्सच्या आखातांत दाखल झाला. हें प्रकरण नेटाला लागणार

असा रंग पाहून इटालियनांच्या उत्साहाला सीमा राहिली नाहीं. ऑस्ट्रियाबरोबर लढाई उपस्थित झाल्यास पोपला मदत करावयाचें चार्लस अलबर्टनें कबूल केलें. इटालियनांच्या मनोवृत्ति अशा उत्तेजित झाल्या होत्या तोंच ठिकठिकाणीं बंडाळीला सुरवात झाली. ता. २ जानेवारी १८४८ रोजीं मिलान येथें एका राजकीय मिरवणुकींत सामील झालेल्या लोकांवर ऑस्ट्रियन सैन्यानें गोळीबार केला; ह्या सैतानी प्रकारामुळें खवळून जाऊन मिलन, पालर्मो व नेपल्स या शहरांमध्यें बंडाळीला सुरवात झाली. ता. २९ जानेवारी रोजीं नेपल्सच्या फर्डिनंड राजानें लोकांनीं तयार केलेल्या मसुद्याबरहुकूम राज्य चालवावयाचें कबूल केलें; थोडक्याच दिवसांनीं टस्कनीच्या संस्थानिकालाहि आपल्या प्रजेला जबाबदार राज्यघटना देणें भाग पडलें. ता. ४ मार्च १८४८ रोजीं चार्लस अलबर्टनें आपखुषीनें राज्यघटनेचा जाहीरनामा काढून ट्यूरिन शहरीं लोकसभा स्थापन केली. पोपनेंहि रोम येथें लोकसभा स्थापन केली.

स. १८४८ च्या फेब्रुवारी महिन्यांत फ्रान्समध्यें राज्यक्रान्ति होऊन प्रिन्स लुई नेपोलियन याला डिसेंबर महिन्यांत लोकशाहीचा अध्यक्ष निवडण्यांत आलें. फ्रान्समध्यें झालेल्या प्रत्येक क्रान्तीचा परिणाम सर्व युरोपखंडावर व्हावयाचा हें ठरलेलेंच आहे. ऑस्ट्रियन साम्राज्यांतील असंतोषानें यावेळीं पेट घेतला व जागोजाग बंडें उपस्थित झालीं; ऑस्ट्रियाच्या राजधानींत मार्च महिन्यांत बंडाळीला सुरवात झाली; बंडवाले आपल्या जीवावर उठलेले आहेत हें दिसून येतांच युरपियन दडपशाहीचा सूत्रधार प्रिन्स मेटरनिक यानें ता. १३ मार्च रोजीं व्हिएन्ना येथून पळ काढला. १८१५ सालीं मेटरनिकची बुद्धि तीक्ष्ण होती; निर्णयशक्ति तयार होती; १८४८ सालीं त्याची मुत्सद्दिगिरी गंजून गेली होती; पळ काढावयाचे अगोदर मेटरनिकनें मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता; पण ऑस्ट्रियन साम्राज्यामध्यें त्यानें निर्माण केलेली राज्यपद्धति त्याच्या पलायनानंतरहि कायम टिकली. तथापि त्याच्या अधिकारत्यागाचा युरोपियन लोकांवर फार परिणाम झाला. ऑस्ट्रियन बंडखोर जर मेटरनिकला हद्दपार करूं शकले तर त्याच्याच तंत्रानें राज्य हांकणाऱ्या इटालियन संस्थानिकांना व त्यांना पाठिंबा देणाऱ्या ऑस्ट्रियन सैन्यालाहि आपण हद्दपार कां करूं नये असा विचार इटालियनांच्या अंत:करणांत उत्पन्न झाला. १७८९ सालीं फ्रेंच बंडखोरांनीं बॅस्टाइलचा तुरुंग उध्वस्त केला त्यावेळीं नव्या युगाची सुरुवात झाली;

त्याचप्रमाणें १८४८ सालीं मेटरनिक हद्दपार झाला. त्याबरोबर राष्ट्रसंघटनेच्या नव्या युगाला प्रत्यक्षपणें सुरवात झाली.

मेटरनिकच्या बातमीमुळें इटलींतील क्रान्तिकारकांना जोर चढला. १८४८ सालीं इटलींत बंडाळी होणार अशीं चिन्हें स्पष्ट दिसत होतीं तरी ऑस्ट्रियन सेनापति मार्शल रॅडेट्स्की हा सैन्याची विशेष तयारी न करतां स्वस्थ होता. व्हिएन्ना येथील क्रान्तीची बातमी समजतांच मिलन शहरीं बंड झालें. तेथील क्रान्तिकारकांनीं ऑस्ट्रियन सैन्याचा पराभव केला. ता. २२ मार्च रोजीं व्हेनिस शहरीं डॅनिएल मानीन याच्या नेतृत्वाखालीं इटालियनांनीं ऑस्ट्रियन सैन्याचा पराभव केला. ता. २३ मार्च रोजीं पीडमॉटच्या चार्लस अलबर्टनें ऑस्ट्रियाविरुद्ध युद्ध पुकारलें. पारमा व मॉडेना येथील संस्थानिकांनीं मेटरनिकची वार्ता कळतांच धास्ती घेऊन पळ काढला! चार्लस अलबर्टनें राष्ट्रकार्य हातीं घेतल्यामुळें इटालियनांच्या आनंदाला सीमा राहिली नाहीं. मे महिन्यांत पारमा, मॉडेना, मिलान येथील लोकांनीं आपण पीडमॉटचे प्रजाजन असल्याचें जाहीर केलें. इटलीच्या उत्तर भागांतून ऑस्ट्रियाची हकालपट्टी झाली आणि आज अनेक वर्षे देशभक्तांच्या हृदयांत स्फुरण पावलेलें दिव्य राष्ट्रस्वरूप लवकरच मूर्तस्वरूपांत प्रकट होणार अशी आशा सर्वत्र दिसूं लागली!

युद्धाच्या पहिल्या धडाडींत चार्लसला सारखे विजयच प्राप्त होत गेले; पण लष्करी हालचालींमध्यें घोर चुका झाल्यामुळें ऑस्ट्रियन सैन्याला कुमक मिळाली. सरहद्दीवरील चार किल्ल्यांतून बाहेर पडून रॅडेट्स्कीनें शिस्तवार हल्ला सुरू केला तेव्हां चार्लसला माघार घ्यावी लागली. रॅडेट्स्कीच्या कर्तबगारीवर ऑस्ट्रियाची इभ्रत व साम्राज्य अवलंबून होतें. १८४८ च्या जुलै महिन्यांत कस्टोझा येथें व १८४९ च्या मार्च महिन्यांत नोव्हॅरा येथें रॅडेट्स्कीनें चार्लस अलबर्टचा पूर्ण पराभव केला. नोव्हॅराच्या लढाईनंतर चार्लसनें राजत्याग केला. व अधिकार सूत्रें आपल्या मुलाच्या हातीं दिलीं. या भाग्यशाली मुलाचें नांव व्हिक्टर इमॅन्युएल; भाग्यशाली म्हणण्याचें कारण हें कीं त्याचच हातून इटलीचें एकीकरण व स्वातंत्र्यसाधन तडीला गेलें.

इटलींतील क्रान्तिकारक एकत्र झाले व एकीकरणाच्या कार्याला सुरवात झाली तेव्हां आपल्या राज्याची आहुति पडणार अशी पोप पायसला भीति वाटूं लागली; पीडमॉटच्या राज्यांत इटालियन संस्थानें सामील होऊं लागलेलीं पाहतांच त्याचें धाबें दणाणलें. म्हणून ता. २९ एप्रिल १८४८ रोजीं त्यानें जाही-

रनामा काढून ऑस्ट्रियाविरुद्ध उभारण्यांत आलेल्या राष्ट्रीय युद्धाचा निषेध केला. हा जाहीरनामा प्रसिद्ध होतांच पोपची राष्ट्रभक्ति कोणत्या प्रकारची आहे हें सर्वांच्या निदर्शनास आलें. पोपचा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर थोड-क्याच दिवसांनीं नेपल्सच्या राजानें ऑस्ट्रियाशीं लढण्यास पाठविलेलें आपलें सैन्य परत बोलाविले. चार्लस आलबर्टची वीरवृत्ति वेताबाताचीच होती. आपल्या घराण्यांत राज्यपद रहावें या अटीवर त्यानें राज्यत्याग करावयाचें कबूल केलें. पोपनें राष्ट्रीय आकांक्षांना विरोध करावयाचे धोरण स्वीकारल्यामुळें रोमन लोक अगदीं खवळून गेले; १८४८ च्या नोव्हेंबर महिन्यांत पोपचा प्रधान रॉसी याचा खून झाला; लगेच जीवाच्या आशेने पोपने नेपल्सच्या राज्याकडे पळ काढला. १८४९ च्या फेब्रुवारी महिन्यांत रोमन लोकशाहीची स्थापना झाली. मॅझिनी व गॅरिबॉल्डी यांच्या नेतृत्वाखालीं रोमन लोकशाहीनें विलक्षण कीर्ति संपादन केली. फ्रान्समधील रोमन कॅथलिक पक्षाला संतुष्ट करावयासाठीं लुई नेपोलियननें पोपच्या मदतीसाठीं रोमवर फ्रेंच सैन्य पाठविलें; फ्रेंच सैन्यापुढें रोमन लोक-शाहीचा टिकाव लागणार नाहीं हें उघड होतें; फ्रेंच सैन्याच्या मदतीनें रोमची गादी पोपला पुन्हा प्राप्त झाली तर एक इटालियन संस्थानिक व फ्रान्समधील प्रबळ कॅथलिक पंथाचा धर्मगुरु आयताच आपल्या हातीं येईल असा नेपोलियनचा कयास होता. इटलींतील ऑस्ट्रियाचें वर्चस्व फ्रान्सला अनेक दृष्टींपासून खुपत होतें; पोपच्या संस्थानांत एकदां आपला शिरकाव झाला कीं मग इटलींत पक्के पाय रोवणें जड जाणार नाहीं अशी नेपोलियनची खात्री होती. ऑस्ट्रियाचें इट-लींतील वर्चस्व नाहींसें झालें कीं त्या साम्राज्याला उतरती कळा लागेल व युरोपि-यन राष्ट्रांतील अग्रस्थान फ्रान्सकडेच येईल अशी त्याची खात्री होती. पोपला काबीज केल्यावर फ्रान्सची बादशाही मिळविणें फारसें जड नाहीं हें तो जाणून होता; त्याचप्रमाणें लोकशाहीच्या नांवानें आरोळ्या मारणाऱ्या फ्रेंच सैनिकांना रोमन लोकशाहीविरुद्ध लढवून वेळ प्रसंग पडल्यास खुद्द फ्रेंच लोकशाहीबरोबर लढण्या इतका निगरगट्टपणा फ्रेंच लष्करांत त्याला उत्पन्न करावयाचा होता. इतका दूरवर विचार करूनच त्याच फ्रेंच सैन्य रोमवर रवाना केलें. रोमन लोकशाहीचा पाडाव झाला, गॅरिबॉल्डी व मॅझिनी हे फिरून देशोधडीला लागले व पोप महाराज आपल्या धर्माच्या गादीवर फिरून अधिष्ठित झाले; ऑस्ट्रियाच्या मदतीनें टिकटिकाणचे संस्थानिक आपल्या राज्याचा फिरून उप-भोग घेऊं लागले आणि दडपशाहीचा अंमल फिरून सर्वत्र गाजूं लागला.

१८५१ सालीं काव्हूर हा पीडमाँटच्या प्रधानपदावर आला. त्यावेळीं इटलीमध्यें पीडमाँट घराण्याची नाचक्की झालेली होती; संस्थानच्या तिजोरींत शिल्लक नव्हती. संस्थानी सन्याची बेअब्रू झालेली होती; गेल्या लढाईबद्दल खंडणी भरावयाची होती. अशा परिस्थितींतहि धीर धरून त्यानें राज्याची पुनर्घटना करावयास आरंभ केला. संस्थानांत आर्थिक उन्नतीची साधनें निर्माण करीत असतांना त्यानें युरपियन राजकारणाचा सूक्ष्म अभ्यास केला. ऑस्ट्रिया व फ्रान्स यांच्या चुरसीचा फायदा घेतल्यास इटलीचें एकीकरण व स्वातंत्र्यसाधन शक्य आहे असें दिसून येतांच त्याने त्या दिशेने प्रयत्न सुरू केले. इटलीमध्यें व युरोपांत पीडमाँटचें वजन वाढल्याशिवाय आपणास या बाबतींत कांहीं करतां येणार नाहीं हें तो जाणून होता. क्रीमियाच्या लढाईत पीडमाँटचें सैन्य इंग्लंड व फ्रान्स यांच्या वतीनें लढलें म्हणून पॅरिस येथील शांततापरिषदेंत भाग घेण्याची संधि काव्हूरला मिळाली. ऑस्ट्रियामुळेंच इटली देश इतक्या हीन अवस्थेला कसा पोंचला आहे याचें त्यान या परिषदेंत अत्यंत धिटाईनें विवेचन केलें. इंग्लंडव फ्रान्स या दोन राष्ट्रांनीं इटलीबद्दल सहानुभूति प्रकट केली. क्रीमियाच्या स्वारीमुळें 'तरुण इटली'चा समरांगणावर आणि युरपियन राष्ट्रांच्या संघांत प्रवेश झाला. युरोपच्या राजकारणांत प्रविष्ट होतांच काव्हूरनें आपल्या कर्तबगारीनें पीडमाँटला इटलीमध्ये व युरपियन राजदरबारांमध्यें मानाचें स्थान मिळवून दिलें.

१८१५ सालीं मेटरनिकनें केलेली युरोपची पुनर्घटना हाणून पाडावयाची नेपोलियनची इच्छा होती जर्मनी व इटली या दोन्ही देशांमध्ये १८४८ च्या राज्यक्रांतीचे वेळीं अनेक संस्थानें अस्तित्वांत होतीं आणि लोकांचा प्रांतिक अभिमान पूर्णपणें नष्ट झालेला नव्हता. या देशांमध्ये अनुक्रमें प्रशिया व पीडमाँट या संस्थानांच्या नेतृत्वाखालीं एकराष्ट्रीयत्वाची चळवळ सुरू झाली होती; दोन्ही राष्ट्रांच्या एकीकरणाला व स्वातंत्र्याला विरोध करावयाची जबाबदारी एकट्या ऑस्ट्रियावरच येऊन पडली होती. व्हिएन्ना येथील परिषदेपासून युरपियन राष्ट्रांचें अग्रस्थान ऑस्ट्रियाकडे होतें; तें स्थान फ्रान्सला मिळावें अशी नेपोलियनची महत्वाकांक्षा होती; स्वतःच्या घराण्यांत फ्रान्सची बादशाही मंजूर व कायम करून घ्यावयासाठीं फ्रेंच लोकांचे डोळे दिपतील असें कांहीं कृत्य करावयाची त्याची इच्छा होती. जर्मन व इटालियन लोक ऑस्ट्रियाविरुद्ध जोर करूं लागतांच नेपोलियनला फार आनंद झाला. युरोपांत थोडक्याच वर्षांत

विलक्षण घडामोड घडून येणार हें त्यानें जाणलें होतें; या घालमेलींत फ्रान्सच्या इटालियन व जर्मन सरहद्दीवरील कांहीं प्रांत घशाखालीं टाकावयाचा त्याचा बेत होता. युरपियन राजकारणाचा रागरंग पाहून फांसे कसकसे टाकावयाचे याबद्दल त्याचा विचार चालू होता: त्याचवेळीं काव्हूरची मुत्सद्दिगिरी त्याच्या नजरेस आली. काव्हूरला हाताशीं धरलें असतां आपले हेतु सिद्धीस जातील अशी त्याला आशा वाटूं लागली. फ्रान्समधील पक्षभेदामुळें, कॅथालिक पक्षाच्या प्राबल्यामुळें आणि क्रान्तिकारक मनोवृत्तीमुळें त्याचा राजकारणाचा डाव कुजला होता; हा डाव काव्हूरच्या मदतीनें पुन्हां रंगाला आणावयाची त्याची फार इच्छा होती.

पॅरिसच्या परिषदेंत इटलीबद्दल इंग्लंड व फ्रान्स यांनीं सहानुभूति व्यक्त केली होती. इटलीच्या स्वातंत्र्ययुद्धांत इंग्लंडची प्रत्यक्ष मदत मिळणें शक्य नाहीं हें काव्हूर जाणून होता. फ्रान्सची मदत मिळाल्यास ऑस्ट्रियाला तोंड देणें जड नाहीं हें स्पष्ट दिसत होतें. काव्हूरनें नेपोलियनच्या प्रवृत्तींचें परीक्षण केलें होतें; युरपियन राष्ट्रांतील परिस्थितीवरून नेपोलियनच्या आकांक्षा काय असाव्यात याचा त्यानें तर्क बांधला होता; इटलीला ऑस्ट्रियाविरुद्ध मदत करावयासाठीं मोबदला म्हणून नेपोलियन कशाची मागणी करील याचाहि त्यानें अंदाज बांधला होता. नेपोलियनला कसें गठवावें याबद्दल त्याचा विचार चालला होता तोंच १८५८ सालीं जानेवारी महिन्यांत पॅरिस शहरीं नेपोलियनवर ऑर्सीनी या इटालियन देशभक्तानें बॉंबगोळा फेंकला. या बॉंबच्या स्फोटानें काव्हूरच्या सुखस्वप्नांच्या चिंधड्या उडाल्या; नेपोलियनची मदत आतां आपणांस मिळत नाहीं असें त्यास वाटूं लागलें. ऑर्सीनीच्या बॉंबच्या धडाक्यानें नेपोलियनचें डोळे उघडले व इटालियन राजकारणाकडे मन घालावयाचें ठरवून त्यानें प्लोंबिएर्स येथें काव्हूरची गुप्त भेट घेतली. सॅव्हॉय व नीस हे परगणे फ्रान्सला मिळावे आणि पीडमॉंट घराण्यांतील राजकन्या आपल्या घराण्यांत देण्यांत यावी या अटींवर ऑस्ट्रियाची हकालपट्टी करण्यासाठीं दोन लक्ष फ्रेंच सैनिक पीडमॉंटच्या मदतीला द्यावयाचे कबूल केलें; युद्धाची आगळीक प्रथम ऑस्ट्रियाकडून घडली पाहिजे अशीहि एक अट या गुप्त तहनाम्यांत घालण्यांत आली होती. सॅव्हॉय व नीस हे परगणे मिळाल्यानें फ्रेंच लोकांचें समाधान होईल त्याचप्रमाणें एका पुरातन व प्रख्यात राजघराण्याशीं संबंध घडून आल्यानें आपली मानमान्यता वाढेल अशी नेपो-

लियनची खात्री होती. व्हिक्टर इमॅन्युएलनें या अटी मोठया नाखुषीनें मंजूर केल्या; ऑस्ट्रियानें बेभानपणें पीडमाँटची आगळीक केल्यामुळें युद्धाला एकदम सुरवात झाली. ऑस्ट्रियन सैन्याचा जागोजाग पराभव होऊं लागला तसतसें इटलींतील एकराष्ट्रीयत्वाच्या चळवळीला प्रचंड स्वरूप प्राप्त होऊं लागलें. राष्ट्रदेवतेचें हें प्रत्यक्ष दर्शन होतांच नेपोलियन घाबरून गेला. इटालियन संस्थानसंघानें फ्रान्सच्या ताटाखालचें मांजर होऊन बसण्यांतच समाधान मानलें पाहिजे अशी नेपोलियनची इच्छा होती. नेपोलियनला समरांगणावर जय प्राप्त होऊं लागले तसे इटलींतील क्रांतिकारक त्याच्या हेतूंबद्दल साशंक होऊं लागले. ऑस्ट्रियाचा चूर उडविल्यानंतर जर्मनीवर स्वारी करावयाचा नेपोलियनचा बेत आहे अशा बातम्या जर्मनींत पसरूं लागल्या आणि फ्रान्सच्या जर्मन सरहद्दीवर प्रशियन सैन्य जमा होत आहे अशा बातम्या इटलींत येऊं लागल्या. या सर्व बातम्या कानीं आल्या तेव्हां नेपोलियनच्या काळजानें ठाव सोडला. तो तसाच तडकाफडकीं ऑस्ट्रियाच्या बादशहास भेटला व व्हिक्टरइमॅन्युएलचा सल्लाहि न घेतां त्यानें परस्पर तहाच्या अटी ठरवून टाकल्या; याच अटी पुढें रीतसर मंजूर करण्यांत आल्या ( १८५९ ) पीडमाँटला लाँबर्डी प्रांत मिळाला; सॅव्हॉय व नीस परगणे आणि राजकन्या हीं फ्रान्सला मिळालीं. हे परगणे फ्रान्सला दिल्यामुळें इटालियन लोक राजावर व काव्हूरवर चिडून गेले; पण मोबदला देण्यावांचून गत्यंतर नाहीं हें दिसून येतांच लोकसभेनें तहनाम्याला मान्यता दिली. नेपोलियनच्या विश्वासघातकी वर्तनामुळें काव्हूर चवताळून गेला व रागाच्या आवेशांत त्यानें राजीनामा दिला. व्हिक्टर इमॅन्युएलनें मात्र हीं सर्व दुःखें शांतपणानें सहन केलीं.

१८६० सालीं काव्हूर पुन्हां प्रधानपदावर आला. नेपोलियनला मदतीचा मोबदला देणें भाग पडल्यामुळें काव्हूर अगदीं अस्वस्थ झाला होता; विश्वासघातकी नेपोलियनला पेंचांत पकडावयासाठीं काव्हूरनें क्रान्तिकारकांबरोबर संगनमत केलें व वेगवेगळ्या संस्थानांमध्यें एकीकरणाची चळवळ सुरू झाली. ता. २४ मार्च रोजीं सॅव्हाय व नीस हे परगणे फ्रान्सला द्यावयाच्या तहावर काव्हूरनें सही केली; एका आठवड्याचे आंत रोमाग्ना, बोलोना, मॉडेना व टस्कनी हीं संस्थानें स्वसंतोषानें व प्रचंड बहुमतानें पीडमाँटच्या राज्यांत सामील झालीं आणि ता. २ एप्रिल रोजीं संयुक्त इटलीचें पहिलें लोकनियुक्त पार्लमेंट टयूरिन शहरीं भरलें.

१८४९ साली पोप पायस फ्रान्सच्या मदतीनें रोमच्या गादीवर आला तेव्हांपासून पूर्वीचीं उदारमतें झुगारून देऊन त्यानें उघडपणें दडपशाहीला सुरवात केली. रोमन संस्थानाचें प्रधानपद अँटोनेली याच्या हातीं गेलें त्या दिवसापासून रोमन प्रजेवर अनन्वित जुलूम होऊं लागला. पोपचें स्वतःचें सामर्थ्य फारसें मोठें नव्हतें तरी कॅथलिक पंथाचा धर्मगुरु या नात्यानें वेगवेगळ्या राष्ट्रांमध्यें हजारों लोक पोपची कड घ्यावयास तयार होते. रोमन संस्थानांतील क्रांतिकारकांकडून पोप महाराजांना त्रास होत आहे ही वार्ता प्रसिद्ध होतांच फ्रान्स, बेलजम, आयर्लंड वगैरे देशांतून हजारों स्वयंसेवक धर्मगुरूच्या रक्षणासाठीं रोमकडे धांवले. पोप महाराजांना त्यांचें राज्य पुन्हां मिळालें व त्यांच्या मर्जीनुरूप सर्वत्र व्यवस्था झाली तरी त्यांच्या मदतीला आलेलें फ्रेंच सैन्य रोमच्या संरक्षणासाठीं तेथेंच तळ देऊन राहिलें होतें. रोमन संस्थानांत कोणत्याहि प्रकारची चळवळ होतांच ती चिरडून टाकावयासाठीं देशोदेशींचीं सैन्यें व स्वयंसैनिक धांवून येतील असा संभव होता म्हणून तूर्त पोपकडे पूर्ण दुर्लक्ष करावयाचें काव्हूरनें ठरविलें. दक्षिण इटलींतील नेपल्सच्या राज्यांतील सिसिली बेटांत उठावणी करावयाची मॅझिनीची खटपट अनेक वर्षें चालली होती. सिसिलींतील क्रान्तिकारक लोकसत्तावादी होते; पण राष्ट्रैक्य व स्वातंत्र्य हीं तत्वें लोकशाहीपेक्षां अधिक महत्वाचीं आहेत हें मॅझिनाचें तत्व त्यांनाहि मान्य होतें. दक्षिण इटलींतील क्रान्तिकारकांनीं गॅरिबॉल्डीला आपलें नेतृत्व स्वीकारण्याची विनंति केली; व्हिक्टर इमॅन्युएलला त्यांनीं मान्यता द्यावी व बंड उभारून तें थोडेंबहुत यशस्वी करून दाखवावें या अटींवर त्यांचें नेतृत्व स्वीकारण्याचें गॅरिबॉल्डीनें कबूल केलें. पीडमाँटच्या मदतीशिवाय बंड यशस्वी होणें शक्य नाहीं हें गॅरिबॉल्डी जाणून होता; म्हणून त्यानें काव्हूरपाशीं मदतीची मागणी केली. नेपल्स दरबार बरोबरच्या राजकीय संबंधांत कोणत्याही प्रकारचा बिघाड आलेला नसल्यामुळे गॅरिबॉल्डीला उघडपणें मदत करणें काव्हूरला शक्य नव्हतें; शिवाय गॅरिबॉल्डीला अपयश आलें तर त्यापासून पीडमाँटचें नुकसान होणार नाहीं अशी खबरदारी घेणें भाग होतें. पोप व नेपल्सचा राजा यांची जूट होती; पोपच्या राज्यांतील रोमाग्ना प्रांत पीडमाँटच्या राज्यांत सामील झालेला असल्याकारणानें या दोस्तांना व्हिक्टर इमॅन्युएलचा सूड घ्यावयाचा होता; पीडमाँटनें सिसिलींतील बंडवाल्यांना उत्तेजन दिलें आहे हें उघडपणें दिसून आलें असतें तर दक्षिण इटलींतील

संयुक्त सैन्यानें पींडमाँटवर स्वारी केली असती; शिवाय या प्रकारामुळें पींडमाँटची युरोपांत नाचक्की झाली असती. केवळ इटालियन राजकारणाचा डाव कुजूं नये म्हणूनच काव्हूरनें क्रांतिकारकांच्या उठावणीचा उपयोग करून घ्यावयाचें ठरविलें. गॅरिबाल्डीनें स्वयं-सेवक जमवावे, मिलन येथें हत्यारें खरेदी करावीं व दक्षिणेकडे शक्य तितक्या त्वरेनें कूच करावें आणि या पूर्वतयारीकडे सरकारनें दुर्लक्ष करावें एवढीच मदत देणें काव्हूरला शक्य होतें. गॅरिबॅाल्डीला इतकेंच पाहिजे होतें. ठरल्याप्रमाणें सर्व तयारी करून ता. ५ मे १८६० रोजीं त्यानें एक हजार स्वयंसैनिकांसह सिसिलीकडे जिनोआ बंदरातून जलमार्गानें कूच केलें. ता. ११ रोजीं मार्सोला बंदरांत दाखल होतांच या सैन्यानें तडक पालर्मोचा रस्ता धरला. त्यावेळीं सिसिली बेटांत २४००० सरकारी सैन्य होतें. स्थानिक बंडवाल्यांच्या मदतीनें गॅरिबॅाल्डीच्या एक हजार स्वयंसैनिकांनीं एक महिन्याचे आंत या अवाढव्य पण पगारी, पोटभरू व भेकड सैन्याचा पराभव केला. ता. २० जून रोजीं सिसिलियन सैन्यांपैकीं वीस हजार लोक बेट सोडून नेपल्सला गेले ! सिसिलींतील लोकांनीं गॅरिबॅाल्डीला सर्वसत्ताधारी नेमलें तरी त्यानें मिळविलेला मुलूख पींडमाँटला जोडावयाची कांहींच भाषा नाहीं व तसें इतक्यांत करावयाचा त्याचा विचारहि नाहीं हें कळतांच काव्हूरनें कुटिल कारस्थानास सुरवात करून पींडमाँटला अनुकूल असें वातावरण निर्माण करावयासाठीं आपले हस्तक सिसिलींत पाठविले ! या कारस्थानाची काव्हूरला कांहींच वार्ता नव्हती ! नेपल्सचे राज्यावर हल्ला करावयाची तयारी पुरी होतांच त्यानें ता. २१ ऑगष्ट रोजीं मेसिनाची सामुद्रधुनी ओलांडून सरळपणें नेपल्सचा रस्ता धरला ! हजारों सैनिक पदरीं असलेल्या राजाला गॅरिबॅाल्डीच्या स्वयंसैनिकांशीं दोन हात करावयाचा धीर झाला नाहीं ! ता. ५ सप्टेंबर रोजीं त्यानें पळ काढला व सातव्या तारखेस गॅरिबॅाल्डीनें नेपल्स शहर ताब्यांत घेतलें. नेपल्सचें राज्य ताब्यांत येतांच रोमवर स्वारी करावयाचा बेत जाहीर करून गॅरिबॅाल्डीनें कूच करावयास सुरवात केली. पण व्होलटर्नो येथें नेपल्सच्या सैन्यानें त्याला थोपवून धरलें !

रोमच्या संरक्षणासाठीं फ्रेंच लष्कर तयार होतें. गॅरिबॅाल्डीनें रोमवर स्वारी केली असती तर आतांपर्यंत त्यानें मिळविलेले सर्व विजय फुकट गेले असते; फ्रान्सनें पोपच्या मदतीसाठीं युद्ध पुकारलें असतें

च कदाचित् नपल्सच्या राजालाहि त्याचें राज्य परत मिळवून दिलें असतें. हें संकट टाळण्यासाठीं काव्हूरनें पीडमाँटचें सैन्य दक्षिणेकडे रवाना केलें. पोपच्या सैन्यानें रोमाग्नावर हल्ला केला तर त्यापासूनच पीडमाँटचें रक्षण व्हावें व गॅरिबॅाल्डीनें रोमवर हल्ला केला तर त्याला विरोध करावा अशा दुहेरी हेतूनें हें सैन्य रवाना करण्यांत आलें होतें. पीडमाँटच्या सैन्यानें ता. १८ सप्टेंबर रोजीं कॅसल फिडारो येथील लढाईंत पोपच्या सैन्याचा पराभव केला. ता. २९ रोजीं पोपचा सेनापति पीडमाँटला शरण आला. ता. १५ ऑक्टोबर रोजीं पीडमाँटच्या सैन्याने नेपल्सच्या राज्याची सरहद्द ओलांडली. ता. २६ ऑक्टोबर रोजीं व्हिक्टर इमॅन्युएल व गॅरिबॅाल्डी यांची भेट झाली; भेटीच्या वेळीं गॅरीबॅाल्डीनें आपले सर्व अधिकार व विजय राजाला अर्पण केले. या संयुक्त विजयी सैन्यापुढें मोकळ्या मैदानांत आपला टिकाव लागणार नाहीं हें जाणून नेपल्सच्या राजानें वीस हजार सैनिकांसह गेइटाच्या किल्ल्याचा आश्रय केला. ता ५ नोव्हेंबर रोजीं संयुक्त सैन्यानें या किल्ल्याला वेढा घातला. ता. ७ नोव्हेंबर रोजीं राजानें गॅरिबॅाल्डीसह नेपल्स शहरांत प्रवेश केला. नेपल्स व सिसिली मधील प्रजेनें प्रचंड बहुमतानें पीडमाँटच्या राज्यांत सामील व्हावयाचें ठरविलें होतें. नेपल्सचें राज्य पीडमाँटला जोडण्यांत आल्यानंतर ता. १८ फेब्रुवारी १८६१ रोजीं ट्यूरिन येथें इटलीचें पार्लमेंट भरलें. व्हेनिस व रोमखेरीज संपूर्ण इटलीचे प्रतिनिधी या सभेस हजर होते. यावेळीं व्हिक्टर इमॅन्युएलच्या प्रजाजनांची संख्या २२,०००,००० होती! मतें घेऊन इतर संस्थानिकांचीं राज्यें पीडमाँटमध्यें सामील करावयाच्या काव्हूरच्या रिवाजाचा निषेध करण्याकरितां मध्यंतरीं वॅार्सा येथें ऑस्ट्रिया, प्रशिया व रशिया या राजांच्या प्रतिनिधींनीं परिषद भरविली होती; या परिषदेनें मंजूर केलेले ठराव युरपियन दरबारांकडे पाठविण्यांत आले; एकट्या इंग्लंडनें या परिषदवाल्यांचा धिःकार करून राष्ट्रस्वातंत्र्य मिळविणाऱ्या इटालियनांचें अभिनंदन केलें. इंग्लंडच्या या उदार धोरणामुळें प्रतिगामी युरपियन राजांना पीडमाँटविरुद्ध संघटित प्रयत्न करणें अशक्य झालें; इंग्लंडच्या या धोरणाचें श्रेय लॅार्ड पामर्स्टनला आहे.

"पण रोमवांचून इटली म्हणजे शिर नसलेल्या धडाप्रमाणेंच होय" असें कॅसलरनें म्हटलें आहे. गॅरिबॅाल्डीनें तर रोम घ्यावयाची प्रतिज्ञाच केली होती. त्याला काव्हूरची कारस्थानी बुद्धि नव्हती म्हणून रोम घेण्याच्या मार्गातील अडचणींची त्याला जाणीवच नव्हती. पोपनें आपला मुलूख सोडून यावा व

धार्मिक सार्वभौमपणा मात्र आपलेकडे ठेवावा यासाठीं त्याचें मन वळवावयाची काव्हूरनें शिकस्त करून पाहिली, पण व्यर्थ ! ता. ५ जून १८६१ रोजीं काव्हूर मृत्यू पावला. त्यावेळीं गॅरिबॅाल्डी कॅप्रेरा बेटांत रहात होता. " रोम अथवा प्राणत्याग " अशी गर्जना करून गॅरिबॅाल्डी आपलें निवासस्थान सोडून इटलीमध्यें दाखल झाला. यावेळीं त्याला इटालियन सरकारकडूनच विरोध झाला. ता. २९ ऑागष्ट रोजीं ॲस्प्रोमोन्ट येथें झालेल्या लढाईत त्याचे स्वयंसेवक पांगले गेले, त्याला स्वतःला जखम झाली व कैदहि करण्यांत आलें ! १८६४ सालीं सप्टेंबर महिन्यांत फ्रान्सनें आपलें रोममधील सैन्य दोन वर्षांचें आंत परत न्यावयाचें कबूल केलें. इ. सन १८६५ मध्यें इटलीची राजधानी ट्यूरिन येथून फ्लॅारेन्स येथें नेण्यांत आली.

इ. स. १८६६ मध्यें बिस्मार्क व इटली यांचेमध्यें तह झाला. ऑस्ट्रिया व जर्मनी यांमध्यें युद्ध सुरू झालें तेव्हां तहाच्या अटींप्रमाणें इटलीनें ऑस्ट्रियावर हल्ला केला. या युद्धांत इटलीचा जमिनीवर व समुद्रावरहि पराभव झाला; तरी बिस्मार्कनें आपलें वचन मोडलें नाहीं; युद्धांत जर्मनीला जय मिळाल्यामुळें नंतर झालेल्या तहान्वयें व्हेनिस प्रांत इटलीच्या राज्याला जोडण्यांत आला.

इटलीमधून ऑस्ट्रियाची हकालपट्टी झाली, तरी अझून रोममधून परक्यांचा पाय पुरता निघाला नव्हता. इटालियन सरकारकडून थोडीशी फूस मिळतांच गॅरिबॅाल्डीनें काहीं स्वयंसेवक जमा केले व रोमवर हल्ला केला. रोमच्या रक्षणासाठीं नेपोलियननें सैन्य रवाना केलें. ता. ३ नोव्हेंबर १८६७ रोजीं गॅरिबॅाल्डीचा पराभव झाला. वरपांगी देखावा कायम ठेवण्यासाठीं इटालियन सरकारनें त्याला पुन्हां कैद केलें व कॅप्रेरा बेटांत हद्दपार केलें !

१८७० सालीं फ्रान्स व जर्मनी यांचेमध्यें युद्ध उपस्थित झालें; त्यावेळीं फ्रान्सनें जर्मनीच्या आघाडीवर न्यावयासाठीं रोममधील आपलें सैन्य काढून नेलें. जें कधीं टळणार नाहीं तेंच राजिखुषीनें व्हावें म्हणून व्हिक्टर इमॅन्युएलनें पोपची अतिशय विनवणी केली; ही शिष्टाई फुकट गेली तेव्हां इटालियन सैन्यानें ता. २० सप्टेंबर १८७० रोजीं रोम शहर ताब्यांत घेतलें. रोमचा ताबा कोणाकडे रहावा याबद्दल मतें घेण्यांत आलीं तेव्हां व्हिक्टर इमॅन्युएलच्या बाजूला ४०७८८ मतें पडलीं व पोपच्या बाजूला ४६ मतें पडलीं !

इटलीच्या स्वातंत्र्यसाधनाचा इतिहास अत्यंत स्फूर्तिदायक आहे. अशी क्रान्ति जगाच्या इतिहासांत आजवर झालेली नाहीं असा इतिहासज्ञांचा

अभिप्राय आहे इतकी काव्यमय, इतकी त्यागपूर्ण, इतकी निकराची व इतकी जिव्हाळ्याची क्रान्ति यापुढें कोठें होणार असेल तें एक एक परमेश्वरच जाणे ! अशा या स्फूर्तिदायक क्रांतीचा ज्या व्यक्तीनें पाया घातला व जी साध्य होण्यासाठीं जिवापाड श्रम केले त्या मॅझिनीचें जीवनचरित्र, ज्या महात्म्यानें या क्रांतीचा आरंभ पाहिला व इटलीच्या ध्येयाला मूर्त-स्वरूप प्राप्त झालेलेंहि 'त्याच देहीं, त्याच डोळां' पाहिलें अशा महापुरुषाचें हें चरित्र वाचकांना स्फूर्तिदायक वाटेल अशी आशा आहे.

---


याच पुस्तकाच्या लेखकांनीं लिहिलेलें

जोसेफ मॅझिनीच्या 'ड्यूटीज ऑफ् मॅन'

या सुप्रसिद्ध इंग्रजी ग्रंथाचें भाषांतर

**मानवी कर्तव्यें.**

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति लवकरच निघत आहे. प्रथमावृत्तीवर केसरी, लोकसंग्रह, विविधज्ञानविस्तार वगैरे अनेक पत्रकारांचे उत्कृष्ट अभिप्राय आले असून अवघ्या एकाच वर्षांत आवृत्ति खलास झाली. दुसऱ्या आवृत्तींत सर्वत्रांच्या सूचनेप्रमाणें योग्य त्या दुरुस्त्या केल्या असून कांहीं नवीन मजकूरहि जोडला असल्यानें पहिल्या आवृत्तीच्या वाचकांसही ही नवी आवृत्ति संग्राह्यच वाटेल यांत शंका नाहीं.

ग्लेझ्ड कागद, सुबक छपाई, किं. १ रु.

गणेश महादेव आणि कंपनी.

६२१ गिरगांवरोड, मुंबई.



**जोसेफ मॅझिनी.**

जन्म ता. २२ जून १८०५. ] [ मृत्यू ता. १० मार्च १८७२.

# जोसेफ मॅझिनी.

## १ जिनोआ.

( १८०५-१८३१ )

"But Italy, my Italy,
    Can it last this gloom?
Can she live & be strong?
    Or is it another dream
Like the rest we have dreamed so long?"

*E. B. Browning.*

जन्म व वालपण-शिक्षण-प्रेरणा-सारस्वतस्वातंत्र्य-कारबोनरो-
विश्वासघात व कैद-सॅव्होनाच्या तुरुंगांत-हद्दपारी.

जोसेफ मॅझिनी याचा जन्म जिनोआ येथें ता. १२ जून १८०५ रोजीं झाला. त्याचा बाप डॉक्टर गायकोमो मॅझिनी हा जिनोआ येथील विद्यापीठांत शारीरशास्त्राचा अध्यापक होता; डॉक्टरसाहेब लोकसत्तेचे कट्टे पुरस्कर्ते होते; गोरगरीबांची सेवाशुश्रूषा करण्यांत आपला बहुतेक वेळ ते खर्च करीत असत. त्याची आई मराया ही फार तीक्ष्ण बुद्धीची आणि मायाळू होती. तिचें नैतिक सामर्थ्य व निष्ठाशक्ति हीं जोसेफमध्यें पूर्णपणें उतरलीं होतीं. मॅझिनीच्या बाल्यावस्थेंत युरोपांतील सर्व देशांमध्यें राज्यक्रान्तीची खळबळ चाललेली होती; आनंदानें भरलल्या या कुटुंबांत युरोपांतील सर्व देशांमध्यें उसळणाऱ्या उत्साहाच्या लाटांचे प्रतिध्वनि उमटत असत.

लहानपणीं जोसेफ फारच नाजूक प्रकृतीचा व कोंवळ्या मनाचा होता. सहा वर्षांचा होईपर्यंत त्याला धड चालतांहि येत नसे. लहान मुलांप्रमाणें धुडगूस घालतां येणें अशक्य असल्यामुळें तो आपल्या आईच्या खोलींत एका खुर्चीवर नेहमीं बसून असे. त्याच्या अशक्त प्रकृतीवर शिक्षणाचें जोखड टाकावयाचें नाहीं असें त्याच्या वडिलांनीं ठरविलें होतें; पण शेजारच्या खोलींत त्याच्या बहिणी आपले धडे पाठ करीत असत–ते ऐकूनच यानें आपलें प्राथमिक शिक्षण संपादन केलें! मुलांना लहानपणीं आवडणाऱ्या खेळण्यांस तो कधीं हात लावीत नसे; जन्मतःच त्याचा स्वभाव फार गंभीर होता. दारीं आलेल्या गोरगरीबांना मदत करावयाचा तो आपल्या आईपाशीं हट्ट घेत असे.

प्रथम ज्या दिवशीं मॅझिनी आपल्या आईबरोबर घराच्या बाहेर पडला, त्या दिवशीं एक विलक्षण गोष्ट घडून आली; त्या दिवसाची हकीकत मराया वारंवार मोठ्या धन्यतेनें सांगत असे. एका देवळाच्या पायऱ्यांवर एक वृद्ध भिक्षेकरी बसला होता; लहानगा मॅझिनी त्याच्याकडे टक लावून पहात उभा राहिला तेंव्हां मरायास वाटलें कीं, त्या भिकाऱ्याचा अवतार पाहून मूल भेदरलें–म्हणून ती मुलाला उचलावयास वांकते तोंच जोसेफ तिच्या हातांतून निसटला, त्या भिकाऱ्याकडे जाऊन यानें त्याच्या गळ्यास मिठी मारली व त्याला कांहीं तरी देण्याबद्दल आईपाशीं हट्ट घेतला; हें पाहून त्या वृद्ध फकीराचा गळा दाटून आला. त्यानें मुलास कुरवाळून म्हटलें, "बाई, ह्या मुलाला जपा बरें, हा सर्व देशाचे पांग फेडील!" दयार्द्रता हा त्याचा उपजत गुण होता. मरायाचा चुलतभाऊ एकदां तिला भेटावयास आला होता–तेंव्हां पांच वर्षांचा जोसेफ, "लिलिपट येथील तत्ववेत्त्यासारखा" एका नकाशाच्या निरीक्षणांत तल्लीन होऊन गेलेला आहे, त्याच्या आजूबाजूस पुस्तकें पसरलेलीं आहेत–हा प्रकार पाहून त्याच्या मामाला अत्यंत कौतुक वाटलें. त्याचवेळीं आपल्या भाच्याबद्दल त्यानें भाकीत केलें कीं, हा मुलगा आपल्या तेजानें युरोपांतील साऱ्या पंडितांना दिपवून टाकील.*

मॅझिनी सुमारें नऊ वर्षांचा झाला तेंव्हां युरोपांतील राजांनीं एकत्र होऊन नेपोलियनचा पराभव केला. व्हिएन्ना येथें भरलेल्या मुत्सद्यांच्या परिषदेनें युरपची पुनर्घटना करून फ्रान्समधील राज्यक्रांति व्हावयाचे पूर्वीची परिस्थिति

* पत्राची तारीख: २८ ऑगस्ट सन १८११.

पुन्हां निर्माण केली. जनतेच्या अंतःकरणांत नव्या युगाचे अभिनव विचार स्फुरण पावत होते; मात्र राज्यकर्त्यांचीं अंतःकरणें पूर्वीप्रमाणेंच कोरडीं ठणठणीत होतीं. स्थानापन्न होतांच सर्व राजांनीं आपल्या राज्यांत पूर्वीची जुलमी शासनपद्धति सुरू केली. स्वतंत्रतेच्या विचारांच्या ठिणग्या सर्वत्र उडालेल्या होत्या, त्या पायांखालीं दाबून विझवून टाकण्याचा त्यांनीं जोराचा यत्न केला; मात्र या प्रयत्नांत त्यांना यश आलें नाहीं. जुलमी राजकर्त्यांना आलेल्या या अपयशामुळेंच स्वातंत्र्याच्या पायावर युरपियन राष्ट्रांची पुनर्घटना झाली.

युरोपांत होणाऱ्या घडामोडींबद्दल मॅझिनीच्या घरीं रोज वादविवाद चालत असत व त्यांमधून लोकसत्तेला पोषक असे निर्णय काढण्यांत येत असत. फ्रेंच राज्यक्रांतीतील लढायांच्या आठवणी सर्वांच्या मनांत अझून ताज्या होत्या; ह्या आठवणी वारंवार त्याला ऐकावयास मिळत. फ्रेंच राज्यक्रांतीमधील जिरॉंडिस्ट या ज्वलत्‌जहाल क्रान्तिकारक पक्षाच्या एका वर्तमानपत्राचे ( Chronique de mois) कांहीं अंक त्याच्या वडिलांनीं पैदा करून आपल्या वैद्यकीच्या पुस्तकांच्या आड दडवून ठेवले होते, ते ह्याच्या हातीं लागले. निसर्गतःच स्वातंत्र्याकडे ओढ घेणाऱ्या त्याच्या बुद्धीला त्या वर्तमानपत्रांमध्यें प्रतिपादिलेलीं लोकसत्तेचीं तत्वें अमृतासमान वाटलीं ! जुलमी राज्यकर्त्यांनीं चालविलेल्या शाळांमध्येंहि त्याला स्वातंत्र्याच्या तत्वांचें शिक्षण मिळालें; " शाळेमध्यें ग्रीस व रोम या राष्ट्रांचे इतिहास, एवढाच विषय काळजीपूर्वक शिकविण्यांत येत असे; आणि हा इतिहास म्हणजे अनियंत्रित राज्यपद्धतीची यथासांग बेअब्रूच होय ! जणूं काय लोकसत्तेचें समर्थन करावयासाठींच ही एवढी घटना विधीनें घडवून आणली ! मला लॅटिन शिकविणाऱ्या शिक्षकानें माझ्याकडून टॅसिटस्‌ व लिव्ही* यांच्या इतिहासांचें भाषांतर करवून घेतलें होतें; " ह्या ग्रंथांच्या अध्ययनानें त्याचीं लोकसत्तात्मक मतें अधिकच दृढ झालीं. त्याच्या घरीं सर्वांची वागणूक गरीब श्रीमंतांशीं अगदीं सारखी असे—त्याचे वडील तर गरीबांशींच विशेष प्रेमानें वागत असत. " व्यक्तीमध्यें मनुष्यत्व किती आहे, इमान किती आहे याकडेच त्यांचें लक्ष असे. " लोकसत्तेचीं तत्वें मॅझिनीच्या

---

* लिव्ही व टॅसिटस या दोघांनींहि आपले इतिहास लॅटिन भाषेंत लिहिले आहेत. लिव्हीचा रोमचा इतिहास व टॅसिटसचे ॲनल्स व हिस्टॉरीज हे ग्रंथ इतिहास व वाङ्मय या दोनहि दृष्टींनीं उत्कृष्ट आहेत.

कुटुंबांतील सर्व मंडळींच्या हाडामासांत खिळलेलीं होतीं ! ह्या तत्वांचें शिक्षण मॅझिनीला बाळपणींच मिळालें.

जोसेफ चवदा वर्षांचा झाला तेव्हां त्याला जिनोआ येथील विद्यापीठांत पाठविण्यांत आलें. इटालियन विद्यापीठांतील आयुष्यक्रम विशेष आनंदाचा असे असें मुळींच नाहीं; जिनोआचें विद्यापीठ तर अगदींच अप्रसिद्ध होतें. मॅट्रिकची परीक्षा पास व्हावयासाठीं धर्मोपाध्यायांचें पापपरिक्षालनासाठीं घेतलल्या प्रायश्चित्ताचें प्रतिज्ञापत्रक दाखल करावें लागत असे. ज्या विद्यार्थ्यांना स्थावर मिळकत नसेल त्यांची परीक्षा जास्त कसून घेण्यांत येई ! विद्यापीठांतील सर्व विद्यार्थ्यांना कांहीं धार्मिक कर्में करणें अवश्य मानलें जात असे; पण तीं मॅझिनीनें केव्हांहि केलीं नाहींत; त्याला धर्माबद्दल तिटकारा वाटत असे असें मात्र नव्हे–विद्यापीठांत धर्मकर्में अवश्य मानलीं जात असत म्हणूनच त्यानें तीं पाळलीं नाहींत ! अध्यापक वर्गाची सर्व विद्यार्थ्यांवर सक्त नजर असे; स्वतंत्रतेकडे प्रवृत्ति असलेल्या विद्यार्थ्यांना त्रास द्यावयासाठीं त्यांना राज्यकर्त्यांकडून उत्तेजन मिळे. विद्यार्थ्यांना मिशा राखण्याची सक्त मनाई होती- मिशा ठेवणें ही क्रान्तिकारकांची खूण मानली जात असे !

क्रमिक विषयांचा अभ्यास विद्यापीठांत होतच असे; शिवाय खासगी रीतीनें मॅझिनीनें गणीत, संगीत, व इंग्रजी या विषयांचा अभ्यास केला. त्याची बुद्धि फार तीक्ष्ण होती, शिवाय वाचनाची हौसहि विलक्षण होती—म्हणून शिक्षकांच्या मदतीशिवाय त्यानें आपला बहुतेक अभ्यास पार पाडला. बरोबरीच्या विद्यार्थ्यांवर त्याची पराकाष्ठेची छाप असे. गरीब सहाध्यायांना तो वारंवार कपडे, पुस्तकें व पैसे देत असे. औदार्य, सौजन्य, न्यायप्रियता इत्यादि गुणांमुळें सहाध्यायी व शिक्षक या दोघांनाहि तो प्रिय होता. तेराव्या वर्षी लिहिलले त्याचे कांहीं निबंध सॅव्होना येथील विद्वत्परिषदेनें नांवाजले आणि त्याला परिषदेच्या सभासदांत सामील करून घेतलें–मात्र या निबंधांचा लेखक तेरा वर्षांचा एक बच्चा असेल असें त्यांच्या स्वप्नांतहि आलें नसेल !•

इ. स. १८२०–२१ सालीं कारबोनरी या गुप्त मंडळीनें इटलीमध्यें बंड उभारलें; नेपल्समध्यें या बंडाला चांगलें यशहि आलें. जनतेला शांत करावयासाठीं जबाबदार राज्यघटनेचा मसुदा जाहीर करणें राजाला भाग पडलें. पुढें आस्ट्रियाच्या मदतीनें राज्यकर्त्यांनीं हें बंड चिरडून टाकलें. रागानें अंध झालेल्या राजकर्त्यांच्या जुलुमांतून सुटावयासाठीं बऱ्याचशा बंडखोरांनीं स्पेनचा मार्ग धरला–कारण तेथील

क्रान्तीमध्यें लोकशाहीचा पक्ष विजयी होत चालला होता व तेथें स्वयंसैनिकांची फार जरूर होती. आयुष्यांतील महत्कार्यांत अपयश आलेलें, जिव्हाळयाच्या जिवलगांचा वियोग झालेला, राज्यक्रान्तीच्या कार्यामध्यें आत्मयज्ञ करावयाची प्रतिज्ञा केलेल्या मित्रांच्या विश्वासघातामुळें निराश झालेले, पोलिसांचा ससेमिरा मागें लागलेला, खिशामध्यें छदामही नाहीं—असे सर्व बाजूंनीं गांजलेले बरेचसे हद्दपार बंडखोर जिनोआ शहरीं गोळा झाले होते; त्यापैकीं पुष्कळजण जलमार्गानें जिनोआ सोडण्याची संधि पहात होते; त्यांच्या मदतीसाठीं भर रस्त्यांत वर्गणी गोळा करण्यांत आली, त्यावेळीं मॅझिनीला आपल्या जीवित कर्तव्याची जाणीव झाली. "माझ्या लहानपणीं—सन १८२१ च्या एप्रिल महिन्यांत मी माझ्या आईबरोबर फिरावयास निघालों होतों. त्यावेळीं पीडमॉंट मधील बंड नुकतेंच मोडलें गेलें होतें. बंडखोरांपैकीं कांहींजण निरनिराळया वहाण्यानें शहरांत शिरले होते; दुःखी चेहऱ्यावरून, उदार मुद्रेवरून व लष्करी बाण्यावरून मी या बंडखोरांना इतर लोकांतून ओळखून काढीत असें. समाजांतहि त्यांचेबद्दल विशेष प्रकारची सहानुभूति उत्पन्न झाली होती. आम्ही रस्त्यानें चाललों असतांना आम्हांस एका उंच मनुष्यानें थांबविलें—त्याची मुद्रा पाणीदार व करारी होती—त्याच्या डोळयांतील तेजाची चमक मी कधींहि विसरणार नाहीं; तो निराश्रित बंडवाल्यांसाठीं मदत गोळा करीत होता. आपल्या हातांतील रुमाल आम्हांपुढें पसरून—' इटलींतील हद्दपारांसाठीं ' इतकेंच तो म्हणाला. माझ्या आईनें त्या रुमालांत कांहीं पैसे टाकले. " त्या मनुष्याचें नांव कप्टन रिनि होतें; बंडाच्या आरंभीं उभारण्यांत आलेल्या राष्ट्रसंरक्षक ( National Guards ) पलटणीचा तो अधिकारी होता. " पुढें तो स्पेनमध्यें गेला व बहुधा स्वातंत्र्यदेवतेच्या चरणीं त्यानें आपला प्राण अर्पण केला असावा. "

ह्या प्रसंगामुळें मॅझिनीच्या मनांत मोठी खळबळ उडून गेली. " त्या दिवशीं माझ्या मनांत एक अस्पष्ट विचार उत्पन्न झाला कीं स्वदेशाला स्वातंत्र्य मिळवावयासाठीं लढणें हें आपणां इटालियन लोकांना शक्य आहे आणि म्हणून तसें करणें हें आपलें कर्तव्य आहे. माझ्या देशावर जुलूम होत आहे आणि त्या जुलमाचा प्रतीकार करण्याच्या प्रयत्नाला आपण हातभार लावलाच पाहिजे ! ही कल्पना त्या दिवशीं अगदीं प्रथम माझ्या मनांत आली; तेव्हांपासून हें ध्येय जन्मभर माझ्या नजरेसमोर राहिलें." या प्रसंगापासून मॅझिनीचें

मन अभ्यासावरून उडालें. "त्या इटालियन निराश्रिताचे चेहरे मला ध्यानीं, मनीं, स्वप्नीं दिसूं लागले, आपणहि त्यांचे मागून जावें असें मला वाटूं लागलें." बंडवाल्यांच्या अपयशाचीं कारणें काय असावींत, त्यांचा पराभव कसा झाला, त्यांचें आतां काय कार्य चाललें आहे ही माहिती मिळविण्यांत तो व्यग्र होऊन गेला. सर्व वृत्तांत व परिस्थिति समजावून घेतल्यावर त्याला वाटूं लागलें कीं, "ह्या बंडवाल्यांनीं निष्ठामय कर्तव्यतत्परता दाखविली असती तर त्यांना खात्रीनें यश प्राप्त झालें असतें. मग फिरून एकदां प्रयत्न कां करूं नये ?" देशासाठीं काय केलें पाहिजे याचा त्यानें पुष्कळ विचार केला, "पण आपल्या देशाची सुटका कोणत्या रीतीनें करावी याची मला कल्पना देखील करतां येईना तेव्हां माझी कंबर अगदीं खचून गेली. माझे सहाध्यायी अभ्यासांत गढून गेलेले असत किंवा आपसांत खिदळत असत तेव्हां मी मात्र खिन्न व चिन्ताक्रान्त असा कोठें तरी बसलेला असे. विचारामुळें तारुण्याच्या ऐन भरांत मजवर वृद्धापकाळाची अवकळा आल्यासारखी झाली. आपल्या देशास पारतंत्र्याचें सुतक आलेलें आहे असें मला वाटलें; म्हणून मी नेहमीं काळया रंगाचा सुतकी पोषाख धारण करावयाचा निश्चय केला. (ह्याच प्रकारचा पोषाक तो पुढें जन्मभर वापरीत असे.) माझ्या विचारांत मी सदैव इतका व्यग्र असे कीं हा आत्महत्या करतो कीं काय अशी माझ्या आईस धास्ती पडली. !"

हळुहळू मनोविकारांचें पहिलें वादळ शांत होत चाललें. आपल्या वडिलांचाच धंदा पुढें चालवावयाचा बेत करून त्यानें वैद्यकाच्या अभ्यासाला सुरवात केली, पण शस्त्रप्रयोगाच्या पहिल्याच प्रसंगीं त्याला घेरी आली. शिवाय या नीरस धंद्याकडे त्याचें चित्तहि लागेना, म्हणून वैद्यकाचा अभ्यास सोडून देऊन त्यानें वकीलाच्या अभ्यासाला आरंभ केला.

आपल्या सहाध्यायांचें नेतृत्व नैसर्गिकपणेंच मॅझिनीकडे आलें. उंच कपाळ, तजेलदार काळेभोर डोळे, गंभीर मुद्रा व प्रेमळ स्मित यांच्या संमीलनामुळें त्याचा चेहरा मोठा मोहक व वैशिष्ट्यपूर्ण दिसे. व्यायामामुळें बाल्यावस्थेंतील अशक्तपणापासून तो सर्वस्वीं मुक्त झाला होता. वाचन, विचार व व्यायाम यांमध्यें तो सदैव गढलेला असे. सिगार व कॉफी हीं दोनच व्यसनें त्याला लागलीं होतीं. सर्व दिवसभर वाचीत असावें, संध्याकाळीं आईबरोबर बोलत बसावें किंवा अगदीं एकटें असें दूरदूर भटकावयास जावें असा त्याचा साधारण आयुष्यक्रम होता. एकादे दिवशीं तो चोरून नाटकाला जाई—मात्र नाटक

अर्धेंच टाकून त्याला परत यावें लागे, कारण घराचें दार बरोबर दहा वाजतां बंद करण्यांत येत असे ! आवेशपूर्ण भाषण व मोहक गायन यांमुळें तो आपल्या सहाध्यायांना फार आवडत असे. औदार्यापेक्षांहि करारी नीतिमत्तेमुळें त्याची विद्यार्थीवर्गावर फार छाप असे. त्याच्या अंत:करणांत स्वार्थबुद्धीचा व भीतीचा लवलेशहि नसे. ह्या सद्गुणांमुळें त्याचे सर्व मित्र त्याच्या अर्ध्या वचनांत वागत असत. जाकोपो, जिओव्हानी व ऑगस्टीनो हे तीन रफीनी बंधु त्याचे अत्यंत जिवलग मित्र होते. जाकोपोचा उत्साहपूर्ण स्वभाव मॅझिनीच्या स्वभावाशीं फार जुळत असल्यामुळें त्यांची मैत्री विशेष दृढ होती. जाकोपोचा अंत ज्या भयंकर परिस्थितींत झाला तिजमुळेंच मॅझिनीची स्वकार्यावरील निष्ठा पुढील निराशेच्या दिवसांत दृढतर व्हावयाची होती.

मॅझिनीच्या नेतृत्वाखालीं त्याच्या मित्रमंडळानें जिनोआ येथें वाङमयाच्या व राजकारणाच्या अभ्यासासाठीं एक संस्था स्थापन केली. राज्यकर्त्यांच्या हुकुमावरून त्यावेळचीं बहुतेक सर्व उत्कृष्ट पुस्तकें सरकारजमा करण्यांत आलीं होतीं. अशीं पुस्तकें गुप्तपणें परदेशांतून आणविणें हें कामहि या संस्थेनें चालविलें होतें.

डॅन्टे, शेक्सपीअर व बायरन ह्या कवींचे ग्रंथ मॅझिनीनें या वयांत विशेष काळजीनें वाचले. बायबलाचें अध्ययन त्यानें असेंच अत्यंत मन:पूर्वक केलें होतें, हें त्याच्या लेखांत सर्वत्र दिसून येतें. मानवजातीचें ऐक्य, परमेश्वराचें शासन, उत्साहपूर्ण देशाभिमान, इटली व रोम यांच्या नियोजित कार्यावर व उज्वल भविष्यावर निष्ठा, इटलीच्या एकराष्ट्रीयत्वाबद्दल दृढविश्वास आणि जीवनाला आधारभूत असणाऱ्या नीतीवर श्रद्धा—हीं मॅझिनीच्या विचार-पद्धतींतील मुख्य तत्वें त्याला शिकविणारा गुरू डॅन्टे हाच होय. " डॅन्टेबद्दल मला अत्यंत आदर वाटत असे; डॅटेला कवि या दृष्टीनें तर मी उच्च लेखितोंच पण इटलीचा पिता या नात्यानें त्याचेबद्दल मला जास्तच आदर वाटतो." मॅकॅव्हेली, व्होल्टेअर, रूसो, व्हिक्टर ह्यूगो, गिझो, शिलर, स्कॉट, वर्डस्वर्थ, शेले, बर्न्स वगैरे ग्रंथकारांच्या लेखांचें त्यानें मन:पूर्वक अध्ययन केलें होतें.*

* डॅन्टे (१२६५–१३२१) इटालियन कवि; व्हिटा नुओव्हा व डिव्हाइन कामेडी या महाकाव्यांचा लेखक. शेक्सपीअर (१५६४–१६१६) इंग्लिश कवि व नाटककार यांचा सम्राट्. बायरन (१७८८–१८२४) इंग्लिश कवि.

जिनोआच्या विद्यापीठांत पांच वर्षे काढल्यानंतर त्याला वकीलीची सनद मिळाली. आतां जोसेफबद्दल आपणांस कांहीं काळजी नाहीं या कल्पनेनें त्याच्या आईबापांस मोठा आनंद झाला, पण जोसेफबद्दल येथूनच त्यांना जन्मभर काळजी वाटावी असा परमेश्वरी संकेत होता! जोसेफनें अगोदरच निश्चय करून ठेवला होता कीं, धंद्याच्या भानगडींत विशेषसें पडावयाचें नाहीं व देशाच्या सेवेंत सर्व आयुष्य घालवावयाचें! त्यावेळीं इटलींतील वकीलांस पहिलीं दोन वर्षे नादार कोर्टांत काम करावें लागे व गरीब अशीलांचे खटले फुकट चालवावे लागत. मॅझिनीनें हें काम अत्यंत आस्थेनें केलें. गरीब लोकांचें काम इतक्या कळकळीनें कोणींच करीत नसे; म्हणून अशा अशीलांची धांव नेहमीं या तरुण वकीलाकडेच असे.

वाङ्मयाचा व्यासंग हा त्याचा अत्यंत आवडीचा विषय—पण तो त्याला सोडावा लागला. सरस्वतीची सेवा सोडून जन्मभर कटवंडाळ्या करीत त्याला

---

चाइल्ड हॅरोल्ड, प्रिझनर ऑफ शिलॉन वगैरे स्वातंत्र्यमय काव्यांचा कर्ता. ग्रीक लोकांच्या स्वातंत्र्यासाठीं लढत असतांना दोषिक तापामुळें मरण पावला. मॅकॅव्हेली (१४६९–१५२७) इटालियन मुत्सद्दी; कुटील नीतीचा प्रणेता. 'प्रिन्स' या ग्रन्थाचा लेखक. व्हॉल्टेअर (१६९४–१७७८) फ्रेंच कवि, नाटककार व तत्ववेत्ता. डॅन्टे व बायरन यांजप्रमाणें व्हॉल्टेअरलाहि आपल्या देशांतून हद्दपार व्हावें लागलें होतें. फ्रान्सच्या राज्यक्रान्तीचें तात्विक बीजारोपण यानेंच केलें. रूसो (१७१२–१७७८) फ्रेंच तत्ववेत्ता. सोशल कॉन्ट्रॅक्ट हा ग्रन्थ लिहून त्यानें फ्रान्समध्यें क्रान्तिकारक तत्वांचा प्रसार केला. व्हिक्टर ह्यूगो (१८०२–१८८५) फ्रेंच कवि, नाटककार व कादंबरीकार. एकोणीसाव्या शतकांतील फ्रेंच लेखकांचा अग्रणी. गिझो (१७८७–१८७४) फ्रेंच मुत्सद्दी व इतिहासकार. हिस्टरी आफ सिव्हिलिझेशन वगैरे ग्रंथांचा कर्ता. शिलर (१७५९–१८०५) जर्मन कवि व नाटककार. मेड आफ ऑर्लीन्स, विल्यम टेल वगैरे स्वातंत्र्योत्तेजक नाटकांचा कर्ता. स्कॉट (१७७१–१८३२) स्कॉटिश कवि व कादंबरीकार. ले आफ दि लास्ट मिन्स्टेल, हार्ट आफ् मिडलोथियन वगैरे उत्कृष्ट ग्रंथाचा लेखक. वर्डस्वर्थ (१७७०–१८५०) इंग्लिश कवि. नवविचारप्रवर्तकांपैकीं एक प्रमुख लेखक. शेले (१७९२–१८२२) इंग्लिश कवि. उत्कृष्ट वीणाकाव्यें व प्रोमेथियस अनबाउंड वगैरे ग्रंथांचा कर्ता. बर्न्स (१७५९-१७९६) स्कॉटिश राष्ट्रीय शाहीरांचा अग्रणी.

देशोदेशीं भटकावें लागलें. " ऐतिहासिक नाटकें व कादंबऱ्या यांचीं अनेक संविधानकें माझ्या कल्पनेपुढें उभीं राहात; एकांतवासांत प्रणयी मनुष्याला सुंदर व रम्य तरुणींचीं कल्पनाचित्रें ज्याप्रमाणें समाधान देतात त्याचप्रमाणें ते प्रसंग माझ्या चित्ताला मोहित करीत असत–पण स्वदेशाच्या निकृष्टावस्थेची लाज वाटून मला राजकारणाच्या खटापोपांत शिरावें लागलें. " इटलीला स्वातंत्र्य केव्हां प्राप्त होईल आणि आपण पुन्हां एकदां सरस्वतीची सेवा केव्हां सुरू करूं अशी उत्कण्ठा त्याला जन्मभर लागून राहिली होती. " स्वातंत्र्य हें राष्ट्राचें चैतन्य आहे; स्वतंत्र देशांमध्यें राष्ट्रीय जीवनाच्या प्रत्येक उसळीबरोबर राष्ट्राच्या सारस्वतालाहि बहर येत असतो. इटली आज अगदीं मृतवत् होऊन पडला आहे; इटलीच्या राष्ट्रीय जीवनाला ध्येय नाहीं; इटलीच्या चैतन्याला संघटित स्वरूपांत प्रकट व्हावयास आज वाव नाहीं; आणि म्हणूनच इटलीचें राष्ट्रीय सारस्वत विकास पावत नाहीं. सारस्वताचा विकास व्हावा अशी तुमची इच्छा आहे काय ? तर मग तुम्ही स्वदेशाच्या प्रश्नाकडे पहा. तुम्हांला स्वदेश पाहिजे काय ? तर मग एकदम राजकारणाकडे वळा. राष्ट्राचें राजकीय ध्येय साध्य झालें तर मग आपल्या रक्षेवरहि वाङ्मयाला फुलांचा बहर येईल ! वाङ्मयाचा विकास व्हावा अशी इच्छा असेल तर राष्ट्राच्या सुप्तावस्थेंत असलेल्या चैतन्याला जागृत करा. स. १८२१ च्या एप्रिल महिन्यांत उदय पावलेल्या कल्पनांची ज्योत त्यावेळींहि ( १८२७ ) माझ्या हृदयांत जागृत होती; वाङ्मयाच्या द्वारें राष्ट्राची सेवा करावी ही कल्पना मी यावेळीं सोडून दिली आणि राजकारणामध्यें प्रत्यक्ष कार्याला हात घालावयाचा असें ठरविलें. " सरस्वतीची रमणीय उपासना सोडून त्यानें राष्ट्रदेवतेच्या सेवेचें खडतर व्रत स्वीकारलें " आणि हाच माझा पहिला महत्वाचा स्वर्थत्याग होय ! "

त्यावेळीं इटलीमध्यें रोमँटिसिस्टस् ( अद्भुत रचनावादी ) व क्लासिसिस्टस् ( पूर्व रचनावादी ) या दोन पक्षांमध्यें वाङमयावरील नियमनांच्या बाबतींत मोठें रण माजलें होतें. दोन हजार वर्षांपूर्वीं घालून दिलेल्या नियमनांच्या बंधनांतच वाङ्मयानें राहिले पाहिजे, इटलीचें वाङ्मयहि पारतंत्र्यांत–बौद्धिक गुलामगिरींत असलें पाहिजे असें पूर्वरचनावाद्याचें म्हणणें होतें. ज्यांचा जीव वयानें सुकून गेलेला आहे, ज्यांच्या हृदयांत देशाभिमानाचा व उदार मतांचा लवलेशहि नाहीं असे जुनेपुराणे लोक या पूर्वरचनावादी पक्षांत होते. वाङ्मयाची दिशा अंतःस्फूर्तीच्या अनुरोधानें ठरविण्यांत यावी असें

नव्या पक्षाचें म्हणणें होतें. नव्या पक्षाचे अनुयायी चैतन्यानें भरलेले व ध्येयासाठीं तळमळणारे होते. सरस्वतीला दास्यमुक्त करून तिला अंत:स्फूर्तीच्या अनुरोधानें विकसित होऊं द्यावें असें त्याचें म्हणणें होतें. पारतंत्र्यातून वाङ्मयाला मुक्त करावयासाठीं त्यांनीं पुराणमतवाद्यांविरुद्ध बंड उभारलें. मॅझिनी अर्थातच नव्या पक्षाला मिळाला. " सारस्वताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे, कारण त्याशिवाय राष्ट्राचें सामाजिक व राजकीय पुनरुज्जीवन अशक्य आहे, म्हणून हा प्रश्न केवळ वाङ्मयापुरताच नव्हता. " मात्र ह्या प्रश्नांचें महत्व सर्वांच्या लक्षांत आलेलें नव्हतें. नव्या पक्षाच्या उच्छृंखल अनुयायांना वाटे कीं, वैयक्तिक लहर म्हणजेच कलेचें पूर्ण स्वरूप होय ! ललितकलाहि नियमबद्ध असल्याच पाहिजेत, याचें त्यांना भानच नव्हतें. पुराणपक्षीयांना वाटे कीं, वाङ्मयास बंधनांत ठेवल्यानेंच तें शुचिर्भूत राहूं शकेल. मॅझिनीची वाङ्मय कल्पना अशी हिरवट नव्हती. " राष्ट्राची राजकीय आणि बौद्धिक प्रगति बरोबरच चाललेली असते, आणि म्हणूनच तरुण पक्षाचीं तत्वें राष्ट्राच्या राजकीय जीवनालाहि पोषकच आहेत " असें त्याचें म्हणणें होतें. " इटलीचें राष्ट्रीय वाङ्मय निर्माण करणें हें या नव्या पक्षाचें कार्य आहे. मनुष्याच्या मनाला क्षणभर आनंद देणें हें वाङ्मयाचें उद्दिष्ट नव्हे, राष्ट्राच्या आकांक्षा व भावना राष्ट्राच्या वाङ्मयांत प्रतिबिंबित झाल्या पाहिजेत; जनतेच्या गरजा व चळवळी यांचा गर्भित अर्थ त्यामध्यें विशद होत असला पाहिजे. कलेचें खरें स्वरूप म्हणजे व्यक्तीची लहर नव्हे, कलेमध्यें भूत व भविष्य यांचें संमिश्रण झालें पाहिजे; कलेचें स्वरूप भविष्यकालाचें द्योतक व भूतकालाचा परिणाम असलें पाहिजे. इटलीच्या कलेमध्यें भूत व भविष्य यांचें संमिश्रण व्हावें कसें ? गुलामगिरीची इटलीला इतकी चटक लागली आहे कीं, लोक स्वत्व विसरले आहेत; या गुलामगिरींतहि जीव धरून राहिलेल्या मनोवृत्तींबरोबर लेखकानें समरस झालें पाहिजे. व्यक्तीच्या स्फूर्तीचा उद्भव समाजाच्या चैतन्यांतच आहे; समाजचैतन्याचा विकास व्हावयास स्वदेश स्वतंत्र असला पाहिजे. स्वदेशाशिवाय व स्वातंत्र्याशिवाय वाङ्मयाचा विकास होणें अशक्य आहे म्हणून सर्वांनीं आपल्या शक्ति राजकारणाकडे लाविल्या पाहिजेत. "

जिनोआ येथें व्यापारविषयक माहिती प्रसिद्ध करणारें एक वर्तमानपत्र ( Indicatore Genovese ) निघत असे. वेळोवेळीं प्रसिद्ध होणाऱ्या

पुस्तकांवर मॅझिनीनें लिहिलेले अभिप्राय प्रसिद्ध करावयाचें ह्या पत्राच्या संपादकानें कबूल केलें. प्रथमतः हे अभिप्राय अगदीं छोटे छोटे असत. वाढतां वाढतां त्यांना स्वतंत्र निबंधांचें रूप येऊं लागलें. हे वाङमयात्मक निबंधहि सुधे नसत-क्वचित् एकाद्या जागीं एकादा शब्द बदलला कीं त्यांना एकदम जहाल राजकीय स्वरूप प्राप्त होत असे! अर्थातच या पत्राचें व्यापारी स्वरूप नाहींसें होऊन वाङमयाची चर्चा हेंच त्याचें प्रधान स्वरूप होऊन बसलें. अशा प्रकारचे लेख लिहितांना मझिनीला गनीमी काव्यानें लढणाऱ्या वीरासारखा उत्साह येत असे; कारण वाङ्मयाच्या चर्चेमधन गुप्तपणानें राजकारणाची चर्चा करणें ही त्याच्या दृष्टीनें गनीमी काव्याची लढाईच होती! मॅझिनीचे वाङ्मयात्मक निबंध प्रसिद्ध होऊं लागल्यामुळें त्या पत्राचा खपहि वाढला; आजवर आलेल्या यशानें उत्साहित होऊन संपादकांनीं दुसऱ्या वर्षाच्या आरंभापासून आपल्या पत्राचा आकार दुप्पट करावयाचा बेत जाहीर केला; पण मॅझिनीचे लेख अगोदरच पोलिसांच्या डोळ्यावर आले होते. स्वतंत्र विचारांचा प्रसार त्यांना कसा सहन होणार? पत्राचा आकार वाढावयाचे अगोदरच पीडमॉंटच्या सरकारनें तें पत्र अजिबाद बंद करण्याचा हुकूम सोडला (१८२८). ग्यूराएझी, मॅझिनी वगैरे मंडळींनीं लेगहार्नमध्यें दुसऱ्याच एका नांवाखालीं (Indicator Livornese) पहिल्या पत्राच्याच धर्तीवर, एक नवें पत्र सुरू केलें. ह्या पत्रामधील लेखांचा ओघ पूर्वीप्रमाणें प्रच्छन्न नव्हता; शिवाय हें पत्र प्रसिद्ध होत असे तेथील सरकारहि इतकें जुलमी नव्हतें; पण पुढें पुढें त्यामध्यें इतके जहाल लेख येऊं लागले कीं, टस्कनीच्या सरकारालाहि तें बंद करविणें भाग पडलें. मॅझिनीचे लेख प्रसिद्ध व्हावयाचें बंद झालें खरें-पण अगोदरच प्रसिद्ध झालेल्या लेखांमुळें अनेक तरुणांचीं अंतःकरणें थरारून निघालीं होतीं; त्यांच्या चैतन्यमय भावनांना आजवर चालनाच मिळाली नव्हती. त्या सर्वांच्या अंतःकरणांत आतां स्वदेशासंबंधींचे विचार खेळूं लागले! जनतेचे सुप्त विचार आतां जागृत झाले होते. वाङ्मयाची चर्चा करणारीं पत्रेंसुद्धां बंद करावींत असें परक्यांच्या मुठींत असलेल्या इटालियन संस्थानिकांना वाटत आहे, जनतेची प्रगति होऊंच द्यावयाची नाहीं असा त्यांचा दृढनिश्चय आहे व ह्या संस्थानिकांना उलथून टाकल्याशिवाय आपली प्रगति होणें अशक्य आहे-हें या दोन वर्तमानपत्रांच्या प्रयोगावरून लोकांना चांगलें कळून आलें.

वाङ्मयचर्चेमुळें मॅझिनी बराच प्रसिद्धीला आला; पण वाङ्मय हा आपल्या जीविताचा मार्ग नव्हे अशी अगोदरच त्याची खातरजमा झालेली होती. राजकारणामध्यें प्रत्यक्ष भाग घ्यावयास तो अत्यंत उत्सुक होता. त्यावेळीं इटालीमध्यें कारबोनरी या नांवाची एक गुप्त समिति होती. इंडिकेटर जिनोव्हीजमध्यें लेख लिहूं लागण्याच्या सुमारास एका मित्राच्या मदतीनें मॅझिनीचा या समितींत प्रवेश झाला.

समितीमध्यें नव्या सभासदाला प्रविष्ट करून घेतेंवेळीं एक प्रवेशक समारंभ होत असे. ह्या समारंभाला फाजील गंभीरतेचें स्वरूप प्राप्त झालें होतें; समारंभाचें सव्य अपसव्य चाललेलें असतांना मॅझिनीनें मोठया कष्टानें आपलें हंसें दावलें ! सन १८२० च्या बंडापासून तो या संस्थेची माहिती मिळवीतच होता; आतां आपण या समितीचे प्रत्यक्ष सभासद झालों—आतां तरी या संस्थेचीं मतें, मार्ग व उद्दिष्ट काय आहे याबद्दल आपणांस जास्त माहिती मिळेल अशा कल्पनेनें त्यानें बऱ्याच सभासदांची गांठ घेतली; पण त्याला आढळून आलें कीं, या बाबतींत कोणासच कांहींहि माहिती नाहीं ! संस्थेच्या शपथेमध्यें आज्ञाधारकपणाच्या प्रतिज्ञेशिवाय दुसरें कांहींहि नव्हतें—राष्ट्रस्वातंत्र्याचा उल्लेखहि नव्हता हें पाहून तर त्यास फारच अचंबा वाटला. सभासदांनीं जादा भानगडींत पडावयाचें नाहीं—होतील ते हुकूम विनतक्रार पाळावयाचे व हलके हलके समितीमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या विश्वासाला पात्र व्हावयाचें एवढेंच आपलें कर्तव्य होय, अशीच सर्व सभासदांची कल्पना होती; ही विचित्र संघटना पाहतांच मॅझिनीचे मनांत संस्थेबद्दल बेभरंवसा उत्पन्न झाला. आपल्या देशाचें स्वातंत्र्य कोणत्या मार्गानें मिळवावयाचें याबद्दल कारबोनरी समितीच्या सभासदांचा कांहींच सिद्धांत ठरलेला नव्हता; फ्रान्स, स्पेन, इटली वगैरे देशांमध्यें संस्थेचे सभासद पसरलेले होते; लोकसत्तेच्या अंधुक व अस्पष्ट कल्पनेशिवाय दुसऱ्या कोणत्याही तत्वाला तिजमध्यें थारा मिळत नसे. शिवाय या संस्थेचें नेतृत्व मध्यम स्थितींतील उतार वयाच्या गुळमुळीत मतांच्या लोकांकडे गेलें होतें; तरुणांच्या उत्साहाचा भंग करण्याशिवाय दुसरें कोणतेंही कार्य त्यांच्या हातून होणें शक्य नव्हतें. त्यांचेमध्यें आत्मविश्वास नव्हता; त्यांना वाटे इटलीला फ्रान्सची मदत होईल, स्पेनची मदत होईल ! पण इटलीमध्यें ही एकच गुप्त मंडळी त्याकाळीं जीव धरून राहिली होती; राजकारणांत प्रत्यक्षपणें शिरकाव करून घ्यावयासाठीं अशा संस्थेशिवाय दुसरा मार्ग उपलब्ध

नव्हता, म्हणूनच मॅझिनीनें हें सर्व सहन केलें. संस्थेच्या खजिन्याकरितां प्रत्येक सभासदाला बरीच वर्गणी द्यावी लागे. मॅझिनीसारख्याला अशी रक्कम दरमहा देत राहणें बरेंच जड होतें. पण कारबोनरी मंडळीला मदत करणें हें सत्कार्य आहे अशी त्याची समजूत होती; म्हणूनच त्यानें ही वर्गणी देण्यामध्यें कधींहि दिरंगाई किंवा कुरकूर केली नाहीं. " अमुक सुधारणा झाली पाहिजे, तमुक सुधारणा झाली पाहिजे असें तोंडानें वायफळ वडवडणारे लोक पुष्कळ असतात; पण त्याच सुधारणांच्या पायीं स्वतःच्या पदरास खार लागण्याची पाळी आली कीं, हे सर्व बोलघेवडे सुधारक माघार घेतात. वाईट कामासाठीं पैसे उडविणें हें पाप आहे; परंतु एखाद्या पवित्र कार्याला मदत होण्याचा संभव असतांना पैसे देण्यास मागें घेणें हें त्याहूनहि मोठें पाप आहे. सत्कार्यासाठीं एक कवडी देण्याचा प्रसंग आला कीं लोक आपापसांत यादवी माजवतील आणि स्वतःच्या चैनीसाठीं मात्र तेच लोक लाखों रुपयांचा फन्ना उडवतील. स्वदेशाच्या यशासाठीं, कीर्तीसाठीं व स्वातंत्र्यासाठीं वेळ पडल्यास स्वतःच्या रक्तमांसाचीं नाणीं पाडावीं लागतील हें समजत असूनहि वारंवार द्रव्यत्याग करावा लागतो म्हणून लोक रडगाणें गात बसतात ! स्वतःच्या आणि आपल्या देशबांधवांच्या अब्रूला व आत्म्याला काळोखी लागली तरी ते ती पत्करतील, पण आपल्या थैलीचा बंद ढिला करणार नाहींत ! ख्रिश्चन धर्माच्या ऐन भराच्या दिवसांत कितीएक भाविक लोक आपली सर्व संपत्ति आपल्या गरीब बांधवांच्या मदतीसाठीं धर्मगुरूंच्या हवालीं करून, स्वतः अगदीं गरीबीमध्यें संतुष्टपणें रहात असत—त्यांचे अंतःकरणांत जिवंत श्रद्धा होती, आणि आज आमच्या डोक्यांत उसनवार आणलेलीं मतें भरलेलीं आहेत ! "

कारबोनरी मंडळींच्या अंगीं त्याला एक सद्गुण मात्र दिसून आला. इटलीचें स्वातंत्र्य कोणत्या मार्गांनीं साधावयाचें याबद्दल जरी त्यांचेमध्यें ऐकमत्य नव्हतें तरी त्यांचा कृतनिश्चय झालेला होता कीं, कांहीं तरी प्रत्यक्ष कृति करून दाखवावयाची, वायफळ वटवटींत कालक्षेप करावयाचा नाहीं. या मंडळींना तुरुंगवासाची, धार्मिक बहिष्काराची, हद्दपारीची अथवा फांशीची बिलकुल दरकार नसे ! एक बंड फसलें तर तितक्याच उत्साहानें दुसरें बंड उभारावयास ते नेहमींच तळहातावर शिर घेऊन सज्ज असत, "आणि म्हणूनच मी या मंडळीमध्ये शिरलों व तनुमनधनेंकरून संस्थेच्या अभिवृद्धीसाठीं झटलों. गुप्त मंडळ्यांच्या संघटनेमध्यें मी सारें आयुष्य घालविलें आहे आणि माझ्या अनुभवावरून मी सांगतों कीं,

लोकांना बिनचूक मार्ग दाखविणें हें अत्यंत कठीण काम आहे—नेत्यांचे हुकूम बिनचूक व बिनतक्रार पाळणें हेंहि तितकेंच अवघड आहे. प्रत्येक देशांत असे अनेक तरुण असतात कीं ते अहंपणाच्या मिजासींत कोणत्याच पक्षास किंवा मंडळीस मिळत नाहींत—हे लोक हव्या त्या प्रबळ पक्षाचे अथवा स्वार्थाचे दास व्हावयास कबूल असतात. कारण त्यांची संघभावना विकास पावलेली नसते, कारण त्यांना शिस्तीनें काम करावयाची संवय नसते." तरुणांनीं संघटित व्हावें, राजकारणांत प्रत्यक्ष भाग घ्यावा व कांहीं काळपर्यंत आपल्या नेत्यांचे हुकूम बिनतक्रार पाळावे अशी निष्ठा असल्यामुळें मॅझिनीनें आपल्या वरिष्ठांचे हुकूम पाळले व संस्थेचें कार्य केलें.

कारबोनरी संस्थेचा सभासद झाल्यानंतर थोडक्याच दिवसांनीं मॅझिनीला संस्थेचा दीक्षागुरु करण्यांत आलें व संस्थेचा प्रसार करावयाचें काम त्याजवर सोंपविण्यांत आलें. ह्या सुमारास कोणा चुगलखोरानें हा आपल्या वरिष्ठांसंबंधीं अवमानकारक भाषा वापरतो अशी चहाडी केली! पण संस्थेच्या अधिकाऱ्यांचें मॅझिनीबद्दल चांगलें मत असल्या कारणानें त्यांनीं त्याला समजूत द्यावयासाठीं एक फार्स बठवून दाखवला. संस्थाप्रचाराचे कामावर निघावयाचे अगोदर एका विशिष्ट ठिकाणीं हजर व्हावयाचा त्याला हुकूम करण्यांत आला. त्या ठिकाणीं कांहीं सभासद जमलेले होते; त्यांचेपैकीं दोघांनीं काळे बुरखे घेतलेले होते. मॅझिनी तेथें येतांच एका वरिष्ठानें सभासदांना उद्देशून सांगितलें कीं, पुढाऱ्यांची निंदा केल्याबद्दल एका सभासदाला ठार मारण्यासाठीं हे दोन बुरखेवाले जाणार आहेत! या प्रच्छन्न धमकावणीमुळें मॅझिनीच्या अंगाचा नुसता तिळपापड उडाला व संतापाच्या पहिल्या भरांत "प्रचारासाठीं आपण कोठेंही जावयास कबूल नाहीं, याबद्दल संस्थेला आपलें काय वांकडें करावयाचें असेल तें तिनें करून घ्यावें," असा त्यानें आपल्या वरिष्ठांकडे निरोप पाठविला. वैयक्तिक अपमानासाठीं देशकार्याचा घात करणें अनुचित आहे अशी कांहीं मित्रांनीं समजूत घातल्यावर आणि संतापाचा पहिला भर ओसरल्यावर तो सभासद मिळविण्यासाठीं टस्कनी येथें जावयास कबूल झाला.

"ज्या लोकांनीं प्रचारकाचें काम मला दिलें त्यांना हें काम करण्याजोगी संधि मिळविणें मला किती जड आहे ह्याची कल्पनाहि नव्हती. घरांतील शिस्त मोडावयाचा प्रयत्न मी आजवर केव्हांहि केलेला नव्हता आणि मला तशी इच्छाहि होत नसे. कारणाचा मागमूसहि लागूं दिल्याशिवाय प्रवासावर जाव-

याची परवानगी घरांतून मिळविणें तर जवळ जवळ अशक्यच होतें; ग्रंथमाला लागणारें द्रव्य मिळविणें हेंहि तितकेंच जड होतें. माझें मन कितीतरी वेळ अनिश्चयाचे हेलकावे खात होतें; बराच वेळ विचार केल्यानंतर कामावर निघावयाचा मी निश्चय केला. चार थापा मारून थोडेसे पैसे उकळण्यांत मी माझ्या आईच्या सज्जनपणाचा फायदा घेतला. " प्रचाराचें काम अंगावर घेतल्यानंतर संस्थेच्या अभिवृद्धीसाठीं मॅझिनीनें जिवापाड मेहनत केली. टस्कनी प्रांतांत त्यानें बरेच सभासद मिळविले व लेगहार्न येथें संस्थेची शाखाहि स्थापन केली; पण आपण जें कार्य करीत आहोंत त्यामध्यें विशेष जीव नाहीं असें त्याला प्रत्यक्ष अनुभवानंतर वाटूं लागलें. ज्या संस्थेच्या प्रसारासाठीं व पुनरुज्जीवनासाठीं आपण इतकी खटपट करीत आहों तिला ध्येयच नाहीं मग साधनांची एकवाक्यता कोठून असणार-हा विचार वारंवार त्याच्या मनांत येऊं लागला. मृत्युपंथाला लागलेल्या ह्या संस्थेचें पुनरुज्जीवन करण्यापेक्षां एकादी नवीनच अधिक उत्साहमय, विशिष्ट ध्येयासाठीं व विशिष्ट साधनांचा पुरस्कार करणारी संस्था स्थापन करणें जास्त सोपें व अधिक इष्ट आहे असें त्याला वाटूं लागलें. टस्कनी, बोलोना, जिनोआ व पीडमॉंट या कारबोनरी संस्थेच्या शाखांना संघटितपणा आणावयासाठीं बोलोना येथें जावयाचें ठरवून त्यानें सरकारकडे प्रवासाच्या परवान्याची मागणी केली. बोलोना येथें असलेल्या डन्टेच्या ग्रन्थाच्या एका हस्तलिखित प्रतीचें परीक्षण आपणांस करावयाचें आहे म्हणून आपणांस प्रवासाचा परवाना पाहिजे आहे असें त्यानें पोलिसखात्यास कळविलें होतें-पण-यापेक्षां जास्त महत्वाचें काम नसल्यास थोडे दिवस परवाना मिळणार नाहीं असें सरकारांतून त्याला कळविण्यांत आलें-तेव्हां संघटनेचा बेत सोडून देऊन घरींच बसून राहणें त्याला भाग पडलें.

इ.स. १८३० सालीं फ्रान्समध्यें क्रान्तिकारकांनीं उठावणी केली तेव्हां इटालियन कारबोनरी मंडळींतहि नवीन चैतन्याचा संचार झाला. नवीन सभासदांची भरती चढत्या प्रमाणांत होऊं लागली, पूर्वींचे प्रवेशक समारंभ वगैरे रद्द करण्यांत आले आणि सर्वांनीं मिळून एकदम बंड उभारावयाचें असें ठरविण्यांत आलें. लढाई होणार असें समजतांच तरुण मंडळींना मोठा उत्साह आला-त्यांनीं भावी युद्धासाठीं शिशाच्या गोळ्या पाडावयास सुरवात केली !

इकडे उत्साहाला भरती येत असतांना मॅझिनीला अंतःस्फूर्तीनेंच वाटावयास लागलें होतें कीं, लवकरच कोणीतरी आपला विश्वासघात करणार; म्हणून

कटांतील लोकांशीं पत्रव्यवहार करण्याची त्यानें अशी व्यवस्था केली कीं, वस्तुत: राजकीय पण बाह्यत: खासगी दिसणारीं पत्रें यानें आपल्या आईकडे पाठवावीं व तिनें तीं ज्यांची त्यांस पोंचवावीं ! कारबोनरी संस्थेमध्यें सभासदांची भरती जास्त जारीनें होऊं लागली तसें सरकारहि सावध झालें; बरेचसे सरकारी अधिकारी बातमी काढावयासाठीं संस्थेमध्यें प्रविष्ट झाले-त्यांचेपैकींच एकानें मॅझिनीबद्दल नक्की बातमी सरकाराला दिली. पोलिसांचा त्याचेवर अगोदरपासून डोळा होताच; कारबोनरी ह्या क्रान्तिकारक समितिमध्यें कांहीं लोकांना प्रविष्ट करून घेतल्याच्या आरोपावरून पोलिसांनीं मॅझिनीला कैद केलें.

मॅझिनीच्या वडिलांना ही बातमी लागतांच आपल्या चिरंजीवांना कां कैद केलें हें समजावून घ्यावयासाठीं ते जिनोआच्या गव्हर्नरास भेटावयास गेले. त्यांना जबाब मिळाला कीं, " तुमचा मुलगा तरुण व बुद्धिमान् आहे, पण त्याला रात्रीं बेरात्रीं विचारांत गर्क होऊन एकट्यानें सहल करावयाची फार वाईट खोड आहे ! अशा वयांत इतकें विचारांत गर्क होऊन जाण्यासारखें काय आहे ? आपण कोणत्या विषयासंबंधीं विचार करीत आहों हें या लोकांनीं आम्हाला कळविलेंच पाहिजे—आपले विचार कशासंबंधीं आहेत हें सरकारास न कळवितां विचार करीत राहणें हें सरकारला बिलकुल आवडणार नाहीं—आणि ह्याच अपराधासाठीं आपल्या चिरंजीवांना कैदेंत टाकण्यांत आलें आहे ! "

कैद करण्यांत आलें तेव्हां मॅझिनीजवळ बंदुकीच्या गोळ्या; सांकेतिक लिपींत लिहिलेलें एक पत्र; फ्रान्समध्यें ता. २७, २८ व २९ जुलै सन १८३० मध्यें झालेल्या बंडाळीचा सरकार जमा झालेला इतिहास; कारबोनरी समितीच्या शपथपत्रिकेचा मसुदा आणि एक गुप्ती इतका पुरावा होता ! या साधनांमुळें त्याचेवर आरोप सहज शाबीत झाला असता. पोलिसांच्या अटकेंत असूनहि हा सर्व पुरावा त्यानें मोठ्या शिताफीनें व धैर्यानें नाहींसा केला ! पोलीस बराकींत कच्च्या अटकेंत असतांना एका वृद्ध अधिकाऱ्यापुढें मॅझिनीची जबानी झाली. " त्यानें मला अनेक प्रकारचे आडवे तिडवे प्रश्न विचारले; त्यांचीं उत्तरें मी अगदीं थंडपणानें दिलीं. मी जितक्या शांतपणानें उत्तरें देई तितका तो अधिक चिडत असे ! मला अगदीं चीत करून टाकण्यासाठीं त्यानें आपला निर्वाणीचा प्रश्न विचारला कीं, ' मेजर कॉटिन* नांवाच्या मनुष्यास मी

* पॅरिसच्या क्रान्तीनंतर थोडक्याच दिवसांनीं मेजर कॉटिन नांवाच्या एक मनुष्यास कारबोनरच्या दुसऱ्या वर्गाची दीक्षा द्यावयाचा मॅझिनीला हुकूम

अमुक दिवशीं अमुक वाजतां कारबोनरी संस्थेंत प्रविष्ट करून घेतलें होतें कीं नाहीं?' त्यानें हा प्रश्न विचारतांच माझ्या अंगावर शहारे आले, पण सर्व मनोविकार आंवरून मी धिटाईनें त्याला सांगितलें कीं, 'हा मेजर कॉटिन कोण आहे याची मला मुळींच माहिती नाहीं; जर तो तुमचा इतका खात्रीचा साक्षीदार आहे तर त्याला पुढे कां आणीत नाहीं!' मेजर कॉटिननें विश्वासघात केला होता तो याच अटीवर कीं, चौकशीच्या वेळीं त्याला साक्षीसाठीं बोलावण्यांत येऊं नये!

"बराकींमध्यें शिपायांच्या शिव्यांचा व चेष्टांचा माझ्यावर वर्षाव होत असे; कच्च्या अटकेंत असतांना मला घरूनच अन्नपाणी येत असे; एके दिवशीं या अन्नामध्यें मला एक पेन्सिलीचा तुकडा सांपडला. त्यावेळीं माझे घरचे कपडेहि मला वापरण्यास मिळत असत; ते धुवावयास घरीं पाठवितांना त्या पेन्सिलीनें मळक्या कपड्यांवर मी कांहीं मजकूर लिहून पाठविला. माझ्या मित्रांचे विरुद्ध पुरावा मिळेल असे कांहीं कागदपत्र या युक्तीमुळें नाहींसे करतां आले!"

कांहीं दिवसांनीं मॅझिनीला सॅव्होनाच्या किल्यामध्यें अटकेंत ठेवण्यांत आलें. येथें तो सहा महिने अटकेंत होता. किल्याच्या शेवटच्या मजल्यावर त्याची कोठडी होती. "तेथून मला अनंत आकाश आणि विस्तीर्ण सागर दिसत असे! सागर आणि आकाश! हीं विश्वचालकाच्या अगाध लीलेचीं प्रमाणें आहेत, अनंततेचीं मूर्तिमंत स्वरूपें आहेत! कोठडीच्या गज मारलेल्या खिडकीजवळ जातांच मला आकाश व सागर याचें दर्शन होई! बाहेरच्या जमिनीचें मला दर्शनसुद्धां होत नसे; पण वारा माझ्या दिशेनें वाही तेव्हां समुद्रकाठीं काम करणाऱ्या कोळ्यांचे शब्द मात्र मला ऐकूं येत. त्या तुरुंगांतहि मला

---

झाला. कॉटिनची व मॅझिनीची ओळखहि नव्हती! ठरलेल्या खाणावळींत तो भेटतांच रंगरूप पाहूनच मॅझिनीला त्याचेबद्दल संशय आला. काठींतली तरवार उपसून मॅझिनी त्याला दीक्षाविधीची शपथ सांगत आहे तोंच एका गुप्त खिडकींतून एका मनुष्यानें जमिनीवर धाडकन् उडी टाकली! तो मनुष्य आपला नोकर आहे, अशा रीतीनें अशा वेळीं येथें आल्याबद्दल मी त्याला चांगलाच फैलावर घेईन, वगैरे थापा देऊन कॉटिननें वेळ मारून नेली—मॅझिनीला मागाहून कळलें कीं तो मनुष्य एक गुप्त पोलीस होता!

एक स्नेही मिळाला होता— एक लहानसा पक्षी नेहमीं माझ्या खोलींत येई, माझें त्याच्यावर विलक्षण प्रेम जडलें होतें !"

सॅव्होना येथें आल्यावर मॅझिनीला एकदां सिगारेट ओढण्याची तलफ आली. "तुरुंगावरील मुख्य अधिकाऱ्याकडे मी सिगारेट मागितली तेव्हां तो म्हणाला कीं, 'तुरुंगांत तुह्मांला सिगारेट द्यावी असा हुकूम मला मिळालेला नाहीं, पाहिजे तर मी जिनोआच्या मुख्य अधिकाऱ्याला विचारून पाहतों.' हें त्याचें उत्तर ऐकतांच माझ्या डोळयांत आसवें उभीं राहिलीं—कैद झाल्यापासून माझ्या डोळयांत आलेले हे पहिलेच अश्रू ! ज्या लोकांबद्दल मला अत्यंत तिरस्कार वाटत असे त्यांच्या तावडींत मी पुरता सांपडलों आहे या कल्पनेमुळें माझे मनोविकार मला आवरले नाहींत !" अटकेंत पडल्यापासून एक महिनापर्यंत त्याला वाचावयास पुस्तकें मिळालीं नाहींत. पण पुढें तुरुंगावरील अधिकारी बदलला आणि नव्या गव्हर्नरानें त्याला बायबल, टॅसिटस व बायरन हीं तीन पुस्तकें दिलीं. अगदीं सरळ दिसणाऱ्या प्रथांतहि देशभक्ताला किती जहाल विचार आढळतात हें त्या बिचाऱ्याला काय माहीत ? "तुरुंगावरील हवालदार मला रोज गंभीरपणें विचारीत असे कीं 'महाराज, कांहीं हुकूम आहे काय ?' त्याला मीहि तितक्याच गंभीरपणानें 'जिनोआला जावयासाठीं गाडी घेऊन ये' असा हुकूम देत असे !" दर दहा दिवसांनीं त्याला घरून आईचें पत्र येत असे. "हीं पत्रें दिसावयास अगदीं सरळ असत पण प्रत्येक विषम शब्दांच्या पहिल्या अक्षरांचें एक वेगळेंच वाक्य तयार होत असे—आणि तेंहि लॅटिन भाषेत ! या पत्रव्यवहारामुळें मला पोलंडांतील बंडाची बातमी समजली. तारुण्याच्या उद्दामपणाच्या भरांत या माहितीच्या जोरावर मी जेलरला भेवडावण्याचें ठरविलें; तो मला रोज सांगत असे कीं, युरोपांत सर्वत्र अगदीं सामसूम आहे. त्याला मी एकदम पोलंडमधील बंडाची बातमी सांगितली—ह्यावरून त्या बिचाऱ्याची खात्री झाली कीं मला कर्णपिशाच्चाचें साह्य आहे !"

आपण पकडले गेल्यामुळें कारबोनरी मंडळींची अगदीं पांचावर धारण बसली आहे हें कळलें तेव्हां त्याची खात्री झाली कीं, या निर्जीव मढ्यांमध्यें चैतन्याचा संचार करणें अशक्य आहे व आपणास जिवंत माणसांची एक नवीनच संस्था स्थापन केली पाहिजे ! ह्या नवीन संस्थेचा पाया कोणत्या नैतिक व धार्मिक तत्त्वांवर असावा याबद्दल मॅझिनीनें तुरुंगांत असतांना फार [illegible] विचार केला. संस्थेमध्यें एकजूट रहावी यासाठीं कोणतीं बंधनें घा[illegible]

जेल, राज्यक्रांति कशी घडवून आणतां येईल, कोणत्या प्रकारच्या लोकांना तिजमध्यें प्रविष्ट करून घ्यावयाचें, या संस्थेचें साध्य व साधनें काय असावींत, ही साधनसमाग्री कशी प्राप्त करून घेतां येईल, या व अशाच प्रकारच्या विषयांवर त्यानें फार सूक्ष्म विचार केला.

नव्या संस्थेची रूपरेखा आखून झाली न झाली तोंच मॅझिनीच्या अटकेचें प्रकरण टयूरिनच्या सेनेटपुढें आलें. आपणांविरुद्ध असलेला प्रत्यक्ष पुरावा त्यानें मोठ्या शिताफीनें अगोदरच नाहींसा केला होता. त्याचे विरुद्ध सरकारतर्फे एकच साक्षीदार उभा करण्यांत आला होता; पण कायद्याप्रमाणें दोषी ठरवावयास दोन साक्षीदार जरूर होते. मॅझिनीनें आपणांवर ठेवण्यांत आलेला आरोप नाकबूल केल्यानंतर त्याला निर्दोषी ठरवून बंधमुक्त करणें कोर्टाला भाग पडलें! पण त्याच्या आरोपाबद्दल पोलिसांची पुरती खातरजमा झालेली होती; म्हणून सरकारतर्फे त्याला कळविण्यांत आलें कीं, एक तर सरकारनें नेमून दिलेल्या गांवीं त्यानें नजर कैदेंत रहावें अगर आपखुषीनें इटलीमधून हद्दपार व्हावें! नजर कैदेंत राहिल्यानें त्याला कोणतीहि चळवळ करतां आली नसती; तसेंच यःकश्चित् संशयावरूनहि पोलिसांनीं त्याला फिरून कैदखाना दाखविला असता. त्यावेळीं इटलीमध्यें बंडाळीला सुरवात झाली होती व ह्या बंडखोरांना फ्रान्सची फूस आहे ही गोष्ट सर्वश्रुत होती; अशा परिस्थितीमध्यें नजरकैदेंत राहण्यापेक्षां फ्रान्समध्यें हद्दपार झाल्यानें आपणांस जास्त कार्य करतां येईल असें वाटल्यावरून मॅझिनीनें ही बिनमुदतीची हद्दपारीच पत्करली! सन १८३१ च्या फेब्रुआरी महिन्यांत आप्तस्वकीयांचा निरोप घेऊन त्यानें फ्रान्सचा मार्ग धरला. "त्यावेळीं माझे वडील मला भेटावयास आले होते; हीच त्यांची व माझी शेवटची भेट!" लियॉन्स येथील हद्दपार इटालियांना मिळाल्यास बरें असें वाटल्यावरून पॅरिसला जावयाचा पहिला बेत रद्द करून त्यानें लियॉन्स येथें जावयाचें ठरविलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
प्र. क्र. २२५०

# २ तरुण इटली.

"For freedom's battle, once begun,
Bequeathed by bleeding sire to son,
Though baffled off is ever won."

*Byron.*

इटलीची राजकीय परिस्थिति–गुप्त मंडळयांविषयीं–कारबोनरी संस्थेचा इतिहास व संघटना–तरुण इटली–ध्येय, संघटना व तत्वें.

**इटलीमध्यें** विधायक देशभक्तीच्या दृष्टीनें केवढी अंदाधुंदी माजली आहे याची कल्पना मॅझिनीला पूर्णपणें आली होती. इटली या नांवाचें एकादें राष्ट्र आहे असें कोणाच्या स्वप्नींहि नव्हतें. दीनदुबळया लोकांवर जुलमी राज्यकर्त्यांचा अंमल सर्व संस्थानांमध्यें चालू होता. लॉंबर्डी प्रांत आणि एका काळीं व्हेनिसच्या लोकशाहीच्या ताब्यांत असलेला विभाग–या भागावर ऑस्ट्रियाचें स्वामित्व होतें. सार्डीनिया, सॅव्हाय वगैरे प्रांत पीडमॉंटच्या राजघराण्याच्या ताब्यांत होते. इटलीच्या मध्यभागांत धर्मगुरूंचें ऐहिक साम्राज्य होतें. मॉडेना, पार्मा व लूका हीं संस्थानें वेगवेगळया संस्थानिकांच्या अमलाखालीं होतीं. इटलीच्या दक्षिणभागांत नेपल्सच्या बूर्बोन घराण्याची सत्ता होती. प्रत्येक संस्थानच्या सरहद्दीवर जकात घेण्यांत येई; यामुळें व्यापाराची वाढ होणें अशक्य होतें. इटलीचे असे तुकडे पडलेले होते म्हणून सर्व देशभर नुस्ता प्रवास करणेंहि अशक्य होतें; वाङ्मयाच्या प्रसाराचें क्षेत्रहि अत्यंत मर्यादित होतें–कारण जागोजाग पोलिस अधिकारी पुस्तकें जप्त करावयास टपून बसलेले होते! प्रत्येक संस्थानिकाचा बडेजाव व राज्यव्यवस्थेचा खर्च प्रजेच्याच जिवावर चालावयाचा असल्यामुळें करांचा बोजा अर्थातच फार जड होता–आणि धर्मगुरूंना खुषीची मदत सक्तीनें द्यावी लागे ती वेगळीच! अर्थातच सर्वत्र असंतोष पसरला होता–पण ह्या असंतोषाला वाचा नव्हती व

संघटित स्वरूपहि नव्हतें. स्वत:च्याच गुन्हेगारीमुळें भेदरून गेलेल्या सत्ताधाऱ्यांना जिकडे तिकडे फंदफितुरी दिसूं लागली होती–असंतोषाचें पर्यवसान राज्यक्रान्तीमध्यें होऊं नये म्हणून प्रत्येक संस्थानिकानें हेरांचें व तुरुंगांचें जाळें उभारलें होतें–ह्या जाळ्यांच्या गांठी इतक्या जवळ जवळ होत्या कीं उदार प्रवृत्तीचा कोणताहि मनुष्य त्यामध्यें सहज अडकवितां येत असे ! कोणाच्या घरादारावर, अब्रूवर व जीवितावर कोणीकडून कसा घाला येईल याचा कांहींच नेम नव्हता ! या हेरांचा सुळसुळाट घरोघरहि झाला होता—घरच्या मंडळींत सरकारावर सहज टीका करणाऱ्या मनुष्यावर किटाळ येणें हा रोजचाच प्रकार झाला होता ! जनतेला स्वहितासाठीं कायदे करण्यामध्यें भाग घ्यावयाचा हक्क नव्हता, शिक्षणाची हेळसांड चालली होती; कोणत्याहि प्रकारची संस्था स्थापन करणें अगर कसल्याहि प्रकारची सभा भरविणें हा गुन्हा गणला जात असे—अशा परिस्थितीमध्यें देशाच्या कार्य–शक्तीला सुसंघटित स्वरूप आणावयाचें कार्य मॅझिनीला करावयाचें होतें. हें कार्य त्यानें " यंग इटली " ह्या गुप्त मंडळीच्या द्वारें घडवून आणलें.

साहजिकपणें असा प्रश्न उद्भवतो कीं, सनदशीर चळवळीचा सोपा मार्ग सोडून मॅझिनी ह्या गुप्त मंडळीच्या भानगडींत कां पडला.

राजकीय चळवळीचें स्वरूप नेहमीं राज्यघटनेवर अवलंबून असतें. जुलमी राजांच्या अमलाखालीं जनतेच्या सनदशीर चळवळीच्या हक्कालाच अस्तित्वच नसतें; म्हणूनच तेथें गुप्त मंडळ्या अस्तित्वांत येतात; चालू राज्यघटनेचा नाश करून राज्यकारभार जनतेच्या हिताच्या दृष्टीनें चालविण्यांत येईल अशा प्रकारची राज्यघटना निर्माण करणें हाच ह्या गुप्त मंडळ्यांचा हेतु असतो. भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य व संघटनास्वातंत्र्य हे जनतेचे जन्मसिद्ध हक्क हिरावून घेण्यांत आलेले असतात तेव्हां गुप्त मंडळ्या अस्तित्वांत येतात. राज्यकर्त्यांच्या पोटावर पाय आणावयासाठीं स्थापन झालेल्या गुप्त मंडळ्यांना आपला गुप्तपणा कायम टेवावयासाठीं कांहीं तजविजी कराव्या लागतात. आपल्या कार्यासाठीं प्रसंगीं प्राणत्याग करण्यास न कचरणारे लोक मात्र ह्या संस्थेंत प्रविष्ट होतील, हेरांचा प्रवेश होणार नाहीं व संस्थेबद्दलची अगदीं क्षुल्लक बातमीहि आपल्या शत्रूंनां मिळणार नाहीं यासाठीं अशा गुप्त मंडळ्या आपल्या सभासदांच्या वर्तनावर अत्यंत कडक निर्बंध ठेवीत असतात. प्रवेशाच्या वेळीं उमेदवाराची अगदीं कसून परीक्षा घेण्यांत येते; शारीरिक मानसिक अथवा कोण-

त्याहि प्रकारच्या हालअपेष्टांना तो जुमानीत नाहीं असें आढळून आल्यास त्याला लागलीच संस्थेमध्यें प्रविष्ट करून घेण्यांत येतें. जनतेची कार्यशक्ति संघटित होईपर्यंत या संस्थांचा गुप्तपणा व करारीपणा टिकला तर त्यांना विरोध करणाऱ्या शक्तींचा नाश आपोआपच होतो. जे हक्क जनता मागत आहे ते दिल्यास आपणांस जनतेच्या कह्यांत वागावें लागेल या भीतीनें व आपल्या सुखांत अंतर पडेल या लोभानें जुलमी राज्यकर्ते जुलमाचा कळस करतात; त्याच जुलमानें प्रज्वलित झालेल्या लोकक्षोभांत त्यांचें भस्म होतें.

जनतेचे हक्क ही कल्पना दिसते तशी सरळ नाहीं. ह्या हक्कांची मांडणी करूं गेलें असतां ते कोणकोणत्या वर्गांना मिळावे याबद्दल सर्वत्र मतभेद दिसून येतो. राज्याच्या अधिकारांत योग्य वांटा मिळावा यासाठीं इंग्लंडांत जॉन राजाच्या कारकीर्दीत सरदार लोकांनीं धिंगाणा घातला—वीसाव्या शतकांत मताभिलाषी स्त्रियांनीं धिंगाणा घातला! यावरून एवढेंच अनुमान काढतां येतें कीं, राज्यकारभारामध्यें भाग घ्यावयाचा हक्क ज्या विशिष्ट वर्गाला असतो त्याच्या खालच्या वर्गांतील लोक नेहमीं राजकीय चळवळ करीत असतात. हाच प्रकार गुप्त मंडळ्यांच्या उत्क्रांतींतहि दिसून येतो. जनतेमध्यें कोणत्याच वर्गाला हक्क नसतात तेव्हां प्रथमतः वरिष्ठ वर्गाचे लोक राजकीय चळवळी-मध्यें पडतात. ही चळवळ उघडपणें चालविणें अशक्य असल्यास, त्याच वर्गा-मध्यें एखादी गुप्त मंडळी अस्तित्वांत येते. राज्यक्रान्तीच्या मार्गानें आपल्या हातीं सत्ता घ्यावयाची हाच अशा संस्थांचा हेतु असतो. ह्या वर्गाचा हेतु साध्य झाल्यावर नवी स्थापन झालेली सत्ता जुलमी आहे असा विचार त्या खालच्या वर्गाच्या मनांत उद्भवतो आणि नंतर ह्या वर्गाची नवी गुप्त मंडळी स्थापन होते. अशा रीतीनें राजकीय हक्क प्राप्त करून घ्यावयासाठीं प्रत्येक वर्ग धडपडत असतो. जेथें सनदशीर चळवळ शक्य असते तेथें गुप्त मंडळ्या नसतात पण राजकीय संघ असतात.

देशामध्यें पसरलेल्या अज्ञानाच्या अंधःकारांत, आपल्या आजूबाजूला काय चाललें आहे हें जनतेच्या दृष्टीला मुळींच दिसत नसतें-अशावेळीं शिक्षण, संपत्ति, दर्जा, सामर्थ्य व इच्छाशक्ति यांनीं समृद्ध असलेला वरिष्ठ वर्गच प्रत्येक चळवळीमध्यें पुढाकार घेत असतो. फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या वेळीं अगदीं पहिले क्रांतिकारक वरिष्ठ वर्गापैकींच होते. उदाहरणार्थ, काऊंट आफ प्रॉव्हेन्स, ड्यूक ऑफ ऑर्लीन्स, काउंट मिराबो वगैरे. नंतर मध्यम स्थितींतील लोकांनीं

श्री ग्रंथ संग्रहालय

या चळवळीमध्यें भाग घेण्यास आरंभ केला. उदा०—लफैट, रोलँड, वगैरे. यानंतरच्या क्रान्तिकारकांच्या पिढीमध्यें मारॉट, राबिस्पिएर वगैरे कनिष्ठ दर्जाच्या लोकांची नांवें दिसून येतात. इंग्लंडच्या इतिहासांतहि हाच प्रकार दिसून येतो.

गुप्त मंडळ्यांच्या बाबतींत मॅझिनी अगदींच अननुभविक नव्हता. कारबोनरी मंडळीचा तो सभासद होता. या संस्थेच्या संघटनेचें, स्थितीचें व गुणदोषांचें निरीक्षण त्यानें अत्यंत सूक्ष्मपणानें केलें होतें. कारबोनरी व तरुण इटली या दोन संस्थांमधील भेद नीट कळावयास आणि इटालियन जनतेच्या भवितव्याला योग्य दिशा दाखविण्याचें कार्य तरुण इटली याच संस्थेला कां शक्य झालें हें समजण्ययासाठीं आपणांस कारबोनरी मंडळीच्या इतिहासाचें सिंहावलोकन केलें पाहिजे.

कारबोनरी या संस्थेची स्थापना व संघटना कोणी व केव्हां केली याबद्दल बराच मतभेद आहे. सत्यप्रीति व स्वातंत्र्य ह्या उच्च गुणांचा प्रसार करावयासाठीं ही मंडळी प्रथम स्थापन झाली होती; फ्रीमेसन्स या सद्धर्माच्या कैवाऱ्यांच्या पंथामधून ही संस्था उत्क्रांत झाली. इटलीच्या दक्षिणभागांत कोळशाचा व्यापार करणाऱ्या लोणाऱ्यांचा मोठा भरणा असे; या लोकांमध्यें वरील तत्वांचा प्रसार प्रमथतः झाला; म्हणून तिला कारबोनरी ( कार्बन-कोळसा ) हें नांव प्राप्त झालें.

माघेला या नांवाचा जिनोआचा एक रहिवासी या संस्थेचा सभासद होता—ह्यानेंच तिला राजकीय स्वरूप दिलें. इटली देश पादाक्रांत केल्यावर नेपोलियननें नेपल्सच्या फर्डिनँड राजाला पदच्युत करून त्याच्या राज्यावर आपला मेहुणा मुरात यास बसविलें. नेपोलियनची सत्ता झुगारून देऊन मुरात ह्यानें नेपल्सचें राज्य स्वतःकडेच ठेवावें व स्वतंत्र व्हावें यासाठीं माघेलानें त्याचें मन वळविण्याचा फार यत्न केला पण तो फुकट गेला. नेपोलियनला ही बातमी कळतांच त्याने माघेला यास पकडून परिसच्या तुरुंगांत कैदेंत ठेवलें. नेपोलियनचा लाइपझिगच्या लढाईंत पराभव झाला व त्याच्या सत्तेस उतरती कळा लागली त्यावेळीं माघेला यानें अत्यंत धाडसानें आपली मुक्तता करून घेतली; इटलीमध्यें परत येतांच त्यानें गुप्त मंडळीच्या संघटनेस सुरवात केली. प्रातिनिधिक राज्यपद्धति सुरू व्हावी हा आपल्या मंडळाचा हेतु आहे असें त्यानें जाहीर करतांच सरदार घराण्यांतील व उच्च कुलांतील अनेक लोक त्याला

अनुकूल झाले; परक्यांची सत्ता देशांत स्थापन झाल्यामुळें त्यांचे हक्क व सरंजामी नेमणुका रद्द झाल्या होत्या, म्हणून हे लोक असंतुष्ट होते. इटलीचें राज्य तुझ्या ताब्यांत आणून द्यावयासाठीं हें मंडळ स्थापन करण्यांत आलें आहे अशी त्यानें मुरातची कल्पना करून दिली होती. सामान्य वर्गाची त्यानें कल्पना करून दिली होती कीं, कारबोनरी संस्थेच्या ध्येयाप्रमाणें इटलीमध्यें लोकसत्ताक राज्यपद्धति सुरू होतांच जनतेवरील करांचें ओझें कमी होईल व सर्वांचा आर्थिक फायदा होईल; ह्या संस्थेच्या कार्याला मदत करणें म्हणजे प्रभु येशूचीच इच्छा पार पाडणें आहे अशीहि गप्प त्यानें उठवून दिली होती. राजा, सरदार वर्ग व सामान्य लोक आपापल्या कल्पनांमध्यें गर्क झालेले होते; पण माघेलाचा अंतस्थ हेतु निराळाच होता. संपूर्ण इटलीला स्वातंत्र्य प्राप्त करून द्यावयाचें—या उदात्त ध्येयासाठीं त्यानें ही सारी कारवाई मांडली होती! नेपल्स येथें संस्थेचें केंद्रवर्ती मंडळ माघेला यानें स्थापन करतांच सर्वत्र संस्थेच्या शाखा निघूं लागल्या व सभासद होण्यासाठीं अनेक लोक लोटूं लागले. मध्यवर्ती मंडळ स्थापन झाल्यापासून अगदीं थोडया काळांत सभासदांची संख्या पंचवीस हजारांवर गेली.

या मंडळींचें प्रस्थ फारच वाढूं लागलें तेव्हां मुरातला संशय आला व कारबोनरींना विरोध करावयासाठीं त्यानें कार्डिनल रूफो याच्या करवीं "धर्मनिष्ठ संस्था" या नांवाची एक गुप्त मंडळी स्थापन करविली. या दोन संस्थांतील लोक एकमेकांच्या नजरेसमोर येतांच त्यांच्यामध्यें मारामाऱ्या होऊं लागल्या. यामुळें देशांतील असंतोषाला तीव्र स्वरूप येऊं लागलें. कोर्टामार्फत होणाऱ्या चवकशीमध्यें दोनहि पक्षांचे लोक फांशीं जाऊं लागले तेव्हां हें प्रकरण अधिकच चिरडीस गेलें. कारबोनरी मंडळींनीं मुरातच्या विरुद्ध उघड बंड उभारलें; मुरातचे सैनिक अगोदरच फितूर झालेले होते; यामुळें टोलेंटिनोच्या लढाईंत राजपक्षाचा पाडाव झाला; ही बातमी ऐकतांच मुरातनें पळ काढला. ह्या विजयामुळें क्रान्तिकारक लोक अगदीं निर्धास्त झाले व सिसिलींत पळून गेलेल्या फर्डिनँड राजाबरोबर त्यांनीं समेटाचें बोलणें लाविलें. सुव्यवस्थित राज्यपद्धति सुरू करावी व कारबोनरी मंडळीला कायदेशीर मान्यता द्यावी या दोन अटींवर नेपल्सची गादी त्याला द्यावयाला ते तयार होते. फर्डिनँडनें या अटी कबूल केल्या नाहींत. इकडे ऑस्ट्रियाचें सैन्य दुबळ्या इटलीवर चाल करून आलें व त्यांनीं माघेला यास कैद केलें. अर्थातच क्रान्तिकारकांचे सर्व बेत निष्फळ झाले या धामधुमीमुळें फ्रेंचांचे जागीं ऑस्ट्रियाचें जोखड इटलीच्या मानेवर बसलें.

ऑस्ट्रियाचें स्वामित्व मान्य करून फर्डिनँडनें पुन्हां राज्यसूत्रें धारण केलीं. नव्या अमदानींत कारबोनरी मंडळीच्या छळाला फार मोठ्या प्रमाणावर, अत्यंत पद्धतशीरपणें व अतिशय अमानुषपणानें सुरवात झाली. कारबोनरी मंडळीनेंहि या छलाचा सूड घ्यावयास आरंभ केला. आपलेपैकीं फितूर झालेला इसम अत्यंत क्रूरपणें मारला जातो हें त्यांनीं राजाच्या निदर्शनास आणून दिलें. या मंडळीच्याच धर्तीवर अनेक गुप्त मंडळ्या इटलीभर स्थापन झाल्या; त्यांनीं आपल्या सभासदांना भर रस्त्यावर कवाईत शिकवावयास सुरवात केली-इतके ते राज्यसत्तेबद्दल बेपर्वा झाले होते. सरकारचा कमकुवतपणा पाहून त्यांनीं दरवडे घालण्यासाठीं आपल्या लहान लहान टोळ्या वेगवेगळ्या ठिकाणीं पाठविल्या. सरकारहि चिडून गेलें व नुसत्या वहीमावरून त्यांनीं लोकांना फांशीं द्यावयाची इमामशाही आरंभिली. कटवाल्यांनीं राजपक्षीय लोकांचे बळी घ्यावयाचा क्रम सुरू केला. १८१७ सालीं कारबोनरी संस्थेच्या नेतृत्वाखालीं इटलींतील क्रान्तिकारकांनीं बंड करावयाची तयारी केली. अनेक अडचणीमुळें या बंडाची तारीख वारंवार पुढें ढकलावी लागली. या दिरंगाईमुळें सरकार सावध झालें, पोलिसांचा तपास जोरानें सुरू झाला; कटाचे बरेचसे-धागे हातीं येतांच १८१८ मध्यें एकदम पकडापकडी करण्यांत आली व अनेक कटवाल्यांना फांशीं देण्यांत आलें.

क्रान्तिकारकांवर इतका जुलूम झाला तरी पुन्हा संघटना करून १८२१ मध्यें त्यांनीं नेपल्स येथें बंड उभारलें. यावेळीं एकट्या नेपल्स संस्थानांत सुमारें १० लक्ष कारबोनरी होते. इटलीच्या इतर प्रांतांतहि त्यांची संख्या अशीच लाखांनीं मोजण्यासारखी होती. पोलिस, हेर, जाहीरनामे, धरपकड, अत्याचार व फांशी या जालीम उपायांनींहि कारबोनरी मंडळीची वाढ थांबेना. सैन्यामध्येंच फितुरी झालेली पाहून फर्डिनँडनें प्रातिनिधिक राज्यपद्धति स्थापन करण्याचें कबूल केलें !

इ.स.१८३० मधील युरोपांतील क्रान्तिकारक चळवळी उभारण्यामध्यें कारबोनरी संस्थेच्या इतर राष्ट्रांतील शाखांचें बरेंच अंग होतें. कारबोनरी मंडळीनें इटलीमध्यें १८३१ सालीं फिरून बंड केलें. मॉडेना संस्थानांत प्रथम दंग्याधोप्याला आरंभ झाला; नंतर पारमा व पोपचीं संस्थानें यांमध्यें बंडाचा प्रसार झाला. सुमारें तीन आठवड्यांच्या आंतच पोपच्या मुलुखापैकीं बहुतेक भागांत क्रान्तिकारकांना पूर्ण जय मिळाला. नंतर बंडवाल्यांनीं रोमच्या दिशेनें चाल

केली. ऑस्ट्रियन सैन्यापुढें आपलें कांहीं चालणार नाहीं व लोकांनीं पदच्युत केलेल्या इटालियन संस्थानिकांना पुन्हां तक्तनशीन करून देण्यास ऑस्ट्रिया एका पायावर तयार आहे हें ते जाणून होते; पण फ्रान्समधील क्रान्तिकारांची मदत आपणांस मिळेल अशी त्यांना आशा वाटत होती. फ्रान्समधील पुढाऱ्यां-कडून कारबोनरी मंडळींना आश्वासन मिळालें होतें कीं, इटलीच्या अंतस्थ राज-कारणांत ऑस्ट्रियानें हात घातला तर आह्मीं ऑस्ट्रियाविरुद्ध लढाई पुकारूं. त्यावेळीं लुई फिलिप हा फ्रान्सच्या गादीवर होता. क्रान्तिकारकांच्या मदतीनेंच तो राज्यावर बसला होता; म्हणून क्रांतिकारकांच्या पुढाऱ्यांच्या इच्छेप्रमाणें वागण्यास तो कबूल होता. पण ऑस्ट्रियाबरोबर युद्ध पुकारल्यास कदाचित् फ्रान्समध्येंच पुन्हां राज्यक्रान्ति होण्याचा संभव आहे असें दिसून येतांच त्यानें ऑस्ट्रियाचा प्रधान मेटरनिक याला गुप्त संदेश पाठविला कीं, कांहीं झालें तरी आमचेकडून इटालियन क्रान्तिकारकांना मदत मिळणार नाहीं. हा निरोप येतांच ऑस्ट्रियन सैन्यानें इटलीवर निकराचा हल्ला केला; ह्या चढाईमध्यें इटा-लियन क्रान्तिकारकांचा पूर्ण पराभव झाला. कारबोनरी संस्थेचें कार्य या बंडाबरोबरच विराम पावलें.

कारबोनरी संस्थेचें केंद्रवर्ती मंडळ नेपल्स येथें होतें. संस्थेमधील प्रतिष्ठित मंडळी व प्रांतांतील शाखांचे प्रतिनिधि यांचाच मध्यवर्ती कार्यालयांत प्रवेश होत असे. संस्थेच्या वेगवेगळ्या शाखांमध्यें वाद उत्पन्न झाल्यास त्याचा निवाडा लावण्याचा अधिकार मध्यवर्ती मंडळास होता. संस्थेमध्यें धार्मिक अगर अनीतिपर विषयांवर वादविवाद करण्याची मनाई होती. सभासदांचे प्राथमिक व प्रौढ असे दोन वर्ग होते. प्राथमिक वर्गामध्यें सहा महिनें राहिल्यानंतर उमेदवारांची कडक परीक्षा घेऊन मग त्यास प्रौढ वर्गांत प्रविष्ट करून घेण्यांत येत असे. गुप्ततेसाठीं एका कार्यालयांतील बातमी दुसऱ्या कार्यालयांतील सभा-सदांना कळविण्यांत येत नसे. सभेची दीक्षा घेण्याची पद्धत मोठी विलक्षण होती. डोळे बांधून दिवाणखान्यांत आणलेल्या उमेदवाराकडून शपथ घेवविल्या-नंतर त्याचे डोळे सोडण्यांत येत, डोळे उघडतांच त्याला मोठा भीतिप्रद देखावा दिसून येई. कांहीं सभासद त्याचें भोंवतीं कुऱ्हाडी परजीत उभे राहिलेले असत; ते त्याला भासवीत कीं, हीं शस्त्रें फितूर होणाराची गय करणार नाहींत. असे अनेक भयानक प्रकार वारंवार सभासदांच्या नजरेस आणले जात असत. प्रौढ वर्गांत प्रवेश व्हावयाचे वेळीं पुन्हां शपथविधि होत असे. त्यांना पांच-

रण्यासाठीं एक तिरंगी वस्त्र देण्यांत येत असे--काळा, निळा व तांबडा हे ते तीन रंग व ते अनुक्रमें कोळसा, धूर व अग्नि यांचे निदर्शक मानण्यांत येत असत. सभासदांना दुर्वर्तनाबद्दल संस्थेमार्फत शिक्षा होत असे. संस्थेचे नियम, वादविवादांचा सारांश, कार्यालयांची यादी, सभासदांची यादी, संस्थेमधून फितूर झालेल्या लोकांची यादी वगैरे नोंदणीपुस्तकें संस्थेच्या मुख्य कार्यालयांत असत.

कारबोनरी संस्थेला प्रथमतः कोणतेंच निश्चित ध्येय नव्हतें. पुढें मात्र इटलीचें स्वातंत्र्यसाधन हें ध्येय संस्थेनें मान्य केलें. राष्ट्रस्वातंत्र्य कोणत्या मार्गांनीं मिळवावयाचें याबद्दल चालकांची एकवाक्यता नव्हती. संस्थेचे बहुतेक सर्व पुढारी वयस्क होते; त्यांच्या अंतःकरणांत उत्साह नव्हता व मनगटांत जोर नव्हता. आपला कामधंदा संभाळून जें कार्य करतां येईल त्यामुळें इटलीला स्वातंत्र्य मिळत असेल तर उत्तम, असें त्यांना वाटत होतें. त्यांची कल्पना होती कीं, इतर देशांची मदत आपणांस मिळेल; या मदतीच्या अपेक्षेमुळें त्यांनीं जनतेमध्यें जागृति करावयाचा जोराचा यत्न केला नाहीं. त्यांना राजकारणांतील डाव खेळण्याची हौस होती. त्यांना वाटत होतें कीं, इटलीचा पुनरुद्धार करणें ही गोष्ट सर्वस्वीं वरच्या वर्गाच्या कार्यावरच अवलंबून आहे; त्यांना जनतेबद्दल कळकळ वाटत नव्हती व जनतेलाहि त्यांच्या उठावणींत भाग घ्यावा अशी स्फूर्ति झाली नाहीं. त्यांना जनतेची मदत नको होती—परकी सरकारांच्या मंत्रिमंडळांची मदत त्यांना हवी होती. राष्ट्रामध्यें जोराची खळबळ उडवून देईल अशा जोमाचा कोणीच मनुष्य संस्थेमध्यें नव्हता. राष्ट्राच्या तरुणांना विश्वासांत घेतलें जात नसे म्हणून शौर्याचा मार्ग स्वीकारावा अशी बुद्धि त्या नेत्यांना झाली नाहीं. आस्ट्रियाबरोबर युद्ध केलेंच पाहिजे ही गोष्ट त्यांना पटली नव्हती.. या युद्धांत आपण खात्रीनें विजयशाली होऊं अशी निष्ठा त्यांचे ठिकाणीं नव्हती. त्यांना राष्ट्राचें हृदय वेधून टाकण्याचें सामर्थ्य नव्हतें, गनीमी काव्यानें लढावयाचें धाडस नव्हतें; राष्ट्रस्वातंत्र्यासाठीं केवढा स्वार्थत्याग करावा लागतो याची त्यांना कल्पनाच नव्हती. " संस्थेचा देह विशाळ होता पण त्या देहांत प्राणच नव्हता; संस्थेचे विचार उदार होते पण तिजमध्यें भावना नव्हत्या! स्वातंत्र्य, समता आणि ऐक्य ह्या तत्वांवर त्यांची श्रद्धा नव्हती. देशकालपरिस्थितीनें अबाधित आणि सदैव विजयशाली होणाऱ्या अशा महातत्वांवर त्यांची निष्ठा नव्हती. त्यांना सुखासाठीं स्वातंत्र्य हवें होतें, नियमबद्ध असणारें

वाङ्मय हवें होतें, पोपच्या तंत्रानें चालणारा धर्म पाहिजे होता! ते पक्षाभिमानी होते, राष्ट्रधर्माचे एकनिष्ठ अनुयायी नव्हते." पण इटलीमध्यें पारतंत्र्याच्या काळरात्रींत त्यांनीं राष्ट्राचें चैतन्य जिवंत ठेवलें. एकामागून दुसरे प्रयत्न फुकट गेले तरी पुन: कार्याला लागण्याची त्यांची चिकाटी विलक्षण असे. तसेंच कारबोनरी मंडळींत समतेचें तत्व पूर्णपणें पाळण्यांत येत असे. सर्व प्रांतांतील व सर्व दर्जाच्या लोकांना एक दीक्षा देण्यांत येत असे; ह्यामुळें व्यक्तींची समानता व राष्ट्रैक्य ह्या दोन्ही तत्वांची भूमिका तयार झालेली होती. तरुण-इटलीसारख्या सुसंघटित व जिवंत संस्थेचें बीजारोपण व्हावयास योग्य अशी जनतेची तयारी कारबोनरी मंडळीनें करून ठेविली होती.

सॅव्होना येथील तुरुंगाच्या कोठडींत नव्या संस्थेचीं मूलतत्वें कोणतीं असावींत व ध्येय काय असावें यावद्दल मझिनीनें फार विचार केला. "संस्थेला आरंभ कसा करावयाचा, प्रथमत: कोणत्या मंडळींना सामील करून घ्यावयाचें, युरोपांतील इतर देशांतील क्रांतिकारकांना या संस्थेंत घ्यावयाचें कीं नाहीं याबद्दल मी विचार केला. आम्हांसारख्या थोडया, निर्बल व अप्रसिद्ध अशा तरुणांनीं राष्ट्रोद्धाराच्या चळवळीला आरंभ केला तर तिला लोक येऊन मिळतील कीं नाहीं अशी शंका वारंवार माझे मनांत येई. राष्ट्राचें अंत:करण इतिहास व राष्ट्रीय आकांक्षा यांमध्यें प्रकट होत असतें. राष्ट्रीय अंत:करणाशीं समरूप होणें हाच मुख्य प्रश्न होता. राष्ट्रीय चळवळीचा आरंभ नेहमीं अगदीं अप्रसिद्ध अशाच व्यक्तींकडून केला जातो; एकनिष्ठा आणि आत्मविश्वास हेंच त्यांचें सामर्थ्य! त्यांच्या प्रबल इच्छाशक्तीपुढें कोणतीहि प्रतिगामी अथवा विरोधी शक्ति टिकाव धरूं शकत नाहीं. प्रत्यक्ष काळाचीहि त्यांना खातरजमा नसते. उभारलेलें काम थोडेसें रंगरूपास येऊं लागलें कीं मग वजनदार, सुप्रसिद्ध व सुसंपन्न असे लोक राष्ट्रीय चळवळीला मिळूं लागतात, पण बहुधा हेच लोक राष्ट्रीय चळवळीला ध्येयापासून च्युत करतात.

"इतिहासांत प्रकट होणाऱ्या आणि सामाजिक संघटनेमध्यें दिसून येणाऱ्या इटलीच्या प्रवृत्ति लोकसत्तात्मक आहेत अशी माझी खात्री झाल्यामुळें **राष्ट्रैक्य व लोकसत्ता** हें संस्थेचें ध्येय निश्चित केलें. माझ्या कार्याला प्रेरणा देणारी देणारी भावना राजकीय नव्हती; आपापसांत फाटाफूट झालेले, सर्वांकडून तिरस्काराला पात्र झालेले, जुलमानें गांजलेले अशा इटालियन लोकांचें जीवन जास्त सुखमय व्हावें एवढेंच माझ्या कार्याचें ध्येय नव्हतें. मला वाटे कीं,

मानवजातीमध्यें नवजीवनाचा संचार करण्याचें आणि युरोपांतील राष्ट्रांचें एकीकरण करण्याचें भाग्य इटली देशाचें आहे आणि म्हणून इटलीचा उद्धार हें युरोपच्या उद्धाराचें कार्य आहे, हें मानवजातीच्या उद्धाराचें कार्य आहे ! इटलीनें जगाच्या उद्धाराचें कार्य आजपर्यंत दोन वेळां हातीं घेतलें आहे. लोकसत्ताक रोमन साम्राज्याचे वेळीं हक्क या कल्पनेचा इटलीनें प्रचार केला. खिश्चन धर्मस्थापनेच्या काळीं **कर्तव्य** ह्या तत्वाचा इटलीनें प्रसार केला. जगदुद्धाराचें कार्य हातीं घ्यावयास इटली आज तिसऱ्यांदा जागृत झाला आहे. त्यावेळी इटलीनें व्यक्तिमात्रांना महामंत्रांचा उपदेश केला. युरपच्या तृतीय पुनरुज्जीवनाचा आरंभहि इटलीच्याच उत्साहामुळें व स्वार्थपराङ्मुखतेमुळें होणार आहे; हक्क व कर्तव्य हीं दोन तत्वें भिन्न भिन्न काळीं प्रचारलीं गेलीं, आज त्या दोन्हीं तत्वांचा समेट होऊन धरा व स्वर्ग समरूप होऊन **संघटना** या महातत्वाचा उपदेश करण्यास आज इटली सज्ज झाला आहे; स्वतंत्रांना व समसमानांना आपल्या कार्याचा मार्ग इटली दाखवून देणार आहे !

" सॅव्होनाच्या कोठडींत हे विचार माझ्या मनांत आले; तीस वर्षांनंतर तेवढ्याच एका कोठडींत तेंच विचार माझ्या मनांत पुन्हां घोळत आहेत; त्या विचारांना आतां निष्ठेचें स्वरूप आलें आहे.

" या विचारांवरून मी निर्णय काढला की, आपलें कार्य नैतिक व विस्तृत स्वरूपाचें असलें पाहिजे–राजकारणाच्या संकुचित मर्यादेमध्यें त्याची कुचंबणा होतां कामा नये; या नव्या कार्याचा पाया धर्मावर व उदात्त तत्वांवरच असला पाहिजे; स्वार्थ व सुख यांसाठीं उभारलेलें कार्य विघातक असतें, कर्तव्यासाठीं केलेलें कार्य विधायक असतें. "

" तरुण इटली " या नांवावरून दिसून येईल कीं, ही तरुणांची संस्था होती; स्वदेश, स्वातंत्र्य, समरांगण, सत्कीर्ति यांची दिव्य स्वप्नें ज्यांच्या डोळ्यांसमोर सदैव उभीं असतात अशा तरुणांची ही संस्था होती ! कारबोनरी मंडळीमध्यें तेजस्वी तरुणांचा समावेश नव्हता; म्हणूनच त्यांच्या कार्यांत आत्मविश्वास व ध्येयभक्ति नव्हती असें मॅझिनीचें मत होतें. " राष्ट्रांतील तरुण पिढीकडूनच बंडाची उभारणी होत असते. " स्वतःच्या पिढीबद्दल मॅझिनीला फार आशा वाटत असे आणि ही आशा अस्थानीं नव्हती. " बंडखोर जनतेच्या अग्रस्थानीं तरुणांची स्थापना करा; तरुणांच्या ठिकाणीं केवढी शक्ति अव्यक्ता-

चस्थेंत असते, तरुणांच्या शब्दानें जनतेला केवढा उत्साह येतो याची तुम्हांला अझून कल्पनाच नाहीं. नूतन राष्ट्रधर्माचे ते देवदूतच आहेत! चळवळ हेंच तारुण्याचें जीवन आहे, चळवळीमुळेंच त्यांच्या उत्साहाचा व निष्ठाशक्तीचा विकास होतो. एकाद्या उदात्त कार्याची महती त्यांच्या अंत:करणांत जागृत करा, त्या कार्यासाठीं आत्मार्पण करावयाची निष्ठा त्यांचे ठायीं जागृत करा; त्यांचा स्वाभिमान जागृत करा; दिव्य व चैतन्यानें भरलेले प्रतिभाशाली बोल त्यांना ऐकवा; राष्ट्राचें वैभव, सामर्थ्य व परंपरा यांची त्यांना आठवण करून द्या." आणि मग तरुणांच्या हातून केवढें कार्य होतें तें पहा! "तरुणांच्या शक्तीबाहेरचें असें कोणतें कार्य या जगांत आहे?" आजपर्यंत तरुणांच्या अंगावर कोणतेच जबाबदारीचें काम टाकण्यांत आलेलें नाहीं, म्हणूनच त्यांची कार्यशक्ति कसाला लागलेली नाहीं, म्हणूनच तारुण्याच्या महतीची आपणांस कल्पना नाहीं! मॅझिनीची तरुण पिढीवर इतकी निष्ठा होती कीं, चाळीस वर्षांवरील वयाचे लोक या संस्थेमध्यें प्रविष्ट करून घेतले जाणार नाहींत अशी अट घालण्यांत आली होती! "राष्ट्रामध्यें क्रान्तीची उठावणी नेहमीं तरुण लोकांकडूनच करण्यांत येते-सर्व राष्ट्रकार्यांचा उद्भव तरुण पिढीमधूनच होत असतो; कार्याला आरंभ व्हावयाचे अगोदर त्यांची माहिती कोणालाहि नसते; पण त्यांच्या अंत:करणांत निष्ठा असते व जोमदार इच्छाशक्तीची तिला जोड असते; निष्ठाशक्ति व इच्छाशक्ति यांच्या जोरावर त्यांना कसलेहि अडथळे ओलांडून जातां येतें."

तरुण इटलीचें निशाण तिरंगी होतें—श्वेत, रक्त व हरित; श्वेत रंग हा पावित्र्याच्या निदर्शक होता; इटलीवर आजपर्यंत जो जुलूम झाला त्याचा आपणांस सूड घ्यावयाचा आहे हें तांबड्या रंगानें दर्शविलें जाई; हिरवा रंग हा तरुण पिढीच्या ताज्या दमाचा द्योतक होता. ह्या निशाणावर एका बाजूला "स्वतंत्रता, समता व मानुषता" हे शब्द लिहिलेले असत व दुसऱ्या बाजूवर "राष्ट्रैक्य व दास्यमुक्तता" हे शब्द असत. पहिल्या बाजूवरील शब्दत्रयीनें इटालियनांचीं वैयक्तिक कर्तव्यें व दुसऱ्या बाजूवरील शब्दद्वयानें त्यांचीं राष्ट्रीय कर्तव्यें दर्शविलीं जात.

सभासदांची वर्गणी दरमहा आठ [illegible] होती; ज्यांची सांपत्तिक स्थिति विशेष चांगली आहे त्यांनी जास्त [illegible] द्यावी अशी त्यांना संस्थेची विनंति होती. कारबोनारीच्या वर्गणीचे [illegible] मोठे होते; गरीब लोकांना तर संस्थेचे

सभासद होणें हें केवळ वर्गणीच्या ओझ्यामुळें अशक्य होतें; हें लक्ष्यांत आणू-नच मॅझिनीनें तरुण इटलीची वर्गणी इतकी थोडी ठेवली होती.

तरुण इटलीची रचनाहि अगदीं सरळ होती. एक राष्ट्रीय केंद्रमण्डळ, प्रत्येक प्रांतांत एक प्रांतिक मंडळ; प्रत्येक शहरीं एक व्यवस्थापक व एक दीक्षागुरु अशी ही रचना होती. प्रांतिक मंडळांसाठीं सभासदांची निवडणूक करणें व नियम तयार करणें, संस्थेमार्फत लेख प्रसिद्ध करणें, राष्ट्रांतील सर्व शाखांच्या कार्याचा क्रम आंखणें व त्यांचें आपल्या नेतृत्वाखालीं एकीकरण करणें हें काम केंद्रमण्डळाकडे असे. आपल्या प्रांतांत नवे सभासद मिळविणें व जुन्या सभा-सदांना केंद्रमंडळाचे हुकूम कळविणें हीं कामें प्रांतिक मंडळाकडे असत. प्रांतिक मंडळाकडून दरमहा कामाचा व परिस्थितीचा अहवाल केंद्रमंडळाकडे पाठवि-ण्यांत येत असे. व्यवस्थापकांची निवडणूक प्रांतिक मंडळाकडून करण्यांत येत असे. व्यवस्थापकाला आपल्या कामाचा मासिक अहवाल प्रांतिक मंडळाला सादर करावा लागे. दीक्षागुरूंची निवडणूक प्रांतिक मंडळाकडून व्यवस्थाप-कांच्या संमतीनें करण्यांत येत असे. दीक्षागुरूंना आपल्या कामाचा मासिक अहवाल व्यवस्थापकांकडे सादर करावा लागे. संस्थेचे सभासद तरुणच असले पाहिजेत, त्यांचें शील शुद्ध असलें पाहिजे व त्यांनीं वेळच्या वेळेवर वर्गणी दिली पाहिजे असा नियम असे. दीक्षा कोणाला द्यावयाची व कोणाला नाहीं हें ठर-विण्याचा अधिकार दीक्षा गुरूंनाच असे. दीक्षा घेतल्यावर कांहीं काळ लोटला म्हणजे सभासदाची नीट परीक्षा घेऊन त्याला दीक्षागुरूचे अधिकार देण्यांत येत असत.

संस्था स्थापन करणें सोपें आहे; पण तिच्या हातून कांहीं उपयुक्त कार्य व्हावें, हातीं घेतलेलें काम पुरें होईपर्यंत संस्थेचा नाश होऊं नये यासाठीं संस्थेचें ध्येय निश्चित, स्पष्ट व सुव्यक्त असलें पाहिजे; " संस्थेची सुरक्षितता, उपयुक्तता व प्रगमनशीलता हीं ध्येयाच्या स्पष्टतेवर, सुव्यक्ततेवर व निश्चित-तेवर अवलंबून असतात. " संस्थेचें सामर्थ्य सभासदांच्या संख्येवर नसतें तर त्यांच्या एकवाक्यतेवर असतें–अशी एकवाक्यता उत्पन्न व्हावी यासाठीं संस्थेचे ध्येय व कार्यक्रम निश्चित असला पाहिजे; साध्यामध्येंच साध-नांचाहि अंतर्भाव होतो; म्हणून ध्येय निश्चित करतांना तें कोणत्या मार्गानीं सिद्ध करावयाचें हेंहि सभासदांना स्पष्टपणें कळलेलें असलें पाहिजे, म्हणजे संस्थेचें कार्य निश्चयेंकरून यशस्वी होतें. संस्थेच्या उपयुक्ततेबद्दल व चिरस्था-

यित्वाबद्दल अनेक दिवस विचार करून मॅझिनीनें तरुण इटलीची तत्वमालिका निर्माण केली होती. अशीं उदात्त तत्वें पाळलीं गेलीं नाहींत म्हणूनच कारबोनरी मंडळींचें प्रयत्न निष्फळ झाले; या तत्वांच्या पायावर तरुण इटलीची उभारणी झाली होती म्हणूनच तिच्या हातून जगाच्या इतिहासाला वेगळें वळण लावण्याचें कार्य झालें. या सर्व तत्वांचें स्पष्टीकरण दीक्षागुरूंकडून प्रत्येक सभासदाला करण्यांत येई.

**परमेश्वर व जनता**:–हें तरुण इटलीचें पहिलें तत्व होय. राष्ट्रकार्याला धर्माचें पवित्र स्वरूप मॅझिनीनें प्राप्त करून दिलें. आजपर्यंतच्या चळवळी स्वार्थासाठीं झाल्या–या नव्या पक्षाची दृष्टि मानवजातीच्या हिताकडे होती. राष्ट्रोद्धाराचें कार्य हें प्रत्यक्ष परमेश्वराचें कार्य आहे अशी भावना झाल्याशिवाय राष्ट्रोद्धार त्वरित होत नाहीं. धर्मकार्याचें सामर्थ्य व स्फूर्ति यांची जोड राष्ट्रकार्याला मिळतांच राष्ट्रीय मोक्ष, म्हणजेच राष्ट्रस्वातंत्र्य, प्राप्त होत असतो. राष्ट्रभक्ति व धर्मनिष्ठा यांची जोड मॅझिनीनें उत्कृष्टपणें घालून दिली होती. " इटलीचें नाम पुराणप्रसिद्ध आहे; त्या नामाभोंवतीं अनेक विजयांचें तेज तळपत आहे; विपत्काळीं इटलीनें आपलें दुःखहि अत्यंत उदात्तपणें साहिलें आहे; अनेक शतकांच्या गुलामगिरीनें इटलीच्या नामामधील पावित्र्य नष्ट झालेलें नाहीं. " असे देशभक्तीनें ओथंबलेले शब्द बोलून मॅझिनीनें इटलीची राष्ट्रभक्ति जागृत केली. " कोणी म्हणतात–इटली हें एक विशाल स्मशान आहे—पण त्यांनीं खूप समजून असावें कीं, या स्मशानांत कालनिद्रा घेणारे महापुरुष अत्यंत सामर्थ्यवान् होते—अशा वीरांनीं ज्या स्मशानांत आपला देह ठेविला आहे त्या स्मशानापेक्षां जगांतील जमिनीचा कोणताहि तुकडा अधिक पवित्र नाहीं, अधिक जिवंत नाहीं ! कारण इतरत्र जिवंत असलेले लोक जिवंत असूनहि मेल्यासारखेच आहेत—मेल्यापेक्षांहि अधिक मेलेले आहेत ! मात्र या स्मशानांतील वीर मृत असूनहि जिवंतच आहेत ! " हा संजीवनी मंत्र उच्चारून त्यानें इटलीचें चैतन्य जागृत केलें. " पण अजून इटलीचें कार्य पूर्ण झालेलें नाहीं. ज्या राष्ट्रांना वाटत आहे कीं इटली मृत आहे, त्यांच्याच समुदायांत इटलीला आपला जिवंतपणा सिद्ध करून दाखवावावयाचा आहे—त्यांना दिव्यतेचा मार्ग दाखविणाऱ्या देवदूताचें कार्य अजून इटलीच्या हातून व्हावयाचें आहे. " असे उत्साहवर्धक शब्द बोलून त्यानें भविष्यत्कालांतील इटलीच्या पवित्र वैभवाबद्दल जनतेच्या हृदयांत निष्ठा उत्पन्न केली. " रोमला पुढें असें वैभव प्राप्त होणार आहे

कीं, त्यापुढें त्याचें गतवैभव कांहींच नाहीं. युरोपच्या तृतीय पुनरुज्जीवनाचा आरंभ इटलीमध्यें होणार आहे. धर्माचा, नीतीचा व एकीचा उपदेश रोमकडून सर्व राष्ट्रांना होत आहे असें दिव्य स्वप्न मला दिसत आहे." असे प्रतिभाशाली शब्द बोलून त्यानें राष्ट्रोद्धार व धर्म यांची सांगड घालून दिली. इटलीचा उद्धार इटालियनांच्या सुखासाठीं नाहीं, तर मानवजातीच्या प्रगतीसाठीं व्हावयाचा आहे; आणि मानवजातीची प्रगति परमेश्वराच्या हुकमावरून, त्यानेंच नेमिलेल्या मार्गानें होत आहे; म्हणून इटलीचा उद्धार हें परमेश्वराचें कार्य आहे अशी भावना, निसर्गतःच धर्मनिष्ठ असलेल्या इटालियनांच्या अंतःकरणांत त्यानें जागृत करून दिली. इटलीच्या पुनरुज्जीवनाचा प्रयत्न म्हणजे हजारों जीवांचे बळी व अनेक घरादारांची राखरांगोळी, या सर्व गोष्टींची मॅझिनीला पुरती जाणीव होती; पण राष्ट्राच्या अब्रूपुढें आणि नियोजित कार्यापुढें या संकटपरंपरेची कांहींच किंमत नाहीं अशी त्याची निष्ठा होती—आणि आपल्या उज्वल देशभक्तीच्या सामर्थ्यानें संपूर्ण इटलीमध्यें अशीच कर्तव्यनिष्ठा त्यानें तरुण इटलीच्याद्वारें प्रसृत केली. कसोटीची वेळ आली म्हणजे नफ्यातोटयाचें तत्वज्ञान टिकाव धरूं शकत नाहीं; स्वार्थबुद्धीच्या अहंकारमय देशाभिमानाच्या जागीं मॅझिनीनें उदात्त व त्यागमय अशा देशभक्तीची स्थापना केली. "भाकरी स्वस्त आहे कीं महाग आहे हा मुख्य प्रश्न नाहीं—त्या भाकरीवर गुलामगिरीचा शिक्का आहे कीं काय हा मुख्य प्रश्न आहे." राष्ट्र व धर्म यांची या अभिनव देशभक्तीमध्यें मॅझिनीनें सांगड घातली म्हणूनच जनतेला स्वार्थत्याग व आत्मयज्ञ करावयाचें तेज प्राप्त झालें; म्हणूनच तरुण इटली ही केवळ एक राजकीय ध्येय साधण्यासाठीं स्थापन झालेली गुप्त मंडळी नव्हती. "मानवजातीची प्रगति होत आहे व मनुष्यमात्रानें आपलीं कर्तव्यें पाळलींच पाहिजेत या दोन महातत्वांवर निष्ठा असलेल्या तरुणांची ही सहकारी संस्था आहे." राष्ट्रोद्धारासाठीं आपली बुद्धि व कृति अर्पण करणारांची ही संस्था होती, एकी व एकनिष्ठा हेंच विजयाचें रहस्य आहे असें मानणाऱ्या वीरांची संस्था होती. "तरुण इटलीचे सभासद हे नव्या धर्माचे अनुयायी आहेत; आयुष्य हें कर्तव्य आहे, परमेश्वरानें नियोजित करून दिलेलें कार्य आहे; आणि म्हणून कर्तव्यनिष्ठा हाच जीवनाचा धर्म आहे; तत्वनिष्ठेनें चिरकाल टिकणाऱ्या विजयाची प्राप्ति होत असते; सत्य आणि न्याय यांबद्दल आदर बाळगल्यानेंच विजय प्राप्त होत असतो; स्वार्थत्यागानें—आत्मयज्ञाच्या अखंडतेनेंच विजयश्री प्राप्त

होत असते. ” या तत्वांचा तरुण इटलीनें स्वीकार केला म्हणूनच इटलीला स्वातंत्र्य प्राप्त झालें.

**लोकसत्ता** हें तरुण इटलीचें दुसरें महातत्व होय. केवळ राजकीय दृष्ट्या सोईस्कर म्हणूनच मॅझिनीला लोकसत्ता पसंत होती असें नव्हे. मानवजातीची प्रगति हेंच मॅझिनीच्या राष्ट्रधर्माचें ध्येय होतें; त्याचप्रमाणें त्याच्या लोकसत्तावादाला धर्मतत्वांचा पाया होता. “ परमेश्वराच्या दृष्टीनें सर्व मानवी प्राणी सारख्या योग्यतेचे आहेत. म्हणून त्यांचें राजकारण त्यांच्याच हातीं असणें श्रेयस्कर आहे. लोकसत्ताक राज्यपद्धति हीच जनतेचें कल्याण करण्यास योग्य व समर्थ आहे. सम व स्वतंत्र अशा नागरिकांच्या संमतीनें एकजीव झालेल्या देशबंधूंच्या संघटनेलाच राष्ट्र म्हणतात. राष्ट्रघटनेमध्यें कोणत्याही व्यक्तीचे अगर वर्गाचे हातीं सत्ता ठेवल्यानें त्या व्यक्तीला अथवा वर्गाला सत्तेची चटक लागते, मग स्वामित्वासाठीं देशामध्यें भेद माजतात; नागरिकांची समता नष्ट होते, परस्परांविषयीं वाटणाऱ्या संशयाचें पर्यवसान संघटित पक्षभेदांत होतें, देशांत दुही माजते व अखेर देशाचें स्वातंत्र्यहि नष्ट होतें— म्हणून लोकसत्ता ही एकच चिरस्थायी राज्यपद्धति आहे. देशावर कोणत्या व्यक्तीनें राज्य करावयाचें हें लोकमतावरून ठरवावयाचें अशी पद्धति कांहीं ठिकाणीं अस्तित्वांत होती; अशी पद्धति असते तेथेंही बेबंदशाही माजते व राष्ट्रस्वातंत्र्याचा नाश होतो असा इतिहासाचा निर्णय आहे. राजपद्धतीच्या तत्वांच्या उत्क्रांतीकडे पाहिलें असतां लोकसत्तेचें प्रभुत्व सहज दिसून येणार आहे. वंशपरंपरेच्या हक्कांचें समर्थन करणारा चवदावा लुई, मनगटाच्या जोरावर राज्यावर हक्क सांगणारा नेपोलियन, प्रजेवर जुलूम करणारे, प्रजेच्या सुखासाठीं अहर्निश तळमळ करणारे–सर्व प्रकारचे राजे आजवर युरोपमध्यें होऊन गेले आहेत. पण राज्यपद्धतीची उत्क्रांति त्याच्या पुढें गेलेली आहे. स्वतंत्र व समसमान देशबांधवांची संघटना निर्माण करणें हा प्रत्येक राष्ट्राचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि अशा प्रकारची संघटना लोकशाहींतच होणें शक्य आहे असा इतिहासाचा निकाल आहे. इटलीमध्यें असें एकहि राजघराणें नव्हतें कीं, ज्याचे हात प्रजेच्या रक्तानें माखलेले नाहींत, कीं ज्यानें इटालियन प्रजेला चिरडून टाकण्यासाठीं आस्ट्रियाबरोबर सहकारिता केली नाहीं! राजांचें राज्य म्हणजे जुलमाचा कहर अशीच इटालियन लोकांची कल्पना झाली होती. राष्ट्रकार्यासाठीं

एकाहि राजघराण्यानें झीज सोसली नव्हती; म्हणून इटालियनांना कोणत्याहि राजघराण्याबद्दल ममत्व व अभिमान वाटत नव्हता. इटलीचे नागरिक व्यक्तीसाठीं लढावयास उत्सुक नव्हते, कारण त्यामुळें आपल्या हक्कांवर, हितावर व प्राणांवरहि गदा येते असा त्यांना अनुभव आला होता. लोकशाहीमध्यें लोकांना आपले हक्क व स्वातंत्र्य प्राप्त होतें, ह्या महातत्वामुळेंच जनतेमध्यें चैतन्य जागृत होतें, याच तत्वासाठीं संपूर्ण जनता एकवटून कार्य करण्यास उद्युक्त होते—म्हणून लोकसत्ता ही एकच चिरस्थायी राज्यपद्धति आहे. प्रत्येक देशांतील लोकांनीं बंधुभावानें, एकोप्यानें व स्वतंत्रतेनें रहावें असा ईश्वराच्या सृष्टीचा नेमानेम आहे. लोकतंत्रणाधिकार जनतेच्या संमतिपासूनच उद्भव पावतो म्हणून सत्ता राष्ट्राधीनच असली पाहिजे. कायदा ही राष्ट्राच्या इच्छाशक्तीची भाषा आहे, कायद्यामध्यें राष्ट्रांतील सर्व वर्गांच्या हितसंबंधाचा समावेश असला पाहिजे; विशिष्ट हक्काला कायद्याची संमति नाहीं; खरा कायदा लोकशाहीच निर्माण करूं शकते म्हणून लोकसत्ता हीच श्रेष्ठतम राज्यपद्धति आहे. राजा प्रजा यांचेमध्यें बड्या लोकांचा फरजी असावा लागतो—त्याचेशिवाय राजे लोकांचें चालतच नाहीं. ह्या बड्या लोकांचीं घराणीं एकदां जनतेमध्यें रुजलीं म्हणजे उच्चनीच भाव फैलावतो; शिवाय या बड्या लोकांच्या घरांतच अनीतीचें माहेरघर असतें. अनीति व उच्चनीच भाव राष्ट्राला सर्वस्वीं घातुक आहे म्हणून लोकसत्ता ही एकच चिरस्थायी राज्यपद्धति आहे. राजा हा ईश्वराचा अंशधारी आहे हा समज लोकांमध्यें एकदां उत्पन्न झाला कीं, राजे लोकांना जुलूम करावयास फावतें; हा समज नाहींसा झाला कीं राजे लोकांना आपला दरारा कायम ठेवावयास जुलूम करण्याशिवाय गत्यंतरच नसतें. राजा म्हटला कीं त्याच्या मागें तो दरबार, तीं कारस्थानें वगैरे अनिष्ट प्रकार येतातच. एकंदरींत कोणत्याहि दृष्टीनें विचार करितां लोकसत्ताक राज्यपद्धतीच श्रेष्ठतम आहे असें ठरतें. प्रजासत्ताक राज्यपद्धतीचें शिक्षण राष्ट्राला पायरी पायरीनें मिळणें अगदीं अशक्य आहे; लोकसत्तेची पात्रता यावयासाठीं लोकसत्तेचेंच शिक्षण राष्ट्राला मिळालें पाहिजे आणि लोकसत्तेचें शिक्षण देशाला मिळावयासाठीं देशामध्यें एकदम लोकसत्ताच सुरू झाली पाहिजे " इटलीची परंपराहि लोकसत्ताक आहे. इतिहासाच्या प्रारंभीं अगदीं पहिली लोकसत्ता येथेंच निर्माण झाली; व्हेनिस व जिनोआ येथील लोकशाही तर एकोणीसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत जिवंत होती. फ्रान्सच्या लोकसत्तेला अत्याचारांचा

करावा लागला आहे; तिनें राजसत्तेपेक्षांहि जास्त प्रमाणांत जनतेचें स्वातंत्र्य हिरावून घेतलें आहे, इटालियन लोकसत्तेची परंपरा निष्कलंक आहे." ह्मणून इटलीमध्यें लोकसत्तेच्या संस्थापनेकरितां तनुमनधनेंकरून झटावयाचें असा तरुण इटलीचा निर्धार होता.

राष्ट्रैक्य:—हे तरुण इटलीचें तिसरें महातत्व होय. राष्ट्र हें एकच शासन-पद्धतीखालीं असलें पाहिजे. कारण ऐक्याशिवाय राष्ट्रीयत्वच संभवत नाहीं. राष्ट्रामध्यें फूट असली तर राष्ट्रकुटुंबाचा विध्वंस होतो. राष्ट्रैक्याशिवाय जनतेमध्यें सामर्थ्य उत्पन्न होत नाहीं. इटलीच्या आजूबाजूला असलेलीं राष्ट्रें संघटित, समर्थ व मत्सरग्रस्त आहेत म्हणून इटलीला आपलें सामर्थ्य केंद्रीभूत करणें अत्यंत अवश्य आहे. संयुक्तसंस्थानपद्धतीमुळें ( Federalism ) प्रांतिक अभिमान दृढ होतात व हट्टास पडतात, राष्ट्राचे निर्जीव तुकडे पडून राष्ट्राचें सामर्थ्य नष्ट होतें आणि वैयक्तिक महत्वाकांक्षांना कार्यक्षेत्र उत्पन्न होतें. स्विट्झरलँडचें दुर्बलत्व हें या पद्धतीमुळेंच उत्पन्न झालेलें आहे. इटलीचे कांहीं तुकडे पाडण्यांत यावे, या प्रत्येक तुकड्याला स्वातंत्र्य द्यावें आणि या सर्व तुकड्यांवर प्रभुत्व चालविणारें एक केंद्रवर्ती मंडळ स्थापण्यांत यावें असा इटलींतील कांहीं पुढाऱ्यांचा आग्रह होता. त्यांचें म्हणणें होतें कीं, इटलीमध्यें एकराष्ट्रीयत्वाची भावनाच नाहीं आणि असली तरी तिला मूर्तस्वरूप प्राप्त होणें शक्य नाहीं; युरपमधील राजकारणाचा रंग पाहून त्यांना वाटे कीं, इटली एक राष्ट्र होणें अशक्य आहे—कारण प्रत्येक संस्थानिकानें वेगवेगळया राष्ट्रांचा आश्रय केलेला आहे ! इटलीच्या एकराष्ट्रीयत्वासाठीं युरपखंडाच्या सामर्थ्याशीं झगडावें लागेल हें त्यांना टाऊक होतें पण त्यांचेमध्यें इतका आत्मविश्वास व कार्यनिष्ठा नव्हती; या पेंचातून सुटावयासाठीं त्यांनीं एक नवाच मार्ग शोधून काढला होता—इटलीमध्यें संस्थानमंडळ निर्माण करणें हा तो मार्ग ! इटालियन जनतेच्या अंत:करणांत एकराष्ट्रीयत्वाचा विचारच नाहीं; त्यांच्या ऐतिहासिक परंपरेंत एकवाक्यता नाहीं; देशामध्यें अनेक प्रकारचे कायदे, अनेक प्रकारच्या जमीनमहसूलपद्धति अनेक वर्षांपासून चालत आलेल्या आहेत; लोकांना एकमेकांबद्दल प्रेमभाव वाटत नाहीं; म्हणून इटलीमध्यें संस्थानमंडळापेक्षां जास्त लांबची उडी घेण्यांत हंशील नाहीं अशी निरुत्साहानें भरलेली नेभेळट विचारपरंपरा त्यांनीं निर्माण केली होती; आणि ही विचारपरंपरा सर्वस्वीं असत्य होती असेंहि म्हणतां येत नाहीं. मॅझिनीच्या अंत:करणांत केव्हां केव्हां नैराश्याचा अंध:कार पसरे, तेव्हां

श्री ग्रंथ संग्रहालय

त्याला या विचारांमधील सत्यतेचा अंश दिसून येत असे. पण त्याचा आशावादी राष्ट्रधर्म इतका उत्साहपूर्ण होता कीं, लोक आपापसांतील भेदभाव विसरून गेले. ज्यावेळीं इटलीच्या ऐक्याची नुस्ती कल्पनाहि लोकांच्या चित्तांत नव्हती तेव्हां मॅझिनीच्या दिव्य दृष्टीला एकवटलेल्या इटलीचें भविष्यदर्शन झालें. स्वतंत्र व लोकसत्ताक अशा एकवटलेल्या इटलीचें भव्य व दिव्य स्वप्न त्यानें लोकांच्या चित्तचक्षूंपुढें उभें केलें; त्यामुळें इटालियनलोकांमध्यें एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली. राष्ट्रभक्तीनें थबथबलेला त्याचा शब्द लोकांच्या कानावर येतांच त्यांच्या हृदयांत एकनिष्ठा व राष्ट्रैक्यभाव उत्पन्न झाला, स्थानिक व प्रांतिक अभिमान नष्ट झाले, आपसांतील यादवीचा लोप झाला. इटलीचें सामर्थ्य सकलांच्या एकजुटीमध्यें व परस्परांबद्दलच्या सहानुभूतीमध्यें आहे हें त्यांना दिसून आलें. इटलीचे वेगवेगळे तुकडे अगोदरच पाडलेले होते, -या अनेक तुकड्यांमध्यें वेगवेगळ्या राज्यकर्त्यांच्या जुलमांतहि सवड काढून रहावयास लोक तयार होते-म्हणूनच या जुलमाला आजवर विरोध झाला नाहीं. इटलीच्या ऐक्याच्या कल्पनेनें सर्व राज्यकर्त्यांवर जनतेचें एकवटलेलें सामर्थ्य आदळणें शक्य झालें. संपूर्ण जनता एकदां जागृत झाल्यावर मग प्रचंड प्रजाक्षोभापुढें त्या हीन व दुर्बल राज्यकर्त्यांचा कितीसा वेळ टिकाव लागणार ?

**आस्ट्रियांशीं युद्धः**—हें तरुण इटलीचें चवथें तत्व होय. " परक्यांच्या अंमलाखालीं कुजत पडलेला देश उत्तरोत्तर अधिकाधिक अवनत अवस्थेप्रत जात असतो. " " आस्ट्रियाबरोबर आपणांस युद्ध केलेंच पाहिजे; ऑस्ट्रियानें इटलीचा प्राण हिरावून घेतला आहे; ऑस्ट्रियामुळें इटलीचें राष्ट्रीयत्व नष्ट झालें आहे. इटलीचा अभिमान, वैभव, संस्कृति व जनतेचें हित यांचा नाश झालेला आहे. इटलीचा प्रश्न शांततेच्या मार्गानें सोडवितां येणें सर्वस्वीं अशक्य आहे. ऑस्ट्रियाबरोबर युद्ध टाळतां येणें अशक्य आहे. हें युद्ध लॅांबर्डीच्या मैदानावर होईल-आणि इटलीच्या भाग्यपत्रिकेवर आल्पस् पर्वताच्या पलीकडे मोर्तब केलें जाईल. ज्याला आपली गुलामगिरी असह्य झालेली आहे असा असंतुष्ट व त्यानें गुलाम रहावें यांतच ज्याचा फायदा आहे असा धनी-या दोघांनाहि भवितव्यता समरांगणावर खेंचून नेत असते ! असंतुष्ट तावेदार व जुलमी मालक यांचेमध्यें युद्ध होणें हा सृष्टिनियम आहे. " इटलीचें ध्येय सुसाध्य नाहीं-त्यासाठीं घनघोर युद्ध, अपरिमित अपेष्टा व जिवापाड श्रम करावे

लागतील हें मॅझिनीनें लोकांना स्पष्टपणें दाखवून दिलें होतें—स्वतःच्या सुखमय स्वप्नासाठीं लोकांची फसवणूक केल्याचा बोल त्याला लावतां येत नाहीं.

**गनीमी कावा**:-हें तरुण इटलीचें पांचवें तत्व होय. परकी अंमलाखालीं क्रान्तिकारकांना लष्करी शिक्षण देतां येत नाहीं म्हणून परक्यांच्या लष्करावर शिस्तवार हल्ला करतां येत नाहीं; म्हणून ऑस्ट्रियाबरोबर होणाऱ्या युद्धांत इटालियन क्रान्तिकारकांनीं गनीमी काव्याचाच अवलंब केला पाहिजे. लहान लहान टोळ्यांचे अंगीं चपलता असते, त्या इव्या तिकडे त्वरेनें हालवितां येतात व परक्या सैन्याची नजर चुकवतां येते. या टोळ्या वेगवेगळ्या ठिकाणीं पसरून देतां येतात; त्यांना तोंड द्यावयासाठीं शत्रूला फार मोठें सैन्य रणांगणावर आणावें लागतें; अर्थातच तें फार अवजड असतें. अत्यंत मोठें सैन्यहि लहान लहान टोळ्यांनीं गुंतवून टाकतां येतें. गनीमी सैन्याला पुरेसें लष्करी शिक्षण फार थोड्या काळांत व देश पारतंत्र्यांत असतांनाहि देतां येतें. गनीमी सैन्यामुळें बंडाचा प्रसार देशभर होतो व जनतेमध्यें जागृति उत्पन्न होते व लोकजागृतीवरच बंडाचें यश अवलंबून असल्यामुळें गनीमी सैन्याचा विजय होतो. या युद्धपद्धतीमुळें स्थानिक शौर्याला आपली करामत दाखवितां येते, तिजमुळें शत्रूला चांगला वचक बसतो. निश्चित स्थळीं, सुसंघटित व मोठ्या अशा राष्ट्रीय सैन्यानें शत्रूशीं लढाई दिली तर तिजमध्यें प्राप्त होणाऱ्या जयापजयावर संपूर्ण राष्ट्राचें भवितव्य अवलंबून असतें, अशा युद्धांत अनर्थ ओढवण्याचा संभव असतो. गनीमी सैन्याच्या एकाद्या टोळीचा पराभव झाला तर दुसऱ्या टोळीच्या जयापजयावर त्याचा परिणाम फारसा होत नाहीं, म्हणून राष्ट्राचें नशीब केव्हांही इरेस पडत नाहीं; म्हणून अवजड व परमुलखांत असलेल्या परक्या सैन्याशीं लढाई देण्याचा परतंत्र देशाला एकच मार्ग आहे आणि हा मार्ग ह्मणजे गनीमी कावा होय. दुसऱ्या फिलिपचा डच लोकांनीं याच पद्धतीनें पराभव केला. अमेरिकेनें इंग्लंडचा पराभव याच काव्यानें केला. विजयाचें सर्वच श्रेय गनीमी काव्यास देतां आलें नाहीं तरी विजयाचें आदिकारण हेंच होय हें निर्विवाद आहे.

**सामाजिक सुधारणा**:—हें तरुण इटलीचें सहावें तत्व होय. इटलीमध्यें आजपर्यंत केवळ जनतेसाठीं म्हणून एकहि चळवळ करण्यांत आली नव्हती म्हणून त्या चळवळींचा जनतेवर फारसा परिणाम झाला नाहीं. कांहीं चळवळे लोक बंडें उभारतात, त्यामुळें उद्योगधंद्याला मात्र त्रास होतो,

व निष्पन्न मात्र कांहींच होत नाहीं हें पाहून लोक अगदीं त्रासून गेले होते; त्यांना पुन्हां बंडाला उद्युक्त करणें जवळजवळ अशक्यच झालें होतें. स्वदेशाला स्वातंत्र्य प्राप्त करून द्यावयाच्या चळवळीमध्यें संपूर्ण जनतेनें भाग घ्यावा यासाठीं खालच्या वर्गाची जागृति होणें अवश्य आहे, कर्तव्यांच्या उदात्त तत्वज्ञानाचा परिणाम फक्त सुसंस्कृत व सुस्थितींत असणाऱ्या व्यक्तींच्या मनावर होतो; अशिक्षित व दरिद्री लोकांचे अंत:करणांत कर्तव्याच्या कोरड्या मीमांसेनें आत्मयज्ञाची स्फूर्ति उत्पन्न होत नाहीं. या दीनदुबळ्यांचे आर्तरव राजकारस्थानी पुढाऱ्यांच्या कानावर जात नाहींत; क्रान्तीपासून आपणांस कांहींच फायदा नाहीं, समाजासाठीं आपण कर्तव्य करावें असें म्हटलें तर समाजानेंहि आपणांस बहिष्कृत केलेलें, तेव्हां आपण या भानगडींत पडूंच नये असा मुत्सद्दीपणाचा विचार करून हे लोक राष्ट्रीय चळवळीपासून अलिप्त राहतात. मॅझिनीचें चित्त सदैव या बहिष्कृत समाजाकडे लागलेलें असे. “ भुकेनें खंगलेले, दु:खानें गांजलेले, धनवंतांनीं तुच्छतेनें झोंकून दिलेलें उष्टे खरकटे तुकडे गोळा करीत असलेले हे दीन अनाथ लोक माझ्या डोळ्यांसमोर उभे राहतात; सदैव हीन स्थितींत राहिल्यानें त्यांच्या अंत:करणावरहि हीनपणाचीं पुटें चढतात. म्हणूनच ते केव्हां केव्हां हलकेपणांतच आनंद मानीत असलेले दिसतात; त्यांच्या चेहऱ्यावरील पशुवृत्ति स्पष्ट दिसत असतांहि मला त्यांचे अंतरीं वसत असलेल्या परमेश्वराची आठवण होते आणि वाटतें कीं आपल्या जीवनाला जसें कांहीं तरी उद्दिष्ट आहे तसेंच यांच्याहि जीविताला कांहींतरी नियोजित कार्य असलेंच पाहिजे, पशुवृत्तीमध्यें गर्क झालेल्या याच लोकांचे ठिकाणीं मानवी जीवनाची उदात्तता वास करीत असली पाहिजे. एकाच धर्मानें, नागरिकत्वाच्या एकाच ध्येयानें, समतेच्या व प्रीतीच्या एकाच बंधनानें ते बद्ध झालेले आहेत आणि आपल्या हक्कांची व कर्तव्यांची जाणीव त्यांना झालेली आहे असें भविष्यकालचें दर्शन माझ्या अंतश्चक्षूंना दिसत आहे. ” हे लोक राज्यक्रान्तीच्या कार्यामध्यें जनतेची बाजू घेतील याबद्दल मॅझिनीला तिळमात्रहि संशय नव्हता. “ आज ज्या लोकांना मागसलेले मानण्यांत येत आहे त्यांना त्यांच्या मागसण्याचीं कारणें दाखवून द्या; त्यांना दाखवून द्या कीं त्यांचा पक्ष सत्याचा आहे, त्यांचा रक्षणकर्ता परमेश्वर आहे आणि मग तेहि कर्तव्यभावनेनें जागृत झालेल्या सुशिक्षित वर्गाइतकेंच कार्य करतात कीं नाहीं तें पहा. जें कार्य संपूर्ण राष्ट्रासाठीं म्हणून करावयाचें त्यामध्यें उच्च नीच

भाव काय कामाचा ? " राष्ट्राचें बंधविमोचन म्हणजेच जनतेचें बंधविमोचन; " परमेश्वर आणि जनता! परमेश्वर गांजलेल्यांचा कैवारी आहे ! " ह्या सिद्धांताच्या जोरावर परतंत्र राष्ट्रें स्वातंत्र्याच्या मार्गाला लागतात; आणि याच सिद्धांताचा आधार घेऊन दीन, अशिक्षित व मागसलेल्या वर्गांच्या उद्धाराचा प्रयत्न झाला पाहिजे. " राज्यक्रान्ति ही जनतेकडून आणि जनतेसाठीं करण्यांत आली पाहिजे; आजवर झालेल्या क्रान्त्या विशिष्ट वर्गांनीं उभारल्या होत्या; अशा क्रान्तीमुळें एका वर्गाची सत्ता दुसऱ्या वर्गाचे हातांत जाते, जनतेवर त्याचा कांहींच परिणाम होत नाहीं; म्हणून जनतेकडून आणि जनतेसाठींच अशी क्रान्ति झाल्याशिवाय राष्ट्राचें व जनतेचें बंधविमोचन होणें शक्य नाहीं. " मानवजातीची प्रगति व्हावी व परमेश्वराचें शासन प्रगट व्हावें यासाठीं राष्ट्रस्वातंत्र्य आवश्यक आहे; तसेंच राष्ट्रांतील सर्व वर्गांचा सर्वांगीण उद्धार व्हावा हाहि राष्ट्रस्वातंत्र्याचा प्रेरक विचार असला पाहिजे.

प्रत्येक सभासदाचें जीवन नीतितत्वांना धरून असलेंच पाहिजे असा संस्थेचा नियम होता. नीतिशिवाय नागरिकत्व संभवतच नाहीं; अंत:शुद्धीशिवाय महत्कार्य होत नाहीं. " सत्कार्य हातीं घ्यावयाला अधिकार लागतो; सद्वर्तनानें होणारी अंत:शुद्धि ही या अधिकाराची पहिली पायरी आहे." अनीतिमान् मनुष्यानें राष्ट्रधर्माचा प्रसार करूं पाहणें हा शुद्ध ढोंगीपणा आहे अणि ढोंगीपणाइतकी भ्रष्टता कोणतीच नाहीं! वर्तन विचाराइतकें उच्च असलें पाहिजे. " तरुण इटली ही राष्ट्रधर्माची समिति आहे, देवदूतांचें मंडळ आहे, एकनिष्ठेचें आगर आहे—हा अहंकाराचा पक्ष नाहीं, हा स्वार्थावर व व्यक्तिमहत्वावर नजर ठेवणारांचा पक्ष नाहीं. " अशा या पवित्र संस्थेमध्यें अपवित्र वर्तनाच्या अथवा विचाराच्या माणसांचा समावेश कसा करावयाचा ? उच्च नीति हा नियम अत्यंत कडकपणें पाळण्यांत येत असे.

आपलें ध्येय साध्य करून घ्यावयासाठीं दोन साधनें तरुण इटलीनें मान्य केलीं होतीं.—**शिक्षण व उठावणी**—शिक्षण दीक्षागुरूंकडून व मंडळाकडून उदाहरणानें वक्तृत्वानें व लेखणीनें दिलें जाणार होतें—"या शिक्षणाचा सारा रोख उठावणीकडेच होता. स्वदेशहित हेंच व्यक्तिहित अशी भावना उत्पन्न करून देण्याकडे होता. विचार आणि वर्तन यांमध्यें ऐक्यभाव ठेवणें ही माझ्या प्रयत्नांची दिशा होती; इटलीचें पुनरुज्जीवन एवढाच प्रश्न आमच्यापुढें नव्हता तर पुनर्जन्म पावलेल्या इटलीला सामर्थ्य कसें प्राप्त होईल, आपल्या गतवैभवाला

व भविष्यकाळांतील महत्कार्याला साजेल असें समर्थ राष्ट्र निर्माण करणें, हा प्रश्न आमचेपुढें होता. " प्रथम मनःप्रवर्तन आणि नंतर उठावणी अशी या कार्यक्रमाची संगति होती. उठावणीचें शिक्षण सभासदांना गुप्तपणें देण्यांत येई. " पहिल्या उठावणीला बंड म्हणतात व यशस्वी झालेल्या बंडाला क्रांति म्हणतात " हें सभासदांच्या चित्तावर ठसविण्यांत येई.

तरुण इटलीचा **स्वावलंबनावर** विशेष भर होता. स्वातंत्र्य, ऐक्य, लोकशिक्षण, लोकसत्ता व स्वावलंबन हें तरुण इटलीच्या तत्वज्ञानाचें सारसर्वस्व आहे. राष्ट्रस्वातंत्र्यसाधनासाठीं पितृभूमि सर्व समर्थ आहे–त्यासाठीं एतद्देशीय किंवा परदेशीय राजांची व दरबारांची मदत घ्यावयाची जरूर नाहीं, अशी निष्ठा सभासदांच्या हृदयांत जागृत करण्यांत येई. निष्ठेशिवाय महत्कार्य होत नाहीं " स्वातंत्र्याचा मोक्ष साधू पाहणाऱ्या या राष्ट्रमुमुक्षूंचे ठिकाणीं सामर्थ्य व अधिकार नाहीं असें नाहीं–त्यांचे ठायीं फक्त आत्मविश्वासाचा अभाव आहे. " इटलीमध्यें आत्मविश्वास आणि एकनिष्ठा निर्माण करणें हें कार्य तरुण इटलीनें हातीं घेतलें आणि अत्यंत यशस्वी रीतीनें पार पाडलें. " सर्वत्र पराभूत झालेल्या, सर्वस्वीं निरुत्साह झालेल्या, नैराश्याच्या अंधःकारांत आत्मविस्मृति झालेल्या, छातींत धडकी भरलेल्या " इटलीच्या हृदयांत, " इटलीचें सामर्थ्य प्रत्यक्ष काळालाहि नमवील अशा प्रकारचें आहे, " अशी आत्मनिष्ठा मॅझिनीनें उत्पन्न केली व इटलीच्या भाग्योदयाचा पाया घातला. स्वातंत्र्याच्या प्रयत्नांत परक्यांच्या मदतीशिवाय पान हलावयाचें नाहीं अशी परंपरा कारबोनरी मंडळीनें घालून दिली होती. परक्यांच्या जोरावर केलेल्या उठावणीचें प्रारब्ध परक्यांच्याच हातांत असतें हें अनेक विश्वासघातांनंतर इटालियन लोकांना समजून आलें होतें. परक्यांच्या मदतीनें मिळवलेल्या विजयाचा राष्ट्राला फारसा उपयोग होत नाहीं, त्या विजयाला जनशक्तीचा पाठिंबा नसतो, त्यामुळें राष्ट्रनिष्ठा जागृत होत नाहीं. स्वावलंबनानें जरी पराजय झाला तरी लोकशक्तीच्या व लोकजागृतीच्या जोरावर पुन्हां उठावणी करण्याचें सामर्थ्य जनतेमध्यें जिवंत असतें.

" **यावच्चंद्र दिवाकरौ** " हें तरुण इटलीचें ब्रीदवाक्य होतें. इटलीच्या एकीकरणाचें व स्वातंत्र्यसाधनाचें कार्य अनेक अपजय आले तरीहि अखंडितपणें चालू ठेवण्यांत येईल हा अर्थ ह्या ब्रीदवाक्यानें प्रदर्शित होतो अशी जाणीव प्रत्येक सभासदाच्या अंतःकरणावर उमटविण्यांत येत असे. तरुण

इटलीच्या निशाणावर हें ब्रीदवाक्य लिहिलेलें असे व सायप्रस वृक्षाच्या डहाळीचें चित्र काढलेलें असे; इटलीसाठीं ज्या लोकांनीं आपले प्राण खर्ची घातले होते त्यांच्या स्मरणार्थ सायप्रसच्या डहाळीचें चिन्ह निशाणावर अधिष्ठित केलेलें असे.

" राज्यक्रान्ति हेंच या संस्थेचें उद्दिष्ट आहे पण राज्यक्रान्तीचा दिवस उगवेपर्यंत व राज्यक्रान्ति झाल्यावरहि जनतेला शिक्षित करणें हेंच संस्थेचें प्रधान कार्य असेल. " महत्कार्य हातीं घेतांना लोकसमूहाचा क्षोभ जागृत करण्यानें भागत नाहीं, लोकक्षोभाला शिस्त लावल्यानेंच ध्येय साध्य होतें हें मॅझिनीनें पूर्णपणें जाणलें होतें. " राष्ट्रोद्धाराच्या निशाणाखालीं इटालियन लोकांना सुसंघटित करण्याकडेच संस्थेची प्रवृत्ति राहील. " आपणांस " क्रांति कशासाठीं व कशी करावयाची आहे ह्याची जाणीव क्रान्तिकारकांच्या चित्तांत सदैव जागृत असली पाहिजे; तसेंच क्रान्ति या शब्दामुळें दर्शविल्या जाणाऱ्या कल्पनाहि क्रान्तिकारकांना नीटपणें माहीत असल्या पाहिजेत. " " राज्यक्रान्ति हा एक कार्यक्रम आहे आणि तो पायरीपायरीनें पुरा केला पाहिजे. क्रान्तीची प्रेरणा अभिनव, सर्वव्यापी, विधायक व जिवंत अशा तत्वांपासूनच होत असते. " " प्रगतीच्या सर्व मार्गांच्या एकीकरणासाठीं, आजवर अवमानिलेल्या तत्वाला मान्यता देण्यासाठीं व राष्ट्राच्या संघटनेंत त्याला योग्य स्थान प्राप्त करून देण्यासाठीं क्रान्त्या होत असतात. " तरुण इटलीच्या कार्यक्रमांत क्रान्तीचें स्थान कोणतें आहे याबद्दलहि मॅझिनीचे उद्गार स्पष्ट आहेत. "क्रान्ति ही जनतेकडून व जनतेंसाठींच केली गेली पाहिजे. क्रान्ति हा आमच्या कार्याचा महामंत्र आहे; त्यामध्यें आमच्या सर्व तत्वांचें सार आहे; हेंच आमचें शास्त्र, हाच आमचा धर्म, हेंच आमचें जीवनसर्वस्व ! आमचे विचार व कृति यांचें रहस्य याच महामंत्रांत आहे, त्याचेसाठींच आम्हीं इटलीच्या काळरात्रींत जागता पहारा ठेवला; त्या रात्रीच्या अंधःकारांत ह्याच दिव्य कल्पनेच्या तेजानें आम्हांला जागृत ठेविलें ! " तरुण इटलीनें हें कार्य हातीं घ्यावें अशी मॅझिनीनें आज्ञा दिली त्यावेळीं त्यानें युरपच्या राजकीय परिस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण केलें होतें. " तरुण इटलीला माहीत आहे कीं, क्रान्तिकारक युरप फक्त खुणेचीच वाट पहात आहे; क्रान्तीला सुरवात होऊं द्या, ही खूण द्यावयाचा युरपमधील दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राइतकाच इटलीला हक्क आहे. इटलीनें ज्या मार्गानें जावें अशी तरुण इटलीची इच्छा

आहे त्या मार्गावर पाय टाकावयास कोणाचींहि पाउलें आजवर धजलेलीं नाहींत ही गोष्टहि आम्हांस ठाऊक आहे ! ” स्वातंत्र्यलक्ष्मीचा प्रेषित व राष्ट्रधर्माचा आद्यप्रवर्तक हे शब्द बोलला आणि मगच युरपमध्यें राष्ट्रधर्माचा उदय झाला; आणि आज ह्याच राष्ट्रधर्माचा जगांतल्या सर्व राष्ट्रांनीं अंगीकार केलेला आहे.

तरुण इटलीचा सभासद होऊं इच्छिणारा प्रत्येक जण दीक्षा घेतांना पुढील शपथ घेत असे:—

“ **परमेश्वराला** व माझ्या **पवित्र मातृभूमीला स्मरून,**

“ राष्ट्रकार्यासाठीं स्वकीय अथवा परकीय सत्ताधाऱ्यांच्या जुलमाला ज्या वीरांना बळी पडावें लागलें आहे त्या **राष्ट्रवीरांना स्मरून,**

‘ परमेश्वरानें मला ज्या देशांत जन्माला घातलें त्या देशाशीं मला निगडित करणाऱ्या **कर्तव्यांना** आणि परमेश्वरानेंच मला दिलेल्या माझ्या **देशबंधूंना स्मरून,**

‘ ही माझ्या पूर्वजांची जन्मभूमि आणि याच देशामध्यें माझीं मुलेंबाळेंहि वास्तव्य करणार आहेत; जन्मभूमीबद्दल प्रत्येक मनुष्याला निसर्गतःच प्रीति वाटत असते; त्या पवित्र **देशभक्तीला स्मरून,** ’

‘ जुलूम, अन्याय, अपहार व गुलामगिरी यांबद्दल मनुष्यप्राण्याला निसर्गतःच तिरस्कार वाटत असतो, या **नैसर्गिक भावनेला स्मरून,** ’

‘ इतर देशासंबंधीं विचार करतांना मला दिसून येतें कीं, मला स्वदेश नाहीं, नांवनिशाणी नाहीं आणि स्वतःच्या देशाच्या नागरिकत्वाचा हक्कहि नाहीं; हे विचार अंतःकरणांत येतात तेव्हां मला लज्जेनें मान खालीं घालावी लागते; त्या **लज्जेला स्मरून,** ’

‘ स्वातंत्र्यासाठींच हा जीव निर्माण झाला, सत्कृत्य हेंच या जीवाचें कार्य; स्वातंत्र्याकडे व सत्कृत्याकडे हा जीव सारखी ओढ घेत असतो; पण गुलामगिरीनें जखडून गेल्यामुळें ह्या निसर्गप्रवृत्तींची आज्ञा त्याला मान्य करतां येत नाहीं—या **नैसर्गिक प्रवृत्तींना स्मरून,** ’

‘ **प्राचीन वैभवाला** आणि **सध्यांच्या हीनतेला** स्मरून ’

‘ इटलीच्या स्वातंत्र्यासाठीं कित्येक पुण्यात्मे फांशीं गेले, कितीकांना तुरुंगवास भोगावा लागला, अनेकांना हद्दपारी पत्करावी लागली—या राष्ट्रवीरांच्या मातांनीं जो अश्रुवर्षाव केला त्या **पवित्र अश्रूंना स्मरून** ’

' दुःखानें तडफडणाऱ्या माझ्या लक्षावधि **देशबांधवांना स्मरून** '

' मी ... ... ... तरुण इटली या संस्थेमध्यें आपलें नांव दाखल करीत आहें. जगाच्या उन्नतीचें कार्य इटलीच्याच हातून व्हावयाचें आहे हा ईश्वरी संकेत आहे अशी माझी दृढ श्रद्धा आहे. परमेश्वराची ही योजना सिद्धीस जावी यासाठीं झटणें हें प्रत्येक इटालियनाचें कर्तव्य आहे. राष्ट्रोद्धाराचें कार्य ईश्वरी संकेतानुसारच होत असतें; हें कार्य पूर्ण व्हावें यासाठीं परमेश्वरच त्या राष्ट्रांच्या नागरिकांना सामर्थ्य देत असतो अशी माझी निष्ठा आहे. हें चैतन्य फक्त एकाच व्यक्तीचे ठायीं केंद्रीभूत झालेलें नसतें, तें संपूर्ण राष्ट्रामध्यें जागृत होतें; ह्या सामर्थ्याचा उपयोग योग्य दिशेनें करण्यांत आला तर राष्ट्राला विजयश्री खास प्राप्त होईल अशी माझी निष्ठा आहे. स्वार्थत्याग व प्रत्यक्ष कृति म्हणजेच सदाचरण, राष्ट्रकार्याबद्दल एकनिष्ठा आणि संहति हेंच जनतेचें सामर्थ्य असा माझा दृढभाव आहे.

' मी शपथ वाहतों कीं, इटली देशाला एक, स्वतंत्र व लोकसत्ताक राष्ट्र करण्याचा प्रयत्न मी आजन्म करीन. तरुण इटलीच्या ध्येयाचें ज्ञान लोकांना करून देण्यासाठीं मी यावज्जीव एकनिष्ठेनें व कायावाचामनेंकरून झटेन; हें ध्येय साध्य व्हावयासाठीं जनतेमध्यें एकी असलीच पाहिजे; आणि एकदां मिळविलेलें स्वातंत्र्य सदाचरणाशिवाय चिरस्थायी व्हावयाचें नाहीं, म्हणून मी माझ्या देशबांधवांना संहतीचें व सदाचरणाचें शिक्षण यावजन्म देत राहीन. यापुढें मी दुसऱ्या कोणत्याहि संस्थेमध्यें नांव नोंदविणार नाहीं. तरुण इटलीच्या ध्येयाला धरून जेवढे हुकूम होतील ते सर्व मी पाळीन. संस्थेचे सर्व व्यवहार मी गुप्त ठेवीन; प्राण गेला तरीहि संस्थेची गुप्त बातमी मी फोडणार नाहीं. उपदेश व कृति यांद्वारें मी माझ्या समाजबंधूंना साह्य करीन.

' ही शपथ मी अंशतःहि मोडली तर प्रत्यक्ष परमेश्वराच्या कोपानलाचा मजवर वर्षाव होवो ! संपूर्ण मनुष्यजाति माझा धिःकार करो ! असत्य प्रतिज्ञेच्या लांछनानें माझें तोंड काळें ठिक्कर होवो ! ''

प्रथम मॅझिनीनें ही शपथ घेतली आणि नंतर इतर लोकांनीं घेतली. इटलीच्या स्वातंत्र्यासाठीं पुढें जें घनघोर युद्ध माजलें त्यामध्यें सामील झालेले बहुतेक सर्व वीर तरुण इटलीचे सभासद होते; सभासदांपैकीं कित्येक आंगचोर पण प्रतिष्ठित अशा गृहस्थांनीं या प्रतिज्ञेचा भंग केला, ह्या गोष्टीची मॅझिनीनें स्वमुखानें अनेक वर्षांनंतर त्यांना आठवण करून दिली; " ह्या लोकांनीं शपथ

घेऊन तिजप्रमाणें आचरण केलें नाहीं ह्या गोष्टीची मी त्यांस आठवण देत आहे म्हणून ते पाहिजे तर माझा तिरस्कार करोत, पण त्यांनीं मला दाखवून द्यावें कीं मी आपली शपथ मोडली आहे! ही शपथ मी धर्मवाक्याप्रमाणें पवित्र मानतों, तिजमध्यें नमूद केलेलीं तत्वें सत्य आहेत अशी माझी तेव्हांहि निष्ठा होती व आजहि आहे. इटलींतील राजसत्तेच्या आश्रयानें तुह्मी आज राष्ट्राच्या एकीकरणाचें कार्य चालवितां आहां तें कसें ह्मणून जर कोणी आक्षेप घेईल तर त्याला माझें उत्तर हेंच आहे कीं, त्यानें पुन्हां एकदां तरुण इटलीच्या नियमांकडे व तत्वांकडे नजर द्यावी, त्यांमध्यें स्पष्ट म्हटलेलें आहे कीं, राष्ट्र एकदां स्वतंत्र झालें म्हणजे तें हव्या त्या प्रकारची राज्यपद्धति मान्य करील, हवें तें निशाण उभारील, आणि हें सर्व राष्ट्रांतील बहुजन समाजाच्या मतानेंच होईल. राष्ट्रास जर राजसत्ता मान्य झाली तर माझेंहि सुख त्यांतच आहे. मी स्वतः मात्र राजसत्तेचा गुलाम कधींहि होणार नाहीं. माझीं मतें सत्य आहेत कीं असत्य आहेत हें लोकांचें लोकांनाच कळून येईल."

गुप्त मंडळ्यांच्या इतिहासांत तरुण इटलीचें वैशिष्ट्य काय आहे हें एवढ्या विवेचनावरून स्पष्ट झालें असेलच. हक्कांचे ठिकाणीं कर्तव्य, परावलंबनाचे ठिकाणीं स्वावलंबन, खून व धाकदपटशा यांचे जागीं विधायक कार्यक्रम, वायफळ बडबडीचे ठिकाणीं प्रत्यक्ष कृति, पक्षभेदाचे ऐवजीं बंधुभाव, अस्पष्ट ध्येयाचे जागीं स्पष्ट ध्येय, कटवाल्यांचे ऐवजीं निष्ठावंत, केवळ क्रांतीचे जागीं पुनरुज्जीवन, वैयक्तिक हुकमतीचे जागीं तत्वनिष्ठा, व्यक्तिमहत्व, व्यक्तिस्वार्थ व वर्गसत्ता यांचे जागीं लोकशाही, जनतेचा उद्धार व आत्मयज्ञ, लोकक्षोभ व असंतोष यांचे जागीं तत्वांच्या शिस्तीमुळें ध्येयाकडे प्रगमन पावणारी विधायक लोकशक्ति, जुन्यापुराण्या वयस्क लब्धप्रतिष्ठित सभासदांचे जागीं अभिनव उत्साहाचे, दिव्य दृष्टीचे व विनयशील असे तरुण—हीं सर्व तरुण इटलीचीं वैशिष्ट्यें आहेत. या संस्थेनें प्रत्यक्ष कार्य काय व कसें केलें तें पुढें येईलच.

गुप्त मंडळीच्या संघटनेमध्यें निसर्गतःच एक दोष असतो तो हा कीं अशा संस्थेचा गुप्तपणा फार दिवस टिकत नाहीं. कारबोनरीमध्यें देशभक्तांचा प्रवेश जितक्या सुलभपणें होत असे तितक्याच सहज रीतीनें गुप्त पोलिसांचाहि प्रवेश होत असे, हें मॅझिनीला स्वानुभवावरूनच ठाऊक होतें; पण मनुष्य स्वभावावर औषध नाहीं; मॅझिनीलाहि या दोषावर उपाय काढतां आला नाहीं, कारण त्याचें मूळ व्यंगपूर्ण अशा मनुष्यस्वभावांतच आहे. मॅझिनीनें ही संस्था स्थापन

केली त्यावेळीं उदारमतवाद्यांना आपलीं–आज अत्यंत मवाळ वाटणारीं–मतें बोलून दाखविल्याबद्दल तुरुंगवासाची किंवा हद्दपारीची शिक्षा भोगावी लागत असे. अशा स्थितींत जनतेला राष्ट्रधर्माचें शिक्षण देण्याचें अत्यंत अवघड व अत्यंत अवश्य असें कार्य ह्या संस्थेनें केलें; या शिक्षणामुळेंच इटली देश स्वतंत्र राष्ट्रांच्या महत्पदाला पोंचूं शकला. तरुण इटलीच्या तत्वज्ञानानें राष्ट्रजागृति झाली पण युद्धाची प्रत्यक्ष तयारी या दृष्टीनें संस्थेचा हेतु मुळींच तडीस गेला नाहीं. मॅझिनीला वाटत होतें कीं, राष्ट्रीय उठावणीचा काळ अगदीं समीप आलेला आहे. " दोन कोटि लोक एकदां जागृत झाले व स्वदेशासाठीं युद्ध करावयास सज्ज झाले " कीं मग इटलीच्या भाग्योदयाच्या आड येणाऱ्या शत्रूंचा निःपात व्हावयास कितीसा वेळ लागणार आहे ? इटलीसाठीं लढावयास आपखुषीनें लक्षावधि तरुण धांवून येतील अशी त्याची अपेक्षा होती–या देशभक्ताचीं गोड स्वप्नें व इटलींतील कटुतर वस्तुस्थिति यांचेमध्यें केवढें महदंतर होतें हेंच आतां आपणांस पहावयाचें आहे !

श्री ग्रंथ संग्रहालय
नं. .......
ता. .......

# ३ हद्दपार मॅझिनी.

( १८३१-१८३४. )

"In exile because I loved righteousness&hated iniquity"

*Pope Gregory VII.*

लियॉन्सच्या हद्दपारांचा विश्वासघात–तरुण इटलीची स्थापना व कार्य–चार्लस अलबर्टला पत्र–१८३३ ची उठावणी–जाकोपो रफीनी याचा हृदयद्रावक वृत्तांत–अज्ञातवास–सॅव्हॉयची स्वारी–विश्वासघात.

लियॉन्सला त्यावेळीं सुमारें दोन हजार हद्दपार जमले होते. " येथें मला खरा जिवंतपणा दिसून आला. येथें जमलेल्या हद्दपारांपैकीं बहुतेक सर्वांना लष्करी शिक्षण मिळालेलें होतें. त्यांच्यापैकीं बऱ्याच जणांना जिनोआच्या रस्त्यांतून फिरतांना मी माझ्या लहानपणीं पाहिलें होतें. " सार्डीनियाच्या ताब्यांतील सॅव्हॉय प्रांतावर स्वारी करण्याचा त्यांचा बेत होता, ह्या कामीं फ्रान्सचा लुई फिलिप त्यांना मदत करीत होता आणि ही गोष्ट जगजाहीर होती. फ्रान्सच्या राज्यावर त्याला क्रान्तिकारांनीं अधिष्ठित केलें होतें, म्हणून क्रान्तिकारकांची सहानुभूति मिळविणें त्याला इष्ट होतें. युरोपमधील इतर राजे त्याचा फ्रान्सच्या राज्यावरील हक्क कबूल करीत नव्हते. युरपमधील क्रान्तिकारकांना मदत करून या राजांना भेवडावून त्यांचेकडून आपल्या हक्काबद्दल मान्यता उकळावयाची असा त्याचा बेत होता. इटालियन क्रान्तिकारकांना ह्या अंतस्थ राजकारणाचा मागमूसही नव्हता ! फ्रेंच सरकारची या धाडसाला सहानुभूति आहे हें पाहून पुष्कळसे सरदार व धनिक लोक क्रांतिकारकांना मिळाले

होते. या स्वारीसाठीं पुरून उरेल इतका पैसा जमविण्यांत आला होता. स्वारीची तयारी अगदीं उघडपणें व निर्धास्तपणें चालली होती. क्रान्तिकारकांच्या मुख्य ठाण्यावर फ्रान्स व इटली यांचे राष्ट्रीय ध्वज बरोबरच फडकत होते; त्यांनीं शस्त्रास्त्रें सपाटून जमविलीं होतीं व युद्धसामग्रीचा पुरवठा भरपूर करून ठेवला होता; सर्वत्र आनंद व उत्साह दिसत होता—पण युरपमधील राजकीय परिस्थिति आपल्या बेताला फारशी अनुकूल नाहीं, ऑस्ट्रियाविरुद्ध लढाई पुकारल्यास फ्रान्समध्येंच धामधूम होईल व कदाचित् स्वत:सच चंबूगवाळें आटोपण्याची पाळी येईल हें दिसून येतांच लुई फिलिपनें जाहीरनामा काढला कीं, ' लियॉन्सच्या हद्दपारांनीं आपल्या पलटणी तावडतोब मोडून टाकाव्या; त्यांनीं तसें न करतां फ्रान्स व फ्रान्सचे दोस्त यांचेमध्यें वितुष्ट आणण्याचा प्रयत्न केला तर त्यांना कायद्यानें फर्मावल्यापैकीं सर्वांत कडक शिक्षा देण्यांत येईल. " हा जाहीरनामा प्रसिद्ध झाला तरी हद्दपारांच्या पुढाऱ्यांना वाटत होतें कीं लुई फिलिप असा विश्वासघात करणार नाहीं. फ्रान्सवर संकट येऊं नये म्हणूनच त्यानें कावेबाजपणानें असा जाहीरनामा काढला असला पाहिजे ! मी त्यांना सांगितलें कीं, तुम्हांला जें वाटत आहे त्याच्या खरेखोटेपणाची शहानिशा करावयासाठीं बंडवाल्या सैन्याची एक तुकडी इटलीच्या दिशेनें जाऊं द्या. हा डाव हद्दपार इटालियनांना पसंत पडला. सैन्याची पहिली तुकडी मुक्काम सोडून निघाली तोंच फ्रेंच घोडेस्वारांनीं तिला अटकाव केला. " लगेच पकडापकडीला सुरवात झाली; कित्येकांना तुरुंगांत कोंबण्यांत आलें, कित्येकांना देशोधडीला जावें लागलें. हद्दपारींतून सुटलेल्या कांहीं लोकांनीं कॉर्सिकाचा मार्ग धरला. लियॉन्समधील क्रान्तिकारकांचीं ठाणीं उध्वस्त करण्यांत आलीं व त्यांच्या पलटणी आपोआपच मोडल्या गेल्या. " इटालियनांना फसवून राजे लोकांनीं त्यांचा गळा कापण्याचें हें आणखी एक उदाहरण ! "

याच सुमारास इटलींत बोलोना प्रांतांत चालू असलेल्या बंडाला मदत करावयासाठीं कॉर्सिका बेटांत सुमारें तीन हजार हत्यारबंद स्वयंसेवक तयार झाले होते. फ्रान्समधून कांहीं लोकांसह मॅझिनी त्यांना जाऊन मिळाला. पण कॉर्सिकन स्वयंसेवकांना इटलीच्या प्रवासासाठीं गलबतें भाड्यानें घ्यावयासाठीं, लढवय्या स्वयंसैनिकांच्या कुटुंबांच्या पोषणासाठीं पुरेसा पैसा लवकर उभारला जाईना व इटलींतील क्रान्तिकारकांकडूनहि मदत मिळेना; इतर ठिकाणीं जाऊन व्यवस्था करावयाच्या अगोदरच इटलींतील बंडवाल्यांचा मोड झाल्याची बातमी

पसरली. येथेंहि निराशा झालेली पाहून मॅझिनी मार्सेलिसला परत आला व तरुण इटली ही अभिनव संस्था संघटित करावयाच्या प्रयत्नास लागला.

मार्सेलीस येथें मॅझिनी हद्दपार इटालियनांच्या सहवासांत रहात असे. त्यांचेपैकीं कांहीं निवडक लोकांच्या साह्यानें आपल्या कल्पनांना मूर्त स्वरूप द्यावयाचें त्यानें ठरविलें. " येथें एका लहानशा कोठडीमध्यें आम्ही कामाला सुरवात केली. कोणाची मदत नाहीं, व्यवस्थितपणें काम करावयास सोयीची जागा नाहीं, हमालीच्या कामासाठींसुद्धां हाताखालीं नोकर नाहींत—अशा स्थितींत आम्हीं रात्रंदिवस काम करीत असावें ! ' तरुण इटली ' या नियतकालिकासाठीं लेख लिहावे, संस्थेशीं सहानुभूति दाखविणाऱ्या लोकांना सभासद होण्याविषयीं पत्रें लिहावीं, प्रवाशांपासून माहिती मिळवावी, इटालियन खलाशांना आपल्या संस्थेमध्यें मिळवून घ्यावें, छापलेल्या लेखांचीं पुडकीं बांधावीं—वगैरे सर्व शारीरिक व मानसिक कामें आमचीं आम्हींच करीत होतों ! कोणी टाइप जुळवी, कोणी प्रुफें तपाशी, कोणी पैसे वांचविण्याकरितां शिपायाचें काम करी ! आमच्यांत न्यूनाधिक भाव मुळींच नव्हता—आम्ही सख्या भावांप्रमाणें वागत होतों; आम्हां सर्वांचे अंतःकरणांत एकच विचार, एकच आशा व एकच आकांक्षा निवास करीत होती. फ्रान्सच्या लोकसत्तावाद्यांना आमची उद्योगप्रियता व चिकाटी पाहून मोठें कौतुक व प्रेम वाटे. खर्चाच्या मानानें प्राप्तीची बाजू फारच कमकुवत असल्यामुळें केव्हां केव्हां आम्हांला दारिद्र्याच्या सर्व यातना सोसाव्या लागत—पण या सर्व यातना आम्ही आनंदानें सहन करीत होतों. कारण भविष्यकालावर आमची निष्ठा होती. १८३१ पासून १८३३ पर्यंत आमच्या संघांतील तरुणांनीं आपलें कर्तव्य इतक्या आनंदानें आणि मनोभावानें केलें कीं, त्यांच्याविषयींची माहिती पुढील पिढीस मिळेल तर फार बरें होईल, एवढ्याच हेतूनें हे शब्द मी लिहिलेले आहेत. आम्हांला शत्रूहि बरेच होते—मात्र त्यांचा द्वेष उलट्या काळजाचा नव्हता, ते उघडपणें आमचा द्वेष करीत. आम्हांपैकींच कांहीं जणांनीं हरामीचा मार्ग स्वीकारला; नेकीनें देशसेवा करण्याची शपथ गुंडाळून ठेवून, पोकळ अभिमानाला बळी पडून नेभळटपणानें त्यांनीं आम्हांवर आडून आरोप करावयास सुरवात केली. ह्या संकटानें, आम्हांपैकीं जे कांहीं तरुण सत्यापासून ढळले नव्हते त्यांची हिम्मत तर खचली नाहींच, उलट संकटापासून धैर्याला येणारें स्थैर्य त्यांचे अंतःकरणांत उत्पन्न झालें. आपणांस जें कर्तव्य करावयाचें

तें आपण इमानानें केलेंच पाहिजे. आपण कर्तव्यरत आहोंत म्हणून इतरांनीं आपली वाहवा करावी ह्या हीन विचारामुळें नव्हे; कर्तव्यपालनामध्यें खासगी सुखदु:खांच्या व व्यक्तींबद्दलच्या विचारांस थारा द्यावयाचा नाहीं; 'देह जावो अथवा राहो ' अशा प्रकारची एकनिष्ठा कर्तव्याबद्दल व्यक्तिमात्रांमध्यें उत्पन्न झाली पाहिजे, व फलाची आशा न धरतां कर्तव्यरत असलें पाहिजे–एवढाच ह्या संकटांचा निष्कर्ष आम्ही काढला. आम्हांवर या काळांत जे प्रसंग आले त्यांची आठवण होतांच वाटूं लागतें कीं परमेश्वरा, असले प्रसंग पुढें कोणावर आणूं नको ! ''

या निर्मल आनंदाच्या व आशामय कर्तव्यतत्परतेच्या काळाची मॅझिनीला जन्मभर आठवण होई. तेव्हां त्याच्या जीवनांत उत्साह उसळत होता, त्या उत्साहांत ताजेपणाची टवटवी होती ! ह्या उत्साहावर पुढें निराशेची अवकळा आली; त्याच्या त्या वेळच्या बऱ्याचशा आकांक्षा वस्तुस्थितीला सोडून होत्या असें त्याला आढळून आलें; पण ह्या दोन वर्षांत मित्रप्रीति, ध्येयभक्ति व आत्मयज्ञ यांनीं त्याचें जीवन गजबजलें होतें. " ह्या दोन वर्षांत घडून आलेले मित्रसंबंध एक मृत्यूच तोडूं शकला ! ध्येयाच्या पावित्र्यामुळें मैत्रीलाहि पावित्र्य आलें होतें. " त्याचें जीवन इतकें त्यागमय होतें कीं, आपल्या सहकारी मित्रांमध्यें स्वत: इतका स्वार्थत्यागाचा करारीपणा तो सहज निर्माण करी !

दोन वर्षांत या तरुणांच्या टोळीनें विलक्षण कामगिरी केली. मॅझिनीला इटलीचें भवितव्य दिव्य दृष्टीनें दिसलें होतें आणि हें ध्येय त्यानें आपल्या सहकाऱ्यांना पटवून दिलें होतें. हें ध्येय साध्य करून घ्यावयासाठीं मॅझिनीनें आंखलेला तरुण इटलीचा कार्यक्रमहि त्यांना पसंत होता. त्यांना एका संपूर्ण राष्ट्राच्या जीवनाला दिशा लावावयाची होती; असें कार्य त्याच्या अगोदर कोणीहि केलेलें नव्हतें. कारबोनरी मंडळीचें ध्येय क्रान्ति हें होतें पण तरुण इटलीला राष्ट्राचें पुनरुज्जीवन करावयाचें होतें. आजवर क्रान्तिकारकांचें लक्ष केवळ लष्करी तयारीकडे होतें; तरुण इटलीला राष्ट्राचें मन:प्रवर्तन करावयाचें होतें. राजकारण, तत्वज्ञान, नीति, वाङ्मय, ललितकला वगैरे राष्ट्रीय जीवनाच्या सर्व अंगाचें इटालियन परंपरेच्या अनुरोधानें पुनरुज्जीवन करावयाचें कार्य त्यांनीं अंगावर घेतलें होतें. हें कार्य अत्यंत विशाल आहे हें ते जाणून होते; पण त्यांची नजर यशावर नव्हती, ध्येयावर होती. इटलीच्या महत्कार्याची त्यांना अनुभूति झाली होती व त्यासाठीं आपलें आयुष्य वेंचावयाची त्यांची

तयारी होती. चार तरुणांनीं अशा कामाला हात घालणें हें त्यावेळीं कित्येक ' सुखंच मे घृतंच मे ' लोकांना निवळ वेडेपणाचें, नव्हे पागलपणाचेंहि वाटलें असेल; पण त्या एकनिष्ठ तरुणांनीं व त्यांच्या दिव्यदृष्टि गुरुनें राष्ट्रभक्ति व आत्मयज्ञ यांच्या जोरावर तें कार्य सिद्ध करून दाखविलें ! " आम्ही संख्येनें अगदीं अल्प, वयानें अगदीं तरुण, साधनांच्या व वजनाच्या दृष्टीनें अगदीं गरीब असे होतों; पण एकनिष्ठा हेंच आमचें सामर्थ्य ! राष्ट्राच्या अंत:करणांत मूक असलेल्या नैसर्गिक प्रवृत्तींना सशब्द करणें हें आमचें कार्य आम्हांस इतिहासानें व विवेकबुद्धीनें स्पष्ट करून दाखविलें होतें. पतित इटालियनांचा उद्धार एवढेंच आमचें कार्य नव्हतें, आम्हांला युरपखंडांत नवजीवन आणावयाचें होतें. प्रगति आणि बंधुभाव या अभिनव धर्माच्या प्रचाराचें कार्य पुनरुज्जीवन पावलेल्या इटलीनें अंगीकृत केलें आहे असें चित्र माझ्या अंतश्चक्षूंसमोर वारंवार उभें रहात असे ! "

इटलीमधील हजारों तरुणांशीं या मंडळीनें पत्रव्यवहार केला, तरुण इटलीला मिळावयासाठीं त्यांचे मन तयार केलें, तरुण इटलीच्या शाखा देशभर स्थापन करविल्या आणि इटलीच्या ध्येयाला स्पष्ट स्वरूप प्राप्त करून दिलें. राष्ट्रधर्माचा संदेश त्यांनीं इटलीमध्यें घरोघर पोंचविला. तरुण इटलीच्या कार्याला मॅझिनीच्या कल्पनेबाहेर यश आलें; हजारों तरुणांनीं संस्थेच्या शपथ पत्रिकेवर सह्या केल्या. प्रत्यहीं अशा प्रतिज्ञापत्रांचीं पुडकींच्या पुडकीं मॅझिनीकडे इटलीमधून येत असत. " लिहितां वाचतां येणारे सर्व लोक आमचे सहकारी झाले. आमचें यश ही आमच्या तत्वांची महती होय; आजपर्यंत लोक कोणाच्या तरी भिडेस्तव राजकारणामध्यें भाग घेत असत किंवा गुप्त मंडळींत सामील होतांना त्या गुप्तपणालाच मोहित होत असत ! तरुणांच्या अंत:करणांत निद्रितावस्थेंत असलेली प्रतिभा आमच्या तत्वांच्या बोलांनीं जागृत झाली ! "

क्रान्तिकारकांच्या कटांत सामील होणें ही तोंडची गोष्ट नाहीं हें ते तरुण जाणून होते. " कटामध्यें सामील होणाऱ्या व्यक्तीला आत्मविसर्जन करावें लागतें व अढळ सहनशीलता संपादन करावी लागते. दुसऱ्या कोठल्याहि आयुष्यक्रमांत इतकें आत्मविसर्जन आणि सहनशीलता लागत नाहीं. इतरांची मनें वळविण्यासाठीं किती तरी वेळ त्यांच्या तंत्रानें घ्यावें लागतें; त्यांच्या वायफळ वडबडीनें आपले अंत:करणावर विलक्षण परिणाम झालेला आहे असें भासवावें लागतें, त्यांची मर्जी सांभाळावी लागते, त्यांचे हलके विचार ऐकून

घ्यावे लागतात आणि इतकें सोसूनहि मुद्रा प्रसन्न राखावी लागते ! कटवाल्याचें जीवन जणूं स्वत:साठीं नसतेंच; जेव्हां इतर लोक घरीं असावयाचे तेव्हां त्याला बाहेर भटकावें लागतें; जेव्हां वास्तविकपणें उघडयावर फिरावयाचें तेव्हां त्याला घरांत छपून रहावें लागतें; निसर्ग क्रमाला इतका विरोधी असा दुसरा कोणताच जीवनक्रम नाहीं. ” शिवाय सरकारचा ससेमिरा सदैव मागें लागलेला–पोलिसांच्या हातांत एकदां सांपडल्यावर तुरुंग, हद्दपारी किंवा फांशी यांशिवाय चवथी शिक्षा नाहीं ! “ पण आपलें ध्येय पवित्र आहे हें त्या तरुणांना पूर्णपणें पटलें होतें म्हणूनच हा धोक्याचा व दगदगीचा आयुष्यक्रम त्यांनीं आनंदानें स्वीकारला ! ” या कार्यासाठीं आपलें सर्वस्व अर्पण करावयास ते सिद्ध झाले होते. मॅझिनीचा जिवलग मित्र जाकोपो रफीनी आपल्या एका पत्रांत लिहितो:–“ येथें आम्हीं चार पांच तरुण आहों; आमची साधन सामग्री अत्यंत अल्प आहे; पण एका संघटित राज्यपद्धतीला उलथून पाडावयाची आमची महत्वाकांक्षा आहे ! आमच्या कार्याला मूर्त स्वरूप आलेलें आमच्या दृष्टीस पडेल कीं नाहीं याबद्दल मला संशय वाटतो; पण आज आम्ही जें बीज पेरीत आहों तें केव्हां तरी खास फलद्रूप होणार अशी निष्ठा आमच्या अंत:करणांत आहे. ”

“ तरुण इटली ” संस्थेतर्फे “तरुण इटली” ( La Giovine Italia ) ही निबंधमाला सुरू करण्यांत आली. या पत्रकाचे अंक शंभर ते दोनशें पृष्ठांचे असत; ते अनियमितपणें मधून मधून प्रसिद्ध करण्यांत येत असत; संस्थेची सांपत्तिक स्थिति असमाधानकारक असल्यामुळें हीं पत्रकें हलक्या कागदावर काढण्यांत येत असत. छापखान्यांतील फ्रेंच खिळे जुळविणारांना इटालियन भाषा येत नसे म्हणून या पत्रकांची छपाई अगदीं खराब असे. पण त्यांमध्यें प्रसिद्ध होणारे लेख पहिल्या दर्जाचे असत; त्यांमध्यें मॅझिनीचे दिव्य संदेश प्रसिद्ध होत असत. मातृभूमीच्या मोक्षसाधनार्थ मॅझिनीसारख्या महापुरुषानें लिहिलेल्या या उज्वल लेखांचा इटालियन जनतेवर विलक्षण परिणाम झाला. जगाच्या राष्ट्रीय वाङ्मयांतील अग्रस्थान नि:संशय याच लेखमालेकडे आहे ! केव्हां केव्हां मॅझिनीचे सहकारीहि या पत्रकांत लेख लिहीत. हीं पत्रकें सरकारच्या डोळ्यावर आलीं नव्हतीं तोंवर इटलीला जाणाऱ्या खलाशांशीं संधान बांधून जलमार्गानें लेखांची पुडकीं इटलींत पाठविलीं जात. पुढें इटलींतील संस्थानिकांनीं ह्या पत्रकांच्या व संस्थेच्या नियमपत्रिकांच्या वाचकांना, तसेंच त्यांचा प्रसार होण्यास मदत

करणाऱ्या व्यक्तींना भयंकर शिक्षा देण्यांत येईल असे हुकूम सोडले. सरकारच्या डोळ्यांत धूळ टाकावयासाठीं तरुण इटलीच्या सभासदांनीं इटलीमध्यें व्यापारी मालाची एक वखार काढली; फ्रान्समधून या वखारींत राळ, कोळसे, कपडे वगैरे माल आणविण्यांत येत असे. पोत्यांमध्यें मालाच्या पोटीं लेखांचीं व शपथपत्रिकांचीं पुडकीं पाठविण्यांत येत असत. संस्थेचे सभासद खुणेचीं पोतीं ओळखून घेऊन त्यामधील लेखांची पुडकीं वाचीत व त्यांचा इतरत्र प्रसार व्हावा अशी व्यवस्था करीत. पुढें पुढें तर या लेखांची मागणी इतकी वाढली कीं, मार्सेलिसच्या छापखान्यांत पुरेसें काम निघेना म्हणून इटलीमध्यें जागोजाग लहान-लहान छापखाने गुप्तपणें सुरू करण्यांत आले, त्यांमध्यें या पत्रकांच्या हजारों प्रती निघत व त्यांचा प्रसार इटलीभर फार त्वरेनें होत असे.

तरुण इटलीच्या शाखांचा प्रसारहि असाच झपाट्यानें झाला व सभासदांची संख्याहि फार जोरानें वाढूं लागली. कारबोनरी मंडळीनें इटलींतील लोकांना स्वातंत्र्याच्या गोड गोड कल्पना ऐकवीत भुरळींत ठेवलें होतें; प्रत्यक्ष कार्याची कल्पना कोणालाच नव्हती. राष्ट्रैक्य, राष्ट्रस्वातंत्र्य व समाजसुधारणा हें इटलीचें ध्येय तरुण इटलीनें इटलीच्या तरुण पिढीसमोर मांडतांच कारबोनरी मंडळीचे बहुतेक सभासद या अभिनव संस्थेला येऊन मिळाले. स. १८३३ मध्यें सभासदांची संख्या सुमारें साठ हजार झाली. इटलीच्या बंधविमोचनासाठीं पुढें ज्या ज्या वीरांनीं आत्मार्पण केलें त्यांपैकीं बहुतेक सर्व तरुण-इटलीचे सभासद होते. गॅरिबॉल्डी हाहि याच सुमारास संस्थेला मिळाला; याबद्दल त्यानें म्हटलें आहे:— "स्वदेशाचा प्रश्न माझ्या मनांत सारखा घोळत असे. या कार्याला मूर्त स्वरूप द्यावयाच्या प्रयत्नांत माझे देशबांधव आहेत हें पाहून मला इतका आनंद झाला कीं, कोलंबसाला अमेरिका खंड सांपडलें तेव्हां त्यालाहि तितका आनंद झाला नसेल!" तरुण-इटलीचें वजन थोडक्याच दिवसांत इतकें वाढलें कीं, ही संस्था चिरडून टाकावयासाठीं इटलींतील सातही राजे कायावाचामनेंकरून झटूं लागले व त्यापायीं आपल्या जुलमाची शर्थ करूं लागले! "तरुण लोक तरुण इटलीचीं तत्वें जनतेला स्पष्ट करून दाखवीत फिरूं लागले, कोणत्याहि संकटांला भीक न घालतां आमच्या लेखांचा प्रसार सर्व इटलीभर करावयाचें काम त्यांनीं अंगावर घेतलें. आजपर्यंत कोणत्याहि राष्ट्रीय संस्थेमध्यें आत्मयज्ञानें व उदात्त प्रीतीनें प्रेरित झालेले इतके तरुण सामील झाले नव्हते! परस्परांविषयीं उत्कट प्रेमानें बद्ध झालेल्या, अभिनव उत्साहानें भर-

लेल्या, कामाची इतकी हौस दाखविणाऱ्या तरुणांचा असा एकहि संघ माझ्या पाहण्यांत आजवर आलेला नाहीं ! ”

एक वर्षाच्या आंतच तरुण–इटली ही राष्ट्रीय संस्था होऊन बसली. “ आम्हां चार पांच तरुणांना हें एवढें यश आलें; आम्ही कार्याला आरंभ केला तेव्हां इटालियन जनतेमध्यें आमच्या विचारांशीं विरोधी अशीं मतें रूढ होतीं; आम्हांला विरोध करणारे लोक प्रतिष्ठित व वजनदार होते; पण एक वर्षाच्या आंतच–राष्ट्रानें आमच्या कार्यक्रमाला मान्यता दिली; तरुण–इटलीला आतां इतकें सामर्थ्य प्राप्त झालें होतें कीं, संस्थेच्या सभासदांवर जुलूम करतांनाहि राजे लोकांचा थरकांप उडत असे: हा विजय आम्हां चार व्यक्तींचा नव्हता, त्याचें श्रेय आमच्या तत्वांच्या सत्यतेलाच दिलें पाहिजे ! ” इटलींतील इतर सर्व राष्ट्रीय संस्था तरुण–इटलीमध्यें सामील झाल्या. युरोपांतील अनेक प्रमुख लोकांकडून मॅझिनीला उत्तेजनपर पत्रें आलीं. इटलीच्या राजकारणांत पुढें प्रसिद्धीस आलेल्या जोवर्टीचें पत्र त्यांत विशेष महत्वाचें होतें–कारण हाच जोवर्टी पुढें मॅझिनीच्या विरुद्ध पक्षाला म्हणजे मवाळ पक्षाला मिळाला. जोवर्टीचें हें पत्र तरुण–इटलीच्या सहाव्या अंकांत प्रसिद्ध झालें होतें. तो म्हणतो:–“ तरुण इटलीचे कार्यकर्ते हे राजकारणाच्या अभिनव तत्वज्ञानाचे प्रस्थापक आहेत; धर्माला नवा जोम आणण्यासाठीं अवतरलेल्या परमेश्वराच्या प्रेषितांचा पहिला संघ तरुण इटली हाच होय ! अंगीकृत कार्यांत आपणांस यश यावें असें मी चिंतितों; कारण तें कार्य न्यायाचें आहे, भूतदयेचें आहे, पवित्र आहे; कारण तें कार्य जनतेच्या उद्धारासाठीं आहे–म्हणून तें परमेश्वराचें नियोजित कार्य आहे. आम्ही सर्व तुमच्या झेंडयाखालीं जमूं आणि ‘परमेश्वर व जनता’ हा संदेश प्रसृत करूं. देशासाठीं आपणांबरोबर आत्मार्पण करावयाची माझी सिद्धता आहे. ”

तरुण इटलीची निष्ठाप्रतिज्ञा स. १८३१ च्या शेवटाचे सुमारास प्रसिद्ध करण्यांत आली; आणि नंतर तरुण इटलीचीं तत्वें जनतेला समजावून देऊन इटलीचें मन:प्रवर्तन करावयासाठीं तरुण–इटली पत्रकाचे अंक निघूं लागले.

“ आजपर्यंतचा सारा वेळ आपण शाब्दिक चर्चेमध्यें फुकट घालविला आहे–प्रत्यक्ष कार्य असें फारच थोडें झालें आहे. देशाच्या दुर्दैवाबद्दल व बेअब्रूबद्दल वाटणारा संताप व्यक्त करण्यास मार्गच नाहीं म्हणून आज आपण स्वस्थ बसलों आहोंत. आजची परिस्थिति अत्यंत आणीबाणीची आहे.

यावेळीं आपण कांहीं तरी कार्य केलेंच पाहिजे असें कर्तव्यबुद्धीनें सुचविल्यावरून व अनेक इटालियन बांधवांनीं तशी इच्छा व्यक्त केल्यावरून आम्ही हे विचार, आमच्या देशबांधवांच्या व आमच्या हलाखीबद्दल ज्यांचें अंत:करण कळवळतें अशा सदय लोकांच्या पुढें आज मांडीत आहों. हीं तत्वें सत्य आहेत अशी आमची निष्ठा आहे व तीं आज आम्ही आपणांपुढें अत्यंत मनमोकळेपणानें मांडीत आहों. मोठमोठया क्रान्त्या तरवारीपेक्षां तत्वांनींच घडून येत असतात; हीं तत्वें प्रथमत: लोकांचीं अंत:करणें काबीज करतात आणि मग तीं मूर्त स्वरूपांत व्यक्त होतात. तरवारीला तत्वाचा पाठिंबा असतो तेव्हांच तिचें सामर्थ्य अजिंक्य होतें. सामाजिक हक्कांचा व कर्तव्यांचा उद्गम जनतेच्या नैतिक निष्ठेमध्यें आहे. केवळ पाशवी शक्तीमुळें जित, जेते व तत्वांसाठीं प्राणत्याग करणारे वीरहि उत्पन्न होतात; जुलूम हें पाशवी शक्तीचें मूर्त स्वरूप आहे; पाशवी शक्तीचा विजय म्हणजेच जुलूम. जनतेमध्यें तत्वांचा प्रचार व प्रसार झाला म्हणजे लोकांना स्वातंत्र्याची इच्छा व जरूरी उत्पन्न होते. स्वातंत्र्य हा आमचा हक्क आहे असें ते प्रतिपादन करूं लागतात. तत्वांच्या प्रसारानें जनतेची शक्ति अधिक जोमदार होते, तिच्या कार्याला न्यायाचें पाठबळ मिळतें. सत्य एक आहे, पण तें अनेक तत्वें मिळून बनलेलें आहे; मानवी बुद्धीला त्या सर्व तत्वांचें आकलन करतां येणें एकाएकीं शक्य नाहीं–किंवा सिंहावलोकनानंतर त्या सर्वांचें सार एकाच मर्यादित व विशिष्ट स्वरूपांत समाविष्ट करणें मानवी बुद्धीला अशक्य आहे. प्रखर बुद्धीचे व विशाल अंत:करणाचे महापुरुष जगाच्या प्रगतीसाठीं जनतेच्या अंत:करणांत एकाद्या नव्या तत्वाचें बीज पेरीत असतात; पण त्यांच्या कार्याला मूर्त स्वरूप यावयास हजारों वर्षें लागतात, अनेक लोकांनीं आपलें आयुष्य त्या कार्याला अर्पण करावें लागतें. मानवजातीच्या शिक्षणाची प्रगति ही अशी संथपणानें पण अखंडितपणें चाललेली आहे. ज्यांची सत्यता अनेक वर्षें पटत आलेली आहे, ज्यांचे सर्व विभाग पूर्णपणें कसोटीला उतरलेले आहेत, जीं देशकालपरिस्थितीनें अबाधित आहेत अशाच तत्वांना अत्यंत खोल विचाराअंतीं मानवजात मान्यता देत असते."

" जनतेच्या सहानुभूतीशिवाय राष्ट्रीय युद्ध होणें शक्य नाहीं ही गोष्ट तरुण इटली जाणून आहे. जे लोक पुढाकार घेऊन युद्ध करावयास सिद्ध आहेत त्यांना जनतेची उठावणी करण्याचें सामर्थ्य आहे. नव्या परिस्थितीमध्यें नव्या माणसांची जरूर आहे—ज्यांचें अंतकरण स्वार्थ व लोभ यांनीं भ्रष्ट झालेलें नाहीं,

जे प्रतिभेचे जिवंत झरे आहेत अशीं माणसें पाहिजे आहेत. जुन्या संवयी व व पद्धति यांचे दास या कार्याला अगदीं निरुपयोगी आहेत, आज निष्ठावंत लोक पाहिजे आहेत. निष्ठा हेंच सामर्थ्याचें रहस्य आहे. आत्मयज्ञ हेंच खरें सद्वर्तन आहे. सामर्थ्य संपादन करणें व ध्येय सिद्ध करून दाखविणें हेंच राजकारण. जुलूम जबरदस्तीनें आत्मा चिरडून टाकणें शक्य नाहीं; दडपशाहीमुळें निष्ठाशक्ति दृढतर मात्र होते. गेल्या दहा वर्षांत हजारों लोकांनीं आत्मसमर्पण केलेलें आहे हा ह्याच सिद्धांतांचा पुरावा आहे. तत्वासाठीं आत्मयज्ञ करणाऱ्या वीरांचें रक्त मानवी आत्म्याची प्रगतीची आकांक्षा दाखवीत आहे; हें रक्त सर्व धर्मतत्वांचें सार आहे! वीरांच्या रक्तामध्यें रुजलेल्या तत्वांचा बीमोड करतां येणें अशक्य आहे. तत्वांसाठीं आत्मार्पण हाच आजचा आमचा धर्म आहे; भविष्यकाळांत यश ठेवलेलेंच आहे!"

"ह्या कार्यासाठीं शक्तिसर्वस्व अर्पण करावयाची आमची तयारी आहे—कारण त्या कार्याची महती व पावित्र्य केवढें आहे ह्याचा आम्हांस बोध झालेला आहे. परिस्थिति अशी आहे कीं, आजच आम्हांला शस्त्रास्त्रांचा उपयोग करणें अशक्य आहे—म्हणून आज आम्ही केवळ लेखनकार्य करीत आहों. आजच्या पिढीमध्यें प्रसृत होणाऱ्या भावना व आकांक्षा संघटित करणें व त्यांमध्यें पद्धति निर्माण करणें अत्यंत अवश्य आहे; इटलीची तरुण पिढी आज पुनर्जन्म पावत आहे, इटलीच्या-राष्ट्राचा आत्मा जागृत होत आहे-अशा वेळीं पावित्र्य अत्यंत अवश्य आहे; दास्यबुद्धि व हीन मनोविकार ह्यांचा आपण त्याग केला पाहिजे."

"आज असें म्हणण्यांत येत आहे कीं परक्यांनीं आम्हांस शांतता दिली. रक्तानें भरलेल्या आमच्या जखमा उघड्या करून आम्ही जगाला दाखवून देऊं कीं, त्या शांततेसाठीं आम्हांला ही जबर किंमत द्यावी लागत आहे! तुरुंगांतून व गुलामगिरीच्या अंधःकारांतून, आम्हांवर होणाऱ्या जुलमाचे, आमच्या दुःखाचे व आत्मयज्ञाचे पुरावे आम्ही ओढून काढूं; आम्ही आमच्या देशवीरांच्या अस्थि जगाच्या डोळ्यांसमोर धरूं आणि सांगूं कीं, परवशतेंत चिरडल्या जाणाऱ्या लोकांत असे महात्मे उत्पन्न होतात—त्यांनीं व्यक्तिमहात्म्याकडे दुर्लक्ष केलें पण ते देशासाठीं आत्मार्पण करते झाले!"

मॅझिनीला इटलीमधून हद्दपार करण्यांत आल्यानंतर थोडक्याच दिवसांनीं चार्लस अलबर्ट हा पीडमॉटच्या गादीवर आला. तरुणपणीं हा कारबोनरी मंड-

ळीचा सभासद होता व स. १८२१ सालीं बंडवाल्यांना त्यानें बरीच मदत केली होती--पण बंडाला सुरवात होते न होते तोंच त्यानें चळवळींतून आपलें अंग काढून घेतलें होतें. त्याचीं मतें उदार होतीं व देशाबद्दलचे विचार त्याचे मनांत वरच्यावर येत असत; पण देशाच्या स्वातंत्र्यासाठीं युद्ध उभारण्याचें मनोधैर्य त्याच्यांत नव्हतें. ऑस्ट्रियाविरुद्ध फ्रान्स आपणांस मदत करणार नाहीं हें त्याला ठाऊक होतें; गनीमी काव्यानें व जनतेच्या सहाय्यानें ऑस्ट्रियाशीं लढावयाची कल्पना त्याला सपशेल नाकबूल होती. इटलीमधील एका संस्थानाचें आधिपत्य कारबोनरी मंडळीच्या एका सभासदाकडे आलेलें पाहतांच अनेक अदूरदृष्टि व कमकुवत मनाच्या इटालियनांच्या आनंदास पारावार नाहींसा झाला; त्यांना आशा उत्पन्न झाली कीं, हा उदारमतवादी राजा आपल्या मातृभूमीचे पांग खचित फेडील—पण त्याच्या अंतःकरणांत ध्येयभक्ति नव्हती, निष्ठाशक्ति नव्हती, फक्त वैयक्तिक महत्वाकांक्षा मात्र होती—ह्याचा लोकांना उमज पडला नव्हता. अशा या चार्लस अलबर्टला मॅझिनीनें एक जाहीर पत्र पाठविलें.

हें पत्र त्यानें कां पाठविलें ह्याचा पुरता खुलासा होत नाहीं. आत्मचरित्रात्मक टीपांमध्यें त्यानें म्हटलें आहे:-" स्वतःच परतंत्र असलेल्या यःकश्चित् संस्थानिकाकडून इटलीला ऐक्य, स्वातंत्र्य, सामर्थ्य व नियोजित महत्कार्याची नैतिक पात्रता प्राप्त होणें शक्य नाहीं, हें हुरळून गेलेल्या इटालियन जनतेच्या दृष्टोत्पत्तीस आणून द्यावयासाठीं मी हें पत्र लिहिलें. राजसत्तेवर त्यावेळीं माझा हल्लींपेक्षां जास्त विश्वास होता असें मुळींच नाहीं. शिवाय ह्या पत्रामुळें राजाच्या मनावर फारसा परिणाम होईल अशी आशा मला मुळींच नव्हती. वस्तुतः त्याचें कार्य कोणतें असावयास पाहिजे आणि त्या कार्यापासून तो कसा च्युत होणार आहे हें मला इटलीच्या निदर्शनास आणून द्यावयाचें होतें." ह्या आत्मचरित्रात्मक टीपा मॅझिनीनें या प्रसगानंतर सुमारें तीस वर्षांनीं लिहिल्या–त्यावेळीं आपण आपल्या लोकसत्ताक मतांपासून केव्हांहि तिळमात्रसुद्धां ढळलों नाहीं असें त्याला सिद्ध करावयाचें होतें. "हें पत्र प्रसिद्ध करण्यांत आलें म्हणून मी लोकसत्ताक मतांचा त्याग केला असें कित्येक लोकांचें म्हणणें आहे; दुसरे कांहीं लोक याच पत्राचा आधार घेऊन माझ्यावर मतांच्या विसंगतीचा आरोप करतात; पण ह्या दोन्ही पक्षांचें म्हणणें हा शुद्ध विपर्यास आहे." तें कसेंहि असो, चार्लस अलबर्टच्या राज्यारोहणामुळें स्वतः मॅझिनी थोडाबहुत हुरळून गेला होता असें मानावयास फारशी हरकत नाहीं. परिस्थि-

तीच्या अनुरोधानें प्रत्यक्ष कार्याची रूपरेखा कोणत्या प्रकारची असावी हें स्पष्ट करावयासाठीं तरुण इटलीच्या सभासदांकरितां वेळोवेळीं मार्सेलिसहून सूचना प्रसिद्ध करण्यांत येत असत. मॅझिनीचें हें पत्र प्रसिद्ध झाल्यानंतर दोनचार महिन्यांत ज्या सूचना पाठविण्यांत आल्या त्यांमध्यें, लोकसत्ता स्थापन होईपर्यंत राजसत्तेला ' संक्रमणावस्था ' या नात्यानें मान्यता द्यावयास हरकत नाहीं, असा उल्लेख आहे. शिवाय या पत्रांतील उद्गार अगदीं अंतःकरणापासून निघालेले आहेत, त्यांमध्यें कोणतेहि वकीली डावपेंच नाहींत असेंच वाचकाला वाटतें–मतांची संगति सिद्ध करावयासाठीं मॅझिनीनें केलेली वकीलीच मनाला पटत नाहीं! हें पत्र प्रसिद्ध करावयासाठीं पॅरिसच्या एका ग्रंथप्रकाशकानें मॅझिनीची परवानगी मागितली; त्याच्या ह्या विनंतीला मॅझिनीनें पाठविलेलें उत्तरः-"माझे प्रसिद्ध झालेले सर्व लेख सार्वजनिक मालकीचे आहेत; त्यांचेवरील माझे मालकी हक्क मी राखून ठेवलेले नाहींत; त्यांचा हवा तो उपयोग प्रामाणिकपणें करून घ्यावयास हवी त्यास मोकळीक आहे. आज किंवा भविष्यांतहि इटलीला स्वातंत्र्य मिळवून द्यावयाचें सामर्थ्य पोप अथवा राजेलोक यांपैकीं कोणासहि नाहीं असें माझें मत आहे. स्वातंत्र्य व राष्ट्रैक्य हीं इटलीला प्राप्त करून देऊं इच्छिणाऱ्या राजाची बुद्धि अत्यंत प्रखर असली पाहिजे–हें कार्य किती उदात्त व पवित्र आहे व तें आपणांस कोणत्या मार्गानें सिद्ध करून घेतां येईल हें विधायकरीत्या आकलन करण्याइतकी त्याची बुद्धिमत्ता प्रखर असली पाहिजे; या कार्यांत कोसळणाऱ्या संकटांना तोंड द्यावयासाठीं त्याचे अंगीं धाडस असलें पाहिजे; अंगीकृत कार्याला विरोधी असणारे नात्यागोत्याचे व स्नेहसंबंधाचे सर्व पाश तोडून टाकण्याइतका कठोरपणा त्याच्या ठिकाणीं असला पाहिजे; आपलें जीवनच वेगळ्या प्रकारचें आहे, ऐषआरामांत लोळावयासाठीं नाहीं हें त्यानें जाणलें असलें पाहिजे; आपल्या भोंवतालच्या हलकट व भेकड राजकारस्थानांचे तावडींत न सांपडण्याइतकी चतुरता त्याचे ठायीं असली पाहिजे; सध्यां हातीं असलेल्या सत्तेवर ध्येयासाठीं पाणी सोडावयास त्यानें सिद्ध असलें पाहिजे; त्याची नीति अत्यंत उच्च दर्जाची असली पाहिजे. त्यावेळीं चार्लस अलवर्ट तारुण्याच्या ऐनभरांत राज्यासनावर आला; त्यावेळीं आशेनें स्फुरण पावणाऱ्या इटलीच्या अंतःकरणांतील विचार मी व्यक्त करून दाखविले होते. ता. २७ एप्रिल १८४७." हें पत्र दुहेरी महत्वाचें आहे. इटलीला म्हणजेच मॅझिनीला चार्लस् बद्दल आशा वाटत होती हें यावरून दिसून येतें; त्याचप्रमाणें इटलीला

स्वातंत्र्य व राष्ट्रैक्य मिळवून देणारा राजा कोणत्या हिंमतीचा व किंमतीचा असला पाहिजे याबद्दल मॅझिनीचे विचारहि त्यामध्यें वाचावयास सांपडतात. असा राजा पुढें चार्लस अलबर्टच्याच पोटीं आला व त्यानें इटलीच्या पुनरुद्धाराची सांगता केली.

चार्लसला लिहिलेलें पत्र मॅझिनीनें आपल्या एका मित्राला दाखविलें; तें प्रसिद्ध झाल्यास मॅझिनीला जन्मठेप हद्दपारीची शिक्षा होईल आणि जीवनांत जें जें प्रेममय असतें त्याचा आजन्म वियोग होईल; म्हणून तें प्रसिद्ध करूं नये असा त्याचा अभिप्राय पडला. पण केवळ " सार्वजनिक हितार्थ मीं तें प्रसिद्ध केलें. हें पत्र हा माझा पहिलाच महत्वाचा राजकीय लेख होय. " त्यामध्यें पहिल्या लेखांतील सर्व गुणदोष आहेत. कांहीं ठिकाणीं चार्लसची अवास्तव स्तुति केलेली आहे तर कोठें कोठें त्याला धमकावणीहि दिलेली आहे. युरोपच्या राजकारणाचे सर्व धागेदोरे आपणांस अवगत झालेले आहेत, इटालियन जनतेच्या वतीनें बोलावयाचा अधिकार आपणांस आलेला आहे अशा रोखांत या तरुण हद्दपारानें हें पत्र लिहिलें आहे असें वाटतें. राष्ट्रकार्यासाठीं चार्लसचें चैतन्य जागृत करणें तर बाजूलाच राहिलें पण मॅझिनी व पीडमॉंटचें राजघराणें यांचेमध्यें या पत्रामुळें हाडवैर मात्र उत्पन्न झालें ; तरीहि याच पत्रामुळें इटालियन जनतेच्या अंत:करणांतील राष्ट्रधर्माचा अग्नि अधिकच प्रज्वलित झाला; आणि याच पत्रामुळें पीडमॉंटच्या राजघराण्याकडे इटालियनांचें लक्ष वेधलें. या पत्रामध्यें दाखविलेला मार्ग यशस्वी व्हावयास युरोपमधील राजकारणाची परिस्थिति अनुकूल नव्हती व हें कार्य अंगावर घेण्याची चार्लसची पात्रताहि नव्हती. पुढें इटलीचें ध्येय ज्या मार्गानें सिद्ध झालें त्या दृष्टीनें मात्र हें पत्र बिनमोल आहे.

कारबोनरी मंडळीचा एक सभासद राज्यासनावर आल्यामुळें इटालियन जनतेला अति उत्साह वाटत आहे अशी प्रस्तावना करुन मॅझिनी या पत्रांत म्हणतो " पूर्वीं संधि आली होती त्यावेळीं आपण आपल्या मनाप्रमाणें वागण्यास स्वतंत्र नव्हता. आतां तशीच संधि पुन्हां आलेली आहे व आपणहि स्वतंत्र आहां. आपण राज्याधिष्ठित झालां ही बातमी ऐकून ज्याचें हृदय उचंबळलें नाहीं असा इटालियन मनुष्य आढळणें शक्यच नाहीं ! आपल्या कारकीर्दीच्या आरंभीं लोक आपलें स्वागत इतक्या उत्साहानें करीत आहेत हें पाहून आपण हुरळून मात्र जाऊं नये ! लोक आनंद प्रदर्शित करीत आहेत—कारण

त्यांच्या आशा सिद्धीस न्यावयास आपण तयार आहांत अशी त्यांची कल्पना आहे." यापुढें युरपमधील राजकीय परिस्थितीचें विवेचन केलेलें आहे. "आज युरपमध्यें दोन तट पडलेले दिसून येतात. सत्ता व हक्क यांचेमध्यें झटापट चाललेली आहे. आपण वळकावलेल्या सत्तेला बाध येऊं नये म्हणून राजेलोक हरप्रयत्न करीत आहेत; लोकहि आपले हक्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहेत; या दोन तटांमध्यें केव्हां युद्ध जुंपेल याचा नेम नाहीं. रक्तस्रावामुळेंच रक्तपाताची इच्छा उत्पन्न होते! आत्मार्पण केलेल्या धर्मवीरांच्या रक्तांत बुडविल्यानें अधिक तीक्ष्ण झालेल्या कटवाल्याच्या कट्यारीइतकें भयंकर हत्यार दुसरें कोणतेंहि नाहीं!" पुढें इटलींतील इतर संस्थानिकांची स्थिति वर्णन करून मॅझिनी म्हणतो, "महाराज, खरी शक्ति व अजरामर कीर्ति संपादण्याचा मार्ग दुसराच आहे; ऑस्ट्रिया आणि फ्रान्स यांपेक्षां जास्त इमानाचा व अधिक समर्थ असा दुसरा सहाय्यकर्ताहि आपणांस मिळूं शकेल. पीडमॉट संस्थानच्या यःकश्चित् मुकुटापेक्षां अधिक देदीप्यमान व उदात्त असा दुसरा एक राजमुकुट आहे; ज्या कोणाचे अंगीं धाडस असेल त्यालाच तो प्राप्त होईल; त्याच्या प्राप्तीसाठीं आत्मार्पणाची सिद्धता असली पाहिजे; जुलमाच्या हलक्या वर्तनानें त्याच्या उज्वलतेला कालिमा येईल-म्हणून तो प्राप्त करून घेऊं इच्छिणारानें असले विचारहि मनांत आणतां कामा नये. महाराज, आपण आपल्या मातृभूमीकडे एकदां तरी प्रेमाच्या नजरेनें पाहिलें आहे काय? सौंदर्यसंपन्नतेमुळें सस्मित दिसणारी, दोन हजार वर्षांच्या उदात्त कृतींनीं वैभवपूर्ण झालेली, बुद्धिवंतांनीं परिपूर्ण, साधन सामुग्रीनें समृद्ध, अभेद्य सरहद्दींनीं वेष्टिलेली अशी ही इटली! आपल्या मातेचा अपमान करावयास उद्युक्त झालेल्या परकीयांपासून तिचें संरक्षण करावयास तिच्या वीरपुत्रांनीं आघाडीस सरसावून यावें-याशिवाय इटलीला कशाची वाण आहे? महाराज, आपण राष्ट्राचे अग्रस्थानीं अधिष्ठित व्हा, "ऐक्य आणि स्वातंत्र्य" हा दिव्य मंत्र आपल्या निशाणाच्या शिरोभागीं स्थापन करा; अनार्य परकीयांपासून मातृभूमीला आपण मुक्त करा, इटलीच्या स्वातंत्र्याचे आपण नेपोलियन व्हा...आम्ही जनतेच्या हक्कांचें संस्थापन करणार आहों व इटलीला पुनरुज्जीवन प्राप्त करून देणार आहों, असें तुम्ही एकदां जाहीर मात्र करा-कीं तुम्ही शककर्ते मानले जाल!-हें युग तुमच्याच नांवानें ओळखलें जाईल! आपण हें कार्य हातीं घ्याल तर आम्ही सर्व

जण आपणांभोंवतीं जमूं, आपणांसाठीं प्रसंगीं प्राणांचीहि पर्वा करणार नाहीं आणि संपूर्ण इटली आपल्या ताब्यांत येईपर्यंत आम्हीं आपल्या नेतृत्वाखालीं कार्य करूं...इटलीचे बुद्धिमान्, शूर व निःस्वार्थी तरुण तुमच्या भोंवतीं जमा होतील; जनतेमध्यें आपल्या हेतूंबद्दल व मार्गांबद्दल विश्वास उत्पन्न करा—मग ह्या स्वतंत्र नागरिकांच्या साह्यानें तुम्हांला हव्या त्या कार्यांत यश येईल...नुस्त्या सवलती देऊन सुधारणेचें कार्य सुरूं केल्यानें आतां जनतेची तृप्ति होणार नाहीं; मनुष्याच्या जन्मसिद्ध हक्कांना मान्यता मिळावी अशी त्यांची इच्छा आहे; शेंकडों वर्षांपासून ते ह्या हक्कांना पारखे झाले आहेत; ते नैसर्गिक हक्क आतां त्यांना परत पाहिजे आहेत. इटलीचे आज तुकडे तुकडे पाडण्यांत आले आहेत, समाज विस्कळित झालेला आहे, जुलमानें जनता गांजून गेली आहे; त्यांना स्वदेश नाहीं, झेंडा नाहीं, परक्यांनीं त्यांना गुलाम म्हणावें आणि तें त्यांनीं ऐकून घ्यावें असे दिवस आज आले आहेत! स्वतंत्र देशांतील लोकांनीं इटलीमध्यें आनंद करावयास यावें व जातांना 'मेलेल्या माणसांचा देश' असा शेरा ठोकावा, हें पाहण्याचें आमच्या नशीबीं आहे ! इटालियन लोकांनीं गुलामगिरीचा पेला तळच्या गाळासुद्धां पिऊन टाकला आहे; मात्र तो पुन्हां कधींही हातीं न घ्यावयाची त्यांनीं प्रतिज्ञा केली आहे!...महाराज, आपण तरवार एकदां म्यानांतून बाहेर काढा आणि तें म्यान दूर भिरकावून द्या म्हणजे तुमच्या जीवास कशाचेंहि भय राहणार नाहीं...मात्र या कार्यास आपण आरंभ करणार नाहीं तर तेंच कार्य हातीं घ्यावयास इतर लोक सज्ज झालेले आहेत, त्यांना आपल्या कार्याला आरंभ करावा लागेल ! मग त्यामध्यें तुम्ही त्यांना मिळा अगर विरोध करा, त्याची बिलकुल पर्वा न करतां हे लोक आपलें कार्य खास पार पाडतील—कारण त्यांचें कार्य परमेश्वराच्या योजनेला धरून आहे !...परमेश्वराचा स्वातंत्र्यलेख पुसून टाकावयाचें सामर्थ्य कोणत्या मानवी सत्तेला आहे ? इटलीच्या सुपुत्रांमध्यें अग्रस्थान मिळविणें अथवा इटलीवर राज्य करणारा शेवटचा जुलमी राजा म्हणवून घेणें ह्या दोनहि गोष्टी आज तुमच्या हातांत आहेत ! ह्या दोन मार्गांपैकीं एकाचा स्वीकार करा. स्वातंत्र्यासाठीं उत्सुक असलेल्या लोकांची तुमच्या कृतीवर नजर आहे !"

हें पत्र १८३१ च्या मे किंवा जून महिन्यांत मार्सेलिस येथें प्रसिद्ध झालें. त्याच्या प्रती इटलीमधील सर्व प्रमुख लोकांच्या पत्यावर पाठविण्यांत आल्या.

इटलींतील गुप्त छापखान्यांमध्यें त्याच्या हजारों प्रती काढण्यांत आल्या. खुद्द चार्लस् अलबर्टच्या हातांत या पत्राची एक प्रत गेल्याबद्दल मॅझिनीला पुरावा मिळाला होता; तें कसेंहि असो, निदान पोलिसांच्या हातांत तें पत्र पडलें; सरहद्दीच्या आंत पाऊल घालतांच मॅझिनीला गिरफदार करावें असा पीडमाँट संस्थानातर्फे हुकूम काढण्यांत आला. या पत्राचा राजावर असा विपरीत परिणाम झालेला पाहून पीडमाँट संस्थानांत उठावणी करण्याचा बेत मॅझिनीनें मुक्रर केला. ही उठावणी करून मॅझिनीला चार्लस अलबर्टचा सूड घ्यावयाचा नव्हता; स्वातंत्र्यासाठीं इटालियन जनता किती उत्सुक आहे व आत्मार्पणास सिद्ध आहे हें त्याला जगाच्या निदर्शनास आणून द्यावयाचें होतें.

प्रथम पीडमाँट संस्थानच्या सरकारी सैन्यानें उठावणी करावी व क्रांतीला थोडेंबहुत यश येतांच बंडाचें नेतृत्व स्वीकारण्याची चार्लसला विनंति करण्यांत यावी, राजानें नेतृत्व नाकारल्यास जिनोआ येथें तात्पुरतें सर्वाधिकारी-मंडळ नेमण्यांत यावें, मंडळानें सर्व अधिकार स्वाधीन करून घ्यावे आणि क्रान्तीचें काम नेटानें पुढें चालवावें असा मॅझिनीचा बेत होता; हा बेत यशस्वी होईल अशी बरींच चिन्हें दिसत होतीं. तरुण इटलीचे सर्व सभासद उठावणीचीच वाट पहात होते. संस्थानच्या नोकरींत असलेल्या सैनिकांच्या मनांत पूर्वींच्या उठावणीची आठवण अजून ताजी होती, त्यांचेपैकीं बरेच सैनिक लोकसत्तावादी होते; त्यांचेपैकीं बऱ्याच लोकांनीं नेपोलियनच्या नेतृत्वाखालीं ऑस्ट्रियाचा पराभव केलेला होता—ह्या जुन्या शत्रूचा पुरता नायनाट करावयाची खुमखुमी अजून त्यांच्या मनगटांत होती; बहुतेक सर्व सैनिक उठावणीला सामील होते. सैन्यांतील कांहीं वरिष्ठ अधिकारी बंडाच्या बेतास अनुकूल होते आणि थोडी फार सुरवात होतांच बंडखोरांना मिळण्याचें त्यांनीं अभिवचन दिलें होतें.

प्रजेमध्यें उठावणीची तयारी चाललेली आहे ही गोष्ट सरकारास पुरतेपणीं कळली होती; धाकदपटशानें अथवा लांचलुचपतीनें या कटाचे धागेदोरे हस्तगत करून घ्यावयाचा प्रयत्न त्यांनीं फार कुशलतेनें, धिमेपणानें व नेटानें चालविला होता. कटाचे कोणतेहि कागदपत्र इटलींत आणणारास जबर शिक्षा देण्यांत येईल, कटाची बातमी देण्याचें जे लोक नाकारतील त्यांस वाटेल तेवढा दंड आणि सजा देण्यांत येईल, बातमी देणारास बक्षीस मिळेल व त्याचें नांवहि प्रसिद्ध केलें जाणार नाहीं असे जाहीरनामे वेगवेगळ्या संस्थानिकांनीं काढले.

* मी आणि इटलींतील राजे यांजमध्यें जी लढाई जुंपली तिचा हा प्रारंभ होय.'—

मात्र आपल्या सैन्यांतच फंदफितुरी माजली आहे अशी कल्पना त्यांना स्वप्नांतहि आली नव्हती म्हणूनच १८३३ च्या आरंभालाच बंडाला धडाडीनें सुरवात करण्यांत आली असती तर तें यशस्वी झालें असतें.

पण सर्व प्रकारची संघटना करण्यांतच फार वेळ निघून गेला आणि ही संघटना पूर्ण होत आहे तोंच विधिघटनेनुसार हा सारा कट एकदम उघडकीस आला. "तोफखान्यावरील दोघां शिपायांत खासगी तंटा झाला. यांपैकीं एक तरुण-इटलीचा सभासद होता व तो दुसऱ्याचें मन वळवीत होता. तंटा विकोपाला गेला तेव्हां तुझें सारें गुपित फोडून तुझ्या प्राणावर बेतवणें माझ्या हातीं आहे अशी एकानें दुसऱ्यास दहशत घातली! लगेच पोलीस सावध झाले व गुप्तस्फोटाला आरंभ झाला" हें कळतांच एकदम उठावणी करण्याबद्दल मॅझिनीनें निरोप पाठविला; एकतर हा निरोप स्थानिक पुढाऱ्यांना पोंचला नाहीं किंवा त्याकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें किंवा संशयामुळें त्यांचा निश्चय झाला नाहीं; उठावणी झाली नाहीं. सरकारनें अत्यंत कडकपणानें चवकशीला सुरवात केली. संशयावरून पकडलेल्या कैद्यांनीं सर्व तुरुंग गच्च भरून गेले. कटाची व कटवाल्यांची नक्की बातमी हातीं येतांच सरकारनें अत्यंत क्रूरपणानें जनतेवर सूड घेतला.

सर्वच राजे या कटामुळें भेदरून गेले होते. भीतीचें कारण पुढें आलें असतां भेकड मनुष्य एकदम क्रूर बनतो, आपली शरम तो सूडाच्या भीषणतेमुळें झांकून टाकूं पाहतो- तसें ह्या राजांनीं केलें. चार्लस अलबर्टहि ह्या प्रकारामुळें भेदरून गेला होता; त्याचे अंतःकरणांतील दयामाया—काय, त्याची माणुसकीहि नष्ट झाली होती. इतर राजांबरोबर त्यानेंहि आपली सूडाची तहान क्रांतिकारकांच्या रक्तानें भागवून घेतली.

ह्या प्रकरणाची चौकशी करण्याकरितां ट्यूरिन येथें एक स्पेशल कोर्ट उघडण्यांत आलें. ह्या कोर्टाला लष्करांतील सैनिकांची तशीच नागरिकांचीहि चौकशी करण्याचा अधिकार देण्यांत आला. मूलतःच बेकायदेशीर अशा या कोर्टानें सत्ताधाऱ्यांची रक्ताची तृषा शांत केली. जे न्यायाधीश विशेष कडक शिक्षा देत त्यांना विशेष मानाच्या पदव्या अर्पण करण्यांत आल्या; शिक्षा ठोठावण्याच्या कामांत कुचराई करणाऱ्या न्यायाधीशांना अनेक प्रकारांनीं वठणीवर आणण्यांत आलें! कायद्याचा पाठिंबा असलेल्या गुन्हेगारांचीं हीं भयंकर कृत्यें पाहून युरपची छाती फाटून गेली. चार्लस अलबर्ट तर यावेळीं इतका पिसाळला होता

कीं हलक्यासलक्या गुन्हेगारांनांच शिक्षा होत आहे हें पाहून त्यानें न्यायाधीशांना व पोलिसांना सुचविलें कीं वरिष्ठ दर्जाच्या माणसांना फांसावर चढविण्याकडे जास्त लक्ष द्या—त्यानें मला जास्त बरें वाटेल ! चार्लस अलबर्टचीं या वेळचीं कृत्यें इटलीच्या इतिहासास कालिमा आणतील इतकीं नीचपणाचीं होतीं.

केवळ संशयावरून धरलेल्या लोकांचे अनन्वित हाल करण्यांत आले. कित्येकांना कबुलीजबाबासाठीं लालूच दाखविण्यांत आली; कबुली द्यावी म्हणून कैद्यांची विनवणी करण्याकरतां त्यांच्या घरचीं मुलेंमाणसें तुरुंगांत आणण्यांत आलीं. कित्येकांना मादक द्रव्यें पाजून धुंदींत त्यांचेकडून कबूली घेण्यांत आली. धरपकडीमुळें उठावणी होणें अशक्य आहे हें पाहून कटवाल्यांना भयंकर शिक्षा ठोठावण्यांत आल्या. आपल्या मित्रांना तरुण–इटलीमधील लेख वाचून दाखविले या आरोपासाठीं एका हवालदाराला फांशीची शिक्षा फर्मावण्यांत आली; दुसऱ्या एकाला या कटाची माहिती होती—त्यानें ह्या बेताबद्दल सैन्यांत तिरस्कार उत्पन्न करण्याचा यत्न केला नाहीं म्हणून त्याला फांशीं देण्यांत आलें ! ह्या कमालीच्या क्रूरतेची आणखी किती वर्णनें सांगावीं ! " पण या जुलमाला जे लोक बळी पडले त्यांच्याच स्मृतीनें इटलीचें ध्येय पवित्र राहिलें ! " कारण " धर्मासाठीं आत्मार्पण करणाऱ्या धर्मवीरांच्या रक्तानेंच ध्येयांची पूर्तता होत असते ! " हा जुलूम झाला म्हणूनच इटलीनें स्वातंत्र्यासाठीं घनघोर युद्ध केलें.

ह्या सर्व राक्षसी प्रकारांपैकीं मॅझिनीच्या काळजावर घाव घालणारा प्रसंग म्हणजे जाकोपो रफीनीची आत्महत्या हा होय. जाकोपो रफीनी व जोसेफ मॅझिनी ह्यांची मैत्री अत्यंत निकट व जिवाभावाची होती. " त्याच्या निष्कलंक जीवनाची मला पूर्ण माहिती आहे. त्याचें मन फारच कोवळें होतें आणि त्याचे मनोविकार सूक्ष्मचेतन असत. त्याचे मनांत व्यक्तींबद्दल आदर फारच क्वचित असे पण मनुष्यजातीबद्दल त्याला फार पूज्यबुद्धि होती. प्रगतीचें तत्व त्याच्या अंतःकरणांत इतिहासाच्या अभ्यासानें स्वयंस्फूर्तीनेंच उद्भूत झालें होतें. जगतांत नीतिमत्तेचा अभाव आहे हें पाहून तो सदैव उदासीन असे, तरीहि तो सदैव शांत असे. आत्मार्पणाला सज्ज झालेल्या वीराच्या मुखावर जसें स्मित असतें तसेंच स्मित त्याच्या मुखश्रीवर सदैव विलसत असे. कर्तव्यपूर्तीमध्येंच आयुष्याचा व्यय केला पाहिजे, सुखामध्यें नव्हे, असा त्याचा दृढभाव होता. सरकार आपणांस पकडणार आहे अशी बातमी

त्याला अगोदरपासूनच लागली होती, पण त्यानें पळून जाण्याचा अगर छपून राहण्याचा प्रयत्न केला नाहीं. तो शांतपणानें विधीच्या विलसिताकडे स्मित-पूर्वक पहात राहिला. " जाकोपोला जिनोआ येथें कैदखान्यांत ठेवण्यांत आलें होतें; त्यानें शरण यावें म्हणून त्याचे अनन्वित हाल करण्यांत आले; त्याला कितीतरी दिवस अन्नावांचून ठेवलें होतें, कितीतरी दिवस अधिकाऱ्यांनीं त्याला झोंपहि घेऊं दिली नाहीं ! " तुरुंगांत त्याला हजारों आडवे तिडवे प्रश्न विचारण्यांत आले; पण त्या सर्व प्रश्नांना त्यानें सस्मित मुखानें उत्तरें दिलीं ! कटवाल्यांच्या यादीखालीं माझी सही असलेलें एक बनावट पत्र अधिकाऱ्यांनीं त्याच्या पुढें ठेवलें; रफीनीला धरावा असा मजकूर त्या पत्रांत होता व माझी सहीसुद्धां अगदीं हुबेहूब होती. त्याचा माझ्यावर इतका विश्वास होता कीं त्या पत्रामुळें स्वत:वर देखील विश्वास ठेवावा असें त्याला वाटेना ! संशयामुळें स्वत:-कडून स्वत:चीच फसवणूक होईल म्हणून संशय उत्पन्न व्हावयाचे अगोदरच त्यानें आपल्या कोठडीच्या दाराचा खिळा उपटला व तो त्यानें आपल्या छातींत ठोंकून घेतला व तो आपलें जीवन स्वातंत्र्यदेवतेच्या हवालीं करता झाला—स्वदेशासाठीं देहत्याग करून तो चिरंजीव झाला ! ... वाहत्या रक्तांत बोट बुडवून मरतां मरतां त्यानें आपलें मृत्युपत्र शेजारच्या भिंतीवर लिहून ठेवलें—' मी इटलीच्या अपमानाचा सूड घ्यावयासाठीं मरण स्वीकारलें ! माझ्या मरणाचा सूड इटलीनें घ्यावा ! '... आत्महत्या हें पातक आहे; परमेश्वराच्या परवानगीशिवाय जगांतून पळून जाण्यासारखें आहे, फांशीइतकें निंद्य पातक आहे—पण जाकोपोची आत्महत्या हा अत्यंत पवित्र आत्मयज्ञ आहे ! त्याचा आत्मा अत्यंत निर्मल होता—त्या पवित्र शुभ्रतेवर एकहि कलंक यावयाचे अगोदर तो आत्मा ब्रम्हपदीं लीन झाला ! डोंगरावर एका ठिकाणीं कोमल लीली फुलांचा एक ताटवा आहे; त्याची श्वेतता, नाजूकपणा आणि कोमल सुगंध यांचें आम्हीं दोघांनीं अनेक वेळां कौतुक केलें आहे; त्या फुलांची आठवण होतांच रफीनीची मूर्ति माझ्या अंतश्चक्षूंसमोर उभी रहात असे; त्या फुलांसारखाच तो पवित्र व नम्र असे; देठांवर किंचिन्मात्र कललेलीं तीं थरथरणारीं लिली फुलें ! माझ्या जाकोपोची मान विनयानें तशीच खांद्याकडे लवलेली असे ! ... स्वदेशाविरुद्ध पातक करण्यापेक्षां स्वत:विरुद्ध केलेल्या आत्महत्येच्या या पातकाची दयासागर परमेश्वर तुला पूर्ण क्षमा करील ! "

या भयंकर प्रकारांची बातमी लागल्यावर सर्व देशभक्तांच्या अंत:करणांत मोठी खळबळ उडाली. एक प्रयत्न फसला, दुसरा प्रयत्न जास्त नेटानें केला पाहिजे अशीच मॅझिनी व त्याचे सहकारी यांची निष्ठा होती. राज्यक्रांतीचीं तत्वें लोकांना मान्य झालीं होतीं पण त्या तत्वांच्या विजयासाठीं अवश्य तो स्वार्थत्याग व नेट मात्र अझून राष्ट्रामध्यें उत्पन्न झाला नव्हता. बंडाच्या तयारीच्या मानानें राज्यकर्त्यांना फारच थोडा शोध लागलेला होता. कटवाले फांशीं जात आहेत, पकडले जात आहेत, त्यांचेवर अनन्वित जुलूम करण्यांत येत आहेत, या प्रकारांच्या अनिश्चित बातम्यांमुळेंच इटलीचा क्रान्तिकारक पक्ष विस्कळित झाला होता. त्यांना धीर यावा म्हणून मॅझिनीनें गर्जना केली, "इटालियन लोकांनों, निर्वाणीचा समय आलेला आहे—पीडमाँटमधील देशभक्तांच्या तोडीचें रक्त आपल्या धमन्यांमधून वहात आहे हें सिद्ध करावयाचा समय आलेला आहे!" मॅझिनीनें इटलींतील लोकांना वचन दिलें होतें कीं, आम्ही सर्व हद्दपार मिळून इटलीच्या सरहद्दीवर बंड उभारूं; हें वचन पाळणें आपलें कर्तव्य आहे असें ठरवून ही हद्दपार मंडळी उठावणीच्या तयारीला लागली.

मध्यंतरीं (१८३२ ऑगस्ट) फ्रेंच सरकारनें त्याला हद्दपार व्हावयाचा हुकूम केला. लुई फिलिपचा फ्रान्सच्या गादीवरील हक्क युरोपांतील राजांनीं कबूल केला होता; आतां त्याला इटालियन संस्थानिकांबरोबर स्नेहसंबंध जोडावयाचा होता. इटालियन संस्थानिकांनीं विनंति करतांच त्यानें हद्दपारीचे हुकूम काढले. मॅझिनीच्या मित्रांनाहि हद्दपारीचा हुकूम करण्यांत आला होता; इकडे त्याचा छापखानाहि सरकारनें जप्त केला. इटलीबरोबर दळणवळण राखण्याची सोय मार्सेलिस येथें उत्तम प्रकारची होती, अशी सोय दुसरीकडे करविणें फारच त्रासाचें होतें; तेथें त्याचे स्नेही त्याला मदत करावयास तयार होते; म्हणून कायदेभंग करून मॅझिनी मार्सेलिसलाच एका फ्रेंच ग्रहस्थाचे घरीं गुप्तपणानें राहिला; एक गुप्त छापखाना सुरू करून त्यानें आपलें कार्य पूर्ववत् चालू ठेवलें होतें. "येथून माझ्या गुप्त आयुष्याला आरंभ झाला. आपखुषीच्या अज्ञातवासांत आयुष्याचीं तीस वर्षें मी काढलीं. रात्रंदिवस एकाद्या कोठडींत मी गाडलेला असे. माझ्या तपासासाठीं झडती व्हावयाची असेल तर ती बातमी अगोदरच मला कळावी अशी व्यवस्था करून ठेवलेली होती. एका वेळीं मला पकडावयास आलेल्या लोकांनीं माझ्याच तोंडवळ्याचा एक मनुष्य मोठ्या डौलानें पकडला आणि

पोलिसांच्या रांगेमधून मी राजरोसपणें निघून गेलों! अशीं अनेक संकटें मजवर आलीं; तरीहि एक वर्षभर मी मार्सेलिसलाच राहिलों. ”

हद्दपारीच्या हुकमानें ही व्याद टळत नाहीं हें पाहून फ्रेंच सरकारनें मॅझिनीची बेअब्रू करावयाचा बेत केला. मॉडेनाच्या ड्यूकचे दोन हेर बातमी काढावयासाठीं इटालियन हद्दपारांत मिसळले होते. कांहीं बोलाचाली होऊन स. १८३३ मे ३१ रोजीं भर दोनप्रहरीं भररस्त्यांत रोडेझ येथें तंटा झाला, त्यांत ते दोघेहि मारले गेले. जून आठच्या मॉनिटरच्या अंकांत बिनसरकारी विभागांत एक पत्र छापण्यांत आलें. एका गुप्त क्रान्तिकारक मंडळाचा अध्यक्ष मॅझिनी यानें त्या हेरांना ठार मारण्याबद्दल त्या पत्रांत फर्मावलें होतें. त्यावेळीं मॅझिनी अज्ञातवासांत होता म्हणून सरकारवर बेअब्रूची फिर्याद करणें अशक्य होतें. मॅझिनी हा खुनाला उत्तेजन देणारा गुन्हेगार आहे असा गैरसमज लोकांमध्यें पसरवून, त्याचेबद्दल लोकांना वाटणारी सहानुभूति नष्ट करवून, लोकांकडून त्याला परस्पर कैद करवावें, हा सरकारचा डाव मॅझिनीच्या मित्रांनीं तेव्हांच ओळखला. त्या पत्राची भाषा अगदींच अडाणी–मॅझिनीसारख्या सुशिक्षित मनुष्याला लिहितांसुद्धां येणार नाहीं इतकी अडाणी होती. हें पत्र बनावट आहे, छाती असल्यास सरकारनें मूळ पत्र पुढें आणावें असें जाहीर आव्हान Gazette des Tribuneaux पत्रांत प्रसिद्ध करण्यांत आलें.[1] अर्थातच या बाबतींत फ्रेंच सरकारला माघार घ्यावी लागली.[2]

---

१. ह्या पत्रांत मॅझिनीनें पुढील विचार प्रकट केले होते. “ स्वदेशाला स्वातंत्र्य प्राप्त व्हावें यासाठीं प्रयत्न करणें हा जर गुन्हा असेल तर तो गुन्हा मी केलेला आहे! स्वातंत्र्याचीं तत्वें लोकांना समजावून देणारास जर तुम्हीं कटवाला म्हणत असाल तर मी कट करण्याचा गुन्हा केलेला आहे! गुलामगिरींत जिवंत राहण्यापेक्षां स्वातंत्र्यसाधनांत आत्मार्पण करा–असा आपल्या देशबांधवांना उपदेश करणें हा जर राजद्रोह असेल तर हा गुन्हा मी केलेला आहे!–आणि मी जाहीर करतों कीं, हे गुन्हे मी आजन्म करीत राहीन! ”

२. १८४० मध्यें फ्रेंच पोलिस खात्यांतील एका अधिकाऱ्यानें आपल्या आठवणी प्रसिद्ध केल्या–त्यामध्यें हा खुनाला उत्तेजन देण्याचा आरोप त्यानें फिरून ताजा केला, मॅझिनीनें त्याच्यावर बेअब्रूची फिर्याद केली. ( १८४१

या अज्ञातवासांत मॅझिनीला जिनोआची भयंकर बातमी समजली, पण आपलें दुःख आंवरून मॅझिनी उठावणीच्या तयारीसाठीं स. १८३३ जुलैमध्यें जिनीव्हा येथें रहावयास गेला.

जिनीव्हा प्रांत इटलीच्या सरहद्दीला अगदीं लागून आहे, शिवाय तेथील वजनदार मंडळींची मॅझिनीच्या कार्याशीं सहानुभूति होती. पीडमाँट संस्थानांत जुलमाचा कहर उसळला होता व लोक उठावणी करण्यास उत्सुक झाले होते. चार्लस अलबर्टला त्याच्या राक्षसी रक्ततृष्णेबद्दल जबर शिक्षा मिळाली पाहिजे असेंहि मॅझिनीला वाटत होतें; झालेल्या जुलमानें आपल्या पक्षाच्या सामर्थ्याला यत्किंचितहि धोंका पोंचलेला नाहीं असें दाखवून देऊन तरुण इटलीचें सामर्थ्य वाढवावयाचीहि त्याची इच्छा होती. युरपभर खळबळ उडालेली आहे, लोकसत्ता प्रस्थापित करावयास जनता सर्वत्र उत्सुक झालेली आहे आणि अशी संधि कदाचित् पुन्हां कधींच प्राप्त होणार नाहीं, म्हणूनच मॅझिनीनें बंडाचा बेत मुक्रर केला. युरोपांतील जनता उठावणीला उत्सुक आहे असें त्याला नेहमींच वाटत असे; त्याची ही कल्पना सत्याला सोडून होती असें मुळींच नव्हे; पण जनतेच्या उत्साहांत हिंमत कितपत आहे ह्याचा अजमास त्याला केव्हांहि नीटपणें करतां आला नाहीं.

सॅव्हॉयवर स्वारी करावयासाठीं स. १८३३ सालीं स्वित्झरलँडमध्यें अनेक हद्दपार एकत्र झाले—जर्मन, पोलिश, फ्रेंच वगैरे सर्व देशींचे हद्दपार तेथें जमले होते. प्रथम सॅव्हॉय प्रांताला स्वातंत्र्य मिळवावयाचें, नंतर बहुमताच्या निर्णयानें सॅव्हॉय प्रांतानें हव्या त्या देशामध्यें सामील व्हावें, असा हद्दपारांचा मार्ग होता. सॅव्हॉयनें स्वित्झरलँडमध्यें सामील व्हावें, असें मॅझिनीला वाटत होतें. स्वित्झरलँडचें सामर्थ्य वाढल्यास फ्रान्स, इटली व जर्मनी यांचेमधील लढयास आळा बसेल व स्वित्झरलँडकडून युरपखंडांत शांतता प्रथापित करवितां येईल अशी त्याची कल्पना होती. युरपमधील लोकसत्ताक राष्ट्रांनीं "अभिनव युरप" संघ स्थापून युरपचा उद्धार करावा ही कल्पना मॅझिनीच्या मनांत याच वेळेपासून यावयास लागली. "इटली स्वतंत्र होतांच युरपच्या स्वातंत्र्यसाधनाचें

एप्रिल ). पोलिस अधिकाऱ्यानें जबानींत सांगितलें-जगांत अनेक मॅझिनी आहेत-मॅझिनी म्हणजे जोसेफ मॅझिनीच नव्हे ! या मुद्यावर खटला सोडण्यांत आला. इंग्लंडांत सर जेम्स ग्रॅहॅमनें हाच आरोप फिरून एकदां मॅझिनीवर केला होता—पण त्याला शेवटीं भर पार्लमेंटांत जाहीर माफी मागावी लागली !

२२५०

नेतृत्व ती आपलेकडे घेईल–इटली जगाच्या स्वातंत्र्याची व लोकशाहीच्या विजयाची पताका होणार " व फ्रान्सनें अपुरें ठेवलेलें कार्य पुरें करणार असें मॅझिनीच्या कार्याचें ध्येय याचवेळीं स्पष्ट होऊं लागलें होतें.

सॅव्हॉयवरील स्वारीच्या सैन्याची व्यवस्था पाहणाऱ्या मंडळींना वाटत होतें कीं, स्वारीचें नेतृत्व एखाद्या नाणावलेल्या योध्याला अथवा जबाबदार मनुष्याला देण्यांत यावें–तरच आपणांस यश येईल ! खुद्द सॅव्हॉयमधील बंडवाले तर हट्ट धरून बसले होते कीं, स्वारीचें नेतृत्व जनरल रॅमोरिनो यासच देण्यांत यावें ! ह्या रॅमोरिनोचा जन्म सॅव्हॉय प्रांतांतच झाला होता. शिवाय जनतेमध्यें त्याचें वजनहि बरेंच होतें; नेपोलियनच्या लष्करांत त्यानें कांहीं दिवस नोकरी केली होती आणि स. १८३१ च्या पोलंडमधील बंडांत त्यानें बरेंच महत्वाचें काम केलेलें आहे अशी अफवा होती. प्रांतिक अभिमानाला बळी पडून त्याला या स्वारीचें नेतृत्व द्यावयाबद्दल लोकांनीं धरलेल्या हट्टाविरुद्ध मॅझिनीनें शक्य तितकी तक्रार केली. " नवीन परिस्थितीला नवीन माणसें लागतात; धाडसाच्या प्रसंगांनींच धाडशी माणसें निर्माण होत असतात–माणसें धाडसाचे प्रसंग घडवून आणीत नाहींत ! मी त्यांना पुष्कळ समजावून सांगितलें. पण तत्वाच्या बलापेक्षां व्यक्तीच्या इभ्रतीवर जास्त विश्वास ठेवणारांना तें कसें रुचणार ? पुढें माझ्या लक्ष्यांत आलें कीं, लोकांमध्यें मजसंबंधीं गैरसमज उत्पन्न झालेला आहे; त्यांना वाटूं लागलें होतें कीं, सर्व सत्ता आपल्याच हातीं ठेवावयासाठीं मी तडफडत आहें ! रॅमोरिनोला विरोध करण्यांत वैयक्तिक महत्वाकांक्षेशिवाय माझा दुसरा कोणताहि हेतु नाहीं अशी त्यांची कल्पना झालेली आहे हें मला प्रथम समजलें तेव्हां माझ्या हृदयांत काहूर उठलें. मी इतका निरपराधी होतों कीं, असा आरोप मजवर लादला जाईल अशी माझी कल्पनाहि नव्हती. पण महत्कार्यासाठीं आत्मयज्ञ उभारणाऱ्या व्यक्तींचे कपाळीं लोकनिंदा, अविश्वास व कुशंका याच लिहिलेल्या असतात–ह्या सिद्धांताचा मला जन्मभर अनुभव येत आहे; त्या वेळीं या तत्वाचा पहिला अनुभव मला मिळाला. मी माघार घेतली, स्वारीचें नेतृत्व रॅमोरिनोकडे दिलें, त्याला सर्व बेत समजावून सांगितला–आणि मला आतां वाटत आहे कीं, त्यावेळीं मी माघार घेतली ही मोठी चूक केली ! "

आक्टोबरच्या सुमारास सर्व तयारी झाली. सुमारें आठशें सैनिक स्वारी करावयास शस्त्रास्त्रांनिशीं सज्ज झाले. इटलीच्या वेगवेगळ्या प्रांतांत एकदम बंडें उभारावयाचीं व स्विट्झरलँडमधील सैन्यानें सॅव्हॉयवर हल्ला करावयाचा

असा मॅझिनीचा बेत होता. पीडमाँट संस्थानच्या आरमारांत बंडवाल्यांच्या वतीनें गॅरिबॉल्डी प्रयत्न करीत होता. " तयारी जय्यत झाली पण रॅमोरिनोची वार्ता कांहींच कळेना. मी त्याच्याकडे माणसें धाडलीं—त्यानें स्वारीसाठीं एक हजार लोक जमविण्याचें वचन दिलें होतें, त्यापैकीं पुरते शंभर देखील त्यानें जमविले नव्हते ! तयारीसाठीं त्यानें आणखी मुदत मागितली; तीहि निघून गेली ! तयारीसाठीं मी त्याला चाळीस हजार फ्रँक दिले होते—त्यांपैकीं त्यानें फक्त दहा हजार फ्रँक परत केले–बाकीची सर्व रक्कम त्यानें जुगारांत उधळून टाकली ! हे पैसे मी किती कष्ट करून जमविले होते तें माझें मलाच ठाऊक ! पुढें मला समजलें कीं, रॅमोरिनो याचें खासगी देणें फेडावयाचें फ्रेंच सरकारनें आपल्या अंगावर घेतल्यामुळें मोबदला म्हणून त्यानें आमचा बेत हाणून पाडावयाचें काम स्वीकारलें आहे ! बंडाचा बेत फुटला तेव्हां हजारों पोलीस जिनीव्हा येथें दाखल झाले. बंडवाल्यांचें सैन्य जबरदस्तीनें मोडून टाकण्यांत यावें असे निरोपवजा हुकूम स्वित्झरलँडच्या सरकारला देशोदेशींच्या राजांकडून येऊं लागले. बंडाला आरंभ व्हावयाचे अगोदरच खजिना संपत आला. रॅमोरिनो येत नाहीं हें पाहून सॅव्हॉयमधील बंडवाल्यांचा धीर गळूं लागला—त्यांना वाटूं लागलें कीं हें कार्य अशक्य आहे म्हणूनच तो यावयाचें लांबणीवर टाकीत आहे ! त्याच्या दुर्वर्तनासंबंधीं कोणत्याहि प्रकारचा लेखी पुरावा मजजवळ नव्हता.- त्याचेविरुद्ध तक्रार करावी तर वैयक्तिक महत्वाकांक्षेचा आरोप मजवर जास्त जोरानें झाला असता ! तरी मी स्वारीचा बेत रहित केला नाहीं. हा बेत रहित करणें म्हणजे तत्वांचा त्याग करून राज्यकर्त्यांना शरण जाण्यासारखेंच होतें. सैन्यांत अविश्वास माजूं लागला होता, द्रव्यबळ संपुष्टांत येऊं लागलें होतें—उठावणीला एकदम आरंभ केल्याखेरीज गत्यंतरच नव्हतें. जानेवारीच्या अखेरीस उठावणी करावयाचें नक्की ठरवून आम्ही रॅमोरिनाला तसें कळविलें. युद्धसामुग्री देखील आम्ही सज्ज करून ठेवली होती. जानेवारीच्या अखेरीस तो एकदांचा आला. त्याला आमचा सर्व बेत आम्ही समजावून सांगितला; आम्ही योजलेल्या अधिकाऱ्यांचे यादींत त्यानें फेरफार केला, आमचा कार्यक्रम त्यानें बदलला; पण आमचा विश्वासघातच करावयाचा त्यानें करार केलेला आहे हें मला अगोदर समजलें नव्हतें. सैन्य स्वारीवर निघावयाच्या अगोदरच आमचीं माणसें वाटेल त्या संशयावरून जिनीव्हाच्या सरकारकडून पकडविण्यांत आलीं; पण नागरिकांच्या व अधिकाऱ्यांच्या सहानुभूतीनें

आम्हाला आपलें सैन्य ठरल्या ठिकाणीं जमवितां आलें. पण रॅमोरिनोनें विश्वासघाताचा दुसरा डाव टाकला. सरोवर ओलांडतांना आपल्या तुकडींतील सर्व सैनिकांचीं शस्त्रें त्यानें एकाच बोटींत भरलीं. ती बोट पोलिसांनीं पकडली आणि मग सहज रीतीनें त्यांनीं आमच्या निःशस्त्र सैनिकांना कैद केलें. उरलेल्या सैन्यानिशीं आम्ही स्वारी केली असती तर कदाचित् आम्हांस यश मिळालें असतें; कारण आम्ही यावयाच्या अगोदरच सरहद्दीच्या किल्यांवरील शत्रूचें सैन्य घाबरून निघून गेलें होतें! पण रॅमोरिनोची बातमी ऐकतांच सारे लोक निराशेनें वेडे झाले—आमचा सर्व बेत ढांसळून पडला!"

रॅमोरिनोच्या विलंबामुळें अगोदरच अर्धमेलेल्या या स्वारीचा बेत त्याच्या विश्वासघातानें पार ढांसळून गेला. हद्दपार जर्मन तुकडी स्विस् पोलिसांनीं कैद केली. पोलिश पलटणीचीं शस्त्रास्त्रें सरकारजमा झालीं. रॅमोरिनोनें आपलें सैन्य सरोवराच्या कांठाकांठानें चोवीस तासपर्यंत फिरविलें. सैन्याचा रोंख कोणीकडे आहे असें मॅझिनीनें त्याला संशयानें विचारलें; त्यानें कांहींतरी गुळमुळीत उत्तर देऊन वेळ मारून नेली.

"या स्वारीच्या तयारींत मी तीन महिने एकसारखा राबत होतों; शेवटच्या आठवड्यांत तर बिछान्याला माझी पाठहि लागली नाहीं! विश्वासघात व अपयश यांची काळजी रात्रंदिवस लागलेली होतीच, शिवाय चेहऱ्यावर उत्साह दाखवावा लागत होता! काळजी, त्रास व जबाबदारी यांच्या भाराखालीं माझें शरीर व मन अगदीं खचून गेलें." स्वारीच्या तयारीमध्यें असलेले हे सैनिक चढाईच्या हुकमाची वाट पहात असतांना एके रात्रीं एका सैनिकानें हुषारीचा बार काढला. वृथा कालक्षेप होत आहे हें पाहून चिडून गेलेल्या सैनिकांचीं अंतःकरणें एकदम उत्साहानें भरून गेलीं. त्यावेळीं काळजीनें व दगदगीनें अशक्त झालेला मॅझिनी रॅमोरिनोबरोबर बोलत बसला होता. त्या विश्वासघातक्याकडे संशयानें भरलेली नजर टाकून मॅझिनी म्हणाला, "तें कांहीं उपयोगाचें नाहीं. विजय प्राप्त होणें अशक्य असेल तर निदान मर्द इटालियनांप्रमाणें आत्मार्पण करून आपण धारातीर्थी देह तरी ठेवला पाहिजे!" रॅमोरिनोनें उत्तर दिलें, "नुसतें धाडसच करावयाचें असेल तर योग्य काळ व स्थळ पहात बसण्याची जरूरच नाहीं. असले हुरूपवान् इटालियन तरुण नाहक बळी देणें हें मला अगदीं नापसंत आहे; इतकेंच नव्हे तर हें बलिदान म्हणजे शुद्ध गुन्हा आहे!" मॅझिनीला त्यावेळीं ताप आलेला होता; तो

म्हणाला, " जगांत कोठल्याहि तत्वाला आजपर्यंत आत्मार्पणाशिवाय पावित्र्य प्राप्त झालेलें नाहीं; धर्मवीरांशिवाय कोणत्याहि धर्माला आजपर्यंत सामर्थ्य प्राप्त झालेलें नाहीं. आम्हांला नवीन युगाच्या अभिनव धर्माची स्थापना करावयाची आहे-आणि ह्या कामीं आम्हांला आमचें रक्त सांडावें लागलें तरी बेहत्तर ! " हें वाक्य संपतें न संपतें तोंच त्यानें हुषारीचा बार ऐकला. ज्या निर्वाणीच्या क्षणाची आपण वाट पहात होतों तो क्षण आला असें त्याला वाटलें. अशक्तपणाची व तापाची पर्वा न करतां तो आपली बंदूक घेऊन सैनिकांच्या रांगेंत उभा राहिला-पण रॅमोरिनोनें हालचालीचा हुकूमच दिला नाहीं ! हे श्रम त्याला सहन झाले नाहींत. आपणांभोंवतीं घाईघाईनें फिरणारीं माणसें त्याला अंधुक छायेप्रमाणें दिसूं लागलीं, आपल्या पायांखालची जमीन फिरत आहे असें त्याला वाटूं लागलें व तो धाडकन् बेशुद्ध होऊन पडला. " मला वायूचे झटके येऊं लागले. माझ्या हितचिंतकांना वाटलें कीं, मी विष घेतलें आहे-कारण मी मजजवळ नेहमीं एक जालिम विष तयार ठेवीत असें. मी मधून मधून शुद्धीवर येईं तेव्हां ते मला विचारीत, 'तूं काय घेतलें आहेस ?' ते प्रश्न ऐकतांना माझ्या गोंधळलेल्या मनाला वाटे कीं, तूं विश्वासघात केलास-त्याच्या मोबदला म्हणून तुला काय लांच मिळालेली आहे ! ह्या कल्पनेनें माझ्या देहाचा तिळपापड झाला व एक अतिशय जोराचा वायूचा झटका येऊन मी निश्चेष्ट पडलों. " मॅझिनीच्या ह्या स्थितीची बातमी कळतांच रॅमोरिनोला आपल्या मार्गांतला कांटा अनायासेंच दूर झाल्याबद्दल फार बरें वाटलें. मॅझिनीच्या शीलाचें त्या विश्वासघातक्याला भय वाटे; मॅझिनी हिंडताफिरता होता तेव्हां आपल्या विश्वासघाताचा कळस करावयाची त्याची छाती झाली नाहीं. आतां या आजारांतून मॅझिनी जगत नाहीं असें वाटतांच " त्यानें चवथ्या तारखेला सैन्याला जाहीर केलें कीं, बंडाचा बेत रहित करण्यांत आलेला आहे, शिपायांनीं घरोघर फुटून जावें ! हा हुकूम देऊन तो स्वार होऊन निघून गेला ! इतर लोकांनीं सैन्याला थोपवून धरण्याचा प्रयत्न केला पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. सैन्य विस्कळित झालें, लोक घरोघर निघून गेले...पुढें शुद्धीवर आलों. तेव्हां मी विचारलें, आपण कोठें आहोंत? माझ्या मित्रानें उत्तर दिलें, स्विट्झरलँडांत. मी विचारलें, सैन्य कोठें आहे ? त्यानें दुःखानें उत्तर दिलें, तेंहि स्विट्झरलँडमध्येंच आहे !" मॅझिनी गैरशुद्धींत असतांनाच त्याच्या मित्रांनीं त्याला सरहद्दीपार नेलें होतें.

# ४ ‘ तरुण–युरप ’ व ‘ जीवनाचें रहस्य. ’

( १८३४–१८३७. )

“ There is a bondage worse, far worse, to bear
Than his who breathes, by roof, & floor, & wall
Pent in a Tyrant's solitary Thrall:
Tis his who walks about in the open air,
One of a Nation who, henceforth, must wear
Their fetters in their souls. ”

स्वित्झरलँड–इटलींतील परिस्थिति–तरुण युरप–तरुण स्वित्झरलँड–संशयाची वावटळ–जीवनाचें तत्वज्ञान.

**विश्वासघातामुळें** असा विध्वंस झालेला पाहून मॅझिनीचें अंत:करण निराशेनें व्यापून गेलें. “ निराशेमुळें मी इतका वेडा झालों आहे कीं, जमिनीवर गडबडा लोळून स्वत:च्या अंगाचे चावे मी कितीकदां तरी घेतले आहेत ! कोणाहि मनुष्याचा चेहरा दिसला किंवा आवाज ऐकला कीं मला रागाचा झपाटा येतो आणि हा निरर्थक क्रोध मला आंवरून धरतां येत नाहीं. माझे मित्र मजपासून दूर आहेत तोंवरच मला त्यांचेबद्दल प्रेम वाटतें, पण तेच नजरेसमोर आल्यावरोबर त्यांचेबद्दल माझ्या मनांत द्वेष उत्पन्न होतो ! ” मॅझिनीला कोणत्याहि प्रकारचें स्वास्थ्य मिळूं द्यावयाचें नाहीं असा युरपच्या राज्यकर्त्यांनीं जणूं काय कटच केला होता. “ मॅझिनीला व त्याच्यासारख्या इतर शांतताभंग करूं इच्छिणाऱ्या कटवाल्यांना ” स्वित्झरलँडमधून एकदम हद्दपार करण्यांत यावें–अशा धमकीवजा विनंत्यांचा स्विस् सत्तामंडळावर नुस्ता

वर्षाव होऊं लागला. इटालियन हद्दपारांनीं स्वित्झरलँडच्या मुलखांत आपलें निवासस्थान केलें होतें इतकेंच नव्हे तर शेजारच्या संस्थानावर स्वारी करावयाकरितां सैन्य उभारलें होतें; मॅझिनीच्या ह्या कृत्याकडे कानाडोळा करणें हें आंतरराष्ट्रीय शिष्टाचाराविरुद्ध होतें. आपण स्वित्झरलँडच्या पाहुणचाराचा प्रमाणाबाहेर फायदा घेतला आहे ही गोष्ट इटालियन हद्दपारांनाहि समजत होती. ते हद्दपारीच्या हुकमाची वाटच पहात होते ! लवकरच स्विस सत्तामंडळानें सर्व बंडवाल्यांना हद्दपार व्हावयाचा हुकूम सोडला.

शक्य तोंवर आपण स्वत: स्वित्झरलँड सोडावयाचें नाहीं असें मॅझिनीनें अगोदरच ठरवून ठेवलें होतें. " माझ्या मातृभूमीपासून आणखी दूर जावयाचें ही कल्पनाच मला सहन होत नाहीं; " शिवाय स्वित्झरलँडमधील आल्पस् पर्वताच्या रांगांच्या दर्शनानें त्याचें निराश झालेलें मन रमत असे. " आईवर माझें जितकें प्रेम आहे तितकेंच माझें ह्या आल्पस् पर्वतावर प्रेम आहे ! " हद्दपारीच्या हुकमाची अंमलबजावणी करणाऱ्या पोलिसांच्या ससेमिऱ्यातून सुटण्यासाठीं त्याला वारंवार आपलें निवासस्थान बदलावें लागलें. कित्येक ठिकाणचे प्रांतिक अधिकारी त्याच्या अज्ञातवासाचा थोडासा भंग झाला तर तिकडे कानाडोळा करीत. रिकाम्या पडलेल्या घरांत खिडक्यांना पडदे लावून दिवसभर घरांत कोंडून घ्यावयाचें त्याच्या नशीबीं आलें होतें; निवासस्थान बदलणें अपरिहार्य झालें म्हणजे मात्र तो रात्रीच्या वेळेस बाहेर पडे आणि मित्रांनीं शोधून काढलेल्या दुसऱ्या एकाद्या घरांत फिरून स्वत:स कोंडून घेई ! "हद्दपारीच्या या जीवनक्रमाला मी अगदीं कंटाळून गेलों आहे. ढगांनीं व्याप्त झालेलें आकाश जसें उदास दिसतें, विझून गेलेल्या निखाऱ्यांची राख जशी निर्जीव दिसते तसें माझें जीवन उदास आणि मृतवत् झालें आहे ! मला जें दु:ख भोगावें लागत आहे तें वर्णन करण्याचें सामर्थ्य शब्दांमध्यें नाहीं, तें मोकळें करावयाचें सामर्थ्य अश्रूंमध्यें नाहीं ! मी अत्यंत भेसूर अशा यातना सहन केल्या–त्या यातना अशा प्रकारच्या होत्या कीं, त्यामुळें मनुष्याचे डोळे खोल जातात, त्याचा चेहरा प्रेतासारखा फटफटीत होतो, पण त्याचा प्राण मात्र जात नाहीं ! "

स्वित्झरलँडमधील त्याचें जीवन अत्यंत उदासवाणें होतें. एकाकी जीवनामध्यें आनंद देणारे ग्रंथहि त्याचेजवळ नव्हते. " माझीं सर्व पुस्तकें जवळ असतील तर सर्व जन्मभर एकाच खोलींत कोंडून घेऊन मी मोठ्या आनंदांत राहीन;

पण येथें मजजवळ पुस्तकें नाहींत, माझें आवडतें गीतार वाद्य येथें नाहीं आणि सृष्टिसौंदर्य पहात रानोमाळ भटकत फिरणेंहि शक्य नाहीं ! " सर्वच बाजूंनीं कोंडमारा झाल्यामुळें त्याची प्रकृति ढांसळली; या सर्व दु:खांच्या भरतीला त्याला दारिद्र्याच्या यातना भोगाव्या लागल्या; आईकडून त्याला मधून मधून पैसे येत असत व मित्रांकडूनहि वेळोवेळीं मदत होत असे. पण कोणी गरजवंत हद्दपार मदत मागावयाला आले तर आपल्या सर्व गरजा बाजूस ठेवून मॅझिनी त्यांना सढळ हातानें मदत करीत असे ! त्यानें आपल्या गरजा शक्य तितक्या कमी केल्या होत्या, तरी त्याच्या पाठीचें दारिद्र्य कांहीं सुटलें नाहीं. " आई, मी तुझ्याकडे पैशाची मागणी कितीदां करूं ? आतां तर माझी मलाच शरम वाटूं लागली आहे ! " त्या उदार माउलीनें मुलाच्या मागणीचा कधींहि अव्हेर केला नाहीं. " मला घरीं जावेंसें वाटतें; माझ्या इटलीचें दर्शन घ्यावेंसें वाटतें. इटलीच्या आकाशांत फिरणारे ढग, इटलीच्या भूमीवर घुमणारे वारे, इटलीच्या किनाऱ्यावर धडाडणारा सागर–यांचा मला सारखा ध्यास लागला आहे...परवां मी आल्पस् पर्वतांच्या एका रांगेकडे पहात होतों–पलीकडे असलल्या मायदेशाकडे माझें अंत:करण सारखें ओढ घेऊं लागलें. तेथें माझी दीनदुबळी मातृभूमि आहे ! तिच्यासाठीं माझें अंत:करण तिळतिळ तुटतें ! इटलीच्या स्वातंत्र्यासाठीं ज्या तरुणांनीं आत्मसमर्पण केलें त्यांचीं थडगीं तेथें आहेत ! माझ्या देशांतलीं तीं मनोहर कुरणें, टेंकड्या, सरोवरें, फुलाफळांचे बागबगीचे–आणि या सर्वांना वेष्टणारें तें निर्मल आकाश ! हीं सदैव माझ्या अंत:श्चक्षूंपुढें येतात ! मनुष्याला आपलें आयुष्य आनंदानें घालवावयास त्यांच्या सहवासाशिवाय आणखी कशाची जरूर आहे ? " मनुष्याचा सहवास सहन होणें शक्य नसल्यामुळें त्या उदासवाण्या एकांतवासांत तो आपल्या आवडत्या मांजराला खेळवीत बसे ! " आई, मला किती दु:ख होत आहे म्हणून सांगूं ! ज्यांनीं ज्यांनीं माझ्यावर प्रेम केलें त्यांचेवर मी संकटांची परंपरा व दु:खाचे डोंगर मात्र कोसळविले ! तुझी आणि बालपणच्या माझ्या साऱ्या संवगड्यांची आणि माझी गांठ पडेल त्या दिवशीं मी शांतपणानें प्राण सोडीन !...मी मित्रांचे कल्याणाचा प्रयत्न करावयास हवा होता–पण माझे हातून प्रत्येकाचें अहितच झालें आहे. मी तरुण इटलीची स्थापन केली त्यावेळीं माझी कल्पनाहि नव्हती कीं, ज्या प्रकारचा आयुष्यक्रम आपण स्वीकारीत आहोंत त्यामुळें आपणांवर इतकीं संकटें कोसळणार आहेत ! यावरून मला

माझ्या कृतीचा पश्चात्ताप होत आहे असें मात्र नव्हे; माझीं तत्वें मला धर्मा-इतकीं पवित्र वाटतात; पण धर्मवेडाच्या भरांत मनुष्यानें आत्मसमर्पण करावें—आणि मी मात्र इतरांचा यज्ञ आरंभला होता, याची मला खंत वाटत असे !"

सॅव्हॉयवर स्वारी करावयाच्या प्रयत्नांत अपयश आल्यामुळें तरुण इटलीची अगदीं वाताहत झाली होती. इटलीमधून येणाऱ्या बातम्याहि अत्यंत निराशाजनक होत्या—पळापळी, विश्वासघात, फाटाफूट, कैद व फांशी यांशिवाय बोलणें नाहीं ! तरुण लोक आपल्या तत्वांचा त्याग करून सरकारपक्षाला मिळत होते; तत्वनिष्ठ राहिलेल्या लोकांबद्दल त्यांच्या हीन मनाला मत्सर वाटून ते विश्वासघात करीत—यामुळें सरकारचा दुहेरी फायदा होत होता. " या इटालियनांच्या रक्तांतली उष्णताच नाहींशी झाली आहे. देशकार्य करावयासाठीं उत्साह नाहीं तो नाहींच, पण निरुत्साहाच्या समर्थनासाठीं अनेक सबबी तयार करण्यांत मात्र यांची अक्कल चांगली चालते ! आपण गुलाम आहों, जगांत आपणांला नांवनिशाणीहि नाहीं, सारीं राष्ट्रें आपणाकडे तिरस्कारानें पहात आहेत, प्रत्यक्ष परमेश्वर आपणासारख्या हीन लोकांना अनेक शाप देत असेल—पण असले विचारच त्यांच्या डोक्यांत येत नाहींत, तेव्हां त्यांना आपल्या स्थितीची शरम कोठून वाटणार ? "

इटलीच्या स्वातंत्र्यासाठीं उभारलेले सर्व प्रयत्न निष्फळ झाले, "याचा अर्थ मी प्रत्यक्ष कार्यक्षेत्रांतून माघार घ्यावी असाच असेल काय ? माझ्या अनेक हितचिंतकांनीं मला राजकारणांतून आंग काढून घ्यावयाचा उपदेश केला; त्यांना वाटत होतें कीं, पारतंत्र्यांत अनेक शतकें कुजत पडल्यामुळें स्वातंत्र्ययुद्धाचें कडकडीत व्रत आचरण्याला इटली असमर्थ आहे ! त्यांचे हे विचार मला कधींच पटले नाहींत. स्वत्व ही एक कार्यकारी शक्ति आहे; ती परिस्थितीच्या अनुरोधानें वागत नाहीं—ती परिस्थितीवर विजय मिळवूं पाहते. जीवनाचें तेज केंद्रापासून उद्भवतें व त्याचा प्रकाश कक्षेकडे प्रसार पावतो; चैतन्य बहिरंगांतून अंतरंगात उतरत नाहीं तर तें अंतरंगांतून बहिरंगांत संचारत असतें ! आजारी मनुष्य देहाला सुख व्हावें म्हणून या कुशीवरून त्या कुशीवर वळतो, त्याप्रमाणें इतके दिवस पारतंत्र्यांत काढले, आतां थोडे दिवस स्वातंत्र्यांत काढूं म्हणजे जरा बरें वाटेल—अशा प्रकारची आमची चळवळ नव्हती ! आमचें कार्य केवळ प्रतिक्रियात्मक नव्हतें. स्वातंत्र्य हें आमचें ध्येय नव्हतें—राष्ट्राचें नियोजित कार्य करतां यावें म्हणून आम्हांला स्वातंत्र्य पाहिजे होतें. ' लोकस-

ताक राष्ट्रैक्य ' हें आमचें ब्रीदवाक्य होतें. आम्हांला राष्ट्र निर्माण करावयाचें होतें, आम्हांला दोन कोटि लोकांना जिवंत करावयाचें होतें, आम्हांला जनतेच्या सामर्थ्याला संघटित स्वरूप द्यावयाचें होतें. इतक्या महन्मंगल कार्यासाठीं झटणाऱ्या तरुणांना एका अपजयाची काय पर्वा आहे ? महाकार्यांत महाविपत्ति ह्या यावयाच्याच; विपरीत परिस्थितीमध्येंहि राष्ट्रानें ध्येयाशीं एकनिष्ठ राहिलें पाहिजे; इटलीमध्यें अशा प्रकारची एकनिष्ठा निर्माण करणें हें आमच्या मन:प्रवर्तनाच्या कार्यक्रमांतील एक तत्व होतें. स्वत:च उदाहरण घालून दिल्याशिवाय मन:प्रवर्तन शक्य आहे काय ? आणि असें असतांहि आम्हींच माघार घेणें हा आमच्या तत्वांविरुद्ध आमच्या शत्रूंना एक पुरावाच मिळाल्यासारखें होणार नाहीं काय ? इटलीच्या निष्क्रियतेचें कारण इच्छाशक्तीचा अभाव हें नाहीं; आत्मशक्तीबद्दल अविश्वास हें आमच्या क्लैब्याचें कारण आहे; यामुळें निराशेकडे जनतेची सहज प्रवृत्ति होते; या अविश्वासामुळें एकनिष्ठेचा भंग होतो, श्रमांच्या सातत्यांत खंड पडतो आणि विचार व आचार यांमध्यें महदंतर उत्पन्न होतें ! इटलीमध्यें राहून ह्या नीतितत्वांचा उपदेश करणें अशक्य आहे. काल व परिस्थिति यांच्या प्रतिकूलतेनें निराश न होणारे, निश्चयाचे महामेरु, दडपशाहीला सस्मित मुखानें तोंड देणारे, पुनरुत्थानासाठीं आजचें पतन स्वीकारणारे व एकनिष्ठा हेंच ज्यांचें सामर्थ्य आहे असे तत्वप्रेरित तरुण आज इटलीला हवे आहेत ! अपजयांमागून अपजय आले तरीहि विजय प्राप्त होईपर्यंत सदैव युद्धाला तयार असलेले, जयश्री आपणांसच वरणार अशा निष्ठेनें प्रफुल्लहृदय असलेले लोक आज देशाला पाहिजे आहेत ! तरुण इटली ही यकश्चित् पक्षाभिमानानें अंध झालेल्यांची संघटना नाहीं; राष्ट्रभक्ति हा आमचा धर्म आहे. दडपशाहीनें पक्ष चिरडले जातील पण धर्म चिरडला जाणार नाहीं ! मनांतला सर्व संशय झाडून टाकून पुन्हा कार्याला आरंभ कसा करावा ह्या विषयाचा मी विचार करूं लागलों. ”

विचाराअंतीं मॅझिनीला आढळून आलें कीं, महत्कार्य शिरावर घेतांना तें कार्य परमेश्वराचें आहे अशी श्रद्धा असली पाहिजे, नाहींतर यश प्राप्त होणें शक्य नाहीं. “ फ्रान्सच्या क्रान्तीचीं तत्वें हित व हक्क या कल्पनांवर उभारलेलीं होतीं....मानवजातीच्या प्रगतीचें कार्य अखंडितपणें चालू रहावयासाठीं त्या तत्वांमध्यें आणखी एका तत्वाचा समावेश होणें अवश्य होतें. हें नवें तत्व

म्हणजे धर्म हें होय...राजकीय कार्य करणारी संस्था या दृष्टीनें तरुण इटलीला अपयश आलेलें आहे. नव्या युगाचा नवा धर्म स्थापन करणारी संस्था ह्या दृष्टीनें आपलें पुनरुत्थान झालें पाहिजे...नव्या क्रान्तीचें आद्यतत्व कर्तव्य हेंच असलें पाहिजे–ही नवी क्रान्ति संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाच्या दृष्टीनेंच करण्यांत आली पाहिजे; अशा उदात्त आकांक्षांनीं होणारी क्रान्ति पक्षाभिमान व वैयक्तिक स्वार्थ यांचेपासून सर्वस्वीं अलिप्त राहील."

नव्या युगाच्या संस्थापनेसाठीं मॅझिनीनें निर्माण केलेली "तरुण युरप" ही संस्था कशी उत्क्रांत होत गेली हें त्यानेंच आपल्या आत्मचरित्रांत नमूद केलें आहे. "इटलीमधील आमच्या कार्याला जबरदस्त धक्का बसला होता; आमच्या मंडळींना दहशत बसली होती; त्यांना भानावर यावयास कांहीं काळ लोटणें अवश्य होतें; आम्हां गुलामांचे जुलमी धनीहि जागृत झाले होते; दडपशाही हाच आपल्या धनीपणाचा पुरावा आहे असें समजून आपल्या जागृतावस्थेंत ते शक्य तितका जुलूम करीत होते; आपला धनीपणा शाबूत आहे असें निदर्शनास येतांच ते पुन: झोंपीं जावयाचा बेत करीत होते व त्यांची अशी खात्री व्हावयास कांहीं दिवस जाणें जरूर होतें." दहशत व दडपशाही या दोहोंचाहि जोर कालावधीनें ओसरून जातो. "स्वदेशांत झालेलें नुकसान बाहेरदेशीं भरून काढणें शक्य आहे; परदेशांतील जनतेच्या सहानुभूतीनें इटलीला पुन्हां रणक्षेत्रांत उतरणें शक्य आहे. इटलीच्या कार्याला युरपियन राष्ट्रांची सहानुभूति मिळवावयासाठीं त्या त्या देशांतील लोकसत्तावाद्यांची मदत मिळावयास पाहिजे. हें पाठबळ मिळावें याच धोरणानें आम्ही या तीन वर्षांतील ( १८३४–१८३७ ) चळवळी चालविल्या होत्या. युरपियन राष्ट्रांच्या उत्क्रान्तीमध्यें इटली पुढाकार घेईल अशी मला श्रद्धा वाटत होती."

स्वातंत्र्य व समान हक्क हीं तत्वें फ्रेंच क्रान्तीनंतर युरपमध्यें सर्वमान्य झालीं; पण मानवजात व व्यक्ति यांचा संयोग घडवून आणणारी राष्ट्र ही संघटना तत्वज्ञान्यांना मान्य नव्हती; 'राष्ट्र' हें संघटनाक्षेत्र निर्माण करण्याचें श्रेय मॅझिनीलाच दिलें पाहिजे. लोकसत्ता स्थापन करावयासाठीं झटणाऱ्या लोकांनीं आपल्या कार्यक्षेत्राच्या मर्यादा कोणत्या ठेवाव्या हें युरपियन जनतेला मॅझिनीनेंच प्रथमत: दाखवून दिलें. मानवजातीच्या हितासाठीं तळमळणाऱ्या मनुष्याला कार्य करण्याचें हें नवें साधन मॅझिनीनेंच निर्माण केलें. सर्व राष्ट्रें सुसंघटित व स्वतंत्र झाल्यावर त्यांनीं संघटित होऊन मानव-

जातीच्या प्रगमनासाठीं यतमान व्हावें—ह्याच महातत्वावर "तरुण युरप" ह्या संघाची स्थापना झाली होती. युरपमधल्या सर्व लोकसत्ताक चळवळींना एका केंद्रांत आणून त्यांची एकवाक्यता करणें हा या संस्थेचा मूळ उद्देश होता. सर्व राष्ट्रें सुसंघटित व स्वतंत्र होईपर्यंत मानवजातीच्या कल्याणाचें कार्य हातीं घेणें शक्य नाहीं. "आपपरभाव टाकून देऊन मनुष्यमात्रांचे ठिकाणीं प्रेम ठेवणें व परस्परहितविरोधी अडचणींचा व भेदभावाचा नाश करणें हाच विश्व-कुटुंबित्व या शब्दाचा अर्थ आहे...पण आज राजेलोकांनीं लोकमताला गुंडाळून ठेवलें आहे, त्यांचा कट लोकांनीं मोडून काढला पाहिजे. त्यांनीं स्वतःच्या संरक्षणासाठीं आपसांत तह केले आहेत, त्यांनीं स्वतःच्या स्वार्थाला धक्का न लागेल अशी व्यवस्था केली आहे. पण लोकांमध्यें एकोपा नाहीं. म्हणून आपल्या राष्ट्राच्या पायांतील शृंखला तोडून टाकणें हें मानवजातीच्या कल्याणासाठीं झटणारांचें आद्य कर्तव्य आहे...स्वयंस्फूर्तीनें निर्माण झालेली लोकसत्ताक राष्ट्रें मानवजातीच्या कल्याणास अनुकूल अशीं आपलीं कर्तव्यें ओळखूं लागतील. एका राष्ट्रानें लोकसत्तेसाठीं उठावणी करतांच इतर राष्ट्रांनीं त्याच्या मदतीस धांवून जाणें हें त्याचें कर्तव्य आहे," आणि ह्याच तत्वांचा प्रसार करण्यासाठीं तरुण युरपचीं केंद्रस्थानें वेगवेगळ्या देशांत स्थापन करण्यांत आलीं. १८३६ मध्यें मॅझिनीनें या विषयावर एक लेख लिहिला:—"शांतता राखणें आणि परस्परांविषयीं बंधुभाव उत्पन्न करणें हें राष्ट्रसंघटनेचें उद्दिष्ट आहे; मानवजात ही अनेक राष्ट्रें मिळून बनलेली आहे. स्वतंत्र व समसमान अशा व्यक्तींची राष्ट्र ही संघटना आहे; ह्या संघटनाक्षेत्राच्या मर्यादा निसर्ग व इतिहास हे दाखवितात. मानवजातीच्या प्रगतीचें कार्य सुकर करणें हें राष्ट्रसंघटनेचें ध्येय होय. ह्या प्रगतीची दिशा परमेश्वर वेळोवेळीं दाखवीत असतो; लोकसत्ताक राष्ट्रांच्या युगामध्यें राजे लोक व सरदार मंडळी यांना स्थानच नाहीं; वैयक्तिक महत्वाकांक्षेचें कार्यक्षेत्र नाहींसें झाल्यावर स्पर्धा व युद्ध हीं उपस्थित होणें शक्यच नाहीं. व्यक्ति व संस्था कर्तव्यभावनेनें प्रेरित होतील; दुसऱ्याचे हक्क बुचाडून घेणारास कोणी मोठेपणा देणार नाहीं. आजपर्यंत एका देशानें उठून दुसऱ्यावर स्वारी करावी असें चाललें आहे; पण नव्या युगामध्यें एकामेकांच्या कल्याणासाठीं सर्व राष्ट्रें मनापासून झटतील; त्यामुळें सर्वांचीच प्रगति व हित होईल."

या तत्वांवर उभारलेला "तरुण युरप" हा राष्ट्रसंघ बर्न येथें स. १८३४ एप्रिल १५ रोजीं स्थापन करण्यांत आला. त्यावेळीं काढलेल्या प्रतिज्ञापत्रकावर

देशोदेशींच्या सतरा हद्दपारांनीं, वेगवेगळया संस्थांचे प्रतिनिधि या नात्यानें सह्या केल्या; त्यांपैकीं मॅझिनी व हेरो हेरिंग हे प्रमुख होते. हेरो हेरिंग या देशभक्त हद्दपारानें पोलंड, जर्मनी व ग्रीस या देशांच्या स्वातंत्र्ययुद्धांत भाग घेतला होता; युरपच्या संघटनेसाठीं इटलीचें ऐक्य मॅझिनीला जितकें जरूर वाटत होतें तितकेंच याला स्कॅन्डेनेव्हियाचें ऐक्य अवश्य वाटत होतें.

युरपियन लोकसत्ताक राष्ट्रांचें सामर्थ्य केंद्रीभूत करणें हा या संस्थेचा हेतु होता. लोकसत्तेसाठीं कोठेंहि होणाऱ्या युद्धांस सर्व राष्ट्रांच्या लोकसत्तावाद्यांनीं प्रत्यक्ष अथवा नैतिक साहाय्य करावें आणि स्वार्थसाधु राजे लोकांच्या जुटीस तोंड द्यावें–हें संस्थेचें उद्दिष्ट होतें. १८३४ मध्यें हीं तत्वें जाहीर करणें, एवढेंच शक्य होतें. " ह्या संस्थेचे हेतु त्वरेनें साध्य होतील अशी आशा मला केव्हांहि वाटली नाहीं. तरुण युरपचें ध्येय इतकें विशाल आहे कीं, तें सिद्ध व्हावयास हजारों स्वयंसेवकांना अनेक वर्षें जिवापाड श्रम केले पाहिजेत हें मी जाणून होतों; पण फल केव्हांहि प्राप्त होवो, फक्त लोकसत्तेच्या संघाची कल्पना जगाच्या नजरेसमोर संघटित स्वरूपांत मांडावी एवढाच या संस्थेच्या स्थापनेंत माझा हेतु होता. "

" स्वातंत्र्याला विषमतेमुळें बाध येतो. सहकार्य समसमानांमध्येंच शक्य आहे. व्यक्ति व राष्ट्र यांचीं कर्तव्यें व कार्यें परमेश्वरानेंच योजून ठेविलीं आहेत; तीं पार पाडण्यांतच जीवितसाफल्य आहे. नियोजित कार्याच्या पूर्ततेसाठीं सर्व शक्ति खर्चीं घालणें हें व्यक्तिमात्राचें कर्तव्य आहे. मानवजातींतील सर्व राष्ट्रांची संघटना झाली तर प्रगमनाचा मार्ग सोपा होईल व आपणांस परमेश्वराच्या आज्ञेचा बोध होइल." हें तरुण युरपचे ध्येय होतें. राष्ट्रधर्म हा मानवजातीच्या कल्याणाचा द्योतक आहे अशी या संघाची निष्ठा होती. सदोदित हिरव्यागार असणाऱ्या " आयव्ही " वेलाचें पान ही या संघाची निशाणी होती.

" आम्ही स्वातंत्र्य व प्रगति यांचें भक्त आहों. प्रगमनाच्या नीतिनियमामुळें मानवजातीची अखंड उन्नति होत असते असा आमचा विश्वास आहे. मानवजातीची समता व सुबंधुता यांवर आमची निष्ठा आहे. स्वातंत्र्य, समता व मानुषता हीं तीनहि तत्वें आम्हांला सारखींच पूज्य आहेत. या तत्वत्रयीच्या अनुरोधानें सर्व सामाजिक व राजकीय प्रश्नांचा विचार झाला पाहिजे असें आमचें मत आहे. सर्व राष्ट्रें तशींच सर्व मनुष्यें समसमान, स्वयंस्वतंत्र व बंधु-

भावानें बद्ध आहेत, प्रत्येक व्यक्ति व प्रत्येक राष्ट्र यांना कांहीं विशिष्ट कार्य परमेश्वरानें नेमून दिलें आहे असा आमचा विश्वास आहे. हें कार्य पूर्ण करावयासाठीं व्यक्तीव्यक्तींची व राष्ट्राराष्ट्रांची सहकारिता असणें आवश्यक आहे—म्हणून आम्ही ही राष्ट्रसमिति स्थापन करीत आहों. यंग जर्मनी, यंग पोलंड व यंग इटली या तीनहि संस्था लोकसत्तावादी आहेत, स्वातंत्र्य, समता व प्रगति या महातत्वांवर श्रद्धा ठेवणाऱ्या आहेत, म्हणून समसमान बंधुत्वाच्या नात्यानें या संस्था सहकार्यासाठीं आज ( १५–४—१८३४ ) एकत्र होत आहेत. या संस्थांनीं आपलें विशिष्ट कार्य स्वतंत्रपणें करावें. या संस्थांचा आज बचावाचा व चढाईचा तह झाला आहे. तरुण युरपच्या केंद्र मंडळाचें कार्य राष्ट्रप्रतिनिधींकडून चालविण्यांत येईल. "

ज्या देशानें आपणांस आश्रय दिला त्याचें कल्याण व्हावें व तरुण युरपच्या कार्याला आणखीं एक क्षेत्र मिळावें या हेतूनें मॅझिनीनें इ. स. १८३४ सालीं " तरुण स्विट्झरलँड " ही संस्था स्थापन केली. " इ. स. १३३८ पासून स्विट्झरलँड देश आजतागायत स्वतंत्र व लोकसत्ताक आहे. जुलुमी व महत्वाकांक्षी राजांचा वेढा पडलेला असूनहि आज पांच शतकेंपर्यंत लोकसत्ताक स्विट्झरलँडचें निशाण एकसारखें फडकत राहिलें आहे. स्विट्झरलँडची राज्यघटना संयुक्तसंस्थानपद्धतीची असल्यामुळें निरनिराळ्या संस्थानांवर शेजारचीं राष्ट्रें आपला दाब बसवीत. त्यांना असें करतां येऊं नये आणि स्वतंत्र व लोकसत्ताक स्विट्झरलँडला जुलुमी राजांना तोंड द्यावयाचें सामर्थ्य यावें यासाठीं मी तरुण स्विट्झरलँड या संस्थेचा पाया घातला. "

त्यावेळीं स्विट्झरलँडचे सुभे वेगवेगळ्या घराण्यांच्या कह्यांत गेले होते; कामकरी व शेतकरी वर्गाची स्थिति अत्यंत हलाखीची होती; प्रांतिक अभिमानामुळें कोणतेंहि कार्य हातीं घेणें व तडीस नेणें अशक्य झालें होतें. स्विट्झरलँडच्या उद्धारासाठीं ही संस्था स्थापण्यांत आल्यानंतर थोडक्याच दिवसांत संस्थेच्या शाखा देशभर पसरल्या आणि तिजमध्यें हजारों तेजस्वी तरुण समाविष्ट झाले. स्विट्झरलँडचा राज्यकारभार चालविणाऱ्या मंडळांत व कायदेकानू करणाऱ्या मध्यवर्ती मंडळांत जनतेचे प्रत्यक्ष प्रतिनिधि यावे—प्रांतिक मंडळांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे हातीं मुख्य सत्ता नसावी असें मॅझिनीचें मत होतें. ( या त्याच्या कल्पनांना तांतडीनें यश आलें नाहीं; पण स. १८४८ मध्यें झालेल्या नव्या राज्यघटनेमध्यें त्याचीं बहुतेक सर्व मतें मान्य करण्यांत आलीं. ) या संस्थेच्या

मतप्रसारासाठीं १८३५ मध्यें मॅझिनीनें एक वर्तमानपत्र काढलें ( La Jeune Suisse). तें आठवड्यांतून दोनदां प्रसिद्ध होत असे. फ्रेंच व जर्मन या दोन भाषांत तें छापण्यांत येत असे; बर्न परगण्यांत बिएन या गांवीं तें प्रसिद्ध होत असे. या छापखान्यांतील सर्व कामगार हद्दपार देशभक्त होते. पत्रामधील बहुतेक सर्व अग्रलेख खुद्द मॅझिनीच्याच हातचे असत. इतके दिवस लोकसत्तेचा ज्वालामुखी पॅरिस शहरांतच भडकतो अशी साधारण समजूत होती. आतां ही चळवळ देशोदेशीं उपस्थित होऊं लागलेली पाहून राज्यकर्त्यांचें धाबें दणाणलें. स्विट्झरलँड हा देश फ्रान्स, इटली, ऑस्ट्रिया व जर्मनी यांच्या सरहद्दीवर आहे; म्हणून येथें उत्पन्न होणारी चळवळ आजूबाजूच्या सर्व देशांना बाधल्यावांचून रहाणार नाहीं; तेव्हां ही चळवळ चिरडण्यांत यावी असा आजूबाजूच्या राजांनीं नुस्ता कोलाहल मांडला. स्विट्झरलँडनें या चळवळ्यांना एकदम हद्दपार केलेंच पाहिजे अशी फ्रान्सच्या लुई फिलिपनें धमकी दिली. या हद्दपारांनीं स्विट्झरलँडमध्यें मारेकऱ्यांची एक गुप्त मंडळी स्थापन केली आहे, लुई फिलिपचा खून करण्याचा प्रयत्नहि केलेला आहे, ह्या हद्दपारांनीं सॅव्हॉयवर पुन्हां स्वारी करावयाचा कट केला आहे अशा नाना प्रकारच्या कंड्या बड्या बड्या मंडळींकडून पिकविण्यांत आल्या. नुस्त्या कंड्या पिकवून काम साधत नाहींसें पाहून, हद्दपार बंडवाल्यांना हांकून देण्यांत येणार नाहीं तर स्विट्झरलँडमधील आपली वकीलात रद्द करण्यांत येईल आणि कटवाल्यांना बळजबरीनें सरहद्दीपार हुसकावून लावण्यांत येईल अशी फ्रान्सनें स्विस् सरकारला धमकी दिली. ही धमकी मात्र लागू पडली. मॅझिनीच्या राहत्या घराची कसून झडती घेण्यांत आली, छापखाना जप्त करण्यांत आला व कारखान्यांतले सर्व कामगार कैद करण्यांत आले! खुद्द मॅझिनीला झोलर परगण्यांत कैद करण्यांत आलें होतें; पण त्याच्या मुक्ततेसाठीं तेथील रहिवाशी तुरुंगहि ठिकाणीं राहूं देणार नाहींत असें पाहून त्याला सोडून देण्यांत आलें! त्याचवेळीं या सर्व मंडळींनीं एकदम स्विट्झरलँडमधून हद्दपार व्हावें असा कडक हुकूम सोडण्यांत आला. “ ही बातमी ऐकून मी माझे खांदे मात्र उडवले ! स. १८३७ च्या जानेवारी महिन्यापर्यंत मी तेथेंच राहिलों होतों. तरुण–स्विट्झरलँड पत्र अझूनहि मधून मधून प्रसिद्ध होत असे, तें या लोकांना पाहवलें नाहीं. छापखान्यांतल्या लोकांना, वर्तमानपत्राशीं पत्रव्यवहार करणारांना व लेखकांना निरनिराळ्या आरोपांवरून पकडून त्यांनीं पत्र

चालविणें अशक्य करून टाकलें. शेवटीं स. १८३६ मध्यें आम्हांला पत्र बंद करावें लागलें."

या अज्ञातवासाचा परिणाम मॅझिनीच्या मित्रांच्या प्रकृतीवर होऊं लागला; पोलिसांना चुकविण्यासाठीं लागणारी तडफ त्यांचेंमध्यें राहिली नाहीं; शिवाय, स्विट्झरलँडमध्येंच राहिलें पाहिजे असें महत्वाचें कांहीं कामहि नसल्यामुळें या मंडळींनीं स्विट्झरलँड सोडावयाचें ठरविलें. मॅझिनीच्या मुंडक्याला इनाम नव्हतें असा एकच देश त्यावेळीं युरपमध्यें होता—हा देश म्हणजे इंग्लंड! स. १८३७ च्या जानेवारी महिन्यांत हे हद्दपार लोक लंडन येथें दाखल झाले.

स्विट्झरलँडमधील परिस्थितीचा मॅझिनीच्या मनावर व शरीरावर फार अनिष्ट परिणाम झाला; युरपियन राज्यकर्त्यांच्या जाळ्यांतून निसटण्याकरितां त्याला अनेक शारीरिक अपेष्टा सोसाव्या लागल्या; तत्वनिष्ठा अंतःकरणांत नसलेल्या अनुयायांनीं संकटें येतांच मॅझिनीवर अकृतज्ञतेचा व वैयक्तिक टीकेचा भडिमार केला—त्यामुळें त्याला मानसिक यातना भोगाव्या लागल्या. स्वतःवर येणाऱ्या संकटांची त्यानें कधींच पर्वा केली नाहीं. "अनाथांचें संरक्षण करावयाचें व त्यांना समर्थ करावयाचें कार्य आम्हीं हातीं घेतलें आहे; आम्हांला अनेक दुःखें भोगावीं लागतील हें निर्विवाद आहे. अनेक जीवांच्या अनेक शतकांच्या दुःखांचा भार आम्हांला पेलावयाचा आहे. ह्या दिव्य कार्याचा स्फुलिंग आम्हांस प्रत्यक्ष परमेश्वरापासून प्राप्त झालेला आहे!" या अपेष्टा भोगीत असतांना स्वतःच्या तत्वांबद्दल त्याच्या मनांत संशय उत्पन्न झाला! ह्या संशयाच्या वावटळीची करुण कहाणी त्याच्याच शब्दांत येथें दिलेली आहे. सॅव्होनाच्या तुरुंगांत त्याच्या मनांत आलेले विचार या वावटळींत तावून सुलाखून निघाले. आत्मपरीक्षणाचे हे विचार कोणाहि सहृदय वाचकाच्या डोळ्यांतून आंसवें काढतील—इतके ते कोमल व करुण आहेत.

"या वर्षाच्या शेवटच्या महिन्यांत झालेल्या यातनांची आठवण, मी शेंकडों वर्षे जगलों तरी बुजणार नाहीं! या प्रसंगाचा उल्लेख करतांना माझ्या जीवाला अत्यंत कष्ट होत आहेत; हा उल्लेख मी एवढ्याचसाठीं करीत आहे कीं, ज्यांच्या नशीबीं असले प्रसंग भोगावयाचें लिहिलेलें असेल त्यांना धीर यावा आणि संशयाच्या आवर्तांतून त्यांनींहि आत्मोन्नतीचा मार्ग आक्रमावा. ज्यांनीं ज्यांनीं स्वतःला एकाद्या महत्कार्याला वाहून घेतलें आहे व ज्यांचें हृदय निसर्गतःच प्रेममय आहे त्यांना एकदां तरी संशयाचे वादळांत सांपडावें लागतें अशी माझी

कल्पना आहे. असें संशयाचें वादळ माझ्या आत्म्याला गुरफटूं लागलें—तें इतकें कीं, या नैतिक वादळांत माझा आत्मा अगदीं नष्ट व्हावयाच्या बेतांत आला!

" माझें मन निसर्गतःच प्रेमाचें भुकेलें आहे. लहानपणीं मातेच्या सस्मित मुखाकडे पाहून मला उल्हासाच्या उकळ्या येत असत—आतां त्या नुसत्या कल्पनेनें तसाच उमाळा मला या घटकेपर्यंतहि येतो. स्वतःच्या सुखाची नाहीं तरी इतरांच्या कल्याणाची उत्कट इच्छा माझ्या अंतःकरणांत सदैव जागृत असे. परंतु या माझ्या प्रेमाकांक्षी, आशामय व कोमल मनाभोंवतीं त्या महिन्यांत निराशा, दुःख व विश्वासघात यांचा इतका भयंकर वणवा पेटला होता कीं, जीवनाच्या सायंकाळच्या अंधःकाराची छटा माझ्या मुखावर प्रकट झाली! एकाकी, अज्ञातवासी, आयुष्याचें उद्दिष्ट म्हणून अंगीकृत केलेल्या कार्यांत अपयश आलेलें—भविष्य काळांत उत्साहाला कोठेंहि स्थळ नाहीं—असें आयुष्य आपणांस कंठावें लागणार हें मला दिसून येऊं लागलें! मला कोणाचाहि आधार नाहीं व समाधानास जागा नाहीं, अशी माझ्या मनाची वृत्ति झाली!

" माझीं दुःखें मी कोठवर सांगूं? त्यांना अंतच नाहीं! माझ्या इटलीच्या उद्धाराचा शेवटचा आशातंतु तुटला! आमच्या मंडळींतील विश्वासु लोकांची वाताहात झाली! स्वित्झरलँडमध्यें केलेल्या कामाचाहि नायनाट झाला. आम्हांला देशोधडीला लावण्यांत आलें! ज्या पवित्र कार्याच्या विजयासाठीं आम्ही झटत होतों त्या कार्याच्या पूर्ततेंत अनंत व अनिवार्य विघ्नें उपस्थित झालीं. माझ्या दुःखांची मालिका येथेंच संपत नाहीं. आजपर्यंत माझ्यावर लोकांचें निस्सीम प्रेम होतें; त्यामुळें या युद्धांत मला धीर येत असे. पण आतां माझ्याविषयीं सर्वांनाच अविश्वास वाटूं लागला! आपण अंगीकारलेल्या कार्यांत हजारों अडचणी येतील हें माझ्या अनुयायांना ठाऊक होतें; जो मार्ग आपण स्वीकारीत आहों तो दुःखानें भरलेला आहे हें त्यांना माहीत होतें; तीं सर्व दुःखें सहन करूनहि आम्ही आपल्या कार्यांत यशस्वी होईपर्यंत अविश्रांत श्रम करूं अशी त्यांनीं शपथ घेतलेली होती—पण ते आपली आणभाक विसरले; ते क्रियानष्ट झाले! ज्या कार्याच्या पूर्ततेसाठीं त्यांनां मी उत्तेजन देत होतों त्या कार्यांत उदात्त व परार्थपरायण हेतु नसून माझा कांहीं तरी स्वार्थच आहे अशी त्यांची समजूत झाली! असला संशय साधारण लोकांच्या मनांत आला असता तर त्याला मी भीक घातली नसती; पण ज्यांचेवर माझा पूर्ण विश्वास, जे माझ्या प्रेमाचें केंद्रस्थान, अशा माझ्या जिवलग मित्रांच्या मनांत शंका उत्पन्न होऊं लागल्या

तेव्हां मात्र मी पूर्णपणें निराशेच्या ताब्यांत गेलों! ऐहिक सुखावर लाथ मारून स्वत:ला या कार्याला वाहून घेतल्यामुळें मला किती अपेष्टा भोगाव्या लागल्या हें त्यांना माहीत होतें. चोहोंकडून संकटें कोसळत असतांना ते मला धीर देतील अशी मला फार आशा होती; त्यावेळीं माझ्या जीवाला विश्वासाची व प्रीतीची तहान लागली होती. माझे शत्रु माझ्या कृत्यांवर दुष्ट हेतूंचें आवरण घालीत होते तेव्हां मला आशा होती कीं, आपल्या प्रेमळ मित्रांजवळ मी माझें अंत:करण उघडें करीन; मला वाटत होतें कीं, त्यांच्या प्रेमळ सहानुभूतीनें माझ्या मनाला प्रोत्साहन मिळेल; मला आशा होती कीं, या संकटसमयीं निदान माझे जिवलग मित्र तरी मला सोडणार नाहींत, निदान त्यांना तरी माझ्या सुखसंन्यासाचें मर्म कळून येईल! पण माझ्या तृषित मनाला व उत्कट आशेला निराशेशिवाय कांहींच मिळालें नाहीं!—

"मला दिसून आलें कीं, मी या जगांत अगदीं एकटा आहें—फक्त माझ्या आईचा जीव मात्र माझ्यासाठीं तळमळत असेल, आणि तीहि लांब, इटलीमध्यें माझ्यासाठीं दु:खानें होरपळून गेलेली! ह्या कल्पना मनांत येतांच मला सर्वत्र भयाण शून्यता दिसूं लागली! त्या शून्यतेमध्यें मी गांगरून गेलों असतांना संशयाच्या वावटळींत सांपडलों. मला वाटूं लागलें कीं, कदाचित् जग म्हणतें तेंच खरें असेल, माझी एकट्याचीच कांहीं तरी चूक होत असेल. माझें ध्येय हें माझेंच मनोराज्य कशावरून नसेल? कदाचित् अहंकारामुळें मी माझें तेंच खरें असा हेका धरून बसलों असेन!

"मला संशयपिशाच्चानें पछाडलें तेव्हां या भेसूर कल्पनांची माझ्या मनाला सुयांसारखी टोंचणी लागली; मला स्वत:बद्दल तिरस्कार वाटूं लागला; मला वाटलें कीं मी गुन्हेगार आहें—मी केलेल्या पापांचें परिमार्जन कोणत्याहि प्रायश्चित्तानें होणें शक्य नाहीं! खुनी मनुष्याच्या पाठीस त्याची हत्या लागते, त्याप्रमाणें ज्यांना गोळ्या घालून ठार मारण्यांत आलें होतें त्यांच्या प्रतिमा माझ्या डोळ्यांसमोर उभ्या राहूं लागल्या! त्यांना फिरून सजीव करणें शक्य आहे काय? किती मातांचा तळतळाट माझे मस्तकावर पडला असेल? मी जर आपला हट्ट सोडणार नाहीं आणि आपल्या देशाचें मुख निष्कलंक व उज्वल व्हावें यासाठीं इटलीच्या तरुणांस आत्मसमर्पण करावयासाठीं अशीच चेतना देत राहिलों तर आणखी कितीतरी मातांना अश्रू ढाळावे लागतील! आणि स्वतंत्र इटलीची कल्पना हें नुस्तें माझें मनोराज्यच असेल तर? कालचक्रामध्यें

दोनदां जगाचें धुरीणत्व घेतल्यामुळें इटलीला क्षीणता तर आली नसेल ? नि:सत्व व मृतप्राय झालेल्या इटलीनें यापुढें सदोदित सशक्त परकीयांच्या ताब्यांत रहावें असा तर परमेश्वराचा संकेत नसेल ना ? असें असेल तर भविष्याबद्दल जबाबदारी शिरावर घेऊन, माझ्याच काल्पनिक ध्येयाच्या प्राप्तीसाठीं, हजारों माणसांना त्यांच्या देहाचा व त्यांना प्रिय असणाऱ्या सर्व बंधनांचा त्याग करावयासाठीं उत्तेजन द्यावयाचा मला काय अधिकार ?

" ह्या शंकांचा माझ्या मनावर किती भयंकर परिणाम झाला हें मी येथें सांगत बसत नाहीं–एवढेंच कीं, पश्चात्ताप व अनिश्चितता यांच्या वेदना असह्य होऊन मला वेड लागलें ! रात्रीं झोंपेंतून मी खाड्दिशीं उठावें व वायूच्या लहरीमध्यें असलेल्या मनुष्यासारखें दरवाजाकडे धांवत जावें ! मला वाटे कीं, माझा परमप्रिय जाकोपो रफीनी मला हांक मारीत आहे ! जे माझे स्नेही तुरुंगांत अपेष्टा भोगीत पडलेले आहेत, जे माझ्यापासून फार दूर आहेत हें मला माहीत होतें, ते माझ्या शेजारच्या खोलींत मला भेटावयास आले आहेत व मला हांक मारीत आहेत असें मला वाटे. त्यांना भेटावयासाठीं थरथर कांपत मी या खोलींतून त्या खोलींत भटकत फिरत असें ! एकादा य:कश्चित् शब्द किंवा जरा कठोर आवाज ऐकतांच मला रडूं कोसळे !

" त्यावेळीं आसपासचा सर्व प्रदेश बर्फानें आच्छादलेला होता; मला वाटे कीं, पृथ्वीनें शववस्त्र परिधान केलें आहे ! सर्व प्रदेश स्मशानासारखा भयाण दिसे—आणि तें स्मशान मला आपल्याकडे बोलावीत आहे असें मला वाटे ! कोणाचीहि नजर मजकडे लागलेली दिसतांच मला वाटूं लागे कीं, त्या नजरेंत माझ्याबद्दल तिरस्कार भरलेला आहे ! माझ्या जीवनाच्या सर्व शक्ति सुकून जाऊं लागल्या होत्या, माझा धीर सुटत चालला होता. ही भयंकर स्थिति आणखी कांहीं काळपर्यंत टिकती तर मी कायमचा वेडा झालों असतों—किंवा आत्महत्येच्या पापाचा अधिकारी झालों असतों ! माझ्या जीवाला अनंत यातना होत होत्या—हें पाहून एका तरुण मुलीला माझी करुणा आली; तिनें माझ्या एका शेजाऱ्याला विनवणी केली कीं, मला एकटें न ठेवतां कोणीतरी मजजवळ नेहमीं राहील अशी व्यवस्था करावी; त्या गृहस्थानें तिला उत्तर दिलें, ' छे छे, तो चैनींत आहे ! गुप्त कट रचीत एकलकोंडेपणांत राहण्यांतच त्याला खरें सुख होतें ! ' हाय ! दुसऱ्याच्या मनाची स्थिति

जाणणें किती दुर्घट आहे ? मायेवांचून कढ नाहीं ! सहानुभूतीच्या अभावीं मनोविकारांचा विपर्यास मात्र होतो !

" एके दिवशीं सकाळीं जागा होतों तों एकाद्या अरिष्टांतून पार पडलेल्या मनुष्याप्रमाणें माझें मन एकाएकीं समाधानयुक्त व शांत झालेलें आहे असें मला वाटलें. हा वेळपर्यंत झोपेंतून मी ज्या क्षणीं जागा होई तो क्षण मला अत्यंत उद्विग्नतेचा वाटत असे; माझ्या दु:खमय अस्तित्वाला त्या क्षणापासूनच आरंभ होत असे—जणूं काय मला भोगाव्या लागणाऱ्या सर्व यातनांची बेरीजच तो क्षण माझ्यापुढें मांडीत असे ! पण त्या दिवशीं सकाळीं जागा होतांच माझ्या मनाला अनपेक्षित समाधान वाटलें. माझ्या जीवाला समाधान देण्यासाठीं त्या दिवशीं सर्व सृष्टि स्मितवती झाली आहे असें मला वाटलें ! माझ्या जीवशक्तींना प्रफुल्ल करावयासाठीं सूर्य आपले कोमल किरण माझ्या अस्थिपंजरावर पाडीत आहे असें मला वाटलें ! 'तूं अहंकाराच्या तावडींत सांपडला आहेस; तुझीं सर्व दु:खें अहंकारामुळेंच उत्पन्न झालीं आहेत; जीवितसाफल्य कशांत आहे हें तुला कळत नाहीं; तुझी आयुष्याच्या इतिकर्तव्यतेची व्याख्या चूक आहे आणि म्हणूनच तूं ह्या दु:खांमध्यें गटंगळ्या खात आहेस.' असे विचार माझ्या मनांत येऊं लागले.

" आयुष्याची इतिकर्तव्यता काय आहे, जीविताचें साफल्य कशांत आहे–ह्या प्रश्नाच्या उत्तरावरच सर्व तत्वज्ञानाचा पाया आहे. हिंदुस्थानच्या प्राचीन धर्मांत ईश्वरध्यान हेंच आयुष्याचें इतिकर्तव्य होय असें प्रतिपादन केलें आहे; म्हणूनच गतिमांद्य, क्रियाशून्यता हीं आर्य लोकांचीं मुख्य लक्षणें झालीं ! ख्रिश्चन धर्मांत सांगितलें आहे कीं, आयुष्य पापपरिमार्जनार्थ आहे–म्हणून व्यक्तिमात्रानें येतील त्या विपत्ति सहन कराव्या, त्यांचा प्रतिकार करणें हें मनुष्याचें कर्तव्यच नाहीं अशीं मतें प्रतिपादन करण्यांत आलीं. या व्याख्येमुळें पृथ्वी हें तापत्रयांचें वसतिस्थान आहे आणि मोक्षप्राप्तीचा मार्ग ऐहिकाविषयीं उदासीनता ठेवण्यांत आहे–अशीं मतें रूढ झालीं ! पुढें अठराव्या शतकांत जडवाद उत्पन्न झाला; आयुष्य हें सुखसंपादनार्थ आहे अशी आसुरी व्याख्या या पंथानें प्रकट केली ! या व्याख्येमुळें व्यक्तींमध्यें अहंकाराचा उद्भव झाला. सर्वांच्या कल्याणासाठीं आपण कांहीं कार्य करणार आहों अशी बतावणी करून विशिष्ट वर्गानें उठावणी करावयाची-मात्र स्वत:चा लाग साधतांच माघार

ध्यावयाची–असे अनेक प्रकार आज होत आहेत; हीं निंद्य कर्मे हा त्याच सिद्धांताचा महिमा आहे ! बुद्धीचें अस्थैर्य व विपत्तीपुढें महत्कार्याचा त्याग हींहि ह्याच नफ्यातोटयाच्या सिद्धांताचीं फळें आहेत. नीतीपेक्षां, तत्वापेक्षां सुखसाधन जास्त महत्वाचें आहे असें याच सिद्धांतामुळें मानण्यांत येऊं लागलें. आजूबाजूच्या परिस्थितीचें परीक्षण केल्यावर मला आढळून आलें कीं, आधुनिक युगावर या आसुरी तत्वाचा पगडा बसलेला आहे. मी आत्मपरीक्षण करूं लागलों तेव्हां मला दिसून आलें कीं, या तत्वाचा आपल्या मनावरहि थोडाबहुत ताबा आहे !

" आयष्य हें सुखासाठीं आहे या निंद्य, अधोगामी व आसुरी विचाराचा मला उपजतच तिरस्कार वाटत असे. या विचाराचीं पाळेंमुळें इतरांच्या मनांतून उपटून काढावयाचा मी प्रयत्न केला पण स्वतःच्या मनांत त्याच विचाराचे अंकुर अझूनहि आहेत असें मला आढळून आलें ! माझ्या मनांत सुखाची इच्छा होती परंतु जणूं काय मला फसविण्यासाठीं म्हणून प्रीतीच्या रूपानें ती माझ्या हृदयांत वास करीत होती ! माझ्या मनांत प्रेमाची, सहानुभूतीची आसक्ति होती; पण प्रीतीचें खरें स्वरूप मात्र मला कळलें नव्हतें; मी प्रेमाला ऐहिक आशेचें बंधन घातलें, प्रीतीची निरपेक्ष पूजा न करितां तिच्यापासून उत्पन्न होणाऱ्या सुखाची मी पूजा करूं लागलों होतों; हें सुख आपणांस मिळत नाहीं असें दिसतांच मी अगदीं निराश होऊन गेलों होतों. परमेश्वराच्या प्रेरणेनें प्रीतीचा प्रादुर्भाव हृदयामध्यें होतो, तिचा आपण साभार स्वीकार केला पाहिजे. जीवनाच्या यात्रेमध्यें अंतःकरणाला प्रीतीची सोबत मिळाली तर त्याबद्दल आपण परमेश्वराचे आभार मानले पाहिजेत. पण प्रीति ही परमेश्वराची देणगी आहे असें मानावयाचे ऐवजीं प्रीतीची प्राप्ति हा माझा हक्कच आहे असा मी हट्ट धरला होता ! माझ्यावर लोक प्रेम करतील, मजबद्दल सहानुभूति बाळगतील तरच माझें कर्तव्य माझ्या हातून घडेल अशी मी माझ्या कार्यामध्यें अट घातली होती ! ऐहिक सुखाच्या पलीकडे जी प्रीति असते तीच खरी प्रीति, हें आजपर्यंत माझ्या ध्यानांत आलें नव्हतें. प्रीतीपासून प्राप्त होणाऱ्या आनंदाला मी माझ्या हृदयाचें अधिदैवत केलें होतें; तो आनंद नाहींसा होतांच मी निराशेमध्यें बुडून गेलों. जणूं काय सुखदुःखांमुळें कर्तव्यांत फेरफार पडतो ! आकाश निरभ्र असो किंवा ढगांनीं भरून आलेलें असो, प्रवासाच्या उद्दिष्टांत त्यामुळें कांहीं फेरबद्दल होतो काय ?

" हा जन्म कांहीं एकदम आलेला नाहीं किंवा एकदम नष्ट होणारा नाहीं. अनंत जन्मांतून प्रगमन होतां होतां जीवात्मा परमात्म्याला मिळतो. जन्मांच्या परंपरेंत दुःखें सहन केलींच पाहिजेत; परमेश्वराप्रत जावयाच्या मार्गांत होणारे श्रम म्हणजेच हीं दुःखें होत. कालचक्रामध्यें फिरत असतांना या एकाच जन्मांत मलाच काय तो प्रकाशाचा किरण दिसला नाहीं म्हणून या विश्वांत सूर्यच नाहीं असें मी कसें म्हणूं ? सामान्य जनांप्रमाणें स्वतःला मुक्त मानीत असतांच मीहि अहंकाराच्या तावडींत सांपडलों होतों, त्यांचेप्रमाणेंच मी स्वतःला मुक्त मानीत होतों !

" आयुष्य हें कर्तव्य आहे; आयुष्य हें परमेश्वराचें नियोजित कार्य आहे—हीच जीविताची खरी व्याख्या आहे. आयुष्याच्या इतर सर्व व्याख्या चुकीच्या आहेत. धर्मशास्त्र व तत्वज्ञान यांच्या सर्वच निर्णयांचा समेट होत नाहीं—पण मानवी जीविताला ध्येय आहे या सिद्धांताविषयीं मात्र त्या सर्वांची एकवाक्यता आहे. मनुष्यामध्यें अनेक शक्तींचे अंकुर असतात—त्या शक्तींचा विकास करणें आणि विकसित शक्तींना चालना देऊन मानवी जीवनाचा हेतु व मानवी प्रगमनाची दिशा यांचा शोध लावण्याकडे प्रवृत्ति ठेवणें हेंच तें ध्येय होय. देशकालपरिस्थित्यनुसार प्रत्येक व्यक्तीला अनेक कर्तव्यें असतात. मानवी जीवनाचें अंतिम साध्य शोधण्याचे कामीं प्रत्येक व्यक्तीनें झटलें पाहिजे; कारण हेंच मानवी जीवनाचें प्रधान कर्तव्य आहे; इतर सर्व कर्तव्यें दुय्यम प्रतीचीं आहेत; त्यांच्या पूर्ततेनें मानवी शक्तींचा विकास होतो, मानवी जीवनाची एकवाक्यता होते.

" मानवजात अजून बाल्यावस्थेंत आहे, म्हणून मानवी ज्ञान व शक्ति हीं फारच मर्यादित आहेत. म्हणूनच आपणांस जीवनाच्या ध्येयाबद्दल निश्चिततेनें बोलतां येत नाहीं. जन्मभर खात राहणें, देहव्यापार चालविणें व शेवटीं मरून जाणें हा आयुष्यक्रम मनुष्यें, जनावरें आणि वनस्पति यांना साधारण आहे. झाडपाला व कुत्रींमांजरें यांच्या आणि मानवी प्राण्यांच्या जीवनांत जर कांहीं भेद असला तर तो इतकाच आहे कीं, यदृच्छेनें अस्तित्वाचे जे कांहीं क्षण आपल्या वांट्याला आलेले आहेत त्यांमध्यें, ज्या समाजांत व परिस्थितींत आपण समाविष्ट झालेले आहोंत त्या समाजाची शक्य ती उन्नति करण्यास झटणें हें आपलें कर्तव्य आहे; हें उद्धाराचें कार्य करावयासाठीं अनुकूल परिस्थिति निर्माण करणें हें आपलें कर्तव्य आहे. जनावरें व वनस्पति यांना सामाजिक जीवन नाहीं, त्यांना कर्तव्येंहि नाहींत.

" आत्मा अविनाशी आहे, काल अनंत आहे. मानवी शक्तींचा विकास करणें आपल्याच हातीं आहे. मनुष्यमात्रानें आपला आत्मा सदैव पवित्र ठेविला पाहिजे; आत्म्याला अहंकाराचा स्पर्शहि होतां कामा नये. चित्तशुद्धीनंतर मनुष्यानें मानवी जीवनाचें महत्व व पावित्र्य जाणलें पाहिजे; मग आपल्या भोंवतालच्या परिस्थितीचें निरीक्षण करून समाजाच्या अत्यंत निकडीच्या गरजा काय आहेत हें ठरविलें पाहिजे; नंतर आपलें सामर्थ्य किती आहे, आपणांस कोणतें कार्य करतां येईल हें ज्याचें त्यानें अजमावून पाहिलें पाहिजे. आपलें कर्तव्य ठरवितांना मनुष्यानें निष्कामबुद्धीनेंच विचार केला पाहिजे. पूर्वग्रहानें अथवा दुराग्रहानें दूषित झालेल्या मनानें आयुष्याच्या कर्तव्याचा निर्णय लागणें शक्य नाहीं. स्फूर्ति, पावित्र्य, प्रेम व जागृत विचारशक्ति यांच्या सहाय्यानें आणि संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाच्या दृष्टीनेंच हा प्रश्न सोडविला पाहिजे. ज्या कालांत व ज्या परिस्थितींत परमेश्वरानें आपणांस निर्माण केलें आहे त्या कालांत व परिस्थतींत मनुष्यजातीच्या ज्या गरजा असतील त्या भागविण्यासाठीं आपल्या सामर्थ्याप्रमाणें आपला भाग ठरवून घेतल्यानंतर-आपल्या आयुष्याच्या कर्तव्याचा निर्णय लावल्यानंतर-ही परमेश्वराची कामगिरी आहे अशा निष्ठेनें आपलें आयुष्य त्या कार्याला अर्पण करण्याचा निश्चय केल्यानंतर, मग मात्र—माझ्या तरुण बंधूंनो, तुम्ही कोणत्याहि संकटाला भीक घालतां कामा नये. त्या कर्तव्याच्या पूर्ततेसाठीं आपल्या सर्व शक्ति खर्ची घाला; मग लोक तुमच्यावर प्रीति करोत अथवा तुमचा द्वेष करोत; मग इतर लोक तुम्हांला सहाय्य करोत अथवा तत्वनिष्ठांच्या वांट्याला येणाऱ्या एकांतवासांत तुम्हांला आपलें आयुष्य कंठावें लागो. आपला मार्ग एकदां आंखून, घेतल्यानंतर मग कोणत्याहि दु:खाला अगर मोहाला बळी न पडतां तुम्हीं आपलें कर्तव्य पूर्ण केलेंच पाहिजे, आणि हें जर तुमच्या हातून होणार नाहीं तर परमेश्वराच्या दृष्टीनें तुम्ही भ्याड ठराल !

" स्वत:च निर्माण केलेल्या जीवनाच्या तत्वज्ञानावरील माझा विश्वास कांहीं कालपर्यंत उडाला होता हें मी सांगितलेंच आहे. या संशयाच्या वादळामुळें माझ्या पूर्वीच्याच तत्वांचें दृढीकरण झालें. धर्म आणि इतिहास यांच्या पायावर माझें हें मानवी जीविताचें तत्वज्ञान उभारलेलें आहे. परमेश्वराच्या अस्तित्वापासून आरंभ करून मानवी जीवन प्रगमनशील आहे या तत्वापर्यंत मी आलों; प्रगमनाच्या सिद्धांतावरूनच जीविताच्या इतिकर्तव्यतेचा निर्णय

लावलेला आहे. मनुष्यप्राण्यास निर्माण करण्यांत परमेश्वराचा कांहींतरी हेतु आहे हें मान्य केल्यानंतर कर्तव्यपरिज्ञान आणि कर्तव्यपरायणता हाच मानवी जीवनाचा प्रधान आचार होय असा निर्णय आपोआपच निघतो. आयुष्य हें कर्तव्य आहे, आयुष्य म्हणजेच परमेश्वरानें मनुष्याला नेमून दिलेली कामगिरी, परमेश्वराच्या संकेताची पूर्तता, अशी निष्ठा उत्पन्न झाल्यावर यापुढें कर्तव्य-परिपालनांत अविश्वास किंवा आळस करावयाचा नाहीं अशी मी शपथ घेतली. ह्या स्वात्मार्पणांतूनच मी शांततेप्रत आलों. निराशेमुळें ही शांतता मी बळेंच ओढून ताणून आणली होती हें मला कबूल आहे; पण याच शांततेमुळें मला सहनशीलता आली. माझ्या ऐहिक अस्तित्वांतील वैयक्तिक सुखांच्या आशेला मी फांटा दिला. माझ्या स्वतःच्या हातानें मी सुखाशेच्या थडग्याचा खाडा खणला—पण हें थडगें प्रीतीला पुरावयासाठीं खोदलें नव्हतें; माझे केंस आतां शुभ्र झालेले आहेत, तथापि तारुण्याच्या भरांत माझें मन जितकें प्रेममय होतें तितकेंच तें आजहि आहे, याला ईश्वर साक्ष आहे;—प्रीतीला नव्हे तर फला-शेला, उत्कंठेला, प्रीतीपासून प्राप्त होणाऱ्या सुखाच्या आशेला गाडून टाकावयासाठीं मी खाडा खणला आणि त्यावर आपल्याच हातानें माती लोटली ! कां तर त्यांत पुरून टाकलेला अहंकार पुन्हां वर येऊं नये ! अनेक कारणांमुळें माझ्या जीवाला आजपर्यंत सुखाचा लेशहि मिळाला नाहीं; सध्यां माझें जीवन दुःखमयच आहे आणि शेवटपर्यंत तें असेंच राहील. पण त्या क्षणापासून माझें दुःख कर्तव्यपालनाच्या आड येऊं शकलें नाहीं. इटलींतील रम्य उषःकालच्या प्रभेनें नभ भरून गेलेलें असो, किंवा उत्तर ध्रुवावरील प्रेतकळा धारण केलेली हिममय सृष्टि आजूबाजूस पसरलेली असो—त्यामुळें आपल्या कर्तव्यांत कांहींच फरक होत नाहीं. परमेश्वराचें अधिष्ठान या ऐहिकाचे पलीकडे आहे आणि त्याच्याच आज्ञेनुरूप कर्तव्याचा, एकनिष्ठेचा व भविष्याचा ध्रुवतारा आपल्या हृदयाकाशांत सदैव चमकत असतो ! ”

# ५. लंडन–निवास.

( १८३७–१८४३ )

" Wherefore then wast thou
Outlaw in every kingdom of the world
Except in England ? England, thank thou God
For that cold shelter that thou gavest him,
For which he blessed thee, giving thee back love
For the long years of scornful disregard ! "

लंडन–गृहस्थिति–स्नेहसंबंध–कार्लाइल पतिपत्नी–निराश्रित इटालियन मुलांची शाळा–कामकरी वर्गाचा प्रश्न–कामकरी वर्गासाठीं वर्तमान-पत्र–बॅंडिएरा बंधूचा वृत्तांत–पोस्ट ऑफिस प्रकरण–नंतर.

रफीनी बंधूंसह मॅझिनी स. १८३७ च्या जानेवारी महिन्यांत लंडन येथें आला. क्रान्तिकारकांचा हा सम्राट् आपल्या राशीस बसला होता, तो एकदांचा निघून जात आहे हें पाहून फ्रेंच सरकारला अतिशय आनंद झाला; या आनंदाचे भरांत फ्रेंच अधिकाऱ्यांनीं मॅझिनीला प्रवासांत हरएक प्रकारची मदत केली. युरपियन राज्यकर्त्यांच्या राक्षसी राजकारस्थानांमध्यें इंग्लंडचा कांहीं संबंध नव्हता म्हणून या हद्दपारांच्या गळ्यांभोंवतीं त्यांनीं टाकलेला फांस इंग्लंडमध्यें पोंचत नसे. इंग्लंडांत आल्यावर या मंडळींना मोकळेपणानें वावरतां येऊं लागलें. अज्ञातवासांत त्यांनीं खोटीं नांवें धारण केलीं होतीं, आतां त्यांना बारशाचें नांव वापरतां येऊं लागलें ! मॅझिनीच्या चरित्रांतील इंग्लंडनिवास हा भाग इटलीच्या दृष्टीनें फारसा महत्वाचा नाहीं, व्यक्तिचरित्राचा एक विभाग एवढेंच त्याचें महत्व आहे.

बर्फानें आच्छादलेले पर्वत, त्यांवर पसरणारी संध्येची शोभा, या स्वित्झर-लँडमधील मनोहरतेला मॅझिनीला मुकावें लागलें. आल्पस्‌चा वियोग होऊन ह्या " सूर्यप्रकाशाला मुकलेल्या, जीवनसंगीताचा लेशहि नसलेल्या " लहानशा बेटांत राहण्याचा प्रसंग आल्यामुळें त्याच्या हृदयाला कोरड पडली. लंडनच्या उंच उंच हवेल्या पाहून पाहून त्याचा जीव इतका कंटाळून गेला कीं, पुढें पुढें तर त्यानें खिडकीपाशीं जाण्याचेंहि सोडून दिलें ! लंडनचें दाट धुकें मात्र त्याला मनापासून आवडत असे. " या धुक्यामुळें साऱ्या शहरावर एक जादूच पसरली आहे असें वाटतें. रस्त्यांतून वावरणारीं माणसें भुतासारखीं अंधुक अंधुक दिसतात, आपण स्वत: जड स्वरूपांत वावरत आहों कीं आपला आत्माच या भूतसृष्टींत फिरत आहे याचा मनाला क्षणभर भ्रम पडतो! जड व स्पष्ट अशा या लंडन नगराला या धुक्यामुळें अलकावतीचें अस्पष्ट व काव्यमय स्वरूप प्राप्त होतें ! "

लंडनमध्यें प्रथम मॅझिनीचे फार हाल झाले. लंडन येथें ज्या लोकांच्या संगतींत रहावयाचें त्याच्या नशीबीं आलें होतें त्यांचा स्वभाव अत्यंत विचित्र होता. ऑगस्टीनो रफीनीचें मन अगदीं क्षुद्र होतें व स्वभाव अतिशय फटकळ होता. मॅझिनीचें अंत:करण मूळचें फार उदात्त होतें पण यावेळीं त्याचाहि स्वभाव हेकेखोर बनला होता; अर्थातच या दोघांचे वारंवार खटके उडत असत. रफीनी मॅझिनीबरोबर भांडत असे खरा, पण आपल्या क्षुद्रपणाबद्दल त्याला कित्येक वेळां पश्चात्ताप होत असे; अशाच एका वेळीं त्यानें मॅझिनीला प्रतिज्ञेवर लिहून दिलें होतें कीं, यापुढें मी आपल्या मनोवृत्ति बेताल होऊं देणार नाहीं—आणि हें प्रतिज्ञापत्रक मी आठवड्यांतून तीन वेळां वाचीत जाईन ! पण ही प्रतिज्ञा कागदावरच राहिली. खावें, प्यावें, मजा करावी—अशा प्रकारची त्याची प्रवृत्ति होती; कर्तव्यधर्माची तपश्चर्या करावयाची त्याची पात्रता नव्हती. मॅझिनीला हें माहीत नव्हतें असें नाहीं—पण तो आपला जुना मित्र म्हणून व त्याच्या आईचें आपल्यावर किती प्रेम आहे याची आठवण ठेवून मॅझिनी त्याचेबरोबर अत्यंत उदारपणें वागत असे. मॅझिनीला लागणारे कपडे यावेळीं त्याची आई जिनोआहून पाठवीत असे; भारी किंमतीचे कपडे पाठविले तर आपले चिरंजीव ते विकून टाकून सर्वांना पुरतील असे स्वस्त दराचे कपडे करवितील हें तिला ठाऊक होतें, म्हणून तिजकडून चौघांना पुरतील इतके कपडे नेहमीं येत असत ! मॅझिनी प्रथम हद्दपार झाला तेव्हां त्याला घरून कोणत्याहि प्रकारची मदत

द्यावयाची नाहीं असा त्याच्या वडिलांनीं निश्चय केला होता; त्यांची कल्पना होती कीं, दारिद्र्याच्या अपेष्टांमुळें तो लवकरच मऊ येईल, सरकारची माफी मागेल व मग त्याला पुन्हां घरीं येऊन उद्योगधंदा करतां येईल ! आपल्या मुलाची एकनिष्ठा किती दृढ आहे, त्याच्या कार्याची महती केवढी आहे ह्याचा समज डॉक्टरमजकुरांना पडला नव्हता; पण त्याच्या आईला मात्र मुलाच्या कार्याची महती समजली होती. घरखर्चांत शक्य तितकी काटकसर करून दर तीन महिन्यांनीं ती कांहीं रकम आपल्या मुलाकडे पाठवीत असे. घरून येणारे पैसे जमवावयासाठीं आपल्या आईला किती हाल सोसावे लागतात याची मॅझिनीला वार्ताहि नव्हती—तसेंच आपल्या मुलाला या रीतीनें मदत मिळते हें त्याच्या वडिलांनाहि माहीत नव्हतें ! आईकडून त्याला जें कांहीं थोडेंबहुत खर्चावयास मिळत असे तें त्याला एकट्याला देखील पुरलें नसतें; तरी तेवढ्याच रकमेमध्यें परक्या देशांत चौघांचा खर्च चालविण्याचा प्रसंग त्याच्यावर आला होता ! देशाला आत्मार्पण करावयाचें ठरविलें त्या दिवसापासून त्यानें आपली राहणी अगदीं साधी ठेवली होती; म्हणूनच त्याला लंडन येथें जिवंत राहतां आलें !

इकडे मॅझिनीच्या जिवालाहि सुख नव्हतें. "मला जिव्हाळ्याचें असें कोणीच नाहीं आणि असावें अशी माझी इच्छाहि नाहीं," असे कठोर उद्गार याच्या पत्रांमध्यें आढळतात. लंडनमध्यें त्याची कोणाशीं ओळख नव्हती; "या परक्यांच्या घोळक्यांत मला चुकल्यासारखें वाटतें; परदेशी लोकांबद्दल इंग्रजांचें मन अत्यंत संशयी असतें—आणि ज्या परकीयांजवळ पुरेसा पैसा नसतो त्यांचेसंबंधीं इंग्रजांचें वर्तन तर अत्यंत निर्दयपणाचें असतें. त्यांना वाटतें कीं, दारिद्र्य व पाजीपणा हीं परस्परावलंबी आहेत !" दारिद्र्यानें तो इतका गांजून गेला होता कीं, नुस्ते बटाटे व भात खाऊन त्यानें कित्येक दिवस काढले ! स. १८३७–१८३८ मध्यें ह्या दारिद्र्याची अगदीं सीमा झाली होती. "स्वित्झरलंडांत माझ्या मनोवेदनांचा कळस झाला होता, त्यांतून सांवरतों तोंच मी दारिद्र्याच्या तावडींत सांपडलों." मोठ्या वस्तीच्या व उद्योगधंद्यांच्या आधुनिक शहरांमध्यें भोगावें लागणारें दारिद्र्य अत्यंत तीव्र स्वरूपाचें असतें; अशा ठिकाणीं दारिद्र्याच्या चिखलांत रुतलेला मनुष्य वर यावयाचा संभव बहुधा नसतोच.

लेखणीच्या जोरावर उदरनिर्वाह चालविण्याचा प्रयत्न करावा असें ठरवून मॅझिनी त्या उद्योगाला लागला. त्यावेळीं त्याला इंग्रजीमध्यें धडपणें लिहितां

येत नव्हतें; म्हणून त्याला आपल्या लेखांचीं भाषांतरें इतरांकडून करवून घ्यावीं लागत. भाषांतरकर्त्यांना त्यांच्या श्रमाचा मोबदला दिल्यानंतर त्याला स्वत:ला फारच थोडा पैसा उरत असे. त्यानें युरपियन वाङ्मयाचा व राजकारणाचा चांगला अभ्यास केला होता—पण त्यावेळीं इंग्लिश जनतेला ह्या विषयांची गोडी लागलेली नव्हती ! वेगवेगळ्या मासिकांतून मॅझिनीचे बरेच लेख प्रसिद्ध झाले. 'इटलींतील परिस्थिति' 'युरपमध्यें लोकसत्ता,' हे दोन राजकीय आणि 'डॅन्टे,' 'गटे,' 'बायरन,' 'कार्लाइल' व 'जार्ज सँड' हे वाङ्मयात्मक लेख त्यांपैकीं मुख्य होत.

"मला घरून मिळणारे पैसे इटलीच्या कामासाठीं केव्हांच खर्च होऊन जात आणि वर मला कर्ज काढावें लागे ! माझ्या मित्रांच्या चरितार्थाची जबाबदारी माझ्यावरच असल्यामुळें दुसरीकडून मिळविलेले पैसे मिळाले न मिळाले तोंच संपून जात. कित्येकांनीं आठवणीसाठीं नजर केलेल्या वस्तु मला पैशासाठीं गहाण टाकाव्या लागल्या. मग त्यापेक्षां हलक्या वस्तूंस तोच रस्ता दाखवावा लागला ! माझ्या आईची आंगठी, माझें घड्याळ, पुस्तकें, नकाशे—सर्व कांहीं हळू हळू सावकाराच्या घरांत गेलें. सिगारेटस् शिवाय माझें अगदीं चालत नसे-त्यांच्यासाठीं मला एकदां आपला कोट विकावा लागला ! एकदां तर इतकी अवस्था झाली कीं, रविवारच्या भाकरीसाठीं शनिवारच्या बाजारांत माझा कोट व बुटांचा जोड मला एका आडगिऱ्हाइकीच्या दुकानावर फुंकून टाकावा लागला ! नंतर माझ्यापाशीं कांहींच उरलें नाहीं. तेव्हां मी कर्ज काढीत सुटलों !" पोटासाठीं कपड्यांना मुकावें लागल्यामुळें मॅझिनीच्या अंगावर धड कपडेहि नसत—यामुळें त्याला वाचनालयांत जाणें अशक्य झालें ! ही स्थिति कांहीं इटालियनांना समजल्यावरून त्यांनीं त्याला लहानमोठ्या रकमा कर्जाऊ दिल्या, कोणी कर्जासाठीं त्याला जामीन झाले; पण ह्याचा फटिंगपणा सदैव वाढत्या प्रमाणावरच असल्यामुळें पुढें त्याला कोणी कर्जहि देईनासें झालें ! ट्यूरिनच्या लोकांना हें कळल्यावरून त्यांनीं मॅझिनीच्या मदतीसाठीं फंड उभारावयाचें ठरविलें—पण असली फुकाची मदत स्वीकारण्याचें मॅझिनीनें साफ नाकारलें ! उत्तरोत्तर त्याची स्थिति अधिकच वाईट होऊं लागली. "माझी ही स्थिति आईबापांच्या कानावर घालून त्यांचेकडून मला मदत मिळवितां आली असती; माझ्यासाठीं त्यांनीं आपल्या संसारावरहि तुळशीपत्र ठेविलें असतें; माझ्यासाठीं त्यांनीं आजपर्यंत प्रमाणाबाहेर स्वार्थत्याग

केला होता म्हणून मला वाटे कीं, त्यांना तरी त्रास कोठवर द्यावयाचा ? ” इंग्रजी मारवाड्यांनीं चाळीस ते शंभर टक्के व्याजावर रक्कम द्यावयाचें कबूल केलें, आणि ह्या जबर व्याजावर कर्ज घेणें त्याला भाग पडलें ! “ हे सराफ लोक गरीबांच्या अंगांत रक्ताचा एक थेंबहि राहूं देत नाहींत ! ” ह्या त्रासामुळें कित्येक वेळां आत्महत्येचा विचार त्याच्या मनांत येत असे; पण केवळ दारिद्र्यांतून सुटण्यासाठीं आत्महत्या करणें अत्यंत नामर्दपणाचें आहे अशी त्याची ठाम समजूत असल्यामुळें त्यानें हा विचार सोडून दिला.

“दारिद्र्यामुळें माझें मन हलकें झालें नाहीं. माझ्या हाल अपेष्टांचा मी उल्लेखहि केला नसता पण अशा विपत्ति ज्यांच्या नशीबीं येतील त्यांनीं डगमगून जाऊं नये आणि स्वत:ला य:कश्चित् व नीच लेखूं नये एवढयाचसाठीं मी हे उल्लेख केले आहेत. शारीरिक श्रम, तहानभूक वगैरे हालअपेष्टा निमूटपणें सोसावयाचें मनोधैर्य लहानपणींच मुलांच्या अंत:करणांत उत्पन्न केलें पाहिजे–हेंच त्यांच्या भावी कल्याणाचें साधन आहे. विलासांत वाढलेले व उदात्त मनोवृत्तीचे कित्येक तरुण संकटांनीं डगमगून जाऊन गुन्हेगारीस आणि आत्महत्येस प्रवृत्त झालेले मी पाहिले आहेत, त्याच संकटांत मी हांसत खेळत दिवस काढले आहेत. सध्यांच्या परिस्थितींत आपल्या बालकांना वीरवृत्तीचें कडक शिक्षण देणें हें मातांचें कर्तव्य आहे; कारण युरपच्या क्रान्तिकारक स्थितींत कोणावर कसा प्रसंग येईल हें अजमावणें शक्य नाहीं. भावी कल्याणाची तजवीज म्हणून अगोदर कठोरपणा दाखविण्यास न कचरणें हेंच खऱ्या प्रीतीचें लक्षण आहे ! सत्वास जागण्याचें शिक्षण मला माझ्या मातेनें दिलें होतें म्हणूनच मी दारिद्र्याचे तडाके निमूटपणें सहन केले; नाहीं तर मी केव्हांच आत्महत्या करून मोकळा झालों असतों ! भावी कालाची सूक्ष्म दृष्टीनें परीक्षा करून असें कठोर शिक्षण मला माझ्या मातेनें दिलें याबद्दल तिचे उपकार मला वरचेवर आठवतात.” सुखामागें लागल्यानें मन हीन होतें, स्वार्थलंपट होतें हें त्यानें जाणलें होतें. “ स्वार्थत्याग हाच खरा सद्गुण होय. परमेश्वर, मानवजात व स्वदेश यासंबंधींचीं कर्तव्यें पालन करणें हेंच मानवी जीवनाचें रहस्य आहे. ” ह्या कोरड्या तत्वज्ञानांत अंत:करणाचा उमाळा सम्मीलित होतांच त्या सिद्धांतांना धर्माचें पवित्र व हृदयस्पर्शी स्वरूप प्राप्त झालें. जाकोपो रफीनीची आठवण होतांच या मानवधर्मावरील त्याची श्रद्धा अधिकच बळकट होत असे. कितीहि कठोर संकटपरंपरा कोसळली तरी मनुष्यानें डगमगून जाऊं नये–कारण संक-

टांच्या कसोटीवरच मानवजातीची प्रगति, आशा व भवितव्य हीं अवलंबून आहेत—या गंभीर विश्वासामुळेंच त्याच्या हृदयाला नवजीवन प्राप्त झालें.

हळूं हळूं त्याच्या जीवनाच्या भयाण अंधःकारांत प्रकाशाचे कोमल किरण प्रवेश करूं लागले. इंग्रजीमध्यें लेख लिहिण्याचा सराव झाल्यामुळें त्याला अधिक पैसा मिळूं लागला; इंग्लंडांतील बऱ्याच प्रमुख व्यक्तींबरोबर त्याचा स्नेहसंबंध जडून आला; इंग्लंडांतील सामाजिक जीवनाबद्दल त्याला विशेष सहानुभूति वाटत नसे; " येथील सर्व लोकांची दृष्टि सुखाकडे व विचक्षणेकडे असते–स्वसुखापलीकडे त्यांची नजरच पोंचत नाहीं. ह्या लोकांचे ठिकाणीं मूर्तिमंत स्वार्थ अवतरला आहे असें वाटतें. " पण पुढें त्याचीं हीं मतें बदलूं लागलीं व इंग्लंडच्या सामाजिक जीवनाबद्दल त्याला जास्त सहानुभूति वाटूं लागली. इंग्रजांची मतस्वातंत्र्याची आवड, भिन्नमतसहिष्णुता, अंगीकृत कार्यांतील चिकाटी, पुढें घातलेलें पाऊल केव्हांहि मागें न घेण्याचें धैर्य–या गुणांबद्दल त्याला फार आदर वाटूं लागला. " येथें स्नेहसंबंध जडून येणें फार दुर्घट असतें पण एकदां जडलेली मैत्री मात्र अत्यंत जिव्हाळयाची व चिरकाल टिकणारी असते. इंग्रज मित्र नुस्ती तोंडावर साखर पेरीत नाहींत, त्यांची प्रीति कृतीमध्यें व्यक्त होते. माझ्या अस्वस्थ व कंटाळवाण्या आयुष्यक्रमाला माझ्या इंग्रज मित्रांनीं शांतता मिळवून दिली. इतरत्र मला पुष्कळ शाळूसोबती मिळाले. पण खऱ्या व शाश्वत प्रेमाचा अनुभव मला फक्त इंग्लंडांतच मिळाला. इंग्लंडबद्दल मला फार कृतज्ञता वाटते. मातृभूमीइतकेंच माझें या देशावर प्रेम जडलें आहे. माझी जन्मदात्री इटली आहे पण इंग्लंड माझी धर्ममाता आहे. इंग्लंड–निवासाचा मला कधींहि विसर पडणार नाहीं. "

इंग्लंडमधील त्याचा अगदीं पहिला व निकटचा स्नेहसंबंध कार्लाइल * पतिपत्नीबरोबर जडला. " त्यांचें माझ्यावर सख्या भावाइतकें प्रेम आहे. "

---

* कार्लाइल. ( १७९५–१८८१ ) विख्यात इंग्रज लेखक व तत्ववेत्ता. सार्टर रिझार्टस, फ्रेंच रेव्होल्यूशन, हीरोज अँड हीरो वर्शिप या जगद्वंद्य ग्रंथांचा कर्ता. १८२६ सालीं जेन वेल्स हिजबरोबर त्याचा विवाह झाला. ती सुशिक्षित व सुशील होती. कार्लाइलसारख्या दुर्वासाबरोबर जन्म कंठणें तिच्या नशीबीं आलें होतें; हें कर्तव्य तिनें इतक्या उत्कृष्ट रीतीनें बजावलें कीं, जन्मभर आपण तिची हेळसांड केली याबद्दल खंत वाटून कार्लाइल तिच्या थडग्यावर अश्रू ढाळीत बसे !

कार्लाइलचा मनमोकळेपणा, फटकळपणा व त्याचीं उदार मतें हीं त्याला फार आवडत असत. " परमेश्वरभक्तीचे त्याचे व माझे मार्ग भिन्न आहेत-पण ईश्वराचा सेवक या नात्यानें त्याच्याबद्दल मला फार आदर वाटतो. मानवजातीबद्दल त्याच्या अंत:करणांत गाढ प्रीति आहे; कर्तव्य या महातत्वावर त्याची निष्ठा आहे; कर्तव्यरत राहणें हेंच मानवधर्माचें मूलतत्व आहे असें त्याचें मत आहे. " जनतेच्या प्रगतीबद्दल त्यांचीं मतें अगदीं विरुद्ध होतीं; व्यक्तीला कार्लाइल जितकें महत्व देत असे तितकेंच महत्व मॅझिनी जनतेला देत असे. कार्लाइल शक्तिदेवतेचा भक्त होता-मॅझिनी या जुलमी देवतेला शक्य तितका विरोध करावयासाठींच जन्माला आला होता ! " कार्लाइलची कामगिरी विघातक आहे, विधायक असें कांहींच त्यांत नाहीं. व्यक्तीचे ठिकाणीं प्रीति व आदर यांचें केंद्रस्थान प्रस्थापित करणारा मनुष्य एकतंत्री जुलमाचेंच समर्थन करीत आहे असा निष्कर्ष काढतां येईल. " उलटपक्षीं मॅझिनीच्या कल्पनांना मूर्तस्वरूप प्राप्त होणें अशक्य आहे असें कार्लाइलला वाटे; पण मॅझिनीचें धैर्य, एकनिष्ठा व उदार अंत:करण यांची ओळख कार्लाइलला पूर्णपणें झाली होती. पीडमॉटसंस्थानचा वकील एकदां त्याचेबरोबर संभाषण करीत असतां मॅझिनीबद्दल कांहीं उणें बोलला. कार्लाइल अतिशय संतापून त्याला म्हणाला-' महाशय, आपणांस मॅझिनीची बिलकुल माहिती नाहीं, त्याची आपणांस मुळींच ओळख पटलेली नाहीं. ' असें बोलून त्याचा निरोपहि घेतल्याशिवाय कार्लाइल एकदम घराबाहेर चालता झाला ! पुढें पोष्ट ऑफिसचें प्रकरण उपस्थित झालें तेव्हां टाइम्सकारांना लिहिलेल्या पत्रांत त्यानें म्हटलें आहे-" मॅझिनीच्या राजकारणाबद्दल माझें मत कांहींहि असो; पण सद्वर्तन, सत्यभक्ति, मनाचा उदारपणा व कोमलपणा यांचेबद्दल मात्र मी त्याची हमी घेण्यास तयार आहें. मॅझिनीसारखे महात्मे या जगांत क्वचितच दृष्टीस पडतात; अशांना ' परमेश्वराचे प्रेषित ' हेंच अभिधान योग्य आहे ! हे शब्द लिहिले गेले त्यावेळीं कार्लाइल व मॅझिनी यांचेमध्यें पूर्वीचें प्रेम राहिलेलें नव्हतें; तरी त्यानें आपली तरफदारी केलेली पाहून मॅझिनीचें अंत:करण भरून आलें आणि तो आपल्या एका मित्राला म्हणाला—" मनाचा उदारपणा म्हणतात तो याला ! "

कार्लाइलची पत्नी व मॅझिनी यांचेमधील स्नेहभाव फार जिव्हाळ्याचा होता. तिला मॅझिनीबद्दल फार प्रेम व आदर वाटत असे; आपल्या जीवित-

कल्पना व सांसारिक अडचणी ती त्याचेजवळ बोलून दाखवी व अशा प्रसंगीं मॅझिनी तिच्या मनाचें समाधान करीत असे. " मला मृत्यूचें बिलकूल भय वाटत नाहीं; पण माझें हें डोकें या धडालाच चिकटून रहावें यापेक्षां मला करतां येईल असें जास्त मोठें कार्यच नाहीं काय ? "—निराश मॅझिनीनें तिला एकदां विचारलें. तिनें उत्तर दिलें, " असें महत्कार्य उपस्थित होईपर्यंत ज्याला आपलें डोकें खांद्यावर नीटपणें कायम ठेवतां येत नाहीं त्याच्या हातून कोणतीच महत्वाची गोष्ट होणें शक्य नाहीं ! "

कार्लाइलच्या घरी तो वरचेवर जात असे. त्याचे बूट चिखलानें बरबटलेले असत, तरी बिनदिक्कतपणें तो कार्लाइलच्या बहुमोल गालिच्यांवर भटकत असे ! प्रगतीसारख्या एखाद्या महत्वाच्या विषयावर मॅझिनी बोलूं लागला कीं, कार्लाइल त्याच्या या गोडकल्पनांवर एकदम तुटून पडे; त्याला या कल्पना भोळसटपणाच्या वाटत. कार्लाइलच्या या चटोरपणामुळें मॅझिनीला फार खेद होई; अशा वेळीं मिसेस कार्लाइल मॅझिनीच्या मतांचें समर्थन करीत असे. मार्गारेट फुलरनें तिचें एक वचन नमूद करून ठेवलें आहे. " कार्लाइल साहेबांना मॅझिनीच्या-कल्पना बावळटपणाच्या वाटतात; पण त्याच कल्पनांसाठीं मॅझिनीनें आत्मसमर्पण केलेलें आहे, त्या कल्पनांना मूर्तस्वरूप प्राप्त व्हावें म्हणून अनेक इटालियन देशभक्तांनीं देहत्याग केलेला आहे; त्या कल्पनाचें महत्व काय आहे हें मॅझिनीलाच ठाऊक आहे; कार्लाइलला तें कसें समजणार? मॅझिनी व कार्लाइल यांचेमध्यें वादविवाद चाले तेव्हां बिचाऱ्या मॅझिनीची बाजू अगदींच लंगडी पडत असे. आपल्या मतांचें समर्थन तो अगदीं अंतःकरणपूर्वक व शिष्टाईच्या पद्धतीनें करीत असे; त्याची इंग्रजी भाषा मोडकी-तोडकी असल्यामुळें त्याचे विचार तुटकतुटक दिसत. त्याच्या भाषणाला उत्तर देतांना कार्लाइल त्याच्या मतांची हेटाळणी व अतिशयोक्ति करी; शिवाय त्याच्या वाणीचा प्रवाह अस्खलित व भाषा ओजस्वी असल्यामुळें मॅझिनीचा जीव अगदीं घाबरा होई. मिसेस कार्लाइल व मॅझिनी या दोघांचें प्रेम आमरण कायम टिकलें, मात्र कार्लाइल व मॅझिनी यांचेमध्यें पुढें दुजाभाव उत्पन्न झाला. मॅझिनीच्या कल्पनांना मूर्त स्वरूप प्राप्त होऊं लागलें तेव्हां कार्लाइलनें मनःपूर्वक कबुलीजबाब दिला आहे, ' त्या कवीनें आपल्या कल्पनांना शेवटीं मूर्त स्वरूप आणलें ! '

लंडनला असतांनाच मॅझिनीचा लामेनेस * बरोबर पत्रव्यवहार सुरू झाला. राज्यक्रान्तीनंतर उत्पन्न झालेल्या विघातक विचारपद्धतीला दोघेहि विरोध करीत होते. कर्तव्यपालन हाच जीवनाचा महासिद्धांत होय या तत्वावर दोघांचीहि निष्ठा होती. लामेनेस यानें "श्रद्धावंताचे विचार" (Words of a Believer) हें पुस्तक लिहिल्यामुळेंच मॅझिनीला "मानवी कर्तव्यें" (Duties of Man) लिहावयाची स्फूर्ति झाली. स. १८३९ मध्यें लामेनेसबद्दल मॅझिनीनें लिहिलें आहे कीं, "त्याचा शब्द स्वर्गीय संगीतासारखा दिव्य आहे; त्याचें मन इतकें उदार आहे कीं, दानधर्मासाठीं तो स्वतःला भीक लावून घेईल ! त्याचें अंतःकरण इतकें कोंवळें आहे कीं, आपल्या पायाखालीं एकादी मुंगी चिरडेल असें त्याला वाटलें तर तो दुसऱ्या बाजूनें काळजीपूर्वक चालूं लागेल !" लामेनेसलाहि मॅझिनीबद्दल फार प्रेम वाटत असे. तो म्हणे,—"मॅझिनीबद्दल प्रेम वाटावें हेंच नैसर्गिक आहे !"

मॅझिनीचें मित्रमंडळ विस्तृत होत गेलें तसतसें त्याला काम जास्त मिळूं लागलें. इंग्रजी भाषेवर त्याचा हात अझून बसला नव्हता व इंग्लिश जनतेला आवडतील असे लेख तयार करण्याचें काम त्याला फार दगदगीचें वाटत असे; पण पैशाची निकड लागे तेव्हां मात्र त्यांना रुचतील असे लेख तो तयार करीत असे—मात्र असे लेख लिहितांना त्यानें लोकप्रियतेसाठीं आपल्या तत्वांचा त्याग केव्हांहि केला नाहीं ! परक्या भाषेंत लिहितांना हात संभाळून काम करावें लागतें म्हणून मॅझिनीचे इंग्रजी लेख अत्यंत काळजीपूर्वक लिहिलेले दिसून येतात. व्हिक्टर ह्यूगो, कार्लाइल, चार्टिसम, डॅन्टे, इटालियन राजकारण, इटालियन ललितकला, मानवी कर्तव्यें वगैरे महत्वाचे निबंध इंग्रजीमध्यें यावेळीं त्यानें लिहिले.

---

* लामेनेस ( १७८२–१८५४ ) नेपोलियन एल्बा बेटांत रहात असतांना यानें त्याचेविरुद्ध लेख लिहिले होते. नेपोलियन परत येतांच लामेनेस इंग्लंडांत पळून गेला. स. १८३३ च्या फ्रेंच राज्यक्रान्तींत त्यानें लोकपक्षाचा पुढाकार घेतला होता. त्याच्या एका धार्मिक ग्रंथाबद्दल पोपनें त्याला कार्डिनलची पदवी देऊं केली होती—ती यानें नाकारली; दुसऱ्या एका धर्मग्रंथांत राजकीय व धार्मिक सत्ता यांची फारकत असावी असें प्रतिपादन केल्याबद्दल पोपनें गहजब उडविला होता ! स. १८४० सालीं एका लेखाबद्दल त्याला एक वर्षाची शिक्षा झाली होती. त्याचे विचार उदार असून भाषा ओजस्वी होती.

इटलीमध्यें जाऊन कार्य करणें अशक्य असल्यामुळें लंडनमध्येंचे असलेल्या इटालियन देशबांधवांच्या उद्धाराचें कार्य त्यानें इ. स. १८३९ च्या सुमारास हातीं घेतलें. " लंडन शहरांत रस्त्यांमधून वाद्यें वाजवीत भीक मागत फिरणाऱ्या इटालियन मुलांपाशीं केलेल्या चवकशीवरून मला एका आधुनिक गुलामगिरीच्या पद्धतीचा सुगावा लागला. हीं मुलें विकत घेऊन येथील कांहीं लोक त्यांच्यावर पैसा मिळवीत असतात. इटलीमध्यें गरीब लोकांना आशा दाखवून त्यांचीं मुलें मुदतीच्या करारानें नोकरींत घेण्यांत येत असत. मुदत संपतांच मुलांना परत पोंचविलें जाईल व नोकरी करतांना सांठलेले पैसे त्यांना देण्यांत येतील असा त्या मुलांच्या पालकांबरोबर करार करण्यांत येत असे; पण इटलींत केलेल्या या कराराला इंग्लंडमध्यें कांहींच किंमत नाहीं हें त्या विचाऱ्यांना कळत नसे ! लंडनमध्यें आल्यावर या मुलांना गुलामासारखें वागविण्यांत येई. त्यांचे हातांत एक वाद्य देऊन त्यांना रस्तोरस्तीं भीक मागावयास धाडलें जाई; चांगलीशी रकम न मिळविणाऱ्या दुर्दैवी भिकाऱ्याला रात्रीं उपाशीं रहावें लागे व शिवाय खरपूस मारहि मिळे. या भयंकर प्रकारामुळें कित्येक मुलें मृत्युमुखीं पडत; इतक्या अपेष्टांतहि जीव धरून राहिलेल्या मुलांना अखेर कांहीं कुरापत काढून एक दमडीहि न देतां हुसकून देण्यांत येई ! इटलीचीं बालकें अशा रीतीनें विकलीं जावींत व त्यांना गुलामगिरींत आयुष्य कंठणें भाग पडावें हें इटालियन सरकारला आणि धर्मगुरूंना अत्यंत लांछनास्पद आहे. ह्या अनाथ मुलांचें संरक्षण व्हावें, त्यांना शिक्षण प्राप्त व्हावें, आपले हक्क व कर्तव्यें यांचें त्यांना ज्ञान व्हावें म्हणून मी इटालियन मुलांसाठीं एक शाळा स्थापन केली ( १८४१ ). या शाळेंत शिक्षण मोफत देण्यांत येत असे. त्या मुलांचे मालक अत्यंत निर्दय होते. त्यांच्या क्रूरपणास आळा बसावा यासाठीं त्यांपैकीं कांहीं जणांना मी कायदेशीर शिक्षा देवविल्या. आपल्या वर्तनावर नजर ठेवणारे लोक उत्पन्न झालेले पाहून त्यांनींहि आपल्या निर्दयपणास आळा घातला. " गुन्हेगारांवर आरोप शाबीत करण्याच्या कामांत विल्यम शीन या इंग्रज गृहस्थाची मॅझिनीला फार मदत झाली.

इ. स. १८४१ पासून १८४८ पर्यंत ही शाळा चालू होती. पुढें मॅझिनीला इटलीमध्यें जावें लागलें म्हणून शाळा बंद करावी लागली. शाळेला लागणाऱ्या खर्चाची सोय मॅझिनीच करीत असे व शाळेंत तो अध्यापकाचेंहि काम करी. " हीं मुलें प्रथमतः आमच्या शाळेंत आलीं तेव्हां तीं अगदीं रानवटासारखीं

दिसत. शाळेंत यावयाची प्रथम त्यांना फार भीति वाटे. पण तेथील शिक्षक आपणांस अत्यंत दयाळूपणानें वागवितात हें पाहून त्यांची भीति नाहींशी झाली. शाळेंत आल्यापासून मुलांची स्थिति फार झपाटयानें सुधारूं लागली. शिक्षणामुळें स्वदेश ही भावना त्यांच्या हृदयांत उत्पन्न झाली; आपण सुशिक्षित होऊन घरीं परत जाणार याचा त्यांना अभिमान वाटूं लागला. ”

शाळेच्या मदतीसाठीं इटालियन गवई, बजवय्ये वगैरे लोकांचे खेळ करविण्यांत येत असत; देशाच्या कार्यासाठीं व कीर्तीसाठीं हे लोक विशेष मनःपूर्वक काम करीत; त्यामुळें लंडनच्या शौकीन लोकांचेंहि समाधान होई !

शाळेंतील मुलांचीं संख्या सुमारें दोनशें होती. शाळेचा अभ्यासक्रम व वेळापत्रक अगदीं साधें होतें. मुलें रात्रीं नवाच्या सुमारास शाळेंत येत. लेखन, वाचन, गणित, भूगोल व चित्रकला हे विषय त्यांना शिकविले जात. सर्व विद्यार्थी रविवारीं संध्याकाळीं एकत्र जमत; यावेळीं इटलीचा इतिहास, राष्ट्रवीरांचीं चरित्रें अशा एकाद्या विषयावर व्याख्यान दिलें जात असे. रविवारचीं व्याख्यानें बहुधा मॅझिनीच देत असे. एकाद्या चिकित्सक व सुशिक्षित श्रोतृसमाजापुढें व्याख्यान द्यावयासाठीं जितकी तयारी करावयाची तितक्याच मेहनतीनें या अशिक्षित अडाणी मुलांपुढें द्यावयाचीं व्याख्यानें तो तयार करीत असे. “ दारिद्र्य व गुलामगिरी यांमुळें त्यांच्या अंतःकरणांत अज्ञानाचा अंधःकार पसरला होता; या अंधःकाराची जागा प्रकाशानें व्यापली जाईल, मुलांच्या अंतःशक्तींचा विकास होईल अशाच रीतीचें शिक्षण आम्ही या मुलांना देत होतों. माझ्या देशबांधवांसाठीं देह झिजवण्याची ही माझी दुसरी संधि होय. ह्या सेवेमुळें माझ्या मनांतील निरुत्साह नष्ट झाला; देशकार्य पुन्हां अंगावर घ्यावयाचा उत्साह माझ्या व इतरांच्या मनांत उत्पन्न झाला. शाळेंतील शिक्षक कोणताहि मोबदला घेत नसत; हें धर्माचें कार्य आम्हीं अगदीं निरपेक्ष बुद्धीनें चालविलें होतें. आपल्या संसाराचा व्याप व इतर कामधंदे संभाळून सर्व मंडळी येथें अत्यंत उत्साहानें काम करीत असे. नोव्हेंबर महिन्यांत शाळेचा वाढदिवस मोठ्या समारंभानें साजरा करण्यांत येई. प्रथम मुलांना बक्षिसें वाटण्यांत येत; नंतर भोजनसमारंभ होई. पाकसिद्धीचें व पंक्तींत वाढण्याचें काम शिक्षक मंडळीच करीत ! हें प्रेमाचें भोजन चाललें असतांना मुलें देशभक्तीचीं गाणीं म्हणत असत. सबंध वर्षभर शिकून ह्या मुलांच्या मनावर जितका परिणाम व्हावयाचा तितका ह्या एकाच दिवशीं त्यांच्या अंतःकरणावर होत असे.

ह्या समारंभाला पुष्कळ इंग्रज हितचिंतक येत असत; सुखासमाधानाचा हा सोहळा पाहून त्यांचें अंतःकरण दाटून येत असे." या संस्थेवर मॅझिनीचें अतोनात प्रेम होतें. तेथें शिकणाऱ्या मुलांना मॅझिनी म्हणजे परमेश्वराचा अवतारच आहे असें वाटत असे.

या शाळेमुळें इटालियन कामकरी वर्गाशीं मॅझिनीचा प्रत्यक्ष समागम घडून आला. "हे लोक मला इतके सुशील व निःस्पृही आढळून आले कीं, त्यांच्या उद्धाराचें कार्य हातीं घ्यावयास मला अतिशय उत्साह वाटूं लागला. मोलमजुरी करून निर्वाह करणाऱ्या लोकसमाजाचें अवलोकन करण्याची संधि मला आजवर मिळाली नव्हती. ही संधि मला आतां प्राप्त झाली व ती मी वायां दवडली नाहीं." खालच्या वर्गाच्या स्थितीचें यावेळीं त्यानें सूक्ष्म निरीक्षण केलें. "राजकीयप्रश्नांचा विचार करणाऱ्या मंडळींना आज शेतकरी व कामकरी लोकांबद्दल आस्था वाटत नाहीं; या मागसलेल्या लोकांना जुलूम म्हणजे काय याची धड कल्पनासुद्धां नाहीं, मग स्वतःच्या हक्कांची जाणीव त्यांना कशी होणार? इटलीचें वैभव व परंपरा यांची त्यांना जाणीव करून द्या; स्वातंत्र्याची इच्छा त्यांचे ठिकाणीं निर्माण करा; म्हणजे जुलमाचा प्रतिकार करण्याची इच्छा व सामर्थ्य त्यांचेमध्यें आपोआप उत्पन्न होईल...मागसलेल्या वर्गाची स्थिति सुधारण्याचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. या प्रश्नापेक्षां कोणत्याहि राजकीय चळवळीचें महत्व केव्हांहि कमीच असणार हें उघड आहे! इटलीमध्यें खालच्या वर्गाची स्थिति अत्यंत हलाखीची आहे. त्यांना पोटभर अन्न नाहीं, गृहसौख्याचा लेशहि नाहीं आणि बौद्धिक आनंदाची पात्रता नाहीं; त्यांना राष्ट्रीयत्वाची भावनाच नाहीं; फार काय, त्यांना राजकीय व सामाजिक जीवनच नाहीं असें म्हटलें तरी चालेल!" या लोकांचा प्रांतिक अभिमान नष्ट करण्यासाठीं व त्याचें मनांत राष्ट्रभक्ति उत्पन्न करण्यासाठी मॅझिनीनें फार श्रम घेतले. "परमेश्वर तुमचा न्याय करील तेव्हां तुम्हीं मजुरी किती मिळवीत होता ह्याचा तो आढावा काढीत बसणार नाहीं—तुम्ही आपल्या बांधवांकरतां काय केलें आहे हें पाहूनच तो तुमची योग्यता ठरवील."

इटालियन कामकरी वर्गासाठीं मॅझिनीनें लंडन येथें Apostolato Popolare (लोकप्रिय हितोपदेश) हें वर्तमानपत्र स. १८४० (१० नोव्हेंबर) मध्यें सुरू केलें. कोनार्स्की या पोलंडच्या देशभक्ताची जनतेला माहिती करून द्यावयासाठीं स. १८४० मध्यें लंडन येथें एक जाहीर सभा भरली होती. या देश-

भक्ताला स. १८३९ सालीं रशियन सरकारनें राजद्रोहासाठीं गोळी घालून ठार केलें होतें. सभेला वरेचसे इटालियन कामकरी हजर होते. त्यांच्या अंतःकरणांत राष्ट्रकार्याची जागृति उत्पन्न झाली; आपलें नेतृत्व स्वीकारण्यावद्दल त्यांचेकडून मॅझिनीला विनंति करण्यांत आली; म्हणून त्यानें हें पत्र सुरू करण्याचें ठरविलें. वर्तमानपत्रावरोबरच इटालियन कामगारांचा हितवर्धक संघहि स्थापन झाला. युरपमधील अनियंत्रित सत्ताधाऱ्यांच्या प्रभुत्वावर घाव घालणाऱ्या तत्वांचा प्रसार करणारें मॅझिनीचें हें तिसरें क्रान्तिकारक नियतकालिक होय. ह्याच्या शिरोलेखावर ' काम व त्याचा योग्य मोवदला ' हे शब्द लिहिलेले असत. पत्राचे अंक अनियमितपणें प्रसिद्ध होत असत; स. १८४३ ( ३० सप्टेंबर ) मध्यें हें पत्र बंद पडलें. तोंपर्यंत त्याचे बारा अंक प्रसिद्ध झाले होते. " मानवी कर्तव्यें " या निवंधसंग्रहाचे पहिले चार भाग याच पत्रांत प्रसिद्ध झाले. ( बाकीचे भाग Pensiero e Azione या पत्रांत स. १८५८ सालीं प्रसिद्ध झाले. संपूर्ण पुस्तक स. १८७५ सालीं "युरपमधील लोकसत्ता " या निबंधासह लंडन येथें प्रसिद्ध करण्यांत आलें. ) या पत्राचे अंकांचा फ्रान्समध्यें पाठविलेला पहिलाच गठ्ठा बंदरावरल्या अधिकाऱ्यांनीं पकडला व सरकारच्या हुकमानें त्याची होळी करण्यांत आली ! मॅझिनीनें कामकरी वर्गाचें राष्ट्रघटनेमधील योग्य स्थान जाणलें होतें; कामकरी वर्गानें आपला दर्जा व सामर्थ्य जाणून राष्ट्रकार्यांत सामील व्हावें हें मत मॅझिनीनें या पत्रामधून प्रसृत केलें. कामकरी वर्गानें केवल संख्याबलाच्या जोरावर सर्व सत्ता आपल्याच हातीं ठेवावी असें म्हणणारा एक पक्ष त्यावेळीं युरोपमध्यें उत्पन्न होत होता. या पक्षाच्या मतांवर मॅझिनीनें सडकून टीका केली आहे. ह्या विरोधाला मॅझिनीच्या लंडननिवासांत प्रारंभ झाला व हें वाग्युद्ध त्यानें जन्मभर चालविलें.

मॅझिनी इंग्लंडांत असतांना बँडिएरा बंधूंनीं स.१८४३सालीं इटलीमध्यें उठावणी केली. या उठावणीचा इटलीच्या भवितव्यावर तर परिणाम झालाच. पण तिजमुळें इंग्लिश सरकारनें अनेक वर्षें चालविलेला खिसेकापूपणासारखा एक घाणेरडा प्रकार उघडकीस आला. हा प्रकार ज्या प्रकरणामुळें पुढें आला तें अगोदर दिलें आहे.

गनीमी काव्यानें लढण्यासाठीं सज्ज झालेल्या राष्ट्रीय स्वयंसैनिकांच्या टोळ्यांना लष्करी शिक्षणाच्या अभावीं ऑस्ट्रियाची हकालपट्टी करणें

शक्य आहे—असें मॅझिनीच्या अनुयायांचें मत होतें. आजवर अशा प्रयत्नांमध्यें मॅझिनीला वैयक्तिक अपयश आलें होतें. स्वयंस्फूर्तीनें कट करून उठावणी करणारे लोक इटलीमध्यें त्याच्याच शिकवणीमुळे तयार झाले होते. व्हेनिस शहरीं सरदार घराण्यांत जन्माला आलेल्या ह्या बंडखोर बँडिएरा बंधूंचीं नांवें ॲटिलियो व एमिलियो. राष्ट्रस्वातंत्र्यासाठीं आपण कांहीं तरी केलें पाहिजे असे विचार लहानपणापासून त्यांच्या मनांत येत असत. त्यांनीं विचार करून स्वयंस्फूर्तीनें निर्माण केलेलीं साधनें मॅझिनीच्या विचारांशीं अगदीं जुळतीं होतीं—'यंग इटली' व 'अपोस्टोलेटो पापोलेरी' या पत्रकांचे कांहीं अंक वाचतांच त्यांना हें समजून आलें—लगेच त्यांनीं मॅझिनीशीं पत्रव्यवहार सुरू केला. बँडिएरा बंधु ऑस्ट्रियाच्या आरमारांत हुद्याच्या जागेवर होते. त्यावेळीं इटलीमध्यें जागोजाग गुप्त कट स्थापन झाले होते; सर्व कटवाल्यांनीं एकत्र होऊन एकदम निकराची उठावणी करावी असें या बंधूंचें मत होतें. या उठावणीला संघटित स्वरूप द्यावयासाठीं त्यांनीं इटालियन पुढाऱ्यांची गांठ घेतली; बँडिएरा बंधूंच्या उतावळ्या उत्साहाला त्यांनीं आळा घालावयाचा प्रयत्न केला. त्यांना भुलथापा देऊन या पुढाऱ्यांनीं एक वर्षभर चालढकल केली ! सर्वव्यापी उठावणीच्या डोलदार द्राविडी प्राणायामाच्या नादीं लागल्यानें कार्य करावयाच्या अगोदरच आपण पकडले जाऊं असें या बंधूंना अंतःस्फूर्तीनेंच वाटूं लागलें ! त्यांनीं या सुखासक्त पुढाऱ्यांचा नाद सोडून दिला. त्यांच्या उठावणीला पुरेसे पैसे उभारण्याचें कामहि या स्वयंभू पुढाऱ्यांनीं अंगावाहेर टाकलें ! बँडिएरा बंधू उच्च घराण्यांतले होते पण ते गरीब होते आणि त्यांनीं देशासाठीं आपलीं शिरें तळहातावर घेतलीं होतीं, हे पुढारी श्रीमान् होते आणि त्यांना आपलीं शिरें भूषणालंकृत करावयाचीं होतीं !

आस्ट्रियन लष्करांत आणि आरमारांत त्यावेळीं इटालियन लोकांचा मोठा भरणा असे. इटलीमध्यें जो जुलूम होतो त्याला ह्याच लष्कराचें पाठबळ असे; हें लष्कर असें होतें म्हणूनच जुलूम करावयाची आस्ट्रियाला छाती होत असे; हें लष्कर होतें म्हणूनच इटालियन लोकांना हा जुलूम सहन करणें भाग पडे ! सैन्यांतच बंडाळीला सुरवात झाल्यानें आस्ट्रियाच्या सत्तेला मोठाच धक्का बसेल व इटालियन लोकांचें कार्य अधिक सुकर होईल; म्हणून आपण सैन्यामध्येंच तांतडीनें उठावणी केली पाहिजे असें बँडिएरा बंधूंचें मत होतें. आपल्या या मताला प्रत्यक्ष स्वरूप द्यावयाची चळवळहि त्यांनीं सुरू केली.

पण ऑस्ट्रियाच्या हेरांना झोंप लागलेली नव्हती ! त्यांना ह्या चळवळीची वित्तंबातमी समजली होती. प्रत्यक्ष पुरावा मिळतांच बँडिएरा बंधूंना कैद करावयाचें ऑस्ट्रियन सरकारनें ठरविलें होतें; ह्या बंधूंचा मॅझिनीबरोबर पत्रव्यवहार आहे ही गोष्ट त्यांना ठाऊक होती. ह्या बंधूंचा घात करावयासाठीं इंग्लिश सरकारची ऑस्ट्रियन सरकारनें मदत मागितली. इंग्लंडचे प्रधान परक्या सरकारांना राजकीय कारणासाठीं मदत करावयास तयार होते. त्यांनीं मॅझिनीचा पत्रव्यवहार पोस्टांत फोडून पाहिला व उठावणीची नक्की बातमी ऑस्ट्रियाला दिली. बातमी मिळतांच हा बेत हाणून पाडावयासाठीं सरकारनें अॅटिलियो बँडिएरा याला एकदम व्हेनिस येथें हजर व्हावयाचा हुकुम केला. आपणास कैद करण्याची तयारी चालली आहे ही बातमी त्याला अगोदरच लागली होती म्हणून हा हुकूम अमान्य करून तो फरारी झाला. त्यानें एमिलियोला निरोप पाठविला कीं, तूंहि तांतडीनें पळ काढ, नाहींतर पकडला जाशील. निरोपाप्रमाणें त्यानेंहि पळ काढला.

बँडिएरा बंधु गुप्त होतांच ऑस्ट्रियाच्या सैन्यांत मोठी खळबळ उडाली. या प्रकरणाला महत्व दिल्यास आपल्याच सैन्यांतील फितुरी प्रकट होईल व आपल्या सामर्थ्याच्या नजरबंदीला धोका पोंचेल म्हणून सरकारनें सरळ चौकशी न करतां कुटिल नीतीचा प्रयोग केला. सरकारमार्फत एका हेरानें या बंधूंच्या मातेची गांठ घेतली; मुलांनीं परत येऊन सरकारच्या क्षमेची याचना केली तर त्यांना माफी देण्यांत येईल इतकेंच नव्हे तर त्यांचे हुद्दे कायम ठेवण्यांत येतील असें सरकारी आश्वासन मिळतांच त्या बिचारीनें मुलांचें मन वळविण्याचें काम अंगावर घेतलें ! अॅटिलियोची प्रेमळ व सद्गुणी पत्नी तर या संकटाच्या धक्क्यानें मृत्यु पावली ! दु:खानें तळमळणाऱ्या पण सुखाच्या आशेनें लालचावलेल्या मातेच्या अश्रूंनीं चिंब झालेल्या विनवण्यांचा या बंधूंनीं अव्हेर केला ! माफी मागून शरण येण्याचें नाकारतांच ऑस्ट्रियानें बँडिएरा बंधूंवर राज्यद्रोहाचा आरोप ठेवल्याचें जाहीर केलें. या जाहीरनाम्याला त्यांनीं जाहीर उत्तर दिलें:—" स्वदेशाला गुलामगिरींत ढकलणाऱ्या परक्यांचे सैन्यांत राहून नरकांत जाण्यापेक्षां स्वदेशासाठीं मरण पत्करून स्वर्गास जावयाचा मार्ग आम्ही स्वीकारला आहे ! देशद्रोह करण्यापेक्षां राज्यद्रोहच करावयाचें आम्ही ठरविलें आहे ! " हें उत्तर प्रसिद्ध झाल्यापासून इटलीमधील असंतोष वाढूं लागला व जनतेला अवसान भरूं लागलें; तरुण सशस्त्र होऊं लागले व बंडाळीला लवक-

रच तोंड लागणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. हें पाहतांच बँडिएरा बंधूंनीं 'देह जावो अथवा राहो,' अशा निर्धारानें रणांगणांत उडी ठोंकण्याचा निश्चय केला !

त्यावेळीं ते कार्फ्यू येथें होते. त्यांना फक्त वीस देशभक्तांचें साह्य होतें. कॅलेब्रिया प्रांतांत उतरून बंड करावयाचा त्यांचा इरादा होता. त्यांना ऐंशीं हजार ऑस्ट्रियन सैन्याबरोबर व ऑस्ट्रियाला मदत करणाऱ्या इटालियन संस्थानिकांबरोबर लढावयाचें होतें ! इतक्या तुटपुंज्या तयारीनें उठावणी करणें मर्दुमकीचें आहे तरी वेडेपणाचें आहे असें मॅझिनीनें त्यांना कळविलें होतें. "बँडिएरा बंधू मला लिहीत—'देशाकरितां आपण कसें बळी पडावें हें लोकांना समजूं लागेपर्यंत इटलीला चांगले दिवस येणार नाहींत. देशाकरितां कसें मरावें एवढेंच आम्ही त्यांना दाखवून देणार आहों !' त्यांना आंवरून धरण्याचा मी यत्न केला. मी त्यांना लिहिलें होतें, 'एकटयादुकटयानें उठावणी करून उपयोग होणार नाहीं. सर्वांनीं मिळून निकराचें कृत्य करावयाची वेळ आली आहे.' या आणीबाणीच्या प्रसंगासाठीं या वीरबंधूंना जतन करून ठेवावें म्हणून मी पराकाष्ठा केली आणि यामध्यें मला यशहि आलें असतें; पण इंग्लंडच्या प्रधानांचा अधमपणा माझ्या आड आला."

मॅझिनी व बँडिएरा बंधू यांजमधील सर्व पत्रव्यवहार इंग्लंडमार्फत ऑस्ट्रियाला कळला. ऑस्ट्रियन सरकारनें पूर्णपणें ओळखलें होतें कीं, ह्या उतावळ्या बंधूंना इटलींतील लोक बंडाला उत्सुक आहेत अशी बातमी लागतांच ते इटलींत येतील व मग आपण त्यांना सहज कैद करूं ! आपल्याच हेरांबरोबर त्यांनीं बँडिएरा बंधूंना निरोप धाडले कीं, इटलींत जनता बंडाला उत्सुक आहे; पण त्यांना लष्करी शिक्षण घेतलेले व देशाच्या उद्धारासाठीं हातावर शिर घेतलेले धाडसी पुढारीच मिळत नाहींत ! ह्या बनावट बातम्यांनीं बँडिएरा बंधु फसले; त्यांनीं एकदम इटलींत जावयाचें ठरविलें ! मॅझिनीच्या सूचना ते विसरले ! इटालियन बंडखोरांना मिळावयासाठीं ते आपल्या लहानशा टोळीसह कॅलेब्रियांत उतरले. त्यांच्या नेतृत्वाखालीं लढावयास उद्युक्त झालेल्या बंडखोरांची आणि त्यांची मुलाखतच झाली नाहीं ! पांच दिवस दऱ्याखोऱ्यांतून वाट चालल्यावर त्यांच्या थकल्याभागल्या टोळीला शत्रूच्या भारी सैन्यानें वेढा घातला ! इटालियन देशभक्तांच्या या टोळीपैकीं कांहींजण धारातीर्थी पडले व बाकीचे कैद करण्यांत आले; त्यांची लष्करी कोर्टापुढें चौकशी झाली; त्यांना गोळी घालून

मारण्याची शिक्षा फर्मावण्यांत आली ! ता. २५ जुलै स. १८४४ रोजीं त्यांना गोळ्या घालण्यांत येणार होत्या. " ज्या मनुष्यजातीसाठीं येशूनें आत्मबलिदान केलें त्याच मनुष्यजातीसाठीं आम्ही आत्मयज्ञ करीत आहों. "—त्या देशभक्त गुन्हेगारांपैकीं एकजण म्हणाला. ते इटलीचा जयजयकार करीत होते–स्वातंत्र्य-देवतेचा जयजयकार करीत होते. मुखावाटे हा जयघोष चाललेला असतांच त्यांचेवर गोळया झाडण्यांत आल्या, तेच पवित्र शब्द उच्चारीत असतां त्यांनीं देहत्याग केला !

*   *   *   *   *

कोसेंझा येथें ह्या देशभक्तांना गोळ्या घालून मारण्यांत आलें. हा क्रूर प्रकार प्रत्यक्षपणें ऑस्ट्रियाच्या हातून घडला. ऑस्ट्रियाचें सरकार इटालियन राष्ट्र-भक्तांना राक्षसीपणानें चिरडून टाकीत आहे ही गोष्ट त्यावेळीं जगजाहीर झाली होती. पण ऑस्ट्रियाला सैतानी सरकार असें नामाभिधान देणाऱ्या उदार-मतवादी इंग्लंडनें या प्रसंगीं इतकें घाणेरडें वर्तन केलें कीं, देशभक्तांच्या या होमाची अर्धी जबाबदारी अप्रत्यक्षपणें इंग्लंडवर येते ! बिचाऱ्या बँडिएरा बंधूंचा इंग्लंडच्या इमानावर इतका विश्वास होता कीं आपले अत्यंत गुप्त बेतहि त्यांनीं मॅझिनीला पाठविलेल्या पत्रांत अगदीं मोकळेपणानें स्पष्ट केले होते. इंग्लंडच्या प्रधानांनीं ही पत्रें पोस्टामध्यें फोडलीं ! उदार इंग्लंडनें त्या पत्रांतील सर्व बातमी सैतानी ऑस्ट्रियाला पुरवली व ह्या देशभक्तांचा केंसानें गळा कापला !

मॅझिनीला अगोदरपासूनच संशय येऊं लागला होता कीं, आपलीं पत्रें आपणांस नेहमींपेक्षां उशीरानें मिळतात. पोस्टखात्यांत लोकांचीं पत्रें उघडून पुन्हां बेमालूमपणें चिकटविण्यासाठीं कांहीं बिलंदर भामट्यांची नेमणूक केलेली असते. या भामटेगिरीचा संशय येतांच त्यानें आपल्या कांहीं मित्रांना ही गोष्ट सांगितली; पण या संशयावर त्यांचा विश्वासच बसेना ! त्यांची खात्री पटविण्यासाठीं मॅझिनीनें कांहीं प्रयोग केले. " कांहीं पत्रें मुद्दाम तिरपीं चिकटवून स्वतःच्याच पत्त्यावर मी तीं पोस्टांत टाकविलीं–तीं मला मिळालीं तेव्हां हा तिरपे-पणा नाहींसा झाला होता. कांहीं पत्रांमध्यें मी वाळूचे कण घातले—हीं पत्रें मिळालीं तेव्हां त्यांमधील वाळू नाहींशी झाली होती; पत्रें उघडल्याशिवाय हे कण गळून जाऊं नयेत अशाच रीतीनें तीं चिकटविण्यांत आलीं होतीं. मला मिळणाऱ्या प्रत्येक पत्रावर दोन शिक्के असत–मात्र ते इतक्या बेमालूमपणें मारलेले असत कीं, पहिला शिक्का किती वाजतां मारण्यांत

आला हें बिलकुल उमजून येत नसे ! " हा पुरावा मिळविल्यानंतर सर्व कागदपत्र थॉमस डनकोंब नांवाच्या एका पार्लमेंटच्या सभासदाचे हवालीं करून न्याय मिळावयासाठीं मॅझिनीनें पार्लमेंटकडे अर्ज केला. डनकोंब यानें हा आरोप भर पार्लमेंटमध्यें स्पष्ट करून दाखविल्यावर मुख्य प्रधानांना या बाबतींत प्रश्न विचारण्यांत आले. आपल्या निंद्य कृतीचें समर्थन करावयासाठीं त्यांनीं एका पुराण्या कायद्याचा आधार दाखविला. हा घाणेरडा प्रकार उघडकीला आल्यामुळें इंग्लिश जनता इतकी खवळून गेली कीं, या कायद्याच्या आधारावर आपलें समर्थन होणार नाहीं असें वाटल्यावरून सर जेम्स ग्रॅहॅम व लॉर्ड अबर्डीन या प्रधानांनीं मॅझिनीवर खनाला उत्तेजन देण्याचा आरोप केला ! " खोटें बोलणें व बनावेट लेख तयार करणें येथवर ज्या राजकार्यधुरीणांची मजल आली, त्यांना एकाद्याची निंदा करण्यांत कचरण्यासारखें काय आहे ? " पण मॅझिनीनें हा आरोप सिद्ध करण्याविषयीं जाहीर आव्हान केलें, तेव्हां ग्रॅहॅमनें भर पार्लमेंटांत मॅझिनीची सपशेल माफी मागितली. " त्यावेळीं मॅझिनीवर मी जो आरोप केला त्यामुळें त्याची बेअब्रू झाली; या नुकसानीचें परिमार्जन करावयाचें एकच साधन आतां माझ्या हातीं राहिलें आहे—आणि हें साधन म्हणजे मॅझिनीची जाहीर माफी मागणें हें होय. त्यावेळीं तो आरोप मीं जितक्या जाहीर रीतीनें केला होता, तितक्याच जाहीर रीतीनें मी मॅझिनीची माफी मागावी हें रास्त आहे. माझ्या या माफीनें मॅझिनीचें समाधान होईल अशी मला आशा आहे." ( ग्रॅहॅमचें भाषण. ता. ८ मे. १८४५ ). या पत्रें फोडण्याच्या कृतीचा टाइम्स पत्रानें निषेध केला. मेकॉले वगैरे मंडळींनीं मॅझिनीच्या वतीनें सरकारची पार्लमेंटांत चांगलीच खरडपट्टी काढली. याच बाबतींत कार्लाइलनें टाइम्समध्यें एक पत्र प्रसिद्ध केलें. कार्लाइलची मॅझिनीच्या कार्याशीं फारशी सहानुभूति नव्हती; शिवाय त्यांचें पूर्वींचें प्रेमहि कायम राहिलें नव्हतें; तरी त्यानें हें पत्र अत्यंत अंतःकरणपूर्वक लिहिलें आहे, म्हणून तें पुढें दिलें आहे. त्यावरून मॅझिनी व कार्लाइल या दोघां महात्म्यांच्या औदार्याची साक्ष पटते.

" टाइम्सकर्ते यांसः—

महाराजः—मॅझिनीच्या पत्रांच्या घाणेरड्या प्रकारावर लिहितांना आपण असें विधान केलें आहे कीं, मॅझिनी हा कोण प्राणी आहे याची आपणांस बिलकुल माहिती नाहीं व व्यक्ति या दृष्टीनें आपण त्याचेविषयीं अगदीं उदासीन आहां;

आपण असेंहि म्हटलें आहे, आणि आपलें म्हणणें अगदीं रास्त आहे कीं, मॅझिनी हा संपूर्ण मानवजातींतील अत्यंत तिरस्करणीय व नीच मनुष्य असला तरीहि त्याच्या या विशेषणांमुळें आपल्या पत्रव्यवहाराच्या बाबतींतल्या मुद्यांना बिलकुल बाध येत नाहीं.

आपल्या या उल्लेखानंतर मी मॅझिनीची कांहीं माहिती दिली असतां ती प्रस्तुत प्रकरणाला बरीच उपयोगी होईल; या विषयावर बोलण्याचा मला बराच अधिकार आहे; मी असें सांगू शकतों कीं, या देशांतील बहुतेक कर्त्या पुरुषांना मॅझिनी हा कोण आहे हें चांगलें माहीत आहे; त्याची योग्यता तिरस्करणीय व हीन पुरुषांपेक्षां फार मोठी आहे हेंहि मी सांगू शकतों. आज बरींच वर्षें मॅझिनीच्या सहवासाचा मान मला मिळालेला आहे. आपल्या मतांना व्यावहारिक स्वरूप द्यावयाच्या त्याच्या साधनांबद्दल आणि त्या साधनांच्या उपयुक्ततेबद्दल माझें मत कसेंहि असलें तरी मी एवढें मात्र सांगू शकतों कीं, मी आजपर्यंत पाहिलेल्या बुद्धिवान् व सद्गुणी पुरुषांचें अग्रस्थान मी मॅझिनीलाच देतों; सत्यावर त्याची अढळ निष्ठा आहे; त्याचे अंतःकरणांत माणुसकी आणि औदार्य आहे; मॅझिनीच्या योग्यतेचे महात्मे जगांत क्वचितच आढळून येतात; धर्मवीरांच्या उच्च स्थानावर पोंचलेल्या महंतांत मॅझिनीची गणना आहे. धर्मवीरांच्या कर्तव्यांचा ज्यांना बोध झालेला असतो ते आपल्या दैनिक जीवनक्रमांत तीं कर्तव्यें आचरणांत आणीत असतात; ते आपल्या जीवनक्रमाचा बभ्रा करीत नाहींत, त्यांचें जीवन सदैव अधिकाधिक उदात्त होत असतें-अशा साधुपुरुषांत मी मॅझिनीची गणना करतों. इंग्लिश जनतेला विशेष महत्वाचा वाटणारा प्रश्न पत्रव्यवहाराचा आहे. आजवर आमचीं पत्रें आम्ही विश्वासानें इंग्लिश पोस्टाच्या हवालीं करीत आलों आहों; इतके दिवस आमची कल्पना होती कीं, पोस्टामध्यें आमचीं पत्रें अत्यंत पवित्र मानण्यांत येत आहेत; लोकांचीं पत्रें त्यांना नकळत फोडणें हा गुन्हा आहे, लोकांचे खिसे कातरण्याच्या गुन्ह्याहून अधिक नीच व भयंकर गुन्हा आहे. अत्यंत अपवादात्मक प्रसंगीं सरकारनें अशी गुन्हेगारी करणें क्षम्य आहे. जेव्हां लोक एकादा भयंकर कट करीत असतील किंवा राष्ट्राचा घात होण्याचा प्रसंग येऊन ठेपला असेल तेव्हां लोकांचीं पत्रें फोडणें क्षम्य मानतां येईल; पण ऑस्ट्रियाच्या बादशहासारखे राजे लोक पेंचांत सांपडले असतांना त्यांनीं असा हलकटपणा करावयासाठीं तुमची मनधरणी केली तर त्यांना साफ सांगा कीं, अशा निंद्य रीतीनें ब्रिटिश सरकार तुम्हांला मदत करूं

इच्छित नाहीं; कीं तुमच्यासाठीं खिसेकापूपणा करावयास आम्ही तयार नाहीं. अशा भानगडींत पडून जनतेच्या रोषाला तोंड द्यावयाची कोणत्याही अधिकाऱ्याला छाती नाहीं; कोणी असा प्रकार करील तर त्याला संतप्त झालेले लोक तिरस्कारानें विचारतील कीं तुम्ही असें काम कां केलें ?

आपला नम्र.

चेल्सी. ता. १५ जून १८४४.

**थॉमस कार्लाइल.**

मॅझिनीनें सरकारवर केलेला आरोप शाबीत झाला तेव्हां या प्रकरणाची चवकशी करण्याकरितां हाउस ऑफ कॉमन्स व हॉउस ऑफ लार्डस् मार्फत दोन कमिटया नेमण्यांत आल्या. या कमिटयांचें काम जाहीर रीतीनें चालविण्यांत यावें ही थॅामस डनकोंबची सूचना अमान्य करण्यांत आली ! या कमिटयांनीं आपला रिपोर्ट फार संभाळून लिहिला. त्यामध्यें, ह्या कृत्याचा नीचपणा सकृद्दर्शनीं वाटतो तितका नाहीं, असें भासवण्याचा प्रयत्न केला आहे;-त्यांत त्यांनीं एकमतानें कबूल केलें आहे कीं, स. १८०६ पासून १८४४ पर्यंत अधिकारावर असलेल्या सर्व प्रधानांनीं हें निंद्य कृत्य केलें होतें. राष्ट्रसंरक्षणार्थ अथवा संकटनिवारणार्थ लोकांचीं पत्रें फोडण्यांत येत असत, इतकेंच नव्हे, तर इतर देशांत गुलामगिरी अबाधितपणें चालावी म्हणून हद्दपार होऊन इंग्लंडच्या आश्रयास आलेल्या देशभक्तांचीं पत्रें फोडण्यांत येत असत ! इतकेंच नव्हे तर खुद्द इंग्लिश लोकांचीं व त्यांनीं पार्लमेंटांत निवडून दिलेल्या राष्ट्रप्रतिनिधींचीं व प्रधानांचीं पत्रें सुद्धां पोस्टामध्यें फोडण्यात येत असत ! कायद्यांत भयंकर शिक्षा असलेले गुन्हे करून हा अपराध छपविण्यांत येत असे ! खोटे छाप मारणें, बनावट शिक्के करणें वगैरे फौजदारी गुन्हे सरकारच्या संमतीनें पोस्टखात्यांत रोज बिनदिक्कतपणें करण्यांत येत असत ! रिपोर्टांत कबूल करण्यांत आलें होतें कीं, मॅझिनीचीं पत्रें फोडावयाचा हुकूम सरकारकडून पोस्टखात्यास देण्यांत आला होता! मात्र हा हुकूम द्यावयाच्या अगोदरहि त्याचीं पत्रें उघडण्यांत येत असें सिद्ध झालें आहे !! कमिटीनें असेंहि कबूल केलें होतें कीं, " एका विशिष्ट " परकी सरकारविरुद्ध होणाऱ्या उठावणीची बातमी त्या सरकाराला इंग्लिश सरकारमार्फत कळविण्यांत आली होती ! ! बॅंडिएरा बंधूंच्या विश्वासघाताची ही अप्रत्यक्ष कबुलीच होय! कमिटीपुढें पोस्टखात्याच्या सेक्रेटरीनें साक्ष दिली तेव्हां त्यानें कबूल केलें, कित्येक पत्रांतून पाठविलेल्या

रकमासुद्धां बेधडकपणें पोस्टांत लुटण्यांत येतात! ह्या रिपोर्ट प्रसिद्ध व्हावयाच्या अगोदर पार्लमेंटांतील प्रश्नांना उत्तर देतांना सत्यवक्तेपणाबद्दल प्रसिद्ध असलेला लॉर्ड अबर्डीन यानें धडधडीत असत्य विधान केलें होतें कीं, "मॅझिनीच्या पत्रांमधील एक अवाक्षरहि परकी सरकारला कळविण्यांत आलेलें नाहीं"! ह्या भाषणाला पार्लमेंटांत टाळ्या मिळाल्या होत्या!

या प्रकरणावर टीका करतांना मॅझिनी म्हणतो:–" हे मुत्सद्दी लोक स्वभावत: प्रामाणिक असतात परंतु राजसत्तेच्या पुष्टीकडे त्यांची इतकी तंद्री लागलेली असते कीं, ते तिच्यासाठीं आपल्या सदसद्विवेकबुद्धीचा खून करतात... खासगी व्यवहारांत जीं कृत्यें करण्यास त्यांचा हात धजणार नाहीं तींच कृत्यें प्रधानपदावर असतांना ते बेधडकपणें करतात...दरबारी रीतरिवाजामुळें लोकांना बाहेरचा डामडौल ठाकठीक असला म्हणजे बस होतें. कपडे स्वच्छ असले कीं खूष, मग त्याच्या अब्रूवर कितीही काळिमा आलेला असो! असें नसतें तर लॉर्ड अबर्डीनच्या सहकाऱ्यांनीं त्याची छीथू उडवली असती! लॉर्ड साहेबांनीं भर पार्लमेंटांत असत्य भाषण केलें त्या दिवसापासून मंत्रिमंडळानें त्यांचेवर बहिष्कार घालावयास पाहिजे होता, लोकांनीं त्याला आपल्या घरांत पाऊल टाकण्याला मनाई करावयास पाहिजे होती; म्हणजे पुन्हां तरी असें नीच कृत्य करण्यास कोणी धजावला नसता. पण लॉर्डसाहेबांच्या लार्डपणापुढें इंग्रजांची नीति फिक्कट पडली; त्यांच्या कृत्याविरुद्ध गवगवा झाला, पण प्रधानकीचीं वस्त्रें मात्र त्यांचेपासून हिसकावून घेण्यांत आलीं नाहींत!"

इंग्लंडचें त्यावेळचें परराष्ट्रीय राजकारण फार नेभळें व उदासीन होतें; त्याबद्दलचे आणि इटलीबद्दलचे आपले विचार मॅझिनीनें सर जेम्स ग्रॅहॅम* यांस पाठविलेल्या अनावृत्त पत्रांत (ता. २ मे १८४५) प्रकट केले आहेत. या पत्रांतील उतारा पुढें दिला आहे. " पारतंत्र्य व स्वातंत्र्य यांच्या लढाईत इंग्लंड पारतंत्र्याच्या बाजूनें लढत आहे. आस्ट्रिया व इटली यांच्या झगड्यांत इंग्लंडनें आस्ट्रियाशीं, अन्यायाशीं, पाशवी शक्तीशीं दोस्ती केली आहे! आम्हां इटालियनांना स्वातंत्र्य पाहिजे आहे, जिवंतपणा पाहिजे आहे, प्रगति

* त्यावेळीं सर जेम्स ग्रॅहॅम हे होम सेक्रेटरी होते व लॉर्ड अबर्डीन फॉरेन सेक्रेटरी होते. पोस्ट ऑफिस प्रकरणाच्या जबाबदारीचा बोजा या दोघावर होता. लार्ड अबर्डीन यानें बँडिएरा बंधूंची माहिती ऑस्ट्रियास पुरविली होती त्यामुळें जनतेच्या तिरस्काराचा त्याच्यावरच वर्षाव झाला.

पाहिजे आहे...आम्हांभोंवतीं असलेलें हेरांचें जाळें तोडून टाकून त्याचे जागीं आम्हांस आमच्या देशबंधूंचें प्रेममंडळ स्थापन करावयाचें आहे. आमच्या देशाला तुरुंगाचें रूप प्राप्त झालें आहे; ह्या तुरुंगावर मूठभर शिपायांचा पहारा आहे; आम्ही जराशी हालचाल केली कीं, आमच्या उरांत सुरी भोंसकण्यांत येते; आम्हांला तुरुंग नको आहे—आम्हांला स्वदेश पाहिजे आहे. तुम्ही आम्हांला क्रान्तिकारक म्हणतां, पण यांत कांहीं अपवित्र आहे काय ? येशू ख्रिस्तहि क्रान्तिकारकच होता. त्यानें अज्ञानाच्या स्मशानशांततेचा भंग केला होता, संस्थापित राज्यांविरुद्ध चळवळ केली होती....संग्रामाशिवाय स्वातंत्र्य मिळणें शक्य आहे काय ? आम्हांला शांतपणें राष्ट्रोद्धार करण्याचा दुसरा मार्ग दाखवून द्या; आम्ही शांतपणानें स्वातंत्र्य मिळवावयास तयार आहों...इंग्लिश सार्वजनिक चळवळींत जिवंतपणा आहे. तुम्हांला क्रान्तीची व कटांची जरूरच नाहीं...पण आजचें तुमचें स्वातंत्र्य तुम्ही क्रान्तीच्याच मार्गानें मिळविलेलें आहे ! आमच्या अंत:करणांत उसळणारे विचार व्यक्त करावयास आम्हांला एकहि साधन मोकळें नाहीं...आज इटली देश हा एक तुरुंग आहे. स्वतंत्रतेच्या जीवनदायी आणि पवित्र वातावरणांत श्वासोच्छास करावयाचा आम्ही निश्चय केलेला आहे; या तुरुंगाचे दरवाजे फोडून टाकावयाचा व हा कैदखाना जमीनदोस्त करावयाचा आम्ही संकल्प केलेला आहे. तुरुंगाचे दरवाजे फोडून शुद्ध व पवित्र वातावरणांत वावरण्याचा आम्ही निश्चय केला आहे !... संघटनास्वातंत्र्य नसेल तेथें गुप्त मंडळ्या स्थापणें न्याय्य आहे असें माझें ठाम मत आहे...स्वदेश पारतंत्र्यांत असतांना भूतदयेनें प्रेरित होऊन युद्धापासून परावृत्त होणें हा शुद्ध ढोंगीपणा आहे, नामर्दपणा आहे...मी इंग्लिशांना विचारतों, ' समजा, तुमचा देश फ्रान्सनें जिंकलेला आहे आणि ऐशीं हजार फ्रेंच शिपाई तुमची सनदशीर चळवळ तुडवून टाकीत आहेत—अशा स्थितींत तुम्ही कोणती शांततेची चळवळ चालविणार ?' अशा वेळीं तुम्हीं जें केलें असतें तेंच आम्ही आज करीत आहों...' आम्ही तेवढे स्वतंत्र आणि बाकीचे सारे गुलाम, ' अशी तुमची अधम मनोवृत्ति आहे आणि तुमचें परराष्ट्रीय राजकारण ह्याच मनोवृत्तीच्या अनुरोधानें चाललें आहे. " ( सर जेम्सग्रॅहॅम यांस अनावृत पत्र. प्रसिद्ध—१८४५ ).

इंग्लंडच्या राजकारणावर इतकी कडक टीका कोणीच केली नव्हती. मॅझिनीचें म्हणणें होतें कीं, " स्वातंत्र्याचा उपभोग घेणाऱ्या इंग्लंडानें जीं इतर

राष्ट्रें स्वतंत्र व्हावयाचा यत्न करीत आहेत त्यांना मदत करावी; त्या राष्ट्रांच्या वतीनें त्यांच्या शत्रूंवर इंग्लंडनें हत्यारच उपसलें पाहिजे असें नव्हे; त्यांना इंग्लंडचें नैतिक पाठबळ असावें. " नेपोलियनच्या पाडावानंतर क्रान्तिकारकांना चिरडून टाकण्यासाठीं युरोपांतील सर्व राजांनीं कट केला होता; त्यांच्या सैतानी मार्गांना इंग्लंडनें प्रत्यक्ष संमति केव्हांहि दिली नाहीं. कॅसलरी व कॅनिंग यांनीं युरपियन राजांच्या जुलमी धोरणाला शक्य तितका विरोधच केला होता; पण युरोपांतील राष्ट्रीय चळवळींकडे इंग्लंडचें जावें तितकें लक्ष गेलेलें नव्हतें ही गोष्ट निर्विवाद आहे. इंग्लंडचा परराष्ट्रीय कारभार पामर्स्टनकडे आला तेव्हांपासून युरोपांतील स्वातंत्र्येच्छु व लहान लहान राष्ट्रांना इंग्लंडची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत मिळूं लागली. मॅझिनीनें इंग्लंडांत इटालियन जनतेच्या आकांक्षासंबंधी जी जागृति केली तिजमुळेंच कदाचित् पामर्स्टनचे मनांत इटलीच्या उद्धाराची कल्पना आली असेल! पामर्स्टनमुळें इंग्लंडची इटलीला इतकी मदत झाली कीं, आज पामर्स्टनला मॅझिनी, गॅरिबॉल्डी, काव्हूर व व्हिक्टर इम्यॅन्युएल यांच्या बरोबरीचा मान देण्यांत येतो.

पोस्ट ऑफिस प्रकरणामुळें इंग्लंडांतील सभ्य स्त्रीपुरुषांना मॅझिनीबद्दल सहानुभूति वाटूं लागली. याच प्रकरणामुळें ॲशर्स्ट कुटुंबाशीं मॅझिनीची ओळख झाली. विल्यम हेन्री ॲशर्स्ट साहेबांनीं आपल्या मुलामुलींच्या हातीं मॅझिनीला निमंत्रण पाठविलें. मॅझिनीनें आमंत्रण स्वीकारलें तेव्हां सर्व मंडळींना फार आनंद झाला–कारण त्यांना वाटलें होतें कीं, कदाचित् मॅझिनीला इतका वेळ फुकट घालविण्याची सवड नसेल. ॲशर्स्ट साहेबांनीं आपल्या मुलामुलींना स्वतंत्रतेचें शिक्षण दिलें होतें. आपल्या वर्तनाबद्दल परमेश्वर आपला जाब घेईल हें त्यांनीं मुलांच्या मनावर ठसविलें होतें–म्हणून बेजबाबदार लोकनिंदेची त्यांनीं केव्हांच फिकीर केली नाहीं. ॲशर्स्ट साहेबानींच प्रथमत: पोस्टाच्या टिकिटांची किंमत एक आणा ठेवावी ही कल्पना काढली; त्यांच्या साह्यानें रोलंड हिलनें त्या कल्पनेला मूर्त स्वरूप दिलें. ॲशर्स्ट साहेबांच्या पत्नीला मॅझिनी आपली माताच मानीत असे. ह्या कुटुंबांतील मंडळींना त्यानें पाठविलेल्या पत्रांचा संग्रह प्रसिद्ध झाला आहे.

इंग्लिश समाजांत उत्पन्न झालेल्या या सहानुभूतीचा फायदा घेऊन मॅझिनीनें इंग्लंडांत इटलीसंबंधानें बरीच जागृति केली. त्याच्या प्रोत्साहनानें कांहीं इंग्लिश

सभ्य स्त्रियांनीं मिसेस मिल्नर गिब्सन * हिच्या घरीं इटालियन बाजार भरविला. ह्या बाजारामुळें मिळणारा नफा अनाथ इटालियनांच्या शाळेकडे जमा व्हावयाचा आहे असें जाहीर करण्यांत आलें होतें; पण वस्तुत: हा नफा इटलीच्या राष्ट्रीय निधीमध्यें जमा करावयाचा असें ठरलें होतें.

युरपियन राजांनीं पोलंडच्या स्वातंत्र्याचा क्राको येथें पुरता चुराडा उडवि-ल्यानंतर लोकसत्तावादाच्या प्रचारासाठीं व तरुण युरपचें मध्यंतरीं बंद पडलेलें कार्य पुढें चालवावयासाठीं १८४७ मध्यें मॅझिनीनें 'आंतरराष्ट्रीय जनतासंघ' (People's International League) स्थापन केला. परराष्ट्रीय राजकारणाचा विचार करणारी इंग्लंडमधील ही पहिलीच संस्था होय! "परदेशच्या राजकारणाची इंग्लिश जनतेला माहिती करून देणें; स्वराज्य, स्वातंत्र्य व प्रगति या तत्वांचा प्रसार करणें; लोकमताचें सामर्थ्य वृद्धिंगत करणें आणि युरपियन राष्ट्रांतील लोकांमध्यें एकामेकांच्या मनोवृत्तींबद्दल व आकांक्षांबद्दल समजूतदारपणा उत्पन्न करणें हा या संघाचा उद्देश आहे." मॅझिनीचे बहुतेक सर्व मित्र संघाचे सभासद झाले होते. इटलीच्या स्वातंत्र्या-साठीं इटालियन लोकांनीं युद्धाचाच मार्ग स्वीकारला पाहिजे या मॅझिनीच्या तत्वाला त्यांचेपैकीं कित्येकांचा विरोध होता. त्यांना मॅझिनी सांगे:-"हा विरोध प्रदर्शित करतांना तुम्ही आपल्याच देशांतील परिस्थितीच्या दृष्टीनें विचार करतां. जुलमाविरुद्ध तुम्हीहि पूर्वीं युद्धच केलें होतें. आतां सशस्त्र प्रतिकाराची तुम्हांला जरूरच उरलेली नाहीं. पण परकीयांच्या जुलुमाखालीं चिरडून जात असलेल्या माझ्या देशबांधवांना दुसरा कोणता मार्ग मोकळा राहिला आहे? तेथें प्रातिनिधिक संस्था नाहींत, जनतेच्या हक्कांना मंजुरी देणारे करारनामे नाहींत, फार काय, जनतेला मुळीं हक्कच नाहींत! अशा स्थितींत संग्रामाशि-वाय गत्यंतरच नाहीं." पोस्ट ऑफिस प्रकरणापासून मॅझिनीला बरेच मित्र

---

* मिसेस मिल्नर गिब्सन या बाईचें बालपण इटलींत गेलें होतें. ती निसर्ग-त:च स्वातंत्र्यप्रिय व वीरवृत्तीची होती. मॅझिनीला ती देवदूत मानीत असे. जन्मभर तिनें त्याला मदत केली. मॅझिनींच्या शाळेसाठीं हरएक प्रकारची मदत ती करीत व करवीत असे. पत्रव्यवहाराच्या बाबतींतहि तिनें मॅझिनीला फार मदत केली.

मिळाले होते. पत्रव्यवहार, शाळा, इटालियन बाजार, मुलाखती, लेखन वगैरे बरींच कामें मागें असल्यामुळें त्याला रिकामा वेळ फारच थोडा सांपडत असे— निराशेचे विचार मनांत आणावयाला त्याला फुरसतच नव्हती. फावल्या वेळांत तो व्हिटिंग्टन क्लबांत बुद्धिबळें खेळावयास जात असे. पैशाच्या बाबतींत मात्र त्याची स्थिति अझून हलाखीचीच होती. लेख लिहून त्याला फारसे पैसे मिळत नसत. " सुमारें आठ हजार फ्रँकांच्या कर्जासाठीं मला या गुलामगिरींत दिवस कंठावे लागत आहेत. माझें शरीर वृद्धावस्थेमुळें अशक्त होत चाललें आहे, मन कमकुवत झालें आहे, शक्ति क्षीण झाल्या आहेत ! या गुलामगिरींतून केव्हां सुटेन आणि स्वदेशाचें कार्य पुन्हां हातीं घेईन असें मला झालें आहे. " स्वदेशाचें कार्य हातीं घ्यावयाचा प्रसंग लवकरच येणार होता !

# ६. राज्यक्रान्ति.

( १८४३—१८४८ )

" What bloom of hope was there when Austria stood like an iron wall & their own ones dashing against it were feeble waves that left a red mark & no more ? "

*G. Meredith ( Vittoria).*

इटलीमधील परिस्थिति-संयुक्तसंस्थानपक्ष-पोप पायो नानो-राज्य-क्रान्ति-पीडमॉट विरुद्ध ऑस्ट्रिया-विश्वासघात-गॅरिबॉल्डीची तुकडी-दुसऱ्या युद्धांत पराभव.

सॅव्हॉयवरील स्वारीचा बेत फसल्यामुळें तरुण इटलीची पांगापांग झाली; राष्ट्रैक्य, राष्ट्रस्वातंत्र्य व लोकसत्ता या मॅझिनीच्या तत्वत्रयीवर इटलीची निष्ठा बसली होती; पण तें ध्येय साध्य व्हावयासाठीं ज्या साधनांचा अवलंब करण्यांत यावा असें त्याचें मत होतें त्या साधनांवरील जनतेचा विश्वास डळमळूं लागला होता. " पहिल्याच अपयशानें हे लोक इतके नाउमेद झाले आहेत कीं, इटलीबद्दल एक शब्दहि लिहावयास मला शरम वाटते—मला वाटतें कीं मी असत्य भाषण करीत आहें ! राष्ट्रकार्य एकदां अंगावर घेतलें कीं मग विजयश्री प्राप्त होईपर्यंत तें अखंडितपणें चालविलें पाहिजे. अपयश आलें तर जास्त नेटानें आपण उसळी मारली पाहिजे. " लोकसत्तेवरील मॅझिनीची निष्ठा तिळमात्रहि कमी झाली नव्हती, " तरी एकाद्या राजघराण्यानें इटलीमध्यें राष्ट्रैक्य स्थापन करण्याचें कार्य स्वीकारलें तर त्यालाहि ' अर्धं त्यजति पण्डित: ' या न्यायानें मी अनुमोदन देईन-मात्र हें महत्कार्य

शिरीं न घेणाऱ्या कोणत्याहि राजघराण्याबद्दल मला सहानुभूति वाटणें शक्य नाहीं." इटलीच्या नियोजित कार्यावरील त्याची निष्ठा अढळ होती. "लोकसत्तासंस्थापनेच्या कार्यांत इटलीनेंच पुढाकार घेतला पाहिजे," आणि ही "लोकसत्ता स्थापन करावयास उठावणीसारखें साधन नाहीं." उठावणीमुळें राष्ट्राचें चैतन्य जागृत राहतें ही गोष्ट निर्विवाद आहे; पण असल्या क्षणिक उचलीमुळें अंतिम ध्येयाकडे फारशी प्रगति होत नाहीं. जोबर्टी या इटालियन पुढाऱ्याचें म्हणणें होतें कीं, उठावणीला यश येतें तें क्षणिक असतें; अपयश आलें कीं मग मात्र जुलमाला पारावार उरत नाहीं आणि जुलमामुळें जनता नाउमेद होते. मॅझिनीला वाटे, "उठावणी फसली आणि जुलमाचा कळस झाला तरी बेहत्तर; उठावणीमुळें राष्ट्रचैतन्य सदैव जागृत राहतें; राष्ट्रचैतन्य जागृत असल्यावर आज ना उद्यां यश:प्राप्ति ही झालीच पाहिजे." उठावणीपासून तात्काळ फलप्राप्ति होते ही कल्पना किती फोल आहे हें पुढें त्याचें त्यालाच आढळून आलें; तसेंच, "जुलमाचें राज्य जितकीं वर्षें अधिक चालेल तितका जनतेमध्यें जास्त निरुत्साह उत्पन्न होतो; हा निरुत्साह दूर करावयाचें एकच कार्य एका पिढीला पुरून उरण्यासारखें आहे," हें त्यानें पुढें कबूल केलें.

यंग इटली पत्रकाचा सहावा अंक १८३४ ( जुलै ) मध्यें निघाला. पुढें संस्थेची संघटना ढांसळूं लागली. तरी इतर देशांची सहानुभूति मिळविणें, इटलीमध्यें लोकजागृतीसाठीं प्रचारक पाठविणें, पत्रव्यवहार करणें वगैरे कामें मॅझिनीनें यापुढें कितीतरी दिवस एकाकीच चालविली होतीं. पण पुढें त्याला स्विट्झरलँड सोडून जाणें भाग पडलें; लंडनला यावयाचे अगोदर त्यानें तरुण इटलीच्या नेतृत्वाचा राजीनामा दिला होता. त्याचेमागून संस्थेची जबाबदारी कोणीच अंगावर घेतली नाहीं; म्हणून ही संस्था इटलीमध्यें नामशेष होऊं लागली होती. संघटनेच्या दृष्टीनें संस्था दुर्बल झाली खरी, पण तिनें प्रसिद्ध केलेलें वाङ्मय व केलेलें कार्य ह्यांचा इटलीला विसर पडणें शक्य नव्हतें. कारबोनरी व तरुण इटली या संस्थांच्या कार्यामध्यें भाग घेतलेले पुष्कळ लोक राष्ट्रासाठीं आत्मसमर्पण करावयाच्या योग्य संधीचीच वाट पहात होते; राष्ट्राचा आत्मा जागृत ठेवावयासाठीं त्यांनीं वेगवेगळ्या ठिकाणीं व काळीं आत्मसमर्पण केलें. ऑस्ट्रियानें इटलीमध्यें मांडलेल्या प्रळयाच्या नव्या नव्या बातम्या रोज रोज लोकांच्या कानावर येत असत. हे अनन्वित प्रकार हरघडी घडत असल्यामुळें सुराज्य व स्वराज्य हीं दोन तत्वें लोकांनीं उराशीं बाळगून धरलीं होतीं.

मॅझिनीला वाटे " जाकोपो अझून मेला नाहीं. तो नूतन राष्ट्रधर्माचा आद्य-संस्थापक आहे ! या धर्माची स्थापना झालेली कदाचित् आपणांस 'याच देहीं याच डोळां' पहावयास मिळावयाची नाहीं, पण कधींतरी असें होणार हें मात्र खास !" याच तत्वावर निष्काम निष्ठा ठेवून मॅझिनीनें कार्य चालविलें होतें.

बँडिएरा बंधूंचें प्रकरण झाल्यापासून तरुण इटलीच्या कार्यक्रमावर निष्ठा असणारांची संख्या आणखी कमी झाली. ही उठावणी मॅझिनीच्या चिथावणी-वरून झाली नव्हती, तरी अपयशाचें खापर मात्र त्याच्याच माथ्यावर फोड-ण्यांत आलें ! कांहीं लोक तर उघडपणें म्हणूं लागलें कीं, हा इतरांना आपले जीव धोक्यांत घालण्याचा उपदेश करतो आणि स्वत: मात्र लंडन येथें मजा मारीत राहतो ! लंडनला त्याची चैन कशी चालली होती याचें वर्णन मागें आलेलेच आहे ! म्हातारपण यावयाचे अगोदर देशासाठीं आत्मसमर्पण करावयास मॅझिनी किती उत्सुक होता हें त्यानें वेळोवेळीं काढलेल्या उद्गारांवरून स्पष्ट दिसून येतें. इटलीसाठीं राष्ट्रीय निधि जमा करण्याकरितां त्यानें अविश्रांत तडफड केली पण त्याला फक्त शंभर पौंड जमवितां आले ! इटलीमध्यें लोकसत्ताक पक्षाचें वजन कमी होऊं लागलें आहे ही गोष्ट त्याला जाणवूं लागली होती, तरी त्यानें आपल्या कार्यांत खंड पडूं दिला नाहीं.

इटलीमध्यें त्यावेळीं नवीन पक्ष उत्पन्न होऊं लागले होते. इटलीचे संस्था-निक आपली सत्ता सोडावयास तयार होणार नाहींत व इतरांना युद्धामध्यें परा-जित करून संपूर्ण देश आपल्या अंमलाखालीं आणावयाचें सामर्थ्य कोणाहि एका संस्थानिकाला नाहीं; म्हणून त्यांनीं आपसांत समेट करावा आणि वर्गणी करून राष्ट्र उभें करावें असें गायकोमो ड्यूरँडो याच्या अनुयायांचें म्हणणें होतें. मामीयानीच्या पक्षाला वाटे कीं जिनोआ हेंच इटालियन संस्थानसंघाचें केंद्र असलें पाहिजे. गॅरीबॉल्डीचा नेपल्सवरील हल्ला यशस्वी होईपर्यंत खुद्द काव्हू-रचीं मतेंहि फार गुळमुळीत होतीं. इटलीच्या संयुक्त संस्थानचें अध्यक्षपद पोप-कडेच असावें असें जोबर्टीचें म्हणणें होतें. ऑस्ट्रियानें आपल्या मुलुखांतील प्रजेला हळू हळू सुधारणा द्याव्या असें प्रतिपादन करणारा एक नेमस्त पक्षहि त्यावेळीं अस्तित्वांत होता. एका बाजूला पांढरे फटफटीत नेमस्त, दुसरीकडे लालभडक लोकसत्तावादी, तिसरीकडे काळेभोर पोपचे भक्त आणि चवथीकडे येईल त्या सुसंधीचा फायदा घेणारा काव्हूरचा सोनेरी पक्ष होता !

नेमस्तांना वाटे, मुत्सद्देगिरीनें व धीराधीरानें देशाची उन्नति होणें शक्य आहे. " या पक्षाला उठावणीची एवढी भीति कां वाटते हें सांगणें फारसें कठीण नाहीं; मर्दुमकीची धाडशी वृत्ति त्यांचेमध्यें नाहीं आणि स्वतःचा नामर्दपणा कबूल करावयाची त्यांची इच्छा नाहीं! उठावणी झालीच तर कदाचित् तिजमध्यें भाग घेणें भाग पडेल या भीतीनें हे नेभळट लोक आम्हां क्रान्तिकारकांना मूर्खांत काढू पाहतात! जे देशवीर राष्ट्रासाठीं आत्मबलिदान करून चिरंजीव झाले त्यांचा जयजयकार करून, त्यांचें उदाहरण राष्ट्रापुढें ठेवण्याचे ऐवजीं हे लोक त्यांची निंदा करीत आहेत व इटलींतील तरुणांना कर्तव्यशून्य मात्र करीत आहेत! त्यांच्या हिशेवी अंतःकरणांत उत्साह नाहीं. हे लोक इटलीला शिथिलता आणीत आहेत आणि त्यांच्या कृतीमुळें आमच्या शत्रूंना मात्र अवसान चढू लागलें आहे." सरदार, हुद्देदार, धनवंत, धर्मगुरु वगैरे सुखवस्तु व सुखासक्त लोकांचा या पक्षांत भरणा होता. मॅझिनीच्या उदात्त उद्गारांनीं त्यांच्या हिशेवी माथ्यांत खळवळ उडत नसे; मानवजातीच्या प्रगतीच्या कार्यांत पुढाकार घेणें हें इटलीचें नियोजित कर्तव्य आहे या मॅझिनीच्या कल्पनेची ते हेटाळणी करीत. त्यांना ऑस्ट्रियाच्या सैन्याचें मोठें भय वाटे. इटालियन लोकांना नीति नाहीं, संपत्ति नाहीं, शिक्षण नाहीं—म्हणून ऑस्ट्रियाशीं टक्कर द्यावयाचे अगोदर देशाची नैतिक व आर्थिक उन्नति झाली पाहिजे, अगोदर या युद्धाच्या भानगडींत पडण्यांत अर्थ नाहीं अशी त्यांची कल्पना होती! " स्वातंत्र्याशिवाय खरें शिक्षण प्राप्त होणें शक्य नाहीं हें तत्व त्यांच्या डोक्यांत उतरतच नव्हतें! स्वातंत्र्यप्राप्ति म्हणजेच स्वातंत्र्याची पात्रता! स्वातंत्र्य प्राप्त करून घेईपर्यंत परतंत्र लोक स्वातंत्र्याला पात्र नाहींत असेंच म्हणण्यांत येतें! हे सगळे प्रश्न एकदम सोडविण्याचा एकच उपाय आहे—ही गुरुकिल्ली म्हणजे परवशतेवर हल्ला हीच होय!"

स. १८४६ सालीं पोप सोळावा ग्रेगरी मरण पावला. त्याची कल्पना होती कीं, लोकांच्या सुधारणेसाठीं नवे कायदे करणें, सोयीसाठीं नवे रस्ते बांधणें, प्रगतीसाठीं शिक्षण देणें—म्हणजे प्रत्यक्ष सैतानाला साह्य करणें होय! अग्रस्थानीं असलें रत्न असल्यावर प्रांतिक अधिकाऱ्यांनीं प्रजेवर काय कहर गुदरविला असेल याची कल्पना सहज होणार आहे. ग्रेगरी ख्रिस्तवासी व्हावयाचे अगोदर जोबर्टी नांवाच्या एका धर्मगुरूनें नुकतेंच प्रतिपादन केलें होतें कीं, इटलीला स्वातंत्र्य मिळवून द्यावयाचें सामर्थ्य एकट्या पोपच्याच अंगीं आहे-या कार्याला

त्यानें हात मात्र घातला पाहिजे. ग्रेगरीच्या मागून पोप नववा पायस रोमच्या गादीवर आला तेव्हां जोवर्टीचें भविष्य खरें होणार अशी सर्वांना आशा वाटूं लागली. गादीवर येतांच त्यानें राजकीय गुन्हेगारांना माफी दिल्याचा जाहीरनामा काढला. हे सातशें कैदी घरोघर परत आले तेव्हां त्यांनीं नव्या पोपचा जयघोष चालविला ! लोकांना गैरसोयीचे वाटणारे अनेक कायदे त्यानें रद्द केले व सुधारणेच्या कार्यक्रमाला मंजुरी दिली. अगोदरपासूनच उदारमतवादित्वाबद्दल त्याची ख्याति होती: त्यानें आपल्या मतांना मूर्त स्वरूप द्यावयास आरंभ केलेला पाहून जोवर्टी पक्षाला आनंदाचें भरतें आलें. पायसच्या नेतृत्वाखालीं इटलीमध्यें संयुक्तसंस्थानपद्धति सहज स्थापन करतां येईल असें त्यांना वाटूं लागलें. पोपच्या भक्तमंडळींनीं त्याला ' इटलीच्या स्वातंत्र्याचा अरुण ' अशी पदवी देऊन टाकली ! राष्ट्रैक्यासाठीं आपण लोकसत्ता क्षणभर बाजूला ठेवावयास तयार आहों असें मॅझिनीनें बोलून दाखविलें होतें; आतां त्याला पायसचे भक्तजन आपल्या पक्षाला मिळण्याचा आग्रह करूं लागले. पण राजकर्त्यांच्या गोड वचनांनीं मॅझिनी भुलणारा नव्हता. " इटलीच्या स्वातंत्र्यासाठीं पोप महाराजांनीं झेंडा उभारला कीं मी खास या पक्षाला मिळेन. पण राष्ट्राच्या ऐक्याचा झेंडा कोठें आहे? तें निशाण कोणीहि उभारावें. त्याच्या नेतृत्वाखालीं मीं दाखल होईन ! "

राजे लोकांच्या हातून कितपत कार्य होतें याचा अनुभव मॅझिनीला एकदां आलाच होता; शिवाय पायो नोनोबद्दल त्याचें मत फारसें चांगलें नव्हतें. आपल्या भक्तजनांवर वजन टाकण्यासाठीं पायस खोटाच विनय धारण करी व म्हणे:-' ह्या लोकांना वाटतें कीं मी नेपोलियनसारखे विजय संपादन करावे ! पण मी आहे एक खेडवळ भटजी ! मला या भानगडींत पडून काय करावयाचें आहे ? ' लोकांना वाटे महाराजांचें मन किती उदार आहे ! पण या नाटकानें मॅझिनी फसला नाहीं. " पोप महाराज, सर्व भटजींचे आपण अग्रणी आहांत हें मला कबूल आहे; पण एका संस्थानचें राज्य चालविण्याचें आपल्या नशीबीं आलें आहे, आणि राजा या दृष्टीनें आपण अगदीं अधम आहांत ! " असें मॅझिनीनें स्पष्टपणें बोलून दाखविलें.

राष्ट्रैक्यासाठीं पुढाकार घेणाऱ्या राजाला इटालियनांनीं मन:पूर्वक मदत करावी व पोप महाराजांनीं इच्छा असल्यास हें कार्य उघडपणें हातीं घ्यावें या हेतूनें मॅझिनीनें पायसला एक अनावृत पत्र पाठविलें. त्याचे भक्तजन त्याला

' सुधारक पोप ' म्हणतच होते, सुधारणेचें कार्य हातीं घ्यावयाची मॅझिनीनें त्याला विनंति केली. " तत्वावर निष्ठा ठेवून विजयशाली तरी व्हा किंवा सातव्या ग्रेगरीप्रमाणें* सत्यासाठीं अज्ञातवासाचा तरी स्वीकार करा ! " पायसनें स्वत:ची फसवणूक करून घेऊं नये म्हणून मॅझिनीनें सुधारणेच्या कार्यांची महती केवढी आहे हें विशद करून दाखविलें. " सुधारणेच्या कार्याच्या अग्रस्थानीं असावयाचा अधिकार परमेश्वरी योजनेनुसार आपणांकडे आलेला आहे; हें कार्य हातीं घेणाराचे अंत:करणांत अढळ निष्ठा असली पाहिजे. राजा, राजकारस्थानी व मुत्सद्दी या अभिधानांचा आपण धिक्कारच केला पाहिजे. कारस्थानाच्या नादीं लागून आपण आपला नैतिक अध:पात करून घेऊं नका, परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळें घाबरून जाऊन आपण स्वार्थाच्या मागें लागूं नका; राष्ट्रकार्य हातीं घ्यावयाचा कायदेशीर हक्क आपणांस आहे कीं नाहीं हें पाहण्यासाठीं आपण शास्त्राधार शोधण्याच्या मार्गाला लागूं नका-निष्ठेचा अभाव असला म्हणजे मनुष्याला कायद्याची कांस धरावी असें वाटतें ! सल्लागारांच्या नादीं लागूं नका, परमेश्वराच्या योजनेकडे नजर ठेवा व स्वहृदयाच्या स्फूर्तीचा सल्ला घ्या ! सत्य, न्याय व निष्ठा यांचें मंदिर उभारण्याचें कार्य किती महत्वाचें व जरूरीचें आहे याकडे लक्ष द्या...महाराज, इटलीच्या, आपल्या मातृभूमीच्या ध्येयावर आपण निष्ठा ठेवा आणि राष्ट्रैक्याचा झेंडा उभारा. आपण युरपियन जनतेच्या अग्रस्थानीं आहांत; या स्थानाच्या, वैभवाच्या व सामर्थ्याच्या तोडीचीं कर्तव्येंहि आपणांस आहेत. इटलीचें ऐक्य घडवून आणावयास आपण समर्थ आहांत...आपल्या नुस्त्या आशीर्वादानें हें कार्य होण्यासारखें आहे. राष्ट्रासाठीं आत्मसमर्पण करावयास सज्ज

---

* सातवा ग्रेगरी ( १०२०—१०८५ ) इ. स. १०७३ मध्यें हिल्डब्रँड हा सातवा ग्रेगरी हें नांव धारण करून पोपच्या गादीवर अधिष्ठित झाला. पोपच्या हातीं धार्मिक प्रभुत्व आलें तें याच्याच कर्तबगारीमुळें ! त्यांच्या ऐहिक सत्तेचा पायाहि यानेंच घातला. पोपची निवडणूक कार्डिनल मंडळींनीं करावी हा प्रघात यानेंच घालून दिला. धर्मगुरूंच्या वर्तनावर कडक निर्बंध घातल्यामुळें ते त्याचे शत्रु बनले. जर्मनीचा बादशहा चवथा हेन्री याला त्यानें बहिष्कृत करून प्रायश्चित घेण्यास भाग पाडलें होतें. पुढें सत्तेसाठीं फळ्या पडल्या म्हणून ग्रेगरीनें सत्त्यासाठीं अज्ञातवास स्वीकारला व त्यांतच त्याचा अंत झाला.

असलेल्या तरुणांशीं सहकारिता करा. त्या राजामहाराजांच्या नादीं लागूं नका ! एकोणीसाव्या शतकांत इटलीचें ऐक्य झालेंच पाहिजे. हे उद्गार आपण नुस्ते प्रगट करा–तें कार्य करावयासाठीं जनता धांवून येईल, तें कार्य परस्परेंच पार पाडण्यांत येईल...स्वधर्म व स्वराज्य यांची एकवाक्यता आपल्याच हातून होणें शक्य आहे ! ” गांवढ्या-पुढें वाचली गीता, कालचा गोंधळ बरा होता ! तो बिचारा भटजी मॅझिनीच्या वचनांचें तेज पाहून भीतीनें फिका पडला; आपल्या अमदानीच्या आरंभीं त्यानें प्रजेची सहानुभूति मिळविण्यासाठीं सुधारणेचें कार्य हातीं घेतलें होतें; पण प्रत्यक्ष कार्याला सुरवात होतांच लोकांचें सामर्थ्य वाढूं लागलेलें पाहून पोपच्या छातींत धडकी भरली. अनेक जुलमी अधिकाऱ्यांना बडतर्फ केल्यावांचून सुधारणा यशस्वी होणें शक्य नाहीं हें त्याला कळून चुकलें होतें. पण लोकांना, त्याचप्रमाणें संस्थानच्या नोकरशाहीलाहि खूष ठेवावयाची त्याची इच्छा होती ! या अधिकाऱ्यांना काढून टाकण्याचें पोपनें नाकारतांच नोकरशाहीची मिजास वाढूं लागली; त्यांनीं सुधारणांची चालढकल चालविलेली पाहून लोक खवळून गेले.

इटालियन जनतेच्या उत्साहाबद्दल मॅझिनी निराश झाला होता, पण त्याची ही निराशा लवकरच दूर झाली. स. १७४७ सालीं जिनोआमधून ऑस्ट्रियनांना हांकून देण्यांत आलें होतें; त्या प्रसंगाला बरोबर शंभर वर्षें झालीं म्हणून सर्व इटालियन लोकांनीं स. १८४७ च्या डिसेंबर महिन्यांत मोठा उत्सव केला. नव्या वर्षाला आरंभ होतो न होतो तोंच सिसिलींतील लोकांनीं बंड उभारून बूर्बोन घराण्याला हांकून दिलें व ता. १२ जानेवारी स. १८४८ रोजीं त्यांनीं पालर्मो येथें तात्पुरतें सरकार नेमलें. नेपल्समधील बंडवाल्यांचा जोर पाहून राजानें निमूटपणें राज्यघटनेस मान्यता दिली; टस्कनी व पीडमॉंट संस्थानांच्या राजांनींहि राज्यघटनेनुसार कारभार चालविण्याचें कबूल केलें; पोप पायस यानें आपल्या प्रजेला राज्यघटना दान केली. ऑस्ट्रियाच्या ताब्यांतील प्रांत खेरीज करून इटलीमधील सर्व संस्थानांतील जनतेच्या हक्कांना मान्यता मिळाली. या सर्व संस्थानांनीं एकजूट होऊन ऑस्ट्रियाबरोबर युद्ध करावें असें जनतेनें स्पष्टपणें जाहीर केलें. परकीयांची हकालपट्टी करा अशी गर्जना भररस्त्यांत ऐकूं येऊं लागली. जिनोआ येथें चाळीस हजार लोकांनीं एक जंगी मिरवणूक काढली व इटलीचें राष्ट्रीय निशाण उभारून नव्या राष्ट्राचा जन्मोत्सव साजरा केला.

पण ऑस्ट्रियाविरुद्ध जनतेचें नेतृत्व स्वीकारण्यास चार्लस् अलबर्ट कचरत होता ! त्याला फ्रान्सची भीति वाटत होती, त्याला ऑस्ट्रियाच्या सैन्याची भीति वाटत होती ! असा हा अनिश्चयी राजा किंकर्तव्यमूढ झाला आहे तोंच सर्व युरपभर राज्यक्रान्तीची लाट उसळली !

इटलीमध्यें स. १८४८ मध्यें झालेली बंडाळी मॅझिनीच्याच प्रेरणेवरून झाली असा त्यावेळच्या कागदपत्रांवरून निर्णय निघतो. राज्यक्रांतीच्या बहुतेक सर्व पुढाऱ्यांबरोबर मॅझिनीचा पत्रव्यवहार फार दिवसांपासून चालू होता. "ह्या वर्षी इटली देश एकछत्री करण्याकरितां झालेले प्रयत्न मॅझिनीच्याच प्रेरणेमुळें करण्यांत आले. इटालियन लोक पीडमॉंटच्या राजाच्या नादीं लागले नसते तर ऑस्ट्रियाची हकालपट्टी खात्रीनें झाली असती." (इंग्लंड ब्ल्यू बुक. १८४८–४९ ). "ज्वालामुखींतून उसळणाऱ्या तप्त लाव्हा रसाप्रमाणें हें बंड सगळीकडे पसरूं लागलें आहे—आणि हा मॅझिनीच्याच उपदेशाचा परिणाम होय ! इटलीच्या एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेला तरुण इटलीनेंच मूर्त स्वरूप दिलें ही गोष्ट निर्विवाद आहे." ( लॉर्ड पामर्स्टन यांस ऑस्ट्रियन दरबारचा खलिता ). "आपल्याच संस्थानांत बंडाळी करून थांबावयाचा दंगेखोरांचा हेतु दिसत नाहीं. हीं सारीं राज्यें मोडून टाकून इटलीचें एक राष्ट्र बनवावयाचा त्यांचा हेतु आहे. ( प्रिन्स मेटरनिक* ११ आगस्ट १८४७ ).

ऑस्ट्रियन साम्राज्याचा गगनचुंबी डोलारा स. १८४८ मध्यें कोलमडून पडण्याच्या रंगास आला होता. हंगेरियन व बोहिमियन लोकांनीं आपलें स्वातंत्र्य जाहीर करून ऑस्ट्रियाशीं युद्ध पुकारलें; व्हिएन्नाच्या राजनिष्ठ प्रजेनें ता. १२ मार्च रोजीं बंड केलें. बंडखोरांचा सारा राग मेटरनिकवर आहे हें पाहून बाद-

---

* प्रिन्स मेटरनिक (१७७३—१८५९) ऑस्ट्रियाचा प्रधान व एकोणीसाव्या शतकांतील युरपियन दडपशाहीचा अग्रणी. १८१३ सालीं त्यानें नेपोलियनला हाणून पाडावयासाठीं युरपियन राजांचा कट उभा केला. नेपोलियन सेंट हेलिना बेटांत कैदेंत गेल्यावर त्यानें युरोपांतील राज्यक्रान्तिकारकांना चिरडून टाकावयासाठीं अटोकाट श्रम केले. १८०१ पासून १८४८ पर्यंत त्यानें आस्ट्रियाचा कारभार हांकला. १८४८ च्या क्रान्तिमध्यें त्यानें इंग्लंडास पळ काढला. ऑस्ट्रियामध्यें राजसत्ता पुन्हां स्थापन होतांच तो स्वदेशीं परत आला; पण यापुढें त्यानें राजकारणांत भाग घेतला नाहीं.

शहानें आपल्या वृद्ध प्रधानाला हद्दपार केलें ! तरीहि लोकांचा क्षोभ वाढतच चाललेला पाहून भेदरलेल्या सम्राटानेंहि थोडक्याच दिवसांनीं पळ काढला. फ्रान्समध्यें व जर्मनीमध्यें स्वयंस्फूर्तीनेंच राज्यक्रान्तीच्या लाटा उसळूं लागल्या !

ऑस्ट्रियन क्रान्तीची बातमी येतांच इटालियन जनतेचा उत्साह अमर्याद झाला. व्हेनीशिया व लॅांबर्डी या प्रांतांत बंडाळीला सुरवात झाली. डॅनिएल मानीन नांवाचा ज्यू जातीचा एक वकील ऑस्ट्रियन अधिकाऱ्यांच्या अन्यायापासून व्हेनिसच्या नागरिकांचा बचाव करण्यासाठीं झटत असे, म्हणून त्याला कैदेंत टाकण्यांत आलें होतें; व्हेनिसच्या लोकांनीं ऑस्ट्रियन गव्हर्नराच्या राहत्या घराला गराडा घातला व मानीनला बंधमुक्त करावें असा ओरडा केला. राष्ट्रसंरक्षक स्वयंसैनिकांच्या पलटणींत पहिल्याच दिवशीं चार हजार नागरिकांनीं नांवें नोंदविलीं—पण त्यांचेजवळ शस्त्रास्त्रें नव्हतीं. इतक्यांत दारूगोळयाच्या कारखान्यांतील मजुरांनीं तेथील ऑस्ट्रियन कमांडराचा खून केला; शस्त्रागारांतील हत्यारें बंडखोरांनीं वांटून घेतल्यावर त्यांनीं मानीनची सुटका केली. बंडखोरांना तोंड देणें शक्य नाहीं हें दिसून येतांच ऑस्ट्रियन सैन्यानें ता. २२ मार्च रोजीं शहर खालीं केलें. लगेच व्हेनिस शहरीं लोकशाही जाहीर करण्यांत आली !

ता. १ जानेवारी १८४८ रोजीं मिलन शहरीं 'तंबाखूचें बंड' सुरू झालें. बहुतेक इटालियनांना सिगारेटचें जबर व्यसन असतें. इटलींत तंबाखूचा मक्ता ऑस्ट्रियन सरकारकडे होता; त्यांचें उत्पन्न बुडवावयासाठीं इटालियनांनीं तंबाखूवर बहिष्कार घातला. या राष्ट्रीय बहिष्काराबद्दल तिरस्कार व्यक्त करण्यासाठीं ऑस्ट्रियन पलटणींनीं व सरकारच्या हस्तकांनीं मिलनच्या रस्त्यांमधून सिगारेटस्‌चा धूर सोडीत परेड केली. रस्त्यानें वावरणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या तोंडावर ते मुद्दाम धूर सोडीत ! ह्या अपमानामुळें दंग्याधोप्याला सुरवात झाली. लोकांनीं तंबाखू ओढावा यासाठीं शिपायांनीं जबरदस्तीला सुरवात केली ! ता. ३ जानेवारी रोजीं आस्ट्रियन सेनापति रॅडेटस्की याच्या हुकमावरून रस्त्यांत जमलेल्या निःशस्त्र जमावावर गोळया झाडण्यांत आल्या व स्वारांनीं आपले घोडे लोकांच्या अंगावर घातले. यावेळीं सुमारें साठ नागरिक मरण पावले. ह्या क्रूर प्रकारामुळें मिलनचे रहिवासी अगदीं खवळून गेले. ता. १७ मार्च रोजीं मेटरनिकच्या हद्दपारीची बातमी मिलनला थडकली; त्याच दिवशीं ऑस्ट्रियानें इटालियनांना नवे हक्क दान केल्याचा जाहीरनामा जागोजाग

भिंतीवर डकवण्यांत आला. या जाहीरनाम्यांवर इटालियनांनीं ("Too late") "आतां या सुधारणांचा कांहीं उपयोग होणार नाहीं" असे शब्द लिहिले. खवळलेल्या लोकांना आपल्या सामर्थ्याची कल्पना करून देण्यासाठीं ऑस्ट्रियन सैन्यानें रस्त्यांतून कूच करावें असा हुकूम निघाला. लगेच लोकांनीं रस्त्यांची नाकेबंदी करून जुन्या बंदुका पैदा केल्या; दुसऱ्या दिवशीं ऑस्ट्रियन शिपायांवर गोळ्यांचा व दगडधोंड्यांचा वर्षाव करण्यांत आला; या लढाईंत बायकापोरांनीं व भटाभिक्षुकांनींहि जिवापाड श्रम केले. रॅडेट्स्कीच्या वीस हजार सैन्याला मिलनकरांनीं पांच दिवस तोंड दिलें. पीडमाँटचें सैन्य आपल्या पिछाडीकडून येऊं लागलें आहे हें कळतांच रॅडेट्स्कीनें ता. २२ मार्च १८४८ रोजीं आपल्या सैन्यासह सरहद्दीकडे पळ काढला! या पांच दिवसांत ऑस्ट्रियाचे चार हजार सैनिक गारद झाले! एका आठवड्याचे आंत सर्व इटली देश परकीयांचे तावडींतून मुक्त झाला—सरहद्दीवरील चार किल्ले मात्र अझून ऑस्ट्रियाच्या ताब्यांत होते. ऑस्ट्रियाच्या सैन्यांत नोकरीला असलेल्या इटालियन सैनिकांनीं नोकरीवर एकदम लाथ मारली व ते राष्ट्रीय स्वयंसैनिकांना मिळाले. ऑस्ट्रियाच्या सैन्याला स्वदेशीं जातां येईना; कारण सरहद्दीच्या रस्त्यांतील माऱ्याच्या सर्व जागा इटालियन स्वयंसैनिकांनीं रोखून धरल्या होत्या; याच कारणामुळें रॅडेट्स्कीला कुमक मिळणें अशक्य झालें! तरी त्यानें धीर सोडला नाहीं. कांहीं झालें तरी ह्या किल्ल्यांचा त्याग करावयाचा नाहीं असा त्या वृद्ध व अनुभवी सेनापतीनें निश्चय केला होता!

प्रजा चवताळून गेलेली असल्यामुळें लोकांचे पुढारी म्हणतील तें मान्य करणें संस्थानिकांना भाग पडलें. टस्कनीचा ग्रँड ड्यूक ऑस्ट्रियन राजघराण्याचा अगदीं जवळचा नातेवाईक असूनहि त्याला ऑस्ट्रियाबरोबर होणाऱ्या स्वातंत्र्ययुद्धाला मदत करणें भाग पडलें! नेपल्सच्या राजाला व पोप महाराजांना युद्धासाठीं आपलें सैन्य देणें भाग पडलें. राजपुत्र, मुत्सद्दी, सरदार, भटजी, विद्यार्थी, कारागीर, मजूर वगैरे जनतेचे सर्व घटक उत्साहानें पूरित होऊन रणांगणावर धांव घेते झाले. दऱ्याखोऱ्यांतून, खेड्यांपाड्यांतून स्वयंसैनिकांची नुस्ती रांग लागली. इटलीच्या पवित्र कार्यासाठीं जनता धांवून आली—मॅझिनीला दिसलेलें दिव्य दृश्य सफल व्हावयाचा प्रसंग येऊन ठेपला!

ही आनंदाची वार्ता समजतांच मॅझिनीनें फ्रान्सच्या मार्गानें आपल्या मातृभूमीकडे धांव घेतली. १८४८फेब्रुवारी ता. २९ रोजीं त्यानें पॅरिसला जावयासाठीं

लंडन सोडलें. ता. ५ मार्च रोजीं पॅरिस येथें त्यानें " इटालियन राष्ट्रीय समिती" ची स्थापना केली. ता. १८ मार्च रोजीं मिलनमध्यें बंड झाल्याची बातमी ऐकून तो इटलीमध्यें जावयास निघाला. पीडमॅांट येथील स.१८३३ चा हद्दपारीचा हुकूम अझून कायमच होता. सरहद्दीवरील अधिकाऱ्यांनीं त्याला ओळखलें व त्याचें प्रेमानें स्वागत केलें. वाटेंत लोकांनीं त्याचा जयजयकार केला; मॅझिनीचीं वचनें त्यांना मुखोद्गत होतीं—त्या वचनांचा त्यांनीं घोष चालविला होता! ता. ७ एप्रिल रोजीं तो मिलन येथें पोंचला. मॅझिनी आपल्या गांवीं आला आहे हें कळतांच मिलनच्या रहिवाशांनीं त्याची जंगी मिरवणूक काढली. राष्ट्राच्या वतीनें मिलनकरांनीं त्याला एक तिरंगी झेंडा नजर केला. त्याचें दर्शन घ्यावयास त्याच्या बिऱ्हाडीं उत्सुक लोकांचे थवेच्या थवे लोटले; त्यावेळीं लोकांच्या नेत्रांत कृतज्ञतेचे व मॅझिनीच्या डोळ्यांत प्रेमाचे अश्रु उभे राहिले! ऑस्ट्रियाच्या नोकरीवर लाथ मारून आलेल्या दोन हजार सैनिकांची शहरामध्यें मिरवणूक निघाली होती, ती पाहून मॅझिनीच्या डोळ्यांतून अश्रुधारा लोटल्या! या महात्म्याला आपण कुशब्दांनीं ताडन केलें, त्याची थट्टामस्करी केली, त्याच्या आज्ञांचा अन्हेर केला हें आठवून इटालियन लोकांना मोठी शरम वाटली. त्याच्या ज्या कल्पना कालपर्यंत अव्यवहार्य मानण्यांत येत होत्या त्यांनाच आज मूर्त स्वरूप प्राप्त झालें होतें!

एकराष्ट्रीयत्वाचा, स्वतंत्रतेचा व लोकशाहीचा हेतु मनीं धरून जनतेनें बंडाचा सरळ मार्ग धरला हें पाहून नेमस्तांना अत्यंत आश्चर्य वाटलें. " या नेमस्तांना एकराष्ट्रीयत्व नको होतें, त्यांना संस्थानसंघ पाहिजे होता; त्यांना ऑस्ट्रियाची सावली पाहिजे होती, त्यांना राजे लोकांच्या दरबारांत लुडबुडावयास पाहिजे होतें. नेमस्तांच्या पुढाऱ्यांना कायदेमंडळांत बसावयाचा हक्क पाहिजे होता पण जनतेला मतस्वातंत्र्य द्यावयास मात्र ते कांकूं करीत होते, कारण मतस्वातंत्र्यापुढें आपला टिकाव लागणार नाहीं हें ते जाणून होते!" " इटलीच्या बोटाएवढाल्या चिंध्या झालेल्या आहेत; यावेळीं जर जोराची चळवळ केली नाहीं तर मृत्यु आ वासून बसलेलाच आहे—अशा आणीबाणीच्या वेळीं हे लोक आपला सनदशीर नेमस्तपणा कायम ठेवण्यामागें आहेत!...मागें एकदां त्यांना वाटत होतें कीं, पोप महाराज इटलीमध्यें संस्थानसंघ स्थापन करूं शकतील; त्या पोपनें यांना तोंडघशीं पाडलें; आतां हे चार्लस अलबर्टच्या मागें लागले आहेत; थोडक्याच दिवसांनीं हे दुसरा एकादा संस्था-

निक गांठतील; अशी यांची धांवपळ कोठवर चालणार आहे तें एक परमेश्वरच जाणे ! ” मिलन येथील लोकांनीं बंड उभारलेलें पाहून तेथील नेमस्ताग्रणींनीं व स्थानिक अधिकाऱ्यांनीं एक जाहीरनामा प्रसिद्ध केला:–“ लोकांनीं आरंभलेल्या या बेकायदा बंडाबद्दल आम्हांला फार वाईट वाटत आहे. ज्यांना कोणाला कायद्याची चाड असेल त्यांनीं या बंडाळीमध्यें बिलकुल भाग घेऊं नये. ” नुस्ता जाहीरनामा काढून हे लोक स्वस्थ बसले नाहींत. आपली प्रतिष्ठा शाबूत रहावयासाठीं त्यांनीं चार्लस अलबर्टला या चळवळीचें नेतृत्व स्वीकारण्याची विनंति केली; या विनंतीबरोबरच त्यांनीं राजाला कळविलें कीं, जर आपण असें करणार नाहीं तर कदाचित् आपणांस राज्यासहि मुकावें लागेल. त्यांना ठाऊक होतें कीं, क्रान्तीचें नेतृत्व राजाकडे दिल्यानें लोकांचा लोकशाहीचा जोर आपोआप ओसरेल व राजाचा फायदा झाला तर आपलाहि फायदा होईल; चार्लस अलबर्टलाहि नेमस्तांचें म्हणणें पटूं लागलें होतें. अखेरीस इटालियन क्रान्तिकारकांचें नेतृत्व स्वीकारण्याचें कबूल करून त्यानें ऑस्ट्रियाशीं युद्ध पुकारलें. ( ता. २३ मार्च १८४८ ).

चार्लस अलबर्टला निष्ठासामर्थ्य नव्हतें; कोणत्याहि गोष्टीसंबंधानें त्याचा निश्चय होत नसे; त्याचें अंत:करण जुलमी होतें; केवळ महत्वाकांक्षेमुळें त्यानें युद्धांत भाग घेतला. सेनापतीला अवश्य असणारे गुण त्याच्या ठिकाणीं नव्हते. युद्ध जाहीर केल्यानंतर ,त्यानें मॅझिनीला मुलाखतीला बोलाविलें ! जोकोपो रफीनीचा जिवलग मित्र व त्याच्या खुनाबद्दल जबाबदार असणारा राजा यांच्या भेटीचा हा योगायोग विलक्षणच ! इटलीसाठीं मॅझिनीनें आपल्या खासगी भावना बाजूला ठेविल्या. “ चार्लस अलबर्टबद्दल मला किती किळस वाटतो हें मला सांगतांच येणार नाहीं; त्याच्या निष्ठाशून्यतेबद्दल व भेकडपणाबद्दल मला त्याचा तिरस्कार वाटतो; त्यानें माझ्या मित्रोत्तमांचा घात केलेला आहे; इतकें असूनहि इटलीचें महत्कार्य हातीं घ्यावयाची आकांक्षा त्याच्या मनांत उत्पन्न होत असेल तर मी ‘ तथास्तु ’ असेंच म्हणेन ! ” युद्ध संपून परक्यांच्या तावडींतून देशाची सुटका होईपर्यंत आपण कोणत्याहि प्रकारच्या राजकीय मतांचा प्रचार करणार नाहीं, असें याच चार्लससाठीं मॅझिनीनें कबूल केलें; या युद्धांत मिलनच्या बंडखोर व विजयशाली लोकसत्तावाद्यांनीं चार्लसच्या बाजूनें लढावें अशी खटपट आपण करूं. असें मॅझिनीनें राजाला वचन दिलें—मात्र हें एका अटीवर, कीं हें युद्ध आपण

इटलीसाठीं पुकारलें आहे, सॅव्हॉयसाठीं नव्हे असें राजानें जाहीर करावें. मॅझिनीनें आपलें वचन पाळलें. मात्र राजानें प्रथम वचन दिलें व पुढें वचनभंग केला! मॅझिनीचें वचन म्हणजे आपलेंच वचन होय अशा भावनेनें मिलनच्या लोकसत्तावाद्यांनीं चार्लस अलबर्टच्या निशाणाचा आश्रय केला; त्यांच्या लोकसत्तावादी नियतकालिकांनीहि मॅझिनीच्या शब्दासाठीं चार्लसची बाजू उचलून धरली. असें असूनहि बिचाऱ्या मॅझिनीवर आरोप करण्यांत येतो कीं, त्यानें ऐन आणिबाणीच्या प्रसंगीं इटलीमध्ये दुफळी केली! या आरोपाला इतिहासाचा दुजोरा नाहीं, व्यक्तिद्वेषाचा मात्र आहे!

चार्लस अलबर्टनें रणांगणाचा मार्ग धरला त्यावेळीं विजय मिळवावयाची योजना करावयाचे अगोदरच त्यानें पळवाट निर्माण करून ठेवली! आपण युद्ध कां जाहीर केलें या बाबतींत युरपियन दरबारांना पाठविलेल्या खलित्यांत त्यानें म्हटलें होतें. "लोकसत्ता स्थापन होऊं नये एवढयाचसाठीं आम्ही लॅंबर्डी प्रांतावर हल्ला चढविला आहे!" आणि ह्याच चार्लसला कांहीं लोक त्यावेळीं "इटलीच्या राष्ट्रपुरुषाचा अवतार", "इटलीचें खड्ग" या मोठमोठया पदव्या अर्पण करीत होते. ट्यूरिन येथील इंग्लीश वकीलानें लॉर्ड पामर्स्टनला पाठविलेल्या खलित्यांत चार्लसचा युद्ध जाहीर करण्याचा हेतु स्पष्ट केला आहे. "ऑस्ट्रियानें इटालियन प्रजेला अगोदरच सवलती दिल्या असत्या तर गोष्टी या थराला आल्याच नसत्या; लोकांच्या देशाभिमानाला गुंगी आणण्याची संधि ऑस्ट्रियानें वायां दवडली; म्हणून पीडमॉंटला स्वार्थासाठीं आपल्या राजधोरणांत बदल करणें भाग पडलें." (ता. २५ मार्च). व्हाइस कॉन्सल रॉबर्ट कॅंपबेल यांचा खलिताहि फार महत्वाचा आहे: "सर्व वर्गांची एकी झाली होती पण पीडमॉंटच्या राजानें युद्धांत भाग घेतल्यामुळें जनतेमध्यें दोन तट पडले आहेत; सरदार व श्रीमान् लोकांची इच्छा आहे कीं, लॅंबर्डी प्रांत पीडमॉंटच्या राज्याला जोडण्यांत यावा; सुशिक्षित व उत्साहि लोकांना लोकसत्ता पाहिजे आहे...खुद्द ऑस्ट्रियन सैन्यांतले लोक नोकरी सोडून घरोघर निघून जात आहेत!" (ता. ३१ मार्च). दुसऱ्या एका खलित्यांत म्हटलेलें आहे:— "लॅंबर्डींत प्रजासत्ताक राज्य स्थापन झालें तर सार्डीनियाच्या मुलखांतहि लौकरच धामधूम उडेल. येथील लोक सध्यांच सरकारला जुमानीत नाहींत— त्यांचे पुढारी बंड उभारून ऑस्ट्रियावर हल्ला करावयाची धमकी देत आहेत. या संकटामुळेंच राजघराण्याला तरवार उपसणें भाग पडलें आहे. मॅझिनी

म्हणतो:-" ज्या दिवशीं ऑस्ट्रियन सेनापति रॅडेट्स्की यानें मिलनमधून आपल्या सैन्यासह पळ काढला, ज्या दिवशीं आपल्याच राज्यांतील स्वयंसेवक लॅांबर्डीतील बंड तडीस लावावयास जात आहेत हें राजानें पाहिलें, तेव्हां त्याला समजून आलें कीं, आतां आपण विलंब केला तर राज्याची वाढ होणें तर बाजूलाच राहिलें, पण कदाचित् आहे त्याच राज्यास आपणांला मुकावें लागेल; म्हणून त्यानें ऑस्ट्रियाशीं युद्ध पुकारलें...इटलीच्या स्वातंत्र्यासाठीं आनंदानें आत्मार्पण करणाऱ्या एखाद्या गरीब मजुराच्या खेटराचीहि सर असल्या पन्नास कारस्थानी राजांना येणार नाहीं! तरुण इटलीनें जनतेच्या अंत:करणांत लोकसत्तेची लालसा उत्पन्न केली होती व लोकसत्तेचें कार्य ढांसळ-वण्यासाठींच चार्लसनें युद्ध पुकारलें." लोकांना शांत करण्यासाठीं राजानें एक जाहीर थाप ठोकून दिली कीं, लॅांबर्डीतील लोकांना केवळ भ्रातृभावानें मदत करण्याकरतां आम्ही आलों आहों! आणि दुसरीकडे सरकारी आरमाराला हुकूम पाठविला कीं, "ऑस्ट्रियानें चढाई करीपर्यंत तुम्ही कोणतेंहि दांडगाईचें कृत्य करूं नये!" पीडमॅांटचा प्रधान मार्क्विस परेटो यानें लिहिलेल्या खलि-त्यांतून पुढील उतारा घेतला आहे:-" लॅांबर्डीमध्यें गेल्या थोडक्याच दिवसांत घडलेल्या घडामोडीमुळें मोठी विकट परिस्थिति उत्पन्न झाली आहे. मिलन शहर क्रान्तिकारांच्या ताब्यांत आहे व त्यांनीं ऑस्ट्रियन साम्राज्याच्या कुशल सेनापतीवर विजय मिळविलेला आहे. सार्डीनियाच्या सरहद्दीवर लोकसत्तावादाची आग पेटली आहे...या क्रान्तीला केव्हां कसें स्वरूप येईल हें सांगतां येणें अशक्य आहे. लॅांबर्डीमध्यें लोकसत्ता जाहीर करण्यांत आली तर पीडमॅांटमध्यें तशाच प्रकारची चळवळ सुरू होण्याचा फार संभव आहे...म्हणून स्वत:च्या राज्याचें आणि साधारणत: इटलीचें या संकटांपासून संरक्षण करावयासाठीं उपाय योजणें आम्हांला भाग आहे!" व्हिएन्नाच्या खलित्यांत याच मुत्स-द्यानें म्हटलें आहे कीं, "राजसत्तेचें संरक्षण करावें याच हेतूनें पीडमॅांटनें युद्ध जाहीर केलें आहे!"

या सर्व पुराव्यावरून दिसून येतें कीं, चार्लस अलबर्टकडे युद्धाचें नेतृत्व जाईपर्यंत सर्व गोष्टी ठीक चालल्या होत्या. राजाच्या स्वार्थबुद्धीची व कपट-व्यूहाची मॅझिनीला कांहींच बातमी नव्हती. त्यानें आपले वैयक्तिक मनोविकार व संशयाचे विचार गुंडाळून ठेवले आणि इटलीसाठीं पीडमॅांटच्या वतीनें लढावयाचें ठरविलें. मॅझिनीनें तरुण इटलीच्या वतीनें राजाला मिळावयाचें

वचन दिलें नसतें तर इटलीचें व लोकसत्तेचें कार्य यशस्वी व्हावयाचा पुष्कळ संभव होता. लोक राजाला " इटलीचें खड्ग " म्हणत, पण तो लोकसत्तेचा नकळत खून करावयासाठीं राजसत्तेनें उपसलेला खंजीर मात्र होता !

ता. २६ मार्च रोजीं पीडमाँटच्या सैन्यानें मिलनमध्यें प्रवेश केला. लोकशक्तीच्या उसळीमुळें ज्यांनीं सनदशीर राज्यपद्धतीला मान्यता दिली होती त्यापैकींच चार्लस अलबर्ट हा होता. प्रत्यक्ष कार्य लोकांना दिसतें, तें कां झालें याकडे साधारण जनता लक्ष देत नाहीं. राज्यघटनेला मान्यता देणाऱ्या सर्वच राजांचें लोकांनीं उत्साहानें अभिनंदन केलें होतें; आणि आतां हा राजा तर इटलीसाठीं रणांगणावर धांव घेतो आहे हें पाहून मिलनच्या जनतेनें इटलीच्या या योध्याचें स्वागत अत्यंत उत्साहानें केलें ! नेमस्तांचें व लोकसत्तावाद्यांचें साह्य असलेला हा विश्वासघातकी व अवसानघातकी राजा इटलीच्या स्वातंत्र्यासाठीं लढावयास निघाला होता ! त्याचे मागून सनदशीर चळवळीचे भक्तजन जे नेमस्त, ते मोठ्या दरबारी थाटांत चालत होते; राजे लोकांना अतिरेक केव्हांहि अप्रियच असणार, म्हणून या मवाळांनीं आपल्या अंतःकरणांत राजाबद्दल माफकसा भक्तिभाव उत्पन्न होईल अशी व्यवस्था केली होती ! स्वार्थासाठीं त्यांनीं देशभक्तीला धुडकावून लावलें होतें; स्वार्थासाठीं राजसत्तेचा त्याग करावयालाहि त्यांनीं मागें पुढें पाहिलें नसतें. लोकसत्तेबद्दल द्वेष एवढें एकच तत्व त्यांच्या मनांत होतें. " या पक्षानें नेमस्त ( Moderates ) हें नांव आपण होऊन धारण केलें होतें—जणूं काय राष्ट्राचा उद्धार नेमस्तपणानेंच होणार आहे ! स्वातंत्र्य व राजसत्ता, एकराष्ट्रीयत्व व संयुक्तसंस्थानपद्धति, सामर्थ्य व अनिश्चितता या अहिनकुलांचा समेट करावयाचें कार्य त्यांनीं अंगावर घेतलें होतें...इतिहासाच्या अभ्यासानें त्यांच्या मागासलेपणाचा नाश झालेला नव्हता. इटलीचें ऐक्य या कल्पनेचा गेल्या तीन शतकांत झालेला विकास त्यांच्या नजरेंत आला नव्हता. लोकांच्या आकांक्षांशीं त्यांचा नैतिक व बौद्धिक संबंध नव्हता; अर्थातच राष्ट्रीय जीवनाच्या दिशेबद्दल त्यांना ज्ञान व निष्ठा नव्हती...अधिकारसूत्रें स्वतःच्या पक्षाचे हातीं राहतील एवढेंच स्वातंत्र्य राजसत्तेनें जनतेला द्यावें असें त्यांचें मत होतें...त्यांची कोणत्याहि तत्वावर निष्ठा नव्हती...इटलीला आपल्या अब्रूचें रक्षण करावयाची व स्वातंत्र्य संपादन करावयाची शक्ति नाहीं असें त्यांना वाटत होतें...लोकशक्तीच्या भीतीमुळें त्यांच्या अंतःकरणांत नैतिक

कर्तव्य उत्पन्न झालें होतें...जीवन, ऐक्य, स्वातंत्र्य व लोकसत्ता या तत्वांना त्यांनीं आपल्या क्षीण शब्दानें विरोध केला; या नपुंसकांच्या शब्दाला जनतेच्या सिंहगर्जनेचें उत्तर मिळालें; जेसुइट लोकांना हांकून द्या, राष्ट्रसंरक्षक स्वयंसैनिकांचीं पथकें उभारा, जनतेच्या हक्कांना व शब्दाला मान्यता मिळालीच पाहिजे अशा गर्जना लोकपक्षांकडून होत होत्या तेव्हां हे लोक सबुरीचा व मन शांतपणाचा उपदेश करीत होते ! त्यांना वाटे, आपण गडबड केली तर आपल्या पितृतुल्य राजामहाराजांचीं मनें दुखावतील ! त्यांनीं आपल्या कार्यपद्धतीला विधायक कार्यक्रम हें नांव दिलें आहे व स्वत:ला हे लोक मोठे कार्यकुशल समजत आहेत ! ”

अशा या मवाळ लोकांशीं चार्लस अलबर्टनें संगनमत केलें होतें. सत्तेची व स्वार्थाची तहान लागलेल्या भक्तजनांची ओंवाळणी घेत घेत चार्लस अलबर्टनें रणांगणाचा मार्ग धरला! विश्वासघातावद्दल त्यांच्या पक्षाला पुष्कळशीं शिफारस पत्रें होतीं. खुद्द चार्लस अलबर्टनें कारबोनरींचा विश्वासघात केला होता, पुढें त्यानें इटलीच्या आशेचा घात केला—आतां हाच राजा आपल्या आयुष्यांतील शेवटचा विश्वासघात करावयास सज्ज झाला होता. चार्लस अलबर्टच्या शीलाचें व नेमस्त पक्षाच्या मनोभूमिकेचें इतक्या विस्तारानें विवेचन करावयाचें कारण असें आहे कीं, या गोष्टी लपवून ठेवून कांहीं ग्रंथकारांनीं मॅझिनीवर अत्यंत नीचपणानें हल्ले चढविले आहेत. इटलीची घटना व्हिक्टर इमॅन्युएल राजानें घडवून आणली व चार्लस हा त्याचा प्रत्यक्ष बाप; तेव्हां त्याला विश्वासघातकी कसें म्हणावयाचें ? तत्वांचा प्रचार करणाऱ्या मॅझिनीनें इटलीचें ऐक्य करणाऱ्या दरबारांत मानाची अथवा विश्वासाची जागा मिळविलेली नव्हती, तेव्हां इटलीसाठीं त्यानें श्रम केले असें कसें म्हणतां येईल ? शिवाय काव्हूरनें मॅझिनीला विरोध केला होता, म्हणून आपणहि त्याच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविलेच पाहिजेत अशी या ग्रंथकारांची कल्पना दिसते. तरुण इटलीच्या लोकांना नेमस्त तेवढे भामटे दिसत आणि या मवाळांना तरुण इटलीचे लोक नुस्ते आगलावे आहेत असें वाटे ! प्रामाणिक लोक दोन्ही पक्षांत होते तसेच भामटेहि होते. नेमस्त पक्षांत क्रियानष्ट स्वार्थसाधु लोकांचा मोठा भरणा होता. तरुण इटलीचे लोक स्वार्थत्यागी, आशावादी व तत्वनिष्ठ होते; मात्र त्यांना शक्याशक्यतेची मजल कोठवर आहे हें कळलेलें नव्हतें; उठावणी करणारी जनता कार्यसिद्धीला पुरेशी नाहीं हें त्यांना अजून कळावयाचें होतें.

राष्ट्रैक्य व राष्ट्रस्वातंत्र्य हीं तत्वें लोकसत्ता या तत्वापेक्षां जास्त महत्वाचीं आहेत असें जाहीर करून मॅझिनीनेंच राष्ट्रीय पक्ष निर्माण व्हावयाची पूर्वतयारी करून दिली हें निर्विवाद आहे.

चार्लस अलबर्टची मदत मिळेपर्यंत क्रान्तिकारकांना सर्वत्र यश मिळालें होतें. मिलनच्या मर्दुमकीमुळें इटलीचा उत्साह जागृत झाला होता. मोडेना, बोलोना, पिसा, फ्लॉरेन्स, लेगहॉर्न वगैरे भागांतून रणमैदानाकडे स्वयंसैनिकांच्या झुंडीच्या झुंडी लोटूं लागल्या; दहा हजार रोमन व सात हजार टस्कन स्वयंसैनिक इटलीसाठीं लढावयास तयार झाले होते. "चार्लसच्या नादीं न लागतां लोकांनीं आपलें कार्य जर नेटानें तसेंच पुढें ढकललें असतें तर इटलीला त्याच वेळीं स्वातंत्र्य मिळालें असतें. क्रान्तीला आरंभ करणारे लोक जनतेच्या हृदयाशीं एकतान झाले होते; त्यांच्याच हातून क्रान्तीचें कार्य तडीला लागावें हें इष्ट होतें." लोकसत्तावाद्यांनीं राजावर विश्वास टाकलेला पाहून लोकांचा तर त्याचेवर दृढ विश्वास बसला, मात्र या विश्वासाचा राजानें पुढें घात केला. लोकांचीं मनें भारून टाकण्याकरतां मिलनच्या तात्पुरत्या सरकारशीं संगनमत करून पीडमॉंटच्या मुत्सद्यांनीं जाहीरनामा काढला कीं, 'राज्यसंस्था कोणत्या प्रकारची असावी हें ठरविण्याचा अधिकार जनतेकडे आहे; या अधिकाराचा उपयोग त्यांनीं लढाई संपल्यावर करावयाचा आहे.' लोकसत्तावाद्यांनीं राजकीय चळवळीपासून अलिप्त रहावयाचें वचन दिल्यामुळें आणि हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यामुळें युद्धाचें ध्येय काय असावें याबद्दल लोकजागृति करावयाचें कार्य अर्थातच बंद पडलें. हें पाहून चार्लसनें विश्वासघाताचा दुसरा डाव टाकला. 'आमचेपाशीं युद्धकुशल सैन्य पुरेसें आहे म्हणून लोकांनीं स्वयंसैनिकांचीं पथकें उभारूं नयेत व सध्यां असलेलीं पथकें मोडून टाकावीं' असा त्यानें जाहीरनामा काढला! निदान आल्पस् पर्वतांत तरी हीं पथकें कायम ठेवावीं असें म्हणणें मिलनच्या सरकारपुढें मॅझिनीनें मांडलें; पण त्यांना हें पटलें नाहीं. स्वयंसैनिकांच्या पलटणींनीं ऑस्ट्रियाच्या पिछाडीचे घाट आजवर रोखून धरले होते; त्यांना राजानें रजा दिल्यामुळें जनरल रॅडेट्स्कीचा कुमक मिळवावयाचा मार्ग मोकळा झाला! त्यानें कुमक आणविली व सरहद्दीवरील चार किल्ल्यांमध्ये अन्नसामुग्रीचा मुबलक पुरवठा करून ठेविला. इटालियन हद्दपारांच्या पलटणी उभाराव्या ह्या मॅझिनीच्या सूचनेला सरकारकडून उत्तर मिळालें कीं, ह्या लोकांचा नक्की पत्ता आपणांस माहीत नाहीं! या लोकांना

जमा करण्याचें मॅझिनीनें कबूल केलें व त्यांची पलटण उभारावयास सरकारी परवानाहि मिळविला. त्यानें लोक जमवून आणल्यावर युद्धमंत्र्यानें त्यांना सैन्यांत घेण्याचें नाकारलें ! सेनानी या दृष्टीनें गॅरिबॅाल्डी यावेळीं बराच महशूर होता; देशासाटीं लढावयास तो इटलीमध्यें आला; अधिकाऱ्यांनीं मोठ्या तिरस्कारानें त्याचें म्हणणें ऐकून घेतलें व या ऑफिसांतून त्या ऑफिसांत चकरा मारीत बसविलें ! ऑस्ट्रियन सैन्याचें सामर्थ्य रोज रोज वाढतच होतें आणि इकडे इटलीचें सामर्थ्य दिवसेंदिवस कमी होत चाललें होतें. वेगवेगळ्या राजघराण्यांतील खासगी वैरभावाचा सैन्याच्या बलावर परिणाम होऊं लागला. ऑस्ट्रियाबरोबर मांडलेल्या या लढ्याचा त्याग करावा अशी पोप महाराजांची आज्ञा घेऊन एक वकील चार्लसकडे आला ! वेगवेगळे संस्थानिक स्वयंसैनिकांवर निर्बंध घालूं लागले; ज्यांचें सैन्य अगोदरच रणक्षेत्रीं गेलें होतें त्यांनीं सैन्याला परत फिरावयाचे हुकूम पाठविले ! इतके दिवस नेमस्तांनीं कंड्या पिकविल्या होत्या कीं, “ इटलीच्या अग्रगण्य योध्याचें ” सैन्य सर्वत्र विजयी होत आहे ! पण चार्लस अलबर्ट हा इटलीचा अग्रगण्य योद्धाहि नाहीं व त्याच्या सैन्याला विजयहि मिळत नाहीं ही बातमी लोकांना हळू हळू उमजूं लागली होती. ऑस्ट्रियन सैन्यानें युडीन काबीज केलें तेव्हां मात्र मिलनच्या नेमस्तांच्या उरांत धडकी भरली. आजपर्यंत आपण लोकांच्या डोळ्यांत धूळ घातली पण आतां ऑस्ट्रियाचें जोखड पुन्हां खांद्यावर घ्यावयाचा प्रसंग आलेला आहे; तेव्हां लोकांना पेटवून द्यावें कीं काय, या बाबतींत सल्ला घ्यावयासाठीं ते मॅझिनीकडे आले ! “ भर मध्यरात्रीं मला मिलनच्या सरकारी मंडळाचें बोलावणें आलें. सभेला आणखी कांहीं लोकसत्तावादी हजर होते... त्यांनीं मला सल्ला विचारला तेव्हां मी त्यांना स्पष्टपणें सांगितलें कीं, ‘ तुम्हां लोकांची आज अगदीं नाचक्की झालेली आहे; युद्धाला तयार व्हा असें तुम्हीं लोकांना फर्माविलें तर ते तुमचें ऐकणार नाहींत; लोकांनीं उठावणी करावी अशी तुमची इच्छा असेल तर त्यांना विश्वासघाताची बातमी देण्याशिवाय गत्यंतरच नाहीं...खरी हकीगत लोकांना ताबडतोब कळविण्यांत यावी आणि स्वयंसैनिकांचीं पलटणें उभारावीं याशिवाय दुसरा मार्ग नाहीं ’...पण त्यांना वाटलें कीं, आपण होऊन धोक्यांत जीव घालावयास कोण तयार होईल ? मी त्यांना एवढेंच सांगितलें, माझ्या सहीचीं जाहीरपत्रकें काढावयास आणि मला स्वत:ला स्वयंसैनिकांच्या यादींत नांव घालावयास तुम्ही परवानगी देत असाल

तर या पलटणी मी उभ्या करून दाखवितों ! त्या लोकांना माझें म्हणणें पटलें असें त्यांनीं टाळ्या वाजवून मला भासविलें...पण दोनच दिवसांनीं माझी सूचना अमान्य झाल्याचें मला कळविण्यांत आलें." कां तर इटलीच्या अग्रगण्य योध्याला ही सूचना अमान्य झाली ! "प्रजापक्षीय शत्रूंचें सैन्य आपल्या पिछाडीस असावें अशी आमची इच्छा नाहीं !" असें देशासाठीं लढणाऱ्या राजानें जाहीर केलें !

युद्धामध्यें जय मिळण्याची फारशी आशा नाहीं हें दिसून येतांच नेमस्तांनीं एक नवीनच डाव टाकला. चार्लस अलबर्टचा आपण फायदा करून दिला तर पुढें मागें आपलाहि फायदा होण्याचा संभव आहे हें पाहून त्यांनीं बोंब उठविली कीं, राजकीय चळवळीमध्यें तटस्थपणा पाळण्याचें वचन लोकसत्तावाद्यांनीं मोडलें आहे ! म्हणून नेमस्त पक्षाच्या पुढाऱ्यांनीं व राजाच्या मुत्सद्यांनीं पुढील जाहीरनामा काढला:—"लॅांवर्डी प्रांत पीडमॅांट संस्थानास जोडण्यांत यावा असें लोकांनीं जाहीर करावें. जनतेचा निर्णय अनुकूल पडल्यास युद्ध चालविण्यासाठीं लाखों रुपये व हजारों सैनिक पीडमॅांट संस्थानामार्फत पाठविण्यांत येतील." ता. १२ मे रोजीं लोकांचीं मतें घेण्यांत आलीं व त्यांचा निर्णय पीडमॅांटला अनुकूल पडला. व्हेनिस येथील लोकांनाहि आपला प्रांत राजाच्या स्वाधीन करण्याबद्दल भुरळ घालण्यांत आली व त्या हतभाग्य लोकांनीं ही गोष्ट कबूल केली ! आपल्या कारस्थानाला अकल्पित यश येत चाललेलें पाहून नेमस्तांना व मुत्सद्यांना आनंदाचें भरतें आलें !

लॅांवर्डी येथील लोकमताचा निर्णय लागावयाचे अगोदर चार्लस अलबर्टनें एक डाव टाकला होता. राजेसाहेबांच्या गोटांतून कॅसानेटो हा खानगीकडील अधिकारी मॅझिनीकडे आला व त्यानें बोलणें लावलें कीं, लॅांवर्डी प्रांत आपल्या राज्यास जोडावयाची राजेसाहेबांची इच्छा आहे आणि हें काम सिद्धीस न्यावयासाठीं मॅझिनीनें आपल्या वजनाचा उपयोग केला तर राजेसाहेबांची त्याचेवर फार मेहेरबानी होईल व त्याला प्रधानाची जागाहि देण्यांत येईल ! पण मॅझिनीला मधाचीं बोटें चोखीत बसावयाचें नव्हतें. त्यानें उत्तर पाठविलें कीं, "सध्यांचा मुख्य प्रश्न ऑस्ट्रियाशीं युद्ध हा आहे. हा सर्व खटाटोप राष्ट्रासाठीं करण्यांत येत आहे अशी जनतेची कल्पना आहे. यावेळीं पीडमॅांटनें स्वार्थ साधावयाचा उद्योग आरंभला तर आधींच थंडावत चाललेला उत्साह समूळ नाहींसा होईल व संस्थानिकांमध्यें परस्परांविषयीं द्वेषबुद्धि मात्र उत्पन्न होईल.

हा प्रश्न राज्यविस्ताराचा नाहीं, राष्ट्रैक्याचा आहे. इटलीचें सार्वभौमत्व मिळवावयासाठीं प्रसंगीं पीडमॉंटच्या राज्यावरहि पाणी सोडावयास राजेसाहेबांनीं तयार असलें पाहिजे; असें असेल तरच इटालियन क्रान्तिकारक लोकसत्तावाद्यांना राजेसाहेबांस अनुकूल करून देण्याची मजकडून होईल तितकी खटपट मी करीन. लोकांची खात्री पटावी म्हणून राजेसाहेबांनीं या आशयाचा एक जाहीरनामा मात्र काढावा. " असा जाहीरनामा काढण्याचें इटलीच्या अग्रगण्य योध्यानें अर्थातच नाकारलें! " मी माझ्या तत्वाशीं कधींहि बेइमान होणार नाहीं. राष्ट्रैक्य होत असेल तर लोकसत्तेच्या विजयासाठीं मी प्रत्यक्षपणें चळवळ करणार नाहीं. लोकसत्तावाद्यांच्या विजयाबद्दल म्हणाल तर त्यांच्या मदतीला राजे लोकांनीं धांवून यावें अशी त्यांची अपेक्षाच नाहीं! " चार्लस अलबर्टहि या युद्धांत स्वार्थ साधीत आहे हें पाहतांच नेपल्सच्या राजानें आपलें सैन्य परत बोलाविलें; पोप महाराजांनीं आपल्या प्रजेला सरहद्द ओलांडण्याची मनाई केली.

आपल्या कारस्थानाला यश येणार या कल्पनेनें नेमस्त व मुत्सद्दी आनंदांत गर्क झाले होते तोंच कस्टोझा येथें पीडमॉंटच्या सैन्याचा मोड (ता. २५ जुलै) झालेला आहे व ऑस्ट्रियन सेनापति रॅडेट्स्की आपल्या ताज्या दमाच्या सैन्यानिशीं त्याचा पाठलाग करीत आहे अशी बातमी येऊन थडकली! आपणांस कसें फसविण्यांत आलें आहे हें लोकांना कळून आलें. " मला लोकांनीं पुष्कळ वेळां सांगितलें होतें कीं, मिलनच्या तात्पुरत्या अधिकाऱ्यांचा पाडाव करून त्यांचेजागीं दुसऱ्या लोकांची योजना करून देशाचा बचाव करावा. हें मला सहज करतां आलें असतें; पण त्यामुळें आपसांत यादवी माजून लोकसत्तावाद्यांच्या नांवाला काळिमा लागला असता. लॉंबर्डींतील लोकांनीं पीडमॉंटची सत्ता कबूल केलेली असल्यामुळें त्या देशांत सैन्य पाठवावयाचा राजाला अधिकार होता, म्हणून आमचेच देशबंधु आम्हांबरोबर लढावयास आलेले आहेत असा प्रसंग ठेपला असता! या यादवीमुळें ऑस्ट्रियाचें मात्र फावलें असतें. म्हणून मी या सूचनांना रुकार दिला नाहीं."

पराभूत झालेल्या पीडमॉंटच्या सैन्यानें मिलनकडे पळ काढला. " मला आशा होती कीं, ऑस्ट्रियाचें सैन्य मिलनवर हल्ला करावयास आलें आहे ही बातमी ऐकल्याबरोबर शहरवासीयांच्या अंगांत चैतन्याचा संचार होईल आणि पुन्हां एकदां जनता व ऑस्ट्रिया यांचेमध्यें खऱ्या युद्धाला आरंभ होईल. "

शहराचें संरक्षण करावयास स्वयंसैनिक उभारण्याला राजानें परवानगी दिली नाहीं. अखेरीस मॅझिनीच्या प्रयत्नांमुळें ता. २८ जुलै रोजीं शहरसंरक्षण-मंडळ स्थापन करण्यांत आलें तोंच शहरचा कारभार हातीं घ्यावयास चार्लस अलबर्टचे प्रतिनिधि मिलनला दाखल झाले (ता. ३ आगस्ट ). दुसऱ्याच दिवशीं ( ता. ४ आगस्ट ) राजेसाहेबांची स्वारी आली ! " ही मंडळी आली तेव्हां लोकांना वाटलें कीं, आपणावरचें संकट टळलें; पण वास्तविक त्यांचा घात झाला होता. " चार्लस अलबर्टनें इटलीच्या शत्रूंवर शस्त्र उपसलें नव्हतें तर तरुण इटलीमुळें जनतेच्या मनांत उत्पन्न झालेल्या लोकसत्तेच्या व राष्ट्रैक्याच्या तत्वांवर हत्यार उपसलें होतें ! मिलनमध्यें प्रवेश करतांना राजाच्या प्रतिनिधींनीं लोकांना शहर रक्षण करावयाचें वचन दिलें होतें. पण राजानें आपला विश्वासघात केलेला आहे ही बातमी फुटली तेव्हां लोक संतापानें अगदीं वेडे झाले. त्यांनीं जिवापाड श्रम करून ऑस्ट्रियाला हांकून दिलें होतें व पुढें ते पीडमाँटच्या सैन्यावर विश्वास ठेवून स्वस्थ होते. ऑस्ट्रियन सैन्याला तोंड द्यावयाची आतां त्यांची तयारी नव्हती. कारण शहरांत दारूगोळा व अन्नसामुग्रीचा पुरवठा भरपूर नव्हता ! आतां ऑस्ट्रियाला तोंड देणें म्हणजे स्वतःची कत्तल करून घेणें होय हें त्यांना स्पष्टपणें दिसत होतें. चार्लस अलबर्टच्या राजवाड्याला त्यांनीं गराडा दिला; लोकांचा संताप पाहून राजानें जाहीर केलें कीं, "माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी लढेन आणि माझ्यामागें माझा मुलगाहि माझेंच अनुकरण करील ! " पण त्याच रात्रीं राजा मिलनमधून गुप्तपणें पसार झाला व त्याचें सैन्यहि उठविण्यांत आलें. सैन्य माघार घेत असतांना चिडून गेलेल्या लोकांनीं त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. ता. ५ आगस्ट रोजीं ऑस्ट्रियन प्रतिनिधींनीं शहर आपल्या ताब्यांत घेतलें ! चार्लसचे प्रतिनिधि मिलनचा कबजा घ्यावयास आले त्याच्या अगोदर दोनच दिवस राजानें ऑस्ट्रियाशीं गुप्त तह केला होता आणि मिलन शहर ऑस्ट्रियाला द्यावयाचें कबूल केलें होतें ! !

नेमस्तांनीं डाव टाकण्यास सुरवात केल्यानंतर मॅझिनीनें आपली बाजू Italia del Popolo ( Italy of the People ) या पत्रकांमधून प्रसिद्ध केली. लढाईच्या कार्याला मॅझिनीची प्रत्यक्ष मदत फारशी झाली नाहीं. मॅझिनीसारख्या लोकसत्तावादी पढाऱ्याची नेमस्तांना मोठी भीति वाटे. मॅझिनी मिलन येथें फार दिवस पडून राहिला म्हणूनच नेमस्तांनीं भांडखोरपणा माज-

विला. त्यावेळीं टस्कनी, रोमाग्ना वगैरे प्रांतांतील जनता बंड करावयास उत्सुक होती. मॅझिनीनें त्यांना संघटित केलें असतें तर हें बंड खास यशस्वी झालें असतें; मिलनचा व राजपक्षीयांचा त्याग करून त्यानें जनतेला संघटित केलें असतें तर स.१८६० मध्यें घडून आलेल्या गोष्टी याचवेळीं घडून आल्या असत्या —पण इटलीच्या भाग्याला आणखी हेलकावे बसावयाचे होते ! इटालियनांचीं अंतःकरणें अझून पूर्णपणें एकवटलीं नव्हतीं. पांच दिवसांच्या कार्यामुळें मिलनच्या लोकांनीं इटलीला स्वातंत्र्याचे पांच महिने मिळवून दिले. इटलीच्या कार्याला रणभूमीवर यश मिळवावयाचें काम ज्यांचे हातीं होतें त्यांचे अंगीं सेनापतित्वाचे गुण नव्हते आणि मुत्सद्देगिरीहि नव्हती. चार्लस अलबर्ट इटलीचा जनक नव्हता—तो फक्त व्हिक्टर इम्यॅन्युएलचा जनक होता इतकेंच !

"ह्यावेळीं लोकसत्तेसाठीं लढूं इच्छिणाऱ्या मिलनच्या चार हजार स्वयंसैनिकांच्या एका लहानशा तुकडीनिशीं गॅरिबॉल्डी बरगॅमो येथें तळ देऊन राहिला होता. त्याला वाटत होतें कीं चार्लसजवळ चाळीस हजार फौज आहे, अझूनहि तो कदाचित् मिलनचें संरक्षण करील. या युद्धांत राजाला मदत करावयाचा त्याचा विचार होता." पूर्वीच्या क्रान्तीचे वेळीं त्याला फांशीची शिक्षा फर्मावण्यांत आली होती म्हणून अशा बंडखोराची मदत घेणें लाजिरवाणें वाटल्यावरून चार्लस अलबर्टनें त्याला निरोप दिला. राजाच्या प्रतिनिधीनीं शहराचा कबजा घेतला त्याच दिवशीं मिलन सोडून मॅझिनी गॅरिबॉल्डीच्या तुकडीला मिळाला. लोकांना संकटांत ढकलून मॅझिनी स्वतः मात्र सुखांत राहतो असे उद्गार काढणारांना खालील प्रसंग फार बोधप्रद वाटेल; हा प्रसंग गॅरिबॉल्डीचा अधिकारी जनरल मेडीसी याच्या शब्दांत दिला आहे. " पीडमाँटच्या सैन्याचा पाठलाग करणाऱ्या ऑस्ट्रियन सैन्याच्या डाव्या फळीवर हल्ला करावयाचा गॅरिबॉल्डीचा बेत होता. ता. ३ आगस्ट १८४८ रोजीं आम्ही बरगॅमो सोडावयाच्या विचारांत होतों तोंच खांद्यावर बंदूक टाकलेला मॅझिनी माझेकडे आला व शिपायांच्या पलटणीमध्यें दाखल व्हावयाची परवानगी देण्याची त्यानें मला विनंति केली ! मॅझिनी आला तेव्हां सर्वांनीं आनंदाचा एकच गजर करून त्याचें स्वागत केलें व एकमतानें आपला झेंडा त्याच्या स्वाधीन केला. हें निशाण ' परमेश्वर आणि जनता ' या पवित्र शब्दांनीं अंकित झालें होतें...स्वारीवर निघावयाचे पूर्वी त्यानें कांहींतरी बोलावें म्हणून बरगॅमोचे सर्व लोक त्याचेभोंवतीं गर्दी करून उभे राहिले.

मॅझिनी त्यावेळीं अगदीं थोडे शब्द बोलला पण ते शब्द अझून सर्वांच्या कानांत गुणगुणत असतील— " इटलीवर अखंड प्रेम करा आणि कोणतेंहि संकट आलें तरी डगमगूं नका !' हा दिव्य मंत्र ऐकून लोकांना व स्वयंसैनिकांना विलक्षण स्फुरण चढलें...मॅझिनीचें आयुष्य विद्याव्यासंगांत गेलेलें, शिपाईगिरीची दगदग सोसण्याचें त्याला सामर्थ्य नव्हतें. वाटेंत पाऊस धों धों पडत होता; आमचीं हाडेंसुद्धां थंडीनें कुडकुडत होतीं ! तरी त्यानें आपल्या मनाची शांतता व आत्मविश्वास बिलकुल ढळूं दिला नाहीं ! ह्या दगदगीमुळें मॅझिनी आजारी पडेल अशी भीति वाटून त्यानें मागें रहावें म्हणून सैन्यांतील लोकांनीं त्याचें मन वळविण्याची पराकाष्ठा केली; परंतु मागें राहण्याचें किंवा सैन्य सोडून जावयाचें त्यानें साफ नाकारलें...सैन्यांतील एका बालस्वयंसैनिकाच्या अंगावर पुरेसे कपडे नव्हते; थंडी व पाऊस यांच्या कडाक्यानें त्याला त्रास होत आहे हें पाहून तो नको म्हणत असतांहि मॅझिनीनें आपला लोंकरीचा झगा त्याला दिला...आमची तुकडी मोंझा येथें आली तोंच आम्हांला मिलनच्या विश्वासघाताची बातमी मिळाली. आमच्या सैन्यावर हल्ला करावयास ऑस्ट्रियन रिसाला येत आहे अशीहि खबर आम्हांस मिळाली. शत्रूला तोंड देण्यानें व्यर्थ हानि होईल हें जाणून गॅरिबॉल्डीनें मोर्चा फिरविण्याचा हुकूम दिला. गॅरिबाल्डीची तुकडी सुरक्षितपणें निघून जाईपर्यंत शत्रूला थोंपवून धरण्याचें काम माझ्याकडे आलें होतें. माझ्या लोकांनीं शत्रूला अखेरपर्यंत अडवून धरलें. या प्रसंगीं आत्मबळ, शौर्य आणि धडाडी ह्या मॅझिनीच्या गुणांचा कळस झालेला आम्हांला दिसला. त्याचें शौर्य प्रत्यक्ष पाहून आमच्या तरुण शिपायांना पाणी चढलें ! मॅझिनीबरोबर संकटें सोसण्यांत त्यांना मोठा अभिमान वाटे ! मॅझिनीमुळेंच आमच्या सैन्यांत सुव्यवस्था व संकटसमयांत शिस्त राहिली...मोंझापासून कोमोपर्यंत शत्रूंचें सैन्य आमच्या तुकडीवर सारखे हल्ले चढवीत होतें; या प्रवासांत मॅझिनीची निर्भय शांतिवृत्ति व निर्णयशक्ति अत्यंत उच्च दर्जाची होती; हेच गुण पुढें रोमच्या वेढयांत दिसून आले... या थोर पुरुषाच्या ठिकाणीं नागरिकत्व व शिपाईगिरी हे दोनहि गुण आहेत असें आम्हांला आढळून आलें...त्याच्या शीलाचें तेज अधिक दैदिप्यमान व्हावें म्हणूनच हा प्रसंग येथें नमूद केला आहे. "

मिलनचा पाडाव झाल्यानंतर लॉंबर्डी प्रांत शत्रूच्या स्वाधीन झाला. ऑस्ट्रियन सैन्याच्या संख्याबलापुढें गॅरिबाल्डीला हार घ्यावी लागली. देशसेवकांच्या

ह्या सैन्याची पांगापांग झाल्यावर मॅझिनीनें कांहीं लोक बरोबर घेऊन डोंगरी मुलुखांत बंडें उठवण्याचा यत्न केला पण तो सिद्धीस गेला नाहीं. आतां लॉंबर्डीत कांहीं आशा उरली नाहीं हें पाहून मॅझिनी स्वित्झरलँडकडे परतला तोंच टस्कनीमध्यें बंडाची ज्वाळा भडकल्याची बातमी आली. " ही बातमी ऐकून मला राहवेना; स्वित्झरलँड सोडून मी इटलीकडे परतलों. " ता. ८ फेब्रुवारी १८४९ रोजीं मॅझिनी टस्कनीमधील लेगहॉर्न शहरीं दाखल झाला. नऊ तारखेच्या लिव्होर्नीज कुरीयरमध्यें मॅझिनीच्या स्वागताची हकीगत दिलेली आहे. ' इटलींतील सर्व संस्थानिक ज्याचेबद्दल द्वेषानें जळत आहेत तो मॅझिनी काल येथें आला; आणि ह्या द्वेषाचें कारण काय तर त्यानें आपला आत्मा निष्कलंक व शुद्ध राखला आहे, कारण त्यानें स्वार्थसाधु नेमस्तांपुढें मान वांकविली नाहीं ! मॅझिनी आला तेव्हां देवळांमध्यें त्याच्या स्वागतासाठीं घंटा वाजूं लागल्या; तो ज्या रस्त्यानें जावयाचा होता त्या रस्त्यानें हजारों लोक दुतर्फा गर्दी करून उभे राहिले. जिकडे तिकडे निशाणें फडकत होतीं; त्याचा लष्करी सन्मान करावयासाठीं मुख्य प्रधान ग्यूराएझी एका खास तुकडीसह तो उतरणार होता त्या घराच्या समोर वाट पहात उभा राहिला होता ! '

लॉंबर्डींतील बंडामुळें इटालियन जनतेमध्यें मोठी खळबळ सुरू झाली. बंडाची ज्वाळा आपल्याहि संस्थानांत भडकली तर आपलें कसें होणार या भीतीनें पोप महाराजांनीं रोममधून पळ काढला. मॅझिनी लेगहॉर्नला आला त्याच दिवशीं फ्लॉरेन्सच्या ग्रँड ड्यूकनें पोबारा केला अशी बातमी आली. मॅझिनीला वाटलें कीं, टस्कनी व रोम हीं दोन संस्थानें इटालियन जनतेच्या नांवानें एक करण्यास अशी संधि पुन्हां येणार नाहीं. त्यावेळीं मॅझिनीचा मित्र ग्यूराएझी टस्कनी प्रांताचा सर्वसत्ताधारी होता, तो मॅझिनीसारखा तत्वनिष्ठ नव्हता व सरळपणें लोकसत्ता स्थापन होऊं द्यावयास तो तयार नव्हता. मॅझिनीनें आपलें म्हणणें त्याचेपुढें मांडल्यावर दोघांची चांगलीच बोलाचाली झाली; पण जनतेची सहानुभूति मॅझिनीकडेच आहे हें पाहून ग्यूराएझीनें मोठ्या नाखुषीनें व नुस्त्या भिडेखातर मॅझिनीच्या मताला मान्यता दिली. या टस्कन लोकांना घोड्यावर बसवण्यांत फारसा अर्थ नाहीं हें दिसून येतांच मॅझिनीनें रोमचा रस्ता धरला.

* * * * *

मिलन शहर ऑस्ट्रियाच्या ताब्यांत दिल्यानंतर चार्लस अलबर्टची विवेकबुद्धि जागृत झाली ! मिलनमधून माघार घेतांना लोकांच्या मनोविकारांचें वादळ त्यानें पाहिलें होतें; त्याचे प्रतिध्वनि आतां त्याच्या हृदयांत उमटूं लागले ! ज्या लोकांनीं विश्वासानें आपणांकडे धांव घेतली त्यांना आपणच पुन्हां पारतंत्र्यांत ढकलण्यास कारणीभूत झालों हा विचार त्याचे मनाला पोळूं लागला ! आपणांवर ज्यांनीं विश्वास टाकला होता त्यांच्या घरादारांवरून ऑस्ट्रियाच्या सूडाचा नांगर जनरल रॅडेट्स्की फिरवीत आहे हें दिसून येतांच त्याचें मन पश्चात्तापानें दग्ध झालें ! या मनोविकारांच्या भरांत त्यानें ऑस्ट्रियाशीं फिरून युद्ध पुकारलें ( ता. १४ मार्च १८४९ ) ! यावेळीं त्याच्या छातीनें जोर धरला पण त्याच्या सैन्याची संघटना गेल्या युद्धांत विस्कळित झाली होती. ता. २३ मार्च रोजीं दोन्ही सैन्यांची नोव्हॅरा येथें गांठ पडून झालेल्या युद्धांत चार्लसचा पूर्ण पराभव झाला. रणांगणावर देहत्याग करावयासाठीं चार्लसनें धाडसाची कमाल केली-पण व्यर्थ ! पराभव पावल्यानंतर वैयक्तिक दोषांमुळें व द्वेषांमुळें देशाचें अकल्याण होऊं नये म्हणून चार्लसनें राज्यत्याग केला; पुढें त्यानें देशत्यागहि केला. वेश बदलून तो पोर्तुगालमध्यें गेला. तेथें तो एका मठांत पापमरिमार्जनार्थ तपश्चर्या करीत राहिला. इटलीच्या दुर्भाग्यानें गांजलेला हा दुर्दैवी राजा स. १८४९ सालीं मरण पावला. त्याचे मागून त्याचा मुलगा व्हिक्टर इमॅन्युएल हा राज्यावर आला. या विकट परिस्थितींत त्यानें ऑस्ट्रियापासून संस्थानचें रक्षण केलें व राज्यक्रान्तीच्या कार्याला एकदम हात न घालतांहि धीमेपणानें लोकांचा विश्वास संपादन केला; देशासाठीं हवा तो त्याग करावा लागला तरी बेहत्तर, आपण देशोद्धाराचें कार्य निश्चितपणें हातीं घेतलेलें आहे असें त्यानें लवकरच जनतेला स्पष्टपणें दाखवून दिलें-तो वृत्तांत इतरत्र येईलच !

# ७. लोकसत्ताक रोम.

" Manonia ! when nature embellished the list
Of thy fields & thy mountains so fair,
Did she ever intend that a tyrant should print
The footsteps of slavery there ?
No. freedom ! whose smile we shall never resign
Go, tell our invaders, the Danes,
Tis sweeter to bleed for an age at thy shrine
Than to sleep but a moment in chains ! "

*Thamas Moore.*

---

**राजकारस्थान** व युद्ध यांच्या साह्यानें युरपच्या धर्मगुरूंनीं आपलें ऐहिक साम्राज्य रोमन संस्थानांमध्यें मध्ययुगांत स्थापन केलें. जगाच्या पारलौकिक कल्याणाची चिंता वाहणाऱ्या धर्मगुरूंच्या त्या ऐहिक साम्राज्यांत अधर्माचें अधिराज्य अनेक शतकेंपर्यंत चाललें होतें. पोप महाराजांच्या जुलमापासून नेपोलियननें रोमन प्रजेला कांहीं काळ-पर्यंत मुक्त केलें होतें. क्रान्तिकारक तत्वांचा, व्यक्तींचा व राज्यघटनेचा संसर्ग झाल्यापासून पोप महाराजांची प्रजा बेदिल झाली. पारलौकिक कल्याणाच्या खजिनदाराच्या गुलामगिरींत जीवन घालवावयाचें ही कल्पना त्यांना असह्य झाली. नव्या युगाच्या नव्या कल्पनांचा फैलाव होऊं नये म्हणून पोप सोळावा ग्रेगरी यानें ऑस्ट्रियाच्या मदतीनें दडपशाहीचा कहर केला; लोकप्रिय पुस्तकें जप्त करून, छापखान्यांवर तपासनीसांची नेमणूक करून, विद्यापीठामध्यें शिक्षण लॅटिन भाषेंतूनच देण्यांत यावें असा नियम करून व अर्थशास्त्र, आधुनिक वाङ्मय वगैरे विषय मना करून लोकशिक्षणाची सर्व द्वारें त्यानें बंद करून टाकलीं ! रेलवे व तारायंत्रें यांमुळें नव्या कल्पनांचा प्रसार होईल म्हणून तीं

सुरू करण्याची त्यानें मनाई केली ! सूर्याभोंवतीं पृथ्वी फिरते असें कबूल करण्यानें नास्तिकपणा वाढेल म्हणून पृथ्वीभोंवतीं सूर्य फिरतो असें या अंतरिक्ष-शास्त्राच्या शिरोमणीनें जाहीर केलें ! सरकारी अधिकाऱ्यांच्या रोषास पात्र झालेल्यांचें जीवित, वित्त व स्वातंत्र्य यांवर केव्हां घाला येईल याचा नेमच उरला नव्हता. १८२१ सालीं तर शेंकडों स्त्रीपुरुषांना, चौकशीचा तमाशाहि न नाचवतां, त्यांचेवर काय आरोप ठेवावा याचा विचारहि न करतां, तुरुंग-वासाची व हद्दपारीची शिक्षा देण्यांत आली ! या जुलमापासून सोडवणूक करून घेण्यासाठीं लोकांनीं कट रचले; तेव्हां पोप महाराजांनीं हेरांचें जाळें पसरलें व राजकीय चळवळ्यांचे अमानुष हाल केले ! आणि हेच महात्मे परमेश्वराच्या दरबारांत पतित मानवजातीचा कैवार घेतात अशी लोकांची कल्पना होती !

जुलमाबद्दल प्रसिद्ध असलेला पोप ग्रेगरी स. १८४६ सालीं मरण पावला. उदारमतवादित्वाबद्दल महशूर असलेला कार्डिनल फरेटी हा नववा पायस हें नांव धारण करून गादीवर आला. लगेच त्यानें हद्दपार प्रजेला परत यावयाचें निमंत्रण केलें; तुरुंगवास भोगीत असलेल्या बऱ्याच राजकीय कैद्यांना सोडून दिलें; भाषणस्वातंत्र्याचा व मुद्रणस्वातंत्र्याचा पहिला हप्ता प्रजेला दान केला. राज्य करण्याच्या या नव्या पद्धतीमुळें रोमन लोक हुरळून गेले. उदारमतवादी लोकांनीं व परत आलेल्या हद्दपारांनीं हा उत्साहांत आणखी भर टाकली. नव्या पोपचीं स्तुतिस्तोत्रें गाणें हा कांहीं काळपर्यंत इटालियन देशभक्तांचा राष्ट्रधर्मच झाला होता ! लोकांना वाटत होतें कीं, पोप महाराज राष्ट्रकार्य खास हातीं घेणार—पण बरेच दिवस लोटले तरी कांहींच चिन्ह दिसेना, तेव्हां नोक-रशाहीच्या जुलुमाविरुद्ध उदार मतवादी लोकांनीं चळवळ करावयास सुरवात केली; तोंच इटालियन उत्साहाच्या उसळ्या असह्य होऊन पीडमॉंट, नेपल्स व टस्कनी या संस्थानांनीं सुराज्याचे जाहीरनामे काढले ( १८४७ ). हें पाह-तांच रोमन जनतेच्या उत्साहाला विशिष्ट दिशा मिळाली. स्वतःच्या वर्तनानें लोकांच्या आशा प्रथमतः उत्तेजित केल्यामुळें लोकमताचें सामर्थ्य वाढलेलें आहे व लोकसत्तानुसार राज्य चालविण्याचें कबूल केलें नाहीं तर बंडाळी होईल हें जाणून पोप महाराजांनींहि सुराज्याचा जाहीरनामा काढला. ( १८४८ मार्च ). नव्या राजव्यवस्थेमुळें फक्त कॅथॉलिक पंथाच्या माणसांनीं निवडलेल्या प्रतिनिधींचें मध्यवर्ती कायदेकारी मंडळ निर्माण करण्यांत आलें; नोकरशाहीला उपदेश करणें एवढाच या मंडळाचा अधिकार होता. या सुधा-

रणांमुळें नोकरशाहीची सत्ता तिळमात्र कमी झाली नाहीं. त्यावेळीं रोमन नोकरशाहीची कल्पना होती कीं, चकचकीत दिसणाऱ्या सुधारणांनीं लोकांचें डोळे दिपवले कीं त्यांचा उत्साह जागच्या जागीं जिरेल. याच कल्पनेनें पोप महाराजांनीं प्रसिद्ध उदार मतवादी रॅासी याला प्रधानकीचीं वस्त्रें दिलीं ( सप्टेंबर १८४८ ). रॅासीनें राजकारणशास्त्राचें व अर्थशास्त्राचें चांगलें अध्ययन केलें होतें. त्याला स्वराज्यापेक्षां सुराज्यच प्रिय होतें. रस्त्यामध्यें उत्साहानें उत्तेजित होऊन किंचाळ्या मारीत भटकणाऱ्या हलक्या दर्जाच्या लोकसत्तावाद्यांचा त्याला मोठा तिरस्कार वाटत असे. इटलीच्या राष्ट्रीय ध्येयावर त्याची निष्ठा नव्हती; सुराज्याच्या सुधारणांनीं जनतेला गुंगवून टाकावें या हेतूनें रॅासीनें संस्थानांत आगगाड्या व तारायंत्रें सुरू करावयाचें जाहीर केलें व संस्थानची सांपत्तिक स्थिति सुधारण्याचें काम हातीं घेतलें. त्याच्या कारस्थानी वर्तनानें लोक चिडून गेले: लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकूं पाहणाऱ्या या कुटिल मुत्सद्याचा शेवटीं खून झाला ( ता. १५ नोव्हेंबर ). आपल्या हक्काचा अनादर झालेला पाहून चिरडीस गेलेल्या पोपनें जुलमाबद्दल विख्यात असलेल्या लोकांना प्रधानांच्या जागा दिल्या. हें पाहून खवळून गेलेल्या जनतेनें पोपच्या सेक्रेटरीचा खून केला. लगेच पोपसाहेब ताळ्यावर आले व त्यांनीं दुसरें उदारमतवादी मंत्रिमंडळ नेमलें. इकडे लोकपक्ष तर अगदीं चिरडीला जात होता. लोक एकदां खवळले म्हणजे काय करतील व काय नाहीं याचा भरंवसा न वाटून पोप महाराजांनीं कंचुकीच्या वेषानें ता. २४ नोव्हेंबर रोजीं रात्रीं पळ काढला ! पळ काढावयाचे वेळीं त्यांचा बेत फ्रान्सच्या आश्रयाला जावें असा होता; पण क्रांतिकारक फ्रान्सचा विटाळ होईल म्हणूनच कीं काय कोण जाणें, भटजी महाराजांनीं देशभक्तांच्या रक्तानें न्हालेल्या बॅांबा राजाच्या नेपल्स संस्थानचा मार्ग धरला * ! लोकपक्षाला चिरडून टाकावयासाठीं तेथून मदत घेऊन परत याव-

---

* जुलमाच्या बाबतींत बॅांबा राजानें तैमूरलंग व चंगीजखान यांना मागें टाकलें होतें. बंडखोर मेसिना शहरावर त्यानें तोफखाना चालू केला व तेथील रहिवाशांची बायकापोरांसह कत्तल केली (१-७-१८४८). पालर्मो शहरावरहि त्यानें असाच भडिमार केला होता; म्हणून त्याला लोक बॅांबा म्हणूं लागले ! ( बॅांब-तोफेचा गोळा )

ग्रंथ संग्रह नं.

याचा त्यांचा बेत होता--पण इकडे रोममध्यें लोकसत्तावाद्यांचें सामर्थ्य दररोज वृद्धिंगत होत होतें.

पोप पळाल्यामुळें रोम स्वतःचें राज्य चालविण्यास मोकळें झालें. तुरुंगांतून नुकत्याच सुटलेल्या कैद्याचें मन स्वातंत्र्याच्या आरंभीं ज्याप्रमाणें द्विधा होतें तशी रोमची स्थिति झाली. आपण लोकसत्ता जाहीर केली व मग पोप महाराज परत आले तर त्यांच्या सूडास आपण बळी पडूं अशी भीति रोमच्या नेत्यांच्या मनांत उत्पन्न झाली; आपण काय करावें याबद्दल सल्ला मिळविण्याकरतां ते पोपकडेच जासूद पाठवूं लागले ! परमेश्वरानें त्यांना सोन्यासारखी संधि दिली पण तिचा फायदा घ्यावयाचें धाडस त्यांच्या हातून होईना. "ह्या लोकांची दशा पाहून मला त्यांचा तिरस्कार येई व दुःखहि होई. 'माझ्याशिवाय तुमचा कोणी शास्ता नाहीं आणि माझी इच्छा लोकांच्या इच्छेच्या द्वारेंच प्रकट होत असते' असें परमेश्वराने इतकें स्पष्टपणें आजवर कधींच दाखवून दिलें नव्हतें...आमचे सर्व राजे प्रजाद्रोही आहेत व त्यांना अकलेचा विटाळहि नाहीं ही देवाची आम्हांवर मोठी मेहरबानगी आहे–तरी अशा या राजांच्या द्वारेंच आमचा उद्धार होईल असा आम्ही हट्ट धरून बसलों आहों !...पोप पळाला याचा अर्थ त्यानें राज्यावरचा हक्क सोडून दिला हाच होय. पोप हा वंशपरंपरेचा राजा नाहीं; लोकांनीं निवडल्यामुळेंच त्याला हक्क प्राप्त होतात. रोमवर पोपची आतां कांहीं सत्ता उरलेली नाहीं–रोमची सत्ता आतां जनतेच्याच हातीं आहे !" या सत्तेला संघटित स्वरूप द्यावयासाठीं शक्य तितक्या लवकर सर्व प्रांतांतर्फे प्रतिनिधि बोलावून त्यांची सभा भरवावी अशी रोमन पुढाऱ्यांना मॅझिनीनें सूचना केली.

रोमच्या स्वयंभू पुढाऱ्यांनीं पोपला पुनरागमनाचें निमंत्रण पाठविलें पण तें त्यानें नाकारलें. पुढाऱ्यांचे हातून सत्ता स्वतःच्या ताब्यांत घ्यावयासाठीं पोपनें रोमन रहिवाशांचें एक कार्यकारी मंडळ नेमलें; पण या मंडळांत नेमलेल्या सर्व व्यक्तींनीं काम करावयाचें नाकारलें. नंतर नॅशनल ॲसेंब्लीने तात्पुरतें सरकार निवडलें. त्यांनीं सुमारें दोन महिने काम केलें. पुढें राज्याची घटना ठरवावयासाठीं संघटनामंडळ निवडण्यांत आलें. पोपच्या मुलखाची लोकसंख्या २८००००० होती; पैकीं वयांत आलेल्या पुरुषांची संख्या ३४३००० होती; त्यांनीं संघटना मंडळाच्या निवडणुकीच्या वेळीं मतें दिलीं. संघटनामंडळाची पहिली बैठक ता. ६ फेब्रुवारी रोजीं भरली. ता. ९ फेब्रुवारी रोजीं पंधरा घंटे एकसारखी

चर्चा चालून रोम हें लोकसत्ताक संस्थान आहे व यापुढें संस्थानच्या मुलखावर व प्रजेवर पोपचा कांहीं अधिकार नाहीं असें जाहीर करण्यांत आलें. संघटनामंडळांत १५० सभासद होते. या बैठकीला १४४ सभासद हजर होते. लोकसत्ताक संघटनेला फक्त ११ जणांनीं विरोध केला; पोपचे हक्क रद्द करावयाच्या सूचनेला फक्त पांचजणांनीं विरोध केला. ( मॅझिनी व गॅरिबॉल्डी यांना संघटनामंडळासाठीं निवडण्यांत आलें होतें; वरील बैठकीचे वेळीं ते गैरहजर होते. ) संघटनामंडळाच्या निर्णयाला पोपच्या कारकीर्दींत निवडलेल्या म्युनसिपालिटयानीं मान्यता दिली; मान्यतेचा मसुदा संघटनामंडळापुढें ता. ११ फेब्रुवारी रोजीं सादर करण्यांत आला. नव्या निवडणुकी झाल्यानंतर २३६ म्युनिसिपालिटयांनीं त्याच निर्णयाला फिरून एकदां मान्यता दिली. संघटनामंडळाच्या निवडणुकी झाल्या तेव्हां आणि म्युनिसिपालिटयानीं हे निर्णय दिले तेव्हां मतदारांचें मन वळविण्यासाठीं कोणी दौरे काढले नव्हते किंवा वजनदार पुढाऱ्यांनीं तंबी देऊन कार्यभाग साधलेला नव्हता.

संघटनामंडळानें मॅझिनीला नागरिकत्वाचे हक्क अर्पण केलेच होते. मार्च महिन्याच्या आरंभीं मॅझिनी रोमला पोंचला. क्रान्तीमुळें लोकसत्ता अगोदरच स्थापन झाली होती; आतां ध्येयनिष्ठेच्या, शौर्याच्या व आत्मयज्ञाच्या विभागास आरंभ व्हावयाचा होता. अशा वेळीं तेथें मॅझिनीचे आगमन व्हावें हा योगायोग विलक्षण खरा. "लॉंबर्डीचा पराभव झाला होता; इटलीमध्यें लोकसत्ताक पक्ष विस्कळित झाला होता—म्हणून रोमला जातांना माझ्या मनांत मुळींच हिम्मत नव्हती. अशी स्थिति असतांहि त्या दिवशीं संध्याकाळीं (ता. ५ मार्च) रोमच्या महाद्वारांत पाऊल ठेवतांना माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले व मला नवा दम आल्यासारखें वाटलें ! माझ्या मनांत अत्यंत नम्रबुद्धि उत्पन्न झाली व मीं एकाद्या महातीर्थाचे ठिकाणीं जात आहें अशी माझी भावना झाली...रोमची पूजा हा माझा धर्म आहे. रोम अमर आहे. आजवर जगाला रोमनें दोनदां जीवन दिलेलें आहे. सुधारणेच्या कार्यांत जगाचें धुरीणत्व दोनदां स्वीकारण्याचा मान कोणत्याहि देशाला मिळालेला नाहीं...रोमन लोकांच्या लोकसत्तेचें अधिष्ठान रोममध्येंच होतें...नंतर लोकांना रोम ही स्मशानभूमि आहे असें वाटूं लागलें तोंच पोपांनीं रोमचें नांव पुन्हां दैदिप्यमान केलें...आज रोम–लोकांचें रोम, तिसऱ्या खेपेस जगाचें नेतृत्व घ्यावयास सज्ज झालें आहे...रोम हें माझ्या तारुण्याचें स्वप्न होतें, माझ्या विचारांचें अधिदैवत होतें..."

संघटनामंडळांतील पहिल्याच भाषणांत मॅझिनीनें सांगितलें, " शत्रूचा वेढा पडलेला असतां आपण जितक्या त्वरेनें काम करूं तितक्या वेगानें आपणांस काम केलें पाहिजे—मात्र हेंच काम अनंत काळपर्यंत टिकावें इतकें मजबूत केलें पाहिजे. इटलीच्या भाग्योदयाचे धागेदोरे आज रोमच्या हातांत आहेत आणि इटलीचें भवितव्य म्हणजे जगाचें भवितव्य होय अशी माझी निष्ठा आहे. " ता. ९ मार्च रोजीं तो मार्गारेट फुलर बाईनां भेटावयास गेला होता. " मॅझिनी माझेकडे सुमारें दोन तास होता...त्याचा चेहरा पूर्वीपेक्षां अधिकच दिव्य दिसूं लागला आहे...इटलीवर आलेलें संकट फार भयंकर आहे पण त्यांतूनहि देशाला तारण्याचें सामर्थ्य जर कोणाला असेल तर तें मॅझिनीलाच आहे...हें कार्य आपल्या हातून होईल कीं नाहीं याबद्दल त्याचें स्वतःचें मन साशंक आहे. " लोकशाहीच्या शत्रूंना तोंड देण्यासाठीं सैन्याची उभारणी व संघटना करण्यासाठीं एक मंडळ स्थापण्यांत यावें—" कारण सामर्थ्याशिवाय स्वातंत्र्य नाहीं व स्वातंत्र्याशिवाय राष्ट्रैक्य नाहीं—" अशी सूचना मॅझिनीनें संघटनामंडळापुढें मांडली. यावेळीं लोकशाहीला ऑस्ट्रिया एवढा एकच शत्रु आहे असें त्याला वाटत होतें; नेपल्सच्या सैन्याला तो कःपदार्थ लेखीत होता. रोममधील प्रजासत्तेला पीडमॉटच्या राज्याची मान्यता मिळालेली नव्हती. पीडमाँटचा प्रधान जोबर्टी यानें पोपला रोममध्यें परत यावयासाठीं मदत द्यावयाचें कबूल केलें होतें तरी ऑस्ट्रियाबरोबरच्या युद्धांत रोमनें पीडमाँटचा पक्ष घ्यावयाचें ठरविलें.—"कारण स्वतः स्वतंत्र झालेल्यांचें आद्यकर्तव्य इतरांना स्वतंत्र होण्यास मदत करणें हेंच आहे ! " पण ता. २० मार्चला सुरू झालेल्या या मोहिमेचा शेवट पीडमाँटच्या पराभवांत झाला. नोव्हॅरा येथें चार्लस अलबर्टचा पराजय ( ता. २४ मार्च ) झाला ही बातमी येतांच रोमन संघटनामंडळानें पूर्वीचें कार्यकारी मंडळ रद्द केलें व सर्व सत्ताधारी त्रिकूटाची स्थापना केली. ( यापुढें सर्वसत्ताधारी त्रिकूट या शब्दप्रयोगाऐवजीं ट्रिमुव्हरेट हाच आटोपशीर शब्द वापरला आहे ). ट्रिमुव्हरेटमध्यें जनतेतर्फे मॅझिनी, मध्यम स्थितींतील लोकांतर्फे आर्मेलिनी व सरदारवर्गातर्फे साफी नांवाचा लोकसत्तावादी सरदार या तीघांची निवडणूक करण्यांत आली ( ता. २९ मार्च ).

साफी व आर्मेलिनी हे नांवाला मात्र सर्वसत्ताधारी होते; वस्तुतः सर्व अधिकार व कामें मॅझिनीच्याच हातीं होतीं. आत्मविसर्जनाच्या व सहनशील-

तेच्या अनेक वर्षांच्या अभ्यासामुळें त्याची मुद्रा, स्वर आणि जीवन यांना दिव्यता प्राप्त झाली होती. ब्राझीलमध्यें परिस्थिति गॅरिबॉल्डीची सेनापतित्वासाठीं घडण करीत होती—इकडे परिस्थितीमुळेंच मॅझिनीचा नैसर्गिक संतपणा विकसित होत होता. इतकीं वर्षें घण सोसून त्याला संतपणा आलेला होता; आतां तोच महात्मा आपल्या पावित्र्याच्या जोरावर रोमची कीर्ति वृद्धिंगत करावयासाठीं व लोकांचें जीवन पवित्रतर करावयासाठीं इटालियन स्वातंत्र्याच्या उष:कालीं रोमच्या कार्यभूमीवर दाखल झाला होता! त्याच्या उदात्तपणामुळें रोमन जनता मोहून गेली, त्यांचा आळस व भेकडपणा चटकन नाहींसा झाला; मॅझिनीच्या सर्व आज्ञा त्यांनीं अक्षरश: आणि गर्भितार्थासुद्धां प्रमाण मानल्या: केवळ मॅझिनीसाठींच त्यांनीं आपली सूडाची भावना गुंडाळून ठेवली! त्यांनें अॅसेंब्लीला सांगितलें, " रोममध्यें नैतिक हीनतेचें कृत्य होतां कामा नये. " आणि खरोखरच असें कृत्य मॅझिनी तेथें असेपर्यंत झालें नाहीं.

रोममधील मॅझिनीचा जीवनक्रम फार विलक्षण होता. ट्रिमुव्हरेटची स्थापना ता. २९ रोजीं झाली आणि ता. २५ एप्रिल रोजीं फ्रान्सचें सैन्य जनरल ऑडिनो याच्या नेतृत्वाखालीं रोमचें बंदर सिव्हिटा व्हिकाया (रोमपासून चाळीस मैलांवर) येथें दाखल झालें. लोकशाहीवर शत्रूंचा हल्ला लवकरच होईल हें मॅझिनी जाणून होता; मात्र त्यावेळीं आपणांस फ्रान्सशीं लढावें लागेल अशी कोणाचीहि कल्पना नव्हती. शहरसंरक्षणासाठीं मॅझिनीनें जिवापाड श्रम केले: लोकांच्या हृदयांत उत्साह उत्पन्न करणें, शहरांत अन्नसामग्री व युद्धोपयोगी जिनसांचा भरणा करणें, तोफखान्यासाठीं मोर्चे उभारणें, युद्धासाठीं खजिना उभारणें वगैरे सर्व कामें त्यानें अंगावर घेतलीं होतीं. या दिवसांत मॅझिनी रोमचा सेनापति, मुत्सद्दी व अनभिषिक्त राज्यकर्ता होता. शत्रूवर छापा कोणीकडून व कसा घालावयाचा, शहरच्या रक्षणाच्या तजविजा करावयाच्या, सैन्याला दारूगोळा व अन्नसामुग्री पुरवावयाची वगैरे लष्करी कामांची जबाबदारी त्याच्यावर होती. शत्रूच्या वकिलांशीं बोलणें लावावयाचें, परकीय सरकारांना राजकीय खलिते लिहावयाचे, फ्रान्समधील लोकांना इटलींतील व रोमची खरी परिस्थिति समजावून द्यावयाची, लोकांचें सामर्थ्य व उत्साह जागृत करावयाचा वगैरे मुत्सद्यांचीं कर्तव्यें त्याच्यावरच पडलीं होतीं. मॅझिनीच्या परराष्ट्रीय खलित्यांबद्दल पामर्स्टननें म्हटलें आहे कीं, 'मॅझिनीचे खलिते हे मुद्देसूद विवेचनपद्धतीचे मासलेवाईक नमुने आहेत.'

राज्यकर्ता या दृष्टीनें त्याचें वर्तन फारच मऊ होतें. एका शिपायाला लष्करी कायद्यानुसार फांशीची शिक्षा फर्मावण्यांत आली होती—त्या हुकमावर सही करण्याचें मॅझिनीनें नाकारलें ! हजारों लोक त्याला वारंवार भेटावयास येत व नानाप्रकारचे प्रश्न विचारून भंडावून सोडीत पण त्या सर्वांशीं मॅझिनी अगदीं शांतपणानें वागे. युद्धामध्यें कैद केलेल्या शत्रूच्या सैनिकांशीं व अधिकाऱ्यांशीं त्याचें वर्तन इतकें उदार व प्रेमळपणाचें होतें कीं, कैदेंतून सुटतांना त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले ! त्याच्या वैयक्तिक जीवनांत तर साधेपणाची कमाल झाली होती. इटालियन लोकांना शत्रूचा खून करणें करतलामलवत् आहे—आणि मॅझिनीला त्यावेळीं नेहमींप्रमाणेंच अनेक शत्रू होते; असें असूनहि मॅझिनीनें आत्मसंरक्षणाची कांहींच तजवीज केली नव्हती. क्विरिनल-मधल्या एका लहानशा खोलींत तो रहात असे; भेटावयास आलेल्यांची गांठ तो येथेंच घेत असे; त्याचें राजकाजाचें काम रात्रंदिवस चाललेलें असे. त्याचा दररोजचा जेवणाखाणाचा खर्च दोन आण्यांपेक्षांहि कमी होता ! ट्रिमुव्हर या अधिकाऱ्याला दरमहा बत्तीस पौंड मिळत असत. ही रक्कम तो इतरांना मदत करण्यांत खर्च करी.

लंडन टाइम्स पत्रांत मॅझिनीवर आरोप करण्यांत आला होता कीं, रक्तपात करून सर्व सत्ता हातीं ठेवणाऱ्या कटवाल्यांचा तो नेता आहे. पोपच्या अनुयायांनीं त्याचेविरुद्ध कंडी उठवली कीं, सर्व लोकांची आणि संस्थांची खासगी मालमत्ता जप्त करून टाकावयाचा त्याचा बेत आहे. मॅझिनीच्या कारकीर्दींत फक्त धर्मगुरूंच्या मोठमोठ्या इष्टेटी मात्र सरकार जमा करण्यांत आल्या. इतर देशांमध्येंहि त्यांच्या जमिनी जप्त करण्यांत येत होत्या, मात्र पुढें त्या वरच्या वर्गाच्या हातीं जात असत ! रोमन सरकारनें जप्त केलेल्या जमिनी अगदीं गरीब लोकांना अत्यल्प खंडानें लागवडीस देण्यांत आल्या होत्या. ट्रिमुव्हरेटनें आपला कार्यक्रम ता. ५ एप्रिल रोजीं प्रसिद्ध केला:-" आम्हाला पक्षयुद्ध सुरू करावयाचें नाहीं; खासगी मालमत्तेच्या हक्कांना बाध आणावयाचा नाहीं; पण ज्या वर्गावर लक्ष्मीची नजरहि फिरत नाहीं त्यांची स्थिति सुधारण्याचे प्रयत्न मात्र आमचेकडून करण्यांत येतील. "

संघटनामंडळानें तयार केलेल्या राज्यघटनेमध्यें पोपच्या धार्मिक प्रभुत्वाला कोणत्याहि प्रकारचा निर्बंध घालण्यांत आला नव्हता. " राजा व धर्मगुरु या दोन दृष्टींनीं पोपबद्दल-विचार करण्यांत आला पाहिजे. लोकनियुक्त सरकार

या नात्यानें आपण लोकांच्या धार्मिक भावना दुखवतां कामा नये." काव्हूरनें पुढें पोपच्या बाबतींत याच प्रकारची व्यवस्था केली. धर्मकार्यासाठीं श्रद्धाळू लोकांनीं दान दिलेल्या मालमत्तेवर मोठमोठे धर्मोपाध्याय मनमुराद चैन भोगीत पण गांवोगांवच्या लहान लहान उपाध्यायांची मात्र उपासमार होत असे; ही स्थिति सुधारण्याचा मॅझिनीचा बेत होता. कॅथॉलिक पंथांत कांहीं जीव उरलेला नाहीं असें मॅझिनीचें मत होतें तरी धर्ममतस्वातंत्र्याचें तत्व त्याला मान्य असल्यामुळें लोकांना आपापल्या धर्मकल्पनेप्रमाणें उपासना चालविण्यास मोकळीक होती. मॅझिनीच्या धर्ममतसहिष्णुतेमुळें कॅथॉलिक पंथाचे कित्येक उपाध्याय लोकशाहीला मिळाले; त्यांनीं पोपचा व त्याचेबरोबर गाइटाला गेलेल्या त्याच्या अनुयायांचा उघड धिक्कार केला. पोपच्या अनुयायांचे विरुद्ध प्रथमत: लोकमत इतकें जहाल होतें कीं ट्रिमुव्हरेटनें वेळींच काळजी घेतली नसती तर त्यांचेपैकीं बऱ्याच जणांना लोकक्षोभाला बळी पडावें लागलें असतें. ट्रिमुव्हरेट स्थापन झाल्यानंतर धर्मगुरूंच्या जंगम मालमत्तेची चोरी, अफरातफर अगर विक्रय करणारांना अत्यंत कडक शिक्षा देण्यांत येईल असें जाहीर करण्यांत आलें; प्रत्येक चर्चमध्यें मालमत्तेचें रक्षण करण्यासाठीं सैनिक नेमण्यांत आले. धर्मगुरूंना लोकशाहीमध्यें फारसा त्रास झाला नाहीं. त्यांनीं बंडखोरांचे हाल करावयासाठीं तयार केलेलीं यंत्रें व त्यांचे मिरवणुकीचे रथ लोकांनीं आरंभीं जाळून टाकले; फ्रेंच सैन्याचा वेढा पडल्यानंतर शत्रूला कांहीं बातमी कळविण्याचा प्रयत्न केल्यावरून दोन धर्मगुरू गोळी घालून ठार करण्यांत आले; सार्वजनिक प्रार्थनेच्या दिवशीं उपासना चालवावयाचें नाकारल्यावरून कित्येकांना सरकारतर्फे दंड करण्यांत आला; फ्रेंच लोकांनीं शहर काबीज केलें तेव्हां त्यांचें आनंदानें स्वागत करणाऱ्या तीन पाद्र्यांना लोकांनीं चिडून जाऊन ठार केलें. रोमन लोकशाहीच्या अमदानींत अत्याचाराचीं एवढींच उदाहरणें झालीं; त्यावेळच्या परिस्थितीकडे पाहतां हे अविचार क्षम्य आहेत असेंच कोणालाहि वाटेल.

ट्रिमुव्हरेटच्या राज्यकारभाराचें प्रधान तत्व मॅझिनीनें एकाच वाक्यांत प्रदर्शित केलें आहे. "तत्वांचे बाबतींत सहिष्णुता व निस्पृहता ठेविली जाईल." लोकशाहीला विरोध करूं पाहणाऱ्या नागरिकांचे बाबतींत सहिष्णुताच ठेवण्यांत आली होती; त्यांचे कटांची माहिती मॅझिनीला होती, रोमची स्थिति किती भयंकर आहे हें त्याला ठाऊक होतें—असें असूनहि मॅझिनीनें त्यांना स्वतंत्रच ठेवलें होतें! परक्यांचा वेढा पडलेला असतांना आणि स्वराज्यांत

फितूर लोकांचा भरणा असतांना ट्रिमुव्हरेटच्या कारकीर्दीत गुन्हेगारांच्या चदकशीची, तुरुंगांची व दडपशाहीची जरूरच पडली नाहीं; आणि ह्याच राज्यकारभाराला ' 'दरवडेखोरांची सत्ता ' असें नांव बॅांबा राजानें ठेवलें होतें ! ' इतकी उत्कृष्ट राज्यव्यवस्था रोमन लोकांना आज शेंकडों वर्षें पहावयास मिळालेली नव्हती ' असें लॉर्ड पामर्स्टन या इंग्लंडच्या परराष्ट्रीय प्रधानानें भर पार्लमेंटांत बोलून दाखविलें. जनतेच्या नागरिकत्वाच्या भावनेवर भर ठेवूनच राज्यकारभार चालवण्यांत येई. प्रारंभीं लोकशाही फारशी लोकप्रिय नव्हती पण लवकरच मॅझिनीच्या नैतिक सामर्थ्यानें लोक भारले गेले. पोपच्या राज्यकारभारामुळें लोकांची नीति हलकी झाली होती पण मॅझिनीचा सहवास घडतांच त्यांच्या नैसर्गिक उदात्त भावना जागृत झाल्या. त्याच्या नेतृत्वाखालीं लोकांनीं उत्साह, शौर्य, स्वार्थत्याग व आत्मसमर्पण या गुणांचा कळस करून दाखविला. मॅझिनीचा उदात्तपणा लोकांच्या निदर्शनास येऊं लागला तसतशी ट्रिमुव्हरेटची लोकप्रियता वाढूं लागली. फ्रान्सची लोकसत्ता रक्तपातासाठीं प्रख्यात होती तर रोमची लोकसत्ता अत्याचारापासून अलिप्त होती—हा मॅझिनीच्या कार्याचा परिणाम होय. लोकशाहीची लोकप्रियता, सत्ता व नैतिक सामर्थ्य वृद्धिंगत होत होतें तोंच फ्रेंच लोकांचें सैन्य रोमच्या दरवाजांशीं दाखल झालें ! रोमची लोकसत्ता जगाला आदर्शभूत करून दाखवावयाचा मॅझिनीचा बेत होता पण त्याच्या हेतूंना लुई नेपोलियननें मोडता घातला. स. १८४८ च्या राज्यक्रान्तीमध्यें लुई फिलिपला फ्रान्समधून पळ काढावा लागला. फ्रान्समध्यें पुन्हां लोकशाहीची स्थापना झाली व ता. १० डिसेंबर स. १८४८ रोजीं नेपोलियनचा पुतण्या लुई नेपोलियन बोनापार्ट याला लोकशाहीचा अध्यक्ष निवडण्यांत आलें. लुई नेपोलियनची फ्रान्सच्या सिंहासनावर नजर होती; फ्रान्समधील कॅथॉलिक पंथाच्या मतदारांची सहानुभूति मिळवावयासाठीं त्यानें रोमवरील स्वारीला संमति दिली. फ्रेंच जनतेला ह्या कारस्थानाचा मागमूसहि नव्हता; लोकांच्या इच्छेविरुद्ध त्यांचेवर लोकसत्ता जबरदस्तीनें लादण्यांत आलेली आहे अशी नेपोलियनच्या हस्तकांनीं त्यांची समजूत करून दिली होती. इटलीमध्यें ऑस्ट्रियाचें वर्चस्व होऊं देणें फ्रान्सच्या हिताला विघातक आहे म्हणून ही स्वारी पाठविण्यांत आली आहे असें लोकांना सांगण्यांत आलें होतें. या स्वारीबद्दल त्याला पुढें पश्चात्ताप करण्याचे अनेक प्रसंग आले. या कृत्याबद्दल त्याचें कोणीहि समर्थन केलेलें नाहीं. " राजकारणांत

इतका नीचपणाचा गुन्हा दुसऱ्या कोणीहि केलेला नाहीं. " असा त्याच्या वर्तनाबद्दल इतिहासज्ञांचा अभिप्राय आहे. त्यानें लोकांची फसवणूक केली नसती तर फ्रेंच लोकांनीं या अत्याचाराला केव्हांहि संमति दिली नसती.

जनरल औडिनोबरोबर दहा हजार फ्रेंच सैनिक होते व तोफखानाहि होता. अनेक युद्धांत लढून कसलेल्या या सैन्याला तोंड द्यावयासाठीं रोममध्यें आठ हजार स्वयंसैनिक तयार झाले होते. त्यांचें लष्करी शिक्षण तुटपुंजें होतें व दारूगोळ्याच्या धूमधडाक्याचा त्यांना अनुभव नव्हता; त्यांची लष्करी शिस्त बेताबाताचीच होती पण त्यांना स्वातंत्र्यासाठीं आत्मसमर्पण करावयाचा उत्साह होता. रोमन लोकशाहीला मान्यता द्यावयाची नाहीं, लोकशाहीच्या सत्ताधाऱ्यांना केवळ व्यक्ति या नात्यानें वागवावयाचें व हरप्रयत्नानें त्यांची संघटना उधळून देऊन शहर कबजांत घ्यावयाचें असा जनरल औडिनोला फ्रेंच सरकारचा हुकूम होता ! बंदरचा कबजा कायम ठेवावयासाठीं कांहीं लोक मागें ठेवून सुमारें सात हजार सैनिक व तोफखाना बरोबर घेऊन रोम जिंकावयास तो निघाला. फ्रेंच सैन्याला विजयाची इतकी खात्री वाटत होती कीं, रोमवर वेगवेगळ्या दिशांनीं चाल करून येणाऱ्या तुकड्यांनीं शहरांत पुढील हुकूम घ्यावयासाठीं एकत्र व्हावें असें ठरलें होतें. रोमचे लोक एवढ्या मोठ्या सैन्याला विरोध करतील ही कल्पना औडिनोला इतकी असंभवनीय व हास्यास्पद वाटत होती कीं, रोमकडे जातांना त्यानें मोठमोठ्या तोफा, तटावर चढावयाच्या शिड्या वगैरे वेढ्याचें सामानहि बरोबर घेतलें नव्हतें. रोमजवळ तो आला तेव्हां त्याचें मत हळू हळू बदलूं लागलें. फ्रेंच सैनिकांच्या लोकसत्ताक भावना उद्दीपित करण्यासाठीं मोठमोठ्या अक्षरांत फ्रान्सच्या लोकशाहीच्या संघटनेचें पांचवें कलम छापलेल्या जाहिराती जागोजाग चिकटविलेल्या होत्या. तें कलम येणेंप्रमाणें:–" फ्रान्सला इतर राष्ट्रांबद्दल आदरभाव आहे; इतरांच्या स्वातंत्र्याला बाध येइल असें वर्तन शक्तीच्या जोरावर फ्रान्स करणार नाहीं. " या जाहीरनाम्यांचा सैनिकांच्या मनावर फारसा परिणाम झाला असें दिसत नाहीं. रोमच्या नजीक येतांच लोकांची लढावयाची तयारी पाहून फ्रेंचांनीं तोफांची सरबत्ती सुरू केली. इतक्यांत गॅरिबॉल्डी सुमारें दोन हजार लोकांनिशीं त्यांच्यावर अत्यंत त्वेषानें तुटून पडला. ह्या माऱ्यामुळें फ्रेंचांना माघार घ्यावी लागली; या चकमकींत त्यांचे सुमारें एक हजार सैनिक जाया झाले. पांगापांग झालेलें सैन्य एकत्र करून औडिनोनें रोमला वेढा घालावयाची तयारी केली.

फ्रेंच सैन्य बंदरांत आल्याबरोबर ट्रिमुव्हरेटनें शहरसंरक्षणाचा कडेकोट बंदोबस्त केला. "आम्ही कोणत्याहि पाशवी शक्तीला शरण जाणार नाहीं. आपलें कर्तव्य म्हणून, रोमच्या कीर्तीसाठीं, इटलीच्या वैभवासाठीं व जगताच्या उद्धारासाठीं आपण रोम लढवलेंच पाहिजे." असें मॅझिनीनें संघटनामंडळांत जाहीर केलें. "आपल्या पूर्वजांच्या कीर्तीला साजेल असें कार्य आपल्या हातून झालें पाहिजे. आपापसांतील द्वेषभाव बाजूस ठेवा. प्रत्येक गोळी शत्रूसाठीं राखून ठेवा! लोकसत्तेचा जयजयकार असो!" फ्रान्सच्या स्वारीमुळें इटालियन लोक फ्रेंच जनतेवर अगदीं चिडून गेले; पण या बाबतींत मॅझिनीची बिलकुल चलबिचल झाली नाहीं. फ्रेंच जनतेच्या मनांत लोकसत्तेबद्दल वैरभाव नाहीं, लुई नेपोलियननें वैयक्तिक महत्वाकांक्षेसाठीं रोमचें वैर पत्करलें आहे हें तो जाणून होता.

"आम्ही रोम लढावयाचा निश्चय केला; कारण रोम हें इटलीच्या ऐक्याचें केंद्रस्थान आहे. संपूर्ण इटालियनांची अंत:करणें रोमबद्दल भक्तिभावानें वेधून जावीं असें कार्य करून दाखविणें हें रोमचें कर्तव्य आहे. आज रोमबद्दल इटालियन लोकांना मुळींच आदर वाटत नाहीं. रोम हें एक स्मशान आहे अशी त्यांची कल्पना झालेली आहे. रोमबद्दल लोकांना तिरस्कार वाटत आहे याचें कारण रोममधील लोक पोपची गुलामगिरी सहन करीत आहेत, कारण या पापभ्रष्ट धर्मगुरूंच्या लांचानें ते मिंधे झालेले आहेत! निसर्गत: उदार व वीरवृत्तीच्या लोकांचा हा अध:पात पाहून इटालियनांना रोमची शिसारी आली आहे. इटलींतील लोकांनीं स्वातंत्र्यासाठीं आजपर्यंत जागोजाग आपलें रक्त सांडलें आहे पण रोमनें स्वातंत्र्यासाठीं कोणत्याच प्रकारचें धाडस केलेलें नाहीं म्हणून जनतेचें मन रोमकडे ओढ घेत नाहीं. पण रोमवर माझी निष्ठा आहे. स्वातंत्र्यासाठीं लढावयास रोमन जनता तयार आहे हें मला स्पष्टपणें दिसून आलेलें आहे; जर कोणी माघार घेत असतील तर ते स्वत:ला पुढारी म्हणवून घेणारे लोकच होत! रोमन ॲसेंब्लीनें व रोमन जनतेनें इटलीच्या स्वातंत्र्यासाठीं उदारपणें रोम लढवावयाचें ठरविलें. यश:प्राप्तीसाठीं रोमच्या हद्दीबाहेर युद्ध व्हावयास पाहिजे होतें; शिवाय बाहेरून मदत आल्याखेरीज यश मिळणें अशक्य होतें. आमचा पराभव होणार हें ठरलेलेंच होतें पण भविष्यावर नजर ठेऊन आम्हीं लढावयाचें ठरविलें...." कसल्याहि संकटांना यापुढें मॅझिनीनें जुमानलें नाहीं. "फ्रान्सच्या बलाढ्य

सैन्यापुढें आपला टिकाव लागणें अशक्य आहे असें राष्ट्रसंरक्षक सैन्याच्या अधिकाऱ्यांनीं मला सांगितलें! ते म्हणाले कीं, शहर लढवावयाचें ठरल्यास सैन्याचा बराच मोठा भाग शहररक्षणास नाकवूल जाईल!! पण रोमन लोकांचें अंत:करण मला माहीत होतें. मी हुकूम दिला कीं, सर्व पलटणींनीं उद्यां सभागृहासमोर हजर व्हावें. दुसऱ्या दिवशीं सैनिकांना हाच प्रश्न विचारतांच सर्वांनीं 'लढाई' 'लढाई' म्हणून उत्साहाची आरोळी ठोकली! त्या रणगर्जनेवरोबर अधिकाऱ्यांच्या मनांतील भीति व शंका समूळ नष्ट झाल्या."

"लोकसत्ताक रोमवर स्वारी करावयाची कल्पना लुई नेपोलियनच्या डोक्यांतून निघाली. रोमच्या लोकसत्तेवर फ्रेंच सैन्य पाठविण्यांत त्याचा दुहेरी डाव होता. एका लोकसत्तेविरुद्ध त्यांना लढवून दुसऱ्या लोकसत्तेविरुद्ध उभें रहावयाचा निर्लज्जपणा फ्रेंच सैनिकांचे व लोकांचे मनांत त्याला उत्पन्न करावयाचा होता. तसेंच फ्रान्समधील कॅथॉलिक पक्षाची सहानुभूति व मतें त्याला मिळवावयाचीं होतीं. फ्रेंच ॲसेंब्लींत जाहीर करण्यांत आलें होतें कीं, 'रोमन जनतेला लोकसत्ता मुळींच नको आहे; लोकसत्ताक पक्षाचे प्रमुख त्यांना आज चिरडून टाकीत आहे; गांजलेल्या लोकांना मदत करणें हें आपलें कर्तव्य आहे; शिवाय रोममध्यें पोपची स्थापना करावयासाठीं ऑस्ट्रिया व नेपल्स यांच्या पलटणी धांवत निघाल्याच आहेत; तेव्हां रोमन जनतेचा व पोपचा दुवा फ्रान्सनें तरी कां मिळवूं नये?' रोम लढवून आम्हांला सिद्ध करून दाखवावयाचें होतें कीं, रोममध्यें कोणत्याहि प्रकारची जुलुम जबरदस्ती लोकशाहीकडून केली जात नाहीं; लोकशाहीशीं संपूर्ण जनतेची एकवाक्यता आहे हें आम्हांला सिद्ध करून दाखवावयाचें होतें. लुई नेपोलियनचे घाणेरडे बेत आम्हांला चवाठ्यावर आणावयाचे होते. फ्रेंच लोकांचें मन न दुखवतां लुई नेपोलियनचें कुटिल कारस्थान आम्हांला जगाच्या नजरेसमोर आणावयाचें होतें; आणि यासाठीं आम्ही युद्धाची तयारी केली; हेंच कार्य आम्ही हातीं घ्यावें अशी रोमन म्युनिसिपालिटयांनीं आम्हांला विनंति केली; यासाठींच आम्ही युद्धांत पकडलेले फ्रेंच सैनिक मोकळे केले; यासाठींच आम्ही गॅरिबॉल्डीला फ्रेंचाचा पाठलाग करून त्यांची धूळधाण उडविण्याच्या बेतापासून परावृत्त केलें. गॅरिबॉल्डीला हा हुकूम देण्यांत आला याबद्दल अनेकांचा गैरसमज झालेला आहे; कारण ते त्या हुकुमाची संगति पहात नाहींत. त्यावेळीं आम्हांला फ्रेंच राष्ट्राचें अंत:करण जिंकावयाचें होतें." अगदीं शेवटचा विश्वासघात होईपर्यंत मॅझिनी याच धोरणाला धरून

वागत होता. फ्रेंच कैद्यांची व्यवस्था त्यानें इतकी उत्कृष्ट ठेवलेली होती कीं जनरल औडिनोनेंहि त्याबद्दल आभार प्रदर्शित केले. त्यानें शत्रूच्या छावणींत सिगारेट्सचे पेटारेच्या पेटारे भेटीदाखल पाठविले—त्यांमध्यें लोकसत्ताक भावना जागृत करणाऱ्या हस्तपत्रकांचीं पुडकींहि भरलेलीं होतीं !

रोमन लोकशाहीचे हेतु व मार्ग काय आहेत हें फ्रान्समधील लोकांना समजावें म्हणून मॅझिनीनें बरेच प्रयत्न केले. " फ्रेंच ॲसेंब्लीवर आमच्या वचनांचा व वर्तनाचा परिणाम होऊन त्यांनीं आमच्याशीं तह करण्याचें ठरविलें. " आणखी ताणून धरलें तर फ्रान्सचे लोकसत्तावादी बिथरतील हें पाहतांच लुई नेपोलियननें एक डाव टाकला. एका दगडानें दोन पक्षी मारावयाचा त्याचा बेत होता; एकीकडे फ्रान्सच्या लोकसत्तावाद्यांना असें भासवावयाचें होतें कीं, रोमन लोकशाही तेथील जनतेला अत्यंत अप्रिय आहे तरीहि ती लोकशाही आहे म्हणून तिच्याशीं समेट करावयास आपण तयार आहों; दुसरीकडे त्याला मॅझीनीची फसवणूक करून मिळविलेल्या वेळांत जनरल औडिनोला पुरेशी कुमक पाठवावयाची होती ! म्हणून समेट करावयासाठीं त्यानें फ्रान्सतर्फे द लेझेप्स याला वकील म्हणून पाठविलें.* ता. १५ मे रोजीं तो रोमला आला; ता. १७ मे रोजीं युद्धतहकुबीचा तह झाला आणि समेटाचें बोलणें सुरू झालें.

इकडे पोपच्या मदतीला युरपियन राजे ससैन्य धांवून येत होते. स्पेनचे ४०००, ऑस्ट्रियाचे २८००० व नेपल्सच्या बॉंबा राजाचे २५००० सैनिक रोमच्या दिशेनें चाल करून येत होते. ता. १६ मे रोजीं मध्यरात्रीं गॅरिबॉल्डी नेपल्सच्या सैन्यावर हल्ला करावयासाठीं बाहेर पडला. हें सैन्य गेल्यावर शहराच्या संरक्षणासाठीं एक हजार लोक मागें राहिले होते. पुढें गॅरिबॉल्डीला बोलोनाचे १०००० सैनिक, घोडदळ व तोफखाना येऊन मिळाला. संयुक्त

---

* लेसेप्स याची वकीलातीच्या कामावर ता. ८ मे रोजीं नेमणूक झाली. त्याच दिवशीं जनरल औडिनोला पाठविलेल्या सरकारी खलित्यांत लुई नेपोलियननें म्हटलें होतें कीं, " या वेढ्यामध्यें फ्रान्सची लष्करी अब्रू अटीतटीला पडलेली आहे. फ्रान्सच्या अब्रूला धक्का लागणें मी कधींहि सहन करणार नाहीं. तुम्हांला पुरेशी कुमक लवकरच पाठविण्यांत येईल. " नेपोलियनचा हा डाव लेसेप्सला माहीत नव्हता ! मात्र लेसेप्सची वकीली किती फोल आहे हें औडिनोला ठाऊक होतें !

सैन्यानें नेपल्सच्या सैन्याचा पुरता मोड केला. बोलोनाचें सैन्य इकडे गुंतलें होतें त्यावेळीं बोलोना शहरांत सुमारें २२०० सैनिक उरले होते; हें पाहून ऑस्ट्रियन सैन्यानें बोलोना शहराला वेढा घातला; शहरांतील लोकांनीं आठ दिवसपर्यंत त्यांना दाद दिली नाहीं. पुढें मात्र त्यांना शहर ऑस्ट्रियाच्या स्वाधीन करणें भाग पडलें.

रोमला आल्यावर तेथील सर्वसत्ताधाऱ्यांचा साधेपणा पाहून फ्रेंच वकील अगदीं गार झाला. मॅझिनीचा साधा जीवनक्रम, त्याची दिव्य मुद्रा, त्याचें उदात्त वर्तन, लोकांवर असलेली त्याची छाप पाहून तो अगदीं चकित झाला. आणि त्यानें बोलून दाखविलें कीं, रोमन लोकशाही व तिचे नेते यांसंबंधीं फ्रान्सच्या लोकांची भयंकर गैरसमजूत झालेली आहे! फ्रान्सशीं समेट व्हावा अशीच लोकांची इच्छा होती. पोपच्या पुनरागमनाला व धार्मिक प्रभुत्वाला त्यांचा विरोध नव्हता—मात्र धर्मगुरूंच्या राज्याला मान्यता द्यावयास ते अगदीं नाकबूल होते.

ता. ३१ रोजीं लेसेप्स व ट्रिमुव्हरेट यांचा तह कायम झाला—लेसेप्स हा फ्रान्सचा वकील होता, मुखत्यार नव्हता म्हणून तहाच्या अटी फ्रेंच सरकारला मान्य होईपर्यंत अगदीं नक्की मानणें शक्य नाहीं असें त्यानें अगोदरच बोलून दाखविलें होतें. तहामध्यें असें ठरविलें होतें कीं, रोमन लोकशाहीवर ऑस्ट्रिया, नेपल्स किंवा आणि इतर कोणत्याहि राज्यानें हल्ला केला तर फ्रान्सच्या सैन्यानें रोमन लोकशाहीला मदत करावी! फ्रेंच सैन्याची छावणी तटबंदीच्या बाहेर असावी असें कलम तहनाम्यांत होतें. तहाच्या अटी कायम होतात न होतात तोंच पॅरिसला परत यावयाचा लेसेप्सला हुकूम मिळाला! कारण इकडे औडिनोला पाठविलेली कुमक रोमच्या वेढ्यांत दाखल झाली होती; कारण तिकडे फ्रान्समध्यें लुई नेपोलियनच्या बेताला अनुकूल असलेल्या कॅथॉलिक लोकांचें सरकारांत बहुमत झालें होतें! ता. १ जून रोजीं युद्धतहकुबी रद्द झाल्याचा जाहीरनामा जनरल औडिनोनें रोमन लोकांकडे पाठविला!

फ्रेंचाच्या राजकारस्थानाबद्दल संशय उत्पन्न होऊन ट्रिमुव्हरेटनें गॅरिबॉल्डीला परत बोलाविलें होतें. ता. ३१ मे रोजीं तो रोममध्यें दाखल झाला. ( ता. १ जून रोजीं रोमला वेढा घालणारें फ्रान्सचें सैन्य ३५०००; तोफा ३६; खास वेढ्याच्या तोफा ४०; विरुद्ध रोमचें सैन्य १६००० व लहानसा तोफखाना. रोमचें रक्षण करावयास २०० तोफा व ५०००० सैन्य जरूर आहे असा

तज्ज्ञांचा अभिप्राय होता. रोमची तटबंदी अगदीं कच्ची होती. ) ता. २ जून रोजीं लष्करी परिस्थितीसंबंधीं गॅरिबॅल्डीला सल्ला विचारण्यांत आला. त्यानें सरळ सांगितलें कीं, मला सर्वसत्ताधारी करणें हा एकच उपाय आतां उरला आहे. गॅरिबॅल्डीनें असें सांगितलें कारण त्याला डावपेंच माहीत नव्हते, कारण त्याला आत्मविश्वास होता; पण सर्व अधिकार त्याचे हातीं दिल्यानें शहरचे आंतील व्यवस्था नीट राहणार नाहीं असें वाटल्यावरून त्याचें म्हणणें अमान्य करण्यांत आलें.

ता. २ जून पासून ता. ४ जून पर्यंत परस्परांनीं परस्परांवर हल्ला करूं नये. असा तह झाला होता; पण तीन तारखेला पहांटे दोन वाजतां विश्वासघातकी औडिनोनें रोमवर हल्ला चढविला. हल्ला होईल अशी रोमच्या रहिवाशांची कल्पनाहि नव्हती. हल्ल्याची बातमी लागतांच सर्व सैनिक घाईघाईनें तयार झाले; त्या पहांटे रोमन लोकांनीं मर्दुमकीची शर्थ केली—त्यांचा जोर पाहून छापा घालून रोम काबीज करावयाचा बेत फ्रेंचांनीं सोडून दिला. शहराभोंवतीं त्यांनीं पद्धतशीर वेढा घातला. तटबंदीच्या आसपास लहान लहान गढ्या होत्या, त्या त्यांनीं व्यापून टाकल्या. शहराकडे त्यांची हळू हळू प्रगति होऊं लागली. मधून मधून रोमन लोक त्यांचेवर जोराचे छापे घालीत. फ्रेंचांनीं रोमवर तोफांचा व बंदुकींचा मारा सारखा चालू ठेविला होता. रोमन लोकांचा हल्ला इतक्या त्वेषाचा असे कीं, आत्मसमर्पणासाठीं त्यांचेमध्यें जणूं काय अहमहमिका लागली होती ! जाण्यायेण्याच्या मार्गांवर स्वतःच्या व शत्रूंच्या प्रेतांचा खच पाडून रोमन लोकांनीं कित्येक महत्वाच्या जागा काबीज केल्या, पण संख्याबळापुढें त्यांचा निरुपाय झाला. वीस तारखेला फ्रेंचानीं रोमचे कांहीं बुरूज काबीज केले; तरी लोक त्यांना शरण गेले नाहींत, उलट त्यांनीं इतक्या जोराचे हल्ले केले कीं, काबीज केलेल्या बुरुजांवरच आत्मसंरक्षणाची तजवीज करून स्वस्थ राहणें फ्रेंचांना भाग पडलें. येथून पुढें आठ दिवस त्यांची कांहींच प्रगति झाली नाहीं. फूट फूट जागेसाठीं अनेक लोक मृत्युमुखीं घालावे लागतील असा रंग पाहतांच त्यांनीं चढाईचा मार्ग सोडला. फितुरी, भूक व रोगराई यांच्या जोरावर नुस्ता वेढा कायम ठेवून रोमन लोकांना शरण आणावयाचा त्यांनीं घाट घातला.

" रोमच्या संरक्षणाची कांहीं आशा राहिली नाहीं तेव्हां पुढें काय करावयाचें हा प्रश्न सर्वांच्या डोळ्यांसमोर उभा राहिला. " प्रत्येक फुटासाठीं लढावें

लागलें तरी बेहत्तर पण शत्रूला शरण जावयाचें नाहीं असा गॅरिबॅाल्डीचा निश्चय होता. मॅझिनीचें मत असेंच होतें—पण पुढें काय करावयाचें हें ठरवावयाचा अधिकार त्या दोघांनाहि नव्हता, हें ठरवावयाचें काम अॅसेंब्लीचें होतें. " या प्रश्नावर अॅसेंब्लीमध्यें वादविवाद चाललेला असतांना मी मुद्दाम गैरहजर राहिलों, कीं आपल्या शब्दामुळें लोकांनीं भलत्या हट्टास पेटूं नये; लोकशाहीचे सर्व निर्णय अंत:करणापासून आणि नैसर्गिक स्फूर्तीमुळें निघालेले असले पाहिजेत. व्यक्तींनीं आपलें वजन खर्च करून मिळवलेले निर्णय लोकशाहीचे नव्हेतच. स्वत:च्या हक्कांसाठीं लोकशाहीनें शत्रूंशीं लढावयाला आरंभ केलेला आहे, स्वत:ची शक्ति पूर्णपणें नष्ट होईपर्यंत अथवा विजय प्राप्त होईपर्यंत लढणें हें लोकशाहीचें कर्तव्य आहे. राजे लोक आपलें सिंहासन सोडून पळून जाऊं शकतात, शत्रूंशीं तडजोड करूं शकतात, आत्मसंरक्षणासाठीं भ्याडपणाचा मार्ग स्वीकारूं शकतात; पण लोकशाहीचें तसें नाहीं. लोकशाही हें जनतेचें निष्ठा-सामर्थ्य आहे. तत्वासाठीं आत्मसमर्पणाचें दिव्य करणें हें लोकशाहीचें भाग्य आहे ! यासाठींच आम्हीं म्हणत होतों कीं, रोमशहरांतील एकेका तसूसाठीं झुंजावें !...एक मनुष्य, एक बंदूक व एक गोळी शिल्लक असेपर्यंत हें युद्ध चालविलेंच पाहिजे अशी माझी निष्ठा होती. मी अॅसेंब्लीला एक निराळाच मार्ग सुचविला. अॅसेंब्लीचे येतील तितके सभासद, वेगवेगळ्या खात्यांचे प्रधान व सर्वसत्ताधारी यांनीं आपलें उरलेंसुरलें सैन्य व येतील तेवढे हत्यारबंद नागरिक बरोबर घेऊन शहराच्या बाहेर पडावयाचें, शत्रूची फळी फोडून पार निघावयाचें आणि उघडया देशामध्यें बंड उभारावयाचें ! ह्या मार्गाचा स्वीकार केल्यानें रोमन लोकशाहीचें सरकार व सामर्थ्य यांचा नाश होणार नाहीं, फक्त रोम शहर मात्र फ्रेंचाच्या हवालीं जाईल. आपणांबरोबर पुढें युद्ध चालवावयास त्यांना ऑस्ट्रियाशीं संगनमत करणें भाग पडेल व यामुळें त्यांची युरोपांत बेअब्रू होईल. पण अॅसेंब्लीला हा मार्ग पसंत पडला नाहीं. गॅरिबॅाल्डीनें पुढें ह्याच मार्गाचा स्वीकार केला—पण त्याचेबरोबर लोकशाहीचें सरकार नव्हतें.

" वीस जूनला रोमचे कांहीं बुरूज शत्रूच्या ताब्यांत गेले. मी लगेच लष्करी अधिकाऱ्यांची सभा बोलाविली; आपली जागा सोडून सभेला येणें शक्य नाहीं असा आम्हांला गॅरिबॅाल्डीचा निरोप आल्यावरून आम्ही सर्व मंडळी त्याच्या ठाण्यावर गेलों ! तेथें मी मंडळींना सांगितलें कीं, ' रोममध्यें आज निर्वाणीचा दिवस आलेला आहे. यापुढें कोणचा मार्ग घ्यावयाचा याचा निर्णय आजच

लावणें भाग आहे. ॲसेंब्लीपुढें सर्व परिस्थिति मांडण्याचे अगोदर लष्करी दृष्टीनें या प्रश्नाचा खल झाला पाहिजे. आपणांपुढें आज तीन मार्ग आहेत. शत्रूला शरण जाणें हा पहिला मार्ग, शहराचा विध्वंस होईपर्यंत व आपण सर्वजण मृत्युमुखीं पडेपर्यंत रस्त्यारस्त्यांमध्यें लढणें हा दुसरा मार्ग, रोमन लोकशाहीनें शहरावाहेर पडून युद्धक्षेत्र इतरत्र नेणें हा तिसरा मार्ग. पहिला मार्ग लोकशाहीच्या कीर्तीला काळिमा आणणारा आहे. दुसरा मार्ग अशक्य आहे; कारण आपणांशीं लढावयाचा शत्रूचा इरादा दिसत नाहीं, आम्हाला भुकेनें मारावयाचा त्यांचा बेत आहे ! तिसरा मार्ग व्यक्तिशः मला पसंत आहे.' माझ्या या भाषणावर मतें घेण्यांत आलीं. लोकशाहीच्या उज्वलतेला काळिमा आणणारा शरण जाण्याचा मार्ग कोणालाहि पसंत पडला नाहीं हें येथें नमूद करावयास मला मोठा अभिमान वाटतो. कांहीं जणांना रोम लढवणें श्रेयस्कर वाटलें. गॅरिबॉल्डीला माझा मार्ग पसंत पडला. लष्करी मंडळाची बैठक बरखास्त झाल्यावर मी ॲसेंब्लीकडे धांव घेतली.

"त्या दिवशीं असेंब्लीच्या बैठकीला हजर रहावयाची इतरेजनांना परवानगी नव्हती. लष्करी मंडळापुढें झालेली चर्चा मी असेंब्लीपुढें मांडली. लोकशाहीच्या अब्रूला साजेल असा निर्णय द्यावयाची मी सभासदांना विनंति केली. सभासदांचीं मनें अगोदरच वळवून ठेवावयाचा यत्न मी केला नव्हता. आजपर्यंत युद्धामध्यें रोमन लोकांनीं जें धैर्य व उत्साह दाखविला होता त्यावरून मला वाटत होतें कीं, असेंब्लीचे सभासद माझ्या बेताला अनुकूल मत देतील--पण रोमनें आत्मसंरक्षणाचा प्रयत्न बंद करावा असें त्यांनीं ठरविलें !

" ही सूचना सभेपुढें मांडली जावयाच्या अगोदरच मी सभागृह सोडून गेलों होतों. असेंब्लीचा निर्णय ट्रिमुव्हरेटला रीतसर कळविण्यांत आला. हा निर्णय फ्रेंच सैन्याच्या अधिपतीला कळविणें आणि शहरांतील लोकांच्या सुरक्षिततेसाठीं व शहराच्या स्वास्थ्यासाठीं कोणते उपाय योजावे ह्याबद्दल शत्रूशीं वाटाघाट करणें हें काम माझ्यावरच सोंपविण्यांत आलें होतें ! मी उत्तर पाठविलें कीं, ट्रिमुव्हरेटची योजना लोकशाहीचें संरक्षण करावयासाठीं झाली होती, शरण जाण्याकरितां नव्हे ! या उत्तराबरोबरच मीं माझा राजीनामा पाठविला. मजप्रमाणेंच माझ्या सहकाऱ्यांनींहि राजीनामे दिले."

दोन तारखेला फ्रेंच लोक शहरांत शिरले. लोकशाहीच्या कारकीर्दींत जिकडे तिकडे बेबंदशाही सुरू होती अशी कल्पना करून लोकांना ताळ्यावर आणण्या-

साठीं त्यांनीं दडपशाहीला सुरवात केली. लगेच राजकीय गुन्ह्यांची चवकशी करावयासाठीं लष्करी मंडळ स्थापण्यांत आलें. पांच तारखेला सार्वजनिक संघ (Clubs) मोडून टाकण्यांत आले व सभाबंदीचा कायदा शहराला लागू करण्यांत आला. सहा तारखेला शहर संरक्षक सैनिकांची पलटण मोडून टाकण्यांत आली. सात तारखेला नागरिकांचीं हत्यारें जप्त करण्यांत आलीं. चौदा तारखेला शहरांतील वर्तमानपत्रें बंद करण्यांत आलीं. अठरा तारखेपासून शहरांत पांच माणसांपेक्षां मोठा जमाव जमण्याची बंदी करण्यांत आली—अशा रीतीनें शहरांत स्वस्थता व शांतता स्थापन करण्यांत आली ! ट्रिमुव्हरेटच्या कारकीर्दीत मॅझिनीच्या दडपशाहीला लोक चळचळां कांपत असत, असा फ्रान्सनें युरपभर गवगवा केला होता–त्याच रोम शहरांत फ्रेंचांनीं इतकी शांतता स्थापन केली कीं, चळचळां कांपावयाइतकाहि जीव लोकामध्यें राहिला नाहीं !

या वेढयामध्यें रोमन लोकांनीं दाखवलेलें शौर्य इतिहासामध्यें संस्मरणीय आहे. रोमच्या बाजूनें लढलेले बहुतेक सैनिक पोपच्या मुलुखाचेच रहिवासी होते; दुसरीकडील कांहीं लोक स्वदेशासाठीं लढावयास रोमला आले होते. मॅझिनी, गॅरिबॉल्डी, मेडीसी व बिक्सियो (गॅरिबॉल्डीच्या टोळ्यांचे अधिकारी) मॅनरा(लॉंबर्डीचा प्रसिद्ध योद्धा),मामेली(मॅझिनीच्या प्रणयिनीचा पुत्र व युद्धगीतांचा कर्ता), ऊगो बासी (राष्ट्राभिमानी धर्मगुरु), बर्टेनी (सिसिलींतील सैन्याची संघटना करणारा ) वगैरे अनेक सुप्रसिद्ध राष्ट्रभक्त त्यावेळीं रोममध्यें जमले होते ! राष्ट्रभक्तांचा व राष्ट्रवीरांचा असा जमाव इटलीच्या इतिहासांत पुन्हां केंव्हांहि जमून आला नाहीं. सरदार, मजूरदार, साधुसंत, राजभक्त, राष्ट्रभक्त, लोकसत्तावादी वगैरे सर्व मतांचे व दर्जाचे लोक रोमसाठीं व स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं या युद्धांत लढले. आपलीं घरें शत्रूच्या तोफखान्यामुळें उध्वस्त होत आहेत, पुरेसें अन्न मिळावयाचीहि पंचाईत आहे आणि विजयाची आशा मुळींच नाहीं–असें असूनहि हे लोक मोठ्या धीरानें लढले. जखमी झालेल्यांची शुश्रुषा करावयासाठीं सहा हजार स्वयंसेविका सज्ज झाल्या होत्या. रोमच्या वेढ्यांत पतन पावलेले वीर तर चिरंजीव झालेच असतील, त्यांचा स्वर्गप्रवेशहि मोठ्या थाटाचा झाला असेल; पण एवढा आत्मयज्ञ करणारे जे लोक धारातीर्थी पतन पावले नाहींत त्यांना स्वर्गात बंदी करावयाची परमेश्वराला छाती झाली असेल काय ?

यापुढें रोम लढवावयाचें नाहीं असें ॲसेंब्लीनें ठरविल्यानंतर गॅरिबॉल्डीनेंहि आपल्या अनुयायांसह शहर सोडावयाचा निश्चय केला. "दूरदूरचे प्रवास, मुबलक संकटें, भूक तहान वगैरे अपेष्टा व मृत्यु हीं माझ्याबरोबर येणाऱ्यांच्या वांट्यास येतील; पण पारतंत्र्यांत कुजावयास कबूल नसतील त्यांनीं माझ्याबरोबर चलावें" असें गॅरिबॉल्डीनें जाहीर केलें. सुमारें तीन हजार लोक त्याच्या झेंड्याखालीं जमले. बरोबर येणारें सारें सैन्य शहराबाहेर निघाल्यानंतर गॅरिबॉल्डीनें जमिनींत एक भाला खुपसला आणि जनरल औडिनोला आण घातली कीं, " आतां माझा मी मोकळा आहें; छाती असेल तर पाठलाग कर ! " टर्नी येथें कर्नल ह्यू फोर्बस हा त्याला पांचशें स्वयंसैनिकांसह मिळाला. हें सैन्य सॅन मॅरिनो या लोकसत्ताक राज्यांत दाखल झालें तेव्हां सर्व बाजूंनीं ऑस्ट्रियन सैन्यानें त्याचा कोंडमारा केला. औडिनोचे सुमारें पंचवीस फ्रेंच सैनिक आपल्या पलटणींतून पळ काढून गॅरिबॉल्डीला मिळाले होते. ते परत करण्यांत यावे, मग तहाचें बोलणें लावण्यांत येईल असें ऑस्ट्रियन सेनापतीकडून गॅरिबॉल्डीला कळविण्यांत आलें. ही अट अमान्य करून त्यानें आपल्या सैन्याच्या तीन तुकड्या केल्या व वेढा घालणारांची फळी फोडून बाहेर पडावयाचें ठरविलें. पैकीं एक तुकडी युद्धामध्यें निखालस गारद झाली; गॅरिबॉल्डी व फोर्बस यांच्या ताब्यांतील तुकड्या मात्र शत्रूंची फळी फोडून बाहेर पडल्या— चकमकीमध्यें त्यांचेहि पुष्कळ लोक मारले गेले. नंतर या पलटणी मोडून टाकण्यांत आल्या. कांहीं थोडे लोक गॅरिबॉल्डीबरोबर व्हेनिसला जाण्यास निघाले, पण त्यांपैकीं बहुतेकांना वाटेंतच जलसमाधि मिळाली—गॅरिबॉल्डी मात्र आपल्या पत्नीसह पलीकडच्या तीरावर उतरला—तोंच ॲनिटा श्रम व काळजी यांच्या दगदगीनें गॅरिबॉल्डी शेजारीं असतांनाच मरण पावली ! तिचें दफन केल्यावर वेष पालटून तो जिनोआला आला व तेथून जलमार्गानें जिब्राल्टरला गेला. इकडे कॅप्टन फोर्बस स्विट्झरलँडांत निसटला.

* * * * *

" तीन जुलै रोजीं मी पुढील निषेधप्रदर्शक खलिता ॲसेंब्लीच्या सेक्रेटरीच्या हातीं दिला. " नागरिकहो ! तीस जूनच्या व दोन जुलईच्या निर्णयानें* तुम्ही लोकशाहीचा नाश केलेला आहे; आणि सर्व उपाय थकेपर्यंत लोकशाहीचें संर-

* स्वसंरक्षणाचे यत्न बंद करण्याबद्दलचा निर्णय.

क्षण करावयाचें काम रोमन जनतेनें तुम्हांवर सोपविलें होतें ! तुम्ही हा निर्णय दिला त्यावेळीं सर्व उपाय थकलेले नव्हते; आमच्या झेंडयाच्या सामर्थ्याबद्दल आम्ही सर्वांनींच आशा सोडलेली नव्हती. हें जाहीर करतांना मला अत्यंत दु:ख होत आहे, पण हें जाहीर केल्याशिवाय माझ्या विवेकबुद्धीला शांतपणा वाटणार नाहीं म्हणूनच हें पत्रक मी आपणांकडे पाठवीत आहे. परमेश्वर व जनता यांच्या आज्ञा अनुल्लंघनीय अशा आहेत. आपलें शक्तिसर्वस्व खर्च होई-पर्यंत परकीयांचा प्रतिकार करा अशी परमेश्वर व जनता यांची तुम्हांला आज्ञा होती. रोमच्या लोकशाहीचें संरक्षण करून लोकसत्तेच्या तत्वांना तुम्हीं पावित्र्य आणावें, न्याय व अन्याय यांचा समेट होणें शक्य नाहीं आणि पाशवी शक्तीच्या जबरदस्तीमुळें जनतेचा स्वातंत्र्याचा हक्क विलयास जात नाहीं हें तुम्ही जगाच्या निदर्शनास आणून द्यावें अशी तुम्हांला परमेश्वर व जनता यांची आज्ञा होती. राजे लोक हे स्वार्थ व लोभ यांचे दास आहेत, स्वत:च्या बचावासाठीं शत्रूला शरण जाणें त्यांना साजतें-पण लोकशाही ही जनतेची निष्ठाशक्ति आहे, कर्तव्यभावना आहे; आपलें सामर्थ्य नष्ट होत आलेलें असतांहि आपणांवर जुलूम करणाराचा अन्याय जगाच्या निदर्शनास आणून देत असतांना आपल्या प्राणांची आहुति देणें, हेंच लोकशाहीला साजतें. लोकशाही कालत्रयींहि कोणालाहि शरण जाणें शक्य नाहीं हें सिद्ध करून दाखवा अशी तुम्हांला परमेश्वर व जनता यांची आज्ञा होती. रोमचें आत्मसंरक्षणाचें सामर्थ्य अझूनहि नष्ट झालेलें नाहीं. इकडे तुम्ही शरणचिठ्ठीवर सही करीत आहां आणि तिकडे ते शूर वीर उत्साहानें लढत आहेत. त्यांना या भानगडीची वार्ताहि नाहीं आणि असें होईल हें त्यांच्या स्वप्नींहि नाहीं ! शहरच्या हात हात जागेसाठीं घनघोर युद्ध करावयाचा उत्साह जनतेमध्यें अझून जिवंत आहे. फ्रेंचांना शरण जावयाची इच्छा जनतेनें किंवा सैनिकांनींहि आजवर प्रदर्शित केलेली नाहीं. शहरांतील सर्व रस्त्यांची नाकेबंदी करावयाचा आमचा हुकूम लोकांनीं केव्हांच मान्य केला आहे; आणि इकडे तुम्ही मात्र ठरवीत आहां कीं यापुढें रोमचें संरक्षण करणें ‘ अशक्य ’ आहे ! हे शब्द उच्चारून मात्र तुम्हींच तें कार्य अशक्य करून ठेवलें आहे. ‘ असें-ब्लीचें अस्तित्व कायम आहे ’ असें तुम्ही जाहीर केलें आहे-पण ॲसेंब्लीचें स्थान परक्यांना शरण गेलेल्या जागेंत नाहीं; स्वातंत्र्याचें निशाण उभारून देशोधडीला गेलेल्या ॲसेंब्लींत जो जिवंतपणा आहे तो तुमच्यांत नाहीं. पर-

क्यांना शरण जाऊन आपलें अस्तित्व वचावूं पहाणाऱ्या निर्जीव ॲसेंब्लीनेंच लोकशाहीचा प्राण हरण केला आहे. परक्यांचे पाय शहराला लागतील त्याच दिवशीं असेंब्लीबरोबरच लोकशाहीचें अस्तित्व नष्ट होईल–आणि तुम्ही मात्र म्हणत आहां कीं, ॲसेंब्लीचें अस्तित्व कायम आहे ! लोकसत्तावादी सैन्याला तुम्ही शहर सोडून बाहेर जाऊं दिलेंत; त्यांचेबरोबर लोकसत्तेचे कायदेशीर प्रतिनिधि गेले नाहींत ही गोष्ट रोमच्या लोकशाहींत फूट होती हें जगाच्या निदर्शनास आणीत आहे; लोकसत्तेच्या संरक्षणासाठीं जनतेनें निवडलेले प्रतिनिधि आणि लोकशाहीचा नाश करण्यास उद्युक्त झालेले लोक यांचेमध्यें एकच प्रकारचा संबंध उत्पन्न होऊं शकतो–आणि हा संबंध म्हणजे युद्ध हाच होय ! रोम हें इटलीचें अंतःकरण आहे, इटलीची विचारशक्ति आहे, इटलीची आशा आहे–रोमचा रोमपणा रोमच्या जड देहांत नाहीं तर स्वदेशासाठीं व स्वातंत्र्यासाठीं लढूं इच्छिणाऱ्या व हालअपेष्टा भोगावयास सिद्ध असलेल्या रोमन लोकांत आहे. ह्याचा तुह्मांला विसर पडला. ॲसेंब्लीनें ससैन्य बाहेर पडून शत्रूंशीं मोकळ्या मैदानांत झुंजावयास पाहिजे होतें; इतिहासांत अशा युद्धपद्धतीचीं उदाहरणें पुष्कळ आहेत; पण इतिहासाच्या अध्ययनानेंहि तुमचें चैतन्य जागृत झालें नाहीं. इटलीच्या तृतीय पुनरुज्जीवनाचे तुम्ही मंत्रप्रणते ! तुम्ही युरपला आपली चिकाटी व कर्तव्यनिष्ठा दाखवून द्यावयाला पाहिजे होती. या सर्व गोष्टी तुम्हांला स्पष्ट करून दाखविण्यांत आल्या होत्या, पण तुम्हांला त्या पटल्या नाहींत. तुमच्या या वर्तनाबद्दल जनतेचा प्रतिनिधि या नात्यानें, परमेश्वर व जनता यांना साक्षी ठेवून, मी तुमचा निषेध करीत आहें. इटलीसाठीं आणि संपूर्ण जगतासाठीं महत्कृत्यें करावयाचें भाग्य रोमच्या नशीबीं लिहिलेलें आहे. रोमचें संरक्षण ही या महत्कृत्यांची प्रस्तावना मात्र आहे–या महाकाव्याची ही पहिली ओळ मात्र आहे ! या अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगीं तुम्ही अज्ञानानें अंगीकृत कार्याचा त्याग करीत आहां; आपल्या नियोजित कर्तव्यापासून तुम्ही ढळलां आहां ! भविष्यकाळांत तरी आमच्यामध्यें एकजुटीनें कार्य करण्याचें सामर्थ्य येवो ! ”

ता. ३ जुलै १८४९.

हातीं अधिकार असतांना आपण लोकांवर जुलूम केला अशा बातम्या पसरलेल्या आहेत हें मॅझिनीच्या कानीं आलें होतें. ह्या विधानाची असत्यता सिद्ध

करावयासाठीं तो मुद्दाम रोम येथेंच राहिला. गेल्या दोन महिन्यांच्या दगदगी-मुळें त्याचे केंस पांढरे शुभ्र झाले होते व त्याची मुद्रा अगदीं फिकट झाली होती. त्याची करारी व शांतमुद्रा पाहून जणूं काय रोमच्या स्वातंत्र्याचा आत्माच रस्त्यांतून फिरत आहे असा भास उत्पन्न होत असे. "फ्रेंच लोक शहरांत शिरले, त्यांच्या मागोमाग घाणेरडीं राजकारस्थानेंहि रोममध्यें शिरलीं. सर्वसत्ताधारी असतांना मी लोकांवर जुलूम केला होता अशी फ्रेंच व कॅथॉलिक वर्तमानपत्रांनीं ओरड केली होती; ज्यावेळीं मी जुलूम केले त्यावेळीं माझ्या हातांत सत्ता होती म्हणून माझें पारिपत्य करावयास कोणी धजलें नाहीं असें त्यांनीं ध्वनित केलें होतें. आतां माझ्या हातांत कांहींच सत्ता राहि-लेली नव्हती; मी जर कोणावर जुलूम केला असेल तर त्यांनीं आतां माझें पारि-पत्य करावें व आपणांस भोगाव्या लागलेल्या हालअपेष्टांचा सूड घ्यावा म्हणून मी रोमच्या रस्त्यांमधून वेळीं अवेळीं एकाकी व निःशस्त्र असा फिरत असे...ॲसें-ब्लीचे सभासद व प्रधान हद्दपार झाले; स्वतःच्या कमनशीबापेक्षां देशाच्या दुर्दैवा-बद्दल जास्त दुःखित झालेले जखमी वीर ज्या इस्पितळांत वेदना भोगीत पडलेले होते तीं फ्रेंचांनीं उध्वस्त केलीं; रोमच्या स्वातंत्र्यासाठीं देह ठेवणाऱ्या वीरांचीं थडगीं परक्यांनीं आपल्या पायांखालीं तुडविलीं व भ्रष्ट केलीं;—आणि हें सर्व पहात असतांना आपल्या जीवींच्या जिवलगाला मूठमाती देतांना येतील अशा शोकाच्या भावना माझ्या हृदयांत उसळूं लागल्या ! शहरांतील लोक संतापानें थरथर कांपत होते—पुन्हां युद्धाचा समय येईल त्यावेळीं शौर्याची शर्थ करूं या भावनेनें त्याचे बाहू स्फुरण पावत होते—आणि त्यांच्या रांगांमधून फ्रेंच सैनिक बंदुकांना बागनेटें लावून निर्धास्तपणें फिरत होते हें पाहून मला अतोनात दुःख झालें. फ्रेंच सैनिक त्यावेळीं निर्धास्त झाले होते. पुन्हां एकदां रोमन बंडखोरांना संघटित करून फ्रेंचांवर छापा घालावयाचे अनेक बेत मी योजले—पण ते सर्व व्यर्थ गेले...मला कैद अथवा ठार करावयाची अशी संधि या फ्रेंचांना व कडव्या कॅथॉलिकांना पुन्हां प्राप्त होणें अशक्य होतें; पण त्यांनीं या संधीचा फायदा कां घेतला नाहीं हें गूढ मला अजूनपर्यंत उकललेलें नाहीं...माझ्या सर्व मित्रांनीं मला शहर सोडून जावयाचा उपदेश केला. त्यांना वाटत होतें कीं, दुसऱ्या एखाद्या प्रसंगीं माझ्या उद्दिष्ट कार्याच्या सिद्धीप्रीत्यर्थ मला यत्न करतां येतील. पण माझे सारे मित्र मला सोडून जाणार आहेत, त्यांचेबद्दल मला वाटत असणाऱ्या विश्वासाचा ते घात करणार आहेत व माझ्या वांट्याला फक्त

अकृतज्ञताच येणार आहे या भावी स्थितीचीं स्वप्नें मला अगोदरच पडूं लागलीं होतीं ! म्हणून रोम सोडून जावयाचा उपदेश करणाऱ्या माझ्या हितचिंतकांना मी सांगितलें कीं, तुमचें माझ्यावर प्रेम असेल तर मला रोममध्येच मरूं द्या ! पण पुढें मी रोम सोडावयाचें ठरविलें * अमेरिकन वकीलातींतून मला प्रवासाचा परवाना मिळाला होता; पण त्यावर फ्रेंच अधिकाऱ्यांची सही नव्हती व ती मिळविणें मला शक्यहि नव्हतें. म्हणून तो परवाना निरुपयोगी ठरला. त्यावेळीं बंदरांत एक बोट आली होती, तिचा कॅप्टन माझ्या ओळखीचा नव्हता; त्याची गांठ घेऊन त्याला मी सर्व हकीकत कळविली; तो मला जहाजावर घेईल अशी माझी अपेक्षाच नव्हती—पण त्यानें मला मार्सेलिसला पोंचविण्याचें कबूल केलें ! बोट सुरू होतांच एक नवीनच संकट उभें राहिलें. माझ्या ओळखीचीच पण माझ्या विरुद्ध पक्षाची कांहीं मंडळी पोप महाराजांना परत यावयाचें निमंत्रण देण्यासाठीं याच बोटीनें निघाली होती—त्यांनीं मला ओळखलें ! लेगहॉर्नच्या बंदरांत हे लोक माझी खबर जाहीर करतात कीं काय अशी कप्तानाला धास्ती पडली ! पण त्यांनीं तसें कांहींच केलें नाहीं. मार्सेलिस बंदरांत कस्टमचे अधिकारी बोट तपासावयास आले तेव्हां मी त्यांचकडे पाठ करून एखाद्या खलाशाप्रमाणें भांडीं घांशीत बसून राहिलों—ते निघून गेल्यावर मी बंदरांत उतरलों व फ्रान्समधून स्विट्झरलँडांत जिनिव्हाला गेलों. ही हकीगत मी इतक्या बारकाईनें देत आहें, कारण माझ्या शत्रूंनीं बातमी पसरवली होती कीं, मॅझिनीनें आपली कातडी बचावण्यासाठीं अगोदरच तीन वेगवेगळे परवाने मिळवून ठेवले होते ! ब्रिटिश सरकारनें मला आपल्या संरक्षणाखालीं घेतलें आहे अशीहि कंडी त्यांनीं पिकविली होती ! ”

जिनीव्हाहून मॅझिनी लूसेनला गेला. तेथून त्यानें टोकव्हील या फ्रेंच प्रधानास रोमन लोकशाहीचें समर्थन करण्यासाठीं एक अनावृत्त पत्र पाठविलें—त्यांतील कांहीं भाग पुढें दिला आहे.

---

* रोम व इटली यांमध्यें विचारविनिमय व्हावा म्हणून रोम शहर सोडण्यापूर्वीच मॅझिनीनें तेथें एक गुप्त समाजाची स्थापना केली होती. या समाजानें प्रजासत्तेविषयींची आस्था इटलीमध्यें अनेक वर्षे जागत ठेविली. पण पुढें या समाजाचे अग्रणी पकडले जाऊन कैदेंत पडले व त्यांचा गुप्त छापखानाहि जप्त झाला. यामुळें रोमन जनतेशीं विचारविनिमय करावयाचें मॅझिनीचें एक साधन नाहींसें झालें.

" फ्रान्सच्या लोकसत्तेचे प्रधान या नात्यानें जाहीर रीतीनें घेतलेल्या शपथांचा तुम्ही भंग केलेला आहे. एका लोकसत्ताक राष्ट्राच्या बेइमान नोकरांनींच दुसरीकडल्या लोकशाहीचा नायनाट केलेला आहे. लोकसत्तेचा प्रधान या अभिधानाला तुम्ही सर्वस्वीं अपात्र आहां. मारेकरी हीच पदवी तुम्हांला शोभते. तुम्ही असत्यवादी आहांत, सैतानाचे दूत आहांत; तुमच्या हाताखालचे अधिकारीहि तुम्हांसारखेच आहेत ! जनरल औडिनोनें तर आपल्या खोटेपणानें निर्लज्जपणाची शर्थ केली आहे ! तुमचा वकील लेसेप्स यानेंहि खोटेपणानें आमचा घात केला ! "

वर्तमानपत्रकार व स्वार्थवादी लोक विचारतील कीं, केवळ एका मनुष्याच्या स्वप्नाला मूर्त स्वरूप द्यावयासाठीं हा एवढा खटाटोप व रक्तस्राव करून शेवटीं हातीं काय लागलें ? या प्रश्नाला ते स्वत: कोणतेंहि उत्तर देवोत पण पराभूत झालेल्या रोमन लोकांनीं या प्रश्नाला एकच उत्तर दिलें असतें—" रोमनें शौर्याची शर्थ केली; वेढा पडलेला असतांनाच रोममध्यें भावी इटालियन राष्ट्राचें बीज पेरलें गेलें ! " याच मुद्यावर मॅझिनी म्हणतो:—" १८४९ सालची रोमन लोकांना आतां कशी काय आठवण असेल हें मला माहीत नाहीं. पण रोमन आयांनीं जर आपलें कर्तव्य बजावलें असेल, त्या वर्षी लोकशाहीसाठीं त्या वीरांनीं आत्मार्पण केलें, त्यांचेविषयीं आपल्या मुलांच्या मनांत जर त्यांनीं पूज्यबुद्धि उत्पन्न केली असेल, लोकसत्तेचा जयजयकार असो अशी गर्जना करीत ज्यांनीं धारातीर्थीं देह ठेविले त्यांच्या कथा व त्यांचें रहस्य जर त्यांनीं आपल्या मुलांच्या अंत:करणावर बिंबविलें असेल, त्या देशवीरांच्या रक्तानें रोमच्या प्रत्येक रज:कणाला महातीर्थी पावित्र्य आलेलें आहे अशी भावना जर त्यांनीं आपल्या मुलांच्या हृदयांत उत्पन्न केली असेल तर रोमच्या पुढील पिढीस परवशतेचा विटाळहि होणार नाहीं ! "

# ७. सैतानांचें साम्राज्य !

( १८४९–१८५६. )

" The blood of the martyrs of religion was the seed of Christianity. Our bloodshed for our native land will be the seed of good patriots. "

*Zambelli.*

राज्यक्रान्तीनंतर इटलीमधील परिस्थिति—सैतानांचें साम्राज्य--लंडन-निवास--कृतिपरायण पक्ष--मिलनची उठावणी—मँटुआची उठावणी—मॅझिनीविरुद्ध मानीन--खंजीराची उपपत्ति.

रोमचें ऐतिहासिक साम्राज्य पोप महाराजांच्या हवालीं करण्यांत आलें आहे असा जाहीरनामा जनरल औडिनोनें ता. १४ जून १८४९ रोजीं प्रसिद्ध केला, अठरा महिन्यांच्या गैरहजिरीनंतर ता. १२ एप्रिल १८५० रोजीं पोप महाराजांनीं रोम शहरांत पुन्हां पाऊल घातलें. राज्यक्रान्तीच्या आरंभीं जाहीर करण्यांत आलेली राजघटना रद्द करून पोप महाराजानीं अनियंत्रित कारभाराला सुरवात केली; अधिकाराच्या सर्व जागांवर भटाभिक्षुकांची नेमणूक करण्यांत आली; माजी लोकसत्तेशीं सहानुभूति असणाऱ्या लोकांना हद्दपार करण्यांत आलें; सूडाची तहान भागविण्यासाठीं सावजं गठवण्याकरितां शेकडों हेरांची नेमणूक करण्यांत आली. पाशवी शक्तीच्या जोरावर परत मिळविलेल्या राज्यांत सैतानी दडपशाहीला फिरून सुरवात झाली. धर्माच्या गादीवर आलेल्या या सैतानाच्या तावडींतून सुटावयासाठीं रोमन लोक तळमळूं लागले ! इटलींतील राष्ट्रैक्याच्या चळवळींत आपलें ऐहिक साम्राज्य नष्ट होणार हें पोप जाणून होता; म्हणून राष्ट्रोद्धाराचे

सर्व विचार गुंडाळून ठेवून स्वत:च्या राज्याचें रक्षण करावयाच्या खटपटीला रोमच्या दरबारानें सुरवात केली.

टस्कनीच्या ग्रँड डयूकनें राज्यक्रान्तीच्या धामधुमींत पोबारा केल्यानंतर क्रान्तिकारकांनीं फ्लॉरेन्स येथें ट्रिमुव्हरेट स्थापन केलें होतें; त्यांपैकीं दोघांनीं राजीनामे दिल्यामुळें ग्यूराएझीला सर्वसत्ताधारी नेमण्यांत आलें होतें. तो प्रामाणिक व राजकार्यकुशल होता, पण जनतेमध्यें दृढनिष्ठा उत्पन्न करावयाचें सामर्थ्य त्याचे अंगीं नव्हतें. लोकशाहीच्या संरक्षणासाठीं टस्कनीमधील वेगवेगळ्या पक्षांची एकजूट त्याला निर्माण करतां आली नाहीं. टस्कन लोकांचा प्रांतिक अभिमान नाहींसा करून राष्ट्रीय बंधविमोचनाकडे त्याला त्यांची दृष्टि वळवितां आली नाहीं. ग्रँड डयूकच्या राजनिष्ठ अनुयायांनीं फ्लॉरेन्स येथें बंड उभारलें तेव्हां स्वत:चे प्राण बचावण्यासाठीं त्यानें पळ काढला ( एप्रिल १८४८ ). लोकसत्तावाद्यांचें सामर्थ्य विस्कळित झालेलें पाहून ऑस्ट्रियन सैन्यानें टस्कनीवर हल्ला चढविला व ग्रँड डयूकच्या वतीनें संस्थान आपल्या ताब्यांत घेतलें. ( मे १८४८ ) जुलई महिन्यांत डयूक फ्लॉरेन्सला परत आला; लगेच पूर्वीची राज्यघटना रद्द करण्यांत आली व ग्यूराएझीला हद्दपार करण्यांत आलें; देशभक्तांच्या छळाला आरंभ झाला व प्रगतीचे सर्व मार्ग बंद करण्यांत आले !

व्हेनिशियन लोकशाहीची सारी मदार चार्लस अलबर्टच्या मदतीवर होती. कस्टोझा येथें त्याचा पराभव झाला तरीहि मानीनच्या नेतृत्वाखालीं व्हेनिसची लोकशाही जीव धरून राहिली होती. चार्लसनें ऑस्ट्रियाबरोबर पुन्हां युद्ध पुकारलें तेव्हां लोकांना अमर्याद आनंद झाला; पण पीडमाँटच्या सैन्याचा नोव्हॅर येथें पराभव झाला तेव्हां त्यांची मदतीची व यशाची सारी आशा समूळ नष्ट झाली. तरी ऑस्ट्रियाला शरण जावयाचें नाहीं असा जनतेचा निश्चय झाला होता. ता. २ एप्रिल रोजीं व्हेनिसच्या प्रतिनिधींची सभा भरली होती; शक्य तोंवर शत्रूला शरण जावयाचें नाहीं असा ठराव सभेमध्यें एकमतानें मंजूर करण्यांत आला ! जनरल रॅडेटस्कीच्या ऑस्ट्रियन सैन्यानें व्हेनिसकडे मोर्चा वळविला. व्हेनिसच्या लोकांनीं या जबरदस्त सैन्याला तोंड द्यावयाचें ठरविलें तेव्हां त्यांचा खजिना खलास होत आला होता. लोकशाहीचा अध्यक्ष व सर्व सत्ताधारी डॅनिएल मानीन यानें युद्धासाठीं पैशाची मागणी केली तेव्हां नागरिकांनीं आपलें सर्वस्व त्याच्या पायापाशीं आणून ओतलें ! ता. ४ मे रोजीं व्हेनिसच्या आघाडीवर असलेल्या मालघेरा किल्ल्यावर ऑस्ट्रियन सैन्यानें निकराचा हल्ला

केला; पण व्हेनीशियन सैन्यानें शौर्याची शर्थ करून त्या दिवशीं विजय संपादन केला ! किल्ल्याच्या रक्षणासाठीं नेमलेल्या तुकडींतील बहुतेक शिपाई ठार झाले व शत्रूंच्या तोफांनीं तटबंदी जमीनदोस्त होत आली तेव्हां उरलेल्या शिपायांना व्हेनिसकडे परतण्याचा हुकूम देण्यांत आला. (ता. २७ मे) शत्रूची मगरमिठी अधिक घट्ट होऊं लागली, शहरांतील अन्नसामुग्री व दारूगोळा खलास होत आला तरी शरण जावयाचें नाहीं हा लोकांचा निश्चय कायम होता ! शत्रूच्या तोफांतून दररोज सुमारें एक हजार गोळे शहरांतील इमारतींवर पडून कल्लोळ उडवीत असत ! युद्ध व दुष्काळ यांनीं जर्जर झालेल्या व्हेनिस शहरांत पटकीची व दोषिक तापाची सांथ उद्भवून लोक पटापट मरूं लागले तेव्हां मानीनचा नाइलाज झाला. मानीन शत्रूला हार जाण्याच्या विचारांत आहे हें लोकांना कळतांच ते चिडून गेले व त्याच्या घराजवळ जमा झाले. ! " त्यांना उद्देशून मानीननें भाषण केलें. लोकप्रियतेसाठीं लोकांच्या मर्जीप्रमाणें पगडी फिरविण्यास मी तयार नाहीं. माझ्यावर हजारों खंजीर उगरावलेले असले तरी मी सत्य बोलण्यास कधींहि कचरणार नाहीं. माझेवर विश्वास ठेवा व घरोघर परत फिरा. " मानीनचें नैतिक सामर्थ्य इतकें तेजस्वी होतें कीं, त्याचे शब्द ऐकतांच लोक घरोघर परत गेले ! ता. २२ आगष्ट रोजीं युद्ध तहकूब करण्यांत आलें; ता. २४ आगष्ट रोजीं मानीननें शहर ऑस्ट्रियनांच्या ताब्यांत द्यावयाच्या अटींवर सही केली. त्याच रात्रीं मानीन आपली बायको व मुलगी यांसह देशत्याग करता झाला ! मार्सेलिस येथें त्याची बायको पटकीनें मरण पावली व त्याची मुलगी दुःखामुळें जन्माची दुबळी झाली ! मानीन मरेपर्यंत पॅरिस येथें रहात असे. तेथें विद्यार्थ्यांना इटालियन भाषा शिकवून तो उदरनिर्वाह करीत असे. (मृत्यु १८५७) मानीननें ज्या अटींवर ऑस्ट्रियाशीं तह केला त्यापेक्षां अधिक सवलती मिळविणें अशक्य होतें. रॅडेटस्कीनें शहर कबजांत घेतलें तेव्हां नागरिकांजवळ अन्नाचें एक शीतहि उरलेलें नव्हतें !

लॅांबर्डी व व्हेनीशिया प्रांतांत ऑस्ट्रियन सत्ता प्रस्थापित होतांच जनरल रॅडेटस्कीला त्यांवर लष्करी सुभेदार नेमण्यांत आलें. पहिल्याच वर्षात त्यानें सुमारें चार हजार लोकांना कडक शिक्षा फर्माविल्या; कित्येकांना फांशीं देण्यांत आलें, कित्येकांना जीव जाईपर्यंत फटके देण्यांत आले, अनेकांची मालमत्ता जप्त करण्यांत आली. ब्रेसिया शहराच्या रहिवाशांनीं ऑस्ट्रियन सैन्याला कसून विरोध केला होता म्हणून जनरल हेनो यानें सबंध गांव जाळून टाकला व सर्व

मुलांमाणसांची कत्तल केली! या घोर प्रकारामुळें जगाच्या अंगावर शहारे उभे राहिले व परक्यांना देशाबाहेर हांकून द्यावयाचा इटालियनांचा निश्चय दृढतर मात्र झाला.

नेपल्सचा राजा फर्डिनँड हा आपल्या प्रजेला अशाच क्रूरतेनें वागवीत असे. इटलीमध्यें ऑस्ट्रियाचें वर्चस्व स्थापन होतांच त्यानें राज्यघटना व प्रतिनिधि-मंडळ रद्द केलें. उदारमतवाद्यांचा छळ करण्यांत मोठें पुण्य आहे अशी त्याची प्रामाणिक समजूत होती. स. १८४९ सालीं राजद्रोहाच्या बनावट आरोपावरून ८२ लोकांवर नेपल्सच्या पोलिसांनीं खटला भरला. सर्व आरोपी मोठया घराण्यांत जन्माला आलेले व उच्च शिक्षण घेतलेले होते. त्यांची मुक्तता व्हावी म्हणून घरोघर प्रार्थना करण्यांत आल्या व हजारों लोकांनीं नवस केले; पण परमेश्वरानें त्यांच्या विनवणीला मान दिला नाहीं. आरोपींचें बंदिवासाचें दु:ख तीव्रतर करण्यासाठीं त्यांचे हातपायांत जड जड साखळदंड अडकविण्यांत आले; कैद होण्यापूर्वी हे सर्व लोक सुसंस्कृत समाजांत वावरत होते; त्यांची ही संवय मोडण्याकरितां त्यांची बदमाष गुन्हेगारांबरोबर सांगड घालण्यांत आली होती!

प्रसिद्ध इंग्लिश मुत्सद्दी ग्लॅडस्टन यावेळीं नेपल्स येथें आला होता; बूर्बोन राजाची राज्य करण्याची पद्धति पाहून तो अगदीं खवळून गेला; तुरुंगाची व्यवस्था पाहावयासाठीं तो वेष पालटून गेला होता. लॉर्ड अबर्डीनला पाठविलेल्या पत्रांत त्यानें नेपल्सच्या कारभाराचें वर्णन केलें आहे. " नेपल्सच्या सरकारनें धर्माची धूळधाण, आणि संस्कृति व मानवजात यांची पद्धतशीर बेअब्रू मांडली आहे! सरकारला मधून मधून जुलमाची लहर येते असें मुळींच नाहीं; येथील दडपशाही राजरोस, अखंडित व पद्धतशीर असते! अधिकाऱ्यांकडून हरघडी कायद्याचा भंग होत असतो. बुद्धिमत्ता व शील यांचें ज्या व्यक्तींचे ठिकाणीं एकीकरण झालेलें असेल त्यांना तांतडीनें तुरुंगांत कोंबण्यांत येतें! या राजाचें यथार्थ वर्णन करावयाचें म्हणजे परमेश्वराविरुद्ध बंड उभारणाऱ्या सैतानाचें साम्राज्य असेंच करावें लागेल! एकटया नेपल्स संस्थानांतील तुरुंगांत सुमारें वीस हजार कैदी असावे असा माझा अंदाज आहे. न्यायाधिशानें शिक्षा द्यावयाचे अगोदर राजकीय आरोपींना बहुधा वर्ष दोन वर्षांची कच्ची कैद भोगावी लागते! खोटे आरोप, खोटे पुरावे, खोटया शपथा, खोटया सह्या वगैरे सर्व गुन्हे सरकारी अधिकारी दररोज करीत असतात! चार दमडयांसाठीं आपली माणुसकी विकणारे हलकट

लोक सरकारनें या कामासाठीं मुद्दाम नोकरींत ठेविले आहेत!" ग्लॅडस्टनचें हें पत्र स. १८५१ च्या जुलई महिन्यांत प्रसिद्ध झालें.

* * * * *

रोम शहर सोडण्यापूर्वीं मॅझिनीनें 'नॅशनल इटालियन कमिटी' स्थापन केली होती. संस्थेचा जाहीरनामा ता. ४ जुलै १८४९ रोजीं प्रसिद्ध झाला. उठावणीची पूर्वतयारी करावयासाठीं व शस्त्रास्त्रें सज्ज करावयासाठीं राष्ट्रीय कर्ज उभारण्याचा अधिकार रोमन लोकशाहीच्या वतीनें कमिटीस देण्यांत आला होता. कमिटीपुढें मॅझिनीनें राष्ट्रस्वातंत्र्याच्या तत्वांची मीमांसा केली:-"इटलीला राष्ट्रैक्य हवें आहे. राज्यकारभाराचें केंद्रीकरण एवढाच राष्ट्रैक्याचा अर्थ नव्हे; या केंद्रीकरणामुळें राज्याचा व राजधानीचा फायदा होतो, मात्र व्यक्तिस्वातंत्र्याचा नायनाट होतो. राष्ट्रैक्यामध्यें राजकीय ऐक्य असलें पाहिजे, त्याचप्रमाणें स्थानिक वैशिष्टयहि कायम राहिलें पाहिजे; स्थानिक संस्थांचा व परंपरेचा जिवंतपणा कायम राहिला पाहिजे. स्थानिक संस्थांच्या प्रतिनिधींच्या हातून राज्यकारभार चालविण्यांत आला पाहिजे; स्थानिक संस्थांच्या सल्ल्यानें राज्यघटना निर्माण करण्यांत आली पाहिजे व राष्ट्रामध्यें सहकार्य या तत्वाला शक्य तितका वाव मिळाला पाहिजे." दुसरा व्हिक्टर इम्यॅन्युएल पीडमॅांटच्या गादीवर आल्यानंतर लवकरच त्यानें इटालियन लोकांचें लक्ष वेधून घेतलें; म्हणून मॅझिनीच्या कमिटीला फारसा पाठिंबा मिळाला नाहीं; मात्र या नव्या संस्थेच्या जोरावर आपणांस एका वर्षाचे आंत उठावणी करतां येईल अशी मॅझिनीची कल्पना होती! हळू हळू एक एक पुढारी संस्था सोडून जाऊं लागला व १८५३ सालीं कमिटी नामशेष झाली. राष्ट्रासाठीं उभारण्यांत येणारें कर्ज भावी स्वतंत्र इटलीकडून फेडण्यांत येईल असें मॅझिनीनें आश्वासन दिलें होतें. "राजेरजवाड्यांचे जवळ दांडगें भांडवल असतें. तरी गोरगरिबांनाहि आपलें सामर्थ्य संघटित करून त्यांच्याशीं टक्कर देतां येते हें या राष्ट्रीय निधीवरूनच सिद्ध होणार आहे!" बऱ्याच इटालियनांनीं राष्ट्रीय कर्जाचे रोखे विकत घेतले; पण जमलेला पैसा उठावणीच्या पूर्वतयारींतच उडून गेला व प्रत्यक्ष क्रांतीसाठीं निधि शिल्लकच राहिला नाहीं!

रोम सोडल्यानंतर मॅझिनी मार्सेलिसला गेला. तेथून पोलिसांची नजर चुकवीत चुकवीत तो जिनीव्हाला गेला व नंतर स्वित्झर्लंडमध्येंच लॅासेन येथें त्यानें

ठाणें दिलें. लॉसेन येथें मॅझिनीच्या झोंपडींत कांहीं इटालियन हद्दपार रहात असत; त्यांच्या साह्यानें मॅझिनीनें फिरून कार्याला सुरवात केली. ' ला इटालिया डेल पोपोलो ' या नांवाचें एक मासिक सुरू करण्यांत आलें. राष्ट्रैक्य व राष्ट्रस्वातंत्र्य या महत्तत्वाचें समर्थन करणारे लेख त्यांत प्रसिद्ध होत; या लेखांमध्यें प्रत्यक्ष कृतीपेक्षां पूर्वतयारीवरच अधिक भर देण्यांत येत असे. स. १८४९ सालीं सप्टेंबर महिन्यांत मॅझिनीनें 'सेंट्रल युरपियन कमिटी ऑफ डिमॅाक्रसी' ही संस्था संघटित केली. वेगवेगळ्या राष्ट्रांमध्यें लोकशाहीचीं तत्वें प्रसृत करून त्यांमध्यें बंधुभाव स्थापन करणें आणि परस्परांच्या प्रगतीसाठीं सर्व राष्ट्रांना एकजुटीनें कार्य करण्याकडे प्रवृत्त करणें हें या कमिटीचें ध्येय होतें. "राष्ट्रें हे मानवजातीचे घटक होत. राष्ट्रीयत्व ही त्यांच्या वैशिष्ट्याची निशाणी आहे व त्यांच्या स्वातंत्र्याचें रक्षण करणारी महाशक्ति आहे! मानवजातीच्या प्रगतीसाठीं राष्ट्रांनीं परस्परांशीं सहकार्य केलें पाहिजे. " इटलीच्या क्रान्तिकारकांनीं उठावणी करतांच त्यांना साह्य व्हावें म्हणून ऑस्ट्रियांतील क्रान्तिकारकांनींहि उठावणी करावी अशी व्यवस्था करावयाचा कमिटीचा इरादा होता. कामाचा जोर मधूनमधून कमी होई तेव्हां मॅझिनीचें मन निराशेनें ग्रासून जाई. इटलीवर पाशवी शक्तीचा अंमल गाजत असलेला पाहून त्याचा अगदीं तडफडाट होत असे.

फ्रान्समध्यें स. १८५० च्या सुमारास क्रान्ति होणार अशा बातम्या मिळाल्यावरून मॅझिनी पॅरिसला गेला. तेथें गेल्यानंतर त्या बातम्यांमध्यें कांहीं तथ्य नव्हतें असें त्याला दिसून आलें. आपल्या धार्मिक विचारांचें टांचण त्यानें एका वहींत करून ठेवलें होतें ती टांचणवही या प्रवासांत हरवली. पॅरिसहून तो इंग्लंडला गेला व तेथून स्विट्झरलँडांत परत आला. हद्दपारांना आसरा देऊं नका अशी परराष्ट्रांनीं स्विस् सरकारामागें भुणभुण लावल्यामुळें पोलिसांनीं त्याला त्रास देण्यास आरंभ केला. या त्रासाला कंटाळून जाऊन त्यानें स्विट्झरलँडला रामराम ठोकला; पुन्हां इंग्लंडांत जाऊन तो लंडन येथें स्थायिक झाला.

इंग्लंडबद्दल मॅझिनीला फार कृतज्ञता वाटत असे. " जगांत जर कोठें मला घरासारखा मनमोकळेपणा वाटत असेल तर तो इंग्लंडांतच होय. " लंडनसारख्या कामाच्या सोयी दुसरीकडे प्राप्त होणें अशक्य असल्यामुळें त्याला हें मनुष्यांचें वारूळ सोडणें शक्य नव्हतें. "लंडनच्या धुक्यामुळें माझ्या मनांत गंभीर विचार येतात. माझा जन्म इंग्लंडांत जावा अशीच माझी मनोरचना होती. " तरी इटलीचे विचार वारंवार त्याचे मनांत येत. " इटलीच्या एकाद्या कोंप-

ऱ्यांत जाऊन एकटेंच बसावें, इटलीवर वाहणाऱ्या वाऱ्यानें आपली छाती भरून घ्यावी, इटलीला आच्छादित करणाऱ्या आभाळाकडे व वेष्टित करणाऱ्या सागराकडे डोळे भरून पहात बसावें अशी उत्कंठा वारंवार माझे मनांत जागृत होते." त्याला आतां जिव्हाळ्याचें असें कोणींच राहिलें नव्हतें. डॉ. मॅझिनी स. १८४८ च्या हिंवाळ्यांत मरण पावले. आपल्या मुलाच्या अंगीकृत कार्याशीं ते केव्हांहि एकजीव झाले नाहींत; तरी मुलाच्या कर्तृत्वाबद्दल वडिलांना फार अभिमान वाटत असे. स.१८५२ सालीं मॅझिनीची माता परलोकवासी झाली. "माझ्या अंगीकृत कार्याला यश आलेलें आहे व स्वतंत्र इटलीबद्दल विचार करतांना माझ्या मातेचें हृदय आनंदानें भरून आलें आहे—अशा प्रसंगीं मी तिच्या मुद्रेकडे पहात आहें—हें सुखस्वप्न मीं माझ्या अंत:चक्षूंसमोर कितीतरी वेळां रंगविलें होतें !" पण हें दिव्य सुख अनुभवावयाचें त्याच्या नशीबीं नव्हतें. "माझी माता इहलोकांत होती तेव्हां ती आपणांपासून किती तरी दूर अंतरावर आहे असें मला वाटत असे; आतां ती देवलोकीं गेलेली आहे तरी तिचा आत्मा माझ्या आसपासच कोठें तरी आहे असें मला वाटूं लागतें ! मानवी कर्तव्यांच्या पावित्र्यावर तिची निष्ठा होती; माझ्या अंगीकृत कार्यावर तिची श्रद्धा होती. मातेच्या मृत्यूमुळें या कर्तव्यांचें पावित्र्य अधिकच वृद्धिंगत झालें आहे असें मला वाटूं लागलें. आतां माझी मातृभूमि हीच माझी आई ! माझ्या आईनें शेवटपर्यंत मला सोडलें नाहीं याचप्रमाणें मीहि माझ्या मायदेशासाठींच यावज्जन्म कार्य करीत राहीन." मृतमातेच्या चिंतनांत कित्येक प्रसंगीं तो इतका एकाग्र होई कीं, तिची मूर्ति आपणापुढें उभी आहे असा त्याला भास होई ! "इटलीसाठीं कार्य करीत असतांना इटलीमध्येंच मृत्यु यावा एवढीच उत्कट इच्छा आतां मला राहिली आहे !"

मॅझिनी लंडनला आला तेव्हां साफी वगैरे इटालियन हद्दपार त्याच्याच घरांत रहात असत; कांहीं दिवसांनीं हे लोक दुसरीकडे रहावयास गेले. आतां त्याची सांपत्तिक स्थिति पूर्वीपेक्षां बरी होती—याला कारण त्याच्या आईचा दूरदर्शीपणा ! सार्वजनिक कार्यासाठीं व गरजवंतांना मदत करावयासाठीं जोसेफच्या हातून किती बेभानपणें खर्च होतो हें मरायाला ठाऊक होतें. जोसेफला दरसाल १६० पौंड द्यावे या अटीवर तिनें कांहीं रक्कम पंचांचे स्वाधीन करून ठेवली होती; ही सालिना मदत सुरू झाल्यापासून मॅझिनीला कर्ज काढावें लागलें नाहीं. मधून मधून वेगवेगळ्या नियतकालिकांना तो लेख लिहून देई.

पत्रकारहि त्याला आतां मोबदला देऊं लागले होते. या उत्पन्नाचा तिसरा हिस्सा तो अनाथ मुलांच्या शिक्षणाकडे खर्च करी! शक्य तितक्या कंजूषपणानें राहून शिलकेंत पडणारी सर्व रक्कम तो इटालियन कटवाल्यांकरितां खर्च करीत असे! मॅझिनीच्या जीवाला केव्हां अपाय होईल यांचा भरंवसा राहिला नव्हता–कारण त्याच्या जीवावर उठलेल्या शत्रूंनीं त्याचेवर मारेकरी सोडले होते! तरी तो फक्त एक गुप्ती हातांत ठेवून वेळीं अवेळीं लंडनमध्यें एकटाच निर्धास्तपणें भटकत असे! मॅझिनीच्या अब्रूवर उठलेल्या स्वार्थपरायण कारस्थान्यांनीं इटलींत कंड्या पिकवल्या होत्या कीं, लंडन येथें मॅझिनी ऐषआरामांत लोळत पडलेला आहे! मात्र वस्तुस्थिति अशी होती कीं, इटलीसाठींच त्यानें सर्व सुखांचा त्याग केला होता! "इटलीच्या स्वातंत्र्यासाठीं आत्मसमर्पण करावयास सज्ज असलेल्या देशवीरांकडून बंदुकांचीं मागणी येते त्यावेळीं मात्र मला माझ्या भिकारीपणाबद्दल वाईट वाटतें!"

लंडनला एक लहानशी खोली त्यानें भाड्यानें घेतली होती. खोलींत सामान अगदीं बेताचें असे. खुर्चीवर, टेबलावर, बिछान्यावर सगळीकडे पुस्तकांचे भारे व कागदपत्रांचीं भेंडोळीं पडलेलीं असत. सिगारेटस्च्या धुरानें खोली सदैव भरून गेलेली असे! त्यानें आपल्या खोलींत कांहीं कॅनरी पक्षी पाळले होते. त्यांना उडतां यावें म्हणून खोलीच्या खिडक्यांनाच त्यानें जाळ्या मारविल्या होत्या! ते पक्षी त्याच्या खांद्यावर बसत व कागदपत्रांच्या भिंडोळ्यावर बागडत असत! या खोलींत तो दिवसभर कामांत गढलेला असे. इटालियन वर्तमानपत्रासाठीं लेख लिहिणें, इटलीसाठीं फंड गोळा करणें, निराश्रित हद्दपारांना काम मिळवून देणें, इंग्रज मित्रांना वेळोवेळीं उपदेशाचीं व उत्साहाचीं पत्रें लिहिणें, इटलींतील कटवाल्यांना उत्तेजित व संघटित करण्यासाठीं पत्रव्यवहार करणें–या कार्यांत तो सारखा गढून गेलेला असे!

इंग्लिश समाजांत त्याला बरेच प्रेमळ मित्र मिळाले होते. ॲशर्स्ट, मिल्नर–गिब्सन, टेलर वगैरे कुटुंबांतील माणसांबरोबर त्याचा विशेष परिचय झाला होता. आपलें काम आटोपून रोज संध्याकाळीं कोणाच्या तरी घरीं शिळोप्याच्या गप्पा मारावयास जावयाचा त्याचा क्रम होता. इतिहासकार ग्रोट, तत्ववेत्ता मिल, कवि ब्राउनिंग पतिपत्नी, कवि स्विनबर्न वगैरे मंडळीबरोबर त्याचा पत्रव्यवहार चालू असे. या मित्रमंडळींच्या सहवासांत त्याचा काळ आनंदांत जात असे. त्याचा पोषाक नेहमींप्रमाणेंच काळाभोर असे. पूर्वीं गहाण टाक-

लेली आपल्या आईची आंगठी व वडिलांचें घड्याळ या दोन्ही वस्तु त्यानें सोडवून आणल्या होत्या व त्या तो नेहमीं वापरीत असे. त्याचे केस आतां अगदीं पिकून गेले होते तरी त्याच्या मुद्रेवरील कोमलता नष्ट झाली नव्हती. अनेक वर्षांच्या अपेष्टांनीं त्याच्या हंसत मुखावर गांभीर्य आलें होतें; त्याच्या नजरेंतून जणूं तेजाचा झोंतच वहात असे ! अमेरिकन तत्ववेत्ता इमर्सन याला लिहिलेल्या एका पत्रांत कार्लाइलनें म्हटलें आहे:–'रोमच्या क्रान्तीमुळें त्याचें जीवन पूर्णपणें विकसित झालें आहे.' आपल्या हातून देशासाठीं कांहीं तरीं कार्य झालें आहे अशी समाधानाची छटा त्याच्या मुखावर दिसूं लागली होती. त्याच्या इंग्रज मित्रांना त्याचेबद्दल फार सहानुभूति वाटत असे. त्यांना तो अगदीं घरच्या माणसासारखा वाटे. आपल्या मित्रांबरोबर मॅझिनी अत्यंत प्रेमळपणानें वागत असे; त्यांचे वाढदिवशीं तो त्यांना भेटी पाठवी; इटालियन नाटककार व गवई लंडनच्या मुक्कामाला आले कीं, ते मॅझिनीसाठीं बऱ्याच जागा राखून ठेवीत–हे प्रयोग पहावयाला तो आपल्या मित्रांना बरोबर घेऊन जात असे. मित्रांच्या मुलाबाळांबरोबर तो फार प्रेमळपणानें वागे–त्यांच्या बाहुल्यांच्या तब्बेतीची चौकशी करण्यास तो कधींहि विसरत नसे !

तो बोलूं लागला म्हणजे त्याच्या श्रोत्याचें चित्त अगदीं वेधून जात असे; त्याची विचारसरणी अगदीं सरळ व सोपी असे; त्याच्या भाषणांत कोणताहि डावपेंच नसे. संभाषणांत ओढून ताणून मोहकपणा आणावयाचा प्रयत्न तो केव्हांहि करीत नसे. त्याच्या प्रत्येक शब्दांत त्याची तत्वनिष्ठा ओतप्रोत भरलेली असे. उत्साहानें भरलेले, अनुभवानें पारखलेले व निष्ठेमुळें दैदीप्यमान असलेले विचार तो बोलून दाखवी तेव्हां त्याचे भोंवती जमलेले लोक जादूनें भारल्यासारखे होत असत. कित्येक वेळां श्रोत्यांच्या घोळक्यांत त्याला अगदीं चुकल्यासारखें वाटत असे; अशा वेळीं तो अगदीं स्तब्ध रहात असे; कधीं कधीं आपल्याला चुकल्यासारखें वाटत नाहीं हेंच सिद्ध करून दाखवावयासाठीं तो सारखा बोलत बसे ! ज्या तत्वाच्या सत्यतेसाठीं त्यानें अनेक अपेष्टा भोगल्या होत्या तीं तत्वें भावनांच्या झोंतामुळें कंपित झालेल्या स्वरानें तो बोलून दाखवी; तेव्हां त्याचीं वचनें ऐकण्यासाठीं जमलेल्या तरुणांची अंत:करणें तो सहज काबीज करून घेई. युरपची पुनर्घटना करावयाचें कार्य ज्यानें हातीं घेतलें आहे, नवयुगाच्या नवजीवनाचीं तत्वें प्रसृत करणें हें ज्याचें नियोजित कार्य आहे तो

महात्मा अगदीं निगर्वीपणानें एकाद्या व्यक्तींच्या क्षुद्र सुखदु:खांबद्दल इतकी सहानुभूति दाखवी कीं त्याचे मित्र यामुळें अगदीं गोंधळून जात. संपूर्ण राष्ट्रीय जीवनाला उदात्तता आणावयाचें सामर्थ्य ज्याचे अंगीं होतें त्याच्या सहवासानें व्यक्तींना आपलें जीवन उच्चतर करतां येणार नाहीं हें अशक्य तरी आहे काय ? त्याच्या शिकवणुकीचा व सहवासाचा परिणाम त्या वेळच्या देशोदेशींच्या अनेक तरुणांवर झाला यांत नवल तें काय ?

याच दिवसांत त्यानें " मानवी कर्तव्यें " हा निबंधसंग्रह पुरा केला. "इटलीला स्वातंत्र्य मिळावें आणि नंतर परमेश्वरानें मला आणखी दोनच वर्षें आयुष्य द्यावें—ह्या दोन वर्षांत मी ' धर्मतत्वें ' व ' इटलीचा राष्ट्रीय इतिहास ' हें दोन ग्रंथ लिहीन. " पण प्रत्यक्ष राजकारणाचा त्याग करणें अशक्य झाल्यामुळें हे ग्रंथ लिहावयास त्याला वेळच मिळाला नाहीं.

इंग्लंडच्या परराष्ट्रीय राजकारणाचा मॅझिनीनें मानवजातीच्या कल्याणाच्या दृष्टीनें विचार केला. " राजकारण कोरड्या शिष्टाईच्या पद्धतीनें चालवावयाचें, काय हवें तें झालें तरी लढाईवर गोष्ट येऊं द्यावयाची नाहीं, या तुमच्या राजकारणाबद्दल मला अत्यंत तिरस्कार वाटतो. युरपखंडांतील दोन तृतीयांश प्रजेवर आज जुलूम होत आहे—त्याकडे या मनोभावनेमुळेंच इंग्लंडचें दुर्लक्ष होत आहे...आज युरपखंडांत नवीं राष्ट्रें जन्मास येत आहेत; त्यांना साह्य करणें हें स्वार्थाच्या दृष्टीनेंहि इंग्लंडच्या फायद्याचेंच आहे. ही वेळ वायां दवडली तर आज इतर राष्ट्रांना इंग्लंडबद्दल वाटणारी सहानुभूति लवकरच नष्ट होईल. " क्रिमियाच्या लढाईत इंग्लंडनें ऑस्ट्रिया व तुर्कस्तान या प्रतिगामी राज्यांचा कड घेतला; या धोरणाचा मॅझिनीनें जोरानें निषेध केला. " पूर्वेकडील राष्ट्रांची पारतंत्र्यांतून मुक्तता करावयासाठीं हातीं शस्त्र घेण्याऐवजीं इंग्लंडनें जुलमी राजांना मदत करावयासाठीं आपलें शस्त्र उपसलें आहे ! इटली, हंगेरी व पोलंड या राष्ट्रांवर जुलूम करणाऱ्या सत्तेला मदत करणें हें अत्यंत निंद्य कर्म आहे. या युद्धांत सैनिकांनीं मर्दुमकीची शर्थ केली; पण अत्यंत हीन हेतूंनीं हातीं घेतलेल्या या लढाईंत आपणांस यश मिळावें अशी आशा करण्याला इंग्लंडला थोडी तरी जागा आहे काय ? "

इंग्लिश वर्तमानपत्रककर्त्यांच्या साह्यानें इटलीच्या आकांक्षांविषयीं इंग्लिश जनतेमध्यें सहानुभूति उत्पन्न करून इटलीला इंग्रज सरकारची मदत मिळवितां येईल अशी मॅझिनीला आशा वाटत होती. जेम्स स्टॅनफील, पीटर टेलर,

विल्यम ॲशर्स्ट, विल्यम शीन वगैरे मंडळींनीं स. १८५१ सालीं 'सोसायटी ऑफ दि फ्रेंडस ऑफ इटली ' ( इटलीचें मित्रमंडळ ) ही संस्था स्थापन केली. बरेच उदारमतवादी इंग्रज संस्थेच्या कमिटीचे सभासद होते. क्रान्तिकारक कार्यक्रमासाठीं मॅझिनीला इंग्लंडांत फारसा फंड जमवतां आला नाहीं; मॅझिनीच्या वैयक्तिक कार्यक्रमाला इंग्लंडांत फारशी सहानुभूति मिळाली नाहीं तरी इटलीच्या आकांक्षांना अनुकूल अशी मनोभूमिका या संस्थेनें इंग्लंडांत निर्माण केली एवढें मात्र निर्विवाद आहे. टाइम्स पत्रांत इटलीला अनुकूल असे लेख केव्हांहि आले नाहींत; पण डेली न्यूज, लीडर, मॉर्निंग ॲडव्हर्टायझर या पत्रांतील लेखांनीं मन:प्रवर्तनाच्या कार्याला बरीच मदत केली.

* * * * *

मॅझिनी लंडनला स्थायिक झाला होता तरी इटलीमध्यें कृतिपरायण पक्षाचें प्रचारकार्य चालू होतें. स्थानिक राज्यकर्त्यांच्या दडपशाहीमुळें क्रान्तिकारकांची सूड घ्यावयाची इच्छा प्रबलतर होत चालली होती. १८४८ च्या उठावणीच्या वेळीं ठिकठिकाणीं वेगवेगळीं माणसें आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर पुढें आलीं होतीं; प्रत्यक्ष बंडाचा मोड झाला होता तरी धाडसाच्या जोरावर त्यांनीं कमावलेलें पुढारीपण त्यांचेकडेच राहिलें होतें. ज्या त्या ठिकाणचे क्रान्तिकारक या पुढाऱ्यांच्या संमतीशिवाय कोणत्याहि उठावणीमध्यें भाग घ्यावयास कबूल नव्हते. प्रत्येक ठिकाणची परिस्थिति भिन्न असल्यामुळें या स्थानिक पुढाऱ्यांच्या मतांमध्यें एकवाक्यता नव्हती. नेपल्सचे क्रान्तिकारक लोकसत्तावादी नव्हते, त्यांना फक्त बूर्बोन घराण्याचा पाडाव करावयाचा होता. लॅंबर्डीमधील पुढाऱ्यांना आपला प्रांत पीडमॉंटच्या राज्यांत सामील व्हावा एवढेंच वाटत होतें. ऑस्ट्रियाच्या ताब्यांतील प्रदेशाच्या पुढाऱ्यांना वाटत होतें कीं, परकीयांची हकालपट्टी केल्यानें सर्व भानगडींचा शेवट होईल. यामुळें मॅझिनीच्या आज्ञेवरोबर देशभर बंडाची वावटळ उठावयाचा संभव आतां पूर्वीइतका राहिला नव्हता. १८४८ सालीं क्रान्तिकारकांचें सामर्थ्य विभागलें गेलें म्हणून त्यांना त्यावेळीं यश मिळालें नाहीं. इटलीमध्यें सार्वत्रिक उठावणी करावयासाठीं मॅझिनीनें स्थानिक पुढाऱ्यांबरोबर पत्रव्यवहार चालविला होता. स्थानिक पुढाऱ्यांच्या व संस्थांच्या प्रयत्नांमध्यें एकवाक्यता उत्पन्न करावयाचा प्रयत्न मॅझिनीनें नॅशनल इटालियन कमिटीच्या द्वारें चालविला होता.

आतांपर्यंत आलेल्या कडू अनुभवावरून मॅझिनीनें ठरविलें होतें कीं राष्ट्रीय उठावणीची पूर्ण तयारी होईपर्यंत प्रत्यक्षपणें बंडाळीला सुरवात करावयाची नाहीं. त्याचा हा निश्चय ठरला न ठरला तोंच मिलनचे कामकरी वर्गांतील कांहीं क्रान्तिकारक त्याची गांठ घ्यावयास आले. मिलनवर एकदम छापे घालून शहर कबजांत घ्यावयाचें असा त्यांचा बेत होता; त्यांच्या ह्या उठावणीला हजारों कटवाल्यांचें साह्य होतें व कटाच्या शाखा लँबर्डीमधील सर्व जिल्ह्यांमध्यें स्थापन झाल्या होत्या. मिलनच्या गव्हर्नरला कैद करावयाचें व किल्ला काबीज करावयाचा असा त्यांचा बेत होता. गव्हर्नरला कैद करावयाचें काम फँफुला या गॅरिबॅाल्डियनावर सोंपविण्यांत आलें होतें. किल्ल्यावर छापा घालतांच स्वयंसैनिकांनीं रस्तोरस्तीं पहारा करणाऱ्या पोलिसांना व शिपायांना ठार करावयाचें व नंतर किल्ल्यांतील १२००० बंदुका ताब्यांत घ्यावयाच्या असें ठरलें होतें. उठावणीसाठीं शहरांत पांच हजार स्वयंसैनिक जमले होते व जागोजाग बँाब गोळे तयार ठेवण्यांत आले होते. मिलनकरांनीं उठावणीची इतकी जय्यत तयारी करून ठेविली होती कीं, त्यांच्या बेताला संमति द्यावयाचा मॅझिनीला मोह पडला; तोंच ऑस्ट्रियनांनीं मँटुआ येथें फांशीं दिलेल्या देशभक्तांची बातमी थडकली. * हें घोर वृत्त ऐकतांच बेफाम झालेल्या क्रांतिकारकांनीं

---

* **मँटुआ येथील देशभक्तांचा वृत्तांत**:–मँटुआचा किल्ला काबीज करून बंडाचें निशाण उभारावें यासाठीं कट उभारण्यांत आला होता. Don Enrico Tazzoli हा लोकप्रिय पाद्री या कटाचा अध्वर्यु होता. कटामध्यें सुमारें तीन हजार लोक सामील झाले होते. स. १८५१ डिसेंबरमध्यें सरहद्दीवरील पोलिसांनीं पेझी नांवाच्या रेशमाच्या व्यापाऱ्यास खोटीं नाणीं तयार करण्याच्या आरोपावरून कैद केलें. त्याच्या सामानाची झडती घेतली. तेव्हां त्यामध्यें मॅझिनीच्या राष्ट्रीय कर्जाचा एक रोखा सांपडला. ह्या एका धाग्याच्या अनुरोधानें तपास काढीत काढीत पोलिसांनीं ता. २७ जानेवारी स. १८५२ रोजीं टॅझोलीला कैद केलें. तुरुंगांत त्याचा अनन्वित छळ करण्यांत आला तरी त्यानें कटाचा ठाव दिला नाहीं! अखेरीस कांहीं विश्वासघातकी कटवाल्यांनीं बरींच नांवें सांगितल्यावरून १४१ लोकांना कैद करण्यांत आलें. कैदखान्यांत त्यांचा अमानुष छळ करण्यांत आला. पेझोटी या आरोपीनें आपल्या तोंडांत गुप्त रहाणार नाहीं या संशयामुळें आत्महत्या केली! नोव्हेंबर

मॅझिनीच्या संमतीवर अवलंबून रहावयाचें नाहीं असें ठरविलें. त्यांचा हा निश्चय ठरतांच मॅझिनीनें त्यांना शक्य तितकी मदत करावयाचें ठरविलें. त्यानें कटवाल्यांना राष्ट्रीय कर्जाचे रोखे व २५००० लायर दिले. १८५२ च्या प्रारंभीं बंडवाल्यांना मिळावयासाठीं तो गुप्तपणें लोसार्न येथें गेला. ता. ६ फेब्रुआरी हा उठावणीचा दिवस ठरला होता. मिलनच्या उठावणीची बातमी येतांच शहरोशहरीं बंडें व्हावयाचीं होतीं. मॅझिनी मिलनला निघावयाच्या निरोपाची वाट पहात होता तोंच बातमी आली कीं बंडवाल्यांचा पाडाव झाल्यामुळें त्यांची

---

महिन्याच्या अखेरीपर्यंत सर्व कैद्यांचा छळ केल्यावर ता. ७ डिसेंबर रोजीं टॅझोलीसुद्धां पांच जणांना फांशी देण्यांत आलें. फांसावर चढतांना अँजोलो सारसेलिनी हा डॅाज फालिएरो याचें एक कवन गात होता !—"The scaffold is for us a triumph, if we mount it smiling; but the blood of the valiant shall not be lost." बर्नार्ड ड कनाल यानें फांसावर चढतांना इटलीचा जयजयकार केला. ता. ३ मार्च स. १८५३ रोजीं आणखी तीघांना फांशीं देण्यांत आलें. स्पेरी या लहानग्या आरोपीनें आपल्या आईला लिहिलेल्या पत्रांतील उतारा पुढें दिला आहे:—" माझ्या कटवाल्या बंधूंचीं नांवें मीं फोडलीं नाहींत यांत मी कांहीं विशेष केलें असें मला वाटत नाहीं; माझ्या मातृभूमीचा एक कर्तव्यनिष्ट नागरिक या नात्यानें मी कांहींतरी कार्य केलें म्हणून मात्र मला आनंद होत आहे. फांसावर चढवून त्यांना माझें शरीर फिकें पाडतां येईल पण बिचाऱ्या फांसामुळें माझ्या आत्म्यावर काय परिणाम होणार ? " हे देशभक्त फांसावर इतक्या आनंदानें व उत्साहानें चढले कीं हा देखावा पाहून एक ऑस्ट्रियन शिपाई उद्गारला: इटालियन लोकांना कसें मरावें हें आतां समजूं लागलें आहे ! या कटाच्या बाबतींत सरकारनें जुलमाचा कळस केला. स्पेरी व सारसेलिनी या फांशीवर गेलेल्या देशवीरांच्या मातांकडून त्यांनीं फांशीच्या दोरीची किंमत वसूल केली ! जिवंत कटवाल्यांवर त्यांनीं सूड घेतला इतकेंच नव्हे तर त्यांच्या प्रेतांचीहि त्यांनीं विटंबना केली ! ख्रिश्चन मृतांना पेटीमध्यें ठेऊन पुरण्यांत येतें; पण या कटवाल्यांना मेलेल्या कुत्र्यांप्रमाणें एका खाड्यांत फेंकून देण्यांत आलें. असल्या कटांना आपण दाद देणार नाहीं हें जगाला दाखवून देतांना ऑस्ट्रियानें इतकें रक्त सांडलें कीं त्यामुळेंच पुढें ऑस्ट्रियन साम्राज्याचा शेवट झाला !

पांगापांग झाली आहे ! उठावणीच्या अगोदरच सेनापति फँफुला यानें पळ काढला; फ्रँटी नांवाचा दुसरा एक अधिकारी दहा हजार फ्रँक घेऊन पळून गेला ! बंडवाल्या स्वयंसैनिकांची कार्यनिष्ठा इतकी जाज्वल्य होती कीं, उठावणीच्या दिवशीं त्यांनीं पगारवाढीसाठीं संप पुकारला ! छापे घालावयासाठीं शेंकडों लोक येणार होते पण वेळेवर दहावीसच हजर झाले ! एक तासाच्या आंतच सारी धामधूम खलास झाली ! थोडक्याच दिवसांनीं सोळा लोकांना संशयावरून फांशी देण्यांत आलें. ता. ९ फेब्रुवारी रोजीं ऑस्ट्रियन सेनापति रॅडेटस्की यानें मिलन शहरांत लष्करी कायदा पुकारला. मिलनच्या उठावणीची संघटना मॅझिनीनें केलेली नव्हती तरी अपयशाचें खापर मात्र त्याच्याच माथ्यावर फोडण्यांत आलें ! त्याचेबद्दल इटालियन जनतेमध्यें इतक्या गैरसमजुती पसरविण्यांत आल्या होत्या कीं, या सुमारास त्याचा खून करण्याचाहि प्रयत्न झाला ! मिलनचें अपयश मॅझिनीच्या जीवाला फार लागलें; मात्र या अपयशामुळें काय धडा घ्यावयाचा हें त्याला उमजलें नाहीं. " सर्व जाळें तुटून गेलें आहे; तें पुन्हां विणावयास आपण सुरवात केली पाहिजे ! कित्येक वेळां नेत्यांनीं अनुयायांना फसविलें, कित्येक वेळां अनुयायांनीं नेत्यांना फसविलें; कांहीं प्रसंगीं लोकांनीं चुकारपणा केला; बातमीदारांच्या चुकांमुळें, हुकूम नेणारांच्या चुकांमुळें कांहीं अपजय आले; कित्येक वेळां द्रव्यसाहाय्य कमी पडलें. " हे सर्व दोष सुधारून आणखी एक कट उभारावयाच्या खटपटीला मॅझिनीनें सुरवात केली. इटालियन क्रान्तिकारकांसाठीं ' कृतिपरायण पक्ष ' ( The Party of Action ) आणि ' प्रत्यक्ष कृति हेंच कर्तव्य ' ( The Duty of Action ) हीं दोन पत्रकें त्यानें प्रसिद्ध केलीं. हीं पत्रकें प्रसिद्ध झाल्यानंतर रोमन क्रान्तिकारक कमिटीनें त्याला कळविलें:-" आपलीं पत्रकें वाचून आमची खात्री झाली आहे कीं, पहिली ठिणगी पडतांच इटलीभर धडाका उडून जाईल ! आम्ही ठरविलें आहे कीं या धामधुमींत आपणच आघाडीस जावयाचें ! " पण मॅझिनीचा पक्ष कमजोर होऊं लागला होता. इटालियन नॅशनल कमिटीवरील साफीशिवाय सर्व सभासदांनीं राजीनामे दिले. आतां मॅझिनीनें क्रान्तिकारकांच्या नेतृत्वाचा राजीनामा द्यावा अशी भाषा ता. ६ फेब्रुवारीनंतर ऐकूं येऊं लागली ! व्यक्तिमाहात्म्यासाठीं मॅझिनी हजारों लोकांचे बळी देत आहे अशी भाषा ऐकूं येऊं लागली ! सरकारपक्षाच्या कोणाहि व्यक्तीचा खून झाला तरी त्याची जबाबदारी मॅझिनीवरच लादण्यांत येऊं लागली !

मॅझिनीच्या रोमन लोकशाही इतकीच डॅनिएल मानीनची व्हेनिसची लोकशाही विख्यात आहे. व्हेनिसच्या लोकशाहीचा ऑस्ट्रियानें शेवट लावल्यानंतर हद्दपार मानीन पॅरिसला स्थायिक झाला होता. क्रान्तिकारक लोकसत्तावाद्यांच्या कार्यक्रमाला इटलींत यश येणें फार दुर्घट आहे हें त्यानें जाणलें होतें. राजशाहीचे दिवस आले तेव्हां राजकारणाचा ओघ ओळखून त्यानें ' नॅशनल सोसायटी ' ही संस्था स्थापन केली. राष्ट्रैक्य व राष्ट्रस्वातंत्र्य हें या संस्थेचें ध्येय होतें व तिला राजसत्ता मान्य होती. व्हिक्टर इम्यॅन्युएलकडे राष्ट्राचें नेतृत्व दिल्याशिवाय इटालियन सैन्यामध्यें शिस्त व कार्यक्षमता उत्पन्न होणें अशक्य आहे व लष्करी शिस्त नसलेल्या पलटणींना ऑस्ट्रियावर विजय मिळवितां येणें अशक्य आहे हें त्यानें जाणलें होतें. राजानें राष्ट्रैक्य व राष्ट्रस्वातंत्र्य हें इटलीचें ध्येय म्हणून मान्य करावें व तें कार्य आपल्या शिरावर घ्यावें या अटीवर मानीनची नॅशनल सोसायटी राजसत्तेला मान्यता द्यावयाला तयार होती. आपल्या संस्थेमध्यें मॅझिनीलाहि सामील करून घेतां येईल अशी मानीनची कल्पना होती. मानीन स्वत: लोकसत्तेचा चाहता होता व त्याच्या उज्वल चारित्र्याबद्दल शंका घ्यावयास तिळमात्रहि जागा नव्हती. त्याची देशभक्ति शुद्ध व एकनिष्ठ होती. मॅझिनीप्रमाणेंच त्यालाहि काव्हूरच्या धिम्या व कारस्थानी राजकाणाची चीड येत असे. मॅझिनी आपणाबरोबर सहकार्य करील ही मानीनचीं अपेक्षा फोल ठरली. " इटलीमध्यें भविष्यकालांत लोकशाही असावी कीं राजशाही असावी, हें तुरींचें भांडण आजच कशाला उपस्थित करतां ? स्वातंत्र्यसाधनानंतर हा प्रश्न इटालियन जनतेच्या मतानुसार सोडविण्यांत यावा. " मॅझिनीचें धोरण लोकसत्ताक तत्वांना धरून होतें खरें पण त्यामुळें राष्ट्रीय राजकारणांत शिस्त उत्पन्न होणें अशक्य होतें;एकीकडे व्हिक्टर इम्यॅन्युएलनें राजकारणाच्या पटावर एक डाव टाकावा व दुसरीकडे स्वराज्यांतच लोकसत्तावाद्यांनीं त्याच्या डावांत मोडता घालावा असे प्रसंग उद्भवण्याचा त्यामुळें संभव होता.

मानीननें लंडन टाइम्स पत्रांत १८५६ सालीं एक लेख प्रसिद्ध केला ( ता. २५ मे ). इटालियन लोकांनीं खंजीराच्या तत्वज्ञानाचा त्याग करावा असें त्यानें या लेखांत प्रतिपादन केलें होतें. ' इटलीचा महाशत्रु ' जो मॅझिनी तो आज राजकीय खुनांना उत्तेजन देत आहे. मॅझिनीच्या या खंजीराच्या तत्वज्ञानामुळें परराष्ट्रांतील इटलीच्या हितचिंतकांना इटलीबद्दल वाटणारी सहानुभूति नष्ट होत आहे. खंजीरासारखीं हत्यारें इटलीचे शत्रु वापरीत आहेत

म्हणून त्यांची जगभर नाचक्की झाली आहे; देशभक्तांनीं आपले हात खून करून विटाळून घेतां कामा नये; म्हणून या खंजीराच्या तत्वाचा इटलीनें त्याग केला पाहिजे ! " मॅझिनीनें मानीनच्या या लेखाला जाहीर उत्तर दिलें. मानीनला उत्तरा दाखल लिहिलेलीं मॅझिनीचीं ता. ८ जून, ३० जून व ८ जुलै, स. १८५६ रोजीं लिहिलेलीं तीन पत्रें L'Italia del Popolo या पत्रांत प्रसिद्ध झालीं. लंडन टाइम्ससारख्या प्रतिगामी धोरणाच्या पत्रांत मानीननें हा लेख प्रसिद्ध केला म्हणून मॅझिनी अगदीं खवळून गेला, " निदान इटलीच्या इभ्रतीखातर तरी मानीन यानें आपला लेख टाइम्स पत्रांत प्रसिद्ध करावयास नको होता. " मानीननें प्रतिपादिलें होतें कीं, राजकीय खून जरूर करावे असें मॅझिनीचें मत आहे. " खून करणें हें पुण्य कर्म आहे असें कोणत्याहि कटवाल्याला वाटत नाहीं...इटलीमध्यें राजकीय खून होतात यावरून देशभक्तांना रक्ताची तहान लागली आहे असा निर्णय निघत नाहीं; पण राज्यकर्त्यांनीं इटलीमध्यें अशी परिस्थिति निर्माण केलेली आहे कीं, तिजमध्यें खून होणें अपरिहार्य आहे...ज्यावेळीं देशभक्ति हा गुन्हा आहे अशी राज्यकर्त्यांची समजूत झालेली असते, ज्यावेळीं देशभक्तीच्या अपराधासाटीं देशभक्तांच्या जीविताचा होम करण्यांत येतो व त्यांच्या मालमत्तेची राखरांगोळी उडविण्यांत येते, ज्या वेळीं स्वतंत्र विचाराच्या व्यक्तींवर अखंडित व राक्षसी जुलूम करण्यांत येतो, ज्यावेळीं परकी अंमलाच्या उद्दामपणाचा कळस होतो, ज्यावेळीं बेशरम हेरांच्या सुळसुळाटानें लोक चिडून गेलेले असतात, सर्व जनतेला ज्या सत्तेबद्दल तिरस्कार वाटत आहे अशा सत्तेच्या हातून होणाऱ्या अत्याचारांना ज्यावेळीं न्याय देवतेकडून योग्य तें शासन मिळत नाहीं, त्याचवेळीं खंजीराचें तत्वज्ञान उपस्थित होत असतें ! जेथें लोकांना शिक्षण देण्यांत येत नाहीं, जेथें जुलमाविरुद्ध न्याय मिळावयाची शक्यता नसते, जेथें प्रजेचें जीवित क्षुद्र मानण्यांत येतें, जेथें उद्यांची कांहींच शाश्वती नसते, जेथें सत्ताधाऱ्यांच्या लहरीवरच सर्व कारभार अवलंबून असतो तेथें हें खंजीराचें तत्वज्ञान उदय पावतें. " भोंवतालची परिस्थिति अशी असल्यावर चार दोन खून झाले तर त्यामुळें इटलीबद्दल इतरांना वाटणारी सहानुभूति कां नष्ट व्हावी याचा मॅझिनीला उलगडा होईना. " जुलमाला दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें आळा घालणें अशक्य असतें त्यावेळीं जुलमी लोकांचा खून करणें हा एकच उपाय लोकांच्या हातांत असतो... ज्यावेळीं जुलमापासून मुक्त व्हावयास इतर मार्ग मोकळे असतात त्यावेळीं राज-

कीय खून करणें हा गुन्हा आहे... सूड घेण्याच्या किंवा शिक्षा करावयाच्या बुद्धीनें खून करणें हा गुन्हा आहे... शासनपद्धतीच सदोष असते तेव्हां एकाद्या अधिकाऱ्याचा खून करणें हा गुन्हा आहे, मूढपणा आहे, कारण त्या व्यक्तीच्या प्रेताबरोबर शासनपद्धतींतील दोष जळून जात नाहीं." प्रजेला गांजणाऱ्या राजाचा खून करणें हें पाप नाहीं, "म्हणूनच स्वतःच्या देशासाठीं ज्यूडिथ या वीरकन्येनें ज्या खंजीरानें होलोफर्नेस याचा खून केला तो खंजीर पवित्र आहे... म्हणूनच ज्यूलियस सीझरच्या छातींत खुपसला गेलेला ब्रूटसचा खंजीर धन्य आहे; म्हणूनच विल्यम टेल या स्विस् देशभक्तानें ऑस्ट्रियन सुभेदारावर सोडलेला बाण पवित्र आहे ! जेथें न्याय नाहींसा झालेला असतो; जेव्हां एकाद्या जुलमी व्यक्तीच्या भीतीनें व अत्याचारानें राष्ट्राच्या विवेकबुद्धीचा नायनाट होतो; लोकांना स्वातंत्र्यांत रहावयासाठींच परमेश्वरानें उत्पन्न केलेलें असतें, तें स्वातंत्र्य हिरावून घेऊन कोणी मनुष्य परमेश्वराच्या इच्छेचा भंग करतो; त्यावेळीं उदात्त राष्ट्रधर्मानें प्रेरित झालेला, रागद्वेषासारख्या हीन विकारांपासून ज्याचें अंतःकरण अलिप्त आहे, आपल्या अंतर्यामीं निवास करीत असलेल्या अनंत सत्याशीं जो एकनिष्ठ आहे, असा एकादा वीरपुरुष त्या जुलमी सुलतानापुढें उभा ठाकून त्याला म्हणेल:–'तूं माझ्या लक्षावधि बंधूंचा छळ मांडला आहेस; परमेश्वरानें त्यांना जी देणगी दिली होती ती तूं त्यांचेपासून हिसकावून घेतलीस; तूं त्यांचीं शरीरें नष्ट करीत आहेस व आत्मे मलिन करीत आहेस; तुझ्यामुळें माझी मातृभूमी झिजत पडली आहे; गुलामगिरी, अत्याचार व अपमान यांचा तूं मूर्तिमंत अवतार आहेस ! तुझ्यासह त्यांनाहि मी धुळीस मिळवितों.' लक्षावधि लोकांवर राज्य करणाऱ्या प्रबळ राजाला एकादा एकाकी मनुष्य कां शासन करूं शकतो ? कारण त्याचे अंगीं परमेश्वराचें तेज प्रादुर्भूत झालेलें असतें." खून हा गुन्हा केव्हां गणण्यांत यावा हा मुद्दा मॅझिनीनें आणखी स्पष्ट करून दाखविला आहे. "राष्ट्रांच्या इतिहासांत कित्येक वेळां असे प्रसंग येतात कीं, त्यावेळीं राष्ट्रकार्य अंगावर घेणाऱ्या राष्ट्रवीरांना त्यांच्या कार्याची स्फूर्ति प्रत्यक्ष परमेश्वरापासून प्राप्त झालेली असते; अशा वेळीं त्यांचे हातून घडून येणाऱ्या कृत्यांच्या योग्यायोग्यतेचा निर्णय करावयास रोजच्या व्यवहारांतले नियम उपयोगी पडत नाहींत."

मॅझिनीनें राज्यक्रान्तीचें कार्य हातीं घेतलें होतें; क्रान्ति यशस्वी व्हावयासाठीं संपूर्ण जनतेनें उठावणी करावी लागते; अशावेळीं कांहीं राजकीय खून हे

व्हावयाचेच, असें त्याचें म्हणणें होतें; पण या पुराव्यावर खुनाला प्रत्यक्ष उत्तेजन दिल्याचा आरोप मॅझिनीच्या शिरावर लादतां येत नाहीं. राष्ट्राशीं फितूर व संस्थेशीं हराम होणाऱ्या व्यक्तींचा खून करावयाचा असा कारबोनरी मंडळींचा सांप्रदाय होता; पण ही परंपरा मॅझिनीनें यंग इटलीमध्यें मुळींच चालू दिली नाहीं. सर जेम्स ग्रॅहॅम साहेबांनीं मॅझिनीवर खुनाचा आरोप केला होता, म्हणून त्यांना पुढें त्याची जाहीर माफी मागावी लागली होती. रोमचे लोक राजकीय खून करण्याच्या बाबतींत अट्टल होते; तरी रोमन लोकशाहीचा सर्व सत्ताधारी असतांना मॅझिनीनें या प्रकारचे गुन्हे होणार नाहींत अशी खबरदारी घेतली होती व या प्रयत्नांत त्याला यशहि आलें होतें. व्हिक्टर इमॅन्युएलचा खून करावयाचा मॅझिनी कट करीत आहे असा काव्हूरनें त्याजवर आरोप केला होता. त्याला मॅझिनीनें दिलेलें उत्तर मोठें अन्वर्थक आहे. " पीडमाँट संस्थानांत जबाबदार राज्यपद्धति असल्यामुळें राजाच्या जिवाला कोणत्याहि प्रकारचा धोका येणें शक्य नाहीं, शिवाय राजाचा खून करून कोणाचाहि कोणत्याहि प्रकारचा फायदा होणें शक्य नाहीं. " ऑर्सीनीनें लुई नेपोलियनचा खून करण्याचा यत्न केला; मॅझिनीला याची आगाऊ वार्ताहि नव्हती, तरी या खुनाचा कट केल्याचा आरोप मॅझिनीवर लादण्यांत आला होता. स. १८६४ सालीं व्हेनीशियाच्या ऑस्ट्रियन व्हाइसरॉयाला दारूच्या धडाक्यांत उडवून द्यावयाचा कट झाला होता; तो मॅझिनीनेंच मोडून काढला. मॅझिनीच्या म्हातारपणीं व्हिक्टर इमॅन्युएल व पोप यांचा खून करावयाचा कट चालला होता; तो मोडून काढावयास मॅझिनीनें फार मेहनत घेतली. एका राजकीय खुनाला अप्रत्यक्षपणें उत्तेजन दिल्याचा आरोप मात्र मॅझिनीवर थोडाबहुत सिद्ध होतो. सॅव्हॉयवर स्वारी करावयाचा कट चालला होता त्यावेळीं अँटोनिओ गॅलेंगा ऊर्फ लुईजी मॅरिओटी या नांवाचा एक कॉर्सिकन तरुण मॅझिनीला भेटावयाला आला होता. जिनोआ येथील देशभक्तांना फांशी दिल्याबद्दल सूड म्हणून चार्लस अलबर्टचा खून करावयाचा आपला इरादा त्यानें मॅझिनीपुढें उघडा केला. या खुनापासून त्याला परावृत्त करावयाचा मॅझिनीनें पुष्कळ यत्न केला; पण तो ऐकत नाहींसें पाहून मॅझिनीनें त्याची ट्यूरिनपर्यंतच्या प्रवासाची सोय करून दिली व त्याला एक खंजीर नजर केला. " राज्यकर्ते जुलूम करतात खरे पण त्यांचा जीव एका मनुष्याच्या हातांत असतो—हें त्या जुलमी राज्यकर्त्यांना या मनुष्याच्या कृतीनें दाखवून द्यावयाचा देवाचाच इरादा असेल—" असें

त्यावेळीं मॅझिनीनें स्वतःचें समाधान करून घेतलें होतें. पुढें गॅलेंगाचा धीर खचला व त्यानें खुनाचा बेत सोडून दिला. देशामध्यें बंड होतें तेव्हां बंडखोरांनीं खंजीराचा उपयोग करणें न्याय आहे म्हणून त्यांनीं खंजिराचा उपयोग जरूर करावा असें मॅझिनीचें म्हणणें आहे असा त्याचेवर मानीनचा आरोप होता; मॅझिनीचें एवढेंच म्हणणें होतें कीं, असें होणें अपरिहार्य आहे असा इतिहासाचा निर्णय आहे. " लढाई सुरू असतांना एकाद्या सैनिकानें गोळी झाडून शत्रूच्या शिपायाचा जीव घेतला तर तो खून नव्हे असें म्हणावयाचें; मात्र एखाद्या क्रान्तिकारकानें उठावणीचे वेळीं एखाद्या ऑस्ट्रियनाचा खंजीर खुपसून वध केला तर त्याला मात्र खून म्हणावयाचें-हा शुद्ध ढोंगीपणा आहे; " असें मॅझिनीचें मत होतें. तत्वज्ञानाच्या दृष्टीनें मानीनचें म्हणणें रास्त होतें; पण विश्वासघात, सूड व खून वगैरे गुन्हे ज्यांच्या रक्तांत खेळत होते अशा सभ्य पोषाकाच्या पण हलक्या अंतःकरणाच्या लोकांनीं मानीनच्या टीकेचा युरपभर गवगवा केला. मानीनचा लेख आटोपशीर—दोन पानांचा होता; मॅझिनीचें उत्तर लांबलचक ३६ पानांचें होतें; मानीनचा लेख युरोपांतील बहुतेक पत्रकारांनीं छापून काढला; मॅझिनीच्या लेखांचे वाचक थोडे होते; म्हणून वाचकांच्या संख्येच्या दृष्टीनें या प्रकरणांत मॅझिनीची जास्त नाचक्की झाली. पण सत्य हें केवळ संख्याबलावरच अवलंबून नसतें !

मॅझिनीच्या अनुयायांची संख्या कमी होऊं लागली होती तरी इटलीच्या भाग्योदयाला अधिक विलंब लागू नये असा परमेश्वराचा संकेत असल्यामुळें काव्हूरच्या नेतृत्वाखालीं पीडमाँट संस्थाननें राष्ट्रोद्धाराचें कार्य अंगावर घेतलें. त्या वृत्तांताकडे आतां आपणांस वळलें पाहिजे.

# मॅझिनी व काव्हूर.

( १८५०-१८५७ )

Who blew the breath of life into her frame ?
Gavour, Mazzini, Garibaldi : three,
Her Brain, her Soul, her Sword, & set her free
From ruinous discord, with one lustrous aim.

*Meredith: "Centenary of Garibaldi."*

राज्यक्रान्तीनंतर इटलींतील परिस्थिति—काव्हूरचें चरित्र—सिकार्डी कायदा—क्रीमियाचें युद्ध—पॅरिस परिषद—मॅझिनी व काव्हूर—पीडमॉंट पक्ष—दक्षिण इटलींतील उठावणी—पिसाकोनें याचा वृत्तांत.

स. १८४८ सालीं राज्यक्रान्तीला आरंभ झाला तेव्हां इटली लवकरच स्वतंत्र होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं; पण एका वर्षाचे आंतच या साऱ्या आशांचा चुराडा उडाला ! ऑस्ट्रियानें सैन्याच्या जोरावर १८४९ सालीं इटलीमध्यें पुन्हां १८१५ सालची परिस्थिति निर्माण केली. पण १८१५ सालीं इटालियन लोक गुलामगिरींत रहावयास कबूल होते व इटलीला राष्ट्रीय जीवनच नव्हतें. १८२१, १८३१, १८३४ व १८४८ सालीं झालेल्या उठावण्यांमुळें इटलीचें राष्ट्रीय चैतन्य जागृत झालें होतें; राष्ट्रैक्य व राष्ट्रस्वातंत्र्य प्रस्थापित करावयाची जनतेला इच्छा व आशा वाटूं लागली होती. ऑस्ट्रियाच्या प्रेरणेनें व सामर्थ्यानें इटलींतील दडपशाही चाललेली आहे म्हणून परकीयांची हकालपट्टी करणें हें आपलें राष्ट्रीय आद्यकर्तव्य आहे असें इटालियन लोकांना वाटूं लागलें होतें. स. १८४९

च्या इटलीनें मॅझिनीचीं दिव्य वचनें श्रवण केलीं होतीं, त्याच्या ध्येयांचें ध्यान केलें होतें व राष्ट्रासाठीं जागोजाग रक्ताचा अभिषेक केला होता. देशभक्तांनीं इटलीसाठीं मरण स्वीकारलें होतें म्हणूनच इटलीला जीवन प्राप्त होणें शक्य झालें होतें; आणि ह्या राष्ट्रजागृतीचें सर्व श्रेय मॅझिनीचें आहे हें सर्व इतिहासकारांनीं मान्य केलें आहे.

स. १८४८ च्या राजक्रान्तीनंतर युरपखंडांतील सर्वच देशांच्या परिस्थितींत पालट झाला होता. वेगवेगळया जातींच्या व देशींच्या लोकांवरचा आपला अंमल कायम ठेवावयाचा असल्यास लष्करी सामर्थ्याची अतोनात वाढ केली पाहिजे हें ऑस्ट्रियानें जाणलें होतें. ऑस्ट्रियाच्या उत्तर सरहद्दीवर प्रशिया आपलें सैन्य वाढवीत होता. जर्मन संस्थानांमध्यें ऑस्ट्रियाचें वर्चस्व होतें; तें स्थान स्वतःच्या हस्तगत करून घ्यावयाची प्रशियाची महत्वाकांक्षा होती. दोन्ही राज्यें पक्क्या दिलाचीं असल्यामुळें त्यांमध्यें आज ना उद्यां यादवी माजणार हें उघड होतें. फ्रान्समध्यें लोकशाहीच्या जागीं लुई नेपोलियन बादशाही स्थापन करावयाच्या प्रयत्नांत होता. इंग्लंडच्या प्रधानमंडळांतील एकच मुत्सद्दी–लॉर्ड पामर्स्टन इटलीच्या ऐक्याकडे व स्वातंत्र्याकडे सहानुभूतीच्या दृष्टीनें पहात होता; त्यानें याच सुमारास राजीनामा दिला होता. रोमच्या पोपला पुन्हां गादीवर आणून बसविल्याचें श्रेय फ्रान्सनें मिळविलें होतें; म्हणून इटलीच्या हितशत्रूंमध्यें आणखी एका प्रबल शत्रूची भर पडली होती, एकंदरींत युरप खंडांतील आंतरराष्ट्रीय परिस्थिति इटलीच्या क्रान्तिकारकांना सर्वस्वी प्रतिकूल होती. या प्रतिकूल परिस्थितीवर विजय मिळवावयाचें कार्य व्हिक्टर इमॅन्युएलच्या वांटयाला आलें होतें !

चार्लस अलबर्टनें संन्यास घेऊन राज्यसूत्रें व्हिक्टर इमॅन्युएलच्या हातीं दिलीं त्यावेळीं पीडमॉंट संस्थानची अवस्था अत्यंत हलाखीची झाली होती. लढाईमुळें खजिना खलास झाला होता, युद्धामध्यें अपयश आल्यामुळें सैन्याची अब्रू धुळीला मिळाली होती आणि संस्थानांतील महत्वाचे किल्ले ऑस्ट्रियन सैन्याच्या ताब्यांत होते. ऑस्ट्रियाबरोबर पीडमॉंटनें केलेल्या तहाच्या अटी लोकांना समजल्या त्यावेळीं प्रजा अगदीं खवळून गेली व जिनोआ येथील लोकांनीं तर बंड केलें ! ( ता. २९ मार्च १८४९ ). पण तहाच्या याच अटी मिळवावयासाठीं राजाला निकराचा प्रयत्न करावा लागला होता. युद्धांत पराजय व्हावयाचे अगोदर चार्लस अलबर्टनें आपल्या प्रजेला जबाबदार राज्यपद्ध-

तीची सनद दिली होती. ती सनद व्हिक्टर इमॅन्युएलनें रद्द केल्यास त्याला तहनाम्यामध्यें विशेष सवलती मिळतील असें ऑस्ट्रियाकडून आमिष दाखविण्यांत आलें होतें. पण राजानें या सवलतीचा धि:कार करून ऑस्ट्रियाकडे बाणेदारपणाचें उत्तर पाठविलें कीं, 'माझ्या पित्याच्या प्रतिज्ञेचा मी भंग करणार नाहीं. तुम्हांआम्हांपैकीं कोणा तरी एकाचा पुरा नि:पात होईपर्यंत हें युद्ध चालविण्याचा तुमचा निर्धार असेल तर त्यालाहि आमची तयारी आहे. आमच्या घराण्याला अपयशांचा, त्याचप्रमाणें राजसंन्यासाचाहि परिचय आहे; पण कुलाच्या अब्रूला शरम आणणारें कृत्य आमचे घराण्यांत आजपर्यंत झालेलें नाहीं.'. या बाणेदारपणामुळें त्याला त्या विशेष सवलती मिळाल्या नाहींत. यामुळेंच त्याचेवर जनतेचा रोष झाला. ऑस्ट्रियाबरोबर पीडमाँटनें केलेल्या तहाच्या अटींना लोकप्रतिनिधींनीं मान्यता द्यावयाचें नाकारलें. या विरोधामुळें राजा डगमगून गेला नाही. तहनामा मंजूर होईपर्यंत प्रतिनिधिमंडळें बरखास्त करण्यांत येतील असें जाहीर करून त्यानें आपला शब्द दोनदां अमलांत आणला. नवा राजा आपल्या बापासारखा चंचल वृत्तीचा नाहीं हें दिसून येतांच तिसऱ्या वेळीं प्रतिनिधिमंडळानें तहनामा मंजूर केला ( १८५० ).

'सार्डीनियाच्या राजमुकुटावर काळोखी चढलेली आहे, रणांगणांत विजय मिळविल्याशिवाय तो मुगुट पुन्हां देदीप्यमान होणार नाहीं' हें व्हिक्टर जाणून होता. ऑस्ट्रियाबरोबर दोन हात करावयाची त्याला खुमखुमी होती. संस्थानचें सामर्थ्य वाढवावयासाठीं हवे ते परिश्रम करावयाची त्याची तयारी होती. स. १८५० सालीं न्यायखात्याचा प्रधान, काऊंट सिकार्डी यानें न्यायाच्या बाबतींत धर्मोपदेशकांना असलेले विशिष्ट हक्क काढून घ्यावयाचा मसुदा प्रतिनिधिमंडळापुढें आणला. ( अपराधी धर्मगुरूंची चौकशी करण्यासाठीं वेगळीं न्यायपीठें असत व तेथें त्यांना विशेष सवलतीचा न्याय मिळे; त्याचप्रमाणें देवालयांत असेपर्यंत धर्मोपदेशकांवर कायद्यांचा अंमल चालत नसे.) ह्या मसुद्याला धर्मोपदेशकांनी व त्यांच्या अनुयायांनीं कसून विरोध केला. प्रतिनिधिमंडळांत बिलावर सात दिवस वादविवाद चालला होता; चर्चेमध्यें काव्हूरनें सरकारपक्षाचें उत्कृष्ट रीतीनें समर्थन केलें. शेवटीं ता. ८ एप्रिल स. १८५० रोजीं हें बिल मंजूर झालें. सर्व प्रजाजनांना न्यायासनासमोर एकाच दर्जानें वागविण्यांत येईल, असें राज्यघटनेच्या मसुद्यांत एक कलम होतें–तें सिकार्डी बिलामुळें सार्थ झालें. याच सुमारास संस्थानच्या शेतकी खात्याचा प्रधान काऊंट सँटा रोझा हा मरण

पावला. त्यानें सिकार्डी बिलाला अनुकूल मत दिलें होतें; म्हणून धर्मोपदेशकांनीं त्याचे अंत्यविधीचे संस्कार करावयाचें नाकारलें. या बंडखोर धर्मगुरूंना हद्दपार करून प्रधानमंडळानें राज्यघटनेची अब्रू राखली. व्हिक्टर इमॅन्युएलचा मुख्य प्रधान ॲझिलियो यानें प्रधानमंडळांतील रिकाम्या झालेल्या जागेवर काव्हूरची नेमणूक केली; हें काम काव्हूरनें इतक्या उत्कृष्ट रीतीनें केलें कीं लवकरच त्याला फडणविशीचेंहि काम देण्यांत आलें.

कॅमिलो काव्हूर याचा जन्म ट्यूरिनच्या काव्हूर या सरदार घराण्यांत स.१८१० सालीं झाला. सोळाव्या वर्षी एका परीक्षेंत वर नंबर आल्यामुळें त्याला इंजिनीयरची जागा मिळाली. १८३० सालीं कांहीं जहाल मतें बोलून दाखविल्याबद्दल शिक्षा म्हणून एका डोंगरी किल्ल्यांत त्याची बदली करण्यांत आली. मॅझिनी सॅव्होनाच्या किल्यांत कैदेंत होता तेव्हां काव्हूर वार्डच्या किल्यांतील एकांतवासांत दिवस काढीत होता; ह्या दोनहि शिक्षांचे परिणाम राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें विपरीत झाले; या दोन किल्यांमधील एकांतवासांत या दोघा महापुरुषांनीं इटलीच्या भाग्योदयाचा आपापला मार्ग आंखला! स. १८३२ सालीं काव्हूरनें नोकरी सोडून दिली व आपल्या इनामावर जाऊन शेतकीला सुरवात केली. त्याच्या देखरेखीखालीं जहागिरीची अतिशय भरभराट झाली. फावल्या वेळांत त्यानें इंग्लंड व फ्रान्स येथें प्रवास केला. स.१८४७ सालीं चार्लस अलबर्टनें मुद्रणस्वातंत्र्य मंजूर केलें, तेव्हां काव्हूरनें ट्यूरिन येथें Risorgimento (नवजीवन) हें पत्र सुरू केलें. राज्यक्रान्तीला आरम्भ झाला तेव्हां काव्हूरनें धीटपणानें जाहीर केलें:–'निर्वाणीचा समय प्राप्त झाला आहे; यावेळीं राजानें दृढनिश्चय करून क्रान्तीचें नेतृत्व स्वीकारलेंच पाहिजे. राजाच्या निश्चयावर जनतेची भवितव्यता अवलंबून आहे. या क्षणीं लढाई जाहीर करण्यांत आली पाहिजे.' (ता. २३ मार्च १८४८).

काव्हूरकडे फडणवीशी व शेतकी या दोन खात्यांचें प्रधानपद आलें त्यावेळीं प्रतिनिधिमंडळांत अनेक पक्ष होते. अशा स्थितींत महत्वाच्या सुधारणा करणें अशक्य आहे असें दिसून येतांच त्यानें जहाल पक्षाचा पुढारी रॅटेझी याचेबरोबर सख्य केलें; प्रतिनिधिमंडळांतील आपले अनुयायी काव्हूरच्या बाजूनें मतें देतील असें रॅटेझीनें त्यांच्या तर्फेनें वचन दिलें होतें. या गुप्त तहनाम्याची मुख्य प्रधानाला वार्ताहि नव्हती! यामुळें ॲझिलियोला अर्थातच विषाद वाटला. अखेर काव्हूरनें मुख्य प्रधानाला न विचारतां रॅटेझीला प्रतिनिधिमंडळाचा


अध्यक्ष नेमल्याचें जाहीर केलें. रॅटेझीबद्दल ॲझिलियोचें मत विशेष चांगलें नव्हतें; शिवाय या बाबतींत त्याचा अपमानहि झाला होता; म्हणून त्यानें आपला राजीनामा राजाला सादर केला; तो स्वीकारण्याचें राजानें नाकारलें तेव्हां राज्याचा गाडा सुरळीतपणें चालावा या हेतूनें काव्हूरनेंच राजीनामा दिला. ( मे १८५२ )

राजीनामा दिल्यानंतर काव्हूर लंडनला गेला. तेथें इंग्लंडच्या परराष्ट्रीय खात्याचा प्रधान लॉर्ड पामर्स्टन याशीं त्याची मुलाखत झाली. पीडमॉंटच्या वाढत्या सामर्थ्यामुळें युरपची पुनर्घटना होण्याचा योग येणार आहे व या कार्याला मूर्त स्वरूप द्यावयाचें सामर्थ्यहि काव्हूरच्या अंगीं आहे हें त्याच वेळीं पामर्स्टनच्या ध्यानांत आलें. पॅरिस येथें फ्रान्सच्या लोकशाहीचा अध्यक्ष लुई नेपोलियन याजबरोबर काव्हूरची मुलाखत झाली. लुई फिलिपच्या कारकीर्दींत यानें क्रान्ति करण्याचा दोनदां यत्न केला होता. दुसऱ्या वेळीं त्याला जन्मठेप कैदेची शिक्षा झाली होती; पांच वर्षें तुरुंगांत काढल्यावर तो कामकऱ्याच्या वेषानें लंडनला पळून गेला. स.१८४८ सालीं लुई फिलिपचा पाडाव झाला व लोकशाहीची स्थापना झाली. अध्यक्षाची निवडणूक झाली त्या वेळीं लुई नेपोलियनला सर्वांत जास्त मतें मिळालीं. १८५१ सालीं त्याला दहा वर्षांच्या मुदतीचा अध्यक्ष निवडण्यांत आलें. ता. ३१ डिसेंबर स.१८५२ रोजीं फ्रेंच लोकांनीं बहुमतानें त्याला बादशाही मुकुट अर्पण केला. राज्यारोहणाचे वेळीं त्यानें तिसरा नेपोलियन हें नांव धारण केलें ! ज्या हेतूनें त्यानें मॅझिनीच्या रोमन लोकशाहीवर फ्रेंच सैन्य रवाना केलें होतें तो हेतु सफळ होत आला होता त्याच सुमारास त्याची व काव्हूरची मुलाखत झाली. फ्रान्सच्या मदतीशिवाय ऑस्ट्रियाची हकालपट्टी व इटलीचें एकीकरण हीं साधणें शक्य नाहीं हें काव्हूरनें नेपोलियनच्या मनावर ठसविलें. या मुलाखतींत काव्हूरची योग्यता नेपोलियनच्या नजरेस आली. इटलीमध्यें ऑस्ट्रियाचा पराभव झाल्यास युरपियन राष्ट्रांचें अग्रस्थान फ्रान्सला मिळेल हें नेपोलियन जाणून होता. सीरो मेनोटीनें इटलींत उठावणी केली होती त्यावेळीं नेपोलियन क्रान्तिकारकांना मिळाला होता. उठावणीला अपयश आलें तेव्हां ऑस्ट्रियाच्या तावडींतून निसटण्यासाठीं त्याला वेष पालटून पळ काढावा लागला होता. इटलीसाठीं आपण कांहीं तरी करावें असे विचार त्याच्या मनांत वारंवार येत असत.

स. १८५२ सालीं अॅझिलियोनें राजीनामा दिला तेव्हां व्हिक्टर इम्यॅन्युएलनें काव्हूरला मुख्य प्रधान नेमलें. नव्या प्रधानमंडळांत न्यायखातें रॅटेझीकडे सोंपविण्यांत आलें. काव्हूर मुख्य प्रधान झाला त्यावेळीं ख्रिश्चन मठांतील सन्यासी व संन्यासिनी निवळ आळसांत व चैनींत दिवस काढीत असत. या मठांच्या मदतीसाठीं सरकारी खजिन्यांतून दरसाल चाळीस हजार पौंड देण्यांत येत. मठाधिपतींचा ओढा पोपकडे असल्यामुळें पोप विरुद्ध पीडमॉंट असा कांहीं प्रश्न उपस्थित झाल्यास ते नेहमीं सरकारला विरोध करीत. ह्या सर्व भानगडींचा शेवट लावण्यासाठीं मठांच्या मोठमोठ्या मालमत्ता सरकारजमा कराव्या आणि धर्मगुरूंची नेमणूक व पगार यांची व्यवस्था सरकारनें करावी असें एक बिल रॅटेझीनें अॅसेंब्लीपुढें मांडलें. स. १८५५ सालीं हें बिल मंजूर झालें. हा कायदा मंजूर झाल्यानंतर दोन महिन्यांच्या आंतच राजमाता, महाराणी, बालराजा व राजबंधु इतकीं राजघराण्यांतील माणसें मृत्युमुखीं पडलीं. वरील कायदा हेंच या सर्व आपत्तींचें कारण होय असें देवभोळया लोकांना वाटूं लागलें. या बाजारखातभ्यांचा परिणाम राजावरहि होऊं लागला. वरील कायदा नामंजूर करावयाचा विचार त्यानें बोलून दाखवितांच काव्हूरनें राजीनामा दिला. पीडमॉंटचें राजकारण पाद्र्यांच्या हातांत जाणार असें दिसून येतांच लोक अगदीं खवळून गेले. ' ऑस्ट्रियाचा अंमल पुरवला पण या पाद्र्यांचें राज्य नको ' असें लोक उघड बोलूं लागले. यावेळीं माजी प्रधान अॅझिलियो यानें राजाला योग्य उपदेश दिल्यामुळें काव्हूरचा राजीनामा नामंजूर करण्यांत आला; यामुळें मठांच्या मालमत्तेचा कायदा कायम झाला.

याच सुमारास मॅंटुआ येथील टॅझोलीचा कट व मिलनच्या स्पेरीचा कट उघडकीला आला. या कटवाल्यांच्या घोर अंताचा वृत्तांत इतरत्र दिलेला आहे. राज्यक्रान्तीनंतर ऑस्ट्रियाच्या ताब्यांत गेलेल्या प्रांतांतील अनेक रहिवासी पीडमॉंटच्या हद्दींत स्थायिक झाले होते; हे लोक बाहेरदेशांतील कटवाल्यांना उठावणी करावयाला उत्तेजन देतात या सबबीवर आपल्या मुलखांतील त्यांच्या स्थावर मालमत्ता जप्त करण्यांत येतील असें ऑस्ट्रियानें जाहीर केलें. तहनाम्याप्रमाणें असें करावयाचा ऑस्ट्रियाला अधिकार नव्हता; ऑस्ट्रियन जाहीरनाम्याचा प्रतिकार करावयासाठीं व्हिक्टर इमॅन्युएलनें व्हिएन्ना दरबारीं असलेला आपला वकील परत बोलाविला. या बाबतींत इंग्लंड व फ्रान्स यांनीं पीडमॉंटची कड घेतल्यामुळें ऑस्ट्रियाला अखेरीस माघार घ्यावी लागली. हा दंश

ऑस्ट्रियाच्या मनांतून नाहींसा होणार नाहीं, शिवाय इटलीच्या ऐक्यासाठीं व स्वातंत्र्यासाठीं ऑस्ट्रियाबरोबर युद्ध करणें भाग आहे हें काव्हूर जाणून होता. अशा प्रसंगासाठीं कोणा तरी बलाढ्य राष्ट्राची मदत मिळवून ठेवावयाच्या प्रयत्नास काव्हूर लागला; तोंच क्रीमियन युद्धाला सुरवात झाली (१८५४). क्रीमियाचें द्वीपकल्प जिंकून घेण्याकरितां रशियानें तुर्कस्थानबरोबर लढाई सुरू केली; या युद्धांत फ्रान्स व इंग्लंड यांनीं तुर्कस्थानची बाजू घेतली. क्रीमियामध्यें स्वदेशांतून सैन्य व पुरवठा पाठविणें फार अडचणीचें होऊं लागल्यामुळें त्यांनीं ऑस्ट्रियाची मदत मागितली; पण बादशहा झारविरुद्ध लढावयास कबूल होईना; हें पाहून त्यांनीं पीडमॉटची मदत मागितली. त्यावेळीं युरपियन राज्यामध्यें पीडमॉटचा दर्जा अगदीं कनिष्ठ होता; असें असूनहि क्रीमियन युद्धांत मोठमोठया देशांची बरोबरी करावयाची काव्हूरची महत्वाकांक्षा होती. दोस्तीच्या कराराची वाटाघाट चाललेली असतांना प्रधानमंडळांतील सर्व अधिकाऱ्यांनीं काव्हूरला विरोध केला; त्यांना वाटत होतें कीं हें धाडस शुद्ध वेडेपणाचें आहे. पण व्हिक्टर इम्यॅन्युएलला काव्हूरचें राजकारण पसंत होतें; म्हणून तहनाम्याला विरोध करणाऱ्या प्रधानांनीं राजीनामे दिले व नवें प्रधानमंडळ नर्माण करण्यांत आलें. 'या आणीबाणीच्या प्रसंगीं राजानें योग्य निर्णय करून इटलीच्या भाग्योदयाचा पाया घातला; या वेळीं राजानें निश्चय दाखविला नसता तर काव्हूरच्या राजकारणाची व बुद्धिमत्तेची माती झाली असती' असें मसारी नांवाच्या काव्हूरच्या चरित्रलेखकानें म्हटलें आहे, तें अगदीं यथार्थ आहे. जानेवारी महिन्यांत दोस्तीचा करार पुरा झाला. या तहाचें समर्थन करतांना काव्हूरनें पुढील उद्गार काढले:-' या युद्धांत भाग घेऊन पीडमॉटला काय फलप्राप्ति होणार असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो...सध्यांच्या परिस्थितींत इटलीसाठीं एवढेंच कार्य करणें आम्हांला शक्य आहे. इटलीच्या उद्धारासाठीं आज बरींच वर्षे कटउठावण्या चालू आहेत. त्यांपासून देशाला कांहींच उपयोग झाला नाहीं; कटबंडाळयांमुळें राजकर्त्यांना जुलूम करावयास आयतीच सबब मिळाली; यामुळें हजारों लोकांना हालअपेष्टा भोगाव्या लागल्या इतकेंच नव्हे तर इटालीबद्दल इतर युरोपियन राष्ट्रांना वाटणारी सहानुभूति नष्ट झाली. राष्ट्राच्या भाग्योदयाची पहिली पायरी म्हणजे राष्ट्राची कीर्ति वाढविणें हीच होय. इटली स्वराज्याला पात्र आहे आणि रणांगणावर आपल्या पूर्वजांसारखा पराक्रम करून दाखवावयास सिद्ध आहे हें जगाच्या निदर्शनास



कॅमिलो काव्हूर.

जन्म १८१०.] [मृत्यू १८५१.



जोसेफ गॅरिबॉल्डी.

जन्म १८०७.] [मृत्यू १८८२.

आणून द्यावयाची अशी संधि पुन्हां प्राप्त होणें शक्य नाहीं. इटली स्वातंत्र्याला पात्र आहे हें गेल्या सात वर्षांत आपण जगाला दाखवून दिलेंच आहे; रणांगणावर विजय मिळविल्याखेरीज इटलीच्या कार्याला जोम येणें शक्य नाहीं." काव्हूरचें हें मुद्देसूद विवेचन श्रवण केल्यावर प्रतिनिधिमंडळानें हा तहनामा मंजूर केला.

१८५५ सालीं जानेवारी महिन्यांत तहनामा मंजूर होतांच पीडमाँटचा सेनापति ला मार्मोरा याच्या हाताखालीं पंधरा हजार सैन्य क्रीमियांत पाठविण्यांत आलें. यांपैकीं बाराशें सैनिक पटकीच्या साथींत बळी पडले हें कानीं येतांच काव्हूर फार अस्वस्थ झाला. पीडमाँटच्या सैन्यावर विशेष जबाबदारीचें काम सोंपवूं नये असा फ्रान्सच्या नेपोलियनचा इरादा होता. पण शेवटीं ऑगस्ट महिन्यांत चेरनायाच्या लढाईंत पीडमाँटच्या सैन्यानें शौर्याची शिकस्त करून जय मिळविला, या विजयामुळें इटलीची सगळीकडे वाहवा झाली, नोव्हॅराच्या अपयशाचा कालिमा दूर झाला व स्वतंत्र युरोपियन राष्ट्रांमध्यें बरोबरीनें वागण्याचा मान पीडमाँटला प्राप्त झाला. क्रीमियाच्या लढाईंत रशियाचा पराभव झाल्या, नंतर तहाच्या अटी ठरविण्याकरितां पॅरिस येथें आंतरराष्ट्रीय परिषद भरविण्यांत आली. (स. १८५६). परिषदेसाठीं पीडमाँटच्या वतीनें काव्हूर हजर राहिला होता. पारमा व मॉडेना हीं संस्थानें स. १८४८ च्या क्रान्तीच्या वेळीं प्रजेच्या बहुमतानें पीडमाँटमध्यें सामील झालीं होतीं; तीं संस्थानें पीडमाँटला मिळावींत व रोमाग्ना प्रांताला स्वराज्य देण्यांत यावें अशी काव्हूरनें परिषदेकडे मागणी केली; इटालियन स्वातंत्र्याचा महाशत्रु ऑस्ट्रियाच आहे हें त्यानें युरपियन दरबारांना दाखवून दिलें. जणूं काय आपण संपूर्ण इटालियन राष्ट्राचे प्रतिनिधि आहोंत असा काव्हूरच्या परिषदेपुढील भाषणाचा रोख होता. पॅरिसच्या परिषदेंत काव्हूरला प्रत्यक्ष बक्षीस असें कांहींच मिळालें नाहीं तरी इटलीच्या आकांक्षांना इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांचें नैतिक पाठबळ प्राप्त झालें. इटलीच्या बंधविमोचनाचें कार्य पीडमाँटनें हातीं घेतलें आहे हें या परिषदेमुळेंच जाहीर झालें. काव्हूर हा पहिल्या दर्जाचा मुत्सद्दी आहे व इटलीचा भाग्योदय त्याच्याच हातून होणें शक्य आहे हेंहि याच वेळेस स्पष्ट झालें. पॅरिसच्या परिषदेला इंग्लंडच्या वतीनें लॉर्ड क्लॅरेंडन हजर राहिला होता; परिषदेसंबंधीं काव्हूरनें त्याचेजवळ पुढील उद्गार काढले:—" इटलीमधील जुलूम जबरदस्तींत मुळींच खंड पडूं

द्यावयाचा नाहीं असा ऑस्ट्रियाचा निश्चय झालेला आहे व या पद्धतशीर दडपशाहीवर मुत्सद्देगिरीचा कांहीं परिणाम होणें शक्य नाहीं हें या परिषदेमुळें स्पष्ट झालें आहे...ऑस्ट्रिया व पोप यांचेबरोबर सहकारिता करणें किंवा व्हिएन्ना दरबारबरोबर युद्ध करावयाची तयारी करणें यांपैकीं एका मार्गाचा स्वीकार करणें पीडमॅांटला प्राप्त आहे. राजानें सहकारितेचा मार्ग स्वीकारला तर मी राजकारणांतून बाहेर पडेन व युद्धाचा मार्ग स्वीकारला तर सर्व तयारी करावयास मी मुळींच कचरणार नाहीं." इंग्लंडकडून आपणांस प्रत्यक्ष मदत मिळणें अशक्य आहे हें काव्हूर जाणून होता; इटलीच्या कार्याला इंग्लंडचें नुस्तें नैतिक पाठबळ असलें तरी पुरें आहे असें त्याचें मत होतें; पण फ्रान्सच्या लुई नेपोलियनच्या महत्वाकांक्षेचा पुरता फायदा घ्यावयाचा असें त्यानें ठरविलें होतें. पॅरिस परिषदेच्या वेळींच या दोघांची मुलाखत झाली; तिजमुळेंच पुढें पीडमॅांट व फ्रान्स यांचा तह होऊन इटलीच्या एकीकरणाला सुरवात झाली.

हद्दपारीमध्यें वीस वर्षें घालविल्यामुळें देशाच्या परिस्थितींत घडून आलेल्या क्रान्तीचें मॅझिनीला आकलन करतां आलें नाहीं. मॅझिनीच्या तरुणपणीं कट व उठावणी एवढाच राष्ट्रोद्धाराचा मार्ग उपलब्ध होता; त्यावेळीं राष्ट्रकार्य अंगावर घेण्याची आकांक्षा, धाडस व सामर्थ्य एकाहि इटालियन संस्थानिकाच्या अंतःकरणांत उत्पन्न झालें नव्हतें. पीडमॅांटनें काव्हूर व व्हिक्टर इमॅनुएल यांच्या नेतृत्वाखालीं राष्ट्रकार्य शिरावर घेतल्यामुळें इटलीच्या परिस्थितींत फार महत्वाचा फेरफार घडून आला होता. राज्यकर्त्यांना राजकारणाचे डाव तरवारीच्या साह्यानें रणांगणावर व मुत्सद्देगिरीच्या साह्यानें राजदरबारींहि खेळावयाचे असतात; त्यांना प्रत्येक वाक्य तोलून बोलावें लागतें; शिवाय राष्ट्रकार्य शिरावर घेतल्याचा निश्चय जाहीरपणें बोलून दाखवितां येण्याइतकें सामर्थ्य पीडमॅांटच्या अंगीं अझून आलें नव्हतें. जबाबदार राज्यघटनची सनद आपण प्राणांतींहि परत घेणार नाहीं हें व्हिक्टर इमॅन्युएलनें जाहीर केलें त्याचवेळीं आपण राष्ट्रकार्य हातीं घेतल्याचें त्यानें ध्वनित केलें होतें; ऑस्ट्रियाच्या धमकीला न जुमानण्याइतकें धाडस आपल्या अंगीं आहे हें त्यानें दाखवून दिलें होतें; राष्ट्रीय आकांक्षेला मूर्तस्वरूप द्यावयासाठीं सामर्थ्य संपादन करावयाच्या मार्गालाहि तो लागला होता. राष्ट्रैक्य व राष्ट्रस्वातंत्र्य यांना मॅझिनी लोकसत्तेपेक्षां अधिक महत्व देत होता; इटलींतील परिस्थिति उमगली असती तर त्यानेंहि लोकसत्ता-

चार्यांचीं मनें वळविण्याचा यत्न केला असता. राष्ट्रकार्य शिरावर घेण्याचें धाडस पीडमाँटच्या अंगीं नाहीं, संस्थानी पगारी सैनिकांच्या हातून ऑस्ट्रियनांना हांकून देण्याचें काम तडीला लागणें शक्य नाहीं—हें काम तरण्या ताज्या स्वयं-सैनिकांच्या हातूनच होणें शक्य आहे, चार्लस अलबर्टचा मुलगा आपल्या वचनाला जागेल हें सर्वस्वीं अशक्य आहे असा मॅझिनीचा पूर्वग्रह होऊन बसला होता; हा पूर्वग्रह वदलावयास मॅझिनी तयार नव्हता. त्याचप्रमाणें मॅझिनीबद्दलचे आपले हुकूम परत घ्यावयास पीडमाँटचें सरकार तयार नव्हतें. स्वदेशाबरोबरचा प्रत्यक्ष संबंध तुटल्यामुळें मॅझिनीला इटालियन परिस्थितीचें आकलन झालें नाहीं; पीडमाँटच्या सरकारनें मन मोठें करून त्याला इटलींत येऊं दिलें असतें तर त्यांचाच फायदा झाला असता. मॅझिनीच्या देशाभिमानाची व अनुयायांची व्यावहारिक कार्यक्षमता नाहींशी केल्याची अप्रत्यक्ष जबाबदारी पर्यायानें पीडमाँट सरकारवरच येऊन पडते हें उघड आहे.

हद्दपार मानीननें पॅरिस येथें नॅशनल सोसायटी स्थापन केली होती. मानीन मुळापासून लोकसत्तावादी होता पण इटलीच्या राजकारणाचा कल कोणीकडे झुकत आहे हें त्यानें जाणलें होतें; तात्विक राजकारणाच्या व भावनात्मक राष्ट्र-धर्माच्या व्यावहारिक मर्यादांचा त्याचा निर्णय वस्तुस्थितीला धरून होता. ‘ राष्ट्रैक्य, राष्ट्रस्वातंत्र्य व व्हिक्टर इमॅन्युएल ’ हें नॅशनल सोसायटीचें ध्येय होतें. मॅझिनीनें या संस्थेला मिळावें म्हणून मानिननें बोलणें लावलें पण तें त्यानें मान्य केलें नाहीं. राजकारणाकडे मॅझिनी व्यवहार या दृष्टीनें पहात नसे. त्यांची नजर मानवजातीच्या प्रगतीकडे होती. क्षणोक्षणीं बदलणाऱ्या इटालियन राजकाणाचा रागरंग त्याला ओळखतां आला नाहीं. उत्साहाच्या उसळीबरोबर मिळविलेल्या विजयाला चिरस्थायित्व येण्यासाठीं मुत्सद्देगिरीची आवश्यकता असते. युरपियन राजदरबारांबरोबर संबंध येणें अपरिहार्य असल्यामुळें दरबारी राजकारणाचे कुजके डाव खेळावयास काव्हूरसारख्या धीम्या मुत्सद्याचीच इटलीला जरूर होती. तो इटलीच्या रंगाला आलेल्या डावांत शिरला तेव्हांच मॅझिनीच्या राजकारणाची परिसमाप्ति झाली.* मॅझिनीनें इटलीचें अंतःकरण जिंकलें, राष्ट्रीय चैतन्य जागृत केलें व देशासाठीं आत्मसमर्पण करावयास अनेक वीर तयार केले. इटलीच्या इतिहासांतच नव्हे तर जगाच्या राजकारणांत यापूर्वी केलेल्या कार्यामुळेंच अढळ स्थान प्राप्त करून घेतलें होतें. यापुढें प्रत्यक्ष

राजकारणांत भाग न घेतां सरस्वतीच्या सेवेंत जर त्यानें आपलें उरलेलें आयुष्य घालविलें असतें तर त्याची कीर्ति अधिक उज्ज्वल झाली असती; पण त्याची मनोरचनाच अशी होती कीं, त्याला प्रत्यक्ष राजकारणांतून आंग काढून घेणें अशक्य होतें. देशाचें साध्य साधावयासाठीं तो अगदीं उतावळा झाला होता; सध्यांच्या परिस्थितींत विसावा घेणें हें महत्पाप आहे असें त्याचें मत होतें. देशद्रोही फितूर व देशाभिमानी निष्क्रिय यांमध्यें त्याच्या दृष्टीनें फारसा फरक नव्हता. लोकांचीं मनें उत्तेजित होतील अशा प्रकारचे जहाल लेख लिहावयाचे पण स्वतः मात्र निष्क्रिय रहावयाचें, अशा ढोंगी लोकांवर तो बिलकूल दयामाया करीत नसे. "जनतेला तुमचे लेख समजत नाहींत, प्रत्यक्ष कृति करून दाखवा म्हणजे तुमच्या शिकवणुकीचें मर्म तेव्हांच त्यांच्या लक्षांत येईल." ऑस्ट्रिया, पोप व नेपल्सचा राजा यांच्या जुलमाच्या बातम्या ऐकून तो अगदीं बेफाम झाला होता. "युरप खंडाच्या दोन तृतीयांश भागांतील आपल्या बांधवांमागें आज हद्दपारी व फांशी यांचा ससेमिरा लागला आहे; जिकडे पहावें तिकडे सैतानी सत्तेचा थयथयाट चाललेला दिसून येत आहे; हद्दपार झालेल्या व फांशीं गेलेल्या देशभक्तांच्या आयाबहिणी धाय मोकलून रडत आहेत, जुलमानें गांजलेल्या जनतेचा आक्रोश नभोमंडलाला भेदून जात आहे, कोणामागें हेर फिरत आहेत, कोणामागें मारेकरी धांवत आहेत–आणि या साऱ्या धांगडधिंग्यांत एकीकडे युद्धाला धैर्यानें सज्ज होणारे व मृत्यूला शांतपणानें तोंड देणारे वीर दिसून येतात-त्याचप्रमाणें दुसरीकडे पाशवी शक्तीपुढें मान वांकवणारे भेकड व मोहामध्यें गुरफटून जाणारे लोभी लोक आपणांस दिसून येतात. या स्थितीमध्यें शक्य तितक्या लवकर बदल घडवून आणणें हें आपलें कर्तव्य आहे. रोजगेज देशांतील उत्तमोत्तम लोकांना मांगांच्या हातून फांसावर मरण येत असलेलें पहात बसण्यापेक्षां परमेश्वराच्या कृपाछत्राखालीं, राष्ट्राच्या झेंड्याच्या फडफडाटांत, राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं उभारलेल्या युद्धांत मरण स्वीकारून स्वर्ग प्राप्त करून घेणें हेंच सर्व दृष्टींनीं अधिक श्रेयस्कर आहे...सुसंधीची वाट पहात बसणें हें महत्पाप आहे...ज्या राष्ट्रानें आपल्या कर्तबगारीच्या जोरावर अगदीं एकाकी असहाय स्थितींतहि एकदां आपलें स्वातंत्र्याचें ध्येय जवळजवळ साध्य करून घेतलें होतें, त्याच राष्ट्राला स्वातंत्र्यासाठीं पुन्हां लवकर तसाच निकराचा प्रयत्न करणें जड आहे काय? अत्यंत विपरीत परिस्थितींतहि आपल्या

अंत:करणांतील आशेचा जोम कायम ठेवणाऱ्या, एकदां उभारलेल्या युद्धांत केव्हांहि हार न खाणाऱ्या आणि सत्य व स्वातंत्र्य यांसाठीं हालअपेष्टा भोगणाऱ्या राष्ट्राला विजय प्राप्त झालाच पाहिजे; हा विजय चिरस्थायी असतो; पाशवी शक्तीचा जोर क्षणिक मात्र असतो." मध्यम स्थितींतले लोक उठावणी करावयास तयार होणार नाहींत हें त्याला ठाऊक होतें; आणि ह्याच लोकांची पीडमॉटशीं सहानुभूति होती. "राष्ट्राची सारी मदार आतां मजूर वर्गावर आहे," असें त्याला वाटत होतें. "मजूर लोक माझे आहेत, मजवर त्यांचें प्राणापेक्षांहि अधिक प्रेम आहे; माझा शब्द निघावयाचाच अवकाश कीं तो त्यांनीं पार पाडलाच समजावें," अशी त्याची मजूरवर्गावर निष्ठा होती. "त्यांच्या आकांक्षा अजून कोणास समजलेल्या नाहींत; त्यांचेबद्दल सर्वत्र गैरसमजूत मात्र पसरलेली आहे; पण या वर्गाचें सामर्थ्य किती आहे याची कल्पना अझून कोणासच झालेली नाहीं." मजूरवर्गापैकीं कांहीं व्यक्ति त्याच्या शब्दाला वेदवाक्य मानीत असत; पण या वर्गाबद्दल त्याला वाटणारी आशा अगदीं अनाठायीं होती.

काव्हूरच्या कर्तबगारीवर व्हिक्टर इमॅन्युएलचा अढळ विश्वास असल्यामुळें पीडमॉटचें व पर्यायानें इटलीचें राजकारण त्याच्याच धोरणानें चालत होतें; पीडमॉटच्या नेतृत्वाखालीं इटलीचें एकीकरण व्हावें असें प्रतिपादन करणारा पक्ष दिवसानुदिवस अधिकाधिक प्रबल होऊं लागला होता. पीडमॉट पक्षाचें नेतृत्व अर्थातच काव्हूरकडे होतें. व्यक्तिश: काव्हूर इंग्लंडच्या राज्यशासनपद्धतीचा चहाता होता; इटलीमध्यें जबाबदार राजसत्ता स्थापन व्हावी असें त्याला वाटत होतें. कोरड्या तत्वज्ञानाचा त्याला मोठा तिटकारा होता. तत्वें व ध्येय अगोदर ठरवून ठेवण्यांत त्याला फारशी मातबरी वाटत नव्हती. एकदम मोठी उडी घेऊन शेवटीं अपयश पदरीं घेण्यापेक्षां, स्वाभिमानाच्या अव्यवहार्य कल्पनांचे भरीं पडून ध्येयसिद्धीसाठीं कोणतीं साधनें उपयोगांत आणावींत याची कोरडी विचक्षणा करीत बसण्यापेक्षां, येईल त्या संधीचा शक्य तितका फायदा घेऊन पदरांत कांहीं लभ्यांश पाडून घ्यावा असें त्याचें मत होतें. देशाच्या फायद्यासाठीं हवीं तीं साधनें उपयोगांत आणावयास तो तयार होता म्हणून त्याची देशभक्ति उज्वल नव्हती असें मात्र नव्हे. मॅझिनीचें हृदय काव्हूरपेक्षां उमदें होतें; राजदरबारावर त्याचा काडीइतका विश्वास नव्हता;

सुखाची हांव लागलेल्या मध्यम स्थितींतल्या स्वार्थी लोकांना तो कस्पटासमान लेखीत असे; लोकशाहीवरील त्याचा विश्वास अढळ होता; आपलें अंत:करण तो सर्वांजवळ उघडें करून दाखवीत असे; तो मुत्सद्दी नव्हता पण तो परमेश्वराचा दूत, स्वातंत्र्यलक्ष्मीचा प्रेषित, राष्ट्रधर्माचा आद्यप्रवर्तक व इटालियन देशभक्तांचा आद्यगुरु होता. काव्हूरला मॅझिनीबद्दल अत्यंत तिरस्कार वाटत असे. मॅझिनीच्या भोंवतीं गोळा होणाऱ्या लोकसत्तावादी क्रान्तिकारकांना तो बाजारबुणगे म्हणत असे. इटलीच्या ऐक्याला व स्वातंत्र्याला मॅझिनी हाच मोठा अडथळा आहे अशी त्याची कल्पना होती; मॅझिनीवर निघालेलें फांशींचें फर्मान अमलांत आलें असतें तर त्याला मनापासून आनंद झाला असता! काव्हूर हा एका दरबारचा जबाबदार प्रधान होता; भाषणांत व वर्तनांत अत्यंत सावधगिरीनें वागणें त्याला भाग होतें. भलत्या भरीस पडून पीडमॉंटच्या स्वातंत्र्यावर धोका आणावयास तो तयार नव्हता. क्रान्तिकारकांच्या मदतीचा उपयोग करून घ्यावयास तो तयार होता; पण त्यांनीं पीडमॉंटच्या निशाणाखालींच लढलें पाहिजे व पीडमॉंटच्या राजघराण्यांशीं राजनिष्ठ राहिलें पाहिजे असा त्याचा आग्रह होता. व्यावहारिक व दरबारी राजकारणाच्या बाह्य आवरणांत गुरफटून गेलेलें काव्हूरचें धोरण लोकसत्तावाद्यांना ओळखतां आलें नाहीं; त्यानें आपल्या धोरणाचा छातीठोक पुकारा केलेला नसल्यामुळें मॅझिनीला त्याचेबद्दल अत्यंत तिरस्कार वाटत असे. फ्रान्सच्या मदतीनें ऑस्ट्रियावर चढाई करावयाचा काव्हूरचा बेत होता; म्हणून तो फ्रान्सच्या मुत्सद्यांची व बादशहाची सारखी मनधरणी करी; म्हणून मॅझिनीला वाटे कीं काव्हूर हा एक लफंग्या तोंडपुजा आहे! या वरकरणी मनधरणीचे आडचा राजकारणी डाव मॅझिनीला उमगला नाहीं. हातांत गंजलेला भाला घेऊन गैरशिस्तपणें ऑस्ट्रियन सैन्यावर तुटून पडून जय मिळविणें शक्य असतें तर काव्हूरनें तेंहि केलें असतें हें मॅझिनीला फार उशीरां समजून आलें.

काव्हूर व मॅझिनी यासारख्या भिन्न मनोवृत्तीच्या व्यक्तींना सहकार्य करणें अशक्य होतें. इटलीच्या दृष्टीनें पाहिलें असतां मॅझिनीचें कार्य काव्हूरनें पुरतें केलें; मानवजातीच्या कल्याणाच्या दृष्टीनें पाहिलें असतां मॅझिनीचें ध्येय अझूनहि सिद्ध झालेलें नाहीं. स. १८४८ सालानंतर कटवाल्याच्या खंजीराची जरूरी राहिली नव्हती. पण कट्टया कटवाल्यांना हें अझून उमजून आलें

नव्हतें. मातृभूमीवर पाऊल घालतांच मॅझिनीला मांगाचे हवालीं करून फांसावर चढवावें असा पीडमॉंटसरकारचा खडा हुकूम होता; म्हणून मॅझिनीला वाटे, "इटलीच्या स्वातंत्र्यसाधनाला ऑस्ट्रियाच्या खालोखाल दुसरा शत्रु म्हणजे पीडमॉंटचें सरकार हा होय." मॅझिनी ठांसून सांगत असे कीं, "इमॅन्युएलच्या अंतःकरणांत, एकवटलेल्या इटलीच्या सिंहासनाची आकांक्षा उत्पन्न होणें अशक्य आहे." काव्हूरचा फ्रेंचाच्या मदतीवर मोठा भर होता; "ज्या लुई नेपोलियननें रोमन लोकशाहीचा घात केला त्याचे हातून इटलीला मदत होईल अशी अपेक्षा करणें हा शुद्ध वेडेपणा आहे; इतकेंच नव्हे तर या धोरणांत इटलीची बेअब्रु आहे," असें मॅझिनीचें मत होतें. ध्येयासाठीं आत्मबलिदान करणाऱ्या वीरांची महती मॅझिनीच्या अंतःकरणाला तेव्हांच पटत असे, पण ध्येयसिद्धीसाठीं नैसर्गिक भावना कांहीं कालपर्यंत दडपून ठेवून कार्यसिद्धीसाठीं कारस्थान करणाऱ्या मुत्सद्यांच्या मनोभावना व कार्यपद्धति यांविषयीं त्याला केव्हांहि सहानुभूति वाटली नाहीं.

पीडमॉंटच्या पक्षाला जे लोक मिळाले होते त्यांचें परिस्थितीचें परीक्षण वस्तुस्थितीला धरून होतें; मनुष्याच्या उदात्त भावना उत्तेजित करून त्याला आत्मयज्ञाकडे प्रवृत्त करणें, अंतर्यामींच्या परमेश्वराची जाणीव करून देऊन त्याचेकडून राष्ट्रोद्धारासाठीं आत्मसमर्पण करविणें हा मॅझिनीचा मार्ग होता. मनुष्यस्वभाव व परिस्थिति यांच्या दृष्टीनें व्यक्तीला केवढें कार्य अंगावर घेऊन तें पार पाडतां येईल याचा विचार करून तेवढेंच कार्य ध्येय म्हणून पुढें ठेवणें व तें सिद्ध करावयासाठीं मानवी बुद्धीला सुचतील तेवढे उपाय अमलांत आणणें हा काव्हूरच्या पक्षाचा मार्ग होता. पीडमॉंट पक्षाचे लोक हिशेबी व व्यवहारचतुर होते; विजयाची शक्यता दिसून येईपर्यंत प्रत्यक्ष कार्याला हात घालावयाची त्यांची तयारी नव्हती. ऑस्ट्रियाच्या जुलमाला तोंड द्यावयाचें, पीडमॉंटचें स्वातंत्र्य रक्षण करावयाचें व देशाचें चैतन्य केंद्रीभूत करून पीडमॉंटच्या नेतृत्वाखालीं त्याचा इटलीकडे उपयोग करून घ्यावयाचा असा त्यांचा कृतनिश्चय झाला होता. राष्ट्रैक्य व राष्ट्रस्वातंत्र्य या तत्वांना ते लोकशाहीपेक्षां अधिक मानीत असत. तत्वासाठीं हवा तो त्याग करावयास ते तयार नव्हते पण देशाच्या फायद्यासाठीं हवीं तीं तत्वें गुंडाळून ठेवावयास ते तयार होते. व्हिक्टर इमॅन्युएल व त्याच्या दरबारचे मुत्सद्दी यांना जे विरोध करतील ते

इटलीचे शत्रु अशी त्यांची ठाम समजूत होती–मग ते परके ऑस्ट्रियन असोत किंवा स्वकीय मॅझिनियन लोकसत्तावादी असोत. त्यांच्या कार्यक्रमांत ध्येयनिष्ठा नव्हती, काव्य नव्हतें व धाडस नव्हतें; स्वसामर्थ्याची जाणीव होऊन, स्वयंप्रेरणेनें राष्ट्र जागृत होऊन स्वयंशासन संपादन करीत आहे, हें उदात्त दिव्यदर्शन त्यांच्या कार्यक्रमांत अंतर्भूत झालेलें नव्हतें. एका परकीय शत्रूंशीं झुंझावयासाठीं दुसऱ्या परक्या सत्तेच्या जोरावर इटलीला नुसतें शहाचें प्यादें करावयास ते कबूल होते ! पीडमॉटप्रमाणेंच मॅझिनी राष्ट्रैक्य व राष्ट्रस्वातंत्र्य यांना लोकशाहीपेक्षां अधिक महत्व देत असे; पण या लोकांच्या प्रामाणिकपणाची त्याला व त्याच्या अनुयायांना खात्री नव्हती म्हणूनच ते या पक्षाला मिळाले नाहींत. त्यावेळच्या युरपियन राजकारणाच्या दृष्टीनें पाहतां पीडमॉट पक्षाचा मार्गच अधिक जवळचा, कमी श्रमाचा, अधिक व्यावहारिक व कमी हानिकारक होता. या पक्षामध्यें कित्येक नेभळट लोकहि सामील झाले होते; त्यांना आपली कातडी शाबूत ठेवावयाची होती, त्यांना आपला जमीनजुमला देशापेक्षां अधिक प्रिय होता; त्यांना पीडमॉट संस्थानचा अभिमान वाटत होता–प्रांतिक अभिमानामुळें इटलीच्या एकराष्ट्रीयत्वाचा त्यांना विसर पडला होता. पीडमॉट पक्षाचे कांहीं कायदेबाज वर्तमानपत्रकार लोकांना सांगत कीं, परक्यांच्या अंमलाखालीं असलेल्या प्रांतांना जबाबदार राज्यपद्धतीचें उदाहरण घालून देणें एवढेंच पीडमॉटचें कर्तव्य आहे. या नेभळटांवर मॅझिनीचा मोठा कटाक्ष होता. "तुम्हीं हें उदाहरण कोणाला घालून देणार? ज्यांना चोहोंकडून परक्यांच्या तरवारींचा वेढा पडलेला आहे, ज्यांना मुद्रणस्वातंत्र्य नाहीं व भाषणस्वातंत्र्य नाहीं, त्यांना तुमच्या या उदाहरणाचा काय उपयोग होणार ? दारापुढें खून होत असतांना घरांत कडी लावून बसण्याचें उदाहरण घालून दिल्यानें कोणाची उन्नति होणार ? ईश्वरावर हवाला ठेवून कार्याला हात घाला म्हणजे तुम्ही आम्ही एकच आहों; तसें होत नसेल तर आम्ही कार्याला हात घालीत आहों, त्यामध्यें तुम्ही आम्हांला मदत करा; नाहीं तर तुम्हांलाहि गचांडी देऊन आम्ही आपलें काम पुढें चालवूं ! तुम्हांला सुसंधि हवी असेल तर ती आम्ही तुमच्यापुढें आणून उभी करूं–मग तरी तुम्ही आमच्याशीं सहकार्य कराल काय ?"

उतावळया क्रान्तिकारक बातमीदारांनीं मॅझिनीची कल्पना करून दिली होती कीं, पीडमाँट व फ्रान्स यांचा आपसांत इटलीची विभागणी करून घ्यावयाचा बेत ठरला आहे ! या वेळींच काव्हूर व लुई नेपोलियन यांचा तह ठरत होता–यामुळें त्याचा या बातमीवर विश्वास बसला. इटलीचा दक्षिण प्रांत फ्रान्सला द्यावयाचें ठरलें आहे या समजुतीवरून त्यानें तेथेंच बंडाचें बीज पेरावयाचें ठरविलें. आल्पस् पर्वतांत व लॉंबर्डी प्रांतांतील शहरोंशहरीं बंडवाल्यांना ऑस्ट्रियाविरुद्ध उठवून द्यावयाचें असा मॅझिनीचा बेत होता. बंडाची तयारी करावयासाठीं स. १८५४ सालीं तो पॅरिस व जिनोआ येथें गेला. त्याच्या हालचालीमुळें स्विट्झरलँड, फ्रान्स व इटाली येथील पोलिसांची मात्र तारांबळ उडाली. इटलीमधून त्यानें इंग्लंडांतील आपल्या मित्रांस पत्रें लिहिलीं आहेत–पीडमाँट पक्षाचे बरेच लोक आपणांस मिळावयास तयार आहेत असा त्यामध्यें उल्लेख आहे. पण हा कट पोलिसांनीं हाणून पाडला. या वेळीं मॅझिनी कैदच व्हावयाचा; पण मोठया शिताफीनें तो पोलिसांच्या तावडींतून निसटून गेला !

आतां इटालीला कोठेंच कसलीहि आशा नाहीं असें त्याला वाटूं लागलें. “ माझें जीवन सुकून जात आहे...कांहीं तरी प्रत्यक्ष कृति करावी यासाठीं मन सारखें उसळया घेत आहे–पण प्रत्यक्ष कृति करणें मात्र मला अशक्य होऊन बसलें आहे. माझी देशभक्ति आतां माझी मलाच असह्य झाली आहे; मात्र माझ्यापासून इतरांना त्रास होऊं नये म्हणून मी हंसतमुख रहावयाचा यत्न करीत असतों !” पण स. १८५६ सालीं क्रान्तिकारकांना अगदीं अनपेक्षित ठिकाणाहून मदत मिळेल असा रंग दिसूं लागला. मॉडेना प्रांतांत उठावणी करणारांस काव्हूरचें साह्य मिळेल असें दिसूं लागलें. मॉडेना प्रांत पीडमाँटच्या सरहद्दीवर असल्यामुळें तेथें उठावणी झाली तर ऑस्ट्रियाबरोबर कांहीं कटकट उपस्थित करून फ्रेंच लष्कर आपल्या मदतीस आणवितां येईल असा काव्हूरचा कयास होता. त्यानें जिनोआ येथें मॅझिनीची गांठ घेतली पण दोघांचा समेट होईना. “ या पीडमाँटच्या सरकारनें माझें डोकें उठवून टाकलें आहे. माझा या सरकारबरोबर अप्रत्यक्षपणें संबंध जडून आला आहे, पण त्याचा फारसा उपयोग होईल असें मला वाटत नाहीं. त्यांच्या पक्षांतील लोकांचें मन मजविषयीं शुद्ध नाहीं आणि आमच्या बाजूच्या ज्वलत् जहाल लोकांचीं मनें सरकाराविषयीं साशंक आहेत. यामुळें माझी स्थिति फार नाजूक झाली आहे. ”

समेटाचें बोलणें निष्फळ होतांच मॅझिनी दक्षिण इटलींतील उठावणीच्या तयारीस लागला. सिसिली व नेपल्स या प्रांतांतील कटवाल्यांना एकत्र करून उठावणी करावयाचा त्याचा प्रयत्न दोन वर्षांपासून चालला होता. लंडन येथें असतांना मॅझिनीनें गॅरिबॅाल्डीची गांठ घेतली होती. सिसिलियन लोकांच्या उठावणीला काव्हूरची सहानुभूति असेल तर कटवाल्यांना आपण मदत करूं असें गॅरिबॅाल्डीनें कबूल केलें होतें. सिसिलियन उठावणीला काव्हूरची गुप्त मदत मिळवावयाचा बराच संभव होता. लुसिएन मुराट या आपल्या पुतण्यास नेपल्सच्या सिंहासनावर बसवावयाचा लुई नेपोलियनचा डाव होता; हा बेत हाणून पाडावयाचें सामर्थ्य पीडमॅांटच्या अंगीं नाहीं हें काव्हूर जाणून होता. कटवाल्यांनीं फ्रेंचाचा कांटा परस्पर काढला तर त्यांत काव्हूरला आनंदच होता. पुढें नेपोलियननेंच माघार घेतल्यामुळें काव्हूरनें या कारस्थानांतून आपलें आंग काढून घेतलें. पण त्याच्या मदतीशिवाय उठावणी करावयास कटवाले उत्सुक झाले होते; म्हणून बंडासाठीं फंड गोळा करावयास मॅझिनी इंग्लंडांत गेला व थोडक्याच दिवसांनीं जिनोआला परत आला.

नेपल्सच्या बॅाबा राजावर लोक अगदीं खवळून गेले होते. मॅझिनीचा मित्र कार्लो पिसाकाने यानें कटवाल्यांचें नेतृत्व स्वीकारावयाचें कबूल केलें. या उठावणीपासून त्याला परावृत्त करण्याचा पुष्कळांनीं यत्न केला; त्यांना तो सांगे, ' देशासाठीं आपलें अंतःकरण व आयुष्य अर्पण करणें एवढेंच माझ्या हातीं आहे; म्हणून या आत्मसमर्पणास मी तयार आहें. देशासाठीं फांशीं जावें लागलें तरी तें माझें यशच आहे अशी माझी निष्ठा आहे. ' पिसाकाने यानें जिनोआ व सार्डीनिया यांमध्यें फेऱ्या करणारी एक बोट पकडावी, या बोटींतून त्यानें कॅलॅब्रिया प्रांतांत जावें व तेथील कटवाल्यांचें आधिपत्य स्वीकारावें असा मूळ बेत होता. जिनोआ व लेगहॅार्न या किल्यांमधील दारूगोळा तेथील कटवाल्यांनीं कावीज करून तो पिसाकाने याजकडे पाठवावा असें ठरलें होतें. दारूगोळा काबीज करावयाच्या बेताला यश येणार नाहीं हें मॅझिनी जाणून होता. या हल्ल्यामुळें क्रान्तिकारकांना राष्ट्रैक्यापेक्षां लोकशाहीच अधिक महत्वाची वाटते असा सर्वांचा गैरसमज होऊन बसेल हेंहि त्यानें ताडलें होतें. पण उत्तरेकडील क्रान्तिकारकांना दक्षिणेकडील कटवाल्यांबद्दल कळकळ वाटत आहे हें यामुळें सिद्ध होईल या कल्पनेनेंच त्यानें या बेताला संमति दिली;

शिवाय या हल्लयामुळें ऑस्ट्रिया व पीडमॉंट यांचें युद्ध जुंपेल अशीहि त्याची अपेक्षा होती. स. १८५७ सालीं पिसाकाने यानें काग्लीयारी ही बोट पकडली; नंतर त्यानें पोंझो येथील राजकीय कैद्यांना बंधमुक्त केलें; त्यांना बरोबर घेऊन त्यानें एकदम नेपल्स शहरावर हल्ला केला. नेपल्स सरकारनें अगोदरच जाहीर केलें होतें कीं, पिसाकाने या नांवाचा एक दरवडेखोर लवकरच बंडाळी करणार आहे, तेव्हां लोकांनीं सावध रहावें ! ह्या बातमीवर विश्वास ठेवून अनेक लोकांनीं सरकारी सैन्याला मदत केली ! कटवाल्यांची मदत यावयाचे अगोदरच पिसाकाने याच्या टोळीवर सरकारी सैन्यानें हल्ला केला; या चकमकींत पिसाकाने व त्याचे बरेचसे साथीदार ठार झाले; उरलेल्या लोकांना नेपल्सच्या भयंकर तुरुंगांत टाकण्यांत आलें. जिनोआ व लेगहॉर्न येथील कटवाल्यांची रस्त्यामध्येंच सरकारी सैन्याबरोबर हातघाई झाली, व त्यांच्या उठावणीला अपयश आलें. या उठावणीनंतर राज्यकर्त्यांनीं क्रान्तिकारकांवर पुन्हां एकदां सूड उगवला; कटाचा प्रवर्तक जो मॅझिनी याला राजकर्त्यांनीं फांशीची शिक्षा सुनावली !

जो आरोप आपणांवर करण्यांत येईल अशी मॅझिनीची अपेक्षा होती तो त्याचेवर लादण्यांत आला तेव्हां त्यानें आत्मसमर्थनार्थ एक लेख प्रसिद्ध केला: " प्रजासत्ता कीं राजसत्ता या वादाचा निर्णय लावण्यासाठीं आम्ही या उठावणीला हात घातला नाहीं. निष्क्रियतेंत कुजत पडावयाचें कीं कांहीं प्रत्यक्ष कृति करावयाची एवढाच प्रश्न आमचेपुढें होता. मी स्वतः लोकसत्तावादी आहे; पण राष्ट्राच्या इच्छेच्या आड यावयाचा हक्क राजसत्तावाद्यांना त्याचप्रमाणें लोकसत्तावाद्यांनाहि नाहीं." नेमस्त वर्तमानपत्रकर्त्यांना त्यानें उत्तर दिलें:-"जन्माला आल्यापासून मी राष्ट्रहिताचा सारखा बिघाड करीत आहें असा माझ्यावर तुमचा आरोप आहे. आज मी विवंचनेच्या भारानें लवून गेलों आहे, दांतावर मारण्यास मजजवळ एक छदामहि नाहीं, सर्व राजे व त्यांचे हस्तक माझ्या मागें लागलेले आहेत व इंग्लंडशिवाय जगांत मला कोठें आसराहि नाहीं; सर्वसमर्थ राजांच्या हुकमांची बजावणी करावयास हजारों लोक तयार आहेत तरी माझें नांव ऐकतांच या राजेलोकांच्या उरांत कां धडकी भरते ? इटलीकडे अंत:करणपूर्वक पहाल तर तुमचें तुम्हांसच दिसून येईल कीं, आतां हातपाय हालविल्याशिवाय गत्यंतर नाहीं ! आम्ही जें बोलतों तें करून दाखविण्यासाठीं आमची

तडफड चालू असते; तत्वासाठीं आमच्या हजारों लोकांनीं आत्मार्पण केलें आहे. शुष्क वडबड, तोंडदेखली कळकळ व वायफळ वचनें या पलीकडे तुम्ही काय केलें आहे ? तुम्ही आम्हाला मदत करीत नाहीं म्हणूनच इटलीचें ध्येय साध्य होत नाहीं. एकीनेंच महत्कार्यें यशस्वी होतात. ”

फांशीची शिक्षा जाहीर झाल्यानंतरहि मार्क्विस अर्नेस्टो परोटो या सरदाराच्या वाड्यांत मॅझिनी दडून राहिला होता ! पोलिसांनीं वाड्याची झडती घेतली तेव्हां भालदाराचा वेष घेतलेल्या मॅझिनीनेंच पोलिस अधिकाऱ्याला वाड्याचा दरवाजा उघडून आंत घेतलें ! हा अधिकारी मॅझिनीचा बाळपणींचा दोस्त होता; पण या अडाणी वेळेस त्यानें ओळख दिली नाहीं ! पुढें मॅझिनी वाड्यांतून निघून गेला तेव्हां वाटेमध्यें विडी पेटविण्यासाठीं त्यानें एका शिपायाकडून काडी मागून घेतली व धुराचे लोट सोडीत पोलिसांच्या पहाऱ्यांतून तो निघून गेला ! पिसाकाने याची शेवटची बातमी मिळेपर्यंत तो इटलींतच होता, पुढें तेथें रहावयाचें कांहीं प्रयोजन नसल्यामुळें तो इंग्लंडांत परत आला.

# ९. स्वातंत्र्ययुद्ध व विश्वासघात.

Peace, peace, peace, do you say?
What! with the country's guns in our ears?
With the country's wrong not rendered back?
What! While Austria stands at bay
In Mantua & our Venice wears
The cursed flag of the yellow & black?

Mrs Browning.

*First News from Vilea franca'.*

ऑर्सीनीचा बाँब—प्लोंबिएर्सचें कारस्थान—युद्धाचे अगोदर शांततापरिषद—ऑस्ट्रियाची आगळीक—इटलीचें स्वातंत्र्ययुद्ध—विश्वासघात व व्हिलाफ्रँकाचा तह—काव्हूरचा राजीनामा—पहिलें इटालियन पार्लमेंट.

ता. १४ जानेवारी १८५८ रोजीं रात्रीं आठ वाजतां बादशहा नेपोलियन महाराणीसह पॅरिसच्या नाटकगृहाकडे जात असतांना त्याच्या गाडीवर तीन बाँब गोळे फेंकण्यांत आले. हे बाँब गोळे ऑर्सिनी व त्याचे दोन इटालियन साथीदार यांनीं फेंकले होते. हे गोळे इतके भयंकर होते कीं त्यांच्या धडाक्यानें १५६ लोक जखमी झाले व यांपैकीं आठ पुढें मरण पावले! मात्र या स्फोटामुळें राजा व राणी यांना मुळींच इजा झाली नाहीं! हा भयंकर प्रयत्न करावयाचे अगोदर ऑर्सिनी लंडन येथें रहात होता व सदरहू बाँब गोळे बर्मिंगहॅम येथें तयार करण्यांत आले होते; शिवाय मॅझिनी-सारख्या कटवाल्यांना इंग्लंडांतच आसरा मिळाला होता; म्हणून इंग्लंडवर सर्व

युरपियन दरबारानीं शापांचा वर्षाव केला. ऑर्सिनी हा मॅझिनीचा त्याचप्रमाणें नेपोलियनचाहि मित्र होता. नेपोलियन व ऑर्सिनी हे दोघेहि तरुणपणीं कारबोनरी समितीचे सभासद होते. समितीच्या नियमाप्रमाणें इटलीच्या स्वातंत्र्यासाठीं यत्न करणें हें त्याचें कर्तव्य होतें; या कामीं त्यानें धरसोडीचें वर्तन चालविलें होतें; प्रतिज्ञाभंगासाठीं शिक्षा म्हणून ऑर्सिनीनें त्याचेवर बाँब फेंकले. " नेपोलियन मेला तर फ्रान्समध्यें पुन्हां लोकशाही स्थापन होईल व इटलीला फ्रान्सची मदत मिळेल " असें मॅझिनीला वाटत होतें; संस्थेशीं फितूर झाल्याबद्दल नेपोलियनला योग्य शिक्षा होणें जरूर आहे असें जुन्या कारबोनरींना वाटत होतें; एवढ्या प्राणसंकटांतूनहि सुटका झालीच तर निदान क्रान्तिकारकांबद्दल त्याच्या उरांत धडकी भरून तो इटलीसाठीं कांहीं तरी करील असें या बेताची बातमी असणाऱ्या लोकांना वाटत होतें. ऑर्सीनीला कैद केल्यापासून चोवीस तासांच्या आंत नेपोलियनच्या हातीं क्रान्तिकारकांनीं खलिता पाठविला कीं, गुन्हेगारांना माफी देऊन इटलीसाठीं तरवार उपसण्यांत आपण माघार घ्याल तर लवकरच आपली रवानगी यमलोकीं करण्यांत येईल ! नेपोलियननें तुरुंगांत ऑर्सीनीची गांठ घेतली; त्यावेळीं ऑर्सीनीनें त्याला एक पत्र दिलें. प्रस्तुत अत्याचारामुळें आपण बिलकुल घाबरलों नाहीं हें दाखवावयासाठीं बादशहानें आरोपींना बचावाची परवानगी दिली व त्यांची चौकशी पंचांमार्फत होईल असें जाहीर केलें. चौकशीच्या वेळीं आरोपींच्या वकीलानें वरील पत्र वाचून दाखविलें. केवळ इटलीसाठींच नव्हे तर युरोपमध्यें शांतता नांदावी यासाठीं फ्रान्सनें इटालीला मदत करणें जरूर आहे, अशी प्रस्तावना करून ऑर्सीनी म्हणतोः–' महाराज, पहिल्या नेपोलियनसाठीं माझ्या बापानें आपलें रक्त सांडलेलें आहे; बादशहाच्या कीर्तीसाठीं इटालियनांनीं युरोपच्या अनेक रणांगणांवर आपले प्राण अर्पण केले आहेत–हें आपण ध्यानांत आणा. इटली परतंत्र आहे तोंपर्यंत युरोपांत शांतता नांदणें शक्य नाहीं...माझा देश आपण स्वतंत्र कराल तर आपणांस अडीच कोट लोकांचा आशीर्वाद मिळेल. " आर्सीनीचा वकील जूल्स् फेव्हर यानें पंचांपुढें मोठें तडफदार भाषण केलें; पण त्याचा कांहीं उपयोग न होतां पंचांनीं कटवाल्यांना फांशीची शिक्षा सुनावली. फांशी जावयाचे अगोदर दोन दिवस ऑर्सीनीनें आपलें दुसरें पत्र नेपोलियनला दिलें. या पत्रांत तो म्हणतोः ' माझे हातून घडलेल्या अत्याचाराबद्दल मला फार वाईट वाटत आहे...कोणाचा खून करून

देशाचा उद्धार होणें शक्य नाहीं हें मला फार उशीरां समजून आलें...ऐक्य स्वार्थत्याग व सद्गुणसंवर्धन हाच राष्ट्रोद्धाराचा खरा मार्ग आहे.' असें असें पत्र लिहिशील तर तुला माफी मिळेल अशी आर्सीनीला आशा लावण्यांत आली होती, कटवाल्यांच्या क्षोभाला आपण बळी पडूं नये म्हणून नेपोलियननें ऑर्सीनीची विनवणी केल्यावरून त्यानें स्वत:च्या मृत्यूपूर्वी याचकाची इच्छा पूर्ण केली, असे या पत्राबद्दल अनेकांचे अनेक तर्क आहेत. ता. १३ मार्च रोजीं या इटालियन गुन्हेगारांना फांशीं देण्यांत आलें. फांसावर चढतांना ऑर्सीनीनें गर्जना केली: ' इटली चिरायु होवो.'

नेपोलियनवर बाँब फेंकल्याची बातमी काव्हूरला मिळाली तेव्हां तो म्हणाला, देव करो व हा गुन्हेगार इटालियन न निघो ! पण दैवाची विपरीत घटना कळून येतांच त्याला आपलें राजकारण कोसळणार अशी धास्ती वाटूं लागली. ऑर्सीनीच्या कटाशीं संबंध अगर सहानुभूति असणारांना पीडमाँटच्या हद्दींत न येऊं देण्याची व्यवस्था त्यानें अगोदरच करून ठेवली होती. या संकटांतून बचावल्याबद्दल नेपोलियनचें अभिनंदन करण्याकरितां व्हिक्टर इमॅन्युएलनें स्वदस्तूरचें पत्र देऊन वकील पाठविला होता; पीडमॉट सरकारनें कटवाल्यांच्या बाबतींत अधिक तीव्र धोरण स्वीकारलें नाहीं तर आपण ऑस्ट्रियाबरोबर समेट करूं अशी बादशहानें या वकीलाला धमकी दिली. हें समजतांच व्हिक्टर इमॅन्युएलनें बाणेदारपणाचा जबाब पाठविला कीं, ' आम्ही आजपर्यंत कोणाच्याहि धमकावणीस भीक घातलेली नाहीं. राष्ट्राच्या इभ्रतीचें संरक्षण करणें हा आमचा धर्म आहे; आणि याबद्दल परमेश्वर व जनता यांना जाब देणें आम्हांला भाग आहे. आपल्या विश्वासूक मित्राजवळ वागण्याची ही रीत नव्हे; असें असूनहि आम्ही आपल्या मैत्रीची इच्छा करीत आहों ! " हें उत्तर मिळाल्यानंतर नेपोलियननें व्हिक्टर इमॅन्युएलला एक गोडी गुलाबीचें पत्र पाठविलें ! स. १८५८ च्या एप्रिल महिन्यांत नेपोलियनचा राजवैद्य गुप्त संदेश घेऊन प्रवासाच्या निमित्तानें टयूरिन येथें आला; त्यानें काव्हूर व व्हिक्टर इमॅन्युएल यांना बादशहाचा गुप्त संदेश कळविला. त्यावेळीं नेपोलियन हवा पालटण्याच्या निमित्तानें प्लोंबिएर्स येथें राहिला होता. संकेतानुसार अगदीं गुप्तपणें प्रवास करीत काव्हूर ता. २० जुलई रोजीं प्लोंबिएर्स येथें आला. दुसरे दिवशीं दोघांची मुलाखत झाली. ऑस्ट्रियानें पीडमाँटविरुद्ध चढाईचें धोरण स्वीकारलें तर युद्धांत फ्रान्सकडून पीडमाँटला मदत मिळेल असें बादशहानें कबूल केलें.

ऑस्ट्रियनांची इटलींतून हकालपट्टी करणें अवश्य आहे हें काव्हूरचें म्हणणें बादशहानें मान्य केलें. लॅाबर्डी व व्हेनिशिया हे ऑस्ट्रियन प्रांत व पोपच्या ताब्यांतील रोमाग्ना हा प्रांत पीडमॅांटला मिळावा आणि मदतीचा मोबदला म्हणून पीडमॅांटच्या ताब्यांतील सॅव्हॅाय परगणा फ्रान्सला मिळावा असें ठरलें. युद्धासाठीं निदान दोन लक्ष फ्रेंच सैनिक द्यावयाचें बादशहानें कबूल केलें. आपल्या पुतण्या प्रिन्स जेरोम नेपोलियन याला व्हिक्टर इमॅन्युएलनें आपली मुलगी द्यावी ही अट बादशहानें घातली तेव्हां मुलाखत निष्फळ होणार असें काव्हूरला वाटूं लागलें; कारण नेपोलियन कुलशीलानें व्हिक्टर इमॅन्युएलपेक्षां फार कमी दर्जाचा होता. राष्ट्राच्या हितासाठीं हा विलक्षण स्वार्थत्याग करणें जरूर आहे व कुलीनपणाच्या पोकळ कल्पनेच्या भरीस पडून ही संधि फुकट घालविणें घातुक आहे हें काव्हूरनें व्हिक्टर इमॅन्युएलच्या मनावर ठसविलें. ‘ माझ्या देहामुळें देशाचें कल्याण होत आहे म्हणून या विवाहाला माझी तयारी आहे ’ असें राजकन्येनेंच सांगितलें तेव्हां ही अट व्हिक्टर इमॅन्युएलनें मान्य केली. आतां ऑस्ट्रियाला चढाईचें धोरण स्वीकारण्यास भाग पाडणें एवढाच प्रश्न काव्हूरपुढें राहिला होता.

नेपोलियन व काव्हूर यांनीं हा तह इतका गुप्त ठेवला होता कीं, फ्रान्सच्या परराष्ट्रीय खात्यालाहि त्याची वार्ता नव्हती. पण असा कांहीं तरी तह झाला आहे अशी दाट वदंता युरोपांतील मुत्सद्यांमध्यें पसरली आणि प्रत्येक जण तहाच्या कलमांविषयीं तर्कवितर्क काढूं लागला. व्हेनीशिया प्रांत ऑस्ट्रियाला द्यावयाचा, मध्य इटली लुई नेपोलियननें घ्यावयाचा, लॅाबर्डी प्रांत पीडमॅांटला मिळावयाचा व पीडमॅांटमधील जबाबदार राज्यघटना रद्द करावयाची असा काव्हूर व नेपोलियन यांचा तह झाला आहे अशी मॅझिनीला बातमी लागली होती. ता. १ जानेवारी १८५९ रोजीं फ्रेंच दरबार भरला त्यावेळीं नेपोलियन ऑस्ट्रियन वकीलाला म्हणाला कीं, ‘ पॅरिस दरबार व व्हिएन्ना दरबार यांचे संबंध समाधानकारक नाहींत ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. ’ नवीन वर्षाच्या आरंभीं व्हिक्टर इमॅन्युएलचें प्रतिनिधिमंडळापुढें भाषण झालें. तो म्हणाला, ‘ आजची परिस्थिति अत्यंत आणीबाणीची आहे; कारण इतर दरबारांबरोबर झालेले तहनामे अबाधित ठेवावयास आम्ही उत्सुक असलों तरी इटलीच्या वेगवेगळ्या भागांतून ऐकूं येणाऱ्या जनतेच्या आक्रोशाकडे दुर्लक्ष करणें आम्हांस शक्य नाहीं. ’ राजाचे हे शब्द कानीं पडतांच

अनेक देशभक्तांच्या डोळयांत आनंदाश्रु उभे राहिले. या दोघां राज्यकर्त्यांची वरील वचनें प्रसिद्ध झालीं तेव्हां युरपियन मुत्सद्यांमध्यें मोठी खळबळ उडून गेली. इतक्यांत व्हिक्टर इमॅन्युएलच्या मुलीशीं प्रिन्स नेपोलियनचें लग्न झालें. ( ता. ३० जानेवारी १८५९ ). हे सर्व प्रकार पाहून ऑस्ट्रियानें लॉंबर्डी प्रांताच्या संरक्षणासाठीं इटलींत अधिक सैन्य पाठविलें. हें पाहतांच काव्हूर अधिक धिटाईनें वागूं लागला. त्यानें विशेष खर्चाकरितां म्हणून प्रतिनिधि-मंडळाकडे दोन कोट रुपयांची मागणी केली व ती तात्काळ मंजूर करण्यांत आली; त्यानें उभारलेल्या कर्जाचे रोखे विकत घेण्यासाठीं धनवंतांनीं अहमहमिका सुरू केली ! इटलीच्या स्वातंत्र्यासाठीं युद्ध होणार ही बातमी ऐकतांच हजारों स्वयंसैनिक पीडमॉंटमध्यें जमा होऊं लागले; ऑस्ट्रियाच्या सैन्यांतील इटालियन सैनिक फरारी होऊन, सरहद्दीवरील पोलिसांचा डोळा चुकवून पीडमॉंटकडे लोटूं लागले. युद्धामध्यें इटलीच्या इतर प्रांतांतील स्वयंसैनिकांचा उपयोग करूं नये ही तहनाम्यांतील अट काव्हूरनें नेपोलियनच्या गळीं पडून रद्द करविली. युद्धांत जय मिळाल्यास त्याचें सारें श्रेय फ्रान्सला आहे अशी नेपोलियनला फुशारकी मारतां येऊं नयें व भावी युद्धाला राष्ट्रीय स्वरूप यावें म्हणूनच त्यानें स्वयंसैनिकांच्या बाबतींत एवढा आग्रह धरला होता. या स्वयंसैनिकांना हुरूप यावा म्हणून काव्हूरनें त्यांचें नेतृत्व स्वीकारण्यासाठीं गॅरिबॉल्डीला * निरोप पाठविला; शिवाय स्वयंसैनिकांना आपल्या कह्यांत वागविणें संस्थानी लष्करी अंमलदारांना अशक्य झालें असतें. गॅरिबॉल्डी काव्हूरला भेटावयास आला तेव्हां तो दारवानाला आपलें नांव सांगेना; त्यानें वर जाऊन मालकाला सांगितलें कीं,

* सन १८४९ सालीं गॅरिबॉल्डी ऑस्ट्रियनांच्या तावडीतून मोठ्या शिताफीनें निसटून पीडमॉंटच्या हद्दींत पोर्टोव्हनीर बंदरांत दाखल झाला. त्यावेळीं गॅरिबॉल्डीला आसरा दिल्यास संस्थानावर संकट कोसळेल अशी युरोपियन आंतरराष्ट्रीय परिस्थिति होती; पण त्याला हद्दपार केल्यास देशांतच बंडाळी होईल अशीं चिन्हें दिसत होतीं. शेवटीं ता. ६ सप्टेंबर रोजीं त्याची संमति घेऊन त्याला कैद करून मोठ्या शिष्टाईनें त्याला हद्दपार करण्यांत आलें. येथून तो न्यूयॉर्कला गेला. १८५१ सालीं त्याला एका व्यापारी गलबताचा कप्तान नेमण्यांत आलें. स. १८५४ सालीं त्यानें इटलीच्या किनाऱ्यानजीकच्या कॅप्रेरा बेटाचा कांहीं भाग विकत घेतला व तेथेंच तो स्थायिक झाला होता.

'मोठी टोपी घातलेला व लठ्ठ काठी हातांत असलेला एक विचित्र मनुष्य खालीं आला आहे; तो स्वतःचें नांव सांगत नाहीं पण आपली भेट घेऊं इच्छितो.' हा विचित्र प्राणी कोण हें काव्हूरनें तत्क्षणीं ओळखलें. स्वयंसैनिकांच्या पलटणी उभारण्याचें काम गॅरिबॅल्डीकडे सोंपविण्यांत आलें. या पलटणीचे अधिकारी त्यानेंच नेमावे व त्यांचेवर खडया लष्करी नियमांचा अंमल चालूं नये असें ठरलें. या मुलाखतीनंतर गॅरिबॅल्डीची व्हिक्टर इमॅन्युएलबरोबर भेट झाली.

स्वसंरक्षणासाठीं सरहद्दीजवळ ऑस्ट्रियानें सैन्याची जमवाजमव केलेली पाहून ता. ८ मार्च रोजीं काव्हूरनें संस्थानी सैन्याची जमवाजमव करण्याबद्दल जाहीर हुकूम सोडला. इतकी तयारी झाली तरी नेपोलियनचें मन अझून हेलकावे खात होतें. इतक्यांत पीडमाँट व ऑस्ट्रिया यांमधील लढयाचा समेट करण्यासाठीं युरपियन राष्ट्रांची परिषद भरवावी अशी रशियानें सूचना केली. ऑस्ट्रियन व फ्रेंच सैन्य रोमन हद्दींतून काढून घ्यावें व इटालियन संस्थानांचा संघ निर्माण करून त्याचें अध्यक्षस्थान पोपला द्यावें अशा सूचनाहि रशियानें केल्या होत्या. पीडमाँटनें लष्करी हालचाली एकदम बंद केल्यास रशियाच्या सूचना आपण मान्य करूं असें ऑस्ट्रियानें जाहीर केलें (ता. १९–३ ५९); मात्र या शांततापरिषदेंत पीडमाँटचा प्रतिनिधि बोलावूं नये अशी अट ऑस्ट्रियानें घातली होती. शांततापरिषदेची कल्पना नेपोलियनला मान्य नव्हती; पण त्याची युद्धाची तयारी पुरी झाली नव्हती म्हणून त्यानें परिषदेच्या योजनेला संमति दिली. ता. २६ मार्च रोजीं काव्हूर व नेपोलियन यांची पॅरिस येथें मुलाखत झाली; नेपोलियननें वचन पाळलें नाहीं तर आपण राजीनामा देऊन या प्रकरणांतील सर्व गुप्त कागदपत्र प्रसिद्ध करूं अशी काव्हूरनें धमकी दिली तेव्हां एकदोन महिने दम धरण्याबद्दल नेपोलियननें त्याची विनवणी केली. काव्हूर स्वदेशीं परत गेल्यानंतर पॅरिस दरबारांत शांततेच्या गोष्टी चालू झाल्या. यावरून पीडमाँटला फ्रान्सची मदत मिळणार नाहीं असा पॅरिस येथील ऑस्ट्रियन वकीलाचा समज झाला व त्यानें ही बातमी आपल्या दरबारास कळविली. ऑस्ट्रियन साम्राज्याच्या मानानें पीडमाँट संस्थान अगदीं भिकार होतें; या भिकार राज्याचा नायनाट करावयासाठीं ऑस्ट्रियाचा बादशहा व त्याचें मंत्रिमंडळ अगदीं उत्सुक होतें. परिषदेच्या अटींच्या चर्चेमध्येंच कालहरण होत असलेलें पाहून ऑस्ट्रियन सरकारनें एप्रिल

महिन्याच्या प्रारंभीं आपल्या इटालींतील सेनापतीस युद्धाची पूर्वसूचना दिली; त्यानें मोहिमेवर निघावयाचा हुकूम सैनिकांस वाचून दाखविला; दुसऱ्या दिवशीं पीडमॉंटच्या वर्तमानपत्रांमध्यें हा हुकूम शब्दश: प्रसिद्ध झाला; तो वाचतांच व्हिक्टर इमॅन्युएलच्या अंगाची अगदीं लाही होऊन गेली. पीडमॉंटचें प्रकरण निकरावर येऊं लागलेलें पाहून युरपियन राष्ट्रांनीं शांततेचा प्रयत्न विशेष नेटानें चालविला. इंग्लंडनें सुचविलें कीं, शांतता-परिषदेस सर्व इटालियन संस्थानांचे प्रतिनिधि बोलवावे आणि ऑस्ट्रिया व पीडमॉंट या दोघांनींहि लष्करी हालचाली ताबडतोब बंद कराव्या. इंग्लंडच्या आग्रहामुळें नेपोलियननें ही सूचना मान्य केली व पीडमॉंटनें लष्करी हालचाली बंद कराव्या असा काव्हूरला निरोप पाठविला. फ्रान्सनेंच हात पाय गाळल्यावर काव्हूरला शांततेची योजना मान्य करण्याशिवाय गत्यंतर नव्हतें ! 'पीडमॉंटनें आपल्या लष्करी हालचाली बंद कराव्या अशी फ्रान्स व इंग्लंड यांची मागणी आहे; तसें करणें इटलीच्या दृष्टीनें अत्यंत घातुक आहे; तरीहि आम्ही ही मागणी मान्य करीत आहों.' हें उत्तर ता. १९ एप्रिल रोजीं काव्हूरनें पीडमॉंटच्या दरबारीं असलेल्या फ्रेंच वकीलाच्या हातांत दिलें; नंतर त्याला वाटूं लागलें, आपल्या सर्व आयुष्याची माती झाली ! प्रमुख युरपियन राष्ट्रें शांततेचा प्रयत्न करीत होतीं तेव्हां ऑस्ट्रियामध्यें युद्धाला उत्सुक असलेल्या माथेफिरूंचा पक्ष बळावत चालला होता; पीडमॉंटला फ्रान्सचें पाठबळ मिळणें शक्य नाहीं अशी ऑस्ट्रियन मुत्सद्यांची खात्री झाली होती; व्हिक्टर इमॅन्युएलला चिरडून टाकावयाची ऑस्ट्रियाच्या बादशहाची इच्छा अनावर झाली होती. इंग्लंड व फ्रान्स यांची जोडसूचना काव्हूर मान्य करील हें ऑस्ट्रियाच्या परराष्ट्रीय प्रधानाच्या स्वप्नींहि आलें नव्हतें; म्हणून ता. १९ एप्रिल रोजीं त्यानें या सूचनांचा अव्हेर करून ता २१ रोजीं पीडमॉंटकडे निर्वाणीचा खलिता पाठविला. "हा हुकूम पोंचतांच पीडमॉंटनें लष्करी हालचाल बंद केली पाहिजे; नाहीं तर ऑस्ट्रियन सरकारला पीडमॉंटबरोबर युद्ध जाहीर करणें भाग पडेल. या खलित्याचें उत्तर तीन दिवसांचें आंत मिळालेंच पाहिजे." हा खलिता हातीं येतांच (ता. २३) काव्हूरचा आनंद गगनांत मावेनासा झाला ! खलित्यांतील मजकूर लगेच तारेनें नेपोलियनकडे पाठविण्यांत आला; ऑस्ट्रियाकडून आगळीक झाली पाहिजे ही अट पुरी झाल्यामुळें आतां त्याला माघार घेणें अशक्य होतें. तार मिळतांच त्यानें फ्रेंच सैन्याला पीडमॉंटमध्यें जाण्याचा हुकूम दिला. ऑस्ट्रियन खलिता काव्हू-

रच्या हातीं आला त्यावेळीं साडेपांच वाजले होते; ता २६ रोजीं संध्याकाळीं बरोबर साडेपांच वाजतां त्यानें आपलें उत्तर ऑस्ट्रियन वकीलाच्या हवालीं केलें:–" रशिया, फ्रान्स व इंग्लंड यांनीं एकमुखानें केलेल्या व्यापक स्वरूपाच्या मागण्या आम्ही मान्य केलेल्या असल्यामुळें या बाबतींत आम्हांला अधिक विवेचन करतां येत नाहीं. " काव्हूरचें उत्तर मिळतांच युद्धाला सुरवात झाली.

युद्धाला सुरवात होतांच इटालियन जनतेचा उत्साह अमर्याद झाला. मॅझिनीचे बहुतेक सर्व अनुयायी पीडमाँट पक्षाला मिळाले. पीडमाँटनें इटलीच्या ऐक्यासाठीं व स्वातंत्र्यासाठीं युद्ध पुकारलें आहे असें काव्हूरनें जाहीर करावें असें मॅझिनीचें म्हणणें होतें. युद्धाला मॅझिनीचा पाठिंबा होता तरी पीडमाँटनें नेपोलियनचें साह्य घ्यावें हें त्याला अगदीं नापसंत होतें. रोमन लोकशाहीचा घात करणारा राजा पीडमाँटचा घात करण्यास चुकणार नाहीं; " इटलीचें सैन्य लॅाबर्डीमध्यें तळ देऊन युद्धाची वाट पहात आहे अशा वेळीं नेपोलियन शत्रूंशीं एकदम तह करील; " असें भविष्य त्यानें याच वेळीं वर्तविलें होतें; पण त्याच्या या भविष्याकडे त्या वेळीं कोणींहि लक्ष दिलें नाहीं. " स्वातंत्र्यसाधनासाठीं परक्यांची मदत घेणें म्हणजे स्वातंत्र्यदेवतेला भ्रष्ट करणें होय " असें त्यानें जाहीर केलें. " जुलमी ऑस्ट्रियाची हकालपट्टी करून फ्रेंचांची मांडलिकी स्वीकारण्यांत कोणता फायदा आहे हेंच मला समजत नाहीं...ऑस्ट्रिया व फ्रान्स यांपैकीं कोणाच्याहि तावडींत न सांपडणें हाच उत्कृष्ट मार्ग होय. " युद्ध जाहीर झालें तेव्हां काव्हूर म्हणाला, "जगत्पटावर आपण फांसा तर टाकला... इतिहासांत नमूद करून ठेवण्यासारखें कृत्य आपले हातून झालें ! " युद्धाची बातमी ऐकतांच मॅझिनी म्हणाला, " युद्धाला सुरवात होण्यापूर्वीच आपला पराभव झाला आहे ! "

या युद्धांत ऑस्ट्रियानें १६०००० सैन्य रणभूमीवर आणलें होतें. पीडमाँटचे ६०००० व फ्रान्सचे १२०००० सैनिक त्यांना तोंड द्यावयास तयार झाले होते. ऑस्ट्रियन सेनापतीनें वायफळ हालचाली करण्यांत तीन महिने फुकट घालविले. फ्रेंच सैन्याची पहिली तुकडी खुष्कीनें सेनिया पर्वत ओलांडून इटलींत आली व दुसरी तुकडी नेपोलियनसह जलमार्गानें जिनोआ बंदरांत उतरली. ता. ४ जून रोजीं फ्रेंच सेनापति मॅक–मोहन यानें मॅजेंटा येथें ऑस्ट्रियन सैन्याचा पराभव केल्यामुळें मिलनचा मार्ग मोकळा झाला. ता. ८ जून रोजीं व्हिक्टर इमॅन्युएल व नेपोलियन या दोघांनीं मिलन शहरांत प्रवेश

केला. त्यांच्या स्वागतार्थ नागरिकांनीं मोठ्या थाटाचा उत्सव केला; स्वातंत्र्यप्राप्तीमुळें लोकांना इतका आनंद झाला होता कीं, नगरप्रवेशाचेवेळीं ते एकमेकांच्या गळ्यांत गळे घालून रडले ! असें सांगतात कीं आनंदातिशयामुळें कांहीं लोकांना वेड लागलें ! कोमो शहराजवळ गॅरिबॅाल्डीनें शत्रूचा पराभव करून मध्यरात्रीं शहरांत प्रवेश केला तेव्हां ऑस्ट्रियाची पलटण आली या समजुतीनें लोकांनीं खिडक्या दरवाजे बंद करून दिवे मालवून टाकले; पण हे सैनिक गॅरिबॅाल्डीचे आहेत हें कळतांच कोमो गांव एकदम जागृत झालें, जिकडे तिकडे प्रकाश दिसूं लागला व गांवकरी सैनिकांच्या गळ्यांत पडूं लागले व जिकडे तिकडे 'गॅरिबॅाल्डीकी जय' अशा गर्जना ऐकूं येऊं लागल्या ! ता. २४ जून रोजीं सालफेरिनो येथें फ्रेंचांनीं व सान मार्टिनो येथें इटालियनांनीं ऑस्ट्रियन सैन्याचा पराभव केला. लढाई सुरू झाल्यापासून एक महिन्याचे आंत इटालियनांनीं इतके महत्त्वाचे विजय मिळविले कीं आतां ऑस्ट्रियाची हकालपट्टी खास होणार अशी सर्वांना आशा वाटूं लागली.

युद्ध सुरू होतांच टस्कनी, पार्मा, बोलोना, मॅाडेना वगैरे इटालियन संस्थानांतील लोकांनीं आपल्या राज्यकर्त्यांना हांकून दिलें. त्यानंतर हीं संस्थानें प्रजेच्या बहुमतानें पीडमॅाटच्या राज्यांत आपखुषीनें सामील झालीं. युद्धांत मिळविलेल्या विजयांमुळें व्हेनीशिया व लॅाबर्डी हे प्रांत पीडमॅाटला मिळाले होते. मध्य इटलींतील संस्थानांमध्येंहि याच प्रकारची चळवळ सुरू झाली होती. सर्व इटालियन संस्थानें एकत्र झालीं तर फ्रान्सच्या सरहद्दीवर एक समर्थ राष्ट्र निर्माण झालें असतें—नेपोलियनला हें नको होतें. राष्ट्रैक्याच्या व राष्ट्रस्वातंत्र्याच्या चळवळीमध्यें पोपच्या ऐहिक साम्राज्याचा शेवट होणें अपरिहार्य होतें; फ्रेंच प्रतिनिधिमंडळांत पोपच्या अनुयायांचें सामर्थ्य बरेंच मोठें असल्यामुळें त्यांना दुखविणें नेपोलियनच्या दृष्टीनें अनिष्ट होतें. ऑस्ट्रियन सैन्य स्वदेशाच्या सरहद्दीवर असल्यामुळें त्यांचा माणसांचा व मालमसाल्याचा पुरवठा हाताशीं होता; परदेशांत युद्ध करावयाची नेपोलियनला अगोदरपासूनच फिकीर वाटत होती. शिवाय प्रशियाच्या राजानें आपल्या सैन्याची हालचाल सुरू केली होती; फ्रान्सच्या पूर्व सरहद्दीवरील अल्सेस व लोरेन प्रांतांवर त्याचा फार दिवसांपासून डोळा होता; फ्रेंच सैन्य इटलींत अडकलें आहे अशा वेळीं प्रशियानें हल्ला केला असता तर फ्रान्सची स्थिति फार बिकट झाली असती. म्हणून रणांगणावर मिळालेल्या विजयांची माळ ताजी टवटवीत आहे तोंच तह करून

अम्रूनिशीं स्वदेशीं परत जावयाचा विचार कायम करून नेपोलियननें ऑस्ट्रियन बादशाहाची मुलाखत घ्यावयाचें ठरविलें.

ता. ९ जुलई रोजीं व्हिलाफ्रँका येथें ही मुलाखत झाली. "लँबर्डी प्रांत पीडमाँटला देण्यांत यावा; इटालियन संस्थानांचा एक संघ निर्माण करण्यांत येऊन पोपला त्याचें अध्यक्षस्थान द्यावें; टस्कनी व मॉडेना हीं संस्थानें पूर्वीच्या राज्यकर्त्यांना मिळावीं; व्हेनिशिया व मँटुआ प्रांत आस्ट्रियाच्या ताब्यांत रहावे; पार्मा व पायसेंझा या जहागिरी पीडमाँटमध्यें सामील करण्यांत याव्या आणि रोमाग्ना प्रांत पोपला परत देण्यांत यावा." या अटींवर तडजोड होऊन फ्रान्स व ऑस्ट्रिया यांनीं तहनामा कायम केला. "आल्पस् पर्वतापासून ॲड्रियाटिक समुद्रापर्यंत इटलीला स्वतंत्र व संघटित करावयासाठीं आम्हीं युद्ध पुकारीत आहों," या आपल्या जाहीर वचनाचा भंग करून नेपोलियननें ऑस्ट्रियाशीं तह केला. इटलीच्या राष्ट्रीय आकांक्षांचा धि:कार करून त्यानें बिनदिक्कतपणें इटालियनांचा गळा पोप व ऑस्ट्रिया यांच्या हवालीं केला. तहाच्या अटी ठरवितांना त्यामुळें काव्हूरला काय वाटेल याचा त्यानें विचारहि केला नव्हता. सरकारी रीतीनें तहाचा मसुदा हातीं आल्यानंतर त्यावर सही करण्याशिवाय गत्यंतरच नसल्यामुळें व्हिक्टर इमॅन्युएलनें तहनाम्यावर "फक्त स्वत:पुरती" * सही करून नेपोलियनला उत्तर पाठविलें कीं, "आपला निर्णय कसाहि असला तरी इटलीच्या स्वातंत्र्यासाठीं केलेल्या मदतीबद्दल मी सदैव आपला ऋणी राहीन."

ता. ८ जुलई रोजीं युद्ध तहकूब झाल्याची बातमी मिळतांच काव्हूरनें छावणीचा मार्ग धरला. व्हिक्टर इमॅन्युएलनें त्याला तहाच्या अटी कळविल्या तेव्हां तर तो संतापानें वेडा झाला. हें युद्ध घडवून आणण्यांत त्यानें मुत्सद्देगिरीची शर्थ केली होती, युद्ध चालू असतांना सर्व व्यवस्था ठेवण्यासाठीं त्यानें अहोरात्र अविश्रांत श्रम केले होते, युद्धांत मिळालेल्या विजयांमुळें इटलीला स्वातंत्र्य

---

* तहनाम्याला व्हिक्टर इमॅन्युएलनें 'फक्त स्वत:पुरती' ( so far as concerns myself ) संमति दिली होती; या तहनाम्यानें आपली प्रजा व इटालियन जनता बांधली गेलेली नाहीं हें त्यानें या शब्दसमुच्चयामुळें स्पष्ट केलें होतें; आणि याच शब्दांच्या अनुरोधानें काव्हूरनें राजकारण चालवून इटलीच्या ऐक्याचा पहिला हप्ता पुरा केला.

मिळणार अशीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं होतीं; तोंच नेपोलियनच्या विश्वासघातामुळें त्याच्या आकांक्षाचा चुराडा उडाला. इटलीच्या स्वातंत्र्यासाठीं त्यानें जन्मभर आपले मनोविकार आंवरून धरले होते; नामर्द नेपोलियननें ऐन आणीवाणीच्या वेळीं अत्यंत नीचपणें आडून घाव घालून इटलीला पुन्हां पारतंत्र्यांत ढकलून दिलें; ऐन वेळीं असा विध्वंस झालेला पाहून काव्हूरचे मनोविकार अगदीं अनावर झाले. राजानें त्याला शांत करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण त्वेषामुळें बेभान झालेला काव्हूर त्याला फार टाकून बोलला. राजानें ऑस्ट्रियाबरोबर व प्रसंग पडल्यास नेपोलियनबरोबरहि एकाकीच युद्ध चालू ठेवावें असा त्यानें हट्ट धरला होता. नेपोलियनचा व ऑस्ट्रियाचा तह झाला होता; त्या दोघांचींहि सैन्यें इटलींतच होतीं; त्यांच्या संयुक्त सामर्थ्याला तोंड देणें अशक्य असल्यामुळें तहनामा मंजूर करण्याशिवाय दुसरा मार्गच उरला नव्हता; म्हणूनच या अटी मान्य केल्या पाहिजेत असें राजाचें म्हणणें होतें; हें तर्कशास्त्र काव्हूरच्या विकारवश मनाला नापसंत झाल्यामुळें त्यानें राजीनामा दिला; राजानें मोठ्या कष्टानें पण निश्चयानें तो मंजूर केला.

टस्कनी, पार्मा, मॉडेना, व रोमाग्ना ही संस्थानें युद्धाच्या आरंभीं पीडमॉटच्या राज्यांत सामील झालीं होतीं. व्हिलाफ्रँकाच्या तहानुसार तेथील सुभेदारांना परत बोलावण्यांत आलें; सरकारी रीतीनें त्यांनीं आपला अधिकार सोडला पण पीडमॉटमध्यें सामील व्हावयाची जनतेची खरी इच्छा पूर्ण करावयासाठीं सदरहू तहनामा धाब्यावर बसवून लोकांच्या वतीनें त्यांनीं सर्व अधिकार आपल्या हातीं घेतले! त्यांच्या या राजकारणाला काव्हूरचा पूर्ण पाठिंबा होता. या सर्व संस्थानांनीं ‘ एमिलिया ’ नांवाचा संघ स्थापन केला. मॉडेनाचा सुभेदार फारिनी व टस्कनीचा पुढारी रिकाझोली या दोघांनीं संयुक्त–संस्थानासाठीं चाळीस हजार सैन्य उभारलें. वरील संस्थानांतील लोकनियुक्त प्रतिनिधींनीं जुन्या राज्यांची इतिश्री झाली असून आपलीं संस्थाने पीडमॉटच्या राज्यांत सामील झालीं आहेत असें जाहीर केलें! प्रजेच्या इच्छेमुळें पीडमॉटचें सामर्थ्य वाढत चाललेलें ऑस्ट्रियाला, त्याचप्रमाणे नेपोलियनलाहि पाहवलें नाहीं; पण नेपोलियनचें सैन्य अझून इटलींतच असल्यामुळें मध्य इटलींतील प्रजेचें पारिपत्य करणें ऑस्ट्रियाला अशक्य होते. त्यावेळीं इंग्लंडांत लार्ड पामर्स्टन प्रधानपदावर होता व इटलीच्या ऐक्याशीं त्याची सहानुभूति होती; इंग्लंडशीं वैर उभारण्याची हिम्मत नसल्यामुळें पीडमॉटचा पाडाव करणें नेपो-

लियनलाहि अशक्य होतें. वरील संस्थानें आपल्या राज्यांत सामील करून घ्यावयाची व्हिक्टर इमॅन्युएलची इच्छा होती; पण ऑस्ट्रिया व फ्रान्स यांजबरोबर वैर उभारून राजाची व जनतेची इच्छा पुरी करावयाचें धाडस, काव्हूरच्या मागून प्रधानपदावर आलेल्या राटेझीच्या अंगीं नव्हतें; म्हणून नव्या प्रधानमंडळानें झ्यूरिचच्या परिषदेंत व्हिलाफ्रँकाचा तह कायम करून वरील संस्थानांचा प्रश्न एका स्वतंत्र परिषदेवर सोंपविण्यांत यावा असें ठरविलें. युद्धासाठीं दिलेल्या मदतीचा मोबदला म्हणून काव्हूरनें नेपोलियनला प्लोंबिएर्सच्या मुलाखतींत सॅव्हॉय प्रांत देण्याचें कबूल केलें होतें; व्हिलाफ्रँका येथील तहानंतर मोबदल्याची शर्त आपण स्वसंतोषानें सोडून दिली आहे असें नेपोलियननें जाहीर केलें होतें. मध्य इटलींतील संस्थानें पीडमाँटच्या राज्यांत सामील होत आहेत हें पाहतांच त्यानें तहाचा मसुदा कायम करण्याची निकड लावली. तहनामा कायम झाल्यानंतर थोडक्याच दिवसांनीं काव्हूर पुन्हां प्रधानपदावर आला. (ता १६ जानेवारी १८६०). युरपियन राष्ट्रांमध्यें फ्रान्सचें वजन वाढत चाललें होतें ही गोष्ट इंग्लंडला अनिष्ट वाटत होती. व्हिलाफ्रँका येथील तहामुळें इटालियन लोक नेपोलियनवर चिडून गेले आहेत हें पाहून फ्रान्सचें वजन कमी करण्याकरितां इटालियनांना राष्ट्रैक्य मिळविण्यासाठीं शक्य तितकी मदत करावयाचा लॉर्ड पामर्स्टनचा इरादा होता. हें दिसून येतांच काव्हूरनें जाहीर केलें कीं, ' मध्य इटालींतील लोकांच्या विनंतीचा याउपर अव्हेर करणें पीडमाँट सरकारला अशक्य वाटत आहे. ' आपल्या मदतीमुळेंच पीडमाँटचा राज्यविस्तार होत आहे तेव्हां आपण ठरलेला मोबदला तरी कां घेऊं नये, असा विचार करून नेपोलियननें सॅव्हॉय व नीस हे सरहद्दीवरील प्रांत फ्रान्सला जोडण्यांत यावे अशी काव्हूरकडे मागणी केली. प्लोंबिएर्सच्या मुलाखतींत फक्त सॅव्हॉय प्रांताबद्दलच भाषा झाली होती; नेपोलियननें बेशरमपणें नीस प्रांताचीहि मागणी केल्यामुळें काव्हूरचा अगदीं तिळपापड झाला. पण फ्रेंच सैन्य अझून इटलींतच होतें व नीस प्रांताची मागणी अमान्य होतांच बोलोना व फ्लॉरेन्स हीं शहरें हस्तगत करून घ्यावयाचा गुप्त हुकूम फ्रेंच सेनापतीस मिळालेला होता. सॅव्हॉय व नीस हे दोन प्रांत आपण घेणार आहों असें पॅरिस दरबारनें इंग्लंडच्या परराष्ट्रीय प्रधानास कळविलें होतें; फ्रान्सच्या या धोरणाचा इंग्लंडनें मुळींच निषेध केला नाहीं, म्हणून या बाबतींत आपणांस इंग्लंडची कांहींच मदत होणार नाहीं असा निर्णय करून काव्हूरनें ता. २४ मार्च

१८६० रोजीं सॅव्हॉय व नीस हे प्रांत नेपोलियनला द्यावयाच्या गुप्त तहावर सही केली. !

मध्य इटलींतील संस्थानें पीडमाँटच्या राज्यांत सामील करावयाचा प्रश्न काव्हूरनें जनतेच्या मतावर सोंपविला. सदरहू संस्थानांतील शेंकडा सत्तर लोकांनीं पीडमाँटच्या राज्यांत सामील होण्याची इच्छा दर्शविली. सर्व राज्यांतील एक कोटि दहा लक्ष प्रजाजनांच्या प्रतिनिधींचें पहिलें इटालियन पार्लमेंट ता. २ एप्रिल १८६० रोजीं ट्युरिन येथें भरविण्यांत आलें. राजाने प्रतिनिधींचें स्वागत केल्यानंतर काव्हूरनें सॅव्हॉय व नीस प्रांताचा गुप्त तहनामा सभेपुढें मंजुरीसाठीं मांडला. या तहनाम्यावर दहा दिवस वादविवाद चालला होता. सॅव्हॉय ही काव्हूरची जन्मभूमि असल्यामुळें हा प्रांत तोडून देतांना त्याचें अंतःकरण तुटत होतें पण काळावर नजर देऊन त्यानें आपलें दुःख गिळलें होतें. नीस ही गॅरिबॅाल्डीची जन्मभूमि होती; हा प्रांत परक्यांच्या ताब्यांत जात असलेला पाहून तो अगदीं चिडून गेला. संतापाच्या भरांत त्यानें काव्हूरवर कठोर वचनांचा वर्षाव केला. इटालियन प्रतिनिधींनींहि काव्हूरवर जोराचा हल्ला केला. प्रतिपक्षाच्या आरोपांचें खंडन करतांना काव्हूर म्हणाला:—' ज्या राजकीय धोरणामुळें आजचें इटालियन पार्लमेंट संघटित झालें तें धोरण यशस्वी करण्यासाठीं सॅव्हॉय व नीस हे प्रांत फ्रान्सला तोडून देणें अवश्य होतें. हे प्रांत देतांना आमचें अंतःकरण तुटलें नाहीं असें नाहीं. ह्या बाबतींत लोकनिंदेचा भडिमार आपणांस सहन करावा लागेल अशीच आमची अपेक्षा होती. पण केवळ इटलीच्या कल्याणासाठींच आम्हीं या तहावर सही केली. ' काव्हूरचें विस्तृत, मुद्देसूद व समंजस भाषण ऐकल्यानंतर प्रतिनिधींनीं जड अंतःकरणानें ता. १२ एप्रिल १८६० रोजीं हा तहनामा बहुमतानें मंजूर केला.

*　　*　　*　　*

लढाई सुरू होतांच मॅझिनीनें जाहीर केलें कीं, " इटलीचें नांव निष्कलंक राखण्यासाठीं सर्वांनीं पक्षभेद बाजूला ठेवून एकजूट होणें अवश्य आहे. "राष्ट्रैक्य व राष्ट्रस्वातंत्र्य हें इटलीचें ध्येय आहे आणि त्यासाठींच हें युद्ध उभारण्यांत आलें आहे असें राजानें जाहीर केलें तर त्याला मदत करण्याची आपण शिकस्त करूं असें मॅझिनीनें जाहीर केलें. लॅांबर्डी व व्हेनिशिया प्रांतांमध्यें संयुक्त सैन्य चढाई करीत होतें त्यावेळीं मध्य इटलीमध्यें स्वयंसैनिकांनीं पोपचें ऐहिक

साम्राज्य राष्ट्राधीन करून घ्यावें आणि दक्षिण इटलीमधील लोकांनीं क्रान्ति करावी पण युद्धाचा शेवट होईपर्यंत पीडमॉटमध्यें सामील होण्याची घाई करूं नये असें त्याचें मत होतें. सॉलफेरिनोच्या जयाची बातमी ऐकतांच त्याला वाटलें कीं, " या क्षणींच ऑस्ट्रियाचें इटलींतील वर्चस्व लयाला गेलें ! " पण व्हिलाफ्रँकाची बातमी ऐकतांच, हें तर आपण पूर्वींच भाकित केलें होतें, असें तो म्हणूं लागला ! असा विश्वासघात करावयाचा हें प्लोंबिएर्स येथें अगोदरच ठरलें होतें अशी त्याची कल्पना होती. ऑस्ट्रिया, रशिया व फ्रान्स या तिघांनीं युरोप खंडाची आपसांत वांटणी करून घ्यावयाचा कट केला आहे आणि व्हिला-फ्रँकाचा तह ही या कारवाईची प्रस्तावनाच आहे असें त्याला वाटत होतें. एवढा विश्वासघात झाला तरी मध्य इटलीचें संरक्षण करावयाचा व्हिक्टर इमॅन्युएलचा संकल्प झाला आहे हें मॅझिनीला ठाऊक नव्हतें.

बॅरन रिकाझोली या लोकप्रिय व तडफदार सरदाराला फ्लॉरेन्सच्या लोकांनीं टस्कनीचा सर्वसत्ताधारी नेमलें होतें. इटलीच्या ऐक्यावर व उज्वल भवितव्या-वर त्याची निष्ठा होती. अशा आणीबाणीच्या वेळीं आपण तेथें जाऊन कांहीं तरी कार्य करावें या हेतूनें मॅझिनी १८६० च्या ऑगस्ट महिन्यांत फ्लॉरेन्सला गेला. पीडमॉट सरकारनें युद्ध सुरू होतांच सर्व राजकीय गुन्हेगारांना माफी दिली होती; मात्र या सर्वसाधारण माफीला मॅझिनी हा एकच अपवाद होता ! रिकाझोली हा पीडमॉट सरकारइतका हलक्या मनाचा नव्हता; मॅझिनीनें फ्लॉरेन्स येथील आपलें अस्तित्व जाहीर करूं नये या अटीवर रिकाझोलीनें त्याला शहरांत रहावयाची परवानगी दिली. मध्य इटलींतील लोकांना उद्देशून मॅझिनीनें एक पत्र प्रसिद्ध केलें. "राष्ट्रें ईश्वरानें निर्माण केलीं; आज तुम्हांला इटली हें राष्ट्र निर्माण करावयाचें आहे. प्रत्यक्ष परमेश्वरानें करावें इतक्या महत्वाचें कार्य करावयाचें तुमच्या नशीबीं आलें आहे. " मध्य इटलींतील लोकांनीं राष्ट्राची अब्रू रक्षण करावयाचें कार्य शिरावर घेतलें तर एकट्या पडलेल्या पीड-मॉटबरोबर युद्ध पुकारावयाचें धाडस नेपोलियनच्या अंगीं नाहीं हें मॅझिनी जाणून होता; इटलींतील संस्थानें जुन्या राजघराण्यांना परत मिळावीं असें युरोपांतील राज्यकर्त्यांनीं ठरविलें तर इटलीला कसलीच आशा नाहीं हें तो जाणून होता.

मॅझिनीनें याच सुमारास व्हिक्टर इमॅन्युएलला एक जोरदार पत्र पाठविलें. " राष्ट्राचा एक एक तुकडा राज्यांत सामील करून घ्यावयाचें धोरण भ्याडपणाचें

आहे...महाराजांनीं शपथपूर्वक जाहीर करावें कीं, इटलीचें एकीकरण पूर्ण होईपर्यंत आम्ही आमची तलवार म्यानांत घालणार नाहीं." मध्यइटलींतील संस्थानें राज्यांत सामील करून घ्यावयाची रॅटेझीला भीती वाटत होती; अशा अर्धवट राजधोरणाची मॅझिनीला मोठी चीड होती. " राजानें मध्यइटली प्रांत बेधडक आपल्या राज्यास जोडून घ्यावा...त्याचप्रमाणें दक्षिणेंत बंड उठविणें फार सोपें आहे; पीडमाँटनें या भानगडींत पडावयाचें कारण नाहीं; आमचें आम्हींच हें काम उरकून घेऊं...गॅरिबॉल्डीनें नेपल्स व रोम या संस्थानांवर हल्ला केला तर आपण त्याच्या आड येऊं नये...त्याला या प्रांतांमध्यें जय मिळणार व लगेच पीडमाँटच्या राज्यांत सामील व्हावयाची मागणी जनतेकडून होणार हें अगदीं निश्चित आहे. या दिशेनें राजकारण केल्यास आपणांस एकोणीसाव्या शतकांतील मुत्सद्यांचे अग्रणी हें अभिधान प्राप्त होईल !" हें पत्र व्हिक्टर इमॅन्युएलनें वाचलें असा पुरावा ब्रोफेरियो या इतिहासकारानें दिला आहे. मॅझिनीनें दाखवून दिलेल्या दिशेनेंच त्यानें इटलीचें एकीकरण घडवून आणलें हें पुढील इतिहास वाचतांच समजून येणार आहे.

# १०. राष्ट्रैक्य व राष्ट्रस्वातंत्र्य.

This is the banner, thy gonfalon far in the front
of thy fight,
Red as the hearts that were pierced for thee,
white as the mountains are white,
Green as the spring of thy soul everlasting,
whose lifeblood is light

*Swinburne.*

संयुक्त सैन्यानें ऑस्ट्रियाचा जागोजाग पराभव केला त्यावेळीं नेपल्स व सिसिली प्रांतांतील लोकांना अवसान भरूं लागलें. नेपल्स सरकारच्या राज्यपद्धतीबद्दल ग्लॅडस्टननें लॉर्ड अबर्डीनला १८५१ सालीं आपलें प्रसिद्ध पत्र पाठविलें, त्याचा उल्लेख पूर्वी आलेलाच आहे. " या राज्यपद्धतीमुळेंच लोकसत्तावादी क्रान्तिकारक निर्माण होत आहेत...येथील राजकीय गुन्हेगारांना नुस्त्या संशयावरूनहि इतक्या अमानुष रीतीनें वागविण्यांत येतें कीं, त्यामुळें धर्म, संस्कृति, कायदा व मानवता यांची इज्जत घेण्याचा सरकारनें जणूं काय विडाच उचलला आहे असें वाटूं लागतें... भीतीनें भेदरून गेलेल्या सरकारनें जनतेवर सूड घेण्याचा सपाटा चालविला आहे... सरकारनें न्यायदेवतेला बाजारबसवीच्या पायरीला नेऊन पोंचविलें आहे; शांति, स्वातंत्र्य व सद्गुण यांचा नाश करण्यासाठीं सरकारच्या हस्तकांनीं न्यायवेश्येच्या अंतर्गृहांत खोट्या शपथा, खोट्या सह्या, खोटे पुरावे वगैरे हीन गुन्ह्यांचा कारखानाच घातला आहे... अशा परिस्थितीमध्यें कायद्याबद्दल कोणालाहि आदर वाटणें शक्य नाहीं; या स्थितीमुळें येथील

सामाजिक व नैतिक जीवन मृतप्राय झालें आहे...राजा हा विष्णूचा अवतार आहे असें प्रतिपादन करणारे हे राजे प्रत्यक्ष सैतानाचे अवतार आहेत. ” अशा या बूर्बोन घराण्याच्या तावडींतून सुटावयासाठीं लोक तळमळत होते. या लोकांनीं बंड उभारावें यासाठीं मॅझिनीनें आपले प्रचारक तिकडे पाठविले होते; स. १८५१ पासून १८५८ पर्यंत बंडवाल्यांच्या कटाचे धागेदोरे या प्रचारकांच्या हातांत होते. सिसिलियन लोक बंडाला अगदीं तयार आहेत हें समजतांच मॅझिनीनें ता २ मार्च १८६० रोजीं त्यांना उद्देशून एक पत्र लिहिलें:- “ दोन वर्षांपूर्वीं, पिसाकाने याच्या उठावणीच्या वेळीं, आपण जें धोरण स्वीकारलें होतें तेंच धोरण आज मीं पुन्हां स्पष्टपणें तुम्हापुढें मांडीत आहें. आज इटली. पुढें राजसत्ता कीं लोकसत्ता हा प्रश्न उभा राहिलेला नाहीं; आजचा राष्ट्रापुढील प्रश्न राष्ट्रैक्य हा आहे; जिवंत रहावयाचें कीं नामशेष व्हावयाचें हा आजचा प्रश्न आहे. पीडमाँटचें राजघराणें इटलीला मान्य झालें तर बहुमताला आपण मान्यता दिली पाहिजे...तें कसेंहि होवो; आज आपण स्वस्थ बसतां कामा नये. नेपोलियन अथवा काव्हूर तुमची मुक्तता करावयास तिकडे धांवून येणार आहेत अशी तुमची कल्पना आहे काय?...आजच्या परिस्थितींत धाडस करून प्रत्यक्ष कार्याला सुरवात करणें हेंच तुमचें कर्तव्य आहे; तुम्हांला भरपूर पाठबळ मिळेल; मात्र हें धाडस तुम्ही इटलीच्या नांवानें केलें पाहिजे. गॅरिबॅाल्डी तुमच्या मदतीला येणार नाहीं असें होणें शक्य नाहीं. तुम्ही पुढाकार घेतांच मध्यइटलींतील स्वयंसैनिक तुमच्या मदतीला धांवून येतील अशी तुम्हीं खात्री बाळगा. ” सिसिलियन लोकांना एवढी चिथावणी पुरे झाली. बंडाची पूर्वतयारी पुरी झाली आहे हें समजतांच रोझॅलिनो पायलो या थोर घराण्यांतील सिसिलियन लोकसत्तावाद्यास मॅझिनीनें बंडवाल्यांचा पुढाकार घ्यावयास तिकडे पाठविलें; सिसिलींत जावयाचे अगोदर त्यानें गॅरिबॅाल्डीला या बंडाचा पुढाकार घ्यावयाची विनंति केली होती; गॅरिबॅाल्डीनें वचन दिलें होतें कीं, बंडवाल्यांनीं आठ दिवसपर्यंत टिकाव धरला तर आपण त्या मसलतींत सामील होऊं. हें वचन मिळतांच रोझॅलिनो सिसिलीकडे निघाला. मॅझिनीनें त्याला लहानसा खजिना व पिस्तुलांचा पुरवठा पुरविला होता. ता. ३ एप्रिल १८६० रोजीं पालेर्मो शहरीं बंड उभारावयाचें असें ठरलें होतें. समुद्रप्रवासांत तुफान झाल्यामुळें रोझॅलिनो ता. ११ रोजीं पालर्मो येथें आला. शहरांतील बंडवाल्यांनीं ठरलेल्या दिवशीं बंड उभारलें होतें; पण तें चारदोन

दिवसांतच गार झालें ! तरीहि खेड्यापाड्यांतून अझून बंडाळी चालू होती. पायलोनें त्यांचें आधिपत्य स्वीकारलें व शत्रूचें सैन्य फार भारी असतांहि त्यानें दीड महिना बंडाळी चालू ठेवली. पायलो आला नसता तर राज्यकर्त्यांनीं बंड लगेच मोडून टाकलें असतें. शेवटीं एका चकमकींत तो गोळी लागून ठार झाला; गॅरिबॉल्डी सिसिलींत आल्याची बातमी समजल्यामुळें अंतकाळीं त्याची मुद्रा प्रसन्न होती.

स. १८६० जानेवारीमध्यें काव्हूर पुन्हां प्रधानपदावर आला. त्यानें सॅव्हॉय व नीस हे प्रांत नेपोलियनला देऊन टाकल्याबद्दल मॅझिनीला मोठी चीड आली; लोकसत्तावाद्यांना हाणून पाडण्यासाठींच काव्हूरची सारी कारवाई चालली आहे अशी त्याची कल्पना होऊन बसली. दक्षिण इटलीमध्यें क्रांन्ति करावयाचें कार्य काव्हूरला हातीं घेतां येणें अगदीं अशक्य आहे हें मॅझिनीनें जाणलें होतें; म्हणूनच त्यानें हें कार्य नेटानें चालविलें होतें. बंडाचें नेतृत्व गॅरिबॉल्डीनेंच स्वीकारिलें पाहिजे व उठावणीला काव्हूरचें शाब्दिक पाठबळ असलें पाहिजे असा सिसिलींतील क्रान्तिकारक हट्ट घेऊन बसले होते. मॅझिनीनें उठवलेलीं इतकीं बंडें आजवर निष्फळ झालीं होतीं कीं त्याच्या नेतृत्वाखालीं उठविल्या जाणाऱ्या उठावणीबद्दल गॅरिबॉल्डीलाहि संशय वाटूं लागला होता ! एका मनुष्याच्या मर्जीवर क्रान्तीचें नशीब टांगून ठेवल्यानें घात होईल अशी मॅझिनीची खात्री होती, म्हणूनच त्यानें रोझॅलिनो पायलो याला सिसिलींत पाठविलें. बंडवाल्यांना उत्तेजन देण्यासाठीं मॅझिनी लुगॅनो येथें गेला. बंडवाल्यांच्या चिकाटीमुळें गॅरिबॉल्डीचा संशय नष्ट झाला आणि तो आपले एक हजार स्वयंसैनिक बरोबर घेऊन सिसिलीकडे रवाना झाला ! ( ता. ५ मे १८६० )

ता. ७ मे. रोजीं मॅझिनी जिनोआला आला. गॅरिबॉल्डी हा दक्षिणेंत गेल्यामुळें मॅझिनीला तिकडे लक्ष द्यावयाची आतां जरूर राहिली नव्हती; म्हणून पोपच्या मुलुखावर स्वारी करावयासाठीं त्यानें जिनोआ येथें स्वयंसैनिकांच्या तीन टोळ्या तयार केल्या; पण गॅरिबॉल्डीशिवाय हे लोक पुढें जावयास तयार होईनात ! गॅरिबॉल्डीच्या स्वारीची पूर्वतयारी करणारे स्वयंसैनिक बिक्सियो व मेडिसी यांना वाटूं लागलें कीं, या आणीबाणीच्या वेळीं मॅझिनीनें कांहीं स्वतंत्र कार्य हातीं घेतलें तर त्यामुळें दक्षिण इटलींतील कार्याचाहि घात होईल. मॅझिनीला वाटत होतें कीं मध्यइटलींत बंड उपस्थित झाल्यास कदाचित् लोकसत्तावाद्यांचें सामर्थ्य वाढेल, निदान पीडमाँट सरकार व फ्रान्स यामध्यें

कांहीं कटकट उपस्थित होऊन त्यांच्या दोस्तींत बिघाड येईल ! त्याला काव्हूर-च्या राजधोरणाबद्दल मोठा संशय वाटत असे. फ्रान्सच्या मदतीशिवाय ऑस्ट्रिया व नेपल्स यांच्या संयुक्त सैन्यापुढें पीडमॉंटचा टिकाव लागणें शक्य नाहीं हें त्याच्या नजरेस आलें नव्हतें. मॅझिनीच्या स्वारीशीं सहानुभूति असणाऱ्या लोकांना काव्हूरनें फितविलें व रोमकडे जाण्यासाठीं तयार झालेलें हें सैन्य गॅरिबॉल्डीच्या मदतीसाठीं सिसिलीकडे पाठविण्यांत आलें. जिनोआचें कार्य निष्फळ झालेलें पाहून मॅझिनी फ्लॉरेन्सला गेला. तेथें रोमवर स्वारी करावयासाठीं त्यानें आणखी एक पलटण उभी केली. या पलटणींत आठ हजार सशस्त्र स्वयंसैनिक सामील झाले होते. ह्या सैन्यानें सरहद्द ओलांडतांच जागोजाग बंडें उभारावयाची लोकांची तयारी होती.

नेपल्स व सिसिली प्रांतांतील आशाजनक बातमी मिळतांच गॅरिबॅाल्डीनें स्वयंसैनिकांची जमवाजमव सुरू केली. त्याच्या हाताखालीं लढावयास तयार झालेले लोक सुशिक्षित व इभ्रतदार होते. दीडशें वकील, शंभर डॉक्टर, शंभर व्यापारी, पन्नास इंजिनीयर, वीस रसायनशास्त्रज्ञ, तीस तांडेल, दहा छाप-खानेवाले व तीन पाद्री या पलटणींत सामील झाले होते; बाकीचे सर्व स्वयं-सैनिक विद्यापीठांतील विद्यार्थी होते ! ते धंद्याने शिपाई नव्हते तरी त्यांनीं आपल्या शिपाईगिरीमुळें जगाच्या इतिहासांत नांव कमावलें आहे; जगाच्या इतिहासांत आजवर अशी स्वारी कोणी कोणावर केली नाहीं व करणारहि नाहीं असा इतिहासज्ञांचा अभिप्राय आहे. स्वारीवर निघण्यापूर्वी गॅरिबॅाल्डीनें व्हिक्टर इमॅन्युएलला एक पत्र लिहिलें:–" जर सुदैवानें मला या स्वारींत यश आलें तर सिसिलीचें मौल्यवान् रत्न इटलीच्या राजमुकुटास जडविल्याचें श्रेय मला मिळेल ! " ऑस्ट्रियाबरोबर पीडमॉंटचा तह झाला होता; नेपल्सचा राजा ऑस्ट्रियाचा दोस्त होता; म्हणून नेपल्सवर स्वारी करणाराला उघडपणें प्रोत्सा-हन देणें व मदत करणें व्हिक्टर इमॅन्युएलला अशक्य होतें; मुत्सद्यांच्या दृष्टीनें पाहतां त्यानें या स्वारीला विरोध करावयास हवा होता. गेल्या युद्धाच्या शेवटीं गॅरिबॅाल्डीनें पीडमॉंटबरोबरचा आपला संबंध रीतीप्रमाणें तोडून टाकला होता; "क्रान्तीचा काळ थोडा असतो; लोकांचा उत्साह जागृत झालेला असतो तेव्हांच शक्य तितकें काम पुरें केलें पाहिजे " असें मॅझिनीप्रमाणें गॅरिबॅाल्डीचेंहि मत होतें; म्हणूनच तो या स्वारीवर निघाला होता. गॅरिबॅाल्डी लोकप्रिय होता व त्याचा बेत ऐकून जनतेचा उत्साह अनावर झाला होता; शिवाय त्याच्या

कर्तबगारीवर राजाचा पूर्ण विश्वास होता; म्हणूनच त्याला स्वारीवर जाऊं द्यावयाचें काव्हूरनें निश्चित केलें. पण इतर राजदरबारांना पाठविलेल्या खलित्यांमध्यें काव्हूरनें असें धोरण ठेवलें होतें कीं, त्यामुळें या स्वारीला पीडमाँटची बिलकुल सहानुभूति नाहीं अशीच सर्वांची कल्पना व्हावी; आणि हें धोरण त्यानें इतक्या शिताफीनें पार पाडलें कीं, मॅझिनीच्या अनुयायांनीं व खुद्द गॅरिबॉल्डीनेंहि त्याच्यावर शिव्याशापांचा वर्षाव केला !

स. १८६० च्या जुलई महिन्यांत इंग्लंडनें युरपियन मुत्सद्यांची कोंडी फोडली. लॉर्ड जॉन रसेल व लॉर्ड पामर्स्टन यांनीं गॅरिबॉल्डीला थोपवून धरण्याचें नाकारलें; इंग्लंडनें त्याच्या कार्याला सहानुभूति दाखविल्यामुळें युरपियन दरबारांचा नाइलाज झाला. इंग्लंडच्या या सहानुभूतीचें श्रेय ग्लॅडस्टनच्या पत्रालाच आहे. नेपोलियनचें सैन्य अझून इटलींतच असल्यामुळें ऑस्ट्रियाला हालचाल करणें अशक्य झालें होतें. इंग्लंडच्या सहानुभूतीची मजल प्रत्यक्षपणें कोठवर जाईल याचा अंदाज न झाल्यामुळें युरपियन दरबारांना स्वस्थ राहणें भाग होतें. गॅरिबॉल्डीला यश येईल ही कल्पना त्याच्या स्वारीइतकीच धाडसाची होती; कारण त्याच्या एक :हजार स्वयंसैनिकांना नव्वद हजार खडें सैन्य पदरीं असणाऱ्या राजाशीं टक्कर द्यावयाची होती ! गॅरिबॉल्डी स्वारीवर निघेपर्यंत त्याला मदत करावयाची कीं नाहीं याबद्दल काव्हूरचा निश्चय झालेला नव्हता. त्याला जय मिळाला तर त्यापासून पीडमॉटचा फायदा होणार हें निश्चितच होतें; पण त्याचा पराभव झाला तर त्यामुळें पीडमाँटला धोका येऊं नये म्हणून युरपियन दरबारांची फसवणूक करण्यासाठीं काव्हूरनें आपल्या जाहीरनाम्यांमध्यें दुटप्पी धोरण ठेवलें होतें.

ता. ११ मे रोजीं गॅरिबॉल्डी मार्सोला बंदरांत जमिनीवर उतरला. नेपल्सचें आरमार त्याचा पाठलाग करीत होतें; तें बंदराजवळ दाखल झालें त्यावेळीं मार्सोला येथील ब्रिटिश नागरिकांचें रक्षण करण्याकरितां दोन ब्रिटिश लढाऊ गलबतें बंदरांत नांगर टाकून उभीं होतीं. नेपल्सच्या आरमारी अधिकाऱ्याची कल्पना झाली कीं, हीं जहाजें गॅरिबॉल्डीला मदत करावयासच आलीं आहेत ! या समजुतीनें त्यानें इटालियन स्वयंसैनिकांना खुशाल जमिनीवर उतरूं दिलें ! युद्धाला निघावयाचे अगोदरच गॅरिबॉल्डीनें सर्व अधिकार आपल्या हातीं घेऊन व्हिक्टर इमॅन्युएलच्या नांवानें द्वाही फिरविली. ता. १२ मे रोजीं त्यानें

पालर्मोच्या दिशेनें कूच केलें; वाटेंत एकएक सिसिलियन स्वयंसैनिक त्याला मिळूं लागले. मधून मधून लहान सहान चकमकी करीत करीत अगदीं अनपेक्षित दिशेनें गॅरिबॅाल्डी पालर्मो शहरापुढें एकदम येऊन उभा राहिला, ता. २७ मे रोजीं पहांटे चार वाजतां तो शहरांत शिरला; लगेच रस्त्यांमध्यें जागोजाग मोर्चे उभारण्यांत आले, वीस हजार सैन्याबरोबर सुमारें चार तास लढाई केल्यानंतर सर्व शहर त्याच्या ताब्यांत आलें; पण पालर्मो किल्ला अजून शत्रूच्याच ताब्यांत होता; या किल्ल्यावरून व बंदरांतील जहाजांवरून त्यांनीं शहरांवर तोफा चालू केल्या. ता. २७ व २८ रोजीं सारखी लढाई सुरू होती. दारुगोळा संपत आला म्हणून गॅरिबॅाल्डी मोठ्या फिकीरींत होता तोंच नेपल्सच्या सेनापतीनेंच युद्धतहकुबीचें बोलणें लावावयासाठीं त्याजकडे सरकारी वकील पाठविला! ता ७ जून रोजीं तहाच्या अटींप्रमाणें वीस हजार सैनिक शहर सोडून निघून गेले. सिसिली बेट गॅरिबॅाल्डीच्या ताब्यांत गेलेलें पाहून नेपल्सच्या राजानें नेपोलियनकडे आपला वकील पाठविला; राष्ट्रीयत्वाच्या तत्वासाठीं लॅाबर्डीमध्यें युद्ध करणाऱ्या फ्रेंच बादशाहाला त्याच तत्वाविरुद्ध नेपल्सच्या राजाला मदत करतां येणें अशक्य होतें; नेपल्सच्या राजानें जनतेला सुराज्याचें हक्क देण्याचें कबूल केलें पण आतां एवढ्या तडजोडीनें संतुष्ट रहावयास लोकच तयार नव्हते. ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, रशिया व ऑस्ट्रिया या राष्ट्रांनीं गॅरिबॅाल्डीला नेपल्सवर स्वारी करूं देऊं नये एवढें मात्र केलें; पण त्यांचे हे जाहीरनामे गॅरिबॅाल्डीनें गुंडाळून ठेवले.. त्यानें सिसिली बेट काबीज केलें तेव्हां काव्हूरने ॲडमिरल फॅरिना यास तिकडे पाठविलें; सिसिलियन लोकांनीं पीडमॅांटच्या राज्यांत सामील व्हावें यासाठीं खटपट करावयाचा त्याला हुकूम होता. पण गॅरिबॅाल्डी हा सिसिलीचा सर्वसत्ताधारी होता. त्यानें फॅरिना याला हुसकून लावलें. ता. २५ जून रोजीं त्यानें मिलॅझो येथील लढाईंत शत्रूच्या बारा हजार सैन्याचा पाडाव केला. या विजयानंतर त्याला व्हिक्टर इमॅन्युएलचीं दोन पत्रें मिळालीं. दरबारी खलित्यांत राजानें त्याला नेपल्सवर स्वारी करूं नये असा हुकूम केला होता व खासगी पत्रांत या दरबारी आज्ञेचा इनकार करावयाची विनवणी केलेली होती! हीं पत्रें मिळतांच राजाची आपल्या कार्याशीं असलेली सहानुभूति पाहून त्याचें अंत:करण भरून आलें राजाला पाठविलेल्या उत्तरांत तो म्हणतो: " माझ्या देशबांधवांना जुलमांतून मुक्त करावयाचें कार्य मी शिरावर घेतलें आहे; ह्या कार्यांत मला यश आलें तर माझी तरवार आपल्या

चरणांशीं ठेवून मी जन्मभर आपला अंकित राहीन ! ” गॅरिबॉल्डीनें दरबारी आज्ञेचा धिक्कार केला व नेपल्सवर स्वारी करावयाची तयारी केली.

ऑगष्ट महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत गॅरिबॉल्डी नेपल्सच्या किनाऱ्यावर दाखल झाला; त्यावेळीं दक्षिण इटलींतील बंडाळीला नुक्तीच सुरवात झाली होती. बंडाची बातमी प्रसिद्ध होतांच नेपल्सच्या लष्करांतील हजारों सैनिक हत्यारें खालीं टाकून घरोघर निघून गेले. किनाऱ्यावर उतरतांच गॅरिबॉल्डीनें रेजिया किल्ला काबीज केला; येथें त्याला पुष्कळ लढाऊ सामान मिळालें. राजानें नेपल्सच्या संरक्षणाकरितां सुमारें चाळीस हजार सैन्य जमविलें होतें; पण लष्करी अधिकाऱ्यांना गॅरिबॉल्डीच्या नुसत्या नांवाची इतकी धडकी भरली होती कीं, राजानें युद्धाला उभें न राहतां गेइटा किल्ल्यांत पळ काढावा असा त्यांनीं सल्ला दिला ! इकडे गॅरिबॉल्डी इतका अधीर झाला होता कीं, आपलें सारें सैन्य मागें ठेवून फक्त कांहीं अधिकाऱ्यांना बरोबर घेऊन तो आगगाडीनें नेपल्सला जावयास निघाला ! ही बातमी कानीं येतांच राजानें ता. ६ सप्टेंबर रोजीं नेपल्सहून गेइटाकडे पळ काढला ! ता. ७ सप्टेंबर रोजीं गॅरिबॉल्डीनें नेपल्स शहरांत प्रवेश केला त्यावेळीं त्याला विरोध करावयास कोणीच पुढें आला नाहीं; नगरप्रवेशाचे वेळीं नागरिकांनीं मोटा उत्सव करून त्याचें स्वागत केलें. निवळ नांवाच्या जादूगिरीनें नेपल्स शहर काबीज केल्यावर, किल्ल्याच्या बुरुजावर व्हिक्टर इमॅन्युएलचीं निशाणें लावून बंदोबस्तासाठीं त्यानें आसपासच्या मुलखांत सैन्याच्या टोळ्या पाठविल्या. शांतता प्रस्थापित होतांच जागोजाग नवीन अधिकारी नेमून त्यानें शिस्त लावण्यास सुरवात केली. ज्याचा शेवट गोड तें सर्वच गोड हा न्याय येथेंहि लागू पडतो; तरी बूर्बोन राजानें लढावयाचा धीर करून निकराचा यत्न केला असता तर गॅरिबॉल्डीची अवस्था मोठी कठीण झाली असती यांत संशय नाहीं; पण अलौकिक पुरुषांचें दैवहि अलौकिक असतें !

गॅरिबॉल्डीच्या विजयाची बातमी मिळतांच मॅझिनी नेपल्सला गेला. गॅरिबॉल्डीच्या विकारवश मनावर मॅझिनीच्या लोकसत्ताक तत्वांचा परिणाम होऊन नव्या राज्यांत लोकशाही जाहीर झाली तर कदाचित् पीडमॉंटमध्यें सामील झालेलीं संस्थानें गॅरिबॉल्डीच्या पक्षाला मिळतील अशी काव्हूरला भीति वाटूं लागली. मॅझिनीनें रोमवर स्वारी करावयासाठीं तयारी करून ठेवली होती; त्याच्या या बेताला गॅरिबॉल्डीची सहानुभूति आहे हें कळतांच तो अधिकच

घाबरला. इटलीच्या कल्याणाकरितां नेपल्स व सिसिलीचें राज्य पीडमाँटच्या राज्याला जोडावें असा ठराव त्यानें इटालियन पार्लमेंटांत मंजूर करून घेतला. क्रान्तिकारकांना राजाविरुद्ध उठवून द्यावयाचा यत्न काव्हूरनें अगोदरपासूनच चालविला होता; त्यांनीं बंड करून पीडमॉटच्या राज्यांत सामील व्हावयाचा आग्रह धरावा यासाठीं काव्हूरनें आपले प्रचारक अगोदरच तिकडे पाठविले होते; पण बंडवाले उठावणी करावयास तयार नसल्यामुळें गॅरिबॅाल्डीचे हातून नेपल्सच्या राजाचा पराभव होईपर्यंत वाट पहात बसणं त्याला भाग पडलें. गॅरिबॅाल्डीनें नेपल्सचें राज्य काबीज केल्यानंतर इटालियन पार्लमेंटाचा ठराव त्याचे हातीं आला, त्याचप्रमाणें नेपल्समध्यें आपल्या विरुद्ध काव्हूरनें चालविलेल्या कारस्थानाची बातमी त्याला मिळाली; तेव्हां तो अगदीं चिडून गेला. काव्हूरनें सॅव्हॉय व नीस प्रांत नेपोलियनला बहाल केले त्या दिवसापासूनच गॅरिबॅाल्डी त्याच्यावर खवळला होता; शिवाय याच सुमारास मॅझिनीच्या मध्य इटलींतील बंडाच्या व स्वारीच्या कल्पनेबद्दल व तयारीबद्दल त्याला विशेष सहानुभूति वाटूं लागली होती. ऑस्ट्रियाकडून व्हेनीशिया, फ्रान्सकडून नीस व पोपकडून रोम हे प्रांत हिसकावून घ्यावयाचा धाडसाचा बेत यावेळीं त्याच्या मनांत घोळूं लागला होता ऑस्ट्रिया व फ्रान्स यांचें सैन्य त्यावेळीं इटलींतच होतें व रोमवर स्वारी केल्यास फ्रान्समधील कॅथलिकपंथाच्या लोकांना खूष करण्याकरितां गॅरिबॅाल्डीला निरोध करणें नेपोलियनला भाग पडले असतें. फ्रान्सच्या मदतीशिवाय पीडमाँडचें राज्य सुरक्षित राहणें शक्य नाहीं हें काव्हूर जाणून होता. नेपल्सच्या राजानें गेईटा येथें सैन्याची जमवाजमव सुरू केली होती. गॅरिबॅाल्डीच्या बेफामपणामुळें युरपियन दरबारांमध्यें अस्वस्थता पसरूं लागली होती. गॅरिबॅाल्डीचें अंत:करण मॅझिनीनें काबीज केलें तर कदाचित् इटलींतच यादवी सुरू होईल अशी काव्हूरला भीति वाटूं लागली होती. इटलींतील जनतेने व्हिक्टर इमॅन्युएलबरोबर राजनिष्ठ राहणें अवश्य होतें. काव्हूरनें ट्युरिनच्या पार्लमेंटांत ठराव मंजूर करून घेतला होता कीं, नेपल्स व सिसिलीचें राज्य पीडमॉटमध्यें सामील करून घेण्यांत यावें. इटालियनांनीं मिळविलेल्या विजयांना स्थैर्य आणून त्यांचा राष्ट्रैक्याकडे उपयोग करून घ्यावयाची काव्हूरची इच्छा होती; पण गॅरिबॅाल्डीच्या भोंवती जमलेल्या लोकांनीं विपर्यास करून त्याची कल्पना करून दिली कीं, गॅरिबॅाल्डीला आणखी जय मिळाले तर आपलें प्रस्थ कांहींच

राहणार नाहीं म्हणून मत्सरग्रस्त होऊन काव्हूरनें गॅरिबॅाल्डीचा पाडाव करण्याचा प्रयत्न चालविला आहे ! या कल्पनेमुळें बेभान झालेल्या गॅरिबॅाल्डीनें काव्हूरला प्रधानपदावरून दूर करावें असा व्हिक्टर इमॅन्युएलला सल्ला दिला ! पण राजाचा प्रधानावर पूर्ण विश्वास असल्यामुळें त्यानें गॅरिबॅाल्डीचा उपदेश अमलांत आणला नाहीं.

उत्तरेकडील पीडमॉंटचें राज्य व दक्षिणेंत गॅरिबॅाल्डीनें जिंकलेलें राज्य यांमधील मुलूख पोपच्या ताब्यांत होता; इटलीच्या ऐक्यासाठीं हा मुलूख काबीज करणें अवश्य होतें. पोपच्या हितसंबंधांचें रक्षण करण्यास नेपोलियन बांधला गेला होता; पण त्यालाहि पोपच्या जुलमी राज्यपद्धतीबद्दल किळस वाटूं लागला होता. रोमन संस्थानांत सुरू झालेली बंडाळी मोडण्यासाठीं पोपचा सेनापति लामॅारसिएर यानें क्रूरपणाचा कळस करून सोडला होता. रोमन लोकांना मदत करावयाच्या बाबतींत काव्हूर टंगळमंगळ करूं लागला तेव्हां राजनिष्ठ नेमस्तांना मॅझिनीनें एक जाहीर पत्र लिहिलें. " सर्वांनीं मिळून एकजुटीनें या कार्याला हात घातला पाहिजे. आम्हीं लोकसत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न करूं अशी तुम्हांला भीति वाटत आहे काय ? तुम्ही खात्री बाळगा कीं तत्वप्रचाराचें काम हातीं घ्यावयाचें आम्ही ठरवूं त्यावेळीं शत्रूंना त्याचप्रमाणें मित्रांना तशी जाहीर सूचना देण्यांत येईल. नेपोलियनच्या ओंजळीनें पाणी पिण्याचा हट्ट आतां सोडून या. व्यक्तींना कैदेंत टाकल्यानें कार्यनाश होतो अशी तुमची समजूत आहे काय ? ईश्वराच्या मनांत एकादी गोष्ट घडवून आणावयाची असते तेव्हां एकमेकांपेक्षां वरचढ असे अनेक महापुरुष तो निर्माण करीत असतो. परमेश्वरानें नियोजित केलेलें व जनतेनें हातीं घेतलेलें कार्य हाणून पाडावयाची तुमची काय बिशाद आहे ! " पण असे लेख वाचून जागृत होण्याइतके ते ताळ्यावर असते तर इटलीला इतक्या अपेष्टा झाल्याच नसत्या !

पोपच्या अनाथ प्रजाजनांनीं नरकयातनेंतून सुटण्याकरितां गॅरिबॅाल्डीची मदत मागितली. राष्ट्रैक्य व राष्ट्रस्वातंत्र्य यांसाठीं तो सारखा तळमळत होता; त्यांत या क्रूरपणाच्या बातम्यांची भर पडतांच त्यानें एक जाहीरनामा काढून रोमवर हल्ला करावयाचा विचार प्रकट केला. राजकारणाचा सारा डाव गॅरिबॅाल्डीच्या हातांत जाऊं लागलेला पाहतांच काव्हूर एकदम जागा झाला. दक्षिण इटली प्रांत क्रान्तिकारकांच्या ताब्यांत गेला तर मॅझिनीला आपल्या प्रजासत्ताक तत्वांचें बीजारोपण करावयास एक विस्तृत व सुपीक कार्यक्षेत्र मिळेल अशी त्याला

भीति वाटूं लागली. इटलीमध्यें लोकसत्तावाद्यांना जय मिळाला तर ही सांथ फ्रान्समध्यें पसरून आपली उचलबांगडी होईल अशी नेपोलियनला धास्ती वाटूं लागली. म्हणून या दोघांनीं व्हिक्टर इमॅन्युएलला पोपच्या मुलखावर स्वारी करावयाचा सल्ला दिला; फ्रान्स व ऑस्ट्रिया या देशांतील पोपच्या अनुयायांनीं संघटित होऊन मध्यस्थी करावयाचे आंतच व्हिक्टरनें हें काम उरकून टाकल्यास व रोम शहरावर स्वारी न करावयाचें वचन दिल्यास आपण त्याला विरोध करणार नाहीं असें नेपोलियनचें वचन मिळतांच काव्हूरनें पोपला निर्वाणीचा खलिता पाठविला. नेपल्सच्या राजाला मदत करावयासाठीं, गॅरिबॉल्डीच्या स्वयंसैनिकांना व पीडमॉटच्या लष्करला तोंड द्यावयासाठीं आणि रोमन संस्थानांतील बंडाळी चिरडून टाकावयासाठीं पोपनें एक बडें ' पवित्र सैन्य ' उभें केलें होतें; हें सैन्य ताबडतोब मोडून टाकण्यांत यावें अशी काव्हूरनें मागणी केली. नेपोलियन व काव्हूर यांमध्यें झालेल्या तहाची कांहींच वार्ता नसल्यामुळें रोम दरबारनें या मागणीचा धि:कार केला. लगेच पीडमॉटचें लष्कर सरहद्द ओलांडून पोपच्या मुलखांत घुसलें. ( ता. १० सप्टेंबर १८६० ) शक्य असल्यास पोपचा कांहीं मुलूख घशाखालीं घालणें व गॅरिबॉल्डीच्या तावडींतून रोम शहर वांचवून नेपल्सचें राज्य पीडमॉडला जोडून घेणें या दुहेरी हेतूनें ही मोहीम हातीं घेण्यांत आली होती! कॅसल फिडारो येथील लढाईंत ( ता. २० सप्टेंबर ) पीडमॉडच्या सैन्यानें रोमन लष्कराचा पुरता पराभव केला. ता. २९ सप्टेंबर रोजीं अंकोना शहर पीडमॉटला शरण आलें. अठरा दिवसांच्या या मोहिमेनंतर रोम शहर व त्यालगतच्या समुद्रकिनाऱ्याची अरुंद पट्टी खेरीज करून पोपच्या ताब्यांतील बाकीचा सर्व मुलूख पीडमॉटच्या ताब्यांत आला.

रोमन प्रांतांवर व्हिक्टर इमॅन्युएलनें स्वारी कां केली तें गॅरिबॉल्डीला समजलें नव्हतें. राजानेंच हें कार्य हातीं घेतल्यामुळें आपण या भानगडींत मन घालण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें त्याला वाटूं लागलें. साफी, बर्टानी वगैरे मॅझिनीच्या मित्रांनीं रोमवर स्वारी करावयासाठीं गॅरिबॉल्डीचें मन वळविण्याची शिकस्त केली; मॅझिनीनें त्याला पत्र पाठविलें कीं, " रोम अगर व्हेनिसकडे तुम्ही ताबडतोब कूच करणार नाहीं तर राष्ट्रैक्याची इतिश्री झालीच म्हणून समजा. " इंग्लंडांतील आपल्या एका मित्राला पाठविलेल्या पत्रांत तो म्हणतो, " गॅरिबॉल्डीनें मोहीम हातीं घेतली तर पांच महिन्यांचे आंत इटली देश एक-

छत्री होईल; नाहींतर राष्ट्रैक्याला कालावधि लागेल, इतकेंच ! " गॅरिबॅाल्डीचें मन वळविण्याचा अखेरचा प्रयत्न करावयासाठीं मॅझिनी नेपल्सला आला. पण या मंडळींची ही सारी खटपट व्यर्थ गेली. गॅरिबॅाल्डीच्या भोंवतीं त्यावेळीं जमलेल्या राजपक्षीय लोकांनीं त्याची कल्पना करून दिली होती कीं मॅझिनीसारख्या पाताळयंत्री लोकसत्तावाद्याच्या नादीं लागल्यानें युरपियन राजे बिथरून जाऊन नेपल्सवर स्वारी करतील व बूर्बोन राजाला पुन्हां गादीवर बसवून इटलीचा घात करतील ! हे सल्लागार असा परस्परविरोधी उपदेश करीत होते तेव्हां त्यांपैकीं कोणाच्याहि मताप्रमाणें वागण्याची संधि गॅरिबॅाल्डीला मिळूं नये असाच परमेश्वराचा संकेत होता.

कॅसलफिडारोच्या लढाईनंतर नेपल्सच्या राजानें आपलें राज्य परत मिळवावयासाठीं सैन्य उभारलें. नेपल्सपासून अठरा मैलांवर असलेल्या कॅपुआ गांवीं त्यानें छावणी दिली. कॅपुआचा किल्ला अत्यंत मजबूत असल्यामुळें नेपल्सच्या सैन्याबरोबर निकराची हातोहात चकमक करणें अशक्य होतें; पण शत्रूच्या सैन्याला तोंड देणें अवश्य असल्यामुळें किल्ल्याच्या उत्तरेस तळ देऊन शत्रूचें सैन्य बाहेर यावयाची गॅरिबॅाल्डी वाट पहात बसला. ता. १ ऑक्टोबर रोजीं दोन्ही सैन्यांची गांठ पडून निकराचें युद्ध झालें. राजाच्या नेतृत्वाखालीं नेपल्सच्या सैन्यानें चांगलेंच शौर्य गाजविलें; पण गॅरिबॅाल्डी व त्याचे स्वयंसैनिक यांनीं युद्धाची कमाल केल्यामुळें संध्याकाळीं शत्रूचें सैन्य किल्ल्याकडे माघारें गेलें. दुसऱ्या दिवशींच्या लढाईत गॅरिबॅाल्डीनें शत्रूचा पुरता मोड केला. हा विजय मिळवून तो नेपल्सला परत आला त्यावेळीं त्याचें मन व्हिक्टर इमॅन्युएलला पूर्णपणें अनुकूल झालें होतें. दक्षिणेंतील गॅरिबॅाल्डीच्या विजयाचा पूर्ण फायदा घ्यावयाचा निश्चय करून काव्हूरनें नेपल्स व सिसिलीचें राज्य पीडमॉटच्या राज्यांत सामील करून घ्यावयाचा ठराव इटालियन पार्लमेंटपुढें मांडला. या ठरावावर भाषण करतांना त्यानें गॅरिबॅाल्डीचें मनापासून अभिनंदन केलें; सर्व अधिकार एकाच व्यक्तीचे हातीं अधिक कालपर्यंत ठेवणें धोक्याचें होईल हें त्यानें याच भाषणांत स्पष्ट करून दाखविलें. ता. ११ ऑक्टोबर रोजीं सभेनें बहुमतानें ठराव मंजूर केला. इकडे गॅरिबॅाल्डीच्या सल्लागारमंडळांतहि याच अर्थाचा ठराव मंजूर झाला. नेपल्सच्या रहिवाशांनीं या ठरावावर मतें द्यावीं असा विचार होऊं लागला त्यावेळीं लोकसत्तावाद्यांनीं राजपक्षीयांना कसून विरोध केला. नेपल्सच्या लोकांनीं पीडमॉटचे प्रजाजन

व्हावयास हरकत नाहीं पण एकीकरण होतांच जनतेच्या प्रतिनिधींच्या मंडळानें मंजूर केलेली राज्यघटना मान्य करावयाचें राजानें वचन दिलें पाहिजे असें त्यांचें म्हणणें होतें. पण अशा आणीबाणीच्या वेळीं या प्रकारची यादवी देशांत माजविणें अनिष्ट आहे असें राजपक्षीयांचें म्हणणें होतें. नेपल्सचा दुय्यम सर्वसत्ताधारी व मानीनचा सहकारी जॉर्ज पालव्हिसिनो यानें मॅझिनीला उद्देशून एक पत्र लिहिलें. ' आपल्या प्रामाणिकपणाबद्दल व एकनिष्ठ राष्ट्रभक्तीबद्दल संशय घ्यावयास मुळींच जागा नाहीं. देशांत यादवी माजावी अशी आपली इच्छा नसतांहि केवळ आपल्या संसर्गामुळेच तसा प्रसंग ओढवेल अशी सर्वांना भीति वाटत आहे; म्हणून केवळ देशहितासाठीं आपण देशत्याग करावा अशी मी आपणांस विनंति करीत आहें. ' पण आपल्या मायभूमीपासून दूर व्हावयाचें मॅझिनीनें साफ नाकारलें त्यानें वरील पत्राला उत्तर दिलें, " व्हिक्टर इमॅन्युएल व त्याचें मंत्रिमंडळ यांजविषयीं मला पूज्यबुद्धि आहे म्हणून नव्हे, तर इटलीच्या ऐक्यासाठीं, इटलींत शांतता नांदावी म्हणून व इटालियनांनीं मान्य केलेल्या मताला मान द्यावयासाठीं, स्वत:ला सत्य वाटणारीं तत्वें मी बाजूला ठेवून राजसत्तेला मान्यता दिली...मी असेंहि जाहीर केलें आहे कीं ज्यावेळीं लोकसत्ताक तत्वांचा प्रसार करावयाचें कार्य हातीं घ्यावयाचा माझा निश्चय होईल त्यावेळीं तसें जाहीर करून मगच मी या कार्याला हात घालीन...याहून अधिक स्वार्थत्याग करणें मला शक्य नाहीं. " ज्यावेळीं इटालियन लोक शेणकिड्यासारखे वळवळत होते त्यावेळीं मॅझिनीनें राष्ट्रीय आकांक्षेचें दिव्य दर्शन त्यांच्या नजरेपुढें उभें करून राष्ट्रैक्य व राष्ट्रस्वातंत्र्य या तत्वांचा पाया घातला, या गोष्टीचा नेपल्सच्या जनतेला विसर पडला; ' मॅझिनी मरेल तर बरें ' अशा जाहिराती त्यांनीं शहरांतील भिंतींवर डकविल्या; त्याच्या राहत्या घराच्या दरवाजाशीं जमून ते गिल्ला करूं लागले ! लोकांच्या अज्ञानाकडे पाहून मॅझिनी नुस्ता खिन्नपणें हंसत असे ! या प्रसंगांत गॅरिबॉल्डीनें मॅझिनीचें रक्षण केलें. व्हिक्टर इमॅन्युएल म्हणे, ' आपल्या हातून राष्ट्र निर्माण झालें तर मॅझिनीची भीति बाळगण्याचें आपणांस कांहींच कारण नाहीं; आपल्या हातून कांहींच झालें नाहीं आणि मॅझिनीच्या हातून तें कार्य झालें तर त्याचें मी मनापासून अभिनंदन करीन ! ' पण इटलींतील या प्रकारांचा मॅझिनीला वीट येऊं लागला होता. " गॅरिबॉल्डीचे हातून इटलीचें एकीकरण झालेलें मला मरणापूर्वी पहावयास

मिळावें एवढया एकाच इच्छेसाठीं माझा जीव गुंतून राहिला आहे. " नोव्हेंबर महिन्यांत गॅरिबॅाल्डीची औपचारिक भेट घेऊन मॅझिनी इंग्लंडांत परत गेला.

पीडमाँटच्या राज्यांत सामील व्हावयासाठीं नेपल्समध्यें लोकमत जोरानें प्रगट होऊं लागलें होतें. शेवटीं. ता- २१. ऑक्टोबर १८६० रोजीं लोकांनीं प्रचंड बहुमतानें व्हिक्टर इमॅन्युएलचें आधिपत्य मान्य केलें. कॅसल फिडारोच्या लढाई-नंतर राजा आपल्या सैन्यासह नेपल्सच्या मार्गाला लागला. त्याचें स्वागत करावयासाठीं गॅरिबॅाल्डी सामोरा गेला. ता. २६ आक्टोबर रोजीं काजानेलो व्हाजिरानो या खेडयाच्या दस्तुरीनाक्याजवळ त्यांची गांठ झाली. भेट होतांच गॅरिबॅाल्डीनें ' इटलीच्या पहिल्या राजाचा ' जयजयकार केला !

गॅरिबॅाल्डी व व्हिक्टर इमॅन्युएल यांनीं ता. ७ नोव्हेंबर रोजीं नेपल्स शहरांत प्रवेश केला. गॅरिबॅाल्डीनें हातीं घेतलेलें कार्य अजून पूर्ण व्हावयाचें होतें. नेपल्सच्या राजानें आपल्या स्वयंसैनिकांना संस्थानी सैन्यांत सामील करून घेऊन नेपल्सच्या राजाचा पुरता पराभव करण्याची संधि देण्यांत यावी अशी गॅरिबॅाल्डीनें व्हिक्टर इमॅन्युएलची विनवणी केली; पण या थकल्याभागल्या स्वयंसैनिकांना विसावा मिळणें जरूर आहे असें सांगून राजानें ही विनंति नाकारली ! यामुळें गॅरिबॅाल्डीचा व त्याच्या सैन्याचा फार हिरमोड झाला. स्वयंसैनिकांच्या पल्टणीचा मुजरा घ्यावयासाठीं राजानें एक दिवस मुक्रर केला; या दिवशीं पावसाच्या सरीवर सरी येत होत्या; तरी राजाला मुजरा करावया-साठीं ओले चिंब झालेले स्वयंसैनिक थंडीनें कुडकुडत उघडया मैदानांत उभे होते; त्यांना बक्षीस पगार व पदव्या यांपैकीं कशाचीहि अपेक्षा नव्हती; पण त्या दिवशीं त्यांची गांठ घ्यावयास राजाला वेळ मिळाला नाहीं ! काव्हूरच्या आधीन झाल्यामुळेंच राजानें आपल्या अधिपतीचा असा अपमान केला अशी त्यांची गैरसमजूत झाली ! आपल्या सैन्याची अशी अव-हेलना चाललेली पाहून गॅरिबॅाल्डीनें पलटण मोडून टाकून कप्रेरा बेटांत परत जावयाचा निश्चय केला. सैन्याचा निरोप घेतांना तो म्हणाला; ' गडयांनों तुम्ही गाजविलेल्या बहादुरीबद्दल मींच तुमचें अभिनंदन करतों. आपलें कार्य अजून पुरें झालेलें नाहीं. रोमच्या रस्त्यावर आपली पुन्हां भेट खास होईल ! ' गॅरिबॅाल्डीला राजानें एक उंच पदवी व बडी जहागीर देऊं केली, पण त्याला दोहोंचीहि अपेक्षा नव्हती ! अधिकारावर असतांना लक्षावधि रुपये त्याच्या हातांतून जात असत, पण मोहिमेचा बेत ठरावयाच्यापूर्वीं त्याचेपाशीं जेवढे पैसे

होते तेवढेहि नेपल्सच्या विजयानंतर त्याचे जवळ राहिले नाहींत–कारण सिसिलीच्या स्वारीसाठीं त्यानें पदरचे पैसे खर्च केले होते ! पूर्वीपेक्षां अधिक गरीब झालेला पण जगाच्या इतिहासांत अजरामर झालेला गॅरिबॉल्डी कप्रेरा बेटांत परत जावयासाठीं निघाला तेव्हां लोकांनीं आपले देव्हारे माजवूं नयेत म्हणून कोणालाहि आगाऊ बातमी न देतां, मोठया पहांटेस तो नेपल्स शहरांतून बाहेर पडला. ( नोव्हेंबर १८६० ) वाटखर्चीसाठीं त्यानें लोकांकडून पैसे उसनवार काढले होते व कॅप्रेरा बेटांत लागवड करण्यासाठीं बियाण्याचें एक पोतें एवढेंच सामान त्यानें बरोबर घेतलें होतें.

नेपल्सच्या राजानें आपलें राज्य परत मिळविण्यासाठीं मोठी तयारी केली होती; पण जनतेची व आपल्याच सैन्यांतील शिपायांची सहानुभूति आपल्या पक्षाला नाहीं हें दिसून आल्यापासून त्याचा धीर खचला होता. ता. २ नोव्हेंबर रोजीं पीडमॉंटच्या सैन्यानें कॅपुआ किल्ला काबीज केल्यानंतर त्यानें आपलें चाळीस हजार सैन्य गेइटाच्या किल्ल्यामध्यें जमविलें. वेढा पडल्यानंतर कच्च्या दिलाच्या या सैन्यानें मोठया मर्दुमकीनें किल्ल्याचें रक्षण केलें. किल्ल्यामध्यें रोगराई सुरू झाली व सैनिकांची उपासमार होऊं लागली तरी फ्रान्सचा बादशहा आपणांस मदत करील या भरंवशावर राजा दिवस काढीत होता. ही आशा नष्ट झाली तेव्हां ता. १३ फेब्रु. १८६१ रोजीं त्यानें शरणचिठीवर सही केली. गेइटाहून तो रोमला गेला. येथें त्याने हलकट दरवडेखोरांना हातांशीं धरून नेपल्सच्या राज्यांत लूटफाट आरंभली. इटालियन शिपाई पाठलाग करूं लागतांच हे दरवडेखोर पोपच्या मुलुखांत पळ काढीत. माजी राजाच्या या दरवडेखोरीमुळें या नव्या प्रांतांत व्यवस्था करणें फार जड गेलें.

गेइटाच्या पाडावानंतर एका आठवडयाचे आंतच संयुक्त इटलीचें पहिलें पार्लमेंट टयूरिन शहरीं भरविण्यांत आलें. ( ता. १८ फेब्रु. १८६१ ). यावेळीं व्हिक्टर इमॅन्युएलनें ' इटलीचा राजा ' हा किताब धारण केला. व्हेनिस प्रांत व रोम शहर यांशिवाय संपूर्ण इटलीचें एकीकरण झालें होतें. हे दोनच प्रश्न आतां इटालियनांच्या नजरेसमोर खेळत होते. रोम शहरीं इटलीची राजधानी स्थापन करावयाचा प्रश्न अत्यंत बिकट होऊन बसला होता. व्हिक्टर इमॅन्युएलनें आपल्या राज्यांत धर्मगुरूंचे अधिकार कमी केले म्हणून पोपनें त्याला बहिष्कृत केलें होतें. धर्म व राजकारण यांच्या या विरोधामुळें स्वराज्यावर केव्हां व कोणीकडून कसा घाला येईल याचा कांहींच भरंवसा नव्हता. धार्मिक,

प्रभुत्व पोपकडे व राजकीय प्रभुत्व राजाकडे अशी विभागणी केल्यास स्वराज्याची नीट व्यवस्था लागेल या कल्पनेनें काव्हूरनें एक योजना तयार केली; पण या योजनेचा पोपनें जाहीर धिक्कार केला. इटलीच्या कल्याणासाठीं आपल्या सत्तेचा एक अंशहि सोडून देण्यास पोप तयार नाहीं हें पाहून इटालियन लोक अगदीं खवळून गेले; लोकांचा त्वेष थोपवून धरण्यासाठीं काव्हूरनें इटालियन प्रतिनिधि मंडळांत ता. २७ मार्च १८६१ रोजीं इटलीची राजधानी रोम हीच होय असा ठराव मंजूर करवून घेतला. रोमचें राजकारण असें रेंगाळत पडलें होतें तोंच ता. ६ जून १८६१ रोजीं काव्हूरचा अंत झाला. इटलीच्या भाग्योदयाच्या राजकारणांत काव्हूर इतका गढून गेला होता कीं आपला काळ समीप आला आहे याचेंहि त्याला भान राहिलें नाहीं! इटलीच्या भाग्योदयाचे धागेदोरे काव्हूरसारख्या कसलेल्या मुत्सद्याच्या हातांत असल्यामुळें व्हिक्टर इमॅन्युएल व इटालियन लोक इतके निर्धास्त होते कीं, काव्हूरच्या मृत्यूनंतर त्यांना दाही दिशा शून्य दिसूं लागल्या! हातीं घेतलेलें काम पुरें करावयाइतकें आयुष्य देवानें त्याला दिलें नाहीं पण त्याचे हातून जेवढें कार्य झालें तेवढ्यामुळेंच जगाच्या इतिहासांत त्याला अढळ व अत्युच्च स्थान प्राप्त झालें आहे.

* * * * *

काव्हूरच्या मृत्यूनंतर इटलीचें राजकीय वातावरण निराशेनें भरून गेलें— त्याचप्रमाणें इकडे मॅझिनीचें मनहि निराशेनें ग्रासून गेलें होतें. " मी जन्मभर भुंकत रहावें आणि लोकांनीं तिकडे दुर्लक्ष करावें हेंच माझ्या नशीबीं आहे असें मला वाटूं लागलें आहे. " मातृभूमीबद्दल दिव्य स्वप्नें त्याच्या डोळ्यांसमोर उभीं रहात. " श्रद्धा व निष्ठा, कर्तव्य व नीति, महातत्वें व महत्कार्यें यांचा सर्वत्र अभाव झालेला दिसून येत आहे; मला वाटत होतें कीं, या निर्जीव व निःसत्व झालेल्या युरोपांत इटली नवजीवनाचा संचार करील... अमुक चौरस मैलांच्या इटली या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशांत भाकर स्वस्त झाली आहे कीं महाग झाली आहे हा महत्वाचा प्रश्न नाहीं. इटली हें एक महान् व नीतिमान् राष्ट्र व्हावें आणि आपलें नियोजित कार्य पार पाडण्यासाठीं इटलीनें पुढें व्हावें अशी मात्र माझी मनापासून इच्छा आहे." पण प्रत्यक्ष इटलीकडे पाहतांच ह्या सुखस्वप्नांचा फोलपणा त्याचे नजरेस येई. "हल्लींच्या इटालियनांच्या अंगीं डँटेच्या माहात्म्याच्या एक अंशहि नाहीं, मात्र मॅकॅव्हेलीच्या कौटिल्याचा

त्यांच्यामध्यें पूर्ण संचार झालेला आहे !" काव्हूरच्या मृत्यूनंतर इटालियन पुढारी आपल्याच पोळीवर तूप ओढूं लागले होते; इटलीच्या उत्तर व दक्षिण प्रांतांतील रहिवाशांना एकमेकांबद्दल मत्सर वाटत होता; जिकडेतिकडे दरवडेखोरी व अंदाधुंदी यांचें साम्राज्य माजलें होतें; बाह्यत: इटलींतील परिस्थिति अत्यंत निराशाजनक होती—पण आतांपर्यंत मिळविलेल्या यशाला स्थैर्य येईपर्यंत व राष्ट्रैक्याचें कार्य तडीला जाईपर्यंत या स्थितींत बदल घडून येणें शक्य नाहीं हें मॅझिनीच्या लक्षांत आलें नाहीं. पोपचा पराभव होईपर्यंत रोम शहरीं इटलीची स्थापना होणें शक्य नाहीं—पोपचा पराभव करण्यासाठीं ऑस्ट्रिया व फ्रान्स यांच्या संयुक्त सामर्थ्याला तोंड देण्याखेरीज गत्यंतर नाहीं. आणि रोम शहरांतून फ्रेंचांचें लष्कर निघून जाईपर्यंत हा प्रश्न सुटणें शक्य नाहीं हें मॅझिनी जाणून होता. फ्रेंचांच्या मदतीशिवाय ऑस्ट्रियाचा पराभव करणें शक्य आहे आणि म्हणून व्हेनिस प्रांतांतच एकदम उठावणी केली पाहिजे असें त्याचें मत होतें. राजसत्तेला त्यानें केव्हांहि मान्यता दिली नाहीं पण व्हेनिस व रोमचा प्रश्न व्हिक्टर इमॅन्युएल हातीं घेईल या आशेनें राजाच्या मार्गांत अडथळे उत्पन्न करावयाचे नाहींत असें त्यानें ठरविलें होतें.

नेपल्सहून इंग्लंडांत परत आल्यापासून मॅझिनी ऑन्स्लो टरेस, ब्रॉम्प्टन येथें रहात असे. त्याची शरीरप्रकृति आतां अगदीं खालावली होती. डॉक्टर लोक व औषधें याबद्दल त्याला नेहमीं तिरस्कार वाटत असे. " राष्ट्रें स्वातंत्र्यासाठीं तडफड करीत आहेत–अशा वेळीं आजारी पडणें अगदीं मूर्खपणाचें आहे," असें तो म्हणत असे; पण या वेळीं त्याच्या पोटांत इतक्या तीव्र वेदना होत कीं, दु:ख सहन न झाल्यामुळें तो जमिनीवर गडबडा लोळत असे ! संधिवातामुळें " इंग्लिश मुत्सद्यासारखा ताठरपणा माझ्या अंगीं आला आहे ! " सांपत्तिक अडचणींनीं या वेळीं त्याला भंडावून सोडलें होतें. त्याचे ग्रंथ प्रसिद्ध करणाऱ्या मिलनच्या प्रकाशकानें कबूल केलेले पैसे त्याचेकडे पोंचविले नाहींत; मुलाला दरसाल ठरींव रकम मिळावी यासाठीं त्याच्या आईनें पंचांकडे ठेव ठेवली होती; पण आतां डॉक्टर लोकांचीं बिलें भरतांना ही रकम तेव्हांच उडून जात असे. इटलींतील लोकांना ही स्थिति समजली तेव्हां त्यांनीं मॅझिनीसाठीं फंड उभारून जमा झालेली रकम त्याचेकडे पाठविली; पण मॅझिनीनें ही सर्व रकम व्हेनिस फंडांत जमा केली ! १८६६ सालीं इंग्लंडांतील लोकांनीं त्याला पांचशें पौंडांची थैली अर्पण केली होती—हे सर्व पैसे त्यानें सार्वजनिक

कार्यासाठींच खर्च केले ! इटलींतून परत आल्यापासून त्याचे हातून वाङ्मयात्मक कार्य फारसें झालें नाहीं. कारण राजकारण व आजारीपण यांतच त्याचा सारा वेळ जात असे. मॅझिनी इंग्लंडांत असतांना ग्रेको नांवाच्या एका इटालियनानें लुई नेपोलियनचा खून करण्याचा प्रयत्न केला. या कटाची मॅझिनीला वार्ताहि नव्हती पण ग्रेकोचा व त्याचा पत्रव्यवहार होता :एवढया पुराव्यावर फ्रेंच पोलिसांनीं मॅझिनीवर खुनाच्या कटाचा आरोप लादला ! अमेरिकेंतील संयुक्त-संस्थानांत गुलामगिरीच्या प्रश्नासंबंधी यादवी सुरू झाली त्यावेळीं लंडनच्या इमॅन्सिपेशन सोसायटीतर्फे मॅझिनीनें बरेंच कार्य केलें. " मरतांना विवेक बुद्धीची टोंचणी लागूं नये अशी इच्छा असेल तर गुलामगिरी, फांशीं व धार्मिक ढोंगीपणा या तीन गोष्टी हाणून पाडण्यासाठीं प्रत्येकानें कांहीं तरी कार्य केलें पाहिजे. " अमेरिकेंतील यादवी संपली तेव्हां निग्रो लोकांना मतदानाचे अधिकार व शिक्षण देण्यांत यावें असें त्यानें प्रतिपादन केलें. मेक्सिको देशांत फ्रेंच बादशाही स्थापन करावयाचा नेपोलियनाचा बेत हाणून पाडावयासाठीं त्यानें अमेरिकेचा प्रेसिडेंट अब्राहाम लिंकन याचेबरोबर पत्रव्यवहार केला.

नेपल्स सोडावयाचे पूर्वी मॅझिनी व गॅरिबॉल्डी यांची मुलाखत झाली होती. व्हेनिस व रोम यांवर हल्ला करावयाची चळवळ करावयाचा बेत त्यांनीं या मुलाखतींत मुक्रर केला होता; पण या दोघांचीं मनें एकमेकांविषयीं शुद्ध नसल्यामुळें कांहींच चळवळ झाली नाहीं. मॅझिनीनें इटलीच्या उद्धारासाठीं तीन तपेंपर्यंत अविश्रांत मेहनत केली होती; कालमानानें पाहिलें असतां गॅरिबॉल्डीची राष्ट्रसेवा अगदींच अल्प होती—पण आतां तो मॅझिनीपेक्षांहि इटालियनांना अधिक प्रिय होऊन बसला होता; याबद्दल मॅझिनीला थोडाबहुत विषाद वाटणें अगदीं क्षम्य होतें;तरीहि सर्व वैयक्तिक विचार बाजूला ठेवून गॅरिबॉल्डीच्या नेतृत्वाखालीं कार्य करावयास मॅझिनी तयार होता. स. १८४९ सालीं रोमन लोकशाहीच्या वेळीं मॅझिनीबरोबर झालेली धुसफूस गॅरिबॉल्डी अझून विसरला नव्हता. मॅझिनीच्या तात्विक चर्चेबद्दल त्याला मोठी चीड वाटत असे. गॅरिबॉल्डीच्या मतांचे रंग क्षणोक्षणीं पालटत असत; पण आपणांवर अमुक एका व्यक्तीचें वजन आहे हें तो कधींहि कबूल करीत नसे ! कॅप्रेरा बेटांत त्याच्या भोंवतीं जमा झालेल्या भक्तजनांनीं मॅझिनीबद्दल त्याचें मन कलुषित करावयाचा सारखा यत्न चालविला होता. व्हेनिस व रोम स्वतंत्र करण्यासाठीं दोघेहि अत्यंत उत्सुक होते पण साधनाबद्दल त्यांची एकवाक्यता नव्हती. गॅरिबॉल्डीचा राजावर पूर्ण विश्वास

होता; मॅझिनीची राजनिष्ठा त्याच्या तत्वनिष्ठइतकी प्रबल नव्हती. सरकारशीं सहकारिता करून शक्य तेवढें कार्य करावें असें गॅरिबॅाल्डीला वाटत होतें; सरकारबरोबर कोणताहि संबंध न ठेवतां स्वतंत्रपणें कार्य करावें हा मॅझिनीचा मार्ग होता. इटालियन देशभक्तांनीं व्हेनिसचा प्रश्न प्रथम हातीं घ्यावा असें मॅझिनीला वाटत होतें. रोम शहरावर एकदम हल्ला करावा असें गॅरिबाल्डीला वाटत होतें.

रोमवर हल्ला करावयासाठीं तयारी करण्यास गॅरिबाल्डीनें सुरवात केली तेव्हां मॅझिनीनें आपला एक दूत कॅप्रेराकडे पाठविला. " रोमवर स्वारी करावयासाठीं नेपल्स प्रांतांतूनच मोहीम सुरू केली पाहिजे; हा प्रांत व्हिक्टर इमॅन्युएलच्या ताब्यांत आहे; पोपला फ्रेंच बादशहाचें पाठबळ आहे व नेपोलियनचें मन दुखवावयास व्हिक्टर इमॅन्युएल तयार नाहीं; म्हणून रोमवर स्वारी करणाऱ्या स्वयंसैनिकांना इटालियन सैन्यालाहि तोंड द्यावें लागेल. पण व्हेनिसवर स्वारी करावयाची झाल्यास अशी यादवी उत्पन्न होणार नाहीं; व्हेनीशिया प्रांत ऑस्ट्रियाच्या ताब्यांत आहे. १८६० सालीं नेपल्सच्या बंडामध्यें व्हिक्टर इमॅन्युएलला व्यत्यय आणतां आला नाहीं त्याचप्रमाणें आतां व्हेनीशिया प्रांतांतील बंडहि असेंच निर्वेधपणें तडीस नेतां येईल. आजपर्यंत माझ्या डोक्यावर अनेक अपजय लादण्यांत आले आहेत. व्हेनिसची उठावणी निष्फळ झाली तर तें अपेश माथीं घेण्यास मी तयार आहें. व्हेनिसवर आपण स्वारी कराल तर आम्ही आपल्या सैन्यांत शिपाई म्हणून दाखल होऊं. " हा मुद्देसूद व स्पष्ट संदेश मिळाला तरी गॅरिबॅाल्डीचे डोळे उघडले नाहींत.

स. १८६२ सालीं, मार्च महिन्यांत रॅटेझी हा इटालीच्या प्रधानपदावर आला होता. नेपोलियन व गॅरिबॅाल्डी यांची परस्पर झुंज लावून द्यावयाची व व्हेनीशिया प्रांत इटलीच्या राज्यांत सामील करून घेऊन काव्हूरपेक्षां अधिक कीर्ति मिळवावयाची अशी त्याची महत्वाकांक्षा होती. नेपोलियनला काबीज करून घ्यावयासाठीं त्यानें रोमचा प्रश्न बाजूला ठेवावयाचें कबूल केलें. व्हेनीशिया प्रांत काबीज करण्यासाठीं त्यानें गॅरिबॅाल्डीबरोबर बोलणें लावलें; पण गॅरिबॅाल्डीनें स्वारीच्या तयारीस एकदम सुरवात केल्यामुळें प्रधान अगदीं घाबरून गेला व त्याच्या हुकमावरून कांहीं स्वयंसैनिक कैद करण्यांत आले. रॅटेझीच्या डळमळीत राजकारणामुळें गॅरिबॅाल्डी अगदीं चिडून गेला. १८६२ च्या जुलई महिन्यांत तो एकदम पालर्मो येथें दाखल झाला. ' नेपो-

लियननें रोम शहर आतां सोडलेंच पाहिजे; आपखुषीनें जर तो असें करणार नाहीं तर आम्ही त्याला सक्तीनें रोममधून हुसकावून देऊं ' असें जाहीर करून गॅरिबॅाल्डीनें स्वयंसैनिकांच्या भरतीचा जाहीरनामा काढला. हजारों लोक त्याच्या निशाणाखालीं एकत्र झाले. ' स्वतंत्र रोम अथवा आत्मार्पण ' अशी गर्जना करून या सैन्यानें कूच केलें. गॅरिबॅाल्डीला रोमवर हल्ला करूं द्यावयाचा नाहीं असें पीडमॅांट सरकारनें अगोदरच ठरविलें होतें. ता. ३ आगष्ट रोजीं जाहीरनामा काढून सरकारनें गॅरिबॅाल्डीचा निषेध केला; ता. १७ आगष्ट रोजीं निघालेल्या सरकारी खलित्यांत त्याला बंडखोर ठरविण्यांत आलें ! कॅलॅब्रिया प्रांतांत हें सैन्य दाखल झालें तेव्हां स्वयंसैनिकांवर सरकारी सैन्य रवाना झाल्याची बातमी गॅरिबॅाल्डीला समजली ! ता. २८ आगस्ट रोजीं अस्प्रोमांटच्या टेंकड्यांजवळ या दोन सैन्याची गांठ पडली, व चकमकीला खरोखरीच सुरवात झालेली पाहून गॅरिबॅाल्डी अगदीं चकित होऊन गेला. स्वतःच्या सैन्याला गोळीबार बंद करावयाचा हुकूम देऊन शिस्त लावीत असतांना शत्रूच्या ( ? ) गोळीबारामुळें त्याच्या घोट्याला जखम झाली ! नंतर इटालियन सेनापतीनें त्याला गिरफदार करून समुद्रकिनाऱ्यावरील एका बळकट किल्ल्यांत कैद करून ठेवलें ! गॅरिबॅाल्डीला इटालियन सैनिकांच्या हातून जखम व्हावी व त्याला कैद करून ठेवण्यांत यावें ही राष्ट्राची बेअब्रू होय असें सर्व इटालियनांना वाटूं लागलें. लोकक्षोभ सारखा वाढत चाललेला पाहून रॅटेझीला डिसेंबर महिन्यांत प्रधानकीचा राजीनामा देणें भाग पडलें ! गॅरिबॅाल्डीला कैद केला खरा पण या कैद्याचें पुढें काय करावयाचें हा पेंच सरकारपुढें येऊन पडला. शेवटीं राजकन्येच्या विवाहनिमित्त गॅरिबॅाल्डीला झाल्या गुन्ह्याची माफी करण्यांत येऊन स्वगृहीं परत जाण्याची परवानगी देण्यांत आली !

रोमवर स्वारी करावयासाठीं गॅरिबॅल्डीच्या सैन्यानें कूच केलें ही बातमी मिळतांच स्वयंसैनिकांमध्यें सामील व्हावयासाठीं मॅझिनी लंडनहून निघाला. गॅरिबॅाल्डी जखमी झाल्याची बातमी समजली तेव्हां मॅझिनीचें मस्तक फिरलें व वाताच्या झटक्यांमध्यें तो हवें तें बरळूं लागला ! देशासाठीं आत्मार्पण करणारे समोर उभे राहून आपला धिःकार करीत आहेत असें त्याला वाटूं लागलें ! भ्रमाच्या या लहरींतून ताळ्यावर येतांच त्यानें पीडमॅांटसरकारवर जोराचा हल्ला चढविला. " या रडत राउतांचे हातून कोणतेंहि कार्य तडीला जाणें अशक्य असल्यामुळें आम्हांला लोकशाहीचा झेंडा उभारणें भाग

आहे, " असें त्यानें जाहीर केलें. मनोविकारांच्या वादळाचा भर ओसरल्या-नंतर मॅझिनीनें व्हेनीशियाच्या उठावणीचें काम पुन्हां हातीं घेतलें. १८६३ सालीं पोलंड देशांत बंड सुरू झालें. अशावेळीं व्हेनिस प्रांतांत उठावणी केल्यास ती यशस्वी होईल इतकेंच नव्हे तर पोलंडांतील बण्डवाल्यांना बंधुभावानें मदत केल्याचें श्रेय इटलीला मिळेल असें त्याचें मत होतें. " जुलमी राजे ब्रह्मराक्ष-सारखे राष्ट्रांच्या बोकांडीं बसलेले असतात; प्रजेवर बिनधोक जुलूम करतां यावा यासाठीं एकामेकांशीं तह करून राजे लोक एकजूट झालेले असतात. त्यांच्या दास्यांतून मुक्त व्हावयासाठीं वेगवेगळ्या राष्ट्रांतील लोकांनीं एकजूट होऊन परस्परांस मदत केली पाहिजे. आपलें कर्तव्य संपलें असें मुळींच नाहीं. आजपर्यंत इटलीसाठीं झालेल्या सर्व संग्रामांमध्यें पोलिश लोक इटालियनांच्या खांद्याला खांदा भिडवून लढले आहेत. आपणांस सर्व साधनांची अनुकूलता असतांहि कोरडी शाबासकी व थोडीबहुत वर्गणी यांपलीकडे आपणांकडून पोलंडला दुसरी कोणतीच मदत मिळूं नये हें न्याय्य आहे काय? चला, उठा! व्हेनिसकडे धांव घ्या! केवळ एक लक्ष सैन्याच्या जोरावर ऑस्ट्रियानें आमच्या राष्ट्राचा हा प्रांत आपल्या ताब्यांत ठेवला आहे. आस्ट्रियाविषयीं इटालियन लोकांच्या मनांत सुप्त ज्वालामुखीप्रमाणें क्रोधाग्नि धुमसत आहे! आस्ट्रिया-च्या नरडीचा घोट घ्यावयासाठीं इटालियन लोक उत्सुक झाले आहेत! आस्ट्रियाच्या सैन्यांत पोलंड देशांतले पुष्कळ शिपाई आहेत. 'तुमच्या व आमच्या स्वातंत्र्यासाठीं, अशी गर्जना करून तुम्ही व्हेनिसवर हल्ला करा कीं ते सर्व सैनिक तुमच्या मदतीला धांवून येतील!" पोलंडला इटलीकडून कांहींच मदत होत नाहीं हें पाहून मॅझिनी सारखा जळफळत होता; तोंच व्हेनीशिया प्रांतांतील उठावणीविषयीं व्हिक्टर इमॅन्युएलनें त्याचेबरोबर बोलणें लावलें! मॅझिनी व व्हिक्टर इमॅन्युएल या दोघांना एकामेकांबद्दल आदर व प्रेम वाटत होतें; पण केवळ परिस्थितीच्या विपरीतपणामुळें त्यांना सहकार्य करतां आलें नाहीं. त्या दोघांनाहि ऑस्ट्रिया-बद्दल द्वेष वाटत होता; दोघंहि व्हेनिस काबीज करण्यासाठीं अधीर झाले होते; काव्हूरच्या मागून प्रधानपदावर आलेल्या निर्जीव बाहुल्याबद्दल या दोघांनाहि तिरस्कार वाटत होता. अनेक महिने वाटाघाट झाल्यानंतर त्यांचा समेट झाला. मॅझिनीनें व्हेनीशिया प्रांतांत बंड उठवावें, बंड यशस्वी होईपर्यंत लोकसत्ताक तत्वांचा प्रचार करूं नये, बंडवाल्यांना पीडमॉंटसरकारनें शस्त्रास्त्रांचा पुरवठा

करावा आणि बंड रंगाला आल्यानंतर ऑस्ट्रियाबरोबर युद्ध पुकारावें असा दोघांचा ठराव झाला होता. या समेटाला मूर्त स्वरूप प्राप्त व्हावयाचे अगोदरच या अटी बाहेर फुटल्या; इतक्यांत ग्रीकोचा कट उघडकीला आला व या कटाशीं मॅझिनीचा संबंध जोडण्यांत असल्यामुळें हें सहकार्य अशक्य झालें. पीडमाँटच्या प्रधानमंडळाची कल्पना झाली होती कीं, आपणांसर्वांना बडतर्फ करण्यांत यावें अशी मॅझिनीनें अट घातली आहे व ती राजानें मान्य केली आहे; म्हणून त्यांनीं या समेटाविरुद्ध गिल्ला आरंभला. शेवटीं मॅझिनीबरोबर समेट करून कार्याला सुरवात करावयाचें धाडस अंगीं नसल्यामुळें राजानें गॅरिबॅाल्डीला हाताशीं धरावयाचा बेत केला.

त्यावेळीं गॅरिबॅाल्डी इंग्लंडांत गेला होता. रोमचे अगोदर व्हेनीशियाचा प्रश्न हातीं घेणें अधिक इष्ट आहे ही मॅझिनीची नवी विचारसरणी त्याला पटली होती. इटलीविषयीं इंग्लंडनें आजपर्यंत अत्यंत सहानुभूतिपर वर्तन केलें असल्यामुळें या स्वारीसाठीं इंग्लंडची कांहीं मदत मिळाल्यास पहावी म्हणून प्रयत्न करावयासाठीं तो इंग्लंडांत गेला ( मार्च. १८६४ ). इंग्लिश जनतेला या वीराबद्दल विलक्षण आदर वाटत होता व त्यांनीं ठिकठिकाणीं गॅरिबॅाल्डीचा अपूर्व सन्मान करून हा आदर प्रकट करून दाखविला. इंग्लंडांत त्यानें बऱ्याच बड्या लोकांच्या मुलाखती घेतल्या; इंग्लिश मुत्सद्यांच्या संभाषणावरून त्याची खात्री होऊन चुकली कीं इंग्लंडची प्रत्यक्ष मदत मिळविणें अशक्य आहे. याच सुमारास मॅझिनी व व्हिक्टर इमन्युएल या दोघांनींहि त्याचेबरोबर पत्रव्यवहाराला सुरवात केली. राजाचें म्हणणें होतें कीं त्यानें गॅलेशिया प्रांतांत बंड उभारावें व मॅझिनीचें मत होतें कीं त्यानें व्हेनीशिया प्रांतांत उठावणी करावी. लवकरच आइल ऑफ वाइटमध्यें मॅझिनीनें गॅरिबॅाल्डीची गांठ घेतली; या मुलाखतींत त्यांनीं आपलें अंतःकरण एकमेकांपाशीं मोकळें केलं: व्हेनीशियाचा बेत आपणांस पसंत आहे असा गॅरिबॅाल्डीचा अभिप्राय दिसून येतांच बंडाची पूर्वतयारी करावयासाठीं मॅझिनी लुगॅनो येथें परत आला. इंग्लंडांत टेडिंग्टन येथें अलेक्झँडर हर्झन या हद्दपाराच्या घरीं झालेल्या मेजवानीच्या वेळीं भाषण करतांना गॅरिबॅाल्डी म्हणाला कीं, मॅझिनी हा माझ्या तारुण्याचा गुरु व जन्माचा जिवलग आहे! त्याचे हे शब्द प्रसिद्ध झाले तेव्हां इंग्लिश मुत्सद्यांचें धाबें दणाणलें व अत्यंत हीन मार्गांनीं त्यांनीं गॅरिबॅाल्डीला इटलीकडे परत लावलें. त्याला इंग्लंडची हवा मानवत नाहीं असा डॉक्टरांचा

अभिप्राय पडल्यावरून तो स्वदेशीं परत जात आहे असें जाहीर करण्यांत आलें! गॅरिबॅाल्डी इटलींत परत जावयास निघाला त्यावेळीं राजाच्या हस्तकांनीं गॅलशिया प्रांतांतील उठावणीला त्याची कबुली मिळविली होती. पण हीच बातमी बाहेर फुटली तेव्हां मात्र राजानें या समेटाचा जोरानें इनकार केला! गॅरिबॅाल्डीच्या चंचलतेमुळें व राजाच्या अवसानघातकीपणामुळें मॅझिनी अगदीं चिडून गेला; तरी इटलीला मदत मिळविण्यासाठीं इंग्लंडांत दौरा काढावा असा त्यानें गॅरिबॅाल्डीला निरोप पाठविला; पण गॅरिबॅाल्डी कॅप्रेरा बेटांतच राहिला, व्हिक्टर इमॅन्युएल स्वस्थ राहिला व मॅझिनीनें मात्र उठावणीच्या तयारींत खंड पडूं दिला नाहीं!

ता. १५ सप्टेंबर १८६४ रोजीं फ्रान्स व इटली यांचा नवा तह झाला. इटालियन सरकारनें पवित्र पोपच्या स्थावरजंगम मिळकतीचें संरक्षण करावयाची जबाबदारी शिरावर घ्यावी आणि पोपच्या रक्षणासाठीं रोम येथें असलेलें फ्रेंच सैन्य दोन वर्षांचे आंत हप्त्याहप्त्यानें स्वदेशीं परत नेण्यांत यावें, असें या तहनाम्यान्वयें ठरविण्यांत आलें. इटलीची राजधानी रोम शहरीं स्थापन करणें अशक्य आहे असा गैरसमज रूढ करविणें त्यावेळीं अत्यंत इष्ट होतें; कारण, त्याशिवाय फ्रेंच सैन्य परत नेण्याला फ्रेंच प्रतिनिधींनीं कधींहि मान्यता दिली नसती; लोकांचा गैरसमज करून देण्यासाठीं इटलीची राजधानी ट्यूरिनहून फ्लॉरेन्स येथें हलविण्यांत आली! १८४८ पासून १८६४ पर्यंत रोमच्या संरक्षणासाठीं सैन्य ठेवल्याबद्दल फ्रान्सला जो खर्च करावा लागला तो इटलीनें भरून द्यावा असेंहि सप्टेंबरच्या तहनाम्यानें ठरलें होतें! व्हिक्टर इमॅन्युएलनें तहनाम्यावर मोठ्या नाखुषीनें सही केली. रोम काबीज करावयाचा बेत राजानें निखालसपणें सोडून दिलेला पाहून इटालियन लोक अगदीं खवळून गेले. यावेळीं मॅझिनीनें पुढील जाहीरनामा काढला:—" सरकार, लोकप्रतिनिधी व जनता यांनीं एकवटून इटलीचें ऐक्य करण्याची व रोम शहरीं इटलीची राजधानी स्थापन करण्याची प्रतिज्ञा केलेली आहे. पण या तहनाम्यामुळें सर्वांच्या वचनांचा भंग झालेला आहे...आम्ही लोकसत्तावाद्यांनीं आजवर लोकमत शिरसावंद्य मानलें होतें...विद्यमान सरकारच्या राजकारणाला आजवर आम्ही मान्यता दिली होती...पण हा तह अमलांत येईल तर सरकारची मदत न घेतां, इतकेंच नव्हे, तर प्रसंग पडल्यास सरकारला विरोध करूनहि आम्ही इटलीच्या एकीकरणाचें कार्य तडीस लावूं...ऑस्ट्रियाच्या

जुलमानें टेंकीस आलेल्या व्हेनीशियन लोकांनीं आतां स्वतंत्रपणेंच ऑस्ट्रिया-वर हल्ला चढविला पाहिजे. आज रोम हें अनीतीचें व जुलमाचें माहेरघर होऊन बसलें आहे; तेथें धर्मस्वातंत्र्य स्थापन करणें हें रोमन लोकांनो, तुमचें कर्तव्य आहे ! संपूर्ण राष्ट्रानें एकमतानें रोम येथें अशी राज्यपद्धति स्थापन केली पाहिजे कीं, तिजमुळें भविष्यकालीं राष्ट्राचें रक्षण होईल ! या कामीं केवढेंहि नुकसान सोसावें लागलें तरी बेहेत्तर आहे ! इटालियन लोकांनो, चला, उठा, हीं कामें हातीं घ्या. तुमच्या मार्गांत जीं विघ्नें येतील त्यांचा विध्वंस करावयास सिद्ध व्हा ! ..तुम्हांला ईश्वराची व राष्ट्रमातेची शपथ आहे ! उठा, प्रजासत्तेचा जयघोष करा आणि कार्याला हात घाला ! " मॅझिनीचा हा लेख प्रसिद्ध झाला तेव्हां नेपोलियनकडून इटालियन सरकारकडे एक खलिता आला; पोपच्या गादीला इटालियन लोकांकडून धक्का पोंचेल तर युरोपांतील सर्व कॅथलिक राजे इटलीवर स्वारी करून पोपचें रक्षण करतील अशी नेपोलियननें या खलित्यांत व्हिक्टर इमॅन्युएलला धमकी दिली होती. स्वातंत्र्योन्मुख इटलीचें राजकारण परक्यांच्या हातीं चाललेलें पाहून इटालियन लोक अगदीं खवळून गेले होते—सिसिलींतील लोक तर बंड करावयास तयार झाले होते; परंतु मॅझिनीनें त्यांची समजूत घातली कीं तुम्ही बंड केल्यास इटलीच्या एकीकरणाच्या कामीं हरकती येतील, म्हणून ते स्वस्थ राहिले.

सप्टेंबरच्या तहनाम्यानें रोमचा मार्ग बंद झाल्यामुळें इटालियन सरकारनें व्हेनिसचा प्रश्न हातीं घेतला. त्यावेळीं बिस्मार्कच्या नेतृत्वाखालीं प्रशियानें जर्मनीच्या एकीकरणासाठीं प्रयत्न चालविला होता. जर्मन संस्थानांमधील प्रमुखस्थान प्रशियाकडे यावयाचे मार्गांत ऑस्ट्रिया हा मोठाच अडथळा होता; जर्मन संस्थानांचें एकीकरण झाल्यास आपल्या सरहद्दीवर एक प्रबल राष्ट्र निर्माण होईल अशी ऑस्ट्रियाला भीति वाटत होती; प्रशिया व ऑस्ट्रिया यांच्या चुरसीचा शेवट युद्धावांचून होणें अशक्य आहे हें जाणून बिस्मार्कनें प्रशियन लष्कराचें सामर्थ्य वाढविण्यासाठीं आटोकाट मेहनत केली होती. ऑस्ट्रियाच्या सैन्याचा कांहीं भाग अडकवून ठेवण्यासाठीं बिस्मार्कला इटलीची मदत हवी होती. ऑस्ट्रियाचा पराभव होतांच इटलीला व्हेनीशिया प्रांत मिळावा या अटीवर ता. ८ एप्रिल १८६६ रोजीं इटली व प्रशिया यांचा तह झाला. ऑस्ट्रिया व प्रशिया यांची लढाई जुंपल्यास दोन्ही राज्यांचा नाश होऊन युरपियन राज्यांमधील अग्रस्थान फ्रान्सलाच मिळेल असा नेपोलियनला भरंवसा वाटत होता.

या युद्धांत नेपोलियनची मदत आपणांस मिळणें शक्य नाहीं हें दिसून येतांच ऑस्ट्रियानें इटलीबरोबर तडजोडीचें बोलणें लावलें; ऑस्ट्रिया व प्रशिया यांच्या युद्धांत तटस्थ राहिल्यास इटलीला व्हेनीशिया प्रांत बहाल करण्याचें आमिष दाखवून इटलीला फोडण्यासाठीं ऑस्ट्रियानें बोलणें लावलें; पण प्रशियाला अगोदरच वचन दिलेलें असल्यामुळे इटालियन सरकारनें ऑस्ट्रियाची देणगी फेटाळून लावली. ता. १६ जून १८६६ रोजीं प्रशियानें ऑस्ट्रियाबरोबर लढाई जाहीर केली आणि ता. २० जून रोजीं इटलीनें युद्ध जाहीर केलें.

मॅझिनीनें १८५१ सालीं जाहीर केलें होतें कीं ऑस्ट्रियाबरोबर युद्ध करावयासाठीं इटलीनें जर्मनीकडे मदत मागावी; पण १८६६ सालीं युद्ध जाहीर होतांच त्यानें या दोस्तीविरुद्ध ओरड केली! "इटालियन लोकांनीं विसरतां कामा नये कीं, पोलंडचें स्वातंत्र्य नष्ट करण्याच्या कटांत प्रशियाचें अंग होतें... ऑस्ट्रियाशीं लढावयासाठीं इटलीनें स्वतःच कंबर बांधिली पाहिजे; मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं इटालियन लोकांनीं युद्ध उभारलें तर ऑस्ट्रियानें ज्यांचें स्वातंत्र्य हरण केलें आहे अशीं हंगेरी, पोलंड, बोहीमिया वगैरे राष्ट्रें इटलीला मदत करतील!" सुरू झालेल्या युद्धाचा देशाला शक्य तितका फायदा व्हावा यासाठीं त्यानें आपल्या अनुयायांना सैन्यांत सामील व्हावयाचा उपदेश केला. स्वयंसैनिकांच्या पलटणींत सामील व्हावयासाठीं पंचाण्णव हजार लोकांचे अर्ज आले—पण इटालियन सरकारपाशीं सैन्य भरपूर आहे असें सांगून लष्करी खात्याच्या प्रधानानें यांपैकीं बहुतेक लोक परत लावले! उरल्या सुरल्या स्वयंसैनिकांना गॅरिबॉल्डीच्या हाताखालीं आल्पस् पर्वतांतील घाटांचे रक्षण करण्यासाठीं पाठविण्यांत आलें—पण त्यांना धड हत्यारेंहि पुरविण्यांत आलीं नाहींत!

लढाई जाहीर करण्यांत आली तेव्हां इटालीच्या खजिन्यांत पुरेसा पैसा नव्हता, आरमाराची व सैन्याची गैरव्यवस्था झाली होती. इटालियन सेनापति लॅ मार्मोरा याच्या निष्काळजीपणामुळें कस्टोझा येथें इटालियन सैन्याचा पराभव झाला; लिसा बंदराजवळ ऑस्ट्रियन आरमारानें इटालियन आरमाराचा पराभव केला. इटालियन सैन्याची अशी बेअब्रू झाली—पण ता. ३ जुलै रोजीं प्रशियन सैन्यानें साडोवा येथें ऑस्ट्रियन सैन्याचा पुरता पराभव केल्यामुळें इटलीची बाजू बचावली! युद्धामुळें जर्मनी दुर्बळ झाल्यावर -हाईन नदीच्या किनाऱ्यावरील प्रांत फ्रान्सच्या राज्याला जोडावयाचा नेपोलियनचा बेत होता;

त्यानें व्हिक्टर इमॅन्युएलबरोबर अगोदरच गुप्त तह केला होता कीं, प्रशियाचा मोड होतांच इटलीनें युद्धांतून आपलें अंग काढून घ्यावें व ऱ्हाईन प्रांत बळकावण्यासाठीं फ्रान्सला संधि द्यावी--आणि याबद्दल नेपोलियननें ऑस्ट्रियाच्या ताब्यांत असलेला व्हेनिस प्रांत इटलीला द्यावा ! पण साडोवाच्या लढाईनंतर इटलीवरील आपलें वर्चस्व कायम ठेवण्यासाठीं त्यानें ऑस्ट्रियाच्या वतीनें व्हिक्टर इमॅन्युएलबरोबर बोलणें लावलें कीं, इटलीनें ताबडतोब युद्धतहकुबी जाहीर केली तर व्हेनिस प्रांतावरील आपला ताबा सोडावयास ऑस्ट्रिया कबूल आहे ! पण नेपोलियनच्या मध्यस्तीशिवाय व्हेनिस प्रांत आपणांस मिळणार अशी खात्री असल्यामुळें व्हिक्टर इमॅन्युएलनें ऑस्ट्रियाची मागणी फेंटाळून लावली. शेवटीं ऑस्ट्रियाला प्रशियाबरोबर तह करणें भाग पडलें; ता. ३ ऑक्टोबर १८६६ रोजीं व्हिएन्ना येथील तहामुळें इटलीला व्हेनिस प्रांत मिळाला. व्हेनिस मिळविण्यासाठीं व्हिक्टर इमॅन्युलनें चालविलेलें कुटिल कारस्थान व दुटप्पी डाव बिस्मार्कला माहीत होता-तरीहि अखेरच्या तहनाम्यामध्यें त्यानें वचनभंग केला नाहीं ! ता. ७ नोव्हेंबर रोजीं व्हेनिस शहरांत राजानें प्रवेश केला त्यावेळीं नागरिकांनीं मोठ्या प्रेमानें त्याचें स्वागत केलें.

पीडमॉंट सरकारनें मॅझिनीस फर्माविलेली मरणाची शिक्षा ऑस्ट्रोप्रशियन युद्धाचे आरंभापर्यंत कायम होती. १८६५ सालीं मेसिना शहरच्या रहिवाशांनीं त्याला इटालियन पार्लमेंटांत आपल्या तर्फे प्रतिनिधि निवडून ही शिक्षा आपणांस मान्य नाहीं असें जाहिर केलें; पण प्रतिनिधिमंडळांतील मवाळांनीं ही निवडणूक रद्द ठरविली; मवाळांच्या या हलकटपणामुळें चवताळून जाऊन मेसिनाच्या रहिवाशांनीं पुन: पुन्हां मॅझिनीचीच निवडणूक केली—व मवाळांनीं दर खेपेस त्याची निवडणूक रद्द केली ! मॅझिनीची शिक्षा रद्द व्हावी म्हणून चाळीस हजार सह्यांचा एक अर्ज सरकारकडे पाठविण्यांत आला—पण त्याचाहि फारसा उपयोग झाला नाहीं. १८६६ सालीं लढाई सुरू झाली तेव्हां स्वदेशांत यादवी माजूं नये म्हणून सरकारनें मॅझिनीला माफी दिल्याचें जाहीर केलें. पण ह्या दयेच्या माफीचा मॅझिनीनें धि:कार केला ! मेसिना शहरच्या रहिवाशांनीं त्याला आपलीं गाऱ्हाणीं लोकसभेपुढें मांडावयाची आज्ञा केली होती—पण ही आज्ञा मान्य करण्याचें त्यानें नाकारलें. " इटालींत परत यावयाची परवानगी मला मिळालेली आहे तरी प्रतिनिधिमंडळांत दाखल होतांना घ्यावी लागणारी राजनिष्ठेची शपथ विवेक बुद्धीला स्वरून घेतां येणें मला अशक्य आहे. राष्ट्रैक्य,

राष्ट्रस्वातंत्र्य व लोकसत्ता हीं महातत्वें इटलींत प्रस्थापित करण्याची शपथ मी पस्तीस वर्षांपूर्वी घेतली आहे; मध्यंतरीं लोकमत प्रमाण मानून मी राजसंस्था मान्य केली होती; ज्या मार्गानें इटलीचें एकीकरण होईल तो मार्गहि मी सरकारला स्पष्टपणें दाखवून दिला होता. पण राजानें जनतेची फसवणूक केली. रोम शहर हीच इटलीची राजधानी होय असें लोकांनीं एकमतानें जाहीर केलें असतांहि राजाने पोपची सत्ता कायम राखण्याच्या तहाला संमति दिली ! हल्लींची इटलीची राज्यपद्धति इटालियन लोकांनीं मंजूर केलेली नसून, पीडमॉंट प्रांतांतील लोकांनीं १८४८ सालीं ठरवून घेतलेली असल्यामुळें ही राज्यपद्धति मला मान्य आहे अशी शपथ मी कधींहि घेणार नाहीं. ”

ऑस्ट्रो—प्रशियन युद्धांत इटलीची बेअब्रू झालेली पाहून मॅझिनी अगदीं चवताळून गेला. केवळ मुलूख मिळविण्यासाठीं स्वार्थी राजानें देशाची अशी बेअब्रू केली असें त्याला वाटूं लागलें. खड्या सैन्याच्या जोरावर त्यानें स्वयंसैनिकांचा अपमान केला म्हणूनच इटलीच्या अब्रूचे असे धिंडवडे निघाले, “ राष्ट्राच्या अब्रूला लागलेली ही काळोखी धुवून काढावयाचें सामर्थ्य फक्त लोकसत्तेच्याच अंगीं आहे, ” “ गुलामांना नागरिक बनविण्याचा आणि त्यांना आपल्या नियोजित कार्याची व सामर्थ्याची जाणीव करून देण्याचा लोकसत्ता हा एकच मार्ग आहे, ” असें जाहीर करून त्यानें लोकसत्तावाद्यांच्या संघटनेला उघडपणें आरंभ केला. हा काळ लोकक्षोभ जागृत करावयास योग्य होता; पण जनशक्तीचे हातून विशिष्ट कार्य करविणें मात्र अशक्य होतें. युद्धांतील पराभवामुळें सरकारची बेअब्रू झालेली होती. राजाच्या व्यभिचारांकडे लोकांनीं आजवर दुर्लक्ष केलें होतें—पण नीतीबरोबरच राजानें राष्ट्राच्या ध्येयाचाहि त्याग केलेला पाहतांच जनता चवताळून गेली होती; स्वदेशांतील वेगवेगळ्या पक्षांमध्यें लवकरच यादवी माजणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. पण पूर्वीप्रमाणें काम करावयाचा जोम आतां मॅझिनीच्या अंगीं राहिला नव्हता. म्हातारपणामुळें त्याची प्रकृति वारंवार बिघडूं लागली होती. थोडेसें लिहितांच त्याला घेरी येत असे--तरी त्यानें कामाची टाळाटाळ केव्हांहि केली नाहीं. “ मरावयाचे पूर्वी इटलीमध्यें लोकसत्ता स्थापन करणें हें माझें कर्तव्य आहे, ” असें तो म्हणत असे.

सप्टेंबरच्या तहनाम्यांत ठरल्याप्रमाणें १८६६ च्या डिसेंबर महिन्यांत फ्रेंच सैन्य रोम शहरांतून परत बोलावण्यांत आलें. रोम शहर काबीज करावयाची

राजाला लोकप्रतिनिधींनीं आज्ञा केली होती. पण ही आज्ञा मान्य करावयाचें धाडस राजाच्या अंगीं राहिलें नव्हतें. इकडे गॅरिबॅाल्डीची कल्पना करून देण्यांत आली होती कीं, रोमन जनता उठावणीसाठीं अत्यंत उत्सुक आहे; म्हणून रोमवर हल्ला करण्याकरितां ता. २३ सप्टेंबर १८६७ रोजीं गॅरिबॅाल्डी कॅप्रेरा बेटांतून निघून एकदम फ्लॉरेन्स शहरीं दाखल झाला. लवकरच फ्लॉरेन्स येथें रोमच्या स्वारीची तयारी करावयासाठीं एक सभा स्थापन झाली; या सभेनें गॅरिबॅाल्डीस ‘ रोमन लोकशाहीचा सेनापति ’ ही पदवी अर्पण केली. त्यानें रोमवर स्वारी करावयाचा निश्चय जाहीर करतांच स्वयसैनिकांच्या झुंडीच्या झुंडी फ्लॉरेन्सकडे लोटूं लागल्या. ही हकीगत कळतांच प्रधानमंडळानें गॅरिबॅाल्डीला कैद करण्याचा हुकूम सोडला. सरकारी अधिकाऱ्यांनीं त्याला कैद करून कॅप्रेरा बेटांत सोडून दिलें व बेटाभोंवतीं चार सरकारी गलबतांचा खडा पहारा ठेवला.

इकडे गॅरिबॅाल्डी अटकेंत होता तरी त्याच्या अनुयायांनीं रोम शहरीं बंड उभारण्याचा प्रयत्न चालू ठेवला होता. उठावणीसाठीं शहरामध्यें गुप्तपणें शस्त्रास्त्रें न्यावयाचें काम एनरिको व जिओव्हॅनी या कैरोली * बंधूंनीं अंगावर घेतलें; सत्तर स्वयंसैनिकांच्या मदतीनें त्यांनीं बंदुका व दारूगोळा रोमनजीक टायवर नदीच्या कांठीं उतरविल्या; दारूगोळा ताब्यांत घ्यावयासाठीं रोमन क्रांन्तिकारकांचे प्रतिनिधि त्यांना भेटणार होते—त्यांची व यांची गांठच पडली नाहीं; मात्र पोपच्या सैन्याची व स्वयंसैनिकांच्या या लहानशा टोळीची गांठ पडली ! चकमकींत एनरिको मारला गेला व जिओव्हॅनी कैद झाला ! पोपच्या तुरुंगांत थोडे दिवस काढल्यानंतर जिओव्हॅनीला घरीं जाण्याची परवानगी देण्यांत आली—पण तुरुंगांत भोगलेल्या अपेष्टांमुळें घरीं आल्यावर थोडक्याच दिवसांनीं व वयाच्या केवळ बाविसाव्या वर्षीं त्याचा अंत झाला !

गॅरिबॅाल्डीवर सक्त पहारा ठेवलेला होता तरी ता. १४ आक्टोबर १८६७ रोजीं रात्रीं दाट धुकें पडलेलें पाहून त्यानें मोठ्या धाडसानें इटलीचा किनारा गांठला आणि रोमवर स्वारी करावयास जमलेल्या स्वयंसैनिकांसह त्यानें

---

* कैरोली कुटुंबानें इटलीसाठीं विलक्षण स्वार्थत्याग केला होता. या पांच भावांपैकीं अर्नेस्टो, लुइजी व बॅनेडेटो या तिघांनीं इटलीसाठीं अगोदरच आत्मार्पण केलें होतें. त्यांचा पिता कार्ल कैरोली यानें १८४८ च्या राज्यक्रान्तीमध्यें पुढाकार घेतला होता.

रोमचा रस्ता धरला ! गॅरिबाल्डी रोमपासून ४॥ मैलांवर आला तेव्हां पोपच्या सैनिकांनीं शत्रूला थोपवून धरण्याकरितां वाटेंतील पूल सुरुंग लावून उडवून दिले. गॅरिबॅाल्डीच्या स्वारीची बातमी ऐकतांच युरोपांत मोठी खळबळ उडून गेली. फ्रान्समधील प्रबळ रोमन कॅथलिक पक्षाला संतुष्ट करण्यासाठीं पोपला कुमक पाठविणें नेपोलियनला भाग पडलें. ता. २७ आक्टोबर रोजीं इटालियन सरकारनें जाहीरनामा काढून गॅरिबॅाल्डीचा धि:कार केला ! गॅरिबॅाल्डीच्या या कृत्याला आपली सहानुभूति नाहीं हें सिद्ध करून दाखवावयासाठीं व्हिक्टर इमॅन्युएलनें इटालियन सैन्य रोमच्या दिशेला रवाना केलें ! इटालियन सरकारच्या जाहीरनाम्यामुळें पुष्कळसे स्वयंसैनिक गॅरिबॅाल्डीला सोडून गेले ! या अडचणींमुळें त्याला माघार घ्यावी लागली. ता. ३ नोव्हेंबर रोजीं मेंटाना येथें त्यानें पोपच्या सैन्याचा मोड केला—इतक्यांत फ्रेंच सैन्य तेथें आल्यामुळें त्याला माघार घ्यावी लागली ! स्वयंसैनिकांच्या पलटणी मोडून टाकून व जखमी झालेल्या लोकांची व्यवस्था करून गॅरिबॅाल्डी फ्लॉरेन्सला जावयासाठीं आगगाडीनें निघाला—पण वाटेंतच इटालियन पोलिसांनीं त्याला कैद केलें. वॅरिगॅनो येथें कांहीं दिवस अटकेंत ठेवल्यानंतर त्याला कॅप्रेरा बेटांत परत पाठविण्यांत आलें.

गॅरिबॅाल्डीला ऐन वेळेवर कैद करून आपण फ्रान्सबरोबर होणारें युद्ध, अर्थांतच एक राष्ट्रीय आपत्ति टाळली अशी इटालियन प्रधानमंडळाची समजूत होऊन बसली होती ! पण सरकारच्या अनिश्चित धोरणामुळें इटालियन लोक अगदीं खवळून गेले; इटलीचें राजकारण फ्रान्सच्या तंत्रानें चालावें याची सर्वांना मोठी चीड आली. फ्रान्सच राज्य स्वत:च्या मुलाला मिळावें यासाठीं नेपोलियन हा कॅथलिक पक्षाच्या पुढाऱ्यांना दुखवावयास कबूल नव्हता—आणि म्हणूनच स्वत:च्या मर्जीविरुद्ध पोपच्या संरक्षणासाठीं फ्रेंच सैन्य रवाना करणें त्याला भाग पडलें होतें. फ्रान्सच्या सैन्यापुढें माघार घेतल्यामुळें इटालियन वर्तमानपत्रें राजावर तुटून पडूं लागलीं; ज्वलत् जहाल लेखकांना न्यायाधीशांकडून माफी मिळूं लागली ! लोकसत्तेची चळवळ मॅझिनीनें अगोदरच जाहीर रीतीनें सुरू केली होती—तिला आतां जोर चढूं लागला. मेंटानाच्या लढाईनंतर मॅझिनी लंडन सोडून लुगॅनो येथें येऊन राहिला होता. जिनोआ येथें त्याच्या अनुयायांची संख्या दिवसानुदिवस वाढत होती. १८६९ सालीं मिलनच्या लोकसत्तावाद्यांचा उठावणीचा बेत फसला तेव्हां इटालियन

सरकारच्या विनवणीवरून मॅझिनीनीला स्वित्झरलँडमधून हद्दपार करण्यांत आलें. १८७०सालीं हद्दपार मॅझिनी जिनोआ शहरीं उठावणीची मांडणी करावयास आला; शिरस्त्याप्रमाणें हा कटहि उघडकीला आला–इतक्यांत फ्रान्स व जर्मनी यांमध्यें युद्ध जुंपणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. पूर्वी इटलीनें जर्मनीबरोबर ऑस्ट्रियाविरुद्ध तह करून ऑस्ट्रियाची बाजू लंगडी केली होती याची आठवण धरून नेपोलियननें यावेळीं व्हिक्टर इमॅन्युएलबरोबर तहाचें बोलणें लावलें. फ्रान्सबरोबर तह करावयास राजा कबूल होता पण ही दोस्ती इटालियन लोकांना मान्य होणें शक्य नाहीं असें प्रधानमंडळानें निक्षून सांगितल्यावरून त्यानें हा बेत सोडून दिला जर्मनीची संघटना करावयासाठीं हव्या त्या मार्गाचा स्वीकार करावयास बिस्मार्कची तयारी होती; नेपोलियन व व्हिक्टर इमॅन्युएल यांमध्यें तहाची वाटाघाट चालू होती त्याच सुमारास, जर्मनीनें इटलीला हत्यारें व खजिना पुरवावा आणि इटालियन क्रान्तिकारकांनीं रोमवर हल्ला करावा या अटींवर मॅझिनीनें बिस्मार्कबरोबर बोलणें लावलें; बिस्मार्कनें मॅझिनीला बरीच आशा लावून ठेवली होती, पण फ्रान्स व इटली यांची दोस्ती होणें शक्य नाहीं हें दिसून येतांच त्यानें मॅझिनीला धुडकावून लावलें! फ्रान्स व जर्मनी यांचें युद्ध ता. १९ जुलै १८७० रोजीं सुरू झालें; आणि ता. २ सप्टेंबर रोजीं सेडन येथें आपल्या ऐंशीं हजार सैन्यासह नेपोलियन बादशहा जर्मनीला शरण गेला! ही बातमी प्रसिद्ध होतांच पॅरिस शहरीं क्रान्ति झाली; स्वतःचा जीव वांचविण्यासाटीं महाराणी युजीनी व युवराज यांनीं इंग्लंडांत पळ काढला; जर्मनी व फ्रान्स यांचा तह झाल्यानंतर नेपोलियनला आपल्या बायकामुलांकडे जावयाची परवानगी मिळाली. फ्रान्सचा हा महत्त्वाकांक्षी पण दुर्दैवी बादशहा ता. ९ नोव्हेंबर १८७२ सालीं इंग्लंडांतच मरण पावला.

फ्रँको-जर्मन युद्धाला आरंभ झाला तेव्हां रोमच्या संरक्षणासाटीं पाठविलेलें फ्रेंच सैन्य स्वदेशीं परत बोलावण्यांत आलें. फ्रेंच सैन्य माघारें जातांच रोम शहर कबजांत घ्यावयासाटीं इटालियन लोकांनीं जोराची चळवळ सुरू केली. पोपनें समजूतदारपणानें शहर ताब्यांत द्यावें म्हणून राजानें पुष्कळ खटपट केली; पण रोमन दरबारच्या अडाणीपणामुळे तडजोड होणें अशक्य आहे असें ठरलें तेव्हां रोमवर सैन्य पाठविण्याचें इटालियन सरकारनें ठरविलें. ता. २० सप्टेंबर रोजीं इटालियन सैन्यानें रोम काबीज केलें. पोपचें मन दुखवूं नये म्हणून राजानें नगरप्रवेश लांबणीवर टाकला–पण पोपच्या मनोवृत्तींत बिल-

कुल फरक होत नाहीं हें दिसून आलें तेव्हां ता. २ जून १८७२ रोजीं राजानें मोठ्या समारंभानें रोम शहरांत प्रवेश केला. ता. २७ नोव्हेंबर रोजीं संपूर्ण इटलीच्या लोकनियुक्त प्रतिनिधींचें पहिलें पार्लमेंट रोम शहरांत भरलें तेव्हां लोकांनीं व्हिक्टर इमॅन्युएलचा जयजयकार केला; " ज्या कार्याच्या पूर्ततेसाठीं आम्ही आपल्या आयुष्याचा व्यय करावयाचें निश्चित केलें होतें तें कार्य आज यशस्वी झालें आहे, " हें राजाचें वाक्य ऐकतांच सर्व लोकप्रतिनिधींनीं राजाचा जयजयकार केला ! नोव्हॅराच्या रणमैदानावर त्यानें केलेली प्रतिज्ञा तडीला गेली, स्वातंत्र्य व राष्ट्रैक्य सिद्ध झालें, इटलीचा तिरंगी झेंडा इटलीच्या राजधानीवर फडकूं लागला, इटलीच्या उद्धारासाठीं जन्माला आलेल्या महापुरुषाचें कार्य साध्य झालें आणि युरपियन राष्ट्रांमध्यें इटलीला बरोबरीचा मान व स्थान मिळालें !

सिसिली बेटांतील क्रान्तिकारकांना पीडमाँटच्या राजघराण्याचा अंमल नकोसा झाला होता; सिसिली बेटांत प्रजासत्ताक राज्य स्थापन करावयाचा त्यांचा विचार होता. राष्ट्रैक्यावर नजर ठेवून तुम्ही उठावणी करूं नका असें सांगून मॅझिनीने त्यांना थोपवून धरलें होतें. सिसिली बेटावर नेमलेल्या इटालियन सुभेदाराच्या जुलमानें गांजून गेलेल्या लोकांनीं उठावणीची तारीख कायम करून मॅझिनीला निर्वाणीचा निरोप पाठविला. बंडवाल्यांना यश येईल अशी त्याची मुळींच अपेक्षा नव्हती—पण या झटापटींत आपणांस मरण तरी येवो एवढयाच इच्छेनें बंडवाल्यांना मिळावयासाठीं मॅझिनी १८७० सालीं इंग्लंडांतून सिसिलीकडे जावयास निघाला. मॅझिनीच्या भोंवतीं असलेल्या देशभक्तांच्या घोळक्यांत सरकारचे हेर बातम्या काढण्यासाठीं नेमलेले असत हें सर्वांना माहीत होतें. अशाच एका हेरानें यावेळीं मॅझिनीचा विश्वासघात केला; नेपल्सला निघालेल्या आगबोटीनें प्रवास करीत असतांना मॅझिनीला इटालियन पोलिसांनीं पालर्मो बंदरांत कैद करून गाइटाच्या किल्ल्यांत अटकेंत ठेवलें. या मजबूत किल्ल्याच्या एका उंच बुरुजांत त्याला ठेवलें होतें. एकोणचाळीस वर्षांपूर्वी सॅव्होनाच्या किल्ल्यांत अटकेंत असतांना त्याच्या दृष्टीला आकाश व सागर दिसत असत; गाइटाच्या किल्ल्यांतूनहि त्याला हींच दृश्यें दिसत असत. " रात्र पडली कीं सर्वत्र शांतता पसरते; आकाशांत तारका अत्यंत तेजानें चमकत असतात—इटलीशिवाय दुसऱ्या कोणत्याही देशांत तारका इतक्या तेजस्वी दिसत नाहींत. या तारका माझ्या बहिणी आहेत असें मला वाटूं लागतें. " तुरुंगांतल्या लाय-

ब्रीमधील शेक्सपीअर, बायरन वगैरे कवींचे ग्रंथ वाचण्यांत त्याचा वेळ जात असे. रोम शहर इटालियन सरकारनें कबजांत घेतल्यानंतर मॅझिनीला बंधमुक्त करण्यांत येऊन त्याला सर्व अपराधांची माफी देण्यांत आली–पण या माफीचा फायदा घ्यावयाचें मॅझिनीनें नाकारलें ! आपल्या सुटकेबद्दल इटालियन लोकांनीं आनंदप्रदर्शन करावें ही कल्पना मान्य नसल्यामुळें गाइटा येथून तो मोठ्या पहांटेस निघून गेला. एकवीस वर्षांपूर्वी रोमन लोकशाहीचा सर्वसत्ताधारी असलेला मॅझिनी सुटका झाल्यानंतर मुक्कामासाठीं एक रात्र मात्र रोम शहरांत राहिला.

मॅझिनीनें रोममध्यें पाऊल ठेवलें तेव्हां जुन्या आठवणींनीं त्याचें अंतःकरण भरून आलें. त्यावेळीं अस्तित्वांत असलेलें रोम शहर व सॅव्होनाच्या किल्ल्यांत कैदेंत असतांना त्याच्या चित्तचक्षूंना दिसलेलें रोम शहर यांमध्यें जमीन अस्मानाचें अंतर होतें. " हल्लींचे रोम शहर अधःपतन पावलेल्या बादशाहीच्या स्पर्शामुळें अपवित्र झालें आहे...इटली, माझी इटली, माझ्या स्वप्नांमध्यें मला दृश्यमान झालेली इटली कोठें आहे ? ती महान्, उदात्त व सुंदर अशी इटली कोठें आहे ? सुसंधीचा फायदा घेणाऱ्या भामट्यांनीं, नामर्दांनीं व परक्यांची थुंकी झेलणाऱ्या तोंडपुजांनीं आज इटलीचें प्रेत मात्र उभें केलें आहे—मला इटलीचें चैतन्य जागृत करावयाचें होतें !...माझ्या सुखस्वप्नांची अधिष्ठात्री देवता, सॅव्होनाच्या कोठडींत मला जिचा साक्षात्कार झाला ती इटली कोठें आहे ? माझा जीव कुडींत आहे तोंवर तरी ती इटली मूर्त स्वरूपांत प्रकट झालेली माझ्या नजरेस पडावी अशी माझी उत्कट इच्छा आहे; हल्लीं दिसत असलेली इटली ही हडळ आहे–ती देवता नाहीं ! "

गाइटाच्या तुरुंगांतून सुटल्यानंतर प्रत्यक्ष उठावणीच्या भानगडींत मॅझिनीनें मन घातलें नाहीं. इटलींत लोकशाही स्थापन झालेली पहावयाचें आपल्या नशीबांत नाहीं हें त्याला कळून चुकलें होतें; म्हणून त्यानें लोकशिक्षणाचें शांत कार्य हातीं घेतलें कामकरी लोकांसाठीं रात्रींच्या शाळा स्थापन करणें, उपयुक्त पुस्तकांच्या पेट्या जागोजाग फिरविणें, परस्पर–सहाय्यक मंडळ्या स्थापन करविणें वगैरे कामें त्यानें मोठ्या नेटानें चालविलीं होतीं. आपल्या कल्पनांचा प्रसार करण्यासाठीं रोमा डेल पोपोलो हें नियतकालिक त्यानें सुरू केलें. राष्ट्रीय शिक्षण व इटलीचा राष्ट्रीय इतिहास हे ग्रंथ आपल्या हातून लिहून होतील

अशी त्याला अजून आशा वाटत होती--पण हे ग्रंथ त्याचे हातून लिहून झाले नाहींत.

" माझे सर्व इष्टमित्र इहलोक सोडून गेले आहेत; आतां मी एकटाच मागें रेंगाळत कां पडलों आहे हें मला समजत नाहीं...माझी प्रकृति दिवसानुदिवस क्षीण होत चालली आहे-" इटलीच्या कामकरी लोकांना उद्देशून आपल्या शेवटच्या खोल गेलेल्या आवाजांत तो म्हणाला, " आपल्या मातृभूमीवर, या महाराष्ट्रावर, या दुर्दैवी देशावर प्रेम करा व इटलीच्या उद्धारासाठीं कार्य करा; या देशाचें भाग्य फार उज्वल आहे; पण ज्यांना या भाग्योदयाचा मार्ग माहीत नाहीं त्यांचे हातीं सांपडल्यामुळें इटलीची प्रगति कुंटित झाली आहे! माझेवर तुमचें प्रेम असेल तर तुम्ही देशासाठीं कार्य करा एवढेंच माझें तुम्हांला सांगणें आहे!"

१८७२ सालीं मॅझिनी पिसा येथें रहात होता; येथेंच ता. १० मार्च रोजीं त्याचा अंत झाला. " माझी परमेश्वरावर अढळ निष्ठा आहे" हेच त्याचे शेवटचे शब्द! त्याच्या स्मशानयात्रेला ऐशीं हजार लोक आले होते! जिनोआच्या स्मशानभूमींत आपल्या आईच्या थडग्याशेजारींच आपणांस पुरण्यांत यावें अशी मॅझिनीची इच्छा होती व ती इच्छा त्याच्या मित्रांनीं पूर्ण केली.

# ११ विविध विचार.

" Beware when God lets loose a thinker on this planet."

—*Emerson.*

## १ धर्ममीमांसा.

धर्म हें अनंत, प्रधान आणि सर्वांतर्यामीं वास करणारें जीवनाचें मूलाधारतत्व आहे. धर्म मानवजातीच्या अंतर्यामीं निवास करणाऱ्या नारायणाचें मूर्त स्वरूप आहे. मनुष्याचें जीवन उदात्ततर करणारी, त्याचा आत्मविश्वास दृढतर करणारी व त्याच्या दुःखित मनाला समाधान देणारी धर्म ही एक चिर शक्ति आहे. मनुष्याच्या धर्मनिष्ठेचें निवासस्थान त्याच्या विवेकबुद्धींत आहे. अज्ञात, अदृश्य, अनंत व चिरंतन अशा सच्चिदानंदस्वरूपाची भावना—बुद्धीनें आणि भक्तीनें त्याचें आकलन करायची इच्छा—म्हणजेच धर्मभावना होय. मानवी जीवनाचें ध्येय युगायुगांमध्यें धर्मानेंच स्पष्ट केलें आहे. मानवी जीविताचा आरंभ, नियोजित कार्य व ध्येय यांची एकवाक्यता करून धर्मानेंच मानवजातीमध्यें बंधुभाव प्रस्थापित केला आहे. धर्मतत्वांमध्यें मानवी जीवनाचे सर्व विभाग व कार्यें समाविष्ट झालेलीं आहेत. निष्ठा व ध्येय यांशिवाय समाज संभवतच नाहीं. या निष्ठेचें व ध्येयाचें व्यावहारिक स्वरूप म्हणजे राजकारण व तात्विक स्वरूप म्हणजे धर्म होय.

जीवाभावाच्या व जीवनदायी धर्मश्रद्धेशिवाय समाज एकजीव होणें शक्य नाहीं. सामाजिक जीवनाचें नियमन करण्यास स्वार्थबुद्धि असमर्थ आहे. स्वार्थवादी मनुष्य यशःप्राप्तीसाठीं हव्या त्या साधनांचा उपयोग करावयास मागें पुढें पहात नाहीं. स्वार्थामुळें मनुष्य सैतानाचा भक्त बनतो. स्वार्थामुळें व्यक्तीचा

उत्साह नष्ट होतो व राष्ट्राच्या खऱ्या वैभवाचा नाश होतो. समाजजीवनाच्या नियमनासाठीं निवळ नीतितत्वेंहि असमर्थच ठरलीं आहेत. नीतितत्वांमुळें चैतन्य निर्माण होत नाहीं, संशयांचें छेदन होत नाहीं, भविष्याची तहान भागत नाहीं, कोणीकडून कोणीकडे या प्रश्नाचा उलगडा होत नाहीं. समाजजीवनाच्या नियमनासाठीं तत्वज्ञानाचाहि उपयोग नाहीं—कारण कोरडया तत्वज्ञानामध्यें जीवनाला कुरवाळणारें प्रेम नाहीं. तत्वज्ञान म्हणजे चिकित्साबुद्धि; त्यामध्यें जीवनाच्या ऊन उसळया नाहींत; मनुष्याला कर्तव्यतत्पर करावयाचें किंवा कर्तव्यच्युतिपासून त्याचें रक्षण करण्याचें सामर्थ्य तत्वज्ञानांत नाहीं. स्वार्थ, संशय व निष्क्रियता यांचा त्याग करून व्यक्तिमात्रानें मानवजातीचें मूलभूत ऐक्य, शासन व उद्दिष्ट यांचें ज्ञान करून घ्यावें व तदनुरोधानें कर्तव्यरत व्हावें म्हणजे या युगाच्या सर्व प्रश्नांचा उलगडा आपोआपच होईल. धर्मामुळें व्यक्तीला कर्तव्यांचें ज्ञान होतें. धर्मामुळें समाज समर्थ, एकजीव व उत्साहपूर्ण होतो. समाजाच्या नैसर्गिक धर्मनिष्ठेला युगांयुगांतून चैतन्याच्या उसळया फुटतात; धर्मामुळें सामाजिक जीवन उदात्ततर होतें. स्वर्ग व पृथ्वी अधिक निकट येतात.

जीझस ख्राइस्टचा आत्मा प्रीतीनें थबथबलेला, पावित्र्यानें पूरित झालेला व प्रत्यक्ष परमेश्वरानें स्फूर्तिमय केलेला होता. श्रीमंत व गरीब, सशक्त व दुबळे, स्वतंत्र व गुलाम, ब्राह्मण व अस्पृश्य या सर्वांवर त्याचें प्रेम होतें! त्यानें नव्या युगाची संस्थापना केली. त्याचा शब्द ही भविष्याची वाणी होती. त्याच्या शब्दांमध्यें चैतन्य भरलेलें होतें. आजपर्यंत युरोपांत झालेल्या सर्व चळवळींचें बीजारोपण ख्राइस्टनेंच केलेलें आहे. वर्णव्यवस्थेचा नाश, व्यक्तीची पूर्णावस्था, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, शांति, सत्कार्यामध्यें सहकार्य, एकनिष्ठा आत्मयज्ञ या सर्व तत्वांचें ख्राइस्टनें प्रतिपादन केलेलें आहे. ख्राइस्टचें ध्यान करतांना जीव त्याचेबरोबर तल्लीन होतो; कारण आपल्या पापांचें प्रायश्चित्त देणारा निर्घृण न्यायाधीश या भावनेनें आपण त्याचें ध्यान करीत नाहीं—त्या ध्यानामध्यें भीतीचा व भावी शिक्षेचा लेशहि नसतो. बायबलाचा प्रत्येक शब्द स्वातंत्र्य, समता व बंधुभाव यांनीं थबथबलेला आहे; असत्य व अन्याय यांबरोबर मनुष्यानें सदैव झगडलेंच पाहिजे अशी प्रेरणा देणारा आहे; कर्तव्यामध्यें स्फूर्ति व चैतन्य उत्पन्न करणारा आहे; ख्राइस्टचे आचार व विचार यांचेमध्यें एकवाक्यता होती; त्यानें आत्मयज्ञाचें तत्व प्रकट केलें—आत्मयज्ञा-

शिवाय शील व धर्म हीं अशक्य आहेत. त्यानें सकलांच्या पापांसाठीं व बंध-विमोचनासाठीं आत्मबलिदान केलें. युगायुगांमधून मानवजातीमध्यें सत्यान्वेषण अखंडितपणें चाललेलें असतें हें तत्त्व त्यानें आत्मबलिदानामध्यें प्रकट केलें. क्रूस हें या आत्मबलिदानाचें मूर्त स्वरूप आहे.

धर्मसंस्थापक व धर्मसुधारक या दृष्टीनें जीझसची योग्यता अत्यंत श्रेष्ठ आहे. अंतःकरणांत उत्पन्न होणाऱ्या सर्व उदात्त भावनांचा त्यानें आपल्या शिकवणुकींत समावेश केलेला आहे. या दृष्टीनें या महात्म्याची योग्यता युगांमागून युगें लोटलीं तरी कमी होणार नाहीं; पण त्याचें बौद्धिक सामर्थ्य इतक्या उच्च दर्जाचें नव्हतें. त्याचें तत्वज्ञान युगपरिस्थितीच्या अनुरोधानें निर्माण झालें होतें. आपल्या शिकवणुकीमुळें धर्म व प्रगति यांमध्यें विरोध उत्पन्न होईल हें त्याला आकलन झालें नाहीं; धर्म व प्रगति यांमध्यें विरोध उत्पन्न झाल्यामुळें सर्व युगांना सनातन धर्म हें अभिधान ख्रिश्चन धर्माला प्राप्त होणें शक्य नाहीं. इहलोक ही पापपरिक्षालनभूमि आहे व स्वर्गलोक हेंच आत्म्याचें निवासस्थान आहे असें ख्रिश्चन धर्मानें प्रतिपादन केलें आहे. स्वतःच्या व मानवजातीच्या उद्धारासाठीं अखंड परिश्रम करणें हें मानवी कर्तव्य आहे—पण ऐहिकाचा त्याग करावा अशी ख्रिश्चन धर्माची आज्ञा आहे; आणि म्हणूनच धर्म व प्रगति यांमध्यें विरोध उत्पन्न झाला. वैयक्तिक उद्धार हें ख्रिश्चन धर्माचें ध्येय आहे; पण वैयक्तिक विकास परिस्थितीच्या अनुकूलतेवर, मानवजातीच्या प्रगतीवर व जनतेच्या संघशक्तीवर अवलंबून आहे. संघशक्ति हें तत्व ख्रिश्चन धर्मानें विचारांत घेतलें नाहीं व वैयक्तिक उद्धारावरच भर दिला--हें देशकाल परिस्थितीला धरूनच होतें. अधःपातापासून मानवजातीच्या इतिहासाला सुरवात झालेली आहे असें ख्रिश्चन धर्माचें सांगणें आहे; पण आरंभींच अधःपात संभवत नाहीं. मनुष्यजातीनें प्रगतीच्या सोपानपरंपरेवर चढावयास आरंभ केला तेव्हांपासून मानव्याची सारखी प्रगतीच होत आहे. समाजांतील अन्याय दूर करावयास दयामय जीवन हा एकच मार्ग आहे असें ख्रिश्चन धर्माचें मत आहे--पण आधुनिक युगांतील अन्याय दूर करावयास केवळ करुणा असमर्थ आहे आणि म्हणूनच ख्रिश्चन धर्माचें चैतन्य नष्ट होत आहे.

धर्माचा उद्भव व उद्दिष्टहि इहलोकांतच आहे. जीवनाच्या ओसाड वाळवंटावर जीवाला लागणारी तृषा शांत करावयाची शक्ति श्रद्धेमध्येंच आहे. सृष्टि हें परमेश्वराचें मूर्तस्वरूप आहे. परमेश्वराला अस्तित्व आहे हें त्रिवार सत्य

आहे. व्यक्तीच्या व मानवजातीच्या विवेकबुद्धींमध्यें आणि सृष्टीमध्यें परमेश्वराचें निवासस्थान आहे. दु:खाच्या व आनंदाच्या गंभीर क्षणांमध्यें आपणांस त्याचें अस्तित्व भासमान होतें. रात्रीं तारका चमकत असतांना, आपल्या आवडत्यांच्या पडग्यांच्या समवेत असतांना, धर्मवीर आत्मबलिदान करीत असतांना, परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल कोणाच्या मनांत संशय उत्पन्न होईल बरें? आणि झालाच तर त्याचें अंतकरण दु:खानें होरपळून निघालेलें तरी असलें पाहिजे किंवा तें पापानें कलंकित तरी झालेलें असलें पाहिजे. अनंततेप्रत व उदात्ततेप्रत आपण जावें अशी इच्छा मनुष्याला सदैव होत असते हाच परमेश्वराच्या अस्तित्वाचा पुरावा आहे. ईश्वराला अस्तित्व आहे कारण आपणाला अस्तित्व आहे. नियमबद्धता आणि एकतानता यांचे द्वारें सृष्टि आपणांमधील परमेश्वराचा अंश प्रकट करून दाखविते. परमेश्वर हा केवळ बुद्धिमयच नाहीं तर प्रेममयहि आहे; नुस्ता विचारी नाहीं, तो कार्यकारीहि आहे; तो सकलांचा शास्ता आहे, शिक्षक आहे व मार्गदर्शक आहे. जे जें कांहीं उदात्त व पवित्र आहे त्याचें अखंड विकसन म्हणजेच प्रगति होय. युगायुगांमध्यें, धर्माधर्मामध्यें आणि नव्या नव्या तत्वज्ञानांमध्यें परमेश्वराच्या शासनाचे अधिकाधिक खंड प्रकट होत असतात.

ऐहिक जीवन इतकें क्षणिक आहे कीं मनुष्याला पूर्णावस्था प्राप्त होणें अशक्य आहे. पण हें ध्येय साध्य होणार अशी अंतस्थ भावना मात्र सदैव जागृत असते; ही भावना हाच भूत व भविष्य यांमधील दुवा आहे. जन्माजन्मांमधून मनुष्याचा आत्मा परिणत होत असतो. या प्रगतीचें प्रमाण आत्मशुद्धीवर अवलंबून असतें. प्रगति हा सुखाचा शोध नव्हे तर आत्मयज्ञाची पात्रता. जन्माजन्मांमधून जीवात्मा परिणत होतो त्याचप्रमाणें युगायुगांमधून जनतेचा आत्मा विकास पावत असतो. परमेश्वराचें शासन अजून पूर्णपणें प्रकट झालेलें नाहीं. मानवजातीच्या प्रगमनाची दिशा अजून आपणांस उमगलेली नाहीं. प्रगतीची दिशा परमेश्वरानें नेमून दिलेली आहे; तरीहि हें प्रगमन सर्वस्वीं दैवाधीन आहे असें नाहीं; कारण प्रगतीची गति वाढविणें मनुष्याधीन आहे, पण ही गति थांबविणें मात्र मनुष्याला अशक्य आहे. दैववाद आणि प्रयत्नवाद यांचा अशा रीतीनें समेट करतां येतो. धर्म व नीति शुद्धतर होत आहेत, आत्मयज्ञामुळें त्यांचें तेज वृद्धिंगत होत आहे. सत्य, शौर्य, आत्मयज्ञ यांवरून मनुष्याच्या उदात्ततेची भावना प्रकट झालेली दिसून येत नाहीं काय? पश्चा-

त्याग व आत्मयज्ञ या उदात्त भावनांचें सामर्थ्य नष्ट करणें कोणत्याहि जड-वादाला शक्य नाहीं. परमेश्वराचा संकल्प इतिहासामधून खंडश: प्रकट झालेला दिसून येतो. विवेक, ध्येयनिष्ठा, इच्छाशक्ति, नैतिक सामर्थ्य ह्यांमध्यें मनुष्याचे अंतर्यामीं निवास करणारा नारायण प्रकट होत असतो. ह्या दैवी तेजाचा विकास अधिक त्वरेनें व्हावा व परमेश्वराचा संकल्प पूर्ण व्हावा एतदर्थ यतमान होणें मनुष्यमात्राला शक्य आहे. वैयक्तिक कार्यानेंच परमेश्वराचें नियोजित कार्य पूर्ण व्हावयाचें आहे. आपण जें कार्य करीत आहों त्याला प्रत्यक्ष परमेश्वराची संमति आहे अशा भावनेनें जो कार्य करीत असतो त्याला असामान्य धैर्य व अलौकिक सामर्थ्य प्राप्त होतें. तरुण इटलीमध्यें राष्ट्र-धर्मीयांचा समावेश व्हावा असें म्हटलेलें आहे त्याचा अर्थ हाच आहे. कारण राजकीय पक्ष जसे उत्पन्न होतात तसेच ते नष्टहि होतात; पण धर्मतत्त्वांसाठीं निर्माण झालेला संघ विजय संपादन करीपर्यंत कधींहि नष्ट होत नाहीं.

पण परमेश्वराच्या संकेताचें ज्ञान कसें प्राप्त करून घ्यावयाचें ?---परंपरा व विवेकबुद्धि यांच्या साह्यानें. परमेश्वराप्रत प्राप्त व्हावयाचीं हीं दोन साधनें आहेत. हीन विकार व हीन प्रवृत्ति यांपासून मनुष्यमात्रानें सदैव अलिप्त राहिलें पाहिजे; सत्कर्मरत राहिलें म्हणजे मनुष्याला सत्यपरिज्ञानाची पात्रता प्राप्त होते. मनुष्याच्या भक्तिमय अंत:करणाला पावित्र्याच्या संवेदना होतात तेव्हां तो परमेश्वराच्या संकेताशीं कांहीं क्षणपर्यंत एकतानता पावलेला असतो. परमेश्वराचा संकेत मानवी समाजांच्या जीवनांतहि प्रकट झालेला दिसून येतो. स्वार्थामुळें पतित व गुलामगिरीनें भ्रष्ट झालेल्या राष्ट्रांमधून सत्यपरिज्ञानाची शक्ति नष्ट झालेली असते; उदात्त आकांक्षा व अलोट उत्साह यांनीं उचंबळून आलेल्या जनतेमध्यें परमेश्वराचा शब्द प्रकट होत आहे असें निश्चयेंकरून जाणावें. ज्यांचें जीवन पवित्र आहे, अंत:करण उदात्त आहे व बुद्धि सतेज आहे, ज्यांचें आपल्या बांधवांवर प्रेम आहे, त्यांचेसाठीं स्वार्थ-त्याग व आत्मयज्ञ करावयास ज्यांची सिद्धता आहे---अशा महात्म्यांना 'परमे-श्वराच्या संकेताचा अनुवाद करावयाची प्रेरणा होते. त्यांचें अंतकरण जनतेच्या अंत:करणाशीं समरूप होतें तेव्हांच त्यांना परमेश्वराच्या संकेताचें ज्ञान होतें. महाराष्ट्रांतच महापुरुष निर्माण होतात. कारण महावृक्ष निर्माण व्हावयाला जमीनहि तशीच सुपीक लागते, आणि सहस्रावधि लतापर्णें आपला देह अर्पण करतात तेव्हांच जमिनीला सुपीकपणा प्राप्त होतो.

# विविध विचार.

श्री ग्रंथ सं

परमेश्वराचा संकल्प देशकालपरिस्थितीनें अबाधित आहे. मानवजातीच्या कार्य परंपरेंत तो प्रकट झालेला असतो म्हणून सत्यजिज्ञासूंनीं इतिहासाचा जिवंत अभ्यास केला पाहिजे. विशिष्ट काळ, स्थळ व परिस्थिति यांच्या अभ्यासानें आकुंचित झालेल्या मनाचे विचार सत्याच्या दृष्टीनें कलुषित असतात. मनुष्यजात हा सदैव शिक्षण संपादन करणारा महापुरुष आहे. व्यक्ति मर्त्य आहेत; पण त्यांनीं उद्धृत केलेलें सत्य व त्यांनीं मूर्त स्वरूपाप्रत आणलेलीं तत्वें अमर आहेत. प्रत्येक व्यक्तीचे भोंवतीं जन्मतःच अनंत युगांच्या कल्पना, भावना व निष्ठा यांचें वातावरण पसरलेलें असतें. मनुष्यजातीच्या ज्ञानभांडारांत प्रत्येक व्यक्ति भर घालीत असते. व्यक्तीच्या शिक्षणानें मानव्याचा आत्मा प्रकाशित होतो. निष्ठा व कृति यांच्या परंपरेमधून मनुष्यजातीला परमेश्वराच्या संकेताचें ज्ञान अधिकाधिक स्पष्टपणें होत असतें ध्येयाच्या मानानें व्यक्तींच्या शक्ति अत्यंत मर्यादित आहेत. पण अनेक व्यक्तींचे विचार व कृति संघटित झाल्या असतां ध्येयसिद्धि अशक्य नाहीं. हें ध्येय साध्य व्हावें अशी आस्था बाळगणारानें मानवजातीच्या परंपरेबद्दल आदरभाव धरला पाहिजे, स्वतःच्या एकाकी इच्छेपेक्षां जनतेच्या इच्छेला अधिक महत्व दिलें पाहिजे. भूतकालामध्यें जनतेनें ज्या संस्कृतीचें संवर्धन केलें तिचा त्याग करून समाजाची अगदीं नव्या पायावर संघटना करूं पहाणें अशक्य आहे हें त्यानें जाणलें पाहिजे. शिक्षण, मातृभूमि, स्वातंत्र्य, संघटना, कुटुंब, संपत्ति, धर्म—हीं या परंपरेचीं प्रधान अंगें आहेत; त्यांना विरोध करणारीं तत्वें परमेश्वराच्या शासनाचा भंग करीत आहेत असें जाणावें. परंपरेच्या अंध अनुकरणानें समाजाला मृतावस्था प्राप्त होते, केवळ वैयक्तिक विचारांच्या अनुरोधानें चालण्यानें बेबंदशाही माजते; पण मानवजातीच्या परंपरेचा निष्कर्ष आणि वैयक्तिक विवेकबुद्धीचा निर्णय यांची एकवाक्यता जेथें झालेली असते तेथें परमेश्वराचा शब्द प्रकट होत आहे असें जाणावें. परमेश्वराच्या प्रेषितांना सत्याचें ज्ञान निसर्गतःच प्राप्त होत असतें.

मानवजातीचें ध्येय जाणून तें साध्य करून घ्यावयासाठीं राष्ट्राराष्ट्रांनीं संघटित होऊन यतमान झालें पाहिजे. ही संघटना निर्माण करावयासाठीं राष्ट्राराष्ट्रांतील लोकसत्तांनीं जनतेला खरें राष्ट्रीय शिक्षण दिलें पाहिजे. हें शिक्षण जनतेला आज देण्यांत येत नसल्यामुळें सर्वत्र दुजाभाव व परस्परांबद्दल वैरभाव दिसून येत आहे. मानवजातीमध्यें ऐक्यभाव निर्माण करणें ही आधुनिक युगाची आवश्यकता आहे. वर्गावर्गांमध्यें व राष्ट्राराष्ट्रां-

मध्येंच दुजाभाव आहे असें नाहीं तर प्रत्यक्ष सत्यसंशोधनामध्येंहि भांडणतंटे आहेत. जगताला बंधुभावाची व ऐक्यभावाची तहान लागली आहे. स्वधर्म व स्वराज्य यांची एकवाक्यता झाली पाहिजे. स्वराज्यामध्यें राष्ट्राचें सामर्थ्य आणि स्वधर्मामध्यें राष्ट्राचा आत्मा प्रकट होतो. पण संपूर्ण जनतेची एकाच धर्मावर निष्ठा स्थापित होईपर्यंत राष्ट्रीय सरकारनें या दोन गोष्टी अलिप्तच ठेवल्या पाहिजेत. स्वसत्ताक राष्ट्रांनीं कर्तव्यपूर्ति व ध्येयसिद्धि यांसाठीं बंधुभावानें एकत्र होऊन आपल्या सामर्थ्याची कार्यक्षमता वृद्धिंगत केली पाहिजे. देशदेशींच्या पवित्र व उदात्त महात्म्यांनीं एकत्र होऊन नव्या युगाच्या नव्या धर्माची तत्वमालिका निर्माण केली पाहिजे. या नव्या धर्माचे अनुयायी, स्वातंत्र्य व बंधुभाव यांनीं एकजीव होऊन कर्तव्य व ध्येय यांचे पूजन करीत राहतील.

## २ कर्तव्यमीमांसा.

धर्मतत्वांच्या पायावर मॅझिनीनें आपल्या नीतितत्वांची उभारणी केली. प्रगतीच्या नियमांप्रमाणें कृतीचें महत्व ध्येयाच्या उच्चतेवर अवलंबून आहे. ध्येयसिद्धीसाठीं, आत्मोद्धारासाठीं व आपल्या बांधवांच्या उद्धारासाठीं केलेल्या कार्यावर व्यक्तीच्या नीतीचें स्वरूप अवलंबून आहे. सर्व जगताला आपल्या कक्षेंत घेणाऱ्या ध्येयाच्या दृष्टीनें व्यक्तीच्या नीतीचें व कृतीचें महत्व ठरविलें पाहिजे. सर्वव्यापी ध्येयाशिवाय जीवन हा परस्परविरोधी विचार व कृति यांचा लढा होऊन बसेल; कारण जोम व चिकाटी हीं चांगलें व वाईट या दोहोंचे ठिकाणींहि संभवतात. ध्येयाबद्दल उदासीनता म्हणजे आत्मोद्धाराबद्दल उदासीनता, पाशवी शक्तीची उपासना आणि बऱ्यावाईट परिस्थितीबरोबर झगडावयाचें नैतिक सामर्थ्य नसल्यामुळें वस्तुस्थितीला भेकडपणानें दिलेली मान्यताच होय. सद्भावनेनें प्रेरित झालेले लोक ध्येयाला मूर्तस्वरूप द्यावयासाठीं संघटित होतात; कारण आपल्या कार्याला सत्याचा पाठिंबा आहे व तें कार्य परमेश्वरानेंच योजलेलें आहे अशी त्यांची निष्ठा असते. सर्व मानवांच्या मनावर अधिराज्य करणाऱ्या एका योगेश्वराशिवाय पाशवी शक्तीविरुद्ध अखंडितपणें लढण्याची निष्ठा देणारा कोण आहे? सामर्थ्यालाच सत्याचें स्वरूप देणाऱ्या पाशवी प्रवृत्तींबरोबर सत्याच्या सामर्थ्यानेंच लढलें पाहिजे. अन्याय, जुलूम, विषमता यांचेविरुद्ध आपणांस जें युद्ध उभारावयाचें आहे तें कोणाच्या नेतृत्वाखालीं उभारावयाचें? नीति व अनीति, कर्तव्य व अकर्तव्य, सत्य व असत्य, न्याय व अन्याय

यांमधील विवेक करावयास मनुष्यापेक्षां उच्चतर अशाच शक्तींनीं निर्माण केलेल्या पवित्र व अनुल्लंघ्य अशा शासनाची अवश्यकता आहे.

नीतीचा पाया उपयुक्ततेवर नाहीं, नफयातोटयावर नाहीं, तर उत्साहावर आहे, प्रीतीवर, कर्तव्यतत्परतेवर, जिवंतपणावर आहे. स्वातंत्र्य कशासाठीं पाहिजे ? सुखासाठीं ? सुख म्हणजे काय ? सुखामागें धावणाऱ्या मनुष्याचा अधःपात झालाच पाहिजे; सुखाचा हव्यास म्हणजे जीवनांतील उदात्ततेची हत्या ! सुखाची आशा म्हणजे आपला आत्मा सैतानाच्या हवालीं करण्याविषयीं औत्सुक्य होय ! ऐहिक अभ्युदय हें साध्य नाहीं, साधन आहे; ऐहिक अभ्युदय हेंच साध्य आहे असें मानणाऱ्या राष्ट्राचा अधःपात होतो. जीझस ख्राइस्टनें उपयुक्ततेसाठीं आत्मबलिदान केलें काय ? विषपान करतांना सॉक्रेटिसानें नफयातोटयाचें कोणतें त्रैराशिक मांडलें होतें ? बेंथॅम या उपयुक्तावाद्याच्या दृष्टीनें प्लेटोची गणना महामूर्खांच्या कळपांत होणार हें उघड आहे. गरीबी, तुरुंग, हद्दपारी, फांशी, हीं दुःखें मनुष्यानें आपल्या बांधवांचेसाठीं कां भोगावीं ? पुढील पिढीला स्वातंत्र्य मिळावें म्हणून आज आम्ही आत्मयज्ञ करावा हा न्याय कोठचा ?

नाहीं. हक्कांच्या मागें लागलेला मनुष्य स्वसुखनिरभिलाष असणें शक्य नाहीं. तो म्हणेल, मला सुख मिळविण्याचा हक्क आहे आणि तें मी मिळविणारच ! उपयुक्ततावादी मनुष्य आपल्या बांधवांच्या कल्याणासाठीं स्वार्थत्यागाला प्रवृत्त होणें शक्य नाहीं. हक्कांच्या लढयांत रक्तपात होत नाहीं पण रक्तपाताच्या युद्धाइतकी हानि मात्र होते. व्यक्ति समाजांत संघटित होतात त्या केवळ स्वसुखसाधनासाठीं-हा सिद्धांत स्थापन केल्यावर मग दीन, पंगु, अनाथ, निरक्षर यांच्या उद्धारासाठीं कार्य करावयास या अशी विनंति समाजांतील समर्थ व संपन्न वर्गाला करतां येणें शक्य आहे काय ? हक्कांसाठीं लढणाऱ्या मनुष्याला अपयशाच्या अंधःकारांत आशेचा उत्साह कोठून प्राप्त होणार ? काल्पनिक वायफळ हक्कांसाठीं स्वतःचा जीव धोक्यांत घालण्याचें काय प्रयोजन--त्यापेक्षां स्वसुखसाधनाचा महाजनगत मार्ग कां स्वीकारूं नये ? स्वतःचें पुष्कळ सुख व पुष्कळांचें पुष्कळ सुख या उपयुक्ततावाद्यांच्या दोन्ही तत्वांनीं मनुष्याचा अधःपातच होतो. ख्राइस्टनें युरपियन संस्कृतीची पुनर्घटना केली तेव्हां त्यानें जनतेला अशीं अधोगतीला नेणारीं तत्वें शिकविलीं नाहींत; प्रीति, निष्ठा, कर्तव्य, आत्मयज्ञ या उदात्त तत्वांचें बीजारोपण त्यानें स्वार्थामागें लागलेल्या समाजा-

मध्यें केलें. मृतवत् झालेल्या समाजाच्या कानांत त्यानें या पवित्र संजीवनी मंत्रांचा गुरूपदेश करतांच संपूर्ण जनता अभिनव जीवनाच्या थरारीनें उसळून गेली; नंतर संपूर्ण मानवजातीला या तत्वांचें शिक्षण मिळून प्रगतीच्या मार्गाचें तिनें बरेंच आक्रमण केलें.

नाहीं, आयुष्य सुखप्राप्तीसाठीं नाहीं; शक्य तितकें अधिक सुख मिळविणें व अधिक हक्क मिळविणें हें आमचें ध्येय नाहीं; मानवी जीवन उदात्ततर करणें हें आमचें ध्येय आहे. सुख व दुःख ही जीवनाच्या प्रवासांतील बाह्य परिस्थिति मात्र आहे. वारा सोंसाट्यानें वहात आहे, पाऊस धों धों पडत आहे—अशा वेळीं प्रवासी आपली घोंगडी अंगाशीं जास्तच घट्ट धरून ठेवतो आणि पुढें चालूं लागतो. थोड्या वेळानें वादळ संपून जातें व सूर्याच्या ऊन ऊन किरणांनीं त्याच्या गारठून गेलेल्या गात्रांमध्यें ऊब उत्पन्न होते, त्याच्या डोळ्यांत भक्तीचें तेज चमकूं लागतें आणि सस्मित अंतःकरणानें तो प्रवासी परमेश्वराचे आभार मानतो ! पण थंडीवारा, ऊन अथवा पाऊस यांमुळें त्याला जेथें जावयाचें आहे त्या स्थळांत कांहीं फरक होतो काय ? सुख व हक्क हेंच या जीवनयात्रेचें ध्येय आहे काय ? नाहीं. मानवी जीवन उदात्ततर व्हावें यासाठीं यतमान होण्याची इच्छा मनुष्यमात्रांमध्यें उत्पन्न व्हावी, मानव-जातीविषयीं सर्वांचे अंतःकरणांत बंधुभाव जागृत व्हावा, आत्मयज्ञाबद्दल अखंड एकनिष्ठा निर्माण व्हावी, यासाठीं जीवनाच्या अग्रस्थानीं एकाद्या महातत्वाची प्रस्थापना केली पाहिजे. हें महातत्व " कर्तव्य " हें होय. मनुष्य-मात्रांना एकाच परमेश्वरानें निर्माण केलें आहे, म्हणून स्वतःच्या व इतरां-च्याहि उद्धारासाठीं आपण झटलें पाहिजे. आपल्या बांधवांच्या कल्याणासाठीं झटणें हें आपलें कर्तव्य आहे; ह्या कर्तव्याचें पालन जन्मभर करावयाचें असतें. त्याकडे दुर्लक्ष करणें हें पाप आहे, हा परमेश्वराविरुद्ध गुन्हा आहे; आयुष्य हें कर्तव्य आहे, आयुष्य हें परमेश्वराचें नियोजित कार्य आहे. परमेश्वरानें मनुष्याला निर्माण केलें तें एवढ्याचसाठीं कीं व्यक्तिमात्रानें आपलें आयुष्य मानव-जातीच्या कल्याणासाठीं खर्ची घालावें. मनुष्यानें आपल्या शक्ति अशा रीतीनें उपयोगांत आणल्या पाहिजे कीं त्यामुळें इतरांच्या शक्तींचा विकास होईल, सत्याचा शोध सुगम होईल व मानवी जीवन उदात्ततर होईल. आयुष्य हें युद्ध आहे, असत्य व अन्याय यांबरोबर अखंडितपणें चालवावयाचें हें युद्ध आहे. सैतानी प्रवृत्तींचें समूळ उच्चाटण करणें एकाएकीं शक्य नसलें तरी

त्यांचेबरोबर अखंड युद्ध चालू ठेऊन त्यांची शक्ति क्षीणतर करणें हें आपल्या हातीं आहे. परमेश्वराचा संकेत संपूर्ण व्हावा हें ध्येय पुढें ठेऊन कार्य करणारांची आज जरूर आहे. स्वतःच्या सुखासाठीं नव्हे तर इतरांच्या कल्याणासाठीं अपेष्टा भोगणें हा गुण सर्व सद्गुणांच्या अग्रस्थानीं आहे. आत्मयज्ञाचें सामर्थ्य सर्व शक्तींमध्यें उच्चतम आहे.

जगदुद्धाराच्या कार्याला मनुष्यानें आपल्या सर्व शक्ति अर्पण केल्या पाहिजेत. ज्यांनीं अधोमार्गाचा प्रत्यक्षपणें अवलंब केलेला नाहीं त्यांचा या उद्धाराच्या कार्यामध्यें समावेश होत नाहीं; उद्धाराचें कार्य आत्मयज्ञपूर्वक प्रत्यक्षपणें हातीं घेतल्याशिवाय त्यांना सद्धर्माचे अनुयायी हें अभिधान देणें शक्य नाहीं. हें कार्य एकदां हातीं घेतल्यावर मनुष्याला विसावा मिळत नाहीं. जग ही कार्यभूमि आहे; या कार्यक्षेत्राला तिरस्कृत लेखूं नका; आपल्या कृतीनें व विचारानें जगामध्येंच पवित्रपणा आणा ! जळीं, स्थळीं, काष्ठीं पाषाणीं परमेश्वर भरून राहिलेला आहे; म्हणून जगाला तिरस्कृत मानणें म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराचा धिःकार करण्यासारखें आहे. जगाकडे नुस्त्या चिकित्साबुद्धीनें पाहण्यांत कांहीं जीव नाहीं. जग ही रंगभूमि नाहीं--जग हें कुरुक्षेत्र आहे ! या रणांगणावर सत्याच्या, न्यायाच्या व स्वातंत्र्याच्या निशाणाखालीं लढणारांना विसावा मिळत नाहीं. या युद्धामध्यें खंड पडूं देणें हें पातक आहे. या कार्यभूमीमध्यें तुम्ही आपल्या बांधवांच्या उद्धारासाठीं कार्य करावें एवढ्याचसाठीं परमेश्वरानें तुम्हांमध्यें समाजभावना निर्माण केली आहे. हें कार्य तुम्ही जितक्या जोरानें चालवाल तितक्या तुमच्या शक्ति अधिकाधिक वृद्धिंगत होतील ! पतितांचा उद्धार करावयाचें पवित्र कार्य अंगावर घेतील तितके लोक थोडे अशी स्थिति असतांना आत्मशुद्धीसाठीं जगाचा संबंध तोडून एकांतांत ध्यानस्थ बसून कालक्रमण करणें हा गुन्हा आहे. या धर्मक्षेत्रावर आपणांस आत्मार्पण करावयाचें आहे. येथें विचारहि पाहिजेत व कृतिपरायणताहि पाहिजे. जीवनयात्रेच्या शेवटीं परमेश्वर तुम्हांला असें विचारणार नाहीं कीं तुम्ही स्वतःसाठीं काय केलें आहे-तर आपल्या बांधवांच्या उद्धारासाठीं तूं गेल्या जन्मीं काय कार्य केलें आहेस असेंच तो तुम्हांला विचारील. सत्याबद्दल कोरडी प्रीति बाळगणें निरुपयोगी आहे-सत्याला मूर्त स्वरूप द्यावयाचें कार्य प्रत्यक्षपणें हातीं घेतलें पाहिजे, सत्यासाठीं आत्मबलिदान करावयाला सदैव सज्ज असलें पाहिजे. माझे विचार सत्य आहेत, उदात्त आहेत असा गर्व वाहण्यांत कांहीं अर्थ नाहीं. मनामध्यें उदात्त विचा-

रांची प्रेरणा होतांच त्यांना प्रत्यक्ष कृतीमध्यें मूर्त स्वरूप देणें हें मनुष्यमात्राचें पवित्र कर्तव्य आहे. भावना व कृति यांमध्यें सुसंबद्धता असली पाहिजे. व्यवहार व ध्येय, राजकारण व धर्म, कृति व विचार यांमध्यें सुसंबद्धता असणें हीच नीति होय. ज्या राष्ट्राच्या उदात्त भावना व आकांक्षा राष्ट्रीय चळवळीमध्यें स्पष्टपणें दिसून येतात तेंच राष्ट्र महाराष्ट्र या पदवीला पोंचूं शकतें !

सत्कार्यासाठीं मनुष्यानें आपल्या सर्व शक्ति केंद्रीभूत केल्या पाहिजेत; अहंकार, भीति, स्तुति वगैरे कोणत्याहि मोहाला बळी पडतां कामा नये. परिस्थिति विपरीत असेल तर अंगीकृत कार्य अधिक नेटानें तडीला नेलें पाहिजे. हें व्रत आमरण चालविलें पाहिजे; देहपात हा आत्मयज्ञाचा कळस आहे, विजय आहे. जीवन व मरण हीं दोन्हीहि पवित्रच आहेत; कित्येक वेळां जगण्यापेक्षां मरण्यानेंच अंगीकृत कार्याला यश प्राप्त होतें. एका मृत्यूनें हजारों मृतवत् लोक जिवंत होतात; आपल्या बांधवांच्या उद्धारासाठीं एकानें जीव ठेवला तर त्यामुळें सबंध पिढीचें चैतन्य जागृत होऊन परतंत्र राष्ट्रांना स्वातंत्र्य प्राप्त होतें. मनुष्याचें मन क्षणोक्षणीं उदात्त कृतीकडे उचल खात असतें; फेंसासारख्या या उसळ्या फुकट जातात; मनुष्यानें आपल्या मनांत आत्मार्पणाची भावना सदैव जागृत ठेवली पाहिजे. कित्येक वेळां अंतःकरणाच्या ओढीमुळें आपण सत्कार्याकडे प्रवृत्त होतों; पण ह्या ओढीचें मूळ कारण नाहींसें होतांच अंतःकरणांत उसळणारें रक्त थंडावून जातें, उत्साह नाहींसा होतो व निराशेमुळें अंगीकृत कार्य मागें पडतें; कर्तव्यभावना मूळांतच इतकी निरपेक्ष व निष्काम असली पाहिजे कीं, सत्कार्याकडे केवळ कर्तव्यभावनेनेंच जीव लावला पाहिजे. आपलें कार्य कदाचित् आपल्या जन्मांत पुरें झालेलें आपणांस दिसावयाचें नाहीं; हें बलिदान चालावयाचें तरी कोठवर, असा प्रश्न उपस्थित करण्यांत अर्थ नाहीं. मानवजातीच्या प्रगमनशीलतेवर ज्याचा विश्वास आहे त्यानें आपला धीर खचूं देतां कामा नये. परमेश्वर देहाच्या सामर्थ्याकडे पहात नाहीं, तो भावनांच्या जिवटपणाकडे पाहतो; विजयशाली वीर व आत्मबलिदान करणारे वीर यांची योग्यता त्याच्या दृष्टीनें सारखीच आहे; त्यांच्या सहकार्यानेंच मानवजातीची प्रगति होत आहे. व्यावहारिक लोक दैनिक जीवनांत डावपेंच लढवितात, जन्मभर तडजोड करतात; तसें न करतां सत्य तत्वांच्या आधारानें जन्मभर ताठ उभें राहणें हेंच खऱ्या मर्दाचें कर्तव्य आहे.

ज्याला कर्तव्याची खरी प्रेरणा झालेली आहे त्याचें सामर्थ्य आपोआप शतगुणित होतें; अहंकार, भीति, कुचराई वगैरे मोह त्याच्या अंत:करणांतून नाहींसे होतात; परमेश्वराच्या तेजाचा अंश त्याचे ठिकाणीं प्रकट होतो. कोरडया हक्कांसाठीं लढणारांचा जोर फार थोडया काळांत नष्ट होतो; पण कर्तव्यबुद्धीनें हातीं घेतलेलें कार्य यशस्वी झालेंच पाहिजे—आपले हक्क डुबतात म्हणून राष्ट्रें स्वातंत्र्ययुद्धाला कधींहि हात घालीत नाहींत; आपलें राष्ट्र स्वतंत्र असलेंच पाहिजे, त्यासाठीं व्यक्तिमात्रानें हवा तो त्याग करावयास सज्ज असलेंच पाहिजे. अशीच प्रत्येक राष्ट्रीयाची भावना असते; आणि म्हणूनच राष्ट्रें स्वातंत्र्ययुद्धें हातीं घेतात आणि आणि कर्तव्यतत्पर लोक तीं तडीस नेतात. कर्तव्यभावनेशिवाय कोणतेंहि कार्य सिद्धीस जाणें शक्य नाहीं. राष्ट्राचा अध:पात होऊं लागला असतां नुस्ती टीका व चर्चा करीत बसण्यानें कांहीं कार्य होत नाहीं; अशा वेळीं उदात्त भावनांना मूर्त स्वरूप प्राप्त करून द्यावयाच्या खटपटीसच लागलें पाहिजे; अशा वेळीं राष्ट्राची कर्तव्यभावना व निष्ठाशक्ति जागृत करण्यांत आली पाहिजे. ह्या शक्तींच्या तेजाचा एकच कण टीकांच्या हजारों भाऱ्यांना नामशेष करून टाकण्यास समर्थ असतो.

"मानवी कर्तव्यें" या निबंधांत मॅझिनीनें कर्तव्यांची संगतवार मांडणी केलेली आहे. मानवी जीवन उदात्ततर व्हावें यासाठीं व्यक्ति मात्रानें आपल्या अंगीं पावित्र्य व चांगुलपणा आणला पाहिजे. मानवजातीची नैतिक प्रगति हेंच आज आपणांसमोर असलेलें ध्येय आहे. जीवन हें परमेश्वराचें मंदिर आहे, याच भावनेनें आपण आपला जीवनक्रम आंखला पाहिजे; ध्येयासाठीं आत्मयज्ञ करावयास मनुष्यानें नेहमीं सज्ज असलें पाहिजे. आपलें जीवन पवित्रतर करणें हें व्यक्तिमात्राचें आद्यकर्तव्य आहे. वैयक्तिक कर्तव्यानंतरचें स्थान मॅझिनीनें कौटुंबिक कर्तव्यांना दिलें आहे. कुटुंबामध्यें व्यक्तिमात्राला मानवजातीच्या सेवेचें शिक्षण मिळतें. कित्येक वेळां आईबाप स्वार्थाच्या अपेक्षेनें आपल्या मुलाबाळांच्या आयुष्याची राखरांगोळी करतात; त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी आपणांवरच आहे याचा त्यांना निष्काळजीपणामुळें विसर पडतो; गृहशिक्षणाच्या उपेक्षेमुळें मुलांना सुखाची चटक लागते; आणि आयुष्य हें कर्तव्य आहे, ही भावना त्यांच्या मनांत उत्पन्नच होत नाहीं. देशाभिमान, देशभक्ति, विभूतिपूजा ह्या भावना मुलांच्या अंत:करणांत जागृत करणें हे मातापित्यांचें कर्तव्य आहे. मुलांच्या मनांत खऱ्या

शिस्तीचें महत्व बिंबविलें तर त्यांना गैरशिस्त जुलमाला विरोध करतांना प्राणांचीहि फिकीर वाटणार नाहीं हें उघड आहे. कौटुंबिक आनंदांत गुरफटून गेल्यामुळें नागरिकत्वाच्या कर्तव्यांचा विसर पडण्याची मोठी भीति असते; अशीं कुटुंबें परमेश्वराविरुद्ध सैतानाला फितूर झालेलीं असतात. आपल्या मित्रांबरोबर गोडीनें राहणें, आपल्या कुटुंबीयांबरोबर प्रेमळपणाचें वर्तन ठेवणें व जगांत कोणालाहि न दुखाविणें एवढें केल्यानें मनुष्यानें आपलीं कर्तव्यें योग्य रीतीनें बजावलीं असें मानणें चूक आहे. कुटुंबापेक्षां राष्ट्र उच्चतर आहे व राष्ट्रापेक्षां मानवजात उच्चतम आहे हें मनुष्यानें जाणलें पाहिजे व तदनुरूप आपलें वर्तन ठेवलें पाहिजे हें मॅझिनीनें या निबंधांत स्पष्ट करून दाखविलें आहे.

## ३ राजकारण.

मानवी जीवनाप्रमाणेंच राजकारणालाहि नीतीचा आधार असला पाहिजे असें मॅझिनीचें मत होतें. देशाचा राज्यकारभार नैतिक नियमांनुसार चालविणें हेंच राजकारणाचें ध्येय आहे. व्यक्तींचा व समाजाचा नैतिक दर्जा वाढविणें हेंच राज्यकारभाराचें ध्येय आहे. समाजाचा नैतिक दर्जा बाह्य परिस्थितीवर अवलंबून असतो; नीतीला पोषक अशी परिस्थिति निर्माण करणें हेंच राजकारणाचें ध्येय आहे; एका बाजूला अज्ञान, अपेष्टा, गुलामगिरी, लांचलुचपत तर दुसऱ्या बाजूला अलोट संपत्ति, सामर्थ्य व सुसंस्कृतता--अशी परिस्थिति असते तेथें बंधुभाव उत्पन्न होणें अशक्य आहे. जेथें पैसा मिळविणें हेंच जीवनाचें ध्येय समजलें जातें, जेथें व्यक्तींचें स्वातंत्र्य व सुरक्षितता हीं पैशावरच अवलंबून असतात, तेथें आत्मयज्ञाकडे व्यक्तींची प्रवृत्ति होणें अशक्य आहे. सुखाचा ध्यास लागलेल्या समाजांत देशभक्ति कशी जागृत होणार ? आपलीं मतें लपवून ठेवण्यांतच जेथें सुरक्षितता आहे तेथील लोकांमध्यें निर्भयपणा व प्रामाणिकपणा कसा उत्पन्न होणार ? जेथें केवळ सुसंपन्नांनाच मानमरातब मिळतो व गोरगरिबांना क्षणोक्षणीं अपमान सहन करावा लागतो तेथील लोकांमध्यें सुवर्णाला तुच्छ मानण्याची प्रवृत्ति कशी उत्पन्न होणार ? मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या गरीबांना जनावरांसारखें वागविण्यांत येतें–त्यांच्या अंतःकरणांतील नारायण कसा जागृत होणार ? त्यांना नागरिकत्वाचे हक्क दिल्याशिवाय त्यांना आपले हक्क व कर्तव्यें यांचा बोध होईल काय ? कौटुंबिक जीवन, मालमत्ता, शिक्षण व राजकीय हक्क सर्वांना प्राप्त झाल्या-

नंतरच मानवी जीवन पवित्रतर व उच्चतर होईल. ब्राह्मण व अंत्यज, मालक व गुलाम हे भेदभाव नष्ट झाल्यानंतरच आपणांस देवभक्ति निष्ठापूर्वक करतां येईल.

स्वातंत्र्याशिवाय नीति अशक्य आहे, प्रगति अशक्य आहे. जेथें जनतेवर सुधारणा लादण्यांत येतात तेथें त्या जीव धरीत नाहींत. स्वार्थ व समाजसेवा यांमधील एक मार्ग स्वीकारण्यासाठीं मनुष्याला स्वातंत्र्य असलें पाहिजे; स्वातंत्र्यावांचून जबाबदारी नाहीं व जबाबदारीवांचून नीति नाहीं. एका परमेश्वरावांचून माझा कोणीहि नियंता नाहीं असें मानणाऱ्या स्वतंत्र मनुष्याचाच नैतिक उद्धार होणें शक्य आहे. जीवनांत स्वातंत्र्य नसेल तर त्यामध्यें देहव्यापारापेक्षां अधिक कांहींच राहणार नाहीं. आपल्या स्वातंत्र्याचा भंग करूं देणारा मनुष्य प्रत्यक्ष परमेश्वराच्या आज्ञांचा भंग करीत असतो. व्यक्तिस्वातंत्र्य, धर्ममतस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, संघटनास्वातंत्र्य, व्यापारस्वातंत्र्य–हे प्रजेचे जन्मसिद्ध हक्क आहेत; त्यांवांचून मनुष्याला आपल्या कर्तव्यांचा बोध होणें अशक्य आहे; सरकारनें हे हक्क हिरावून घेतले तर प्रजा अधोगतीला लागते; हे हक्क हिरावून घेणें म्हणजे मनुष्यांची माणुसकी काढून घेऊन त्यांना जनावरांच्या पंक्तींत लोटण्यासारखें आहे. समाजाच्या नैतिक उन्नतीसाठीं प्रजेला स्वातंत्र्य देणें हें सरकारचें आद्यकर्तव्य आहे. मॅझिनीला समाजाच्या नैतिक उद्धारासाठीं स्वातंत्र्य हवें होतें. अनाचारस्वातंत्र्याला त्याची मंजुरी नव्हती. बहुमताच्या जोरावर कायदे मंजूर करून लोकांवर सुधारणा लादणें त्याला नापसंत होतें. उदात्त विचार ज्याच्या त्याच्या अंत:करणांतच उत्पन्न झाले पाहिजेत, म्हणजेच उद्धाराचा मार्ग मोकळा होतो, उद्धाराला पोषक परिस्थिति निर्माण करणें एवढेंच सरकारचें काम आहे असें त्याचें मत होतें.

संघटनेमुळें स्वातंत्र्य फलद्रूप होतें, आपसांतील विरोधबुद्धि नाहींशी होते व समाजाची प्रगति होते; संघटनेमुळें बंधुभाव उत्पन्न होतो, समाजाची दैवी शक्ति जागृत होते; संघटनेमुळें समाजाची तशीच व्यक्तीचीहि उन्नति होते; संघटना हें प्रगतीचें साधन आहे आणि प्रगतीसाठींच सृष्टिव्यापार चाललेले आहेत. म्हणून सरकारनें व्यक्तिस्वातंत्र्याप्रमाणेंच संघटनास्वातंत्र्यहि अबाधित ठेवलें पाहिजे. सार्वजनिक, शांततावादी व स्वातंत्र्यप्रेमी संघटनांच्या विकासास सरकारनें पूर्ण वाव दिला पाहिजे. स्वातंत्र्याचें सामर्थ्य संघटनेमुळें कार्यक्षम होतें.

समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठीं स्वातंत्र्य व संघटना या दोहोंची सारखीच आवश्यकता आहे. स्वातंत्र्याशिवाय संघटना व सहकार्य अशक्य आहे, त्याचप्रमाणें संघटनेशिवाय स्वातंत्र्य अशक्य आहे. संघटनेशिवाय मनुष्याला आपलीं कर्तव्यें पार पाडतां येणें अशक्य आहे. सरकारनें सार्वजनिक चळवळीपासून अलिप्तहि राहूं नये व सर्वच सार्वजनिक गोष्टी स्वतःच्याच हातीं घेऊन लोकांचें स्वातंत्र्य हिरावूनहि घेऊं नये. व्यक्तिस्वातंत्र्य व समाजसंघटना यांचा संगम झाल्यानेंच सार्वजनिक कार्यांना जोम येऊन तीं सिद्धीस जातात.

व्यक्ति व समाज यांमधील संबंध कोणत्या प्रकारचे असावे या तात्विक चर्चेकडे मॅझिनीनें मुळींच लक्ष दिलें नाहीं; त्याच्या मतें व्यक्ति व समाज यांमध्यें विरोधभाव उत्पन्न होणें अशक्य होतें. व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे इतरांच्या हक्कांवर धाड घालणें नव्हे तर इतरांबद्दलचीं आपलीं कर्तव्यें स्वयंस्फर्तीनें पार पाडणें होय. या भावनेमुळेंच व्यक्ति व समाज, स्वातंत्र्य व संघटना यांचा मिलाफ होतो. प्रजेला सत्कार्याची स्फूर्ति देणें व जनतेची कर्तव्यबुद्धि जागृत व कार्यक्षम करणें हेंच राजकारणाचें ध्येय आहे. हें ध्येय साध्य व्हावयासाठीं शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे; म्हणून सार्वत्रिक व राष्ट्रीय शिक्षण प्रजेच्या आटोक्यांत आणणें हें सरकारचें कर्तव्य आहे. शिक्षण ही राष्ट्रनिष्ठेची स्फूर्ति आहे, जीवनाच्या महतत्वांचा बोध व्यक्तीला करून द्यावयाचें खरें साधन आहे. शिक्षणाचा उगम धर्मामध्यें आहे; शिक्षणामुळेंच राष्ट्रीय जीवन संघटित व एकतान होतें, शिक्षणामुळेंच व्यक्तिमाहात्म्य व पक्षभेद नाहींसे होतात. शिक्षणामुळेंच राष्ट्रीय ध्येय सिद्ध होऊं शकतें. मोफत व सक्तीचें राष्ट्रीय शिक्षण जेथें देण्यांत येत नाहीं त्या देशाला राष्ट्र ही संज्ञा प्राप्त होणें अशक्य आहे. राष्ट्रानें आपला शिक्षणाचा कार्यक्रम स्पष्टपणें आंखून जनतेला शिक्षण दिलें पाहिजे. राष्ट्रीय ध्येय व निष्ठा राष्ट्रीय शिक्षणामध्यें प्रबळ झाल्या पाहिजेत; राष्ट्रीय शिक्षणामुळें जनतेचा आत्मा चैतन्यमय होतो. राष्ट्रानें आपलें ध्येय व निष्ठाप्रतिज्ञेचीं कलमें केवळ बहुमतानेंच ठरवावयाचीं कीं काय, तीं शिक्षणाच्या कार्यक्रमांत कोणत्या रीतीनें प्रकट होऊं शकतील याचें विवेचन मॅझिनीनें स्पष्टपणें केलेलें नाहीं. राष्ट्रीय शाळांमधून मानवी कर्तव्यें, आत्मयज्ञ व अढळ निष्ठा यांचें शिक्षण देण्यांत यावें असें त्याचें मत होतें. मानवजातीच्या उत्क्रांतीची व प्रगतीची दिशा, राष्ट्राचा इतिहास, राज्यकारभाराचीं मूलतत्वें वगैरे विषयांचा राष्ट्रीय शिक्षणांत समावेश होतो. स्वार्थाकडे व ऐहिक

सुखाकडे प्रवृत्त करणारे विचार विद्यार्थ्यांच्या कोंवळया मनावर कधींहि ठसवि-ण्यांत येऊं नयेत असें त्याचें मत होतें.

राजकीय सत्तेचे हुकूम व्यक्तींच्या मार्फत प्रसिद्ध होतात; या व्यक्तींनीं आपला कारभार परमेश्वराच्या नांवानें हांकला पाहिजे; पण सर्व अधिकार तेच बळकावून बसतील तर त्यांना उलथून टाकणें हें आपलें काम आहे. राज्यकारभार बहुमताच्या तंत्रानें चालविण्याशिवाय गति नाहीं हें खरें आहे; पण बहुमतालाहि नीतिबाह्य वर्तनाचा अधिकार नाहीं--प्रगतीचा रस्ता बंद करण्याचा अधिकार बहुमताला नाहीं. जनतेची इच्छा पवित्र आहे, तिला आपण मान दिला पाहिजे—पण जनतेच्या प्रतिनिधींनीं बहुमतानें अनीतीचा मार्ग स्वीकारला तर त्यांच्या इच्छा अंमलांत आणण्याचें लोकांनीं नाकारलें पाहिजे. कित्येक संस्था अशा असतात कीं त्यांची कार्यक्षमता नष्ट झाल्यावरहि केवळ परंपरेमुळें त्यांचें बाह्य स्वरूप कायम राहतें. अशा संस्था उलथून पाडणें समाजाला आवडत नाहीं; त्या संस्थांमध्येंच नव्या विचाराच्या मंडळींनीं प्रविष्ट होऊन तिला नवें चैतन्य प्राप्त करून दिलें पाहिजे. म्हणजे परंपरेला प्रिय असलेलें बाह्य स्वरूप कायम राहून संस्थेमध्यें कार्यक्षमता उत्पन्न होते व समाजाला तिचा उपयोगहि होतो. संस्थांचें अंत:करण अशा रीतीनें बदलावें हें मॅझिनीला मान्य नव्हतें; अशा संस्था उलथून पाडल्या पाहिजेत असें त्याचें मत होतें.

राजशाहीपेक्षां लोकशाही अधिक इष्ट आहे–कारण जनतेच्या ठिकाणीं परमेश्वरानें सर्व प्रकारच्या शक्ति निर्माण केलेल्या आहेत. लोकशाहीला सर्वांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा घेतां येतो. जेथील नागरिक स्वतंत्र असतात त्या देशाचें राजकारणहि स्वतंत्र असतें. लोकशाहीशिवाय दुसऱ्या कोणत्याही प्रकारची राज्यपद्धति चिरस्थायी होणें अशक्य आहे. लोकशाहीनें ध्येयाचा त्याग केला तर देशामध्यें स्वार्थसाधूंचा व अराजकांचा भरणा होतो. राज्यकारभारासाठीं प्रतिनिधि निवडून देण्याचा मतदानाचा हक्क सार्वत्रिक असला पाहिजे; त्यामुळें जनतेला राजकीय जबाबदारीचें शिक्षण मिळतें. राष्ट्रीय शिक्षणामुळें राष्ट्रीय जीवनांत एकतानता येते; म्हणून स्वतंत्र होतांच प्रत्येक देशानें राष्ट्रीय शिक्षण द्यावयास सुरवात केली पाहिजे; राष्ट्रीय शिक्षणाच्या उपक्षेनें पक्षभेद माजतात, कांहीं व्यक्तींना विशेष महत्व प्राप्त होऊन इतरांचें स्वातंत्र्य नष्ट होतें; आणि बहुमतपक्षाकडून जनतेवर जबरी होते. स्त्रियांना मतदानाचा हक्क देण्यांत यावा—त्याचप्रमाणें त्यांची नटण्यामुरडण्याची हौस व पोकळ अभिमान कमी

करण्यासाठीं त्यांचा नैतिक उद्धार होईल अशीहि तजवीज केली पाहिजे. राष्ट्रीय सरकारनें आपला कार्यक्रम नेहमीं सुधारणेच्या आघाडीस ठेवला पाहिजे. लोकसत्तावाद्यांनीं लोकसत्तेची संस्थापना केल्यावर लोकसत्तेनें लोकसत्तावादी निर्माण केले पाहिजेत. राज्यकारभारामध्यें केंद्रवर्ती सत्ता किती असावी व स्थानिक संस्थांकडे किती अधिकार असावे याची मीमांसा मॅझिनीनें स्पष्टपणानें केलेली नाहीं. लोकशाही ही राज्यपद्धति तर्काला व नीतीला धरून आहे—व्यक्तिस्वातंत्र्य व समता हीं लोकशाहीशिवाय अशक्य आहेत; राजशाहीमुळें स्वार्थबुद्धि व विषमता यांचा प्रसार होतो; राजशाहीला जनतेचें चैतन्य जागृत करण्याचें सामर्थ्य नाहीं; राजशाहीमुळें प्रजेचें कल्याण होणें अशक्य आहे; म्हणून राजसत्ता चिरस्थायी होणें अशक्य आहे. इंग्लंडच्या सदनशीर राजसत्तेमध्यें जनता व राजा यांचेमध्यें विरोध नसतो; इंग्लंडांतील राजकीय झगडा जनता व वरिष्ठ वर्गांतील प्रतिष्ठित लोक यांजमध्यें चाललेला असतो; म्हणून इंग्लिश राजसत्ता हानिकारक नाहीं. इंग्लंडच्या राज्यपद्धतीकडे त्याला ज्या नजरेनें पाहतां आलें त्याच दृष्टीनें त्याला पीडमाँटच्या राजसत्तेकडे पाहतां आलें नाहीं; कारण त्याचें मन पीडमाँटसंबंधीं पूर्वग्रहानें दूषित झालें होतें. लोकशाही कीं राजशाही या बाह्यांगावर मॅझिनीची दृष्टि नव्हती. एका बहुसंख्याक पक्षाकडून दुसऱ्या पक्षावर लादण्यांत येणाऱ्या राज्यपद्धतीला मी लोकशाही म्हणणार नाहीं. लोकशाहीचें तत्व प्रजेच्या अंतःकरणावर बिंबल्यानें त्यांना राजकीय शिक्षण मिळतें व त्यांचा नैतिक उद्धारहि होतो, लोकशाहीच्या संस्थापनेबरोबर जनतेमध्यें स्वातंत्र्य, समता व संघटना या तत्वांचा विकास झाला पाहिजे. जुने जातिभेद मोडून टाकून त्यांच्या जागीं नवे राजकीय भेद स्थापन करणें अनिष्ट आहे. लोकशाही म्हणजे राष्ट्राच्या सर्व शक्तींची संघटना होय. लोकशाहीमध्यें सरकार व प्रजा यांमध्यें केव्हांहि विरोध उत्पन्न होत नाहीं, अधिकाराला पात्र असलेले लोकच अधिकाराच्या जागांवर नेमण्यांत येतात व पक्षभेदामुळें जनतेच्या शक्ति फुकट जात नाहींत. लोकशाहीमध्यें गोरगरिबांचा परामर्श घेतला जातो, समाजाची सर्वांगीण प्रगति होऊन सर्व शक्ति जागृत होतात; लोकशाही असलेल्या राष्ट्रांतील लोक समर्थ व गंभीर असतात, ते एकमेकांशीं बंधुभावानें बद्ध झालेले असतात; लोकशाही हें स्वातंत्र्याचें, संस्कृतीचें, नीतीचें व प्रगतीचें पवित्र मंदिर आहे; लोकसत्ताक राष्ट्रामध्यें उच्चनीच, गरीब श्रीमंत वगैरे भेदभाव नसतात. निष्ठा, परंपरा व भक्ति

यांमुळें ते एकजीव झालेले असतात; त्यांना परंपरा प्रिय असते--पूर्वीपेक्षांहि अधिक उज्वल भवितव्य आपणांपुढें आहे अशी त्यांची निष्ठा असते. त्या निष्ठेला मूर्त स्वरूप द्यावयासाठींच ते बंधुभावानें सहकार्य करीत असतात.

## ४ राष्ट्र-धर्म.

मानवजातीच्या प्रगतीची गति वाढवणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. हें महत्कार्य शिरावर घेण्याइतकें सामर्थ्य कोणाहि एकाच व्यक्तीचे ठिकाणीं असणें संभवत नाहीं; मानवजात इतकी विशाल आहे कीं तिचेसंबंधीं आपणांस कांहीं कर्तव्यें आहेत असा नुस्ता संशयहि मनुष्याचे मनांत उत्पन्न होत नाहीं, पण राष्ट्रीयत्वाची भावना त्याचे मनांत सहज उत्पन्न होते; राष्ट्रकर्तव्यांचा बोध मनुष्यमात्राला सहज होतो व राष्ट्रासाठीं हवा तो स्वार्थत्याग करावयाला त्याची तयारी सहज होऊं शकते. प्रत्येक राष्ट्रांतील व्यक्तींच्या प्रवृत्ति व आकांक्षा सारख्याच असाव्यात अशी परमेश्वराची योजना आहे; व्यक्तीची राष्ट्रसेवा मानवजातीच्या कारणीं लागावी अशी त्याची योजना आहे मानवजातीच्या प्रगतीचें राष्ट्र हें परमेश्वरनिर्मित साधन आहे आणि म्हणूनच राष्ट्रधर्म पवित्र आहे. राष्ट्र हें मानवजातीच्या उद्धाराचें कार्यालय आहे. मानवजातीच्या प्रगतीशीं राष्ट्र ही संघटना निगडित झालेली आहे, आणि म्हणूनच ती सजीव व समर्थ आहे. राष्ट्रें वेगवेगळीं आहेत पण त्या एकाच सैन्याच्या वेगवेगळ्या पलटणी आहेत, मानवजातीच्या प्रगतीची दिशा परमेश्वरानेंच आंखून ठेवलेली आहे. ती दिशा ओळखून राष्ट्रकार्य त्याच मार्गानें चालविणें हें राष्ट्रीय पुढाऱ्यांचें कर्तव्य आहे. ह्या कार्याच्या सुसंगतीवरच मानवजातीची प्रगति अवलंबून आहे हें उघड आहे. यासाठीं राष्ट्रें संघटित झालीं पाहिजेत; त्याशिवाय त्यांचें सामर्थ्य कार्यक्षम होणार नाहीं. यासाठीं राष्ट्रांनीं आपलें चैतन्य, निष्ठा व वैशिष्ट्य सदैव जागृत ठेवलें पाहिजे.

मॅझिनीनें राष्ट्रधर्माचें हें तत्वज्ञान प्रगट केलें त्यावेळीं युरोप खंडाची स्थिति अत्यंत आणीबाणीची झाली होती. राजेलोक आपल्या प्रजाजनांची कोरडी संमतीहि न घेतां वेगवेगळे तह करून मुलुखाची आपसांत वांटणी करून घेत असत. प्रजेला कांहीं आकांक्षा आहेत अशी त्यांची कल्पनाहि नव्हती. आपलें उत्पन्न व वैभव वाढवण्यासाठीं ते हव्या त्या कुरापतीवरून युद्धें उभारीत;

हजारों सैनिकांची आहुति देऊनहि त्यांची तृष्णा तृप्त होत नसे. सर्व सत्तांचें सामर्थ्य सारखें असावें हें तत्व अबाधित ठेवण्यासाठीं युरोपियन राज्यांमध्यें सारखी धुमश्चक्री चाललेली असे. राजकारस्थानी मुत्सद्यांनीं प्रस्थापित केलेल्या स्मशानशांततेमधून एकादेवेळीं लोकांच्या अंतःकरणाच्या उसळ्या उमटत असत. शेवटीं लोकक्षोभ अनावर झाला व युरोपियन राज्यांची पुनर्घटना होऊं लागली. अजूनहि युरोपियन राष्ट्रें पूर्णपणें उत्क्रांत झालेलीं नाहींत, महायुद्ध होऊन गेलें तरीहि युरोपांत शांतता नांदूं लागलेली नाहीं, आणि याचें कारणहि हेंच आहे कीं राजकारस्थानाला अजून राजकारणाचें स्वरूप आलेलें नाहीं, व युरोपियन राष्ट्रांना राष्ट्रधर्माचें सामर्थ्य व उपयुक्तता यांचा अजूनहि बोध झालेला नाहीं.

सृष्टिरचना, जात, भाषा, चालीरीति, परंपरा, वाङ्मय वगैरे अनेक गोष्टींवर राष्ट्रीयत्व अवलंबून आहे असें राजनीतिकोविदांचें मत आहे; वेगवेगळ्या जातींचें वैशिष्ट्य शोधून नंतर त्यांनीं कोणता प्रदेश काय प्रमाणांत व्यापलेला आहे याचा हिशेब करावयाच्या भानगडींत मॅझिनी कधींच पडला नाहीं. जातींचें संमिश्रण इतकें झालेलें आहे कीं त्यांवर राष्ट्रीयत्व अवलंबून ठेवणें शक्य नाहीं. समर्थ व स्वतंत्र त्याचप्रमाणें दुबळ्या व परतंत्र राष्ट्रांतहि जातींचें मिश्रण झालेलें आहे. मनुष्यजातीमध्यें असा गोलंकार झालेला आहे तरीहि कित्येक जाती अनेक वर्षेंपर्यंत एकाच देशामध्यें निवास करीत असल्यामुळें त्यांना त्या प्रदेशाबद्दल स्वीयभाव वाटूं लागतो; यामध्यें भाषेच्या ऐक्याची भर पडली कीं त्या लोकांमध्यें एकराष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न होऊं लागते. राष्ट्रांच्या मर्यादा परमेश्वरानेंच आंखून दिलेल्या आहेत; नद्या, पर्वतांच्या रांगा, समुद्र वगैरे साधनांनीं राष्ट्रमर्यादा त्यानें स्पष्ट करून ठेवल्या आहेत. एक भाषेमुळें दळण-वळण वाढतें व शिक्षणाच्या प्रसारानंतर ती भाषा बोलणारांना एकमेकांबद्दल आपलेपणा वाटूं लागतो. कित्येक वेळां वाङमयामध्येंच राष्ट्रीयत्वाचें चैतन्य जीव धरून राहिलेलें असतें. पोलंडच्या कवींनीं स्लाव्ह लोकांचें चैतन्य जागृत ठेवलें व डॅन्टेनें इटलीचें चैतन्य जागृत ठेवलें. ऐतिहासिक परंपेरे-मुळें राष्ट्रांचा अभिमान जिवंत राहतो, युद्धामुळें मृत राष्ट्रांचेंहि पुनर्जीवन होतें. समाजशासन व सरकार यांमुळेंहि एकाच प्रदेशावरचे रहिवासी एकमेकांच्या अधिकाधिक जवळ जवळ येत जातात, या साधनांमुळें राष्ट्रीयत्व निर्माण होतें—पण राष्ट्रीयत्व म्हणजे ही साधनांची यादी नव्हे असें मॅझिनीचें मत होतें. इटलीमध्यें अनेक राज्यें अनेक शतकेंपर्यंत

गाजत होतीं, तरीहि इटलीचें राष्ट्रीयत्व नष्ट झालें नाहीं. स्विट्झरलँडमध्यें अनेक भाषा आजमितीसहि चालू आहेत--तरीहि त्याचें राष्ट्रीयत्व नाहींसें झालें नाहीं. राष्ट्रीयत्व ही एक भावना आहे, नैतिक भावना आहे. बाह्य साधनांनीं ती भावना निर्माण होणें शक्य आहे; पण ह्या भावनेचें दृश्य साधनामध्यें वर्गीकरण करणें अशक्य आहे. राष्ट्रें जनतेकडून स्वयंस्फूर्तीनेंच संस्थापित झालीं पाहिजेत. जुलूमजबरदस्तीनें राष्ट्रघटना करणें अशक्य आहे. आपण राष्ट्रसंस्थेमध्यें संघटित व्हावयाचें असें जनतेनें एकदां ठरविल्यानंतर मग त्यांच्या हेतूच्या पूर्ततेच्या आड यावयास समर्थ अशी कोणतीहि शक्ति जगांत नाहीं. राष्ट्रीयत्व ही सर्वस्वी राजकीय भावना नाहीं; नैतिक ध्येय हेंच राष्ट्रीयत्वाचें समर्थन आहे. ज्या राष्ट्रानें आपलें मानवजातीसंबंधीचें कर्तव्य जाणलें आहे त्याच राष्ट्राला स्वातंत्र्याची पात्रता आहे. राष्ट्रसंघटनेचा पाया चिरंतन तत्वांवरच असला पाहिजे. प्रदेश म्हणजे स्वदेश नव्हे--विशिष्ट प्रदेश हा स्वदशाच्या भावनेचा पाया मात्र आहे; स्वदेश या भावनेमुळें त्या प्रदेशावर निवास करणारे सर्व लोक बंधुभावानें निगडित होतात; या बंधुभावालाच मॅझिनी राष्ट्रभावना असें म्हणतो.

" माझ्या बंधूनों आपल्या मातृभूमीवर प्रेम करा; ! स्वदेश हेंच तुमचें घर आहे; हें घर तुम्हांला परमेश्वरानें देणगी म्हणून दिलेलें आहे; राष्ट्रकुटुंबांत एकत्र झालेल्या आपल्या देशबांधवांवर प्रीति करा; त्यांचें अंत:करण पारखा, त्यांच्या भावनांबरोबर समरूप व्हा ! प्रत्येक मनुष्य हा स्वदेशाचा अवतार असला पाहिजे, स्वदेशाचें चालतें बोलतें स्वरूप असला पाहिजे; तुम्हावर आपल्या स्वत:च्या वर्तनाची नव्हे तर आपल्या देशबांधवांच्या वर्तनाचीहि जबाबदारी आहे, हें ओळखून तसेंच वर्तन ठेवा. तुम्ही अशा रीतीनें वागावें कीं त्यामुळें लोक तुम्हांलाच नव्हे तर तुमच्या देशालाहि मान देतील व त्यावर प्रीति करतील. प्रत्येक नागरिकानें आपल्या राष्ट्राच्या तेजामध्यें भर घातली पाहिजे, राष्ट्राच्या सामर्थ्याच्या जोरावर नागरिक उद्दाम होऊन शेखी मिरवूं लागले तर त्या राष्ट्राला खरें सुख कधींहि प्राप्त होणार नाहीं. खरा राष्ट्राभिमानी मनुष्य सत्य बोलण्यास कधींहि डगमगणार नाहीं. तोंडपुजेपणामुळें राष्ट्राचा उद्धार होणें शक्य नाहीं किंवा पोकळ गर्वाच्या डौलामुळें आपली किंमतहि अधिक वाढणें शक्य नाहीं. आपल्या अंगीं असलेले दोष दूर करण्यांतच खरी राष्ट्रभक्ति आहे; आपल्या अंगच्या गुणांचें प्रदर्शन करीत

राहणें ही राष्ट्रभक्ति नव्हे. स्वार्थाचा नुसता स्पर्श झाल्यानें राष्ट्रांचा अधःपात होतो; म्हणून राष्ट्रीय राजकारण कारस्थानापासून व स्वार्थापासून सर्वथैव अलिप्त असलें पाहिजे." मॅझिनीची राष्ट्रधर्माची मीमांसा अशी तेजस्वी व सडेतोड आहे; त्याची देशभक्ति गंभीर व मर्दुमकीची होती. त्याचे अंतःकरणांतील दैवी तेजाची ज्योत संथपणें तेवत होती; ती कधींहि भडकली नाहीं किंवा विझूनहि गेली नाहीं. तोंजपुजा, खोटें बोलणारा, पोकळ डौल मारणारा, स्वार्थी, ज्यांना अब्रूची किंमत जीविताहूनहि अधिक वाटत नाहीं अशा लोकांना राष्ट्रभक्ति करतां येणें अशक्य आहे असें त्याचें म्हणणें होतें. ज्यांचें राजकारण व देशभक्ति या दोषांपासून अलिप्त असते त्यांना चारचौघांमध्यें मान खालीं घालावयाचा प्रसंग केव्हांहि येणार नाहीं.

राष्ट्रभक्ति म्हणजे राष्ट्राचें वैभव वृद्धिंगत करण्यासाठीं जिवापाड श्रम करणें होय. मनुष्याला मानवजातीच्या प्रगतीसाठीं कार्य करावयाचा मार्ग दाखविणें व कर्तव्यांचा बोध करून देणें हें राष्ट्रधर्माचें ध्येय आहे. यासाठीं राष्ट्रीय सरकारनें प्रजेला राष्ट्रीय शिक्षण दिलें पाहिजे; त्याचप्रमाणें सरकारनें सर्व कामकऱ्यांना कामहि दिलें पाहिजे. वाङ्मय, व्यापार, प्रवासाचीं साधनें व शिक्षण यांमुळें राष्ट्रांना एकमेकांबद्दल अधिक बंधुभाव वाटूं लागला आहे. महत्कार्यांमध्यें नैतिक आकर्षणशक्ति असते. लोकसत्ताक राष्ट्रांच्या अडचणी दूर व्हाव्या यासाठीं संघटित कार्याची अत्यंत जरूरी आहे; यासाठींच मॅझिनीनें 'तरुण युरप' ही संस्था स्थापन केली होती. राष्ट्राराष्ट्रांचा आर्थिक व बौद्धिक संयोग झालाच पाहिजे; इतर राष्ट्रांना तिरस्कृत लेखणें ही राष्ट्रभक्ति नव्हे व राष्ट्राभिमानहि नव्हे, हा पोकळ डौल आहे; त्यामुळें केव्हांहि नाशच व्हावयाचा हें उघड आहे. एखाद्या राष्ट्रावर इतर राष्ट्रें प्रेम करूं लागलीं, विश्वास ठेवूं लागलीं म्हणजेच त्या राष्ट्राचा उद्धार होतो असें समजावें. नीतीवर श्रद्धा ठेवणाऱ्या राष्ट्राला व्यापारांत प्रतिबंध होत नाहीं व राजकारणांतहि अडचणी येत नाहींत; अन्यायानें वागणाऱ्या राष्ट्राबद्दल कोणासच प्रेम वाटत नाहीं व त्यावर कोणी विश्वासहि ठेवीत नाहीं; म्हणून परराष्ट्राचा घात करणें हा प्रत्यक्ष आत्मघातच आहे. दीनदुबळ्या परराष्ट्रांना गांजणाऱ्या व लुबाडणाऱ्या देशाबद्दल कोणालाहि तिरस्कारच वाटेल. आपल्या मुलखांतील प्रजेला स्वातंत्र्याचे हक्क देऊन परदेशांतील लोकांचें स्वातंत्र्य हरण करणारीं राष्ट्रें रसातळाला जातात, परतंत्र होऊन अराजकांचे व जुलमी सुलतानांचे ताबडींत सांपडतात !

प्रत्येक राष्ट्राला स्वतःच्या संबंधींचीं जशीं कर्तव्यें असतात त्याचप्रमाणें त्याला कांहीं आंतरराष्ट्रीय कर्तव्येंहि असतात. परराष्ट्रांनां न लुबाडणें व त्यांच्या कोणत्याहि भानगडींत हात न घालणें, एवढेंच केलें असतां राष्ट्रानें आपलीं आंतरराष्ट्रीय कर्तव्यें बजावलीं असें होत नाहीं. सत्य व असत्य, न्याय व अन्याय, स्वातंत्र्य व पारतंत्र्य यांमध्यें जुंपलेल्या लढाईचा अजून निर्णय लागलेला नाहीं—या युद्धाचा निकाल होईपर्यंत तटस्थ राहणें हा भ्याडपणा आहे; परराष्ट्रांचे संबंधीं इतका बेफिकीरपणा दाखविणें हा देवाच्या घरीं गुन्हाच मानला जाईल यांत संशय नाहीं. फ्रान्सनें रशियाच्या झारला पोलंडमध्यें जुलूमजबरदस्ती करावयास मदत करूं नये इतकेंच नव्हे तर रशियानें आपल्या सामर्थ्याच्या जोरावर स्वार्थाला हात घातला तर फ्रान्सनें पोलंडच्या जनतेला प्रत्यक्ष मदत करावी असें मॅझिनीचें म्हणणें होतें. स्वार्थाच्या मागें लागलेले सुलतान एकजुटीन उठावणी करीत आहेत. त्यांच्या एकवटलेल्या सामर्थ्याला तोंड द्यावयाची शक्ति कोणत्याही राष्ट्राच्या असहाय जनतेमध्यें नसल्यामुळें सर्व गांजलेल्या राष्ट्रांच्या रहिवाशांना संघटित होऊन आपलें सामर्थ्य वृद्धिंगत व कार्यक्षम केलें पाहिजे. धर्माबद्दल बेफिकीर असणाऱ्या मनुष्याचे अंतःकरणांत श्रद्धा असणें शक्य नाहीं; तो व नास्तिक यांचेमधला फरक नुसता तात्विक मात्र असतो; त्याचप्रमाणें परराष्ट्रांच्या घडामोडीबद्दल बेफिकीरपणा दाखवणाऱ्या राष्ट्रामध्यें स्वातंत्र्याची ज्योत तेवत राहणें शक्य नाहीं, त्या राष्ट्राला मानवजातीसंबंधींच्या आपल्या परम पवित्र कर्तव्यांचा बोध होणें शक्य नाहीं. १८५९ सालीं इंग्लिश लोकांना उद्देशून मॅझिनीनें म्हटलें होतें:—एका बाजूला सत्य, सत्कार्य व न्याय यांचें निशाण फडकत आहे आणि दुसऱ्या बाजूला जुलूम, जबरदस्ती, अन्याय, असत्य व स्वार्थ यांचा कड घणारांचें निशाण फडकत आहे. इंग्लंड हें स्वतंत्र व समर्थ राष्ट्र आहे; सत्य व न्याय यांवर आमची निष्ठा आहे असें इंग्रज लोक वेळोवेळीं बोलत असतात. सत्य व असत्य यांच्या लढयामध्यें आम्ही तटस्थ प्रेक्षकवृत्ति स्वीकारणार असेंच इंग्लंड म्हणणार काय? असें असेल तर तुम्ही धर्माचें व निष्ठेचें नांवच काढूं नका; अशी तटस्थवृत्ति भेकड व पाखंडी लोकांनाच साजते. स्वकर्तव्यपराङ्मुख व्यक्तीवर ज्याप्रमाणें परमेश्वराचा कोप होतो त्याप्रमाणेंच कर्तव्यपराङ्मुख राष्ट्रावरहि त्याचा रोषच होतो. इंग्लंड आजहि नीतिबाह्य बेफिकीरपणाच स्वीकारणार काय?

दिखाऊ शांततेसाठीं हवें तें मोल द्यावयास मॅझिनी केव्हांहि तयार नव्हता. युद्ध उभारावयाचेंच असेल तर तें सत्यासाठींच उभारलें पाहिजे असें त्याचें मत होतें. "तत्वाचा पाठिंबा नसलेलें युद्ध म्हणजे बंधुद्रोहच होय. युद्धामुळें सत्याचा विजय होणार असेल तर तें शांततेइतकेंच इष्ट व पवित्र आहे. स्वतःच्या स्वार्थासाठीं हवा तो जुलूम करण्यास कचरणार नाहींत अशा पाशवी शक्तींचा पुरता नायनाट झाल्यावांचून शांतता स्थापन होणें शक्य नाहीं; न्याय व स्वातंत्र्य या महातत्वांच्या पायावर समाजाची स्थापना व्हावी यासाठीं हातीं घेतलेलें युद्ध तडीसच नेलें पाहिजे. पोलंडची रशियापासून, इटली व हंगेरी यांची ऑस्ट्रियापासून व स्लाव्ह राष्ट्राची तुर्कस्थानपासून सुटका होईपर्यंत युरपखंडांत शांतता नांदणें शक्य नाहीं." जो नियम युरपखंडाला लागू होतो तोच नियम सर्व खंडांना लागू झालाच पाहिजे "अन्यायाचे जागीं न्याय, असत्याचे जागीं सत्य, स्वार्थाचे जागीं कर्तव्य, राजशाहीचे जागीं लोकशाही यांची स्थापना होईपर्यंत शांतता स्थापन होणें व चिरस्थायी होणें अशक्य आहे."

"प्रत्येक राष्ट्रानें मानवजातीप्रीत्यर्थ एकादें विशिष्ट कार्य केलेंच पाहिजे असा परमेश्वराचा संकेत आहे; हें कार्य सिद्ध करावयासाठीं लागणाऱ्या विशिष्ट शक्ति व प्रवृत्ति परमेश्वराने त्या त्या राष्ट्रांतील लोकांना देऊन ठेवल्या आहेत." ह्या काव्यमय कल्पनेमुळें मॅझिनी थोडासा वाहवून गेल्यासारखा दिसतो. वसाहती वसविणें व उद्योगधंद्यांची वाढ करणें हें इंग्लंडचे नियोजित कार्य आहे, आशिया खंडामध्यें संस्कृतीचा प्रसार करणें हें रशियाचे कार्य आहे अशा प्रकारचीं विधानें त्यानें केलीं आहेत. मॅझिनीच्या मांडणीप्रमाणें तत्वज्ञान जर्मनीच्या वाट्याला आलें आहे, प्रत्यक्ष कार्य फ्रान्सकडे गेलेलें आहे आणि प्रत्यक्ष कृति व तात्विक विचार यांचा संगम करण्याचें कार्य इटलीला मिळालेलें आहे! अनुयायांच्या मनांत उदात्त कल्पना व भावना जागृत करावयासाठीं प्रकट झालेल्या काव्यमय कल्पना तात्विक दृष्टीनें विचार करूं लागल्यास फोल वाटूं लागतात. प्रत्येक राष्ट्रानें जगाच्या इतिहासांत नमूद करून ठेवण्यासारखी ठळक कामगिरी करून दाखविली पाहिजे; आपल्या मातृभूमीचें वैभव वृद्धिंगत व्हावें म्हणून आपण हवा तो स्वार्थत्याग करावयास तयार असलें पाहिजे-ह्या उज्वल विचारांमुळें हजारों तरुण स्वार्थत्यागाला प्रवृत्त होऊन आपल्या मायदेशाचें नांव उज्वल करतील यांत संशय नाहीं—पण अमुक राष्ट्राचें कर्तव्य अमुकच आहे असा

प्रत्यक्ष परमेश्वराचा संकेत आहे असें विधान झोंकून देणें हें बेजबाबदार धाडसाचें आहे असें म्हणावयास फारशी हरकत नाहीं.

आपल्या राष्ट्रीयत्वाच्या तत्वांच्या अनुरोधानें मॅझिनीनें युरोपखंडाच्या पुनर्घटनेची दिशा दाखवून दिली होती. फ्रान्स व इंग्लंड या राष्ट्रांच्या राज्यमर्यादा नैसर्गिक असल्यामुळें त्या कायम राहतील; इटलींतील राज्यें बुडून जातील व निसर्गमर्यादांनीं वेष्टित असें इटली हें राष्ट्र निर्माण होईल; जर्मनीचें राष्ट्रीय एकीकरण होईल पण राज्यकारभाराच्या सोयीसाठीं या राष्ट्राचे दोन तीन राजकीय विभाग करावे लागतील; स्पेन व पोर्तुगाल यांचें एकीकरण होईल; रशियनस्, पोलस्, झेकस् व सर्बस यांचीं वेगवेगळीं राष्ट्रें स्थापन होतील; जेथें ग्रीक भाषा बोलली जाते ते सर्व प्रदेश ग्रीसच्या ताब्यांत जातील; कदाचित् सर्व्हिया व ग्रीस यांचें एकीकरण होईल; दक्षिण युरोपांत स्लाव्ह राष्ट्रें स्थापन होतील; असें भविष्य त्यानें वर्तविलें होतें. लहानसहान राष्ट्रांचें भवितव्य विशेष उज्वल होणें शक्य नाहीं असें त्याचें मत होतें. "युरपखंडांतील राष्ट्रें हळूहळू उत्क्रांत होत जातील व त्यांचें सामर्थ्य जवळ जवळ सारखेंच असल्यामुळें त्यांचेमध्यें समसामर्थ्याच्या तत्वाला बाध येणार नाहीं व शांततेचा भंग होणार नाहीं." "मोठमोठ्या राष्ट्रांमध्यें राज्यकारभाराचें केंद्रीकरण करण्याची फारशी जरूर राहणार नाहीं; स्थानिक संस्थांना स्वतःचा कारभार चालवावयाचे अधिकार देण्यांत आल्यानें राष्ट्राचें संघटना-सामर्थ्य वाढेल व प्रगतीचें काम जोरानें चालू होईल." १८७० सालीं जर्मनी व फ्रान्स यांचें युद्ध झालें त्यापूर्वीच मॅझिनीनें आपलें भविष्य वर्तविलें होतें; कांहीं ठिकाणीं तें खरें ठरलें आहे; कांहीं ठिकाणीं तशा चळवळी चालू आहेत पण त्यांना अजून मूर्तस्वरूप यावयाचें आहे. वीसाव्या शतकांतील पहिल्या वीस वर्षांचा युरपचा इतिहास बहुतेकांना माहीत आहेच. त्यावरून मॅझिनीच्या अनुमानांची सत्यता सहजच प्रत्ययाला येईल.

"युरोप खंडांतील राष्ट्रें उत्क्रांत होऊन राजकीय वातावरण स्थिर झाल्यानंतर युरपियन लोकसत्ताक राष्ट्रांचा लोकसत्ताक संघ स्थापन होईल. भिन्न भिन्न राष्ट्रांच्या शक्ति संघटित करून त्यांमध्यें एकमेकांबद्दल आदरभाव उत्पन्न होईल असें करणें हें काम हा संघ हातीं घेईल." मॅझिनीनें आपलें सारें लक्ष युरपियन लोकांवरच एकाग्र केलें होतें. पूर्वेकडील जनतेच्या अंतःकरणांतहि अशाच आकांक्षा असतील हा मुद्दा त्यानें विचारांतहि घेतला नाहीं. "आशिया खंड ही युरपची पुरवणी आहे" आशियाला आपलें विशिष्ट जीव-

नच नाहीं अशी त्याची कल्पना होती. युरपियन वसाहतवाले आशिया व आफ्रिका खंडाचा ताबा घेतील आणि हें काम विशेषत: रशिया व इंग्लंड हीं दोन राष्ट्रें अंगावर घेतील असा त्याचा कयास होता. " राष्ट्रें आपल्या नैसर्गिक मर्यादांमध्यें स्थिर झालीं म्हणजे लढाईचें कारणच उरणार नाहीं; कारण त्यामुळें रक्ततृष्णेऐवजीं जनतेच्या मनांत बंधुभाव उत्पन्न होईल. क्रान्ति व युद्धें यांचें कारणच राहणार नाहीं; कारण स्वतंत्र राष्ट्रांमधील जनतेच्या शक्ति हळू हळू व योग्य प्रमाणांत पद्धतशीरपणानें उत्क्रांत होत राहतील व प्रगतीच्या मार्गांत कोणत्याहि प्रकारचे अडथळे उत्पन्न होणार नाहींत. लोकसत्ताक राष्ट्रसंघांकडून राष्ट्रकर्तव्यें स्पष्ट केलीं जातील--या कर्तव्यांचें पालन केल्यानें स्वातंत्र्य अक्षय टिकेल आणि राष्ट्रांना आपआपलीं विशिष्ट कर्तव्यें पार पाडतां येतील."

सर्व राष्ट्रांना ऐक्याचा मार्ग दाखविणें हें इटलीचें नियोजित कार्य आहे असा मॅझिनीचा विश्वास होता. १८१५ सालीं फ्रान्सला जगाचें नेतृत्व हातीं घेण्याची संधि मिळाली होती; पण त्यांनीं ती वायां दवडली; युरपियन राजकारणापासून अलिप्त राहिल्यामुळें इंग्लंडनें स्वत:वरच बहिष्कार घालून घतला आहे; आपसांत यादवी माजविण्यामुळें स्लाव्ह राष्ट्रांना हें नेतृत्व स्वीकारतां यणें शक्य नाहीं. " पण इटलीची स्थिति तशी नाहीं. युरपखंडाचें नैतिक एकीकरण करण्याचें कार्य परमेश्वरानें इटलीच्या शिरावर सोंपविलें आहे; आणि युरपच्या साह्यानेंच संपूर्ण मानवजातीचें एकीकरण व्हावयाचे आहे." "इटली हा राष्ट्रीयत्वाच्या तत्वाचा प्रसार करणारा देवदूत आहे, गांजलेल्या लोकांचा कैवारी आहे; स्वातंत्र्याच्या प्रसाराचें कार्य आघाडीनें शिरावर घेणारा देश इटली हाच आहे. हें कार्य इटली स्वयंस्फूर्तीनें शिरावर घेत आहे; म्हणून तें सिद्ध झाल्यानंतर सर्व राष्टें इटलीची ऋणी राहतील; इतरांच्या अगोदर या महत्कार्यांत हात घातल्यामुळें युरोपखंडाचें नेतृत्व इटलीकडेच अबाधितपणें राहील; यामुळें राष्ट्रसंघाचें व शांततेचे अधिष्ठान रोम येथेंच राहील; मानवजातीला कल्याणाचा मार्ग दाखवीत राहण्याचें महद्भाग्यहि इटलीचेंच आहे." मॅझिनीची ही कल्पना इटालियनांच्या अंत:करणाला फार सुखप्रद झाली असेल यांत शंका नाहीं. रोमच्या परंपरेवरून रोमच्या भवितव्याचा कयास बांधणें तर्काला धरून तर नाहींच पण वस्तुस्थितीलाहि सोडून आहे. १८७० सालीं राष्ट्रीयत्वाच्या तत्वाचा युरपपुरता जय झाला; तेव्हांपासून हें तत्व सर्व जगभर नवे नवे

विजय संपादन करीत आहे. राष्ट्रीयत्वाचा जय झाला खरा पण जगाला अजून राष्ट्रभक्तीचा खरा अर्थ उमजलेला नाहीं; आज लोकांना आपल्या देशाबद्दल वृथाभिमान वाटतो, स्वदेशाच्या स्वार्थासाठीं परदेशाचा घात करावयास ते मागेंपुढें पहात नाहींत; मॅझिनीच्या राष्ट्रधर्मांत गर्वाला, फुशारकीला व जबरदस्तीला जागाच नाहीं. युरपियन राष्ट्रांच्या मनांत महायुद्धानंतर हेच विचार येऊं लागले आहेत. आपसांतील भांडणें राष्ट्रसंघामार्फत तोडून घ्यावीं, त्यासाठीं तडकाफडकी युद्ध उभारूं नये अशी प्रवृत्ति मुत्सद्यांमध्यें दिसून येत आहे; पण आजच्या राष्ट्रसंघाचे घटक सर्वस्वीं लोकसत्ताक नाहींत म्हणूनच त्यांच्या कार्याला यश येत नाहीं. मॅझिनीनें आपल्या तत्वांला इटलीपुरतें यश आलेलें पाहिलें; युरपियन राष्ट्रसंघाची त्याची मूळ कल्पना आज जगाच्या डोळ्यापुढें जबाबदार राजकारण या दृष्टीनें मांडण्यांत येऊं लागली आहे. या कल्पनेला यश आलेलें पाहण्याचें श्रेय आपल्या पिढीस तरी मिळणार आहे कीं कसें हें कोण जाणे!

---

याच पुस्तकाच्या लेखकांनीं लिहिलेलें.

जोसेफ मॅझिनीच्या 'ड्यूटीज ऑफ् मॅन'

या सुप्रसिद्ध इंग्रजी ग्रंथाचें भाषांतर

**मानवी कर्तव्यें.**

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति लवकरच निघत आहे. प्रथमावृत्तीवर केसरी, लोकसंग्रह, लोकमान्य, वगैरे अनेक पत्रकारांचे उत्कृष्ट अभिप्राय आले असून अवघ्या एकाच वर्षांत आवृत्ति खलास झाली. दुसऱ्या आवृत्तींत सर्वत्रांच्या सूचनेप्रमाणें योग्य त्या दुरुस्त्या केल्या असून कांहीं नवीन मजकूरहि जोडला असल्यानें पहिल्या आवृत्तीच्या वाचकांसही ही नवी आवृत्ति संग्राह्यच वाटेल यांत शंका नाहीं.

ग्लेज कागद, सुबक छपाई, किं १ रु

गणेश महादेव आणि कंपनी.

६२१ गिरगांवरोड, मुंबई. ग्रंथप्रकाशक,

# १२ माहात्म्य.

" Where is Mazzini ?...........
He is, wherever traitors cower
In terror for their fatal hour;
Wherever men wait impatiently
To give their blood for Italy."

*Ball O'ngars.*

इटलीची राज्यक्रान्ति हें एकोणीसाव्या शतकाच्या युरपियन राजकारणांतील महाकाव्य आहे. युरोपच्या इतिहासांतील इटलीचें बंधविमोचन हें प्रकरण अत्यंत चैतन्यपूर्ण तसेंच हृदयस्पर्शी आहे. फ्रान्सच्या राज्यक्रांतीमुळें स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या तीन महातत्वांचा प्रचार झाला; ह्या तत्वांची सत्यता सिद्ध करून दाखवावयासाठीं व त्यांना मूर्तस्वरूप द्यावयासाठीं देशोदेशीं राज्यक्रान्त्या होणें इष्ट व अपरिहार्य होतें. या दृष्टीनें पाहिलें असतां इटालियन राज्यक्रांति ही फ्रेंच राज्यक्रान्तीची पुरवणी मात्र होय असा भास होतो. राष्ट्रैक्य व राष्ट्रस्वातंत्र्य हीं नवीं महातत्वें प्रस्थापित करून इटलीनें आपलें वैशिष्ट्य कायम राखिलें आणि म्हणूनच इटालियन राज्यक्रान्तीला फ्रेंच राज्यक्रान्तीच्या पुरवणीचें हीन व अपूर्ण स्वरूप प्राप्त झालें नाहीं. राष्ट्रैक्य, राष्ट्रस्वातंत्र्य व लोकसत्ता या तीन महत्तत्वांच्या पायावर राष्ट्र ही संघटना मॅझिनीनेंच प्रथम निर्माण केली; म्हणून इटालियन राज्यक्रांतीच्या पूर्णतेचें श्रेय मॅझिनीलाच दिलें पाहिजे हें उघड आहे.

अठराव्या शतकांत युरपियन राजे आपलें राज्य वाढविण्यासाठीं हव्या त्या मुलखावर स्वाऱ्या करीत. युद्धसमाप्तीचे वेळीं तहनामे होत तेव्हां प्रजाजनांच्या इच्छेची विचारपूस केल्यावांचून मुलखाची अदलाबदल करण्यांत येत असे. कारस्थानें, हेर, लांचलुचपत, दडपशाही, लुटालूट, जुलूमजबरदस्ती वगैरे सर्व

प्रकार युरपियन दरबारांमधून चालत असत. नेपोलियनच्या स्वाऱ्यांमुळें हैराण झालेल्या पण त्याच्या सुधारणांमुळें जागृत झालेल्या युरपियन लोकांना स्वसंरक्षणासाठीं व प्रगतीसाठीं संघटित व्हावयाची आवश्यकता भासूं लागली. या संघटनेचें क्षेत्र कोणतें असावें या विचारानें मूढ झालेल्या लोकांना मॅझिनीनें राष्ट्र हें संघटनाक्षेत्र दाखवून दिलें.

भिन्न भिन्न राष्ट्रांचे हातून वेगवेगळीं कार्यें व्हावींत व मानव जातीची प्रगति व्हावी असा परमेश्वराचा संकल्प असल्यामुळें वेगवेगळया राष्ट्रांना त्याच्याच योजनेमुळें कमी अधिक सामर्थ्य व समृद्धि प्राप्त झालेली आहे. मानवजातीच्या प्रगतीसाठीं राष्ट्र ही संघटना अत्यंत उपयुक्त आहे हें निर्विवाद आहे; पण सामर्थ्याच्या व समृद्धीच्या धुंदींत एकाद्या राष्ट्राला स्वकर्तव्याचा विसर पडला तर मात्र राष्ट्रांच्या उन्मत्तपणामुळें मानवजातीची पीछेहाटच होईल. असें होऊं नये म्हणूनच मॅझिनीनें राष्ट्रधर्माचीं तत्वें जगापुढें मांडलीं. राष्ट्रसंघाची कल्पनाहि प्रथम मॅझिनीनेंच जगासमोर मांडली. स्वसत्ताक राष्ट्रें, राष्ट्रसंघ व मानवजात या तिघांचा संबंध मॅझिनीच्या राष्ट्रधर्मांत जोडलेला आहे आणि म्हणूनच त्याला राष्ट्रधर्माचा आद्यप्रवर्तक हें अभिधान देण्यांत आलें आहे.

राष्ट्रधर्माचीं तत्वें जगाला समजावून द्यावयासाठीं स्वातंत्र्यलक्ष्मीनें पाठविलेला हा देवदूत इटलींत अवतरला त्यावेळीं इटली हें नांव ज्याला देतां येईल असा संघटित प्रदेशच अस्तित्वांत नव्हता. इटलीचे अनेक तुकडे झाले होते व ते वेगवेगळया राजघराण्यांनीं आपसांत वांटून घेतलेले होते; त्यावेळीं इटली असें ऐक्यवाचक नांव घेणें हा सुद्धां राजद्रोहच होता! ज्याचे मनांत स्वातंत्र्याचे विचार येतील त्याचा देह तुरुंगांत ठेवावयाचा असा इटालियन संस्थानिकांनीं निश्चय केला होता. निसर्गतःच स्वातंत्र्यप्रिय असें मॅझिनीचें मन तारुण्याच्या ऐन भरांत येतांच स्वातंत्र्यलक्ष्मीच्या प्रेरणेनें उचंबळूं लागलें तेव्हां त्याच्या देहाला सॅव्होनाच्या तुरुंगांत अडकून पडावें लागलें. तरुणपणीं सॅव्होनाच्या कोठडींत त्याला जीं दिव्य दृश्यें दिसलीं त्यांना मूर्तस्वरूप द्यावयासाठीं त्यानें जन्मभर अटोकाट यत्न केला. राष्ट्रैक्य, राष्ट्रस्वातंत्र्य व लोकसत्ता हीं इटलीला प्राप्त होईपर्यंत इटालियनांचा उद्धार व प्रगति होणें अशक्य आहे हें जाणून या द्रष्ट्यानें हीं साधनें साध्य करुन घ्यावयाचा मार्ग 'तरुण इटली' च्या द्वारें इटालियनांना दाखवून दिलें. मॅझिनीचा छळ करावयासाठीं युरपियन

राज्यकर्त्यांनीं त्याला एका जागीं स्थिर होऊं दिलें नाहीं; पण यामुळें तो जेथें जेथें गेला तेथें तेथें राष्ट्रधर्माच्या तत्वांचें बीजारोपण करावयाची संधि त्याला मिळाली. मॅझिनी आणि राजक्रान्ति व लोकशाही यांची अविच्छिन्न संगति अनेक वर्षें नजरेसमोर असल्यामुळें मॅझिनीचें नुसतें नांव काढतांच युरोपियन राजे व दरबार थरथर कांपत असत. स्वातंत्र्य व समता या तत्वांना त्याची मान्यता होती त्याचप्रमाणें लोकमताचा निर्णयहि त्याला शिरसावंद्य होता; म्हणूनच त्यानें पीडमॉंट घराण्याच्या राजसत्तेला मान्यता दिली. एवढा तात्त्विक अपवाद सोडून दिला तर बाकी जन्मभर तो लोकसत्तावादीच होता; गुलामगिरीचे और्ध्वदेहिक मंत्र पठण करावयासाठीं आणि स्वातंत्र्याचें प्रभात स्तोत्र गाऊन जनतेला जागृत करावयासाठींच त्याचा जन्म झालेला होता; फक्त इटलीलाच स्वातंत्र्य मिळावें असें त्याला वाटत नव्हतें तर सर्वच राष्ट्रें स्वतंत्र असावींत, सर्वच राष्ट्रांनीं मानवजातीच्या कल्याणावर दृष्टि ठेवून स्वतःची प्रगति साधीत असावें असें त्याचें मत होतें आणि म्हणूनच त्याला स्वातंत्र्यलक्ष्मीचा प्रेषित हें नांव देण्यांत आलें आहे.

स १८१५साली इटलीचीं सूत्रें व्हिएन्ना दरबारच्या अनुरोधानें चालत असत. त्यावेळीं इटालियन लोक पारतंत्र्याच्या अंधःकारांत कुजत पडलेले होते; त्यावेळीं लोक गुलामगिरींत कुजत पडावयास कबूल होते कारण त्यांना स्वातंत्र्याची महती माहीत नव्हती, कारण त्यांचें चैतन्य निद्रितावस्थेंत होतें. १८३० सालीं मॅझिनीनें ‘ तरुण इटली ’च्या द्वारें राष्ट्रजागृतीस सुरवात केली तेव्हां इटलीमध्यें अभिनव विचारांचा व नवचैतन्याचा प्रवाह वाहूं लागला. मॅझिनीचे बोल ऐकतांच इटालियनांना गुलामगिरी असह्य झाली; इटलीचे सुपुत्र त्याच्या प्रेरणेनें तुरुंगवासांत आनंद मानूं लागले ! निर्भयपणें फांसावर चढूं लागले ! मॅझिनीच्या शिकवणुकीमुळेंच इटालियनांना आपल्या राष्ट्रीयत्वाची जागीव झाली आणि मातृभूमीसाठीं मरणाचा अंगीकार करणें हीच जीवनाची धन्यता होय असें त्यांना वाटूं लागलें; पारतंत्र्यांत जिवंत राहण्यापेक्षां स्वातंत्र्यासाठीं लढतांना मरणें शतपट श्रेयस्कर होय हें बायरनचें वाक्य इटालियनांनीं सार्थ करून दाखविलें तेव्हांच १८४८ ची राज्यक्रान्ति शक्य झाली. मॅझिनीनें आपले दिव्य प्रतिभेनें भरलेले बोल इटलीला ऐकविले नसते व तरुण इटलीची संघटना केली नसती तर इटली आणखी किती वर्षें गुलामगिरींत राहिला असता याचा नुस्ता अंदाजहि करतां येणें अशक्य आहे.

महात्मा, मुत्सद्दी व वीर या तीघांची एकवाक्यता होते तेव्हां क्रान्ति यशस्वी होते असा इतिहासशास्त्राचा सिद्धांत आहे. महात्मा जनतेची तयारी करतो व महाकार्याला पोषक अशी भूमिका तयार करतो; त्याच्या प्रेरणेनें चैतन्यपूर्ण झालेला वीर क्रान्तीच्या शत्रूंचा निःपात उडवितो आणि या वीराच्या कार्याला मुत्सद्दी संघटित स्वरूप देतो. देशकालपरिस्थितीच्या अनुरोधानें अर्थ लाविला असतां हा नियम सर्वत्र लागू पडतो असें दिसून येईल. असो इटलीच्या उद्धारासाठीं मॅझिनी हा महात्मा, गॅरिबॉल्डी हा वीर व काव्हूर हा मुत्सद्दी हे महापुरुष जन्माला आले होते. मॅझिनीनें इटलीचें चैतन्य जागृत केलें, त्या चैतन्याची कर्तबगारी गॅरिबॉल्डीनें गाजविली; काव्हूरनें दरबारी राजकारस्थानाच्या साह्यानें इटलीला ऐक्याच्या व स्वातंत्र्याच्या मार्गाला लाविलें. काव्हूरच्या दूरदर्शी निगरगट्टपणावांचून गॅरिबॉल्डीचें उतावळें शौर्य वायफळ ठरलें असतें व मॅझिनीच्या दिव्य प्रेरणेच्या अभावीं गॅरिबॉल्डी हा एखाद्या जहाजाचा कप्तान होऊन कोठें तरी भटकत राहिला असता; आणि काव्हूरवर व्हिक्टर इमॅन्युएलनें पूर्ण विश्वास टाकला नसता तर त्याची सारी मुत्सद्दगिरी घायां गेली असती. काव्हूर नसता तर मॅझिनीचें आयुष्य कटबंडाळ्यांवारी फुकट गेलें असतें व मॅझिनी नसता तर काव्हूरला आपलें राजकारण यशस्वी करावयास भाडोत्री शिपायांवर अवलंबून रहावें लागलें असतें. मॅझिनीनें इटलीचें राजकारण अशा अवस्थेला आणून ठेवलें होतें कीं एका सुसंघटित व शिस्तीची संवय असलेल्या सैन्याची मदत मिळतांच तें पूर्णपणें यशस्वी व्हावें; त्यानें केलेल्या पूर्वतयारीमुळेच काव्हूरला यश आलें हें उघड आहे. मॅझिनी, गॅरिबॉल्डी व काव्हूर या तिघांचे भक्तजन व चहाते घरेच असल्यामुळें या तिघांपैकीं सर्वांत श्रेष्ठ दर्जा कोणाचा हें ठरविण्याचा जो तो आपापल्या बुद्धीप्रमाणें प्रयत्न करीत असतो. कोणी या तिघांना सारखाच मान देतात; कोणी या त्रिमूर्तींत व्हिक्टर इमॅन्युएल व लॉर्ड पामर्स्टन यांना ढकलून देऊन मग या पंचायतनाची आरती करतात; निःपक्षपाती पण दरबारी राजकारणांत केवळ संवयीमुळें रुळलेले इतिहासकार काव्हूरलाच इटालीचा जनक मानतात; खुद्द इटालियन लोक गॅरिबॉल्डीची भक्ति करतात; कोणी मॅझिनीला इटलीचा जनक मानतात. प्रत्येक मताचें समर्थन सहज करतां येण्यासारखें आहे. पण पारतंत्र्याच्या काळरात्रींत ज्यानें स्वातंत्र्याचें प्रभातस्तोत्र गाइलें, तुकडे तुकडे झालेल्या इटालीच्या देहांत ज्यानें चैतन्याचा संचार केला

व राष्ट्रमातेच्या उद्धारासाठीं ज्यानें तीन पिढ्यांना आत्मार्पणाची स्फूर्ति दिली त्या जोसेफ मॅझिनीलाच इटलीचा जनक हें अभिधान देणें श्रेयस्कर होय.

एकोणीसाव्या शतकांतील राजकारणाचा ओघ राष्ट्रांच्या उत्क्रांतीच्या दिशेनें वहात आहे हें मॅझिनीनें ओळखलें होतें; मात्र इतिहासाच्या प्रवाहाची ही दिशा त्याच्या समकालीन असलेल्या फार थोडया लोकांनीं ओळखली होती. राष्ट्र व लोकशाही यांचा परस्परांशीं निकट संबंध आहे इतकेंच नव्हे तर पृथ्वीच्या पाठीवरील सर्व राष्ट्रें उत्क्रांत, जागृत व लोकसत्ताक होईपर्यंत मानवजातीची प्रगति झपाटयानें होणें अशक्य आहे असा सिद्धांत मॅझिनीनें प्रस्थापित केला. राष्ट्र ही संघटना केवळ आर्थिक नाहीं व नुस्ती राजकीयहि नाहीं; प्रगतीसाठीं मानवजातीला संघटित करावयाचें राष्ट्र हें कार्यक्षेत्र आहे; परमेश्वराचे शासनानुसार व नैतिक नियमांच्या अनुरोधानें राष्ट्र ही संघटना उत्क्रांत होत असते असें मॅझिनीचें मत होतें. राजकारणाच्या ध्येयाविषयीं त्याची कल्पना फार विस्तृत होती. अन्याय व राजकीय विषमता यांचें निर्मूलन करणें हा फ्रेंच राज्यक्रान्तीचा प्रधान हेतु होता; गरीबी व सांपत्तिक विषमता नाहींशी करणें हा रशियन राजक्रान्तीचा मुख्य हेतु आहे; अन्याय व गरिबी दूर करण्याकडे राजकारणाची दृष्टि असलीच पाहिजे पण मनुष्यमात्रांच्या अंतर्यामीं निवास करणाऱ्या नारायणाची जाणीव प्रत्येकाला करून देणें, मनुष्यमात्रांच्या सर्व शक्ति जागृत करणें, समाजामध्यें बंधुभाव, ऐक्य व शांति यांची स्थापना करणें हें मॅझिनीच्या दृष्टीनें राजकारणाचें ध्येय होतें. लोकशाहीवर त्याची अढळ निष्ठा होती; तत्वज्ञानी लोक बुद्धिबलाच्या जोरावर हवीं तीं तत्वें प्रस्थापित करोत— त्यांच्या तत्वपद्धतीला मान्यता देणें हें जनतेच्याच हातीं आहे; म्हणून वैयक्तिक विवेकबुद्धि व लोकमताचा निर्णय यांची एकवाक्यता झालेली असेल त्याचवेळीं आपले विचार सत्य आहेत असें जाणावें असें त्याचें मत होतें. परमेश्वर, मानवजात, राष्ट्र, लोकशाही, कुटुंब व व्यक्ति यांचा परस्पर संबंध लक्षांत घेऊन मॅझिनीने आपली विचारपरंपरा निर्माण केली होती आणि म्हणूनच ती अद्यूनहि अबाधित स्वरूपांत कायम राहिली आहे.

मॅझिनीची मनोरचना निसर्गतःच भावना प्रधान होती; जनतेचें हृदय जागृत करून तिला कार्याकडे प्रवृत्त करणें हेंच त्याच्या जीवनाचें कार्य होतें. त्याच्या लेखांमध्ये जागोजाग उदात्त व काव्यमय विचार दिसून येतात. सरस्वतीची सेवा करावयाचा त्याचा निश्चय इटलीच्या गुलामगिरीमुळें डगमगला व

त्यानें स्वातंत्र्यलक्ष्मीच्या सेवेची प्रतिज्ञा केली. लहानपणींच बुद्धिविकास झाल्यामुळें त्यानें बालपणींच प्रमाणाबाहेर ज्ञान संपादन केलें होतें; पण राजकारणांत प्रत्यक्ष कार्य करावयास लागल्यापासूनच त्याला स्वस्थपणा जन्मभर मिळाला नाहीं; यामुळें पुढें त्याचा व्यासंग कायम राहिला नाहीं. सरस्वतीभक्तांवर व सारस्वतावर मॅझिनीचें विलक्षण प्रेम होतें; पण व्यासंगाची संवय सुटल्यानंतर लहानपणीं आवडणाऱ्या पुस्तकांचे पलीकडे त्यानें फारसे ग्रंथ वाचले नाहींत; यामुळें त्याचें बौद्धिक तेज दिवसानुदिवस कमीच होत गेलें. भावनाप्रधान मनोवृत्तीचा असल्यामुळें मॅझिनीची विचारपद्धति तशीच आणि म्हणून सदोष होती. त्याची भाषा ताजीतवानी होती व त्याच्या पवित्र व चैतन्यपूर्ण विचारांच्या ओघांत सांपडलेला वाचक देहभान विसरून सारखा वहात जातो, तरीहि त्याच्या लेखांमध्यें तर्काला सोडून केलेलीं विधानें जागोजाग सांपडतात. राजकारण व अर्थशास्त्र या विषयांवरील त्याच्या कांहीं विधानांचा नीटसा अर्थबोधहि होत नाहीं. मॅझिनीची विचारपद्धति व लेखनपद्धति शास्त्रशुद्ध नव्हती तरीहि त्याचे लेख अत्यंत लोकप्रिय आहेत; विशेषत: तरुण पिढीमध्यें त्याच्या भक्तजनांची संख्या फारच मोठी आहे. मॅझिनी हा तरुणांचा गुरु होता आणि म्हणूनच गुरुदेवतेच्या आज्ञेवर विसंबून हजारों तरुणांनीं इटलीच्या पायांशीं आपले प्राण अर्पण केले! तर्कशुद्ध विचार करून तत्वज्ञानावर एकादा ग्रंथ लिहून मॅझिनीनें जगाच्या ज्ञानांत भर घातली नाहीं हें खरें आहे; पण त्यानें इटलीच्या तीन पिढ्यांचें चैतन्य जागृत केलें, इटलीसाठीं आत्मार्पण करावयास हजारों तरुणांना सिद्ध केलें आणि इटलीला जगाच्या इतिहासांत स्थान मिळवून दिलें; म्हणून कोणत्याहि कोरड्या तत्वज्ञापेक्षां मॅझिनीची योग्यता फार मोठी आहे असें मानवजातीच्या प्रगतीच्या दृष्टीनें म्हणावयास मुळींच हरकत नाहीं.

उत्कटता हा मॅझिनीच्या विचारपद्धतीचा प्रधान गुण होता. राष्ट्रीय आकांक्षाविषयीं तरुणांचें चैतन्य जागृत करीत असतांना किंवा जुलमी आस्ट्रियाच्या शिरावर शापांचा वर्षाव करीत असतांना त्याचे शब्द श्रवण करणारे लोक अगदीं बेहोष होऊन जात असत. मनुष्यजातीच्या सुबंधुतेचें विवेचन करीत असतांना त्याचे विचार प्रेमानें थबथबून जात आणि परमेश्वरासंबंधीं बोलत असतांना त्याचें मस्तक आदरातिशयानें नमून जात असे. मॅझिनीचे सर्व विचार तावून सुलाखून निघालेले असल्यामुळें त्याचे बोल ऐकतांच श्रोत्यांचें मन एक निष्ठेनें

भरून जात असे. अंत:करणापासून निघालेले शब्द अंत:करणालाच भिडतात! मॅझिनीचे विचार वाचतांच मनुष्याची विवेकबुद्धि जागृत होते आणि जेथें संपूर्ण अंधःकार होता तेथें प्रकाशाचे किरण पसरूं लागतात. मॅझिनीची नजर कोणाच्याहि नजरेला भिडतांच तो मनुष्य आईबाप वगैरे संसारांतील सर्व पाश एकदम तोडून टाकून त्याच्या मागून जावयास सिद्ध होई! मनुष्य जातीला असत्यांत गुरफटून ठेवणारें स्वार्थाचे व पाशवी शक्तीचे धागेदोरे तोडून टाकावयासच तो जन्माला आला होता. मॅझिनीची विचारपद्धति इतकी उत्कट होती, त्याचा आवाज इतका मोहक होता व त्याची नजर इतकी भेदक होती कीं त्याचे दिव्य बोल श्रवण केलेल्या आबालवृद्धांना स्फुरण चढे व ते मॅझिनीचे अनुयायी होऊन राष्ट्रासाठीं आत्मसमर्पण करावयास सिद्ध होत!

मॅझिनीचे धार्मिक विचार त्याच्या राजकीय विचारांइतके उज्वल आहेत. एकोणीसाव्या शतकांत युरोपांत धार्मिक अंदाधुंदी माजली होती. मतामतांच्या व पंथापंथाच्या गलबल्यामध्यें जीझस ख्राइस्टच्या धर्मतत्वांचा मागमूसहि राहिलेला नव्हता. कॅथलिक पंथाचे धर्मगुरु जुलूमजबरदस्तीच्या व सत्तासामर्थ्याच्या मार्गाला लागल्यामुळें सैतानाच्या तावडींत गेले होते. युरोपांतील राष्ट्रें उत्क्रांत होऊं लागलीं होतीं व यामध्यें युरोपियन राजारजवाड्यांचें नुकसान होतें. आपल्या घराण्याच्या हातांतील सत्ता नष्ट होऊं नये म्हणून त्यांनीं अटोकाट यत्न चालविला होता; स्वार्थामुळें सैतान झालेल्या या राज्यकर्त्यांचे हातून प्रजाजनांवर अनन्वित जुलूम होत होता. अशा वेळीं लोकांना परमेश्वराची आठवण करून देणाऱ्या महात्म्याची फार जरूर होती; मॅझिनी राजकारणांत पडला नसता किंवा तो जन्माला आला त्यावेळीं इटली स्वतंत्र असता तर त्यानें मार्टिन लूथरसारखी धर्मक्रान्ति घडवून आणली असती. धर्म या विषयावर अनेक वर्षें विचार करून त्यानें काहीं टिपणें केलीं होतीं; त्यांवरून एक विस्तृत ग्रंथ लिहावयाचा त्याचा बेत होता; एका लगबगीच्या प्रवासांत ही टिपणवही हरवली तो वृत्तांत मागें आलाच आहे; वहीच हरवल्यामुळें ग्रंथलेखनाविषयीं मॅझिनीचा हुरूपहि नाहींसा झाला. धर्म या विषयावरील स्फुट विचार मॅझिनीच्या लेखांत जागोजाग आढळून येतात. Duties of Man, From Council to God, Faith and Future वगैरे निबंध वाचले असतां हें सहज समजून येईल. "मनुष्यमात्राचे अंतर्यामीं सद्गुणांचें व महाशक्तींचें बीज परमेश्वरनिर्मितच आहे;

जन्माजन्मांमधून मनुष्यमात्राची प्रगति होत असते; मानवजातीची प्रगति परमेश्वराच्या शासनानुसार होत आहे; युगांयुगांमधून हें शासन खंडशः प्रकट होत असतें; या प्रगतीची गति वाढविणें हें मनुष्याचें पवित्र कर्तव्य आहे. जग ही कार्यभूमि आहे, जगाला परमेश्वराच्या मंदिराचें स्वरूप प्राप्त व्हावें म्हणून अखंड यत्न करणें हें आपलें कर्तव्य आहे. प्रगतीचा कायदा कार्यक्षम करण्याचें कर्तव्य हें साधन आहे. परमेश्वराचे भक्त संसाराचा त्याग करीत नाहींत, ते जगाची सेवा करतात, जगाला पावित्र्य यावें यासाठीं झटतात. ” मॅझिनीचें राजकारण नैतिक व धार्मिक होतें त्याचप्रमाणें त्याचीं धार्मिक मतें राजकारणाशीं विरोधी नाहींत. राजकारण, धर्म, नीति ह्या सर्वांचें कार्य मानवजातीची प्रगति हेंच आहे आणि म्हणूनच प्रगतीच्या दृष्टीनें विचार करून ठरविलेलीं धर्मतत्वें चिरंतन आहेत. नव्या युगाच्या या नव्या धर्माची स्मृति मॅझिनीनें लिहिली नाहीं ही मोठी खेदाची गोष्ट आहे. त्याच्या विचारांमध्यें तारुण्याची टवटवी होती, चैतन्याचा झोंत होता, पावित्र्याचें तेज होतें, अनुभवाची कसोटी होती, आत्मयज्ञाचें सामर्थ्य होतें व दिव्यदृष्टीची प्रतिभा होती; या सर्व शक्तींच्या साह्यानें उत्पन्न होणारीं धर्मतत्वें किती चैतन्यपूर्ण झालीं असतीं याची कल्पनाहि करवत नाहीं. १८४८ सालीं राज्यक्रान्ति यशस्वी होती तर मॅझिनीनें युरोपच्या नैतिक उद्धाराचें कार्य हातीं घेतलें असतें असा कांहीं लेखकांचा कयास आहे.

मॅझिनीचें वैयक्तिक आयुष्य अत्यंत करुण व हृदयस्पर्शी आहे. सॅव्होनाच्या तुरुंगाची हवा खाऊन आल्यापासून त्याला मरेपर्यंत निवांतपणा मिळाला नाहीं. युरपियन राजदरबार, त्यांचे हस्तक व हेर हात धुवून त्याच्या पाठीस लागले होते. देशोदेशीं भटकत फिरावें लागल्यामुळें त्याचे हातून सारस्वत सेवा झाली नाहीं. पण उपजीविकेचें दुसरें कोणतेंहि साधन नसल्यामुळें इंग्लंडांत त्याला लेखणीच्या जोरावरच पोट भरावें लागलें; मॅझिनीला अशी गरीबी आली म्हणूनच त्यानें बरेच लेख लिहिले; नाहींतर कटवाल्यांबरोबरच्या पत्रव्यवहारांतच त्याची लेखणी झिजून गेली असती. मॅझिनी बाह्य अडचणींना भीक घालणारा नव्हता व परमेश्वरावर त्याची अढळ निष्ठा होती म्हणूनच गरिबीच्या भोंवऱ्यांत व संशयाच्या वावटळींत त्यानें धीर सोडला नाहीं. पाणीदार, करारी व उदार मनोवृत्तीच्या मॅझिनीनें तारुण्यांत देशाच्या गुलामगिरीबद्दल सुतक धरलें व हें व्रत त्यानें जन्मभर पाळलें. दैवी तेजानें देदीप्यमान, असलेल्या स्वातंत्र्य

देवतेच्या भक्तांना आजन्म हद्दपारींत, वंदिवासांत अथवा सुतकांत रहावें लागावें व फांशीवर जावयाची त्यांनीं जन्मभर अपेक्षा करीत रहावें असाच त्या वेळचा योग होता. १९०५ सालीं मॅझिनीची शतसांवत्सरिक जन्मतिथी साजरी करण्यांत आली त्यावेळीं मॅझिनीचें माहात्म्य श्रवण करावयास इटलीचा राजा आपल्या मंत्रिमंडळासह हजर राहिला होता; त्या दिवशीं शिक्षणमंत्र्याच्या हुकुमावरून इटलींतील प्रत्येक शाळेंत मॅझिनीचा उत्सव करण्यांत आला; मॅझिनीच्या स्मरणार्थ उभारलेल्या पुतळ्याचे भोंवतीं त्यावेळीं इटली व इंग्लंड या देशाची निशाणें गुंडाळण्यांत आलीं होतीं ! इटली ही मॅझिनीची माता होती पण इंग्लंड ही त्याची मानलेली आई होती ! शंभर वर्षांनीं त्याच्या स्मारकाला हीं निशाणें गुंडाळण्यांत आलीं पण याच देशींच्या दरबारांनीं त्याचा नायनाट करण्यासाठीं एकेकाळीं अटोकाट यत्न केला होता. वेगवेगळ्या राष्ट्रांच्या दरवाजांत निवाऱ्यासाठीं आलेल्या या महात्म्याचा अनेक ठिकाणीं धिःकार झाला ! अंगीकृत कार्याच्या दृष्टीनें त्याचें जीवन विफळ ठरलें; साऱ्या जन्मांत अधिकाराची व जबाबदारीनें काम करावयाची संधि त्याला रोम शहरीं फक्त चारच महिने मिळाली होती; या दिवसांत केलल्या कार्यावरून कोणीहि निर्णय काढील कीं इटलीचीं अधिकारसूत्रें मॅझिनीच्या हातीं असतीं तर इटलीच्याच नव्हे तर संपूर्ण युरोपच्या इतिहासास वेगळें व उच्चतर वळण लागलें असतें. साऱ्या जन्मांत त्याला गृहसौख्याचा लेशहि प्राप्त झाला नाहीं. जोसेफचें व डॉक्टर गायकोमो यांचें विशेष रहस्य नव्हत पण आपल्या आईवर मात्र मॅझिनीचें विलक्षण प्रेम होतें. १८४८ सालीं त्याचे वडील आणि १८५२ सालीं त्याची आई मरण पावली; पण हद्दपारीची शिक्षा झाल्यापासून पितापुत्रांची भेटच झाली नाहीं. स्वतंत्र झालेल्या इटलीकडे आपल्या आईनें अभिमानानें पहावें आणि मग तिनें आपणांस प्रेमानें कुरवाळावें ही मॅझिनीची एकच वैयक्तिक आकांक्षा पण तीहि निष्फळ झाली ! जन्मदात्या मातेच्या मृत्यूनंतर मातृभूमी हीच आपली जन्मदात्री मानून तिची एकनिष्ठ सेवा करावयाची असा त्यानें निश्चय केला ! मॅझिनी हा आजन्म ब्रम्हचारी होता. संगमरवराच्या पुतळ्यासारखें त्याचें सुंदर मुख व विलक्षण तेजानें चमकणारे त्याचे डोळे पाहून अनेक तरुणी त्याचेवर लुब्ध झाल्या होत्या. पण त्या सर्वांना त्यानें मातेसमान मानलें. गायडिटा सिडोली या स्त्रीवर मॅझिनीचें विलक्षण प्रेम होतें.

गायडिचा भाऊ तरुण इटलींत सामील झाल्यामुळें हद्दपार झाला होता. सोळाव्या वर्षी गायडिटाचा विवाह जिओव्हॅनी सिडोली या तरुण हद्दपाराबरोबर झाला. ती मॅझिनीपेक्षां एक वर्षानें मोठी होती; लग्नानंतर थोडक्याच वर्षांना जीओव्हॅनी साहेब मरण पावले. वैधव्यानंतर पांच वर्षांनीं तिची व मॅझिनीची प्रथमभेट मार्सेलिस येथें झाली; भेटीनंतर झालेल्या बोलण्याचालण्यामुळें त्यांचें एकमेकांवर प्रेम बसलें व सॅव्हॉयच्या स्वारीवर निघावयाचे पूर्वीच त्यांचा पुनर्विवाहाचा बेत ठरला; पण तिचीं चार मुलें रेजियो येथें होतीं—त्यांचेकडे तिचें अंत:करण सारखें ओढ घेऊं लागलें; त्यांना भेटण्यासाठीं सरकारी परवाना मिळविण्याकरितां ती फ्लॉरेन्सला गेली; पण सरकारनें तिची व मुलांची भेट होऊं दिली नाहीं. सॅव्हायचा बेत फसल्यानंतर मॅझिनी इंग्लंडांत गेला; इंग्लंडांत विवाह करून एकत्र रहावयाचा त्यांचा बेत होता पण गरीबीच्या भोंवऱ्यांत सांपडल्यामुळें मॅझिनीला विवाह करतां आला नाहीं. त्यांचें एकमेकांवरील प्रेम आमरण कायम टिकलें. पण प्रत्येकाच्या अंत:करणांत या प्रेमाला एक प्रतिस्पर्धी होता; मॅझिनीच्या हृदयावर इटलीचा ताबा होता आणि गायडिटाचा जीव मुलांमध्यें अडकून राहिला होता. चवदा वर्षांच्या वियोगानंतर रोम येथें या दोघांची फिरून गांठ पडली; रोमच्या वेढयांत गायडिटाचा एकुलता एक मुलगा ॲशील हा मारला गेला. १८७१ सालीं गायडिटा मरण पावली. तिजवरील मॅझिनीचें प्रेम अत्यंत पवित्र व गंभीर होतें. वैयक्तिक इच्छा व आकांक्षा यांमध्यें असें अपयश आलें तरी त्यामुळें त्याचा जीव कोळून गेला नाहीं किंवा अंगीकृत कार्यावरील त्याचें लक्षहि कमीं झालें नाहीं; इतकेंच नव्हे तर राष्ट्रकार्यासाठीं कायम केलेल्या दिशेनें प्रयत्न करीत असतांना आलेल्या अनेक अपयशांमुळेंहि त्यानें राष्ट्रकार्याचा त्याग केला नाहीं किंवा इटलीच्या उज्वल भवितव्याबद्दल तो निराश झाला नाहीं!

मॅझिनीनें युरपियन राजकारणाला जें वळण लाविलें तें अप्रत्यक्ष असल्यामुळें त्याच्या समकालीन इतिहासकारांना त्याच्या माहात्म्याचा बोध झाला नाहीं. इटलींतील तरुणांना मॅझिनी हा देवदूतच वाटत असे. युरपियन देशांमध्यें भटकत असतांना जागोजाग लोकसत्ताक संस्था स्थापन करून त्यानें लोकजागृति केली. फ्रेंच राज्यक्रान्तीनंतर उदयास आलेल्या राजकीय कार्यकर्त्यांमध्यें मॅझिनीची गणना प्रमुखपणें केली पाहिजे. मॅझिनीच्या शिकवणुकीमुळें इटलींत उठलेल्या उत्साहाची आज नस्ती कल्पनाहि करणें अशक्य झालें आहे. राष्ट्रजागृति

व्हावयाची असते तेव्हां आत्मार्पणासाठीं अहमहमिका सुरू होते—इटलीमध्यें लोकांनीं आत्मार्पणाला सिद्ध व्हावें अशी तुतारी फुंकून मॅझिनीनें त्यांना जागृत केलें व इटलीच्या उद्धाराचा प्रश्न व्यावहारिक राजकारणांत आणला. मॅझिनीच्या राष्ट्रधर्मामुळें युरपियन राष्ट्रें जागृत होऊन उत्क्रांत होऊं लागलीं. केवळ इटलीच्या उद्धारासाठींच नव्हे तर सर्व राष्ट्रांच्या स्वातंत्र्यासाठीं, लोकशाहीच्या यशासाठीं व मानवजातीच्या प्रगतीसाठीं परमेश्वरानें हा आपला दूत पाठविला होता. मॅझिनीच्या लोकसत्ताक कटवाल्यांनीं ऑस्ट्रियावर व इटालियन संस्थानिकांवर अखंडितपणें हल्ले चढविले नसते तर युरपियन राष्ट्रांची उत्क्रांति इतक्या त्वरेनें कधींहि झाली नसती. यशस्वी झालेल्या बंडालाच क्रांति म्हणतात; मॅझिनी ज्या मार्गानें क्रांति घडवून आणूं पहात होता त्या मार्गाला यश आलें नाहीं म्हणून मॅझिनी व त्याचे अनुयायी बंडखोर व कटवाले ठरले पण काव्हूरचा मार्ग यशस्वी झाला म्हणून त्याला मुत्सद्यांचा अग्रणी व इटलीचा संस्थापक ह्या पदव्या मिळाल्या. युरपियन राष्ट्रांच्या उत्क्रांतींतील आद्यस्थान इटलीकडे आहे व इटलीच्या उद्धारासाठीं कार्य करणाऱ्या महापुरुषांमध्यें अग्रपूजेचा मान मॅझिनीचा आहे; या दृष्टीनें विचार केला असतां मॅझिनीच्या प्रत्यक्ष राजकीय कार्याच्या महतीचा बोध सहज होणार आहे.

मॅझिनीचें नांव काढतांच अनेकांच्या मनांत अनेक विचार उभे राहतात. देशभक्त, क्रान्तिकारक, लोकसत्तावादी, मुत्सद्दी, तत्वज्ञानी, महात्मा, देवदूत, स्वप्नसृष्टींत गर्क असलेला कवि, विध्वंसक, लफंगा, खलाशी व कोळसेवाले यामध्यें सवंग लोकप्रियता संपादन करणारा स्वयंभू पुढारी, फंडगुंड वगैरे अनेक विशेषणें त्याला लावण्यांत येतात. यांपैकीं कांहीं विशेषणें मॅझिनीला त्याच्या भक्तांनीं दिलेलीं आहेत व कांहीं पदव्या त्याला त्याच्या शत्रूंनीं बहाल केलेल्या आहेत हें उघड आहे. मॅझिनीला शिवीगाळी करणारे लोक आपलीं विधानें कोणत्या पुराव्याच्या आधारानें करतात हें अझून प्रसिद्ध झालेलें नसल्यामुळें स्वार्थासाठीं अथवा सूडासाठीं त्याजवर या अपशब्दांचा वर्षाव करण्यांत आलेला असला पाहिजे असें गृहीत धरावयास फारशी हरकत नाहीं.असो.ज्यावेळीं मॅझिनीनें राष्ट्रधर्माच्या तत्वांचा पुरस्कार व प्रचार केला त्यावेळीं देशभक्ति हा भयंकर गुन्हा होता; ज्यावेळीं त्यानें लोकसत्ताक तत्वाचें विवेचन केलें त्यावेळीं राजेरजवाडयांची संख्या व सामर्थ्य हल्लींपेक्षां अनेकपटींनें अधिक होतें. राजशाहीपेक्षां पारतंत्र्यावर मॅझिनीचा विशेष कटाक्ष होता; परक्यांचे अंमलाखालीं

राहणें म्हणजे परमेश्वराविरुद्ध गुन्हा करणें आहे, अभिमानशून्यतेचा, भेकडपणाचा व पशुवृत्तीचा कळस आहे असें त्याचें मत होतें; प्रत्येक राष्ट्रानें स्वतःच्या सामर्थ्यानेंच स्वातंत्र्य संपादन केलें पाहिजे, स्वातंत्र्य हा प्रत्येक राष्ट्राचा जन्मसिद्ध हक्क आहे, स्वातंत्र मिळविणें व तें अबाधितपणें कायम ठेवणें हें व्यक्तिमात्राचें कर्तव्य आहे असें त्याचें मत होतें. परक्यांच्या जुलमी अंमलाला त्याचा विरोध होता. त्याचप्रमाणें श्रीमंतांच्या अरेरावीला आणि विशिष्ट व आनुवंशिक हक्कदार वर्गामुळें उत्पन्न होणाऱ्या विषमतेला त्याचा तितकाच विरोध होता. फ्रेंच क्रान्तीच्या पुढाऱ्यांनाहि आनुवंशिक हक्कदार वर्ग नको होता; पण विषमता व अन्याय उत्पन्न करणाऱ्या या पद्धतीचें निर्मूलन करण्याऐवजीं त्यांनीं हक्कदार व्यक्तींचा नि:पात करण्यावरच विशेष भर दिला. मॅझिनीचा या व्यक्तींना विरोध नव्हता, त्याला या पद्धतीचें उच्चाटण करावयाची इच्छा होती. फ्रेंच राज्यक्रान्तीच्या पुढाऱ्यांनीं हक्क मिळविण्यासाठीं लोकांना उठवून दिलें; मॅझिनी हक्कांसाठीं तडफडत नव्हता; आपलें कर्तव्य नीटपणें बजावतां यावें म्हणून राष्ट्रांना व व्यक्तींना स्वातंत्र्य असावें असें त्याचें मत होतें. राष्ट्रस्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित ठेवावें अशी परमेश्वराची आज्ञा आहे आणि म्हणून स्वातंत्र्यसंपादन व स्वातंत्र्यरक्षण हें व्यक्तिमात्राचें पवित्र कर्तव्य आहे, असें त्याचें मत होतें. हक्कांच्या नांवानें ओरडा केल्यामुळें फ्रेंच लोकांच्या पाशवी मनोवृत्ति जागृत झाल्या व राज्यक्रान्तीचे वेळीं रक्ताचे पाट वाहिले; मॅझिनीच्या राष्ट्रीय चळवळीमध्यें भगवंताचें अधिष्ठान होतें आणि म्हणूनच इटलीमध्यें यादवीचे पायीं रक्तपात झाला नाहीं व राष्ट्रनौका सुरक्षितपणें बंदरांत आणतां आली. इटलीची राज्यक्रान्ति द्वेषाच्या पायावर उभारलेली नव्हती. मॅझिनीच्या राजकारणांत प्रवृत्ति व निवृत्ति यांचें एकीकरण झालेलें होतें; त्याला समाजाचें व स्वदेशाचें दास्यविमोचन हवें होतें त्याचप्रमाणें संवर्धनहि हवें होतें. त्याचें निशाण केवळ इटलीचें नव्हतें. तो परमेश्वराचा झेंडा होता. मॅझिनीची देशभक्ति सर्वभूतात्मक धर्मनिष्ठेपासून उद्भूत झाली होती. त्याची मुत्सद्देगिरी मानवजातीच्या अंतिम कल्याणाच्या दृष्टीची होती. मॅझिनीचें ध्येय इतकें उदात्त होते कीं, एकाच देशांतील व एकाच जन्मांतील कार्यानें त्याला यश येणें अशक्य होतें. काव्हूरच्या मुत्सद्देगिरीमुळें, व्हिक्टर इमॅन्युएलच्या दूरदर्शीपणामुळें व गॅरिबाल्डीच्या समरशौर्यामुळें इटलीला स्वराज्य प्राप्त झालें. मॅझिनीला इटलींत लोकसत्ता स्थापन करावयाची होती. जगाच्या प्रगतीसाठीं

२१

राष्ट्रसंघ निर्माण करावयाचा होता व या संघटित कार्याचें नेतृत्व इटलीकडेच यावें इतकी इटालियनांचीं प्रगति करावयाची होती. मॅझिनीच्याच दृष्टीनें विचार करतां त्याला अंगीकृत कार्यांत यश आलें नाहीं. नवयुगाच्या स्थापनेसाठीं खटपट करणाऱ्या या अघाडीच्या बारगीराला अपयश आलें यांतच त्याची महती आहे. म्हणूनच एकोणीसाव्या शतकांतील युरपियन देशभक्तांमध्यें व क्रांतिकारकांमध्यें मॅझिनी हाच अग्रगण्य होय.

मॅझिनीचें सामर्थ्य त्याच्या वाणींत, लेखणींत व मनगटांत होतें; पण त्याच्या माहात्म्याचा खरा पाया त्याच्या निष्कलंक शीलावरच आहे; चोहीं-कडून आकाश कोसळलें तरी न डगमगतां त्यानें आपलें कार्य एकनिष्ठेनें चाल-विलें होतें. त्याचे अंतःकरणांत स्वार्थबुद्धीचा लेशहि नव्हता; त्याची कर्तव्य-भावना निष्काम होती; फलाशाविरहित कर्तव्यबुद्धीमुळेंच मनुष्याला आत्मयज्ञ करतां येतो. आपल्या आयुष्याचें ध्येय विवेकपूर्वक ठरविल्यानंतर त्यानें ध्येया-साठीं सर्व सुखांचा त्याग केला, ध्येयाला अनुकूल नसलेल्या मनोवृत्ति त्यानें जागींच जिरवून टाकल्या. निष्कलंक आयुष्याशिवाय तत्कालीन इटा-लियन परिस्थितींत ध्येयाशीं एकनिष्ठ राहणें अशक्य होतें. पुढाऱ्यांच्या खासगी जीवनक्रमाचा विचार करावयाचा नाहीं, ते शीलभ्रष्ट असले तरी त्या-साठीं त्यांच्या सार्वजनिक कार्याचा धिःकार करावयाचा नाहीं. असा युरपियन लोकांचा प्रघात आहे. अशा सर्व दोषांपासून मॅझिनीचें चरित्र अलिप्त आहे इतकेंच नव्हे तर उदात्त शीलामुळें त्याचें जीवन उज्वल आहे. त्याचें चारित्र्य उदात्त होतें. इतकेंच नव्हे तर ज्या ज्या व्यक्तीबरोबर त्याचा संबंध येई त्यांचा त्या क्षणापासून उद्धार होई अशीं अनेक उदाहरणें नमूद करून ठेवण्यांत आलीं आहेत. चारित्र्य हीच मॅझिनीच्या माहात्म्याची कोनशिला आहे. लोकप्रियतेमुळें मॅझिनी चढून गेला नाहीं किंवा लोकांनीं शिव्याशापांचा वर्षाव केला तेव्हां तो चिडून गेला नाहीं. त्याचें अंतःकरण उदार होतें; त्याचे अंगीं गर्वाचा लेशहि नव्हता; तो सुस्वभावी व प्रेमळ होता; गोरगरीबांना मदत करावयासाठीं स्वतःची उपासमार होईल याकडेहि तो दुर्लक्ष करीत असे. प्रेमाला व स्वगृहाला पारखें झालेलें त्याचें हृदय मित्रांसाठीं तहानेलें होतें. गरीबी व संकटें यांचा त्यानें स्वसंतोषानें स्वीकार केला. स्वित्झरलँड व लंडन येथें भोगलेल्या यातनांमुळें त्याच्या गंभीर चेहऱ्यावर दुःखाची छाया पसरली होती. तरी या दुःखमय

गंभीरतेमधूनहि प्रेमानें ओथंबलेले त्याचे शब्द ऐकून त्याच्या अनेक मित्रांना समाधान प्राप्त होत असे.

अर्थात इटलीचा जनक म्हणूनच नव्हे तर जगांतील अत्यंत उच्च दर्जाचा नागरिक म्हणून येत्या पिढ्या मॅझिनीचें नांव घेतील यांत संशय नाहीं. जगांतील अत्यंत श्रेष्ठ अशा महात्म्यांमध्यें व साधुसंतांमध्यें मॅझिनीची गणना सदैव होत राहील यांत संशय नाहीं. स्वतःच्या विवेकबुद्धीची हांक मनुष्यांना जसजशी अधिक स्पष्टपणें ऐकूं येऊं लागेल, आत्मयज्ञ व निष्काम कर्तव्य यांचें माहात्म्य यश व सामर्थ्य यांपेक्षां अधिक आहे अशी मनुष्यांची जसजशी खात्री होत जाईल तसतसें मॅझिनीचें माहात्म्य वाढत जाईल यांत संशय नाहीं.

REFBK-0002250

२२५०

सुदामा पेपर मार्ट.

कागद शाई वगैरे छापखान्यास लागणाऱ्या मालाचे व्यापारी.

९ मिंटरोड, जनरल पोष्टासमोर,

फोर्ट, मुंबई.

# अमृतांजन.

हें ठणका, कळा, वेदना इत्यादि व्याधींवर अचूक गुणकारी आहे. आज २५ वर्षें याच्या एकसारख्या वाढत्या खपावरून याची सहज कल्पना होते. लाखों कुटुंबें आज अमृतांजन वापरीत आहेत; कारण तें सर्व प्रकारच्या वेदना, मुरगळणें, संधिवात, कफ, सूज आणि अशा प्रकारच्या पुष्कळ व्याधि निखालस बऱ्या करितें. म्हणून ज्यांनीं हें अद्याप अनुभवलें नसेल त्यांनीं खात्री करून घ्यावी. किं. १० आणे व्ही. पी. खर्च निराळा.

**अमृतांजन डेपो, फोर्ट, मुंबई.**

मुंबई इलाख्यांतील पहिले एम्. डी.

# डॉ. अण्णा कुंटे.

## यांचीं गुणकारीं औषधें.

**बालग्रहांतक.**
(मुलांचे आंकडी अपस्मारा-
वर औषध.)

**अर्शःकुठार मलम.**
(मूळव्याधीचे मोडावर
मलम.

किंमत प्रत्येकीं एक रुपया. पोस्टेज माफ.

* मुंबई येथील सर्व केमिस्ट अँड ड्रगिस्ट यांचे दुकानीं मिळतील.

**धी गणेश फार्मसी, मुंबई, नं. ४**

---




तापावर
बाटली घेतानां
**कर्णिक** यांची
हीच बाटली
मागवा.

**कर्णिक ब्रदर्स, गिरगांव–मुंबई.**

शरीरांतील रक्त बिघडल्यानें सर्व रोगांची
उत्पत्ति होते म्हणून रक्त शुद्ध ठेवणें
प्रत्येकाचें कर्तव्य आहे. बिघडलेलें
रक्त शुद्ध करण्याचा
खात्रीचा इलाज म्हणजे

## डॉ. वामन गोपाळ यांचा

आयोडाइज्ड

# सार्सापरिला

घेणें हाच होय

असें लक्षावधी लोकांनीं ६० वर्षांचे अनुभवानें ठरविलें आहे.

**आणि म्हणून निरनिराळ्या प्रदर्शनांतून त्यांस सोन्याचीं व चांदीचीं पदकें बक्षीस मिळालीं.**

याचे सेवनानें उपदंश किंवा त्यापासून होणारे इतर रोग जसे पक्षघात, संधिवात, अंगावर काळे डाग पडणें अंग सुजणें, शरीरांत आग होणें, अंगावर देवीसारखे फोड उठणें वगैरे विकार पार नाहींसे होतात.

**बाटलीची किं. १-४-०. चार बाटल्यांनीं उत्तम गुण येतो. चार बाटल्यांची किं. ४-८-० पोस्टखर्च निराळा.**

प्रत्येक शहरीं प्रसिद्ध व्यापाऱ्यांकडे मिळेल. | डॉ. गौतमराव केशव आणि सन्स, ठाकुरद्वार, मुंबई.

सी. गोखले यांचें मुलांस आवडणारें

# अडुळसा सरबत.




मुलांच्या सर्व जातींच्या खोकल्याच्या विकारांवर अप्रतीम गुणकारी असल्याबद्दल प्रख्यात डॉ. भडकमकर एम्. ए. एम्. डी. यांनीं प्रशंसा केली आहे. बाटली किं. १॥ रु. टपालखर्च वेगळा.

---

डॉ. मॅन व डॉ. भडकमकर यांचीं प्रशंसापत्रें मिळालेला

# सुवर्णराज वंगयुक्त गुलकंद

घेतल्यानें कडकीसंबंधीं सर्व विकार जाऊन शक्ती वाढते.

एक रतली डबा १। रु. ट. ख. ८६ आणे.

पत्ता:—जोशी आणि सन्स.

छत्र्यांचें घर, गिरगांव बॅक रोड, मुंबई.

# ब्राह्मी तेल.

मेंदूचे विकार व डोकें दुखणें यांवर—जागरण करणार—नाटकी, सर्कसवाले, तारमास्तर, स्टेशनमास्तर, वगैरे व मानसिक श्रम करणारे—विद्यार्थी, वकील, डॉक्टर, जज्ज वगैरे लहानथोर स्त्री पुरुषांस वापरण्यास योग्य, यानें त्रासामुळें गेलेले केस पुनः येतात. मो. बा. १८२, म. बा. ८१०, ल. बा. ८३, पॅ. पो. ख. निराळा. व्यापारी लोकांस सवलतीनें मिळेल.

| | | | |
|---|---|---|---|
| **बाळबाळंतिणीकरितां औषधें** | | **पौष्टिक औषधें.** | |
| बाळंतकाढा नं. १ किं. | ८१४ | सूतशेखर | तो. ६ रु. |
| बाळंतकाढा नं. २ ,, | ८१४ | नागेश्वररस | ,, ६ रु. |
| द्राक्षासव बाळंतिणीकरितां | ८१४ | सुवर्णमालिनी वसंत | ६ रु. |
| कुमारी आसव | ८१४ | ,, ,, नं. १ | १२ रु. |
| प्रतापलंकेश्वर तो. | २ रु. | पूर्णेंदूरस | १२ रु. |
| वातविध्वंस ,, | ४ रु. | मन्मथरस | १२ रु. |
| बाळकडु बा. | ८३ | चतुर्मुख | १० रु. |
| दशमूलकाढा बा. | १८२ | लक्ष्मीविलास | १५ रु. |
| महावातास्त्र तेल | १ रु. | वसंतकुसुमाकर | १५ रु. |

शिवाय टिकाऊ काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें वगैरे पांचशेंवर औषधें तयार आहेत. सविस्तर माहितीचा क्याटलाग सहा आणे आले असतां आणि लहान क्याटलाग व रुग्णपत्रिका एक आणा आला असतां पाठवूं.

टेलिफोन नंबर २२७८ किंवा ९८२४,

**दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स,**
दुकान—ठाकुरद्वार, मुंबई नं. २.
कारखाना—चेंबूर जि. ठाणें.